# शिवराज्य व शिवकाल

## (शिवकालीन महाराष्ट्र)

लेखक

**वासुदेव कृष्ण भावे**, बी. ए., पुणें

( 'पेशवेकालीन महाराष्ट्र', 'मुसलमानपूर्व महाराष्ट्र', 'युगप्रवर्तक शिवाजी-महाराज' इत्यादि ग्रंथांचे कर्ते )

चैत्र शुद्ध ९ शके १८७९

८ एप्रिल १९५७

मूल्य ७॥ रुपये

# शिवराज्य व शिवकाल

## ( शिवकालीन महाराष्ट्र )

लेखक

**वासुदेव कृष्ण भावे**, बी. ए., पुणें
( 'पेशवेकालीन महाराष्ट्र', 'मुसलमानपूर्व महाराष्ट्र', 'युगप्रवर्तक शिवाजी-महाराज' इत्यादि ग्रंथांचे कर्ते )

चैत्र शुद्ध ९ शके १८७९
८ एप्रिल १९५७

मूल्य ७॥ रुपये

प्रकाशक :
नारायण वासुदेव भावे,
२२६ सदाशिव पेठ,
पुणें २.

• • •





• • •

मुद्रक :
श्री. ज. श्री. टिळक,
केसरी मुद्रणालय,
५६८ नारायण पेठ,
पुणें २.

# कांहीं संदर्भ-ग्रंथ



१ शिवचरित्र-निबंधावलि.
२ शिवचरित्र-साहित्य.
३ शिवकालीन पत्रसारसंग्रह.
४ शिवचरित्र-प्रदीप.
५ शिवाजी सावनीर.
६ शिवदिग्विजय.
७ शिवछत्रपतींचें चरित्र ( ले. – कृष्णाजी अनंत सभासद ).
८ शिवछत्रपतींचें चरित्र ( मल्हारराव चिटणीसकृत ).
९ मराठा स्वराज्य-संस्थापक श्रीशिवाजीमहाराज ( ले. – चिं. वि. वैद्य ).
१० इतिहास-संग्रह.
११ इतिहास-मंजरी.
१२ मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें ( ले. – वि. का. राजवाडे ).
१३ राजवाड्यांच्या प्रस्तावना.
१४ कोंकणच्या इतिहासाचीं साधनें ( सं. – शां. वि. आवळसकर ).
१५ भा. इ. सं. मंडळ, त्रैमासिक ( इ. स. १९४८-४९ ).
१६ श्रीसमर्थ-चरित्र ( ले. – स. खं. आळतेकर ).
१७ श्रीसमर्थावतार ( ले. – शं. श्री. देव ).
१८ शिवाजीची राजनीति ( ले. – भा. वा. भट ).
१९ Sandas and Letters ( By G. C. Vad ).
२० Shivaji the Great ( By Dr. Balkrishna ).
२१ Administration of Shivaji ( By Dr. S. N. Sen ).
२२ Foreign Biographies of Shivaji ( By Dr. S. N. Sen ).
२३ Studies in Literary History, Vol. II ( By Dr. P.K. Gode )
२४ House of Shivaji ( By Sir J. N. Sarkar ).

# परिपूर्ति

भारतांत मुसलमानांचें आगमन होण्यापूर्वी अनेक राष्ट्रें होतीं. त्यांपैकीं कांहीं स्वायत्त होतीं व कांहीं परतंत्र होतीं. जीं राष्ट्रें परतंत्र होतीं त्यांजवर स्वधर्मीय व स्वदेशीय राजांची सत्ता असल्यामुळें त्या परतंत्र राष्ट्रांच्या धर्मास, संस्कृतीस व समाजरचनेस त्यांजपासून धक्का पोंचला नव्हता. या दृष्टीनें त्यांचें पारतंत्र्य नाममात्र असून पारतंत्र्याचीं दुःखें त्यांना भोगावीं लागत नव्हतीं. या कारणानें आपण परतंत्र आहोंत याची जाणीवहि त्यांना नव्हती व ती सत्ता उलथून पाडण्याचा प्रयत्नहि तीं करीत नव्हतीं. अशा स्थितींत ज्यांची धर्माच्या झेंड्याखालीं एकजूट झाली आहे, जे बुभुक्षित व कांहीं अंशीं रानटी आहेत व ज्यांच्यांत नव्यानेंच स्वीकारल्यामुळें धर्मवेड संचरलें आहे, अशा वायव्य सीमेपलीकडे राहणाऱ्या मुसलमानांनीं इ. स. च्या दहाव्या शतकांत भारतांत प्रवेश करून हळूहळू दिल्लीस राज्य स्थापिलें व त्याभोंवतालचा प्रदेश जिंकण्यास प्रारंभ केला. त्यामुळें भारतांतील जुनीं राष्ट्रें मोडत व विस्कळीत होत चाललीं. या उपद्रवाचा पहिला तडाखा उत्तर भारतास बसून त्यांतील अंग, वंग, कलिंग, कोसल, गांधार, मगध इत्यादि राष्ट्रें धुळीस मिळून त्यांचें नांवहि शिल्लक राहिलें नाहीं.

उत्तर भारतांत यवनांची सत्ता तीनशें वर्षांत दृढमूल झाल्यानंतर दक्षिण भारताची पाळी चौदाव्या शतकांत आली. अल्लाउद्दिन खिलजी याच्या स्वारीचा तडाखा प्रथम महाराष्ट्रास बसला व त्यानंतर आंध्र, कर्नाटक, गोमंतक इत्यादि राष्ट्रें मुसलमानांच्या टांचेखालीं सांपडलीं. हा परसत्तेचा लोंढा थेट रामेश्वरापर्यंत जाऊन पोंचला असता. पण तुंगभद्रेच्या तीरावर विजयानगराच्या राजांनी त्याला अडवून धरल्यामुळें तुंगभद्रेच्या दक्षिण तीरावरील हिंदुधर्म व हिंदु-संस्कृति यांचा बचाव झाला. या जगांत क्रियेला प्रतिक्रिया नेहमींच होत असते. त्या नियमास धरून हिंदुधर्मरक्षणार्थ काशीपासून रामेश्वरापर्यंत सर्वत्र ईश्वरनिष्ठ संत उत्पन्न होऊन त्यांनीं आपल्या नितान्त धर्मनिष्ठेनें व उज्ज्वल चारित्र्यानें देव व धर्म यांना महंमदी धर्मापासून

रक्षिण्यांत बऱ्याच अंशीं यश मिळविलें. ते धर्म रक्षूं शकले, पण जनतेंत प्रतिकारशक्ति मात्र उत्पन्न करूं शकले नाहींत.

इतर प्रांतांतल्याप्रमाणें महाराष्ट्रांतहि संत उत्पन्न झाले व आश्चर्य हें कीं त्यांनींहि इतर प्रांतांतील संतांनीं जें सहिष्णुपणानें धर्मरक्षणाचें कार्य केलें, तेंच कार्य तंतोतंत पार पाडलें; याचें कारण सर्वत्र परिस्थिति समान होती हेंच होय. जशी धार्मिक स्थिति सर्वत्र समान होती, तशी राजकीय स्थितिहि समानच होती. ही दोन्ही प्रकारांची स्थिति समान असतां त्या दोन्ही स्थितींना कलाटणी देणारे दोन महापुरुष एकाच वेळीं महाराष्ट्रांत जन्मास आले. यांपैकीं धार्मिक स्थितीस कलाटणी देणारे श्रीसमर्थ रामदासस्वामी व राजकीय स्थितीस कलाटणी देणारे श्रीछत्रपति शिवाजीमहाराज होत. समर्थांच्या लक्षांत हें आलें कीं नुसत्या सहिष्णुतेनें धर्मरक्षण कांहीं काल झालें, तरी तें चिरकाल टिकणार नाहीं. तें चिरकाल टिकावयास पाहिजे असेल तर ज्यांच्या हल्ल्यां-पुढें हिंदु धर्माची पिछेहाट होत चालली आहे त्या मुसलमानी सत्तेचा नायनाट करण्याची राजकीय व नैतिक शिकवण समाजास देऊन समाज जयिष्णु म्हणजे प्रतिकारक्षम बनविला पाहिजे. पण नुसती तशी शिकवण अपुरीच पडणार! त्या शिकवणीचा फायदा घेणारा कोणी वीर पुरुष पुढें यावयास पाहिजे होता व तो शिवाजीरूपानें आला. इतर प्रांतांत साधुसंत असतांना त्यांत एखादा रामदास उत्पन्न न होतां तो महाराष्ट्रांत उत्पन्न व्हावा आणि इतर प्रांतांत शूर पुरुष असतांना त्यांत एखादा शिवाजी उत्पन्न न होता तो महाराष्ट्रांत उत्पन्न व्हावा यास काकतालीय न्याय म्हणावा, ईश्वरी संकेत म्हणावा कीं परिस्थितीचा परिणाम म्हणावा हें वाचकांनींच ठरवावें.

## राष्ट्रीयत्वाची व्याख्या

शिवाजी व रामदास या दोघांनीं मिळून महाराष्ट्राचें नवीन कालास अनुरूप असें नवें राष्ट्र बनविलें. मग प्रश्न असा कीं त्यापूर्वी भारतांत जीं राष्ट्रें होतीं तीं कोणत्या प्रकारचीं होतीं ? यासाठीं प्रथम राष्ट्र या शब्दाची पाश्चात्त्य विद्वानांच्या दृष्टीनें व्याख्या कोणती हें आपण पाहूं. पाश्चात्त्य लेखक प्रो. होलकोंबे यानें राष्ट्रीयत्वाची व्याख्या केली आहे ती अशी – ‘विशिष्ट प्रदेशांत राहणाऱ्या लोकांनीं सामुदायिकपणें केलेले उज्ज्वल पराक्रम वा

त्यांजवर आलेलीं सामुदायिक संकटें व दुःखें यांविषयीं परंपरागत स्मृतीच्या योगानें त्या लोकांत एकमेकांविषयीं उत्पन्न झालेली सहानुभूति व ममत्व यांजपासून जी भावना निर्माण होते तेंच राष्ट्रीयत्व.'

ब्लंटस्ली या राजनीतिशास्त्रज्ञानें राष्ट्राची व्याख्या येणेंप्रमाणें केली आहे. 'राष्ट्र हा एक विभिन्न व्यवसाय करणाऱ्या लोकांचा समूह आहे. या समूहांत समानतेची भावना वंशपरंपरेनें उत्पन्न झालेली असली पाहिजे. त्यांची भाषा, चाली, रीति व संस्कृति हीं समान असावीं. त्या योगानें त्यांच्यांत ऐक्याची भावना उद्भवावी व त्यांस आपलें अस्तित्व इतरांपासून पृथक् आहे असें वाटूं लागावें.'

वरील राष्ट्रीयत्वाच्या व्याख्या पाश्चात्त्यांनीं केल्या आहेत. त्याजप्रमाणें भारतीय नीतिशास्त्रवेत्यांनींहि राष्ट्रीयत्वाच्या व्याख्या केल्या आहेत. त्यांपैकीं गौतम हा आपल्या न्यायसूत्रांत पुढील व्याख्या करतो – "विविध धातूंनीं युक्त अशा खाणींची संपन्नता, फलदायी वृक्षांची समृद्धि, धन, मोठालीं नगरें व ग्रामें, उत्कृष्ट धान्याची उत्पत्ति, वैश्य व शूद्र या उत्पादक व्यवसायी वर्गांचें आधिक्य, अन्योन्यरक्षक भावानें युक्त असा समाज आणि पशु, धान्य, हिरण्य व संपदा यांचें रक्षण करणारा, प्रबल व सर्वगुणसंपन्न असा राजा यांनीं युक्त अशा, जातिदेशसमुच्चयाला राष्ट्र म्हणतात." शुक्रनीतींत राज्याचीं राजा, अमात्य, मित्र, कोश, राष्ट्र, दुर्ग व सैन्य अशीं सप्तांगें मानलीं असून त्यांपैकीं राष्ट्र हें एक अंग आहे. अर्थात् त्यांत राजाला प्राधान्य देण्यांत आलें आहे.

तथापि साकल्यानें पाहिल्यास पाश्चात्त्य व भारतीय राजनीतींत राष्ट्राच्या केलेल्या व्याख्येंत म्हणण्यासारखा फरक नाहीं. राष्ट्र हें स्वयंपूर्ण व स्वयंपोषक असावयास पाहिजे, यावर भारतीय नीतीचा कटाक्ष आहे. त्यांत समाजाची सर्वांगीण गरज भागविणाऱ्या जाती वा वर्ण असावे व परस्परांचें रक्षण करण्याची म्हणजे सहकारितेची अर्थात् आत्मीयत्वाची भावना असावी. राष्ट्र हें असें असावें व त्याचें रक्षण करणारा राजा समर्थ, मंत्रिमंडळयुक्त व साधनसंपन्न असावा. मुसलमानी अमलापूर्वीं भारतांत जीं अनेक राष्ट्रें होतीं तीं या स्वरूपाचीं होतीं. वरील भारतीय व्याख्येंत प्राचीन ग्रंथकारांनीं भाषेचा समावेश केला नाहीं. याचें कारण

त्या काळांत संस्कृत हीच बहुतांशीं सर्वत्र राजभाषा असून प्राकृत भाषांना दुय्यम स्थान होतें. त्यांचा उल्लेख वरील ग्रंथकारांनीं केला नसला तरी प्रत्येक राष्ट्राची म्हणजे प्रांताची कोणती ना कोणती तरी प्राकृत अशी व्यावहारिक भाषा होतीच. यावरून भारतांत राष्ट्रें नव्हतीं व राष्ट्रीयत्व नव्हतें अशी जी कित्येक पाश्चिमात्य लेखकांनीं समजूत करून घेतली आहे ती कशी चुकीची आहे हें कोणाच्याहि लक्षांत आल्याशिवाय राहणार नाहीं. मात्र अखिल भारत हें त्या काळीं एक राष्ट्र मानलें जात नसून, भारताच्या पोटांत अनेक राष्ट्रें होतीं हें विसरतां कामा नये.

## महाराष्ट्राचें राष्ट्रीयत्व

पण राष्ट्राचें रक्षण करणारा स्वदेशी राजाच नष्ट होऊन त्याच्या जागीं परकीय व परधर्मीय राजे राज्य करूं लागल्यावर राष्ट्राची घडी मोडून जनतेस राष्ट्रीयत्वाचा विसर पडावा यांत नवल कसलें? अशा स्थितींत नवीन कालास अनुसरून राष्ट्रीयत्वाची नवीन भावना जनतेंत चेतविणें राष्ट्रीय नेत्यांस आवश्यक होतें व तें महत्कार्य अखिल भारतामध्यें केवळ एकट्या महाराष्ट्रांतच समर्थ व शिवाजी यांनीं सिद्धीस नेलें. समर्थांनीं आपल्या उपदेशानें लोकांच्या मनोभूमिकेंत राष्ट्रीयत्वाचें स्फुलिंग टाकून महाराष्ट्रभक्ति निर्माण केली व त्यास शिवाजीनें राज्यस्थापनेनें मूर्तस्वरूप दिलें. समर्थ आपल्या वाङ्मयांत ज्यास महाराष्ट्र धर्म म्हणतात तें दुसरें तिसरें कांहीं नसून राष्ट्रधर्म म्हणजे राष्ट्रीयत्व होय. ते उपदेशतात –

मराठा तितुका मेळवावा। आपला महाराष्ट्र धर्म वाढवावा।
येविषयीं न करता तकवा। पूर्वज हांसती।

याचा अर्थ – सर्व मराठ्यांनीं म्हणजे महाराष्ट्रांत राहणाऱ्या हिंदुधर्मीयांनीं एक होऊन आपल्या धर्माचा प्रसार महाराष्ट्राबाहेरहि करावा. हा प्रसार राज्यस्थापनेशिवाय होणार नसल्यामुळें, मराठ्यांनीं आपलें राज्य महाराष्ट्रांत स्थापन करावें व त्या आरंभस्थानापासून सर्व भरतखंडांत तें वाढवून अखिल भारतांतील हिंदुधर्माचें रक्षण करावें.

ते हिंदुधर्मास देव-ब्राह्मणांचें राज्य असें म्हणतात. हिंदुधर्माचे रक्षक देव व ब्राह्मण हे होत. त्या देवांचीं मंदिरें आणि ब्राह्मण व त्यांची

विद्या यांचें जतन केलें असतां अखिल धर्माचें रक्षण आपोआपच होतें. त्याचें वर्णन सूत्ररूपानें रामदास पुढीलप्रमाणें करतात –

देवाचा कैपक्ष घेणें। ब्राह्मणांची चिंता वाहणें।
बहुत जनांसी पाळणें।

हें काम कोणीं करावयाचें याचेंहि स्पष्टीकरण त्यांनीं पुढीलप्रमाणें केलें आहे –

धर्मस्थापनेचे नर। ते ईश्वराचे अवतार॥
जाले, आहेत, पुढें होणार। देणें ईश्वराचें॥

धर्मस्थापनेचें कार्य हें महत्कार्य असल्यामुळें ईश्वराच्या अवतारावांचून घडून येणार नाहीं. असे अवतार पूर्वीं झाले आहेत, आज आहेत व पुढेंहि होणार आहेत. अर्थात् आज असलेले अवतार शिवाजीमहाराज होत.

हें कार्य करण्याचें महाराष्ट्रानें ठरविलें त्या वेळीं भारताची स्थिति चिंताजनक व निराशाकारक होती. वायव्येकडून परकीयांचे जे लोंढे भारतांत घुसत होते ते मोगलांचें राज्य दिल्लींत स्थापन होऊन त्यानें बंद पाडले होते. तथापि त्यांचे जातभाई अफगाणिस्तान, इराण, अरबस्तान, तुर्कस्तान, इराक, मध्यआशिया आणि आफ्रिका यांत पसरले असून ते उत्तरेंत मोगल व दक्षिणेंत बहामनी राज्यें यांच्या पदरीं राहावयास येऊन सरकारी कारभारांतील सेनापति, मंत्री व उच्चपदाधिकारी बनून स्थानिक लोकांना डोकें काढण्यास संधि देत नव्हते व राज्यांचा जोम कायम राखण्याकरिता नवीन रक्ताचा पुरवठा करीत होते. हीं परकीय राज्यें प्रजेच्या कल्याणाविषयीं साहजिकच बेफिकीर होतीं व जागतिक स्थितीची त्यांस नीटशी कल्पनाहि नव्हती. प्रजेस संतुष्ट राखलें तरच आपलें राज्य टिकेल व देशांतील कलाकौशल्यास व उद्योगधंद्यांस उत्तेजन व संरक्षण दिलें तरच प्रजेची व आपल्या राज्याची भरभराट होईल हें समजण्याइतकें ज्ञान त्यांना नव्हतें.

## नवें संकट

याच वेळीं मुसलमानांहून उच्च संस्कृतीचे व शिक्षणाचे लोक समुद्रमार्गानें भारतांत प्रवेश करूं लागले होते. त्यांचें व्यापारी व राजकीय धोरण काय आहे हें समजून घेण्याचीहि या परकीय राज्यकर्त्यांनीं कधी क्षिती बाळगली नाहीं. हें एक महान् संकट आहे व तें आकाशांत एक लहानसा

ढग दिसूं लागावा व तो वाढत वाढत अखेर त्यानें सर्व आकाश व्यापून टाकून पृथ्वीवर मुसळधार पाऊस पाडावा त्याप्रमाणें आज लहान दिसणारें असलें तरी कालांतरानें सर्व मुसलमानी सत्तेस पालथें घालणारें आहे याचें आकलन कोणाहि मुसलमानी राज्यकर्त्यास झालें नाहीं. त्या काळीं पोर्तुगीज, इंग्रज, फ्रेंच व डच यांनीं भारताच्या समुद्रकिनाऱ्यावर स्वतंत्र वसाहती स्थापन केल्या असून ते मृत जनावरावर गिधाडें जशीं पडावीं त्याप्रमाणें मरणोन्मुख होऊन पडलेल्या भारताचे लचके तोडीत होते.

मुसलमानांच्या तीनशें वर्षांच्या सत्तेखालीं इकडील व्यापार व उद्योगधंदे झपाट्यानें खालावत चालले असून ते जमीनदोस्त करण्याच्या उद्योगांत पोर्तुगीज, इंग्रज, फ्रेंच व डच व्यापारी गढून गेले होते. येथील व्यापार इकडील नाविकांच्या हातून काढून आपल्या कबजांत आणणें, येथील कारखानदारीची बारकाईनें पाहणी करून त्या धर्तीचे कारखाने आपल्या देशांत उभारणें व त्यांत तयार झालेला माल भारतांत आणून येथील कारागिरांना भिकेस लावणें हें कार्य पाश्चात्त्यांनीं नेटानें चालविलें होतें. त्यांचे प्रवासी सर्व भरतखंडभर हिंडून व्यापारीदृष्ट्या देशस्थितीची पाहणी करीत होते. इस्लामी धर्माचें संकट जुनें होतेंच, पण त्याच्या जोडीला ख्रिस्ती धर्माचें नवें संकट उत्पन्न होऊन पोर्तुगीजांकडून हिंदूंना बाटविण्याचा धोशा चालू झाला होता. आपल्या सत्तेला बळकटी आणण्याचा व आपले धर्मानुयायी लाखोंनी बनवून मुसलमानांच्या मागून ख्रिस्तधर्मीयांचें राज्य सर्व भरतखंडभर पसरविण्याचा उद्देश पोर्तुगीजांनीं हिंदु लोकांच्या निदर्शनास स्पष्टपणें आणून दिला होता. ख्रिस्ती धर्माची भीति जितकी हिंदूंना होती तितकी मुसलमानांना नसल्यामुळें तिचा घोर रामदासासारख्या सर्व भरतखंड फिरून आलेल्या धूर्त, व्यवहारज्ञ, बुद्धिवान्, दूरदृष्टि, धोरणी व चतुरस्र संतास आणि धर्मरक्षणाचें कंकण बांधलेल्या शिवरायास लागलेला होता. सारांश, भरतखंडाच्या भवितव्याकडे सचिंत मनानें व कर्तव्यबुद्धीनें पाहणारे अखिल भारतवर्षांत हेच दोन महापुरुष विद्यमान होते.

त्यांच्याभोंवतीं काय चाललेलें दिसत होतें ? खाण्या-पिण्याचे पदार्थ व वस्त्रप्रावरणें यांची स्वस्ताई होती. लोक नीतिमान् होते, मद्य व परस्त्री-

गमन हें निंद्य मानलें जात होतें. मांसाहाराचें प्रमाण हिंदूंत कमी होतें. प्राणिवध हें पाप व गोमांसभक्षण वर्ज्य ठरलें होतें. हिंदुधर्मावर बाटलेले कित्येक मुसलमान व ख्रिस्ती यांचें इतकें प्रेम होतें कीं त्यांनीं यज्ञोपवीत धारण करण्याचें सोडलें नव्हतें. स्त्रिया पतीबरोबर सती जाण्यांत परलोकाची जोड होते असें समजत. ख्रिस्ती धर्माचा प्रसार पश्चिम-समुद्रापासून पूर्वसमुद्रापर्यंत सर्वत्र कमीअधिक प्रमाणांत झाला होता. गोव्यांत आर्चबिशप, पोर्तुगीजांचा व्हाइसरॉय व धर्मासाठीं हिंदूंना शिक्षा करणारा इन्क्विझिटर-जनरल राहत होता. त्याशिवाय जेसुइटादि सर्व पंथांचे प्रचारक गोव्यांत होते. त्यांचे मठ सुंदर व रम्य होते, प्रासाद शृंगारलेले होते. त्याशिवाय पोर्तुगीज नाणें पाडणारी टांकसाळ स्थापन झाली होती. तेथील प्राणिसंग्रहांत सिंह, राज्यांत संकरप्रजा व समुद्रांत उच्च दर्जाचीं जहाजें आणि किल्ल्यांच्या तटांवर प्रभावी तोफा होत्या. गोव्यापासून वसईपर्यंत सबंध समुद्रपट्टी पोर्तुगीजांनीं व्यापली असून वसईस जेसुइट, डॉमिनिकन्स, फ्रान्सिस्कन्स यांचीं भव्य प्रार्थना-मंदिरें उभारण्यांत आलीं होतीं.

## युरोपियनांचा व्याप

आग्र्यांत सहस्रों ख्रिस्ती लोक असून तेथें रेव्हरंड फादर टोवा हा जर्मन जेसुइट मिशनरी संस्कृत भाषेंत नैपुण्य मिळवीत होता. बंगालमध्यें कासिमबाझार येथें डचांच्या कापड-कारखान्यांत सात-आठ सहस्र बंगाली विणकर खपत होते. खुद्द औरंगजेबास औषध देणारा डॉक्टर बर्नियर हा ख्रिस्ती युरोपियन होता. खंबायतेस पोर्तुगीज लोक समुद्रकांठीं अभिनव बंगले उठवून आपल्या ऐश्वर्याचें, टापटिपीचें व आरोग्यविषयक नियमांचें प्रदर्शन एतद्देशीयांपुढें करून त्यांचे डोळे दिपवीत होते. मुंबईतील इंग्रजांनीं कुलाब्यास प्राणिसंग्रह स्थापून आपली ऐहिक सुधारणा भारतीयांच्या नजरेसमोर धरली होती. इंग्रजांचा मुंबईतील अध्यक्ष नबाबी थाटानें राहत होता. त्यांनींहि मुंबईस आपली टांकसाळ व छापखाना घातला असून एका गुजराथी गृहस्थास हाताशीं धरून संस्कृत ग्रंथ छापून त्यांचा इंग्लंडांत प्रसार करण्यास सुरुवात केली होती. मालाचा विमा उतरण्याची कल्पना त्यांनीं भारतांतहि आणिली होती. ते इंग्लंडांतील कापड व कागद हिंदु-

स्थानांत आणून त्यांचें श्रेष्ठत्व भारतीयांना पटवून देत होते आणि आपल्या शाळा काढून त्यांत आपल्या कारभारास उपयोगी पडतील असे एतद्देशीय शिक्षित तरुण निर्माण करीत होते.

पाश्चात्त्यांच्या या उलाढाली भरतखंडभर चालू असतां त्यांजकडे लक्ष न देतां येथील मुसलमान राज्यकर्ते आपल्याच ऐषआरामांत दंग होते. ते आपल्या सुखासाठीं प्रजेस पिळून काढीत होते. शेतकरी, व्यापारी, उदमी व कारागीर निकृष्टावस्थेस पोंचले होते. मुसलमान राज्यकर्त्यांपेक्षां हिंदु राज्यकर्त्यांचा अंमल कमी कष्टप्रद असल्यामुळें ते त्यांच्या राज्यांत राहावयास जात होते व तें न जमल्यास आपलीं गांवें सोडून शहरांत पोट भरण्याकरितां धाव घेत होते. मुसलमान राज्यकर्ते कारागिरांपासून कलाकौशल्याच्या वस्तु निर्मून घेत होते, पण त्यांस पोट बांधून राबवीत असल्यामुळें ते नाउमेद व असंतुष्ट होते. त्यांच्याच निढळाच्या घामावर दिल्ली, आग्रा, अहमदाबाद, खंबायत, सुरत, औरंगाबाद, हैदराबाद इत्यादि नगरांत मुसलमान राज्यकर्ते राजवाडे, मशिदी, दर्गे, धर्मशाळा उठवून एतद्देशीयांचीं मनें आपल्या वैभवानें दडपून टाकून त्यांस दैवाला बोल लावावयास सांगत होते. तेहि आपल्या मशिदींतून व दर्ग्यांतून मुसलमानांना अरबी व फारशी भाषांचें शिक्षण देत होते.

राज्यकर्त्यांची प्रजेविषयीं इतकी उपेक्षाबुद्धि होती तरी भारतानें फार प्राचीन: काळापासून उत्पादनांत आघाडी मारली असल्यामुळें हिंदु लोक आपली कीर्ति अगदींच गमावून बसले नव्हते. नवापुरास विणकरवस्ती मोठी असून महाराष्ट्रांत ती एक व्यापाराची महत्त्वाची पेठ होती. सिरोंज येथील पाण्याचा गुण असा कीं, येथील चिटें विटत नाहींत अशी ख्याति होती. तीं चिटें अतिशय तलम असत. बऱ्हाणपूरचें कापड इराण, तुर्कस्तान, अरबस्तान, कैरो इतकेंच काय पण पोलंड येथपर्यंत जात होतें. त्या कापडावर विविध रंगांचीं फुलें असत व स्त्रिया त्याचा बुरखा करीत. चित्रकलेंत व कलाकौशल्यांत भारतीय कारागीर पाश्चात्त्यांस मुळींच हार जाणार नाहींत अशी इकडे आलेले युरोपियन प्रवासी त्यांची मुक्तकंठानें स्तुति करीत होते.

हिंदूंसारखे चिकाटीचे लोक जगांत कोठेंहि पहावयास सांपडणार नाहींत. ज्या जातीचा जो व्यवसाय आहे तो ती जात काळ कितीहि

प्रतिकूल असला तरी सोडीत नसे. काशी क्षेत्रानें आपला विद्वत्तेचा लौकिक याहि काळांत कायम ठेवला होता. तेथील विद्वान् ब्राह्मण आपल्या घराच्या पाठशाळा बनवून त्यांत विद्यार्थ्यांना पाठ देत. असे शेंकडों छात्र वाराणशींत असून त्यांना खिचडी घालून धर्मनिष्ठ वैश्य त्यांचा योगक्षेम चालवीत. आणि कित्येक पंडित आपल्या विद्वत्तेच्या जोरावर दिल्ली दरबारांत वशिले लावून अकबर, जहांगिर, शहाजहान इत्यादि बादशहांपासून वर्षासन मिळवीत. औरंगजेब हिंदुधर्माचा कट्टा शत्रु, पण ब्राह्मण-पुढारी त्यास नजराणा देऊन यमुनेवर ग्रहणासारख्या पर्वकाळीं स्नानादिकाची परवानगी घेत.

## दरिद्री महाराष्ट्र

महाराष्ट्राशीं तुलतां इतर प्रांत समृद्ध होते. भारताच्या पूर्व भागांत पाटणा, कासिमबाजार, चितगांव हीं नगरें श्रीमान् होतीं. बंगाल्यांत साखरेची पैदास पुष्कळ होत होती, फळें विपुल पिकत होतीं आणि तेथून रेशमी व कार्पास वस्त्रें युरोपांत जात होतीं. मलबार, कर्नाटक, तामीळ या देशांतील देवालयें उत्कृष्ट व भव्य होतीं. पण सर्वसामान्य जनांचीं घरें खोपटवजा व मातीचीं होतीं. महाराष्ट्रांत जुनीं लेणीं व थोडीं देवालयें सोडल्यास प्रेक्षणीय असें मानवनिर्मित कांहींहि नव्हतें. खानदेश व वऱ्हाड वगळल्यास व्यापार व उद्योगधंदे यांत नांव घेण्यासारखें एकहि नगर नव्हतें. एकंदरींत महाराष्ट्र हा द्रव्यहीन व साधनशून्य होता. अशा प्रतिकूलावस्थेंतहि श्रीशिवछत्रपति व श्रीसमर्थ हे दोन द्रष्टे महाराष्ट्रांत निर्माण होऊन त्यांनीं आपल्या दिव्य दृष्टीनें व कल्पकतेनें प्रतिकूल परिस्थितीवर मात करण्याचा निर्धार केला. त्या वेळीं स्वराज्य निर्मून तें चालविण्याकरितां शिवाजीमहाराजांनीं राज्ययंत्र कसें उभें केलें, त्यास गतिमान् करण्याकरितां अधिकारीवर्ग कसा हाताशीं धरला, नवराष्ट्राची उभारणी करतांना विद्या व भाषा यांना कसें उत्तेजन दिलें, धर्मरक्षण कोणत्या उपायांनीं केलें, शेतकऱ्यांच्या हिताचे कोणते उपाय शोधून काढले, वसुलाची पद्धति कशी आंखली आणि राज्याचा बंदोबस्त कसा ठेवला हें या ग्रंथांत विवेचिलें आहे. तसेंच दुसरे द्रष्टे रामदास यांनीं स्वधर्म व स्वराज्य यांस पोषक व बळकटी आणणारी अशी शिकवण दिलेला शिष्यवर्ग कसा अस्तित्वांत आणिला आणि मोठ्या

योग्यतेचे असे जयरामस्वामींसारखे सहकारी यांच्याशीं स्नेहसंबंध जोडून आपल्या कार्याचा व्याप कसा वाढविला हेंहि या ग्रंथांत पाहावयास सांपडेल.

शिवाजीमहाराजांचें चरित्र ‘ युगप्रवर्तक शिवाजीमहाराज ’ या नांवानें दोन वर्षांपूर्वी मीं प्रसिद्ध केलें. शिवाजीनें आपल्या पराक्रमानें व बुद्धिवैभवानें मुसलमानी राज्यकर्त्यांना जिंकून स्वराज्य कसें स्थापलें याचा विस्तृत वृत्तान्त त्या चरित्रांत येऊन गेला आहे. पण तेवढ्यानें त्याच्या कार्याची पूर्तता होत नाहीं. ज्यांना शिवचरित्राचा तेवढाच भाग माहीत आहे असे कांहीं लोक शिवाजीस लुटारू व घातपाती समजतात. इंग्रजी राज्य होतें व स्वातंत्र्याची तहान अखिल भारतास लागली होती तोंपर्यंत महाराष्ट्राप्रमाणेंच भारतांतील इतर प्रांत शिवाजीची स्तुति मुक्तकंठानें करीत होते. पण स्वराज्य मिळाल्यानंतर त्यांतील कित्येक उच्चपदस्थ व्यक्तींची ती वृत्ति आतां राहिलेली दिसत नाहीं. ते त्याजकडे व मराठ्यांकडेहि दोषैक दृष्टीनें पाहूं लागले आहेत. मराठे लोक फुकटे व इतरांनीं कष्टांनीं मिळविलेल्या संपत्तीवर अन्यायानें हात मारून आपलें घर भरणारे आहेत असा त्यांनीं स्वतःचा समज करून घेतला आहे. किंबहुना हे लोक रानटी, आडदांड व पुंड आहेत असेंहि त्यांना अंतर्यामीं वाटतें. राष्ट्रदृष्ट्या हा समज चुकीचा असेल तर तो दूर करणें जरूर आहे. तेंच कार्य पार पाडण्याचा हा प्रयत्न आहे. हा ग्रंथ वाचून शिवाजी हा आदर्श योद्धाच नव्हे तर आदर्श राजा होता, तो सुसंस्कृत व उच्च विचाराचा होता, त्याचें आचरण अत्यंत शुद्ध व निष्कलंक होतें, तो दयार्द्र-बुद्धीचा व उदार अन्तःकरणाचा होता, राज्यकारभारांत त्याजपाशीं पक्षपात नव्हता, सर्व जातींच्या व धर्मांच्या लोकांना तो समदृष्टीनें वागवीत असे.

### शिवाजीचें विभूतिमत्त्व

प्रस्तुत ग्रंथ वाचून शिवाजीचें विभूतिमत्त्व कोणाच्याहि प्रत्ययास आल्याशिवाय राहणार नाहीं. ज्यांच्या ठिकाणीं विभूतिमत्त्व असतें त्यांजकडे कोणत्याहि दृष्टिकोनावरून पाहिलें तरी त्यांचें थोरपणच नजरेंत भरतें. असले पुरुष हिमालयासारखे भव्य वैभवसंपन्न व स्फूर्तिदायक असतात. त्यांचें चरित्र आनंददायक असतें व त्यांच्या परिशीलनानें राष्ट्रीय गुणांचें संवर्धन होऊन राष्ट्रास वैभवगिरीचें शिखर गांठण्यास सामर्थ्य येतें. शिवाजी-

महाराजांच्या गुणांचें स्मरण करून व त्यांचा आदर्श डोळ्यांपुढें ठेवून यच्चयावत् महाराष्ट्रीय लोक आजहि एकजुटीनें वागतील तर त्या सर्वांचें कल्याण होऊन महाराष्ट्रास अखिल भारतांत पूर्ववत् मानाचें स्थान प्राप्त होईल यांत संदेह नाहीं. कारण महाराष्ट्राचें सामर्थ्य जुटींत व मरण फुटींत आहे.

शिवाजीचीं चरित्रें मराठींत व इंग्रजींत अनेक झालीं आहेत. पण शिवाजीच्या राज्यकारभाराचा व त्याच्या विविध कार्यांचा जितका विस्तारपूर्वक विचार या ग्रंथांत मीं केला आहे तितका इतर कोणाहि लेखकानें केला नाहीं. किंबहुना वाचकांच्या दृष्टीनें हा ग्रंथ बहुतांशीं नावीन्यपूर्ण आहे. थोडक्यांत या ग्रंथाचें वर्णन करावयाचें झाल्यास 'शिवकालीन महाराष्ट्र' या सुटसुटीत नांवानेंच करतां येईल. सारांश, शिवकालीन महाराष्ट्राचें हें शब्दचित्र असून, तें प्रसिद्ध होण्याचा योग परमेश्वरानें आणून दिला याबद्दल त्याला विनम्रभावानें शरण जाणें मी आपलें आद्य व पवित्र कर्तव्य समजतों. हा ग्रंथ खर्चाची सर्व जोखीम स्वतःवर घेऊन मीं प्रसिद्ध केला आहे. हा भार हलका करण्याकरितां या ग्रंथाच्या प्रकाशनास पांचशें रुपयांची देणगी पुणें विद्यापीठानें ( युनिव्हर्सिटी ऑफ पूना ) दिली याबद्दल मी त्याचा फार ऋणी आहें. मुंबई प्रांताचे माजी राज्यपाल डॉ. हरेकृष्ण मेहताब यांना शिवाजीमहाराजांविषयीं फार आदर व अभिमान वाटत होता. त्यांनीं या कार्यास सक्रिय साहाय्य केलें त्याचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख करणें जरूर आहे. भा. इ. सं. मंडळांतील संशोधक श्री. शंकर नारायण जोशी व गणेश हरि खरे यांनी विचारली ती माहिती दिली व विचारविनिमय केला याबद्दल त्यांचे व केसरी मुद्रणालयानें छपाईचें काम त्याच्या लौकिकास साजेल असें उत्कृष्ट केलें याबद्दल केसरी-मराठा संस्थेचेहि आभार मानावयास पाहिजेत. हा ग्रंथ प्रमाणाबाहेर मोठा होऊं लागला म्हणून यांतील कांहीं प्रकरणें मुद्दाम राखून ठेवलीं आहेत. त्यांचाहि एखादा लहानसा ग्रंथ 'शिवकालीन भारत' या नांवानें प्रसिद्ध करतां येण्यासारखा आहे. तो योग येईल तेव्हां येवो.

२२६ सदाशिव पेठ, पुणें २.<br>
रामनवमी शके १८७९

वासुदेव कृष्ण भावे

# अनुक्रमणिका

# शि व रा ज्य व शि व का ल

## प्रकरण पहिलें

## धर्मवेडे पोर्तुगीज

युरोपियन लोकांपैकी भारतांत प्रथम प्रवेश करणारे पोर्तुगीज लोक. पोर्तुगीज भाषेंत फिडलगी म्हणजे सभ्य गृहस्थ; त्या त्यांच्या चमत्कारिक नांवाचा अपभ्रंश करून भारतीय लोक त्यांस फिरंगी म्हणूं लागले. पोर्तुगीजांपैकीं प्रथम भारतांत येणारा वास्को-डी-गामा. तो इ. स. १४९८ मध्यें पश्चिम किनाऱ्यावरील कालिकोट बंदरांत आला. भारतांत येतांना वाटेंत पोर्तुगीजांना जे देश लागले त्यांतील व्यापारी दृष्टया महत्त्वाचीं ठाणीं पाहून तींहि त्यांनीं जिंकून घेतलीं. इ. स. १५०४ मध्यें आफ्रिकेच्या पूर्व किनाऱ्यावरील झांजिबार बंदरावर त्यांनीं आपला अंमल बसविला. इ. स. १५०५ मध्यें मोझँबिक, किल्वा व सोफाला या तीन ठिकाणीं त्यांनीं किल्ले बांधले. त्यानंतर दोन वर्षांनीं अरबस्तानांतील मस्कतच्या सुलतानास त्यांनीं शरण आणिलें. इ. स. १५०३ मध्यें कोचीन घेऊन तेथें त्यांनीं वखार घातली व किल्ला बांधला. इ. स. १५१० त त्यांनीं गोवें घेतलें व तेथून पुढें जाऊन इ. स. १५११ त मलाक्का व इ. स. १५१८ त सिंहलद्वीपांतील कोलम्बो बंदर काबीज केलें. इ. स. १५१० त गोव्यास पाय रोवल्यावर इ. स. १५३४ त मुंबई व वसई हीं ठाणीं व त्या भोवतालचा वांद्रें, ठाणें इत्यादि प्रदेश गुजराथेचा सुभेदार बहादुरशहा याजपासून त्यांनीं मिळविला. इ. स. १५३५ मध्यें दीव

बेट घेऊन त्याची तटबंदी करण्यांत आली व पुढें इ. स. १५५९ त त्यांनीं दमणहि हस्तगत केलें. अशा रीतीनें अर्ध्या शतकाच्या अवधींत पोर्तुगीजांनीं आफ्रिका व आशिया या दोन खंडांत आपले हात-पाय पसरले. हा व्याप त्यांनीं व्यापारासाठीं वाढविला असला तरी व्यापारी ठाण्यावर आपली राजकीय सत्ता असल्याखेरीज व्यापार निर्वेधपणें चालवितां येणार नाहीं हें त्यांनीं त्याच वेळीं ओळखलें होतें. आफ्रिकेच्या पूर्व किनाऱ्यापासून मलाया-पर्यंत अंतराअंतरावरील ठाणीं घेण्यांत व बंदरांची एक लांबच लांब साखळी गुंफण्यांत त्यांचा स्पष्ट हेतु दिसत होता तो असा कीं, कोणतेंहि बंदर एकाकी व असहाय असें न रहातां त्यांची प्रसंगविशेषीं एकमेकांस आरमाराची व सैन्याची मदत व्हावी. कारण त्या प्रत्येक ठिकाणीं पोर्तु-गीजांनीं आरमार व सैन्य ठेवून आपल्या सत्तेस बळकटी आणली होती; इतकेंच नव्हे तर त्यांनीं आपल्या देशबांधवांना कार्यक्षेत्रहि मिळवून दिलें होतें. इ. स. १५१७ त चीन देशांत जाऊन त्या देशाशींहि ते व्यापार करूं लागले. म्हणजे समुद्रतीरावरील बहुतेक आशियाखंड त्यांनीं व्यापलें.

अलफान्सो अलबुकर्क यानें इ. स. १५१० त गोवें घेतलें; त्यापूर्वी तें विजापूरचा बादशहा आदिलशहा याच्या अमलाखालीं होतें. इ. स. १५६९ त पोर्तुगीजांनीं १३० लढाऊ जहाजें व ३ हजार शिपाई यांसह होनावर शहरावर स्वारी करून तें काबीज केलें. गोव्याभोंवतालचा अधिक प्रदेश जिंकून त्यांनीं सासष्टी व बारदेश हे प्रांत आपल्या राज्यास जोडले. उत्तर कोंकणांतील चौल बंदर त्यांनीं इ. स. १५०८ तच घेतलें होतें. तें पूर्वी मूर्तुजा निजामशहाचें असल्यामुळें तें परत घेण्याकरितां निजामशहानें त्याजवर इ. स. १५७० त ३४ हजार घोडेस्वार १ लक्ष पायदळ, ३६० हत्ती व ७० तोफा यांसह जबरदस्त हल्ला केला. त्यानंतर उभयतांत तह झाला; त्यांत राज्यरक्षणाच्या कामीं एकमेकांनीं एकमेकांस साहाय्य करावें असें ठरलें. हा तह बरींच वर्षें टिकला. पण पुढें पुन्हां बेबनाव होऊन इ. स. १५९२ त बुऱ्हण निजामशहानें मोठ्या सैन्या-निशीं चौलावर हल्ला केला. चौलचा किल्ला फिरंग्यांच्या तीन हजार सैनिकांनीं लढविला व त्यांनीं निजामशहाचा सेनापति फरहदखान याचें कांहीं चालूं दिलें नाहीं. यांवरून एक गोष्ट स्पष्ट होते ती ही कीं, आदिलशहा, निजामशहा व

गुजराथेचा बहादुरशहा यांचें सामर्थ्य जमिनीवर केवढेंहि मोठें असलें तरी जलचर असे फिरंगी त्यांना समुद्रावर फार भारी होते व त्यांजबरोबर आरमारी युद्ध करून त्यांना जिंकण्याइतकी ताकद त्यांजपैकीं कोणाच्याहि ठिकाणीं नव्हती. पोर्तुगीज हे लढाऊ गलबतें व तोफखाना या दोन प्रमुख साधनांत त्यांजहून फारच श्रेष्ठ होते; किंबहुना आफ्रिका व आशिया या दोनहि खंडांत त्यांचा हात धरणारा हिंदु, मुसलमान व बौद्ध यांपैकीं कोणीहि नव्हता.

असो. इ. स. १५७० अखेर पोर्तुगीजांच्या आशिया व आफ्रिका येथील सत्तेचा आढावा घेतल्यास भारतांत कालिकोट व कोचीन हे प्रांत होनावर, बर्सलोर ( बसनूर ), मंगळूर, काननूर हीं कानडा प्रांतांतील गांवें व गोवें, दाभोळ, चौल, मुंबई, करंजें, साष्टी बेट, वसई, ठाणें, माहीम, तारापूर इत्यादि ठिकाणें हा पश्चिम किनाऱ्यावरील प्रदेश त्यांनीं संपादन केला होता; त्यांपैकीं बहुतेक ठिकाणीं वखारी घालून तटबंदीहि केली होती. पूर्व किनाऱ्यावरील चौलमंडल भागांतील निगापट्टण, मच्छलीपट्टण व मलियापूर येथेंहि त्यांच्या वखारी होत्या, बंगाल्यांतहि त्यांनीं नाक्याच्या जागा ताब्यांत घेतल्या होत्या. पश्चिमेस इराणी आखातांत ऊर्मज व बसोरा यांजवर त्यांचा अंमल होता. अरबस्तानांत मस्कत आणि आफ्रिकेच्या पूर्व किनाऱ्यावर सोफाला, मोझँबिक व मोंबासा हीं बंदरें त्यांचीं होतीं. सिंहलद्वीपांत व भारताच्या पूर्वेकडील बेटांतहि त्यांच्या वसाहती होत्या.

मुसलमानांप्रमाणें पोर्तुगीजांचाहि मोठा दोष म्हणजे धर्मवेड. आपला धर्म तेवढा चांगला व दुसऱ्यांचा वाईट अशी त्यांची अज्ञानमूलक समजूत होती. त्या समजुतीमुळें त्यांच्या हातून अत्यंत निर्दयपणाचीं, क्रूर व घोर कृत्यें घडलीं. पोर्तुगीज लोक भारतांत व विशेषतः महाराष्ट्रांत अप्रिय होण्यास व लोकमत त्यांजविरुद्ध बनण्यास त्यांचीं हींच जुलमी कृत्यें कारण झालीं. पोर्तुगीजांनीं केलेल्या कांहीं कृत्यांचीं उदाहरणें येथें देतों. तीं वाचलीं म्हणजे पोर्तुगीजांचे भारतीय प्रजाजन त्या वेळीं किती त्रस्त झाले असतील व त्यांना ‘ नको हें जिणें ’ कसें वाटूं लागलें असेल याची कल्पना येईल.

### जोडप्यांची फाटाफूट

अल्बुकर्क यानें इ. स. १५१७ त गोवें घेऊन बंदोबस्ताकरितां त्याजभोंवतीं तट बांधला. आपण या देशांत पाहुण्यासारखे राहिल्यास एतद्देशीय

लोकांत आपल्याविषयीं जिव्हाळा उत्पन्न होणार नाहीं याची जाणीव त्याला होती; म्हणून त्यानें एक युक्ति काढली. इकडे जे पोर्तुगीज सैनिक येत त्यांपैकीं बहुतेकांचीं लग्नें झालेलीं नसत. या तरुण सैनिकांचे अनैतिक संबंध इकडील स्त्रियांशीं होत; पण त्यांची संतति 'न हिंदुर्न ख्रिस्तिः' अशी झाल्यामुळें अनवस्थाप्रसङ्ग ओढवूं लागला. तेव्हां त्यानें पोर्तुगीज सैनिक व हिंदु स्त्रिया यांचीं चर्चमध्यें नेऊन सामुदायिक लग्नें लावलीं. त्यासंबंधीं तिकडील इतिहासकारांनीं लिहिलेली हकीकत अतिशयोक्तिपूर्ण असली तरी तींत तथ्यांश बराच आहे यांत शंका नाहीं. ती अशी :– ज्या वेळीं गव्हर्नर अलबुकर्क यानें सामुदायिक लग्नें उत्साहपूर्वक लावलीं, त्या-वेळीं कृष्णपक्ष होता. लग्नें चर्चमध्यें लागलीं व तीं लागल्यावर विवाहित जोडपीं चर्चमधून बाहेर पडण्यापूर्वींच चर्चमधील दिवे गेले. जोडप्यांची फाटाफूट झाली व घरीं जातांना भलत्याच पुरुषानें भलत्याच स्त्रीचा हात धरून तिला आपल्या बिऱ्हाडीं नेलें आणि दुसऱ्या दिवशीं सकाळीं पाहतात तों जोडप्यांची अदलाबदल झालेली! असा घोटाळा झाल्यावर अशी तोड काढण्यांत आली कीं, "गतरात्रीं प्रारब्धगत्या जी स्त्री ज्या पुरुषाची शयनसखी झाली तिजवरच त्या पुरुषानें देवळांतील कराराकडे लक्ष न देतां संतुष्ट रहावें."

हिंदु लोकांना बाटविण्याच्या प्रयत्नांत ख्रिस्ती पाद्री यांचा पुढाकार होता. त्यांच्या आज्ञेवरून गोवें सरकारानें ता. ३० जून १५४१ रोजीं पुढीलप्रमाणें फर्मान काढलें :– 'आकाशांतील देवानें हिंदूंचीं सर्व देवालयें जमीनदोस्त करण्याची आम्हांस आज्ञा केली आहे.' त्यास अनुसरून त्यांनीं बरींच हिंदु देवळें पाडलीं व त्यांच्या साहित्यावर चर्चें बांधलीं. जे हिंदु ख्रिस्ती होण्यास तयार झाले नाहींत त्यांजवर धार्मिक डोईपट्टीसारखा कर बसविण्यांत आला.

ता. ८ मार्च १५४६ मध्यें पोर्तुगीज राजाकडून गोव्यास पुढीलप्रमाणें फर्मान आलें :– 'गोव्यांतील मूर्तिपूजेचा नाश करा, हिंदूंचीं देवळें पाडा, हिंदूंना धार्मिक उत्सव करण्यास बंदी करा, ब्राह्मणांना गोवें प्रांताबाहेर हाकून लावा, अधिकाराच्या जागा फक्त ख्रिस्ती होतील त्यांनाच द्या.'

इ. स. १५४८ त गोव्यांत दो फे जुबाव द अल्बुकर्क हा हिंदुधर्माचा

कट्टा द्वेष्टा पाद्री आला होता. हा अल्बुकर्क गव्हर्नर अलफान्सो अल्बुकर्क याहून अर्थातच निराळा होता. ब्राह्मणांना हद्दपार केलें म्हणजे हिंदुधर्माचे रक्षकच नाहींसे झाले. तसेंच त्यांचे धर्मग्रंथ नाहींसे केले कीं त्या धर्माचा आधारच नष्ट झाला. असें असल्यामुळें पाद्री अल्बुकर्क हिंदूंचीं पोथ्या-पुस्तकें हुडकून काढून तीं जाळून टाकी.

पाद्र्यांत वेगवेगळ्या पंथांचे लोक असत. जेसुइट हाहि एक पंथ असून त्यांतील पाद्री फारच कडवे असत. जीजस ख्राइस्ट याचा कट्टा अनुयायी तो जेसुइट. इ. स. १५४८ त बारेट नामक जेसुइट सांप्रदायिक गोव्याचा धर्मोपदेशक झाला. रस्त्यांत जो हिंदु भेटेल त्यास पकडून तो लागलीच बाप्तिस्मा देई. त्या योगानें गोव्यांतील लोक अगदीं त्रस्त होऊन गेले. इ. स. १५६० त बारेट जाऊन त्याच्या जागीं गास्पर नामक पाद्री गोव्याचा मुख्य धर्मोपदेशक नेमण्यांत आला. सासष्टी प्रांतांतील ४०९ इसम गोव्यास व्यापाराच्या निमित्तानें आले होते; त्यांना त्यानें पकडून एका दिवसांत बाटविलें. त्या वेळीं गोवें बेटांतील सर्व हिंदु लोक इतके भीतिग्रस्त झाले कीं त्यांपैकीं पुष्कळ जण आपआपलीं कुलदैवतें घेऊन अन्य प्रांतांत निघून गेले.

सासष्टी प्रांतांतील एका/पाद्र्यानें १२०० हिंदु देवालयें मोडून लोकांना बाटविलें व नवीं देवालयें बांधण्यास व मूर्तिपूजा करण्यास मनाई केली. सासष्टी बाटविल्यानंतर ५० वर्षांनीं बारदेश बाटविण्यांत आला. प्रसिद्ध ख्रिस्ती धर्मोपदेशक सेंट झेवियर हा मलाका, सिंहलद्वीप व जपान या देशांत गेला होता. तेथें त्यानें लाखों लोकांस बाटविलें. तो इ. स. १५४२ तै भारतांतहि आला होता. त्यानें सर्व ठिकाणीं मिळून १२ लक्ष लोक बाटविले. याच्याच स्मरणार्थ मुंबई व कलकत्ता येथें त्याच्या नांवाचीं दोन महाविद्यालयें चालू आहेत. त्याचेंच गोव्यांत पुरलेलें प्रेत बाहेर काढून विशिष्ट दिवशीं ख्रिस्तभक्तांना दाखविण्यांत येतें. त्याच्या दर्शनास परदेशाहूनहि सहस्रो लोक त्या वेळीं गोव्यास जमतात.

हिंदु मनुष्य मेला म्हणजे त्याचीं बायका-मुलें अनाथ होत. त्यांना बाटविण्यासाठीं इ. स. १५५९ त असा हुकूम काढण्यांत आला कीं तीं जर ख्रिस्ती होतील तरच त्यांस त्या मयताची मालमत्ता देण्यांत येईल, नाहीं तर ती सरकारांत जप्त केली जाईल. इ. स. १५७४ त एक विलक्षण कायदा

झाला. त्याअन्वयें कोणाहि हिंदु पंडितास वा वैद्यास गोव्यांतील रस्त्यांतून घोड्यावर, पालखींत वा मेण्यांत बसून जाण्यास बंदी करण्यांत आली. हा कायदा मोडणारास दहा रुपये दंड होऊं लागला. हिंदूंतील प्रतिष्ठित लोक वरील प्रकारच्या श्रेष्ठ वाहनांत बसून गेल्यानें ख्रिस्ती धर्मगुरूंचा व अधिकाऱ्यांचा अपमान होतो, अशी या बंदीच्या मुळाशीं समजूत होती.

प्रसिद्ध संशोधक व लेखक श्री. अ. का. प्रियोळकर हे ता. १७ जानेवारी १९५४ च्या केसरींत पोर्तुगीजांच्या जुलमी कृत्यांत पुढील कृत्यांची भर घालतात. " ता. २५ मार्च १५५९ रोजीं पोर्तुगीजांनीं नवीन फर्मान काढलें तें असें :– गोवें व त्याच्याजवळचीं बेटें यांतील घरांत वा बाहेर देवळें किंवा मूर्ति असलेल्या जाळून उद्ध्वस्त कराव्या. खाजगी वा जाहीर रीतीनें हिंदुधर्मोत्सव करूं नयेत. एखाद्याच्या घरांत देव-मंदिर वा मूर्ति असल्याचा संशय आल्यास त्याची ताबडतोब वर्दी सरकारांत देण्यांत यावी. म्हणजे त्या घराच्या मालकीची सर्व मिळकत जप्त करून अर्धी सरकाराला व अर्धी वर्दी देणाराला दिली जाईल."

" इ. स. १५६३ सालीं नवी राजाज्ञा निघाली कीं, स्वतः हातांनीं जमीन पिकविणारे शेतकरी, वैद्य, सुतार, लोहार, भंडारी हे खेरीजकरून इतर हिंदूंनीं आपलीं घरें व जमिनी विकून गोवें बेटांतून एका महिन्याच्या आंत निघून जावें. नाहींतर त्यांना जहाजावर बंदी म्हणून पाठवून त्यांच्या जमिनी सरकारजमा होतील.

" गोव्यांमधील कडक धोरणाचा प्रसाद वसईकडील हिंदु व मुसलमान यांनाहि मिळाल्याशिवाय राहिला नाहीं. उत्तरेकडे ( वसई ) जीं देवळें व मशिदी असतील तीं शक्य तितकीं सफई नष्ट करावीं असें धोरण जाहीर झालें. पोर्तुगालचा राजा तिसरा जॉन याच्या हुकुमानें गव्हर्नर जॉर्ज काब्राल यानें इ. स. १५४९ सालीं फर्मान सोडलें कीं, " कोणत्याहि माणसानें मग तो केवढाहि मोठा असेना, देऊळ किंवा मशीद उभारूं नये व एखादा मनुष्य ख्रिस्ती होत असला तर त्याच्या मार्गांत व्यत्यय आणूं नये." इ. स. १५५० त गोव्याच्या बिशपनें उत्तर कोकणांतील जेसुइट व फ्रान्सिस्कन लोकांना अशी धर्माज्ञा सोडली कीं, एखादें देऊळ जर आधींच उभारलें असेल, उभारलें जात असेल तर तें उद्ध्वस्त व जमीनदोस्त करा."

व्हाइसरॉय दों पेद्र मास्कारेंजस इ. स. १५५५ मध्यें घोषणा करतो कीं, “वसई व वसईजवळचा भाग येथें कोणत्याहि प्रकारें सार्वजनिक वा गुप्त देऊळ राहूं देऊं नका. लांकूड किंवा कोणतीहि धातु यांची मूर्ति बनविण्यास बंदी करा. प्रकटपणें वा गुप्तपणें हिंदुधर्म-विधि साजरे होऊं देऊं नका. धर्मकार्य करणाऱ्या भटजींचें तिकडून उच्चाटन करा. हिंदूंच्या ज्या घरांत देवघर वा मूर्ति असल्याचा संशय येईल त्याची कसून झडती घ्या!”

## शेंडीवर कर

“स्वधर्मप्रसार व परधर्मसंहार यांचें धोरण ठरविण्याकरितां गोव्यांत धर्मपरिषदा भरविण्यांत येऊं लागल्या. पहिली परिषद् इ. स. १५६७ सालीं भरली. या परिषदेंत सुमारें ५० ठराव संमत झाले. त्यांत मुसलमानांचे काजी, हिंदूंचे भटजी, जोशी व गुरव यांना हाकलून द्यावें. हिंदूंचा देव केवळ देवळांत नसून वड, पिंपळ, औदुंबर अशा वृक्षांवरहि वास करतो. म्हणून अशीं झाडें तोडून टाकावीं. हिंदु वैद्याचें औषध घेऊं नये, हिंदु दायांना ठेवूं नये, वसईत परभूंना नोकरीला ठेवूं नये, हिंदु माणसाला सरकारी नोकरी देऊं नये असे आदेश देणारे ठराव आहेत. पहिल्या परिषदेच्या नवव्या व तिसऱ्या परिषदेच्या पांचव्या ठरावांत हिंदु लोकांना त्यांच्या धर्माचें चिन्ह असें जें यज्ञोपवीत तेंहि वापरण्याची बंदी असावी असें म्हटलें आहे. इतकेंच नव्हे तर कपाळाला व छातीला चंदनाची उटीहि लावण्याची मनाई करण्यांत यावी अशी सरकाराला विनंती केली आहे. या ठरावांतून शेंडी सुटली, पण पुढें शेंडीवरहि कर बसविण्यांत आला. हा कर देऊनहि हिंदु लोक शिखारक्षण करीत. या शेंडीच्या ठरावाची १४ ऑगस्ट १७३२ सालची हस्तलिखित प्रत पोर्तुगालच्या ‘येव्होर’ येथील ग्रंथसंग्रहालयांत आहे.

“इ. स. १५६४ च्या सुमारास वसईपाशीं कोठें तरी एक तीर्थक्षेत्र होतें. त्या ठिकाणीं गोकुळअष्टमीच्या दिवशीं हिंदुस्थानांतील निरनिराळ्या प्रदेशांतून स्नानाकरितां लोक येत. त्या दिवशीं ते खात-पीत नसत. ब्राह्मणांना दान व भिकाऱ्यांना भिक्षा घालीत नदींत नारळ टाकीत. येथें स्नान केल्यानें सगळीं पापें नष्ट होतात अशी समजूत होती. या उत्सवाचा नव ख्रिश्चनांवर विलक्षण परिणाम होईल अशी पाद्री लोकांना धास्ती पडली.

तेव्हा हा प्रकार बंद पाडण्याकरितां क्रिस्ताव द कोस्त नांवाच्या पाद्रयानें वसईच्या कॅप्टनकडे तक्रार केली व यात्रेच्या दिवशीं तिजवर ५० बरकंदाज व तितकेच घोडेस्वार यांनीं हल्ला करून यात्रेकरूंना पळवून लावलें. यात्रेकरूंपैकीं एक जोगी ठिकाणावर राहिला. त्याला पकडून न्यायासनासमोर उभें करण्यांत आलें. त्यांनी तेथील मंदिरें उद्‌ध्वस्त केलीं, मूर्ति जाळून टाकल्या, एक गाय मारून तिचें रक्त सर्वत्र शिंपडलें व मांसाचे तुकडे आसपास व तळ्यांत फेकले. ही हकीगत फ्रान्सिस्क द सौझ या जेसुइट इतिहासकारानें लिहून ठेवली आहे. या दोन-तीन वर्षांत म्हणजे इ. स. १५६३–६५ च्या दरम्यान ठाणें गांवांत ५-६ हजार लोकांना व वसईत सातशेंवर लोकांना बाप्तिस्माचें पाणी पाजून बाटविण्यांत आलें.

" इ. स. १५३४ ते १५५२ च्या दरम्यान वसई, आगाशी व ठाणें या भागांत आंतोनियुद पोर्तु या फ्रान्सिस्कन पाद्रयानें दोनशें देवळें जमीनदोस्त केलीं, दहा हजारांवर लोकांना बाटविलें, कान्हेरीच्या तिसऱ्या लेण्याचें पोर्तानें सेंट मायकेलचें चर्च केलें, मंडपेश्वरच्या लेण्याचें ' अवर लेडी ऑफ कन्सेप्शनचें ' चर्च बनाविलें. हा झाला उत्तरेकडील साष्टींतला प्रकार.

दक्षिणेंतील गोव्याजवळच्या साष्टींत इ. स. १५६७ सालीं २८० वर देवळें जमीनदोस्त व भ्रष्ट करण्यांत आलीं. इकडील श्रीमंगेश, श्रीशांतादुर्गा, श्रीम्हाळसा, श्रीलक्ष्मी वगैरे देवता त्यांच्या भक्तांनीं पळवून फोंडें महालांत त्यांची स्थापना केली. या वेळीं या महालावर पोर्तुगीजांची सत्ता नव्हती. यांपैकीं दोघां देवांना म्हणजे श्रीमंगेश व श्रीम्हाळसा यांना प्रियोळ येथें आसरा देण्यांत आला. येथील कांहीं देव-देवता त्यांच्या ब्राह्मणेतर भक्तांनीं होडींत घालून कोचीनला नेल्या व त्या हल्लीं एका देवळांत मांडून ठेवलेल्या आहेत. "

पोर्तुगीज व मुसलमान यांजमध्यें धर्मच्छळ व जुलूम या बाबतींत सरसनिरस ठरविणें कठीण आहे. मुसलमानांप्रमाणेंच परमुलखांत जाऊन लूट व जाळपोळ करणें हा त्यांचा दंडक होता. उत्तर कोकणचा समुद्रकिनारा जिंकण्यापूर्वी इ. स. १५३१ च्या मार्च महिन्यांत नूनो ड कुन्हा याने बलसाड, तारापूर, माहीम, केळवें व आगाशी यांची जाळपोळ केली व ठाणें लुटलें. इ. स. १५३२ त ठाणें, वांद्रें, माहीम व मुंबई यांपासून त्यानें खंडणी वसूल

केली. इ. स. १५३४ त कान्हेरीच्या लेण्यांत बौद्धांची वस्ती होती. तेथें एक १५० वर्षांचा योगी होता, त्याला पोर्तुगीजांनीं बाटविलें. मण्डपेश्वराच्या देवळांत ५० साधु होते त्यांना तेथून पळवून लावून फादर अँटोनिया यानें त्या ठिकाणीं ख्रिस्ती देवीची स्थापना केली. सेंट फ्रान्सिस झेवियर वसईस इ. स. १५४४ व ४८ त आला होता. त्यानें तेथें होली नेम ऑफ गॉड या नांवाचें महाविद्यालय ( कॉलेज ) काढून मशिदीस दिवाबत्तीकरितां जें उत्पन्न होतें तें या संस्थेकडे लावून दिलें.

## मराठींत ख्रिस्तपुराण

जेसुइटांनीं चौल येथें इ. स. १५८० त मिशन स्थापलें. त्यांचें त्या ठिकाणीं एक धर्ममंदिर, एक आश्रम व तीनशें मुलांची शाळा होती. त्याच वर्षी वसई व ठाणें येथें प्रत्येकीं ८० लोकांना व वांद्र्यास दोन सहस्र कोळ्यांना बाटविण्यांत आलें. पोर्तुगीज लोक हिंदूंना बाटविण्याकरितां जुलमांचा कळस करूनच थांबले नाहींत, तर त्यांनीं हिंदूंच्या अठरा पुराणांप्रमाणें ख्रिस्त पुराणहि रचून थोडया भाबडया हिंदु लोकांचें मन ख्रिस्ती धर्माकडे वळविण्याचा प्रयत्न केला. हें पुराण फादर टॉमस स्टीफन्स ( इ. स. १५४९–१६१९ ) यानें प्रथम पोर्तुगीज भाषेंत लिहून त्याचें मराठींत ओवीबद्ध भाषांतर इ. स. १६१४ त केलें. फादर टॉमस हा जन्मानें पोर्तुगीज नव्हता. तो मूळचा इंग्रज असून पुढे पोर्तुगालमध्ये जाऊन राहिला. तेथेंच त्यानें पोर्तुगीज भाषा आत्मसात् केली. याचा जन्म इंग्लंडांत विल्टशायर परगण्यांतील बुल्स्टन या गांवीं इ. स. १५४९ त झाला. तेथून पोर्तुगालमध्यें जाऊन राहिल्यावर त्यानें ४ एप्रिल १५७९ रोजीं हिंदुस्थानांत येण्याकरितां लिस्बन सोडलें. तो ता. २४ आक्टोबर १५७९ रोजीं आफ्रिकेस वळसा घालून गोव्यास उतरला. म्हणजे त्याला हिंदुस्थानास येण्यास सहा महिन्यांहून अधिक दिवस लागले. गोव्यांत असतांना त्यानें कोकणी भाषेवर चांगलें प्रभुत्व मिळविलें. कोकणी ही मराठीचीच एक बोली आहे. तिजवर प्रभुत्व मिळविल्यावर मराठीवर त्याचें प्रेम बसून तिच्यांत त्याची चांगलीच गति झाली. मराठीची थोरवी त्यानें पुढील ओव्यांत गाइली आहे.

जैसी हरळांमाजी रत्नकिळा। कीं रत्नामाजी हिरा निळा। तैसी भासामाजी चोखळा। भासा मराठी॥ जैसी पुष्पामाजी मुख्य मोगरी

कीं परिमळामाजी कस्तुरी। तैसी भासामाजी साजिरी मराठिया ॥ पाखियांमधें मयूर। वृखियांमधें कल्पतरू। भासामधें मानूं थोरू। मराठियेसी ॥

( फादर स्टीफनचें ख्रिस्तपुराण )

फादर स्टीफननें गोव्यास कोंकणीचें व्याकरण प्रसिद्ध केलें. या सुमारास मुद्रणकला पोर्तुगीजांनीं भारतांत आणली असून त्यांनी आपल्या राज्यांत गोवें, कोचीन, इत्यादि तीन ठिकाणीं छापखाने सुरू केले होते; त्यांतच हीं व इतर पुस्तकें छापण्यांत आलीं. स्टीफन गोव्यांत ४० वर्षें काम केल्यावर इ. स. १६१९ त ७० वर्षांचा होऊन तेथेंच मरण पावला.

शिवछत्रपतींच्या जन्मापूर्वी दहा वर्षें म्हणजे ३१ जानेवारी सन १६२० रोजीं गोवें प्रांतांतील कोणाहि हिंदूनें हिंदुपद्धतीप्रमाणें विवाह करूं नये, जो करील त्यास एक हजार मोहरा दंड असा कायदा अंमलांत आला. हा कायदा शिवाजीच्या भीतीनें असो वा अन्य कारणानें असो, त्याच्या कारकीर्दीच्या अखेरीस म्हणजे १९ जानेवारी सन १६७८ रोजीं त्यांत बदल करून थोडा सौम्य करण्यांत आला. तो असा कीं, हिंदूंनीं आपले लग्नविधि राजरोस न करतां गुपचुप घरांत करावे, ते बाहेर कोणास दिसूं न देण्याकरितां घराचीं दारें बंद करावीं. हें मंगलकार्य या नियमाप्रमाणें चालतें कीं नाहीं यावर देखरेख ठेवण्याकरितां घराबाहेर सशस्त्र सैनिकांचा पहारा ठेवीत व लग्नघरीं दक्षिणा वगैरे घेण्यास जर कोणी भिक्षुक जाऊं लागेल तर त्यास बंदी करण्यांत येई.

धार्मिक बाबी सोडून दिल्या तरी इतर बाबतींत जनतेला पोर्तुगीजांचा म्हणजे फिरंग्यांचा किती तिटकारा आला होता व तिला कसा जाच सोसावा लागत होता याचीं उदाहरणें चौल बंदराच्या इतिहासांत अनेक सांपडतात. ( १ ) चौल गांवांत पोर्तुगीज माणसास स्थावर मिळकत करतां येऊं नये म्हणून तेथील स्थानिक लोकांनी कोणाहि फिरंग्यास जमीन न विकण्याचा कट केला होता. तो मोडून पिलोबा वर्तक यांच्या भावानें आपलें एक शेत फिरंग्यास विकलें. या अपराधाबद्दल त्याला त्या शेतांत नेऊन सुळीं देण्यांत आलें ( शके १४८६; इ. सन १५६४ ). ( २ ) फिरंग्यांच्या जाचामुळें चौलचीं माड, पोफळी, आंबा, फणस हीं झाडें तुटलीं व रयत परागंदा झाली ( शके १५१०; माघ शु. ६ इ. स. १५८९ जानेवारी १२ ).

( ३ ) तपे श्रीगाव व तपे परहर येथें फिरंग्यांनीं दंगा केला. तेव्हां त्यांनीं प्रजेपैकीं कित्येकांना कैद केलें. कित्येक परागंदा व मयत झाले, प्रजा उठून गेल्यामुळें आगरांची व्यवस्था पाहण्यास कोणी राहिलें नाहीं. अशीं तीन वर्षें गेलीं. अशा स्थितींत समुद्राचें पाणी आंत शिरून बांध, खाड्या व सीलें फुटून खांजणें झालीं. तीं पुनः बांधावयास पैका पाहिजे ( शके १५१७ माघ व. ४; १५९६ फेब्रुवारी ७ ). ( ४ ) इ. स. १६०६ त चौलास निजामशाही अंमल होता. त्याचा वेठबिगारीच्या बाबतींत रयतेवर जुल्म होऊं लागल्यामुळें कित्येक कुळें रेवदंड्यास व इतरत्र गेलीं. यानंतर फिरंगी यांची फतरत झाली. तींत कोळ्यांचीं घरें जळालीं, कांहींना बंदी केलें व मुलूख खराब झाला ( शके १५२८ माघ शु. १४; १६०७ जानेवारी ३१ ). ( ५ ) त्याच वर्षीं फिरंग्यांची पुन्हां धाड आली तेव्हां व्यापारी, वाणी, उदमी पळाले. रयतेस तहासिलाची तसवीस लागली म्हणून तिनें गुरें, ढोरें व बीं विकून धाऱ्याची भरपाई केली. ( ६ ) इ. स. १६०७ च्या सुमारास फिरंग्यांनीं तीन वेळां चौल लुटलें आणि चौथ्या वेळीं खूनखराबी करून लोकांना कैद केलें. या जुलमास भिऊन रयत रेवदंडा व दाभोळ इकडे पळाली ( शि. च. सा. खं. ९, पृ. २४–३१ ).

गोवें प्रांतांतील पोर्तुगीजांचा राज्यविस्तार सर्वश्रुतच आहे. पण वसई प्रांतांत त्यांनीं केवढें राज्य कमावलें होतें याची नीट कल्पना आज येणें शक्य नाहीं. ती पुढील माहितीवरून येणार आहे. बहादुरशहापासून पोर्तुगीजांनीं वसई प्रांत घेतला तेव्हां त्यांनीं वसई ही त्या प्रांताची राजधानी करून तिच्याखालीं अंझोर, विरार, शाळगांव, वसई, ठाणें, करंजें, आगाशी, माहीम, सोपारें इत्यादि नऊ परगणे दिले. त्यांत ४ कसबें, ५६ पाखाड्या, ३२४ खेडीं व १८ बागा होत्या.

पोर्तुगीजांच्या राज्यांतील गोवें व वसई या प्रमुख नगरांचें विस्तृत वर्णन येथें देत आहें.

## गोवें

( लेखक :– फ्रॅन्सिस कॅरेरी, इ. स. १६९५ )

गोवें नगर हें गोवें बेटांत आहे. गोवें बेटाला तीसवाडीहि म्हणतात. नगराला तट चांगला आहे. त्याला बुरूज असून त्यांजवर तोफा ठेवल्या

आहेत. गोवें बेटालाहि तट आहे व तटांत जमिनीच्या बाजूस वेशी आहेत. हें बेट धान्य, पशु व नारळी, पोफळी, आंबे, फणस, अननस यांनीं समृद्ध आहे. पाणीहि विपुल आहे. गोवें नगर पोर्तुगीजांच्या हिंदुस्थानांतील प्रदेशाची राजधानी आहे. आर्चबिशप, व्हाइसरॉय व धर्मविषयक शिक्षा करणाऱ्या समितीचा मुख्य ( इन्क्विझिटर-जनरल ) येथें राहतात. अल्बुकर्कास इ. स. १५१६ त येथेंच पुरलें. झेव्हियरचा सेंट फ्रॅन्सिस यास इ. स. १५५२ त येथेंच पुरण्यांत आलें. येथील मांडवी ( Mendona ) नदीस ब्राह्मणादि हिंदु गंगेप्रमाणें पवित्र मानतात. यांत सुंदर चर्चें, रम्य मठ व शृंगारलेले प्रासाद आहेत. येथें जेसुइटादि सर्व पंथांचे लोक आहेत. डचांनीं पोर्तुगीजांचा व्यापार बुडविण्यापूर्वी गोव्याइतकी संपन्नता पृथ्वीवरील फार थोड्या स्थळांची होती. भिक्षुकीशिवाय इतर व्यावसायिकांत ब्राह्मणाप्रमाणें वैश्य व शूद्रहि आहेत. ब्राह्मण बुद्धिमान्, हुशार, कल्पक व कर्तव्यनिष्ठ असल्यामुळें त्यांना नोकरीस ठेवण्यास सर्वजण उत्सुक असतात. अगदीं हलक्या जातीचे लोक नुसत्या लंगोट्या घालतात. रात्रंदिवस ते उघडेबंब असतात.

गोव्यांतील बहुतेक नागरिक हिंदु व मुसलमान आहेत. ते गांवाच्या वेगवेगळ्या भागांत राहतात. काफीर व काळे लोकहि पुष्कळ आढळतात. असे लोक एका पोर्तुगीजापाशीं ६ ते ४० पर्यंत असतात. ते त्यांजवर छत्र्या धरतात व हलकीं कामें करतात. त्यांना दिवसांतून दोन वेळां भात जेवावयास वाढला म्हणजे झालें. मग त्यांना दुसरें कांहींहि द्यावें लागत नाहीं. आईच्या पोटांतून ते उघडे येतात तसेच जन्मभर राहतात. ते आफ्रिकेंतून मोंबासा, मोझँबिक व झोफाला येथून दास म्हणून विकत आणलेले असतात. ते किंमतीलाहि स्वस्त पडतात.

गोवें बंदर उत्कृष्ट आहे. तें निसर्गतःच सोयीचें असून त्यासभोंवार किल्ले बांधून त्यांवर तोफा ठेवल्यामुळें व इतर सोयी केल्यामुळें या बंदराची सर इतर बंदरांना क्वचितच येईल.

गोव्यांत प्रासाद तीन आहेत. ते सर्व व्हाइसरॉयाच्या उपभोगार्थ आहेत. त्यांतील एका प्रासादास फोर्ट ( किल्ला ) म्हणतात. तो थिएटिन्सच्या ( Theatins ) प्रार्थनामंदिरापाशीं आहे. तेथून वास्को-डी-गामा वेस

जवळ असून त्यांतून मांडवी नदीचें सुंदर दृश्य दिसतें. त्यांतील खोल्या उत्कृष्ट आहेत व एक खास व्हाइसरॉयाकरितां बांधलेलें प्रार्थनामंदिर (Chappel) आहे. व्हाइसरॉयाच्या या वाड्यांत एक मंडप (Hall) असून त्यांत गोव्यांत आजवर झालेले सर्व व्हाइसरॉय व गव्हर्नर यांच्या तसबिरी आहेत. दुसऱ्या मंडपांत गोव्यांत प्रथमपासून आतांपर्यंत जीं जहाजें आलीं त्यांचीं चित्रें आहेत. याच वाड्यांत न्यायमंदिर, कोश व टांकसाळ आहे. टांकसाळींत सोनें, रुपें व चिनी धातु यांचीं नाणीं पाडतात. चिनी धातूचीं नाणीं कमी किंमतीचीं असतात.

हल्लीं व्हाइसरॉय येथील हवा वाईट असल्यामुळें या वाड्यांत न राहतां येथून दोन मैलांवर असलेल्या वाड्यांत राहतो. हा वाडा नगराच्या तोंडाशीं असून मूळ दारूगोळा बनविण्याकरिता बांधला होता. तो वाढवून त्यांत व्हाइसरॉयाच्या राहण्याची सोय करण्यांत आली आहे. तिसरा व्हाइसरॉयाचा वाडा पणजीच्या किल्ल्यांत आहे. पण त्यांत व्हाइसरॉय अलीकडे बरींच वर्षें राहत नसल्यानें शिबंदी (Garrison soldiers) असते. व्हाइसरॉयानें मोझँबिकमधून एक सिंह आणला आहे, तो पाहण्यास मी गेलों. तो चीनच्या बादशहास नजर म्हणून पाठवावयाचा आहे. गोव्याभोंवतीं हिंदु लोक पुष्कळ आहेत. ते मारुतीची पूजा करतात.

मांडवी नदी गोव्यापुढें सहा मैलांवर समुद्रास मिळते. या नदीच्या कांठानें दोन मैलपर्यंत गोवें नगर पसरलें आहे. त्याची रुंदी फक्त अर्धा मैल आहे. साऱ्या हिंदुस्थानांत येथील घरें उत्कृष्ट आहेत. वस्ती वीस सहस्र आहे. गोव्यांत मिश्र संतति म्हणजे पोर्तुगीज बाप व हिंदु आई यांजपासून झालेली कांही आहे. यांतील संकर स्त्रियांशीं इकडील संकर पुरुष कितीहि श्रीमंत असले तरी विवाह न करतां अस्सल पोर्तुगीजांशीं करूं इच्छितात. येथील (कानडी) बायका जरी काळ्या असल्या तरी गोऱ्या माणसांशीं लग्न झाल्यानंतर त्यांस होणारी संतति निमगोरी होते.

गोवें बेट महाराष्ट्र व कर्नाटक यांच्या सीमेवर असल्यामुळें त्यांत मराठी व कानडी या दोन्ही भाषा बोलणारे ब्राह्मण लोक आहेत. ते शिद्द्याप्रमाणें काळे आहेत. त्यांचे केस सडक आहेत व ते नाकाडोळ्यांनीं नीटस आहेत. ते भिक्षुक, वकील, ॲटर्नी, सॉलिसिटर इत्यादि व्यवसाय करतात.

## वसई

### ( लेखक :- फ्रॅन्सिस कॅरेरी )

मी दमणहून वसईस जाण्यास ता. २५ जानेवारी १६९५ रोजीं निघालों. मी आपलें सामान भोयाकडून किनाऱ्यावर नेलें आणि तेथून नावेंतून नाव्हीलो जहाजावर जाऊन पुढील प्रवास सुरू केला. बुधवार ता. २६ रोजीं दिवस उगवतां आम्ही तारापूरचा किल्ला व तारापूर गांव मागें टाकलें. तारापुरास डॉमिनिकन्स व रेकोलेट्स् या पंथांचे मठ आहेत. येथून दहा मैलांवर पोर्तुगीजांचा अशेरी नांवाचा डोंगरी किल्ला आहे. तो इतका अवघड आहे कीं दोन माणसें जोडीनें तो चढूं शकत नाहींत. वारा अनुकूल असल्यामुळें आम्ही माहीम गांव, माहीमचा किल्ला व इतर वस्त्या लवकर मागें टाकून वसईपाशीं आलों. पण वेळेवर पडाव न मिळाल्यामुळें वसईस सत्तर मैलांचा प्रवास संपवून मध्यरात्रीं पोंचलों. हें गांव खंबायत राज्यांत होतें. तेथील ( गुजराथेचा ) राजा बहादुरशहा याजपासून पोर्तुगीजांनीं तें इ. स. १५३४ त जिंकून घेतलें.

वसईचें क्षेत्र तीन मैलांचें आहे. वसईच्या किल्ल्याला आठ बुरूज आहेत. त्याचें काम अद्यापि पुरें झालें नाहीं. त्यांजवर तोफा ठेवण्यांत आल्या आहेत. किल्ल्याच्या दक्षिणेस वसईची खाडी आणि उत्तरेस ( किल्ल्याबाहेर ) वसई गांव आहे. गांवांत वारंवार सांथी आल्यामुळें गांवची बहुतेक वस्ती उठली आहे. किल्ल्यांतील रस्ते रुंद व सरळ आहेत आणि चौकांत बाजार असून त्यांतील घरें चांगलीं आहेत. किल्ल्यास पूर्वेस व पश्चिमेस असे दोन दरवाजे आहेत व एक लहानसा दरवाजा खाडीकडे आहे. बंदर पूर्वेस आहे.

वसईच्या प्रमुखास कॅप्टन म्हणतात. न्यायखात्याच्या प्रमुखास व्हीडोर नांव आहे. त्याजवरील अपील चालविणारास डिसेंबर गाडोर ही संज्ञा आहे. याशिवाय पोर्तुगीज राज्यांतील प्रत्येक नगरांत एक वखार व खजिना असतो. पोर्तुगीज सेनापति ( जनरल ) वसईत राहतो. तो वसईचा कॅप्टन व सर्व नोकर यांचा वरिष्ठ आहे. पोर्तुगीज राज्याचे दोन भाग उत्तर व दक्षिण असे आहेत. दक्षिण भाग गोव्याखालीं व उत्तर भाग वसईखालीं आहे. हा जनरल उत्तर भागाचा मुख्य आहे.

रविवार ता. ३० रोजीं मी आगष्टानिअन्सच्या चर्चमध्यें प्रार्थनेला गेलों. उष्मा इतका होता कीं रस्त्यांतील स्त्री-पुरुष नग्नप्राय हिंडत होते. पुरुषांनीं लंगोट्या घातल्या होत्या व स्त्रियांनीं एक लहानसें चिंधुक अंगाभोंवतीं गुंडाळून घेतलें होतें. ऐटबाज लोकांनीं रेशमी व मलमलीचीं वस्त्रें टाचेपर्यंत परिधान केलीं होतीं. सर्व स्त्रिया नाकांत नथा घालतात व सर्व लोक काडीनें दांत घासतात.

मी जानेवारीच्या शेवटच्या सोमवारीं फादर पीटरबरोबर भद्रापुरास गेलों. तेथें भुरटे मुसलमान डोंबारी खेळ करीत होते. ते दोघेजण होते. त्यांपैकीं एकानें कंबरेवर तीस विती उंचीची एक काठी ठेवली असून तिजवर दुसरा इसम वाटोळा फिरत होता. तो काठीच्या टोंकावर होता व ज्यानें कंबरेवर काठी घेतली होती, ती त्यानें हातानें धरली नव्हती, व काठीवरच्या इसमाला आधार कशाचाहि नव्हता. हें अद्भुत कृत्य त्यास कसें करतां आलें याचेंच मला गूढ पडलें. त्यानंतर दोन गिरक्या मारून तो माणूस एका रोवलेल्या बांबूवर उतरला.

वसईच्या किल्ल्याबाहेर कसबा आहे. वसईस मनोविनोदाची तीच एक वनस्थली आहे. तो पंधरा मैलांचा टापू नारळी, अंजीर, आम्रतरु व इतर वृक्ष यांनीं गर्द आहे. सर्वत्र उंसाचे मळे लागून गेले आहेत. शेत कसणारे ख्रिस्ती, मुसलमान व हिंदु आहेत. ते आसमंतांतील खेड्यांत राहत असून त्यांनीं रहाटगाडग्यानें पाणी देऊन हें रान सतत हिरवेगार ठेवलें आहे. तेथील हवा थंड व वारा आनंददायक आहे. कसब्यांत सुखवस्तु लोकांनीं क्रीडागारेंहि बांधलीं आहेत. उन्हाळ्यांत जेव्हां साथीचे आजार फैलावतात तेव्हां त्यांचा संसर्ग टाळण्याकरितां ते या हर्म्यांत स्थलांतर करतात. या साथींनीं सुरत, दमण, वसई, ठाणें इत्यादि गांवें फार हानि सोसतात.

वसईपाशीं जेसुइट, डॉमिनिकन्स, फ्रॅन्सिस्कन्स यांचीं प्रार्थनामंदिरें आहेत. कसब्याच्या वाटेवर डॉमिनिकन्सच्या प्रार्थना-मंदिरांत लेडी डी लॉस रेमिडिओज हिची मूर्ति आहे. तिच्या दर्शनास मी गेलों. पांच वर्षांपूर्वी मोगलांचा प्रजाजन काकाजी यानें मोठें बंड केलें होतें. त्याच्या बंडांत बरेच दंगेखोर व चार सहस्र सैनिक सामील झाले होते. ते गांवेंच्या

गांवें लुटीत व जाळीत चालले होते. त्या बंडांत काकाजीनें वरील देवीचें मंदिर जाळलें.

जेसुइटांनीं बांधलेलें सेंटपॉलचें चर्च सुंदर आहे. त्याच्या भिंतीवर व कमानीवर सोन्याची नक्षी इकडील कारागिरांनीं काढली आहे. येथील डारमिट्री ( शय्यागार ) व क्लॉइस्टर ( मठ ) हीं वसईत उत्कृष्ट गणलीं जातात. येथील उपवनांत भारतीय, तसे युरोपीय फलद्रुम आहेत. त्यांत अंजीर व द्राक्षवेली आहेत. येथील लोक लांकडी घाण्यानें उंसाचा रस काढतात. मग तो रस कढईत घालून आटवितात. रात्रीं मातीच्या भांड्यांत थंड केला म्हणजे त्याची पांढरी साखर होते.

## प्रकरण दुसरें

# कावेबाज इंग्रज

फार प्राचीन काळापासून भारताला पूर्वेपेक्षां पश्चिम बाजूचेंच भय आहे. मुसलमानांच्या राजकीय व धार्मिक स्वाऱ्या भारतावर पश्चिमेकडून पण खुष्कीच्या मार्गानें झाल्या आणि त्यानंतर पोर्तुगीज, डच, इंग्रज व फ्रेंच यांच्या व्यापारी स्वाऱ्या पश्चिमेकडूनच पण जलमार्गानें झाल्या. पोर्तुगीज व डच यांना भारताशीं व्यापार केल्यापासून फार लाभ होतो असें इंग्रजांना कळून आल्यावर त्यांनीं सोळाव्या शतकांत त्यांच्याच मार्गाचा अवलंब केला. इंग्रजांच्या पूर्वेकडील स्वाऱ्यांना इ. स. १५८८ पासून सुरुवात झाली. त्यांचे हे प्रयत्न फुटकळ असल्यामुळें त्यांना इ. स. १६२५ पर्यंत यावें तसें यश आलें नाहीं. त्या वर्षापर्यंत इंग्रजांच्या भारतांत पांच खेपा झाल्या. त्यांत त्यांचा उद्देश सुरतेस कायमचें ठाणें देऊन आयात-निर्यात व्यापार करण्याचा होता, पण हा त्यांचा उद्देश पोर्तुगीज व एतद्देशीय व्यापारी यांनी सफळ होऊं दिला नाहीं.

भारतावर त्या वेळीं मोंगलांचा मुख्य अंमल असून त्यांच्या दरबारांत वजन असल्याशिवाय कोणाहि परकीय व्यापाऱ्याचा पाय भरतभूमीवर टिकण्याची आशा नव्हती. इ. स. १६११ त मिडलटन नांवाचा इंग्रज मुशाफीर सुरतेस आला. कारण त्या वेळीं सुरत हेंच साऱ्या बंदरांत प्रमुख व मोठें बंदर होतें. तेथूनच उत्तरेस दिल्लीपर्यंत व पूर्वेस नागपुरापर्यंत मालाची

ने-आण चालू असे. या कारणानें सुरतेच्या मोंगल सुभेदाराचा अधिकार व दर्जा फार मोठा होता. पण अधिकार कितीहि मोठा असला तरी त्याची मूठ दाबली म्हणजे त्याला मुठींत आणणें सोपें पडे. पोर्तुगीज त्या कलेंत निष्णात असल्यामुळे त्यांच्या काफिल्यानें मिडलटनला सुरतेस आडविलें. इंग्रजांचा एक वकील हॉकिन्स हा दिल्लीस मोंगलांच्या दरबारांत होता. त्यानें मिडलटनच्या वतीनें खटपट करून पाहिली, पण ती फुकट गेली. अशा रीतीनें सुरतेस डाळ न शिजल्यामुळें निराश झालेला मिडलटन दाभोळास गेला व दाभोळाहून परत तांबड्या समुद्राकडे चालता झाला.

इ. स. १६०० त इंग्लंडच्या इलिझाबेथ राणीनें एका इंग्रज कंपनीस पूर्वेकडील देशांशीं व्यापार करण्याची सनद दिली असली तरी तिनें पहिलीं १०–११ वर्षें भारताबाहेरच काढलीं. तिनें इ. स. १६११ त कॅप्टन हिपॉन याजबरोबर ग्लोब या नांवाचें जहाज पाठविलें. तें सुरतेस इतरांना आलेला कटु अनुभव लक्षांत घेऊन सुरतेस न येतां सिंहलद्वीपास वळसा घालून भारताच्या पूर्व किनाऱ्यावर आलें. प्रथम तें नेगापट्टणला थांबलें. पण तेथें निराश झाल्यावर हिपॉन मच्छलीपट्टणास उतरला. या वेळीं मच्छलीपट्टण ही कापडाची मोठी पेठ होती. पण त्यास तेथेंहि यश आलें नाहीं.

## सर टॉमस रो

यापुढचा इंग्रजांचा प्रयत्न अधिक सुसंघटित व पद्धतशीर झाला. इ. स. १६१४ त ईस्ट इंडिया कंपनीनें आपली उभारणी समायिक भांडवलावर करून आपलें सामर्थ्य वाढविलें. इंग्लंडचा राजा जेम्स यानेंहि कंपनीस उचलून धरण्याचें ठरवून सर टॉमस रो यास याच वर्षी मोंगलांच्या दरबारांत वकील म्हणून पाठविलें. पण याहि वेळीं पोर्तुगीजांनीं आपल्या वजनानें त्याच्या प्रयत्नास खीळ घालून त्याला हव्या त्या सवलती मिळूं दिल्या नाहींत. तथापि त्याच्या खटपटीस तत्काळ यश न आलें तरी तिचा भविष्यकाळांत इष्ट असा परिणाम घडून आल्याशिवाय राहिला नाहीं. कारण त्यानंतर अकरा वर्षांनीं म्हणजे इ. स. १६२५ त इंग्रजांनीं सुरतेस आपला पाय पक्का रोवून तें भारतांतील आपल्या व्यापाराचें मुख्य केंद्र केलें. सुरतेखेरीज गुजराथेंत घोघो, अहमदाबाद, खंबायत, भडोच व बाहेर बंदरआबास, बसरा, ठट्टा येथेंहि त्यांच्या वखारी होत्या.

सुरतेस बस्तान चांगलें बसल्यावर मुंबईपासून दक्षिणेकडील कोंकण-पट्टींतील एक एक बंदर व्यापण्यास इंग्रजांनीं सुरुवात करून कारवार, गोवें, वेंगुर्लें, राजापूर, दाभोळ इत्यादि बंदरांतून आपल्या वखारी घातल्या. जसें भारताच्या पश्चिम किनाऱ्यावर त्यांनीं हातपाय पसरले तशीच त्यांनीं भारताच्या पूर्व किनाऱ्याकडेहि आपली दृष्टि वळविली. पूर्व किनाऱ्यावर मच्छलीपट्टण व पुलीकत या नाक्यांच्या ठिकाणीं त्यांनीं आपल्या वखारी स्थापन केल्या. इ. स. १६२५ त नेलोरच्या दक्षिणेस थोड्या अंतरावर जमीन खरेदी करून आर्मे या गांवीं घातलेली त्यांची वखार चांगलीच भरभराटीस आली. या भागांतील तलम कापड इंग्रज व्यापारी फार मोठ्या प्रमाणावर खरेदी करून युरोपांत पाठवीत. कापडाचा खप अशा रीतीनें वाढून तेथील कोष्टयांना चांगली किफायत होऊं लागल्या-मुळें गोवळकोंड्याच्या सुलतानानें कंपनीस पुष्कळ सवलती दिल्या. इ. स. १६४० त मद्रासपट्टण येथें तिकडील नायकानें किल्ला बांधण्यास परवानगी दिली. तोच फोर्ट सेंट जॉर्ज होय.

इंग्रज लोक भारतीयांपेक्षां या काळांत कलाकौशल्यांत बरेच पुढारलेले होते. त्यांच्या वैद्यकानेंहि आयुर्वेद व युनानी या दोन्ही पद्धतींस मागें टाकलें होते. यांपैकीं त्यांच्या वैद्यकीय ज्ञानाचा त्यांना भारतांत आपला व्यापारी जम बसविण्यास फार उपयोग झाला. भारताच्या फार मोठ्या प्रदेशावर मोंगलांचें राज्य असल्यामुळें मोंगल बादशहाची मर्जी संपादन केल्यास आपला व्यापार सर्व भरतखंडभर त्वरित पसरण्यास फार मदत होईल हें इंग्रज जाणून होते. दिल्लीच्या बादशहास वश करण्याचे इतर प्रयत्न फसल्यावर इंग्रजांनीं आपल्या वैद्यकीय ज्ञानाच्या प्रभावानें त्याजवर छाप पाडण्याची युक्ति योजली. या वेळीं सुरतेस ब्राउटन नांवाचा एक डॉक्टर धंद्याकरितां येऊन राहिला होता. त्याच्या वैद्यकीय ज्ञानाची कीर्ति सुरतेच्या सुभेदारा-मार्फत आग्र्यास शहाजहान बादशहापर्यंत जाऊन त्यानें ब्राउटन यास आग्र्यास बोलावून नेऊन आपल्या कन्येस त्याजकडून औषधोपचार करविला. त्या योगानें ती मुलगी भयंकर आजारांतून बरी झाली. या कामगिरीनें उतराई झालेल्या बादशहाकडून ब्राउटननें आपल्या देशाच्या व्यापाराकरितां सवलती मिळविल्या.

## ब्राउटनची करामत

ब्राउटनचा नांवलौकिक आतां आग्र्याहून कलकत्त्यापर्यंत जाऊन पोंचला. तेथेहि त्यानें आपल्या वैद्यकीय ज्ञानाचा चमत्कार दाखवून बंगालच्या सुभेदाराकडूनहि त्या प्रांताकरितां कित्येक सवलती संपादिल्या. ब्राउटनची पुण्याई सर्वत्र फळास येऊं लागली. कारण सुरतेच्या इंग्रज व्यापाऱ्यांनीं तीन हजार रुपये भरून व्यापारी स्वातंत्र्य व जकातीची माफी पदरांत पाडून घेतली आणि इ. स. १६५६ त इंग्रजांना बंगाल्यांत हुगळी नदीवर वखार घालण्याची परवानगी मिळाली. हरिहरपूर व बालासोर येथेंहि त्यांनीं वखारी उघडल्या. मोंगल बादशहानें ओरिसा प्रांतांत पिपळें येथें वखार घालण्यास त्यांस परवानगी दिली. सारांश, इंग्रजांच्या वखारींनीं १७ वें शतक संपण्याच्या आंत भारताचा किनारा सर्व बाजूंनीं वेढून टाकला.

इंग्रजांनीं सुरत, मद्रास व कलकत्ता हे तीन टापू ठरवून त्या प्रत्येक टापूवर एक गव्हर्नर नेमला व त्या सर्व गव्हर्नरांवरील हुकमत सुरतेच्या गव्हर्नराकडे ठेवून आपल्या कारभारास एकसूत्रता आणली. भारतांतील सर्व बंदरांत मोठें बंदर सुरत. परंतु तें तापी नदीच्या मुखापासून आंत १२ मैल असल्यानें युरोपांतून येणारीं गलबतें सुरतेला खाडींतून न जातां मुखाशीं असलेल्या स्वाली नांवाच्या बंदरांत थांबत व खुद्द सुरतेला फार थोडीं गलबतें येत. स्वालीस शेकडों गलबतें एकाच वेळीं असून त्यांत युरोपीय गलबतांपेक्षां अरब, चिनी व मोंगल या गलबतांचाच भरणा विशेष असे. मोगलांचीं गलबतें मुसलमान यात्रेकरूंना मक्केस नेण्या-आणण्याचें काम मुख्यतः करीत.

इंग्रजांनीं आपली एक कचेरी स्वालीसच सोयीकरितां ठेवली होती. स्वालीस जकातीची तपासणी फार कडक असे. ती झाल्यावर तेथें उतरलेले प्रवासी सुरतेला विविध वाहनांतून जात. हल्लींप्रमाणें तेव्हां खडी व मुरूम घातलेल्या पक्क्या सडका नसल्यामुळें रस्ता उंच, सखल व त्रासदायक असे. चांगलीं वाहनें म्हटलीं म्हणजे रथ व गाडया. त्यांना बैलच काय, पण केव्हां केव्हां रेडेहि जुंपलेले असत. वाहनांत स्वाऱ्यांना बसवून गाडीवान पायींच चालत गाडी हाकी. गाडींत बसणारांना खाचखळग्यांच्या वाटेनें वारंवार हिसके बसत. तरी एकदा गाडी स्वाली गांवांतून धुमधुमाट बाहेर

पडली कीं दोन्ही बाजूंचीं हिरवीगार पिकें, त्यांतून हिंडणारे मोर, रस्त्याच्या कडेनें लावलेल्या वडांच्या झाडांवर बसलेले पोपट पाहून प्रवाशांचें मन रमून जाई.

### प्रेसिडेंटाचा नबाबी थाट

इंग्रजांच्या वखारीचा मुख्य प्रेसिडेंट. तो एतद्देशीय लोकांवर व सरकारी अधिकाऱ्यांवरहि वजन राखण्याकरितां नबाबी थाटानें राहत असे. त्याच्या वाड्याच्या ढेलजेंत भालदार व चोपदार रुप्याच्या काठ्या घेऊन व डगले घालून असत. अध्यक्ष जरा अंगावरून फिरकला कीं मोठ्या आदबीनें ते उठून उभे राहत. या बडेजावाशिवाय त्याजपाशीं एक धर्मोपदेशक, डॉक्टर, शस्त्रवैद्य, दुभाषा व टांकसाळीवरील अधिकारी असे. वखारींतील सर्व इंग्रज लोक एकाच भिशींत एकत्र जेवीत.

इ.स. १६६८ पासून कंपनी आपला गव्हर्नर नेमूं लागली. तिचा पहिला गव्हर्नर गुडीअर होता. गव्हर्नराच्या बंगल्याशीं संत्र्यांचा पहारा असे व पहारेकऱ्यापाशीं वाळूचें एक घड्याळ असे. तें दोनदां उलटें केलें म्हणजे एक तास झाला असें समजून तासावर टोल देण्यांत येत.

इंग्रजांच्या आधीं पोर्तुगीजांनीं भारतांत येऊन पश्चिम किनाऱ्यांवर चांगलें बस्तान बसविलेलें इंग्रजांच्या डोळ्यासमोर होतें. तेव्हां आपला जम नीट बसविण्यास इंग्रजांनीं पोर्तुगीजांचा कित्ता बऱ्याच अंशीं आपल्यापुढें ठेवला. त्यांना व्यापारांत पोर्तुगीजांचा उत्कर्ष पाहवत नसून जमल्यास पोर्तुगीजांना पश्चिम किनाऱ्यावरून हाकून लावण्याचा प्रयत्न इंग्रजांनीं केला. या कामीं त्यांनीं डचांची मदत घेऊन एक संयुक्त आरमार उभारलें व कालिकतच्या झामोरीनचें सहकार्य घेण्याचें ठरविलें. पण तो त्यांचा प्रयत्न सिद्धीस गेल्याचें दिसून येत नाहीं.

हा प्रयत्न इ. स. १६२१ त झाला व फसला. त्यामागून खुद्द गोव्यांतून पोर्तुगीजांना हुसकून लावण्याची संधि त्यांस लाभली. विजापूरचा अब्राहम आदिलशहा यास गोव्यांतील पोर्तुगीजांचें स्वतंत्र राज्य व शिरजोरी सहन होत नव्हती. त्यांस सैन्याच्या जोरावर जेरीस आणण्याचें सामर्थ्य आदिलशहांत होतें. परंतु समुद्रांत पोर्तुगीजांच्या आरमारापुढें विजापूरचें आरमार दुर्बल होतें. ही उणीव इंग्रजांच्या मदतीनेंच विजापूरकरांस भरून

काढण्याची कांही आशा वाटत होती. म्हणून इब्राहिम आदिलशहानें गोवें येथील इंग्रज व्यापाऱ्यांशीं इंग्रज व आपण यांजमध्यें कायमचा तह घडवून आणण्याच्या उद्देशानें पत्रव्यवहार केला. बादशहानें जमिनीच्या बाजूनें पोर्तुगीजांची रसद मारावी व इंग्रजांनीं समुद्राच्या बाजूनें गोव्याला घातलेला वेढा आणखी बळकट करावा आणि असें करून गोवें जिंकल्यावर तें इंग्रजाच्या स्वाधीन करावें असा विजापूरकरांचा बेत होता. परंतु इंग्रजांना आपली आरमारी कुवत अल्प असल्याचें माहीत असल्यामुळें पावसाळा समीप आल्याची सबब इ. स. १६२३ सालीं सांगून विजापूरकरांशीं व्हावयाचा तह त्यांनीं कालावधीवर टाकला.

## दंडाराजपुरी

गोव्यानंतर इंग्रजांचें लक्ष दंडाराजपुरीकडे वेधलें. दंडाराजपुरी हें बंदर ऐन समुद्रावर असल्यामुळें इंग्रजांच्या मनांत भरलें होतें. खाडींतील बंदरापेक्षां भर दर्यावरील बंदरें अधिक सोयीचीं हें ओळखून असें एखादें बंदर हस्तगत करण्याचा इंग्रजांचा फारा दिवसांचा विचार होता. शिवाय दंडाराजपुरीस असलेला चांचे लोकांचा अड्डा इंग्रजांना समुद्रांत लुटालूट करून इतरांप्रमाणें उपद्रव देत असे. यास्तव दंडाराजपुरी इंग्रजांच्या हातीं आल्यास तोहि उपसर्ग बंद झाला असता. परंतु दंडाराजपुरी पडली सिद्दयाच्या मालकीची आणि सिद्दी हा समुद्रावर प्रबल असून जमिनीवरहि फौजबंद होता. तरीहि ईस्ट इंडिया कंपनीनें राजपुरीचा किल्ला घेण्याचा हुकूम इ. स. १६६१ त इकडच्या इंग्रज वखारवाल्यांना दिला. पण आपणापाशीं सैन्य व गलबतें पुरेशीं नसल्याचें ओळखून त्यांनीं हा मनसुबा तूर्त अशक्य ठरविला. तथापि भरदर्यावर व स्वतःच्या पूर्ण राजकीय सत्तेचें बंदर असण्याचा इंग्रजांचा प्रश्न निराळ्याच मार्गानें लवकरच सुटला. इंग्लंडचा राजा दुसरा चार्लस याजबरोबर पोर्तुगालची राजकन्या इन्फन्टा कॅथेराईन हिचें लग्न इ. स. १६६२ त झालें. त्या वेळीं इंग्लंडच्या राजानें कंपनीच्या हिताकरितां मुंबई बेट मुद्दाम हुंडा म्हणून घेतलें. त्याचा ताबा ईस्ट इंडिया कंपनीस मिळण्यास सहा वर्षे लागलीं. कारण इकडील पोर्तुगीजांनीं तें सोडतांना फार खळखळ केली. त्या बाबतींत गोव्याच्या व्हाइसरॉयानें पोर्तुगालच्या राजास इ. स. १६६४ त लिहिलेलें पत्र फार महत्त्वाचें आहे. तो त्यांत

लिहितो, ' राजेसाहेबांच्या हुकमाप्रमाणें मी इंग्रजांच्या ताब्यांत मुंबई देत आहें. परंतु यापासून शेजारच्या पोर्तुगीजांना भयंकर त्रास होणार असून ज्या दिवशीं मुंबई बेटांत इंग्रजांचें बस्तान बसेल, त्या दिवशीं हिंदुस्थानाला आपण मुकलों असें समजावें. ' ही व्हाइसरॉयाची भविष्यवाणी कशी खरी ठरली याची प्रचीती जगाला आलीच आहे.

पोर्तुगीजांनीं आपलें मरण जसें ओळखलें तसें इंग्रजांनीं आपलें भावी वैभव कसें जाणलें याचें प्रत्यंतर सर अब्राहम शिपमन यास इंग्लंडच्या राजानें इ. स. १६६२ च्या मार्च महिन्यांत लिहिलेल्या आज्ञापत्रांत पाहावयास सांपडतें. सर अब्राहम हा इंग्लंडच्या राजानें मुंबई बेटाचा ताबा घेण्याकरितां नेमलेला अधिकारी होता. त्यास राजानें केलेल्या सूचनांत पुढील सूचना होती –

" आमच्या राज्याला हें बेट जोडून घेण्याचें व त्याकरितां इतका खर्च करण्याचें कारण असें कीं, त्या योगानें आमच्या प्रजेला हिंदुस्थानांत अधिक स्वतंत्रपणें व किफायतशीर रीतीनें व्यापार करतां यावा, त्या भागांतील आमचा मुलूख वाढावा व सामान्यतः आमच्या राज्यपदाचा मान वाढून आमच्या प्रजेचा उदीमधंदा व वैभव वृद्धि पावावें. "

सारांश, भारतांत राज्य स्थापण्याचा व आपली सत्ता, इंग्लंडचें वैभव व संपत्ति वाढविण्याचा संकल्प याच वेळीं इंग्लंडच्या धूर्त मुत्सद्दयांनीं कसा केला होता याची खूणगांठ यावरून पडते.

सर अब्राहाम शिपमन मुंबईचा ताबा घेण्यास हिंदुस्थानांत आला तरी इकडील पोर्तुगीज लोकांनीं त्याला कित्येक दिवस जुमानलें नाहीं. म्हणून त्या वेळीं सुरतेच्या इंग्रजांनीं सनदशीर उपायांचा अवलंब केला. त्यांनीं मुंबई व साष्टी बेटांतील लोकांकडून उठावणी करून त्यांजमार्फत एका ब्राह्मण प्रतिनिधीकरवीं अर्ज घेतला. त्यांत म्हटलें होतें कीं, ' मुंबईला इंग्रज येतील तर पोर्तुगीजांची हरकत न जुमानतां मुंबई बेट आम्ही तुमच्या ताब्यांत देऊं. या कामगिरीबद्दल आम्हांस व्यक्ति-स्वातंत्र्य मिळावें '. ही विनंती एतद्देशीयांनीं करण्याचें कारण सुरतेचा इंग्रज गव्हर्नर सर जॉर्ज आक्सिंडेन यानें ६ मार्च १६६५ रोजीं पुढील शब्दांनीं दिलें आहे. ' भारतीय

रहिवाश्यांना जाच आहे तो मुख्यत्वेंकरून पोर्तुगीजांच्या जुलमाचा. कारण एखाद्या कुटुंबांतील कर्ता पुरुष मेला कीं मागें राहिलेल्या मुलांबाळांना ते सक्तीनें जेसुईट शाळांत डांबून ठेवून परत आपल्या माणसांत जाऊं देत नाहींत. ही गुलामगिरी त्यांना फार असह्य होते!' या मुंबई बेटाचा ताबा पोर्तुगीज लोकांनी इंग्रजांस अखेरीस ८ फेब्रुवारी १६६५ रोजीं दिला व अशा रीतीनें लोकमत वळवून घेतल्याचा फायदा इंग्रजांना मिळाला.

मुंबई बेटाचा ताबा इंग्लंडच्या राजानें ईस्ट इंडिया कंपनीस अगदींच फुकट दिला नाहीं. त्याजवरील इंग्लंडच्या राजाचें स्वामित्व कायम ठेवण्याकरितां कंपनीनें राजाला प्रतिवर्षी दहा पौंड खंडणी द्यावी असें आज्ञापत्र इंग्लंडच्या राजानें दि. २७ मार्च १६६८ रोजीं काढलें. बेट ताब्यांत आल्यावर इंग्रजांना आपल्या एक एक विकासयोजना अमलांत आणण्यास उत्कृष्ट साधन निर्माण झालें. त्यांनीं सुरतेंतील आपला व्यापार हळूहळू मुंबईस आणण्यास सुरुवात केली. पण त्यापासून आपलें जकातीचें उत्पन्न बुडेल या भीतीनें बरेच दिवसपर्यंत कंपनीच्या अध्यक्षास आपली कचेरी सुरतेहून मुंबईस आणण्यास मोंगलांनीं परवानगी दिली नाहीं. तथापि मुंबईतील इंग्रजांनीं इंग्रजी भाषा व ख्रिस्ती धर्म यांचा प्रसार भारतीयांत करण्याचा उपाय इ. स. १६६८ च्या ऑक्टोबर महिन्यांतच योजिला. त्यांना इंग्रजी भाषा जाणणारे एतद्देशीय तरुण जितके निर्माण होतील तितके पाहिजे होते. कारण त्यांस आपल्याकडे कारकून म्हणून नेमून कंपनीचा व्यापार कोंकणपट्टीच्या पूर्वेस देशावर फैलावण्यास सोपें होणार होतें. शिवाय देशी लोकांनीं ख्रिस्ती धर्माची दीक्षा घेतल्यास इंग्रजांविषयीं आपलेपणा वाटणारांची व त्यांच्या सहायकांची संख्या वाढणार होती. इंग्रज लोक धर्मासाठी इकडील लोकांवर जुलूम करण्याच्या मताचे नसले तरी आपला व्यापार व राज्य यांबरोबरच आपला धर्मप्रसारहि करण्याचा त्यांचा हेतु होताच. या दृष्टीनें मुंबईकर इंग्रज अधिकाऱ्यानें सुरतेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यास लिहिलेलें पत्र उद्धृत करण्यासारखें आहे. तो लिहितो, "आम्ही येथील लोकांच्या मुलांना इंग्रजी शिकविण्याकरितां १।२ शिक्षक ठेवावे अशी बेटावरील लोकांनीं मागणी केली आहे. या योगानें परस्परांचा स्नेह वाढण्यास व ख्रिस्ती धर्माचा प्रसार होण्यास उत्तम प्रारंभ होणार आहे."

### विमा उतरण्याची कल्पना

विमा उतरण्याची कल्पना इंग्लंडांत सतराव्या शतकांत प्रादुर्भूत झाली असून तिचा अंमल इंग्रज व्यापाऱ्यांनीं इकडेहि सुरू केला होता. त्या वेळीं समुद्रकांठच्या बंदरांत देशावरून शेंकडों मैलांवरून लमाण माल आणीत व बंदरांतील माल घेऊन जात. त्यास वाटेंत लुटारू लोकांचें भय असे. त्यांजपासून मालाचें संरक्षण करण्यास पुरेसा फौजफाटा ठेवणें भाग असे. म्हणून मालाच्या अर्ध्या किंमतीचा विमा व्यापारी उतरीत असत. पण तो देशांत धामधूम सुरू झाल्यावर अपुरा वाटूं लागल्यानें मालाच्या भर किमतीवर विमा उतरावा व मालाचें वाहतुकींतील संरक्षण वाढवावें असा कंपनीनें २२ नोव्हेंबर सन १६७८ रोजीं ठराव केला.

सुरतेस इंग्रजांनीं आपली वखार घातल्यावर आपल्या टांकसाळींत ते नाणीं पाडूं लागले होते. हीं नाणीं भारतांतील इतर बऱ्याच राज्यकर्त्यांच्या नाण्यांपेक्षां सुबक व वजनाला अगदीं बरोबर असल्यामुळें त्यांचा स्वीकार ठिकठिकाणचे व्यापारी आनंदानें करीत. म्हणून इंग्रजांनीं सुरतेप्रमाणें मुंबईसहि टांकसाळ काढण्याचें इ. स. १६७२ त ठरविलें. या टांकसाळींत सोनें, रुपें व तांबें या तीनहि धातूंचीं नाणीं निघावयाचीं होतीं. तसें केलें म्हणजे तीं शेजारच्या पोर्तुगीजांच्या देशांत, शिवाजीच्या मुलखांत व दख्खनमध्ये अप्रतिबंध वापरलीं जाऊन बेटाच्या व्यापाराला सोयीचें होईल असा मुंबईच्या इंग्रज अधिकाऱ्यांचा कयास होता.

नाणीं पाडण्याच्या कामीं कंपनीला इंग्लंडच्या राजाची परवानगी आवश्यक होती. पण ती मिळणार या खात्रीवर मुंबईस कंपनीच्या अधिकाऱ्यांनीं इ. स. १५७४ त नाणीं पाडण्यास अगाऊ सुरुवात केली. या नाण्यांवर चार्ल्स राजाचा मुखवटा असून 'इंग्रज किंग चार्ल्स' अशीं फार्सी अक्षरें होतीं.[१] परंतु त्यांतील सोनें व चांदी या धातूंचीं जीं नाणीं होतीं त्यांत त्या त्या धातूंचें प्रमाण कमी ठेवण्यांत आलें होतें. उदाहरणार्थ, तो होन वा रुपया असला तर त्याची जी दर्शनी किंमत तिजपेक्षा त्याची खरी किंमत कमी असल्यामुळें प्रत्येक नाण्यामागे यांना चांगला फायदा राहण्यासारखा होता. इंग्रजांनीं अशी युक्ति काढली असली तरी नाण्यांची देवघेव होतांना सराफ लोक सर्वत्र त्यांची किंमत कस लावून ठरवीत. त्या योगानें इंग्रजांना

दक्षिणेंत विजापुरास वा कारवारास या नाण्यांपासून अपेक्षित फायदा मिळणार नाहीं अशी भीति वाटली.

विजापूर राज्यांत व गोव्यांत इंग्रजी नाणें चालत होतें तसें तें इ. स. १६७४ च्या डिसेंबर महिन्यापासून मुंबईजवळच्या शिवाजीच्या राज्यांतहि चालूं लागलें होतें. शिवाजीनें जरी आपलें नाणें पाडलें होतें तरी तें अल्प प्रमाणांत असल्यामुळें त्याच्या राज्यांत इंग्रजी नाण्यास व्यापाराच्या सोयी-साठीं त्यानें परवानगी दिली होती.

भारतांत १७ व्या शतकांत तांब्याच्या खाणी नसाव्या असें वाटतें. कारण इंग्रजांनीं तांब्याचें नाणें पाडण्याकरितां इ. स. १६७४ च्या अखेरीस इंग्लंडांतून तांब्याच्या १५०० पेट्या आणविल्या. कंपनीचें नाणें पाडण्याचें काम या वेळीं जोरांत सुरू झालें होतें. तिला हवी असलेली इंग्लंडच्या राजाची परवानगी इ. स. १६७७ च्या मार्च महिन्यांत आली. कंपनीनें इंग्लंडांतून सुरतेच्या अधिकाऱ्यांना कळविलें, 'मुंबईच्या टांकसाळीबद्दल राजाची परवानगी मिळाली आहे. ठसे पुढच्या गलबतांतून पाठवून देतों. तोंपर्यंत तुमचें नाणें पाडण्याचें काम चालू ठशांवर असेंच जोरांत सुरू ठेवा.'

तांब्याचें नाणें पाडण्यास तांब्याच्या पेट्या आल्याच होत्या. चांदी व सोनें यांच्या चिपा त्यांजपाशीं या वेळीं नव्हत्या. पण राजापूर वा सुरत येथील लुटीबद्दल जी नुकसानभरपाई शिवाजीनें करण्याचें कबूल केलें होतें ती भरपाई चांदी व सोनें यांच्या कांहीं चिपा देऊन करण्याबद्दल शिवाजी व इंग्रज यांच्या दरम्यान बोलणें सुरू होतें. त्यांत कंपनीस चांदी व सोनें भारी भावांत मिळणार होतें. तरी 'चोराच्या हातची लंगोटी' या न्यायानें तें घेण्यास इंग्रज अधिकारी इ. स. १६७६ त कबूल झाले होते.

### संस्कृत ग्रंथांची थोरवी

इंग्रजांना भारतीय विद्या व संस्कृति यांची कल्पना इकडे आल्यानंतर लवकरच आली. इकडील संस्कृत ग्रंथ उच्च प्रतीचे असून ते इकडेच छापून युरोपांत पाठवून दिल्यास भारतीय विद्येचा लाभ युरोपियनांना करून घेतां येईल व अशा रीतीनें त्यांपासून सांपत्तिक किफायतहि कदाचित् होईल अशा आशेनें आपला एक सुरतेचा गुर्जर गुमास्ता भीमजी पारख याजकरितां एक छापखाना व यंत्रसामग्री पाठवून देण्याची सुरतेच्या अधिकाऱ्यांनी

इंग्लंडांत इ. स. १६७१ त कंपनीस विनंती केली. ती इ. स. १६७४ च्या एप्रिल महिन्यांत म्हणजे तब्बल तीन वर्षांनीं पूर्ण झाली. त्या वेळीं कंपनीनें भीमजीकरितां मुंबई बेटावर एक मुद्रक, मुद्रण यंत्र व कागद पाठवून दिले. मुद्रकाचा वार्षिक पगार १५ पौंड ठरला असून तो व इतर खर्च भीमजीकडून घ्यावयाचा होता. अर्थात् हा शिळा छापखाना असावा.

इंग्रजांकडे मुंबई बदर आलें तेव्हां त्यांत पोर्तुगीजांच्या ताब्यांत असलेल्या भोंवतालच्या प्रदेशांत बाटवून ख्रिस्ती झालेले लोक बरेच होते. भारतांतील तलम व सुरेख कापड इंग्रज लोक युरोपांत व इंग्लंडांत नेऊन खपवीत असत. त्यांत त्यांचा व्यापारीदृष्ट्या फायदा होत असला तरी इकडच्या विणकरांना त्यामुळें उत्तेजन मिळून त्यांचा धंदा भरभराटीस येत चालला होता. पण इंग्रजांना इकडील माल निर्यात करून गबर व्हावयाचें होतें; इतकेंच नव्हे तर इकडील धंदेहि हळूहळू मारून भारत हा इंग्लंडास कच्चा माल पुरविणारा देश बनवावयाचा होता. यास्तव त्यांनीं इकडील कापडासारखेंच किंवा त्याहूनहि सरस कापड इंग्लंडांत विणावयास सुरुवात करून तिकडील कापडाचा खप इकडे वाढविण्याची युक्ति योजिली. त्यांना इकडील ख्रिस्ती लोक स्वकीय वाटत असत. म्हणून त्यांनाच कापड विकून तें कसें लोकप्रिय करावें याची कल्पना मुंबईच्या इंग्रज अधिकाऱ्यानें इंग्लंडांत कंपनीस इ. स. १६७३ त कळविली ती अशी :— "आमच्या मनांत उत्कट इच्छा आहे कीं, मुंबईतील व शेजारच्या बेटांतील सर्व ख्रिस्ती लोकांनीं इंग्लंडमध्येंच विणलेल्या कापडाचीं वस्त्रें वापरावीं. आमचा माल स्वस्त विकून तो लोकप्रिय करण्याची आम्हांस आशा आहे. इकडे भोंवतालीं युद्धाची धामधूम नसती तर शेजारच्या राजांनीं आपल्या शिपायांस त्याच रंगाचे कपडे द्यावे अशी आमची खटपट यशस्वी झाली असती." यावरून इकडील एतद्देशीय सैन्यांतहि गणवेश वापरण्यास इतर राजांना उत्तेजन देण्याचा त्याचा हेतु स्पष्ट दिसतो.

### धार्मिक स्वातंत्र्य

भारतांतील इंग्रजांना इकडील परिस्थितीची जशी जाणीव होती तशी इंग्लंडमधील कंपनीच्या अधिकाऱ्यांस नव्हती. हिंदु लोक धर्मनिष्ठ आहेत, ते ख्रिस्तीधर्माचा स्वीकार खुषीनें कधींहि करणार नाहींत आणि त्यांजवर

धर्माच्या बाबतींत जुलूम केल्यास पोर्तुगीज व मुसलमान राज्यकर्ते यांज-प्रमाणें आपणहि कसे तिरस्कारास व द्वेषास पात्र होऊं आणि त्याचे घोर परिणाम भावी काळांत आपणांस कसे भोगावे लागतील याचें चित्र मुंबई व सुरत येथील इंग्रज व्यापाऱ्यांच्या डोळ्यांना दिसत होतें. म्हणून कंपनी-कडून ख्रिस्तीधर्माचा फैलाव करण्याची निकड लागली तेव्हां मुंबईच्या अधिकाऱ्यांनीं ता. १५ डिसेंबर १६५३ रोजीं जें पत्र पाठविलें तें वाचनीय आहे. त्यांत म्हटलें आहे.

"दहा आज्ञा व ख्रिस्तीधर्माच्या तत्त्वांचें देशी भाषांत रूपांतर करून व तें बेटांत फैलावून ख्रिस्तीधर्म स्वीकारण्यास उत्तेजन द्यावें ही आपली आज्ञा आम्हांस महत्त्वाची वाटते. आणि ती अमलांत आणण्याची संधि मिळेल तेव्हां ती आणूंहि. परंतु धर्माच्या बाबतींत सर्वांना स्वातंत्र्य देण्याची आमची प्रतिज्ञा असल्यामुळेंच येथील लोकवस्ती वाढत आहे. हें ध्यानांत घेतां या कामीं आमचा तटस्थपणा थोडासाहि ढळल्याचें लोकांच्या लक्षांत आल्यास परिणाम अनिष्ट होईल. यासाठीं हें आक्रमण गुप्तपणेंच करणें जरूर आहे."

मिशनऱ्यांमार्फत शाळा व दवाखाने स्थापून ख्रिस्तीधर्म भारतांत फैलावण्याची क्लृप्ति पुढें निघाली तिचें मूळ 'गुप्तपणा' या शब्दांत सांपडतें. सतराव्या शतकांत इंग्लंड देश दरिद्री असून लोकांना धंदा नसल्यामुळेंहि परदेशगमन करावें लागत होतें. त्यावर व्यापार हाच तोडगा त्यांनीं काढला होता. निर्वाहाचें हें नवें क्षेत्र निर्माण झाल्यानंतर धाडसी लोक तेवढेच भारतांत राहावयास येत. त्यांत कित्येक उडाणटप्पू व व्रात्यहि असत. परंतु येथें आल्यावर ते गबर होतात अशी प्रसिद्धि इंग्लंडांत होऊं लागली, तेव्हां त्यांच्याशीं लग्न करण्याकरितां धाडसी अविवाहित तरुणींनाहि भारतांत येण्याची प्रेरणा झाली. भारतांत येणारे तरुण प्रारंभींच्या काळांत हलक्या प्रतीचे असल्यामुळें ते साहजिकच फटिंग म्हणजे अविवाहित असत. पण ऐन जवानींत ब्रह्मचर्य पाळणें त्यांस शक्य नसल्यामुळें त्यांचे इकडील तरुण स्त्रियांशीं अनैतिक व अधार्मिक संबंध होऊन त्यापासून संतति निर्माण होई. त्यांची गणना धड हिंदूंत वा मुसलमानांत किंवा ख्रिस्ती समाजांतहि न होऊन अँग्लो-इंडियनांची एक नवी जातच इकडे निर्माण झाली, तेव्हां ही

आपत्ति टाळण्याकरितां इंग्लंडांतून इकडे पाठवावयाचे पुरुष विवाहित तरी असावे किंवा त्यांजबरोबर अविवाहित स्त्रिया तरी असाव्या असा विचार सुचून तें धोरण इ. स. १६६८ पासून स्वीकारण्यांत आलें. त्याविषयीं लंडनहून सुरतेच्या कौन्सिलास दि. १० मार्च १६६८ रोजीं लिहिलेलें पत्र उद्‌बोधक आहे. त्यांत म्हटलें आहे :–

"इकडून सपत्नीक शिपायी व कित्येक कारागीर पाठविले आहेत. त्यांबरोबर ज्या स्त्रिया अविवाहित असतील त्यांना शेतकामाशिवाय अन्य काम देऊन एक वर्षभर त्यांच्या अन्नवस्त्राची तरतूद करण्यांत यावी. त्यांनीं तेथें आल्यावर इंग्रजांशींच किंवा प्रॉटेस्टंट असलेल्या इतर गोऱ्या लोकांशींच विवाह करावा."

आज दक्षिण आफ्रिकेंत संकरविवाहाची जी भीति तेथील गोऱ्या लोकांना वाटूं लागली आहे तीच भीति सतराव्या शतकांत इंग्रज लोकांना हिंदुस्थानांत कशी वाटूं लागली होती तिचा हा भक्कम पुरावा आहे. भारतांत त्या वेळीं शस्त्र वापरण्याची सर्रास मुभा होती. इंग्रज लोकांना या सशस्त्र लोकांपासून वारंवार उपसर्ग पोंचत असे. पण सुरत, राजापूर आदी-करून ज्या ठिकाणीं त्यांच्या वखारी होत्या तीं ठिकाणें परकीय सत्तेखालीं असल्यामुळें त्यांना होईल तो जुलूम मुकाट्यानें सोसावा लागे. आतां मुंबई बेट त्यांच्या सत्तेखालीं आलेलें पाहून अशा सशस्त्र लुटारू लोकांपासून बचाव करण्याकरितां इंग्रजांनीं अशी तोड काढली कीं, इंग्रज व प्रॉटेस्टंट यांशिवाय कोणाहि इसमानें हत्यार बाळगणें हा गुन्हा ठरवावयाचा. त्या दृष्टीनें वरील पत्राचा खालील भाग चिंतनीय आहे.

"इंग्रज लोक व अन्य राष्ट्रीय प्रॉटेस्टंट एवढ्यांनाच हत्याराची परवानगी असावी. शिपायांनीं (फावल्या वेळांत) हस्तव्यवसाय करावे व सर्व प्रकारच्या व्यापाऱ्यांना राहण्याकरितां बोलावून आणावें. मोंगल आतां धर्मच्छल करीत असल्यामुळें तुम्हांला तें सुलभ जाईल. मूळ कराराप्रमाणें बेटांत सर्व धर्मांना मोकळीक ठेवावी."

मुंबईची लोकसंख्या वाढून व्यापाराची भरभराट होण्यास मोंगलांचा धर्मच्छल कसा पथ्यावर पडला याचें हें पत्र गमक होय.

संकरविवाहाची धास्ती इकडील इंग्रज अधिकाऱ्यांनाहि विशेष

वाटत असल्याचें आणखी एका १५ जानेवारी १६७४ रोजीं लिहिलेल्या पत्रांत दिसून येतें. हें पत्र प्रेसिडेंट अंजिअर यानें इंग्लंडांत ईस्ट इंडिया कंपनीस पुढीलप्रमाणें लिहिलें आहे :–

"थोड्या हलक्या जातीच्या पण चांगल्या नीतिमत्तेच्या इंग्रज बाया इकडे पाठवून द्याव्या, म्हणजे त्यांचीं लग्नें येथील शिपयांशीं लावून देतां येतील. हे शिपायी देशी बायकांशीं संबंध ठेवूं लागले तर धर्माज्ञेप्रमाणें आम्ही त्यांना त्यांच्याशीं लग्न करण्यास भाग पाडतों. त्यापेक्षां त्यांनीं इंग्रज बायकांशींच लग्नें लावलीं तर अधिक चांगलें होईल." असें म्हणण्याचें कारण हेंच कीं, त्यांचीं लग्नें एतद्देशीय स्त्रियांशीं झाल्यास ते इकडचेच कायम रहिवाशी होतील व स्वदेशास मुकतील.

वरील विधानास खालील पत्रानें दुजोरा मिळतो. इंग्रज लोकांच्या देशाभिमानाविषयीं आपण त्यांची प्रशंसा करतों व तिला ते पुष्कळ अंशीं पात्रहि आहेत. परंतु प्रत्येक इंग्रज म्हटला कीं देशभक्तीचा पुतळा अशी आपली समजूत आहे, तिला मात्र १७ व्या शतकांत पुष्कळ अपवाद असत. इंग्रज लोक एकंदरींत फार कावेबाज. त्यांना भारतीयांना कायमचें अज्ञानांत ठेवून त्यांच्या अज्ञानाचा फायदा आपले खिसे भरण्याकडे करून घ्यावयाचा होता. इंग्रजी गलबतांपुढें आपलीं गलबतें अगदींच तुच्छ असत. ही स्थिति साध्या व लढाऊ अशा दोन्ही जातींच्या गलबतांना सारखीच लागू होती. या कारणानें आरमारी युद्धांत भारतीय आरमाराचा इंग्रजी वा कोणत्याहि युरोपीय आरमारापुढें टिकाव लागत नसे. म्हणून इंग्रज व युरोपीय लोक समुद्रांत फार प्रबळ असून समुद्रावर आपलें वर्चस्व कायम ठेवून असत. त्यांजपुढें जंजिऱ्याचा सिद्दी वा शिवाजी यांची मात्रा चालत नसे. तसेंच नौकानयनाच्या विद्येंतहि ते सर्वांना मागे टाकीत. ही स्थिति कायम राहण्यावरच इंग्रजांचें भारतांतील अस्तित्व व भरभराट अवलंबून होती.

### पोटभरू इंग्रज

पण याला खो देणारे कांही पोटभरू इंग्रज लोकच निघाले. हा गुन्हा समजून इंग्लंडच्या दुसऱ्या चार्लस राजानें २१ फेब्रुवारी १६६२ रोजीं पुढील आज्ञापत्र काढलें :–

" ईस्ट इंडिया कंपनीनें आमच्याकडे तक्रार केली कीं, कित्येक इंग्रज लोक या कंपनीशीं कोणताहि संबंध नसतां हिंदी गलबतें चालवितात, तेथील लोकांना गलबतें बांधावयास व चालवावयास शिकवितात आणि इंग्रज राष्ट्राचें नुकसान होईल अशा प्रकारचा व्यापार करतात. तरी त्यांस धरून इंग्लंडांत पाठवून द्यावें. "

पण याच इंग्रजांनीं इकडच्याच बायकांशीं लग्नें केलीं तर ही आपत्ति अधिकच वाढणार. कारण हे इंग्रज इंग्लंडांत परत जातात कशाला व कंपनीच्या इकडील अधिकाऱ्यांच्या हातीं लागतात कशाला !

आरमारी तयारी व नौकानयन या बाबतींत इंग्रजांची एत्तद्देशीयांवर ताण होती, तशीच ती दारूगोळा व तोफखाना यांतहि होती. तोफा व तोफेचे गोळे इंग्रजांच्या तोडीचे इकडील कोणाहि राजास बनवितां येत नसत. किंबहुना या कामीं अगतिक झाल्यामुळें त्यांना किल्ले लढून जिंकतांना वा इतर प्रसंगीं इंग्रज प्रभृति गोऱ्या लोकांच्या तोंडाकडे पाहावें लागत असे. विजापूरकर, कुडाळकर, दंडाराजपुरीचा सिद्दी हे त्यांजवर सर्वस्वीं अवलंबून राहत. त्यांच्या तोफा व गोळे हे नीटपणें उडविण्याचेंहि ज्ञान विजापूरकरांच्या सैनिकांना नसल्यामुळें तोफा व दारूगोळा इतकेंच नव्हे तर, गोलंदाजहि त्यांना राजापूरच्या इंग्रजांपासून पन्हाळगड शिवाजीपासून जिंकून घेण्याकरितां न्यावे लागले; आणि त्यांनीं ते जेव्हां पन्हाळ्यावर उडविले तेव्हां सिद्दीजोहारासारख्या बड्या सेनापतीनें तोंडांत बोट घातलें.

शिवाजीचीहि तीच स्थिति होती. तोहि इंग्रजांपासूनच तोफा व दारूगोळा विकत घेई. इ. स. १६७१ त दंडाराजपुरी घेण्याच्या कामीं शिवाजीनें ३–४ तोफा इंग्रजांपाशीं मागितल्या होत्या. इ. स. १६७७ त शिवाजीला तोफा विकण्याचें इंग्रजांनीं नाकारल्यावर शिवाजीनें वेगळीच युक्ति लढविली. मुंबईच्या डेप्युटी गव्हर्नरापासून एका फ्रेंच माणसानें दोन तोफा विकत घेतल्या, त्या त्यानें ठाण्याच्या एका व्यापाऱ्याला विकल्या व त्याजपासून शिवाजीनें त्या खरेदी करून इंग्रजांना फजीत केलें.

गोलंदाजीच्या बाबतींत इंग्रज गोलंदाजांनीं थोड्याच अवधींत मोठी कीर्ति मिळवून मोंगलांच्या सैन्यांतहि प्रवेश करून घेतला. औरंगजेबानें शहाजहान बादशहा गादीवर असतांना त्याजविरुद्ध बंड उभारलें होतें तोच

बारसा औरंगजेबाच्या कारकीर्दीत त्याचा पुत्र शहाजादा मुअझ्झम यानें चालवून इ. स. १६७० त बापाविरुद्ध हत्यार उचललें, तेव्हां त्याच्या तोफखान्यावर जॉन ट्रॉलर नांवाचा इंग्रज मुख्याधिकारी होता.

युरोपियनांनीं परदेशगमन सुरू केल्यावर त्या त्या देशांचें यथार्थ ज्ञान स्वतःस व आपल्या देशबांधवांस होण्याकरितां त्यांना नकाशे काढण्याची कल्पना सुचली. हे नकाशे अगदीं हुबेहूब नसले तरी ढोबळ ज्ञानास उपयुक्त असले पाहिजेत. हे नकाशे डचांनीं रेखाटले होते व त्यांपासून ते इंग्रजांना घ्यावयाचे होते. डच व इंग्रज यांचें युद्ध सुरू असतां एकदा इंग्रजांनीं डचांचें जहाज पकडलें. त्यांत इतर मालाबरोबर नकाशेहि सांपडले. त्यासंबंधीं ८ जानेवारी १६६० रोजीं लिहिलेल्या एका पत्रांत पुढील मजकूर आहे :–

" पकडलेल्या मालाच्या कमिशनरानें विकावयास काढलेले डचांचे हिंदुस्थानविषयक नकाशे कंपनीच्या उपयोगाचे आहेत किंवा कसे याची चौकशी करून ते केवढ्याला विकत मिळूं शकतील याचा तपास करावा. "

इंग्रजांची नकाशे मिळविण्याची खटपट सुरू होती, त्याच वेळीं तेहि स्वतः नकाशे काढवून घेण्याच्या प्रयत्नांत होते. इ. स. १६७० त पर्वतराव नांवाच्या इसमानें इंग्रजांकरितां शिवाजीच्या राज्याचा नकाशा काढला व तो दिल्लीच्या बादशहास पाहण्याकरिता पाठविण्यांत आला.

इंग्रज लोक हिंदुस्थानांत कोणत्या जिनसांचा व्यापार करीत असत हें हुबळीच्या लुटींत शिवाजीला मिळालेल्या मालाचा जो तपशील उपलब्ध आहे तो वाचून समजून येतें. हें पत्र १५ एप्रिल १६७३ रोजीं कारवाराहून सुरतेस लिहिलें आहे.

### कागदाचीं रिमें

'हुबळीच्या लुटींत शिवाजीनें ईस्ट इंडिया कंपनीचीं तांब्याचीं भांडीं, कापड, पोतीं, मिरीं, शिसें, काथ्या व कागदाचीं रिमें इत्यादि ७८९४ होनांचा माल नेला.' यांपैकीं बहुतेक माल इंग्रज लोक परदेशीं पाठविण्याकरितां भारतांत खरेदी करीत असले पाहिजेत. शिसें व कागदाचीं रिमें इकडे विकण्याकरितां ते परदेशाहून आणीत असावे. शिशापासून एतद्देशीय लोक बंदुकीच्या गोळ्या, तोफेचे गोळे आपल्या पद्धतीप्रमाणें बनवीत असतील.

कागद दौलताबाद व जुन्नर येथे होत होता. त्याहून सरस कागद इंग्लंडांत बनवून हिंदुस्थानांतील धंदा काबीज करण्यास याच वेळीं प्रारंभ झाला होता. शिवाजीचा मुलूख मुंबई बंदरास लागून असल्यामुळें शिवाजीच्या मुलखाशीं व्यापार करणें इंग्रजांना सर्वांत सोयीचें व फायदेशीर वाटलें. म्हणून मुंबईच्या इंग्रजांनीं इंग्लंडच्या बादशहाचें पत्र शिवाजीकरितां आणिलें व तें त्याजकडे २५ जानेवारी १६६८ रोजीं आपल्या वकिलाबरोबर पाठविलें. त्यांत त्यांनीं शिवाजीबरोबर व्यापाराचे व मित्रत्वाचे संबंध जोडण्याची इच्छा प्रदर्शित केली होती. या पत्राचें उत्तर शिवाजीनें ता. २ ऑगस्ट १६६८ रोजीं रवाना केलें. त्यांत पुढील कलमें होतीं :-(१) ईस्ट इंडिया कंपनीनें शिवाजीच्या मुलखाशीं फक्त व्यापार करावा. याशिवाय इतर कामांत तिच्या नोकरांनीं शिरूं नये. (२) बंदरांत कंपनीच्या नोकरांनीं ज्या किराणा मालाचा व्यापार करावयाचा तो शिवाजीच्या राज्यांतील सावकारांस परभारें न देतां सरकारचे कारकून व किल्लेदार यांच्या विद्यमानें द्यावा. जहाजावरील युद्धसामग्री व सैनिक यांना या सरकाराच्या राज्यांत जमिनीवर उतरूं देऊं नये. (३) कंपनीचे जे लोक व्यापार करावयास या राज्यांत येतील त्यांनीं या सरकारच्या सरदारांची अगाऊ परवानगी घेतलेली असावी. (४) तशी परवानगी न घेतां जर कोणी येऊन पोर्तुगीजांप्रमाणें दगाबाजी करतील तर सरकारानें दिलेली व्यापाराची परवानगी रद्द करण्यांत येऊन मित्रत्वाचे संबंध राहणार नाहींत. (भा. इ. सं. मंडळ, त्रैमासिक, वर्ष २९ वें, इ. स. १९४८-४९.)

वरीलप्रमाणें करार झाल्यावर शिवाजीहि इंग्रजांकडे आपणांस जरूर तो माल मागवूं लागला. तो तोफेचे गोळे व बंदुकीच्या गोळ्या बनविण्याकरितां मुंबईस इंग्रजापाशीं इ. स. १६७० त शिसें मागत होता. तें त्यास विकण्यास इंग्रजांना हरकत वाटली नाहीं. शिशाप्रमाणे गोळ्यांना लागणारा सोराहि इंग्रज लोक परदेशाहून इकडे आणून विकीत. हा सोरा दंडाराजपुरीच्या सिद्याचा नोकर मुंबईस इंग्रजांपाशीं खरेदी करण्यास गेला होता. त्या वेळीं म्हणजे इ. स. १६७० त सिद्दी व शिवाजी यांचें युद्ध चालू असल्यामुळें आपला तटस्थपणा दाखविण्याकरितां इंग्रजांनीं त्यास नकार दिला. पण औषधें मात्र त्यास दिलीं. इंग्रज लोक

कोंकणांतून औषधी जिनसा खरेदी करून त्या युरोपांत पाठवीत व तिकडून त्यांचीं औषधें बनवून इकडे विकावयास आणीत असें यावरून दिसतें. याला बलवत्तर प्रमाण कवींद्र परमानंदाच्या शिवभारतांतील वर्णनाचें देतां येणार आहे. राजापूर शिवाजीनें लुटलें त्या वेळीं इंग्रजांची तेथील वखारहि लुटींत सांपडली. तींत शिवाजीला जो माल मिळाला त्यांत गव्याचें शिंग, कस्तुरी, केशर, रक्तचंदन, वेलदोडा, लवंगा, कंकोळ, दालचिनी, नागकेशर, वाळा, जायफळ, भांग, अफू, तमालपत्र, चारोळी, मिरीं, सुंठ, पिंपळमूळ, देवदार, जटामावशी, आंबेहळद, सैंधव, पादेलोण, हिरडा, शिलाजित, मोरचूद, हरताळ, मनशीळ, ओवा, गुग्गुळ, मंजिष्ठ, शेंदूर, पारा, गोरोचन, राळ इत्यादि वस्तु आहेत. त्यांतील कित्येक औषधी आहेत हें स्पष्ट आहे. त्यांपासून युरोपांत विविध औषधें बनविण्यास या वेळीं आरंभ झाला असल्यास आश्चर्य कसलें ?

कोंकणांतून परदेशास रवाना होणाऱ्या मालांत खंडोगणति सुपारी, नारळ, मिरीं हा खुद्द कोंकणांत उत्पन्न होणारा माल असे. इ. स. १६७९ त टॉमस मिचेल यास २९२ खंडी सुपारी व ५०० खंडी नारळ यांच्या राजापूरच्या सुभेदाराकडून वराता मिळाल्या. इ. स. १६६८ त चौल बंदरांत शिवाजीच्या तेथील अंमलदारानें इंग्रजांना पाहिजे होतीं तीं मिरींहि योग्य दरानें मिळवून देण्याची खटपट केली. इंग्रज लोक इतर जिनसांप्रमाणें काथ्याचाहि क्रयविक्रय करीत. जेथे नारळी असतात त्या मलबार, कारवार, कोंकण या भागांत नारळाच्या शेंडीपासून काथ्या काढण्यांत येतो. काथ्याचीं दोरखंडें गलबतांना लागत असल्यामुळें त्यांची पैदास व खप मोठा असे. मुंबईच्या फॅक्टरी रेकॉर्डांत यासंबंधीं पुढील नोंद आढळते. हें पत्र मुंबईहून सुरतेस १३ एप्रिल १६७० त लिहिलें आहे.

" वसईच्या किल्लेदाराला १०१ खंडी आणि शिवाजीचा कल्याण व आसपासचा मुलूख यांच्या सुभेदाराला तितकाच काथ्या देऊन स्नेह करणें भाग पडलें. कारंजा, त्रुंबे व चौल येथील किल्लेदार आणि माहीम बंदरांत येणारीं गलबतें यांना दोरखंडाकरितां मिळून पुष्कळ काथ्या द्यावा लागला. "

## प्रकरण तिसरें

# महाराष्ट्रीय जीवन

सांप्रत ग्रामीण जीवन व नागरी जीवन यांत जमीनअस्मानाचें अंतर पडलें आहे. नागरी जीवनांत सुखसोयींची समृद्धि झाली असून ग्रामीण भाग नीरस, गैरसोयींचा, बेकार व टाकाऊ बनला असल्यामुळें खेड्यांतील लोक नगरांकडे धांव घेत आहेत व खेडीं ओसाड पडत आहेत. सुशिक्षित, श्रीमान् व सुसंस्कृत माणूस खेड्यांत औषधालाहि मिळणें कठीण झालें आहे आणि शहरें मात्र तशा नागरिकांनीं इतकीं खेचून भरलीं आहेत कीं, त्यांत राहावयास जागाहि मिळेनाशी झाली आहे. नागरी जीवन व ग्रामीण जीवन यांत इतकी फारकत दिसून येऊं लागली आहे कीं नागरी जीवनास ग्रामीण जीवनाची ऊब देण्याकरितां गुजराथेंत आनंद येथें ग्रामीण जीवनांत नागरी जीवन गुरफटण्यासाठी एक विद्यापीठ सरकारी कायद्यानें मुद्दाम नुकतेंच स्थापण्यांत आलें आहे. डांबरी रस्ते, नाटकगृहें, चित्रपटगृहें, उपहारगृहें, विद्युद्दीप, गायनसमाज, चित्रशाळा, विद्यालयें, महाविद्यालयें, रेडियो, व्यायामशाळा, उद्यानें, क्रीडालयें, कारखाने, दवाखाने, व्याख्यानें, प्रवचनें, पुराणें, कीर्तनें यांची नगरांत गर्दी उडाली आहे. उलटपक्षीं खेडेगांवांत दारिद्र्य, अज्ञान, रोगराई, भांडणतंटे, गुंडगिरी, खून, मारामाऱ्या व दुर्गुण यांचें पेव फुटलें आहे.

ही क्रांति आधुनिक सुधारणेनें घडवून आणली आहे. पण शिवकालांत इतकीं खेडीं व शहरें यांत विषमता उत्पन्न झाली नव्हती. तेव्हां

नगरें संख्येनेंहि फार थोडीं व वस्तीनेंहि लहान होतीं. हल्लीं ज्या नगरांची वस्ती लाखांनीं मोजण्याइतकी मोठी आहे, तीं नगरें तेव्हां सहस्रांनीं मोजण्याइतकीं लहान होतीं. लोकसंख्येच्या तुलनेनें खेड्यांत जसें अंतर अगदीं थोडें होतें, तसेंच सुखसोयींतहि होतें. उलट आधुनिक सुधारणेच्या अभावीं शहरें गलिच्छ व खेडीं बरीचशीं स्वच्छ होतीं. यंत्रकलेचा प्रादुर्भाव नसल्यामुळें मोठाल्या गिरण्या व कारखाने शहरांत नव्हते व संपत्तीची विषम वांटणीहि हल्लींप्रमाणें झाली नव्हती. सारांश ग्रामीण जीवन नागरी जीवना-सारखेंच बऱ्याच अंशीं असून ग्रामांत जमीनदार, इनामदार, सावकार व त्यांच्या आश्रयानें शास्त्री, पंडित, वैदिक, ज्योतिषी, वैद्य, पुराणिक, हरि-दास, गोंधळी, गायक, वादक, नर्तक, व्यापारी असल्यामुळें ग्रामीण जीवन समृद्ध, सुखी, आनंददायक, आरोग्यकारक बनून त्यांतूनच राज्यास जरूर त्या सद्गुणांचा व सामर्थ्याचा पुरवठा होत असे.

## राजसभा

तत्कालीन महाराष्ट्रीय जीवनाचीं अंगें विविध होतीं. त्यांपैकीं राज-सभा हें एक होय.

शिवकालीन सरदार हे एका अर्थी राजेच होते. कारण त्यांचें ऐश्वर्य राजाप्रमाणें असे. त्याची कल्पना जयराम कवीनें व्यंकोजीच्या राजसभेचें वर्णन केलें आहे, त्यावरून येईल. जयराम कवि व्यंकोजीस भेटावयास आला त्या वेळीं त्यास त्याची राजसभा पुढीलप्रमाणें दिसली. “ व्यंकोजी हा राजकारणांत कुशल असे. मंत्री, कवि, पंडित, ज्योतिषी, वैद्य, खड्गधारी, दुसऱ्या देशांचे वकील व सभासद यांच्या प्रभावळींत तो शोभत होता. त्या राजसभेंत विस्तीर्ण बिछायत घातलेली असून तिजवर रेशमी वस्त्रें व चित्र-विचित्र गालिचे पसरले होते. सोनेरी व रुपेरी खांब रेशमी सूत्रांनीं उत्तम रीतीनें गुंडाळले होते. वरील छत रंगीबेरंगी होतें. व्यंकोजी सिंहासनावर विराजमान झाला असून सोन्याचा राजदंड, छत्र व चामर या राजचिन्हांनीं भूषित होता. त्याच्या मस्तकावर तेजःपुंज रत्नांचा शिरपेंच होता. कानांत हिरे व मोत्यें यांचीं दिव्यकुंडलें, मनगटांत कडीं, दंडांत केयूर, गळ्यांत हार, बोटांत चमकणाऱ्या अंगठ्या होत्या. त्याच्या भृत्यांच्या हातांत सोनेरी

टिकल्यांनीं शोभिवंत अशीं आयुधें होतीं. ते त्याला ताडपत्री-पंख्यांनीं वारा घालीत होते. गवई, बजवय्ये, स्तुतिपाठक भाट, उत्तम नट व नर्तक हे सभेच्या पुढील भागांत आपआपल्या स्थानीं आसनांवर बसून त्याची स्तुति गात होते. 'महाराज! या मनुष्याकडे आपण कृपादृष्टीनें पाहावें' असें भालदारांनीं प्रत्येकाचा नामोच्चार करून सांगितल्यावर त्या लोकसमुदायानें त्याला यथाक्रम नमस्कार केला. इतक्यांत द्वारपालानें येऊन सांगितलें कीं, हत्तीवर बसून जयराम कवि येत आहेत. तेव्हां राजाचे नेत्र हर्षानें प्रफुल्लित होऊन त्यानें लगबगीनें पंडितांसह त्वरेनें सचिवाला सामोरे पाठविलें. नंतर जयराम कवीनें त्यांच्यासह सभेंत प्रवेश केला.

हें वर्णन तंजावरांतील व्यंकोजी राजाचें असलें तरी तें शिवाजीच्या वा इतर महाराष्ट्रीय संस्थानिकांच्या राजसभेसहि लागू पडणारें आहे.

## टुमदार नगरें

कोंकणांत कुडाळ, शृंगारपूर, पालवणी हीं लहान-मोठीं संस्थानें असून त्यांच्या राजधान्या टुमदार व स्वयंपूर्ण अशा होत्या. पालवणी ही जसवंतराव दळवी यांची राजधानी; तिचें वर्णन शिवभारतांत परमानंदानें केलें आहे, तें वाचलें म्हणजे महाराष्ट्रांतील राजधान्या कशा असत व त्यांत कोणकोणते धंदे चालत असत हें समजतें. पालवणीला परमानंदानें पल्लीवन हें संस्कृत नांव मुद्दाम बनवून दिलें आहे. प्रस्तुत गांव बाणकोटच्या खाडीपासून दक्षिणेस रत्नागिरी जिल्ह्यांत सुमारें तीन कोस आहे. त्याच्या उत्तरेस शिवाजीनें बांधलेला मंडनगड आहे व पश्चिमेस सुमारें आठ कोसांवर केळशी बंदर आहे. पालवणींतील वस्तीची स्थूल मानानें ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र अशी माहिती दिल्यावर परमानंद अठरापगड जातींच्या लोकांकडे वळला आहे. तेथे कासार, सोनार, लोहार, तांबट, सुतार, गवंडी, न्हावी, कुंभार, माळी, कोष्टी, शिंपी, तांबोळी, तेली, परीट, गवळी, गुरव, हलवाई, चांभार, या जातींचे लोक होतेच. पण राजधानी म्हटली म्हणजे तींत गुणी व कसबी लोक राजाश्रयाकरितां व राजवाड्यांतील उच्च संस्कृति वृद्धिंगत करण्याकरितां असावयास पाहिजेतच. राजवाड्यांत प्रसंगोपात्त गायन, वादन, नर्तन व्हावयाचें त्यासाठीं मृदंग्ये, वीणेकरी, टाळकरी, पावेकरी व बजवय्ये कायमची

वस्ती करून राहत असत. राजाची स्तुति करणारे भाट, त्याजपुढें गाणारे गवई व नाचणाऱ्या नायकिणी असावयाच्याच. त्या काळीं आयतीं रंगीत वस्त्रें विकत मिळत नसल्यामुळें लोकांचीं पागोटीं, पटके रंगविणारे रंगारी होते. शस्त्र-व्यवसाय हा तेव्हांचा मुख्य व्यवसाय. तरवारी, जंबिये, पट्टे, बर्च्या, भाले, बाण या आयुधांशीं राजाचा व त्याच्या सैनिकांचा नित्याचा संबंध. तीं त्यांचीं हत्यारें बनविण्याकरितां वा दुरुस्त करण्याकरितां शिकलगार होते. राजास वारंवार युद्धास जावें लागे. द्रव्याचें मुबलक साहाय्य असल्याशिवाय राजाचें व त्याच्या सैनिकांचें राजधानीबाहेर पाऊलहि पडणें शक्य नव्हतें. म्हणून त्यांना द्रव्याचा पुरवठा करणारे सावकार पल्लीवनांत होते. जनतेच्या करमणुकीचीं साधनें म्हणजे कथा, पुराण, नाच, रंग हींच होत. पण त्यांनीं अज्ञजनांचें व मुलांचें पूर्ण समाधान कसें व्हावें? म्हणून नाना प्रकारचे नजर-बंदीचे खेळ करून दाखविणारे जादूगार होते व ढोलग्याच्या तालावर दोरीवरून चालणारे आणि पुंगी वाजवून नागास डोलावयास लावणारे गारोडीहि होते. तेव्हा दारूबंदी नव्हती किंवा दारूबाजांची गर्दीहि नव्हती. सणवारी, विजयोत्सवप्रसंगीं वा लग्नसमारंभांत क्षत्रिय-शूद्रादिकांत, कोळ्यांत व मांगांत निशापाणी व्हावयाचेंच. तशांत तें माडांचीं आगरेंच्या आगरें असलेलें कोंकण. तेथें माडी व्हावयाची नाहीं तर कोठें व्हावयाची? ती करणारे व विकणारे कलाल पल्लीवनांत होते.

बहुधा युद्ध नाहीं असें कधीं व्हावयाचेंच नाहीं. पण चुकून कांहीं दिवस तसेच सुने गेले तर निशाणबाजी व नेमबाजी तयार ठेवणारे पारधी रानावनांत शिकार करण्यास जात असतच. बाटल्यांत भरलेलीं औषधें हल्लीं-प्रमाणें हवीं तितकीं मिळण्याची सोय नव्हती. औषधें देशीच असत व तींहि पल्लीवनाभोंवतालच्या वनस्पतींपासून बनविलेलीं पुड्या बांधून रुग्णाला देण्यांत येत. त्यांचे खल लावून मात्रा, गुटिका, चूर्णें विकणारे गांधी असत. अर्थात् त्यांचे जोडीदार वैद्य व राजवैद्यहि असलेच पाहिजेत. बिडी, सिगरेट तेव्हां नसे. पण घरोघरीं डब्यांतून व चंच्यांतून पान, तंबाखू ठेवणारे व चिलीम बाळगणारे, मिजासीनें चारचौघांस जमवून पानपट्ट्या दांताखालीं दाबणारे, तंबाखूचा बार भरणारे व चिलिमीचा झुरका मारणारे रंगेल लोक असत. त्यांस हा मालमसाला तांबोळी पुरवीत.

## पंढरपूर

निकोलाय मनुची हा इटालियन प्रवासी भारतांत शिवकालांत आला होता. तो तरुण व कांहींसा दूड होता. त्याच्या लिहिण्यांत कोठे अतिशयोक्ति असली तरी त्यांत ग्राह्यांश बराच होता. भारतांतील प्रवासांत महाराष्ट्रांतहि त्यानें भ्रमण केलें होतें. त्या भ्रमणांत गोव्याहून पंढरपुरास गेल्यावर त्याला जो अनुभव आला त्यावरून पंढरपुराची तेव्हांची स्थिति समजण्यासारखी आहे. तो लिहितो, "मीं निल्याचा पोशाख टाकून कारमेलाईट भक्ताचें ( Monk ) सोंग घेऊन गोवें सोडलें. तसें सोंग घेतल्याशिवाय मला गोवें हद्दींतून बाहेर पडणें शक्य नव्हतें. गोव्याची हद्द ओलांडल्यावर शिवाजीचें राज्य लागलें. त्यांत गेल्यानंतर मीं नेहमींचा पोशाख घातला ( इ. स. १६६६ ). मीं शिवाजीच्या राज्यांत आल्यावर ज्या ठिकाणीं पोंचलों तेथें दरोडेखोरांनीं १५ इसमांस ठार मारल्याचें समजलें. मीं अगदीं घाबरलों व 'देवा माझा सांभाळ कर' अशी परमेश्वरापाशीं प्रार्थना केली. कांही पावलें चालून गेल्यावर गोठा लागला. तेथें एक वाटसरू भेटला. तो घाईनें चालला होता. त्यानें मला बजावलें, 'अरे मागून चोर येत आहेत. पळ!' पण मी आजारी व अशक्त असल्यामुळें मला पळवेना. वाटेंत मला जकातीचीं नाकीं लागलीं. नाक्यावरचे अधिकारी प्रवाश्यांपासून जबर जकात उकळीत. त्यांजपाशीं द्यावयास पैसा नसल्यास ते अंगावरचे कपडेहि काढून घेत.

"शेवटीं येत येत विजापूरकराच्या हद्दींत भीमेच्या कांठावर पंढरपूर या खेड्यांत आलों व रात्रीचा मुक्काम तेथेंच केला. पंढरपुरास येणारे प्रवासी बाजारपेठेंत उतरतात तसा मीहि उतरलों व एका दुकानाच्या पडवींत बसलों. जाणारे येणारे लोक मला पाहून म्हणाले, 'याच्या कोटांत मोतीं आहेत.' मी म्हणालों 'मी एक गरीब फिरस्ता आहे. मज गरिबापाशीं कुठलीं मोत्यें?' मध्यरात्रीच्या सुमारास गांवांत चोर शिरले. मी ज्या दुकानांत होतों तेथें येऊन ते धोंडे फेकूं लागले. म्हणून मी दुकानच्या पोऱ्याला घेऊन दुकानाच्या आंतील भागांत शिरलों. आम्हीं दुकान आंतून लावून घेतलें. चोर दुकानांत आले नाहीत, पण बाहेरूनच भाले व तलवारी यांनीं दार फोडण्याची खटपट करूं लागले व 'जें काय असेल तें देऊन टाक' असें

मला दरडावून सांगूं लागले. तेव्हां जीव वांचविण्याकरितां मीं बाहेर दोन साखळ्या फेकून दिल्या. त्या ५० रु. किमतीच्या होत्या. मग बाजार लुटून व लोकांना मारून ते चालते झाले.

" आतां दुकानांत राहणें धोक्याचें वाटून मी बरेच रस्ते ओलांडीत एका घराशीं आलों आणि दार उघडें पाहून कांहीं पायऱ्या चढून गच्चीवर गेलों. मला वाटलें की आता आपल्याला भय नाहीं. पण घरधनी गांवांतील गडबड ऐकून जागा झाला होता. तो ढाल-तरवार घेऊन खोलींतून बाहेर आला. मला पाहून ' चल चालतां हो ' असें खेंकसून म्हणाला. मीं म्हणालों, ' मी परदेशी आहें. चोरांनीं मला बाजारांत लुबाडलें म्हणून इकडे आलों व दार उघडें पाहून जीव वांचविण्याकरितां आंत शिरलों. ' पण तो मला कांहीं केल्या ठेवून घेईना. तेव्हां एका देवळाच्या ( विठोबाच्या ) पायऱ्यावर गेलों. तेथें पुष्कळ लोक बाण व तरवारी यांच्या जिकडे तिकडे चाललेल्या धुमाकुळांतून आश्रयार्थ जमले होते. पण तेथें एक ब्राह्मण भेटला. त्यानें मला गचांडी देऊन तेथूनहि हाकललें. आतां चोर निघून गेले होते. दुसरीकडे कोणी राहूं देईना. म्हणून मी पुनः बाजारांत आलों व उरलेली रात्र तेथेंच काढली. पहाटे बरें वाटेना तेव्हां मीं एक लवंग चावली व ऊन पाण्याच्या घोटाबरोबर ती खाल्ली. मग बऱ्याच वेळां वांतीबरोबर रक्ताच्या गुळण्या पडल्यावर बरें वाटलें. मग भीमा ओलंडण्याकरितां तिच्या उतारावर गेलों. नदीचें पात्र रुंद होतें, पण तरून जाण्यास नावा नव्हत्या. म्हणून सांगडीवर बसून परतीर गाठलें व पुढें परिंड्यास गेलों. "



## ग्रामराज्य

सरदार हा प्रदेशाचा राजा तसा पाटील हा गांवचा राजा होता या विधानांत अतिशयोक्ति मुळींच नाहीं हें त्यांच्या मानमरातबावरूनहि लक्षांत येण्यासारखें आहे. ग्रामीण जीवन स्वयंपूर्ण व बाराबलुत्यांच्या धाग्यांनीं एकत्र विणिलें असून त्याचें केंद्रस्थान पाटील हा असे. त्याच्या संसारोपयोगी वस्तु त्यास गांवांतील बलुतेदार मोफत पुरवीत. त्या योगानें ऋद्धिसिद्धि त्याच्या घरांत पाणी भरीत असा भास होतो. त्याच्या घरीं व चावडीवर अनेक गांवकरी सरकारी कामानिमित्त येत. त्यांस पान-तंबाखू-

करितां लागणारीं पानें दररोज १०० पर्यंत गांवच्या तांबोळ्यानें आणून द्यावीं. त्याच्या घरीं व चावडीवर गोड्या तेलाच्या समया वा ठाणवया असत; त्यांजकरितां हवें असलेलें तेल तेल्यानें द्यावें. गांवांत तेल्याचा घाणा एखादाच असावयाचा. पण चांभारवाड्यांत चांभारांचीं घरें अधिक असत. त्या सर्व चांभारजातीनें एकचर्मी जोडा प्रतिवर्षी पाटलास घालावयास द्यावा. पाटलास बसावयास कांहीं बैठक पाहिजे. त्याकरितां दोन पट्ट्यांचा चवाळ्याचा चौकोनी लोकरीचा घोंगडीवजा तुकडा धनगरानें पोंचवावा. थंडीच्या दिवसांत पाटलास पांघरावयास हवी असलेली पासोडी त्यानें कोष्ट्यापासून घ्यावी. कोष्ट्याप्रमाणें शिंप्यांचींहि घरें अनेक असल्यास सर्व शिंप्यांनीं मिळून दिवाळींत पाटलीणबाईकरितां सालिना पांच चोळखण पुरवावे.

तांबोळ्यापासून पानतंबाखूकरितां पानें मिळालीं तरी सुपारीवांचून त्यांचा काय उपयोग! यासाठीं बाजारच्या दिवशीं बाजारांत बकालांनीं दुकानें मांडलीं म्हणजे प्रत्येक दुकानापासून फार नाहीं, पण त्यानें एक सुपारी घ्यावी. संसारास जोंधळा, गहूं यांशिवाय आणखी काय जिनसा लागत नाहींत? कडधान्यें व डाळी लागावयाच्याच. त्यांची उणीव बाजाराच्या दिवशीं प्रत्येक दुकानांतून फसकी घेऊन त्यानें भरून काढावी. पण इतकें झालें तरी भाजीचें काय! आठवड्याच्या बाजारांत माळणी पाट्या घेऊन व माळी धोतरें पसरून बसतात. त्यांतून त्यानें सेव सबजी म्हणजे भाजी थोडीबहुत उचलावी. पाटलाच्या बायका बुरख्यांतल्या. त्या सहसा घराबाहेर पडावयाच्या नाहींत व ओढ्याचें वा गांव-विहिरीचें पाणी आणण्याचा मराठमोळ्यामुळें कमीपणा मानावयाच्या. यासाठीं गांवच्या कोळ्यानें पाटलाच्या घरचें पाणी भरावें. असें असलें तरी बायकांना स्वयंपाक घरांतल्याघरांत करावा लागावयाचाच, पण तो सर्पणावांचून कसा व्हावा? गांवांत दररोज रानांत जाऊन फांटे गोळा करून व त्यांच्या मोळया बांधून विक्रीकरितां आणणारे मोळीवाले असत. त्यांनीं आपसांत ठरवून पाटलास लागेल तेव्हां एक फांट्यांची मोळी द्यावी. मांगानें मोटेचा नाडा त्यास द्यावा व त्याच्या घरीं राबता महार असावा. कुंभारानें आपल्या टेकावरील आव्यांतून संक्रांतीच्या दिवशीं खण ( मडकीं ) द्यावे.

पाटलांस मांसाहाराची बंदी नसली तरी दररोज मांसभक्षणाचा त्यांचा

परिपाठ नसे. पण सणासुदीला तें पाहिजेच. शिवाय सरकारी अधिकारी व पैपाहुणा आल्यास त्यांची सरबराई त्यांच्या योग्यतेस साजेशीं करावयासच पाहिजे. म्हणून कसायास बकऱ्याची सागोती दररोज वजन ८८।० या प्रमाणांत द्यावी लागे. त्यांजकरितां पोंचवावयास वा आणावयास गाडी, घोडा व गडीमाणसें हवीं असत. तीं त्यानें वेठबिगार पद्धतीनें मिळवावीं.

त्या काळीं ग्रामीण जीवन हल्लींसारखें रूक्ष व कटाळवाणें नव्हतें. दर महिन्यांत एकादां तरी सण यावयाचाच. तसा तो आला म्हणजे गांवकरी मोठ्या आनंदानें, हौसेनें व थाटानें साजरा करीत. त्यांत पाटलाला अग्रपूजेचा मान असे. सणांना चैत्र महिन्यांतील गुढीपाडव्यापासून सुरुवात व्हावयाची. त्या दिवशीं प्रातःकाळीं सर्वांनीं घरोघरीं गुढ्या उभारावयाच्या असल्या तरी प्रथम पाटलाच्या घरची गुढी उभी राहावयाची. चैत्र मास संपला कीं, वैशाखापासून ज्येष्ठअखेर लग्नसराई धूमधडाक्यानें गाजावयाची. तेव्हां नवरा-नवरीवर अक्षता पडून झाल्यावर पहिला टिळा पाटलाच्या कपाळाला लागावयाचा व पहिला विडा त्याच्याच हातांत पडावयाचा. दसऱ्याच्या नवरात्रांत व दिवाळींत वाजंत्र्यांनीं दररोज सूरसनईची व ताशामर्फ्याची हजेरी पाटलाच्या घरीं दिलीच पाहिजे. शिलंगणास गांवकरी सजविलेल्या घोड्यावर बसून गेले म्हणजे शमीपूजन पाटलाच्या हस्तें झालें पाहिजे. भाद्रपदअखेर पोळ्याचा सण गांवांत काय गाजावयाचा! त्या दिवशीं बैलांना कावेच्या पट्ट्यांनीं रंगवावयाचे, त्यांच्या शिंगांना वाखाचे गोंडे व गळ्यांत घुंगूर बांधून पुढें ढोल व लेजीम वाजवीत त्यांची गांवभर मिरवणूक निघावयाची. तिच्या अग्रभागीं पाटलाचे बैल तोऱ्यानें चालावयाचे. भाद्रपदांत शुद्धपक्षांत गौरी व गणपति यावयाचे. ते सर्वांच्या आधीं पाटलाच्या घरीं येऊन बसले पाहिजेत. वर्षअखेर फाल्गुनमासीं शिमग्याचा सण मोठा व शेवटचा. पौर्णिमेस पूर्ण चंद्रमा आकाशांत विलसत असतां होळीच्या टेकावर गांवची मुख्य होळी धडाक्यानें पेटावयाची. तिला गांवचे लहानथोर जमावयाचे व प्रत्येकानें आपल्या घरची पुरणपोळी होळींत टाकावयाची. त्या वेळीं पहिली पोळी कोणाची पडावयाची तर पाटलाची. ती पडली म्हणजे मग सर्वत्र जोराजोरानें महाध्वनि व्हावयाचा.

याशिवाय पाटलाचे कांहीं विशेष मान सांगावयाचे राहिलेच. त्याला

गांवांतल्या प्रत्येक लग्नांत खोबऱ्याची एक वाटी व शेला मिळावयाचा. शिराळशेटाच्या अनेक मूर्तींत मिरवणुकीमध्यें पाटलाचा शिराळशेट पुढें असावयाचा. महजरावर वा अन्य सरकारी कागदावर निशाणी नांगर फक्त मोकदम पाटलाचाच कुळकर्ण्यानें करावयाचा. त्याच्या राहत्या घराला सर्व कर माफ. सरकारांतून दरसाल त्याला मानाचा शिरपाव मिळावयाचा. पौष व माघ मासीं शेतें पिकून शाळू, हरभरा व गहूं या पिकांनीं शिवार अगदीं हिरवेंगार होऊन जाई व कुणब्यांचीं पोरें सकाळच्या प्रहरीं शेतांत हुरडा भाजून व खाऊन माळ्यावर पांखरें राखावयास बसत आणि आनंदानें गोफणींतून पाखरांवर दगड भिरकावींत. सायंकाळीं आज याच्या रानमळ्यांत तर उद्यां त्याच्या रामगिरींत गांवचीं माणसें हुरडा खावयास जात आणि त्यांबरोबर गूळ, खोबरें, गाजरें, भुईमुगाच्या शेंगा व लसणीचें तिखट यांचा समाचार घेत व गप्पा गोष्टी करीत कोवळा कोवळा व गरमागरम हुरडा खात. पाटलाला इतकी स्वस्थता कोठून असणार ! त्याच्यामागें हडदी फार. म्हणून ज्यांच्या शेतांत पीक हुरड्याला आलें असेल त्यानें एक हुरडा कवड पाटलाच्या घरीं पोचवावें. पाटील हा कांहीं बारा बलुत्यांपैकी नव्हे. बलुतेदारांना कुणब्यांच्या खळ्यांवर पेंडीकाडी मिळे. पण पाटलास ती गोष्ट कमीपणाची. यासाठीं खळ्यावर मळणी होऊन धान्य वाढवीत असतां पाटलाला एक सेल पाटी म्हणजे वाढविलेल्या धान्याची एक पाटी मिळावी.

एवढा स्पृहणीय मानमरातब पाटलास असल्यामुळें पाटिलकीच्या वतनाबद्दल भाऊपण्यांत भांडणें लागत. असा एक तंटा मौजे पारगांव माळा तर्फ पाटस येथें लागला असतां त्याचा निवाडा करण्याकरितां भोंवतालच्या अनेक गांवांचे मोकदम ( पाटील ) इ. स. १६५८ त जमविण्यांत आले होते. त्यांची मजालस सुपें येथें भरून त्यांनीं निवाडा केला. तो वाचला म्हणजे भाऊबंदकी कशी असे व वतनदार मानमरातबाकरितां कसा प्राण टाकीत हें कळून येतें. या वादांत दोघांची वांटणी समान ठरली. पण त्या घराण्यांपैकी एक घराणें वडील व दुसरें धाकटें या कारणानें पोळ्यांत कोणाचा बैल पुढें असावा व कोणाचा मागें असावा, दिवाळींत महारमांगांनीं आधीं कोणास ओवाळावें व मागाहून कोणास ओवाळावें आणि होळींत

पोळी आधीं कोणीं टाकावी व मागाहून कोणीं टाकावी याचाहि निकाल मजालशीस द्यावा लागला. त्यामुळें सणवारी व समारंभाच्या दिवशीं गांवकऱ्यांस हा चर्चेचा व करमणुकीचा विषय झाला.

## पंचांगवाचन

तेव्हां छापील पंचांगें नव्हतीं व हल्लींप्रमाणें आणा दोन आणे टाकले कीं कोणासहि पंचांग मिळतें तसें मिळत नव्हतें. लोक धर्मपरायण व सणवार, व्रत-वैकल्यें करणारे असत. त्यांना तें अगाऊ वेळच्यावेळीं सांगणारा हवा असे. तें काम ग्रामजोशी करी व त्यांतहि मानाचा प्रश्न उत्पन्न होई. त्यानें पंचांग आधीं कोणाकडे व मग कोणाकडे वाचावें याचा क्रम ठरलेला कसा होता हें कृष्णाजी माणकजी अधिकारी मामले चेऊल यानें बावाजीबाबा व भावजी बाबा प्रभु यांस लिहिलेल्या पत्रानें कळून येतें. त्यांत म्हटलें आहे, " तुमचे आमचे वडील व तुम्ही आम्ही एकत्र नांदत आलों पूर्वीं चेऊल आबाद असतां संवत्सर प्रतिपदेस पंचांग आधीं जमीनदाराकडे वाचावें, त्याजवर सुभे मामले ( सुभेदार ) यांजकडे वाचावें ऐसी परंपरागत होती. सांप्रत आम्हा जाणता जमीनदारांपैकीं खारबंदीमध्यें आमचें घर होतें तें समयीं बाबूजोशी प्रातःकाळीं आमचे घरीं येत. त्यास ( त्या नंतर ) आम्ही तात्या-कडे पाचारण करूं. ते समयीं अंताजी अथवा चिमणाजी यांस पंचांग श्रवण करण्यास ( त्यांनीं ) पाठवावें. तेथून तात्यांकडे वाचावें. तेथून राजकोटीं वाचावें. तेथून राजापूरचे अंमलदाराकडे वाचावें हें आपणास दखल असेल. ( कोकणच्या इतिहासाचीं साधनें पृ. ५२ सं. शां. वि. अवळसकर ).

## शेटेपण

कोकणांतील व्यापारी-गांवांत शेट्याला मोठा मान असे. " मामले मुर्त-जाबाद उरुफ चेऊल येथें शेट्यास दरसाल दरघरास एक जेवण व एक लारी मिळावी. ज्याच्या घरीं वऱ्हाड होईल ( लग्न ? ) त्यानें शेट्यास एक शेला द्यावा, ज्याला मूल होईल त्यानें हरकी एक लारी द्यावी. हजाम, शिंपी, सुतार, सोनार, कांसार, लोहार, पाथरवट, रंगारी व मोची यांनीं सालाचें एक जेवण म्हणून दरघरास एक लारी द्यावी. कासार बालाघाटी हे लोखंड, पोत, कांबी व शिसें बालाघाटीहून आणतात व चेउलीहून तांबें, मोड,

कथिल, शिसें, पितळ, कांसें खरेदी करतात. त्यांनीं दर खंडीस एक लारी शेव्यास द्यावी." ( शि. च. सा. खं. ९ पृ. १६ इ. स. १५९९-१६०० )

### ग्रामण्य

श. १५६३ आश्विन शु. १५
ता. ८।१०।१६४१ इ. स.

नाशिक येथें सोनप्रभु बिन कोंडप्रभु हा धर्माधिकरणी ( धर्माधिकारी ) होता. तो दुष्काळांत नाशिक क्षेत्रीं पोट भरेना म्हणून आपल्या बायकोस घेऊन कोंकणांत जव्हार गांवीं गेला. तेथे त्याच्या बायकोनें शूद्राच्या हातचें अन्न खाल्लें असा आरोप ठेवून त्यास गण शुक्र यानें वाळींत टाकलें. तेव्हां सोनप्रभूनें दिवाणांत फिर्याद करून मजालस बोलावून तिनें आपल्यावरील आरोपाचा निवाडा करावा अशी विनंती केली. त्यावरून नाशिकच्या अधिकाऱ्यानें समस्त ब्राह्मण भट बोलावून त्यांजपुढें हा विषय निर्णयाकरितां मांडला. त्या वेळीं उभयपक्षांनीं आपली बाजू सांगितली. प्रतिवादी गण शुक्र म्हणाला ' सोनप्रभु व त्याची अवरत ( बायको ) काळामध्यें कोंकणांत गेले होते. तेथे त्यांनीं शूद्राच्या हातचें अन्न खादलें म्हणौनु आपण ऐकलें. यासाठीं तो स्नान करून शुद्ध झाल्याशिवाय त्याला ब्राह्मणांनीं पंक्तीस घेऊं नये असें मीं सांगितलें. '

गण शुक्रानें आपली बाजू मांडल्यावर वादी सोनप्रभु यानेंहि आपला पक्ष सांगितला. तो म्हणाला, " आपण जव्हारतर्फेस काळामध्ये होतों. तेथें आपण गांवीं नव्हतों. अवरत एकली होती. ती आजारी असल्यामुळें तिच्यानें उठवेना. तेव्हां तिनें शूद्राचे हातें तांदूळ धुवून घेऊन चुलीवर ठेवलें. ते तिनें स्नान न करतां उतरले हा दोष घडला. ही हकीकत आपण जवारेस थोर थोर ब्राह्मण होते त्यांसी जाऊन सांगितलें. तिहीं ग्रंथ काढून आपणांस प्रायश्चित सांगितलें तें केलें आहे. ते समस्त ब्राह्मण विद्यमान आहेत. त्यांतच दिनकरभट होते. ते हल्लीस वाराणशीस आहेत. "

दोन्ही पक्षांचें म्हणणें हाजीर मजालसीनें ऐकून घेतल्यावर मजालस बोल्ली, ' जर पहिलें प्रायश्चित भली ब्राह्मणीं दिधलें आहे तर आतां सोनप्रभूस वाळींत टाकण्याचा समंधु काय ? ' त्यानंतर कांहीं दिवसांनी

दिनकर भटजी वाराणशीहून नासिकांत अकस्मात् आले. त्यांस पुसावयास पाठविलें तेव्हां त्यांनींहि सोन प्रभूनें प्रायश्चित्त घेतल्याचें कबूल केलें. यावरून सोन प्रभूच्या शुद्धतेचा निवाडा झाला. समस्त ब्राह्मणांनीं सोन प्रभु व त्याची अवरत निर्दोष आहे असें सांगितलें. तरी यास जो कोणी हाली कैफती व कथला करील तो दिवाणीचा गुन्हेगार व गोताचा अन्यायी. मोर्तब सुद तेरीख १२ माहे रजबू सन हजार १०५१ (श्रीशिवचरित्र, साहित्य-खंड २, पृ. २९४).

### वर्णसंकर

कोंकणांत देशापेक्षां परिस्थिति वेगळी होती. तेथील हिंदूंचा एकट्या मुसलमानांशींच नव्हे तर पार्शी, यहुदी, ख्रिस्ती यांजबरोबर संघर्ष व संबंध येत असे. त्याचे दुष्परिणाम हिंदु जातींना कसे भोगावे लागत व त्यांपासून जातींचें संरक्षण करण्याकरितां हिंदु काय उपाय योजीत असत याची स्पष्ट कल्पना खालील पत्र वाचून येणार आहे. हें पत्र चौलच्या पुढाऱ्यांनीं तेथील देसाई व देशकुलकर्णी यांस लिहिलें आहे. त्याची भाषा जुनी मराठी आहे. ती कळण्यासाठीं सदर पत्राचा आशय आधुनिक मराठींतून देण्याचा प्रयत्न येथें केला आहे. पत्र राजाराम छत्रपतींच्या कारकीर्दींतील असलें तरी त्यांत वर्णिलेली स्थिति शिवकालासहि लागू पडणारी आहे.

॥ श्री ॥

शक १६१५ कार्तिक शु. १३
इ. स. १६९३ ऑक्टोबर ३१.

श्री सकलगुणैश्वर्य (संपन्न) अखिल परोपकारपरायण राजश्रिया विराजित राजमान्य दामाजी आपाजी प्रभुदेसाई व्र देशकुलकर्णी मामले चेऊल व अधिकारी तों. झिराड व तों. अष्टागर मामले भजकूर गोसावी यांसी :–

स्नेहांकित रामाजी कामत कृतानेक विनंती विशेष – अत्रैव कुशल श्री लक्ष्मीकांतकृपया विमलता परिसोन स्वकीय स्वानंद लेखन करीत गेलें पाहिजे. यानंतर बहुत दिवस झाले. स्वकीयें पत्र पाठवून परामर्श केला नाहीं. ऐसे तो विहित नाहीं. परंतु कालवर्तमान व राजकीय उपद्रवास्तव पूर्वस्नेह-

स्मरणास विक्षेप पडोन परस्परें पत्र-लेखनास विस्मृति झाली. याउपर क्षणाक्षणाला पत्रद्वारा दर्शन देऊन परामर्शास अविस्मरण नसलें पाहिजे.

यानंतर या जागीं कुणब्यांच्या खागरी आहेत. त्यांच्या जातींत झोल म्हात्रा व जंवर म्हात्रा यांस आपण ( तुम्ही ) मुख्य नेमून त्यांच्या जाती-जातीचा कारभार त्या दोघा जणांच्या शिरीं स्थापिला आहे. परंतु त्यांनीं कित्येक वहिवाटीस सोडून ( अनराहाटी ) वर्तणूक केली आहे. त्यामुळें त्या जातींत दुफळी माजली आहे. त्या दोघांच्या बाजूंस पांच-सात माणसें व त्यांच्याविरुद्ध पक्षांत ५०।७५ माणसें असे दोन पक्ष पडले आहेत. हीं ५०।७५ माणसें त्या दोघांचा अधिकार मानीत नाहींत, आपल्याच मता-प्रमाणे वागतात, याचा परिणाम असा झाला कीं पाटलाचा भाचा विनाम बाळा पाद्र्याचे घरीं भ्रष्ट झाला. तो जातींत ( याति ) घेतला. वेंटा आगरी हा लहानपणापासूनच मंनजी देवजी याच्या घरीं राहून जेवीत खात असे. मंनजीचा मऱ्हाष्ट धर्म ( हिंदु धर्म ) फक्त नांवाला. परंतु वरकड आचार अवघा मुसलमानांचा. त्यांच्या घरीं जो भ्रष्ट झाला त्याला ( विनाम बाळा ) यातींत घेतला. याच रीतीनें धर्मोजी पणवेलकर यासहि सांप्रत यातींत सरता केला.

याबाबतींत धरबंध असा कांहींच नाहीं. ज्यास यातीमध्ये घ्यावयाचा त्यास घेतात व न घ्यावयाचा त्यासहि घेतात. कांहीं बंद असा राहिला नाहीं. पारशांमध्यें गेला तोहि यातीमध्यें घेतला. उद्यां मुसलमान व महार यांसहि ते यातींत घेतील. या दृष्टीनें झोल म्हात्रा व जंवर म्हात्रा हे कांहीं उत्तम वर्तणूक करीत नाहींत. आपण मात्र त्या दोघांस यातींत शिष्ट करून ठेवले आहेत. पण ते असे वागतात व आपल्या आज्ञेंत वर्तत नाहींत. ते ज्यास यातीमध्यें घेतात, त्याजपासून आपण केलेल्या कायद्याप्रमाणें दंड घेतात तो आपणच भक्षतात आणि स्वतःस वाटतील त्या गोष्टी सजवून लिहून तुम्हांस कळवितात. आणि आपला मजुरा करून घेतात. ते तुम्हांस जें लिहितील त्यावर तुम्ही विश्वास ठेवतां आणि आम्हीं जे चेऊल प्रांतांत रहातों व तुमची आज्ञा मानतों त्यांजवर तुम्हीं अवकृपा करतां.

त्या दोघांच्या सांगण्यावरून तुम्हीं काना झिराडकर व काळा बेलकर यांना यातीबाहेर टाकलें म्हणून ऐकलें. तें ऐकून आम्हांस आश्चर्य दिसून

आलें. खरें पाहतां त्यांचा कांहीं अपराध नाहीं. चेऊलकर व आणखी पांच-पन्नासजण एक होऊन त्यांनीं काना झिराडकर व काळा बेलकर यांजवर कुभांड घेतलें आहे. हे दोघे ५-७ वेळां आम्हांकडे आले होते. त्यांचें,मानस आपल्या यातीचा बंद राखावा, तिळतुल्य अनुचित प्रकार होऊं नेदावा ( देऊं नये ), जो यातीमध्यें घ्यावयाचा तो सर्वांच्या मतानें घ्यावा, ज्याला यातींतून काढावयाचा त्याला काढावा, भलती वर्तणूक ( अन राहाटी ) होऊं नेदावी ऐसा नीतिपदार्थ म्हणतात. पण सदर झोल म्हात्रा व जंवर म्हात्रा यांस त्यांचें म्हणणें चित्तास येत नाहीं. म्हणून त्यांनीं तुम्हांस त्याविरुद्ध लिहून त्यांचें बदनाम केलें आहे. झोल म्हात्रा व जंवर म्हात्रा आपले ढंग सोडीत ( सांडीत ) नाहीत. यांनीं मागें कित्येक अनुचित गोष्टी केल्या आहेत व पुढेंहि अशाच सवलती दिल्यास त्या ते करण्यास चुकणार नाहींत.

अशा स्थितींत मऱ्हाष्ट यातीचा बंद राखावा, अनुचित गोष्ट ( पदार्थ ) होऊं नेदावी हें भल्यास विहित आहे. जाणून या गोष्टीचा अभिमान धरून पारपत्य करणें तुम्हांस ( गोसावियास ) उचित आहे. येणेंकरून पुण्यपुरुषार्थ आहे. यास्तव खागरी-कुणबी समुदाय मिळवून साकल्यें तुम्हास ( गोसावियास ) विनंतिपत्र लिहिलें आहे. तेणेंप्रमाणें मनास आणून पारपत्य केलें पाहिजे. यानंतर तुम्हांस आज्ञा करणें असेल व खागरी कुणबियांच्या जातीची हरएक गोष्ट पुढें लिहिणें असेल तर इतक्यांच्या नांवें पत्र लिहून आम्हांकडे रोखा पाठविणें.

तानकोजी छत्रे, बाळ घरत, राम घरत मुळेकर, काळोजी पाटेल बेलकर, हिरोजी आंघवसकर.

सदरहू चौघाजणांचे नांवें रोखा लिहून पाठवीत जाणें. येणें करून पुढें अनुकूल चालेल. कळलें पाहिजे. कृपा निरंतर असो दीजे. कार्तिक शु. १३ सोमवार शके १६१५ ( शि. च. सा. खं. ९, पृ. ८२।८३ ).

## ब्राह्मणक्षत्रियांचे गुणदोष

वेंकटाध्वरि हा कवि इ. स. १६३७ च्या सुमारास होऊन गेला. त्यानें शिवाजीची बरीचशी कारकीर्द पाहिली असावी. विश्वगुणादर्शचंपू या सुप्रसिद्ध संस्कृत ग्रंथाचा तो कर्ता व द्रविड देशांतला रहिवासी. असा परप्रांतीय ब्राह्मण ग्रंथकार शिवकालीन महाराष्ट्रीय ब्राह्मणांविषयीं व मराठ्यांविषयीं

काय लिहितो हें समजून घेणें कोणासहि बोधप्रद वाटेल. त्यानें आपल्या चंपूंत कृशानु व विश्वावसु असे दोन कल्पित गंधर्व घेऊन त्यांच्या संवादांतून आपला अभिप्राय प्रकट केला आहे. त्यांत इतर प्रांतांप्रमाणें महाराष्ट्राचेंहि वर्णन आहे. हे दोन गंधर्व विमानांत बसून महाराष्ट्रांत आल्यावर त्यांना महाराष्ट्रीय ब्राह्मण येणेंप्रमाणें आढळले.

"येथील लोक ( ब्राह्मण ) कुळकर्ण करणें, गांवचा हिशेब लिहिणें, शेती व वाण्याचा धंदा करणें या विविध व्यापारांत गढल्यामुळें स्नान-सध्या योग्य वेळीं करीत नाहींत. यजन-याजन, अध्ययन-अध्यापन इत्यादि षट्कर्में त्यांनीं सोडलीं आहेत. उपनयन, विवाह हे संस्कार ते योग्यवेळीं करीत नाहींत. या संस्कारांचेंहि धार्मिक स्वरूप नष्ट होऊन मिष्टान्न-भोजन-समारंभाचें स्वरूप त्यास प्राप्त झालें आहे. उपनयनानंतर ब्राह्मण कुमारांनीं वेदाभ्यास करावयास पाहिजे, तो न करतां ते सतत यावनी भाषेचा अभ्यास करतात व तीच भाषा लिहितात. सकाळपासून संध्याकाळपर्यंत त्यांचा हा उद्योग पिढ्यान्‌पिढ्या चालू आहे. यामुळें त्यांचा अधःपात झाला आहे. पोट भरण्याकरितां यवन नृपतींचे सेवक बनून त्यांस ते आपला देह विक-तात; आणि खोटे हिशेब लिहून आपल्या धन्यास फसवितात. अशा लबाड लोकांना जनता मान देते. त्यांचा वेदाभ्यास इतका मागें पडला आहे कीं, ज्या ब्राह्मणांना दशग्रंथ फक्त नांवानें माहीत आहेत ते ब्राह्मण महाराष्ट्रांत वेदव्यास समजले जातात. ज्या ब्राह्मणाला फक्त एकच श्लोक पाठ येतो त्याला बृहस्पतीची योग्यता प्राप्त होते. जो ब्राह्मण फक्त सकाळ-संध्या-काळचा होम करतो तो ब्राह्मण आपस्तंब ऋषीच्या योग्यतेचा समजला जातो."

ही महाराष्ट्र ब्राह्मणांची निंदा केवळ अतिशयोक्तीची आहे. ती विश्वा-वसूला न आवडून तो या विषयाची दुसरी बाजू मांडतो. तो म्हणतो, "या ब्राह्मणांत कांहीं अग्निहोत्री, शास्त्री, शांत वृत्तीचे, अंतर्मुख, आत्मज्ञानी, महन्त ( महान्त ), जगांतील व्यवहारापासून निवृत्त व वैदिक मार्गानें चालणारे ब्राह्मणहि आहेत. तसेच स्नान-संध्याशील, पवित्र, पुराणश्रवण करणारे, पुराण सांगणारे, श्रुति, स्मृति, पुराणें जाणणारे, स्पृश्यास्पृश्य भेद पाळणारे,

देवपूजा करणारे, पवित्र माणसानें शिजविलेलें अन्न ग्रहण करणारे ब्राह्मणहि आहेत. येथील ब्राह्मण सेनापत्य, सुभेदारी, प्रधानपद इत्यादि धारण करणारे असल्यामुळें त्यांजकडून ब्राह्मणधर्म पाळला जात नसला तरी हरकत नाहीं. कारण तसें त्यांनीं केलें नसतें तर हें जग ब्राह्मणहीन म्हणजे निर्ब्राह्मण झालें असतें. अर्थात् सर्वत्र यावनी धर्म पसरला असता. असे ब्राह्मण संख्येनें थोडे असले तरी सहस्रो स्नानसंध्या करून राहणाऱ्या पवित्र ब्राह्मणांच्या तोडीचे आहेत. कारण कुऱ्हाड एक असली तरी सहस्रो विषवृक्षांचा नाश करूं शकते."

इतकें झाल्यावर कृशानु महाराष्ट्रीय क्षत्रियादिकांकडे ( मराठे ) वळून त्यांजवर टीकास्त्र सोडतो. तो म्हणतो, "येथील क्षत्रियादिकांचीं कृत्यें अत्यंत असह्य झालीं आहेत. ते देशोदेशीं लूट करीत हिंडतात, जाळपोळ करतात, ब्राह्मणादिकांचें सर्वस्व हरण करून पोट भरतात.

देशे देशे लम्पटाः पर्यटन्तो भंजं भंजं ब्राह्मणादीनशेषान् ।
हारं हारं हन्त सर्वस्वमेषां पापा एते स्वोदरं पूरयन्ति ॥ "

विश्वावसूला ही क्षत्रियादिकांची निंदा न आवडून तो त्यांचें पुढील शब्दांनीं समर्थन करतो.

"तूं म्हणतोस तें खरें असलें तरी त्यांचें हें कृत्य श्रेष्ठ प्रतीचें आहे. हे गनिमी काव्यानें लढणारे व अतिशय चपळ असे महाराष्ट्रीय सैन्याचे समुदाय जर सर्वत्र हिंडत नसते तर देव-ब्राह्मणांना छळणाऱ्या तुरुष्कांनीं या देशांतील देव व ब्राह्मण नष्ट करून टाकले असते. म्हणून मराठ्यांनीं केलेली लूट क्षम्य आहे.

मायाचञ्चुतया भयावहगतिः प्रत्यर्थिपृथ्वीभुजाम् ।
माहाराष्ट्रभटच्छटा रणपटुर्नो पर्यटाठ्येत चेत् ।
देवब्राह्मणवर्गनिग्रहकृतो देशांस्तुरुष्का इमे ।
निष्प्रत्यूहमनोरथा वितनुयुर्निर्देव-भूमीसुरान् ॥

म्हणून महाराष्ट्र सैन्यानें देवब्राह्मणांच्या कल्याणाकरितां म्लेच्छांचा नाश करीत असतां जीं दुष्कृत्यें केलीं तीं सहन केलींच पाहिजेत. शरिराला अनेक

व्याधि जडल्या असतां ज्याला त्यांतून मुक्त व्हावयाचें असेल त्यानें कडक औषधांचा कडवटपणा सोसलाच पाहिजे.

देवक्षोणीसुरहितकृते दारितम्लेच्छपंक्ते-।
र्मह्यां सह्या कथमपि महाराष्ट्रयूथस्य चेष्टा॥
व्याधिव्यूहप्रतिहतिकृतां व्यक्तमुग्रौषधानां।
कायारोग्यप्रणयिहृदयैः काटवं मर्षणीयम्॥

## परलोकसाधन

सासवडाजवळ दिवे व सोनोरी अशीं दोन गांवें आहेत. हीं दोन्हीं गांवें आपआपल्या परीनें प्रसिद्ध आहेत. दिव्यास अंजीर चांगले होतात व सोनेरीस किल्ला आहे तो पेशव्यांच्या तोफखान्यावरील सरदार पानसे यांचा होता. शिवकालांत गणोबा व विठोबा गिधवे हे या दोन गांवांचे जोशीं व कुलकर्णी होते. त्यांचा वृद्धापकाळ झाल्यावर त्यांनीं मनानें संकल्प केला कीं, 'परलोकाची सामग्री करावी, श्रीगंगातीरीं विश्वेश्वरापाशीं रहावें.' त्यावरून त्यांनीं दोन्ही गांवांच्या लोकांना पुसलें. ते म्हणाले, 'तुम्ही तर जाणार, पण तुमची मिरास कोणाकडे सोंपविणार?' त्यांनीं उत्तर दिलें, 'आम्ही मिराशीची गरज राखून जात नाहीं. आम्हांस तेथेंच वास करणें आहे. फिरोन या मुलखास यावयाचें नाहीं.' तें ऐकून त्या दोन्ही गांवांचे मोकदम म्हणाले, 'तुमचें गुरुकुल पानसी आहे व पिसुनहि होये. त्यास तुम्ही जाताच तर मिरासदान लक्ष्मीधर भटास करणें.' गणोबा व विठोबा यांना हा सल्ला पटून त्यांनीं लक्ष्मीधर भटाचे पाय धुऊन व तीर्थ घेऊन त्यांच्या हातावर दोन्ही गांवांचें जोसपण व कुळकर्णीपण यांचें पाणी घातलें व तसें लिहून दिलें" (श. १४५४ श्रावण शु. ३, शि. च. सा. खं. ८, पृ. ८).

## जनतेची हलाखी

शिवाजीचा काळ म्हणजे बोलूनचालून राज्यक्रांतीचा काळ. त्या काळांत जनतेची स्थिति हलाखीची झाली असल्यास नवल काय? इ. स. १६६७च्या सुमारास शिवाजी व मोंगल यांच्या झटापटी सुरू असल्यानें महाराष्ट्रांत रणधुमाळी माजून राहिली होती. तिची झळ विशेषतः पुणें व सातारा प्रांतांस अधिक लागली होती. त्या प्रसंगाचें पुढील पत्र आहे.

शके १५८९–९०
इ. स. १६६७–६८

'किले चंदन मजकुरींचे विलायत शिवाजी भोसलेचे तसविसीकरितां कुल खराब पडले. देसाई देशकुलकर्णी, मोकदम व रयत परागंदा होऊन परमुलखासी गेले. विलायतींत दिवे लागण नाहीं, ऐसे जहाले. किले चंदन नाजुक सरहदेचा पाहून विलायतीचे मामुरीबद्दल सूर्याजी नाईक देसाई यानें मौजे निंब परगणे वाईचे थळांत उभा राहून सदरेस (सभा) व जमातीस आपला अहवाल सांगितला की, शिवाजी भोसलेनें आपलें घर लुटून तलफ केलें. व आपलीं गुरें वासरें व घोडीं नेलीं. व आपल्या बहिणीस अदबखान्यांत ठेवून तिजपासून ३०० होन दंड व ६० होन सिलकावणी घेतली. किल्ल्याखालचे व जमातीचे गुन्हे व नाईकवाडी आपलीं मुलें माणसें घेऊन पळून गेले होते. ते खंडणी द्यावयाचें कबूल करून परत आले. परंतु त्यांनीं खंडणी दिली नाहीं. म्हणून त्यांची नागवण केली. त्यामुळें येवख्ता खावयास नाहीं अशी स्थिति झाली ? आतां किल्ला नाजूक हें जाणून सूर्याजी नाईक देसाई यास दिलासा करून एक चावर इनाम दिला व त्याकडून विलायतींची मामुरी करविली' (शि. च. सा. खं. ३ पृ.५५).

## जादूटोणा व चेटूक

चेटूक व जादूटोणा यांवर हल्लीं कोणाचा विश्वास असो वा नसो, पण त्याविषयींच्या कल्पना गतकाळांत सर्व जगभर प्रचलित होत्या. त्यांतून महाराष्ट्रहि सुटला नव्हता. मनुची रामनगरच्या डोंगराळ भागांत हिंडत असतां त्याला चोतियाच्या राजास भेटण्याचा प्रसंग आला. मनुचीस राजा जयसिंग यानें एक देखणा घोडा दिला होता. तो आपणास असावा अशी इच्छा चोतियाच्या राजास होऊन त्यानें त्याजवर चेटूक केलें. त्यामुळें मनुची चोतिया सोडून निघाला, तेव्हां त्याच्या घोड्याला चालतां येईना. घोडा आज बरा होईल, उद्यां बरा होईल अशा विचारानें मनुची आठ दिवस चोतियासच थांबला. पण घोडा बरा कांहीं होईना. तेव्हां त्यास राजा म्हणाला कीं घोडा जरी निकामी झाला असला तरी मी एक हजार रुपयांस तो विकत घेतों. तेव्हां मनुचीला या गोष्टीचा राग येऊन त्यानें चोवीस तासांच्या आंत घोड्याला मारून त्याचें कातडें काढून घेण्यास

आपल्या नोकरांना सांगितलें. त्याचा हा निर्धार पाहून आपला डाव फसणार या भीतीनें राजा त्यास बाराशें रुपये देण्यास कबूल झाला व तुझी आठवण म्हणून तो मी बाळगीन असें त्यास म्हणाला. तेव्हां जास्ती ओढून न धरतां तेवढी रक्कम घेऊन त्यानें तो घोडा राजास दिला.

मनुची चोतियाहून जयसिंगाकडे परत जात असतां वाटेंत आणखी एक चमत्कार घडला. मनुचीचा एक चाकर गाजराच्या वाफ्यांत शिरून गाजरें उपटण्याच्या बेतांत होता. त्यानें गाजराचें रोप उपटण्याकरितां हात पुढें केला, तो त्या रोपास चिकटून राहिला व कांहीं केल्या निघेना. म्हणून त्या शेताच्या धन्याला हुडकून काढणें भाग पडलें. त्याप्रमाणें शेताचा धनी भेटला. त्यानें मनुचीच्या नोकरास चांगला चोप देऊन त्याजपासून कांहीं पैसेहि काढले आणि शेवटीं मंत्र जपला तेव्हां त्याचा हात मोकळा झाला.

मनुची पुढें म्हणतो, 'हिंदु व मुसलमान या उभय जमातींत चेटूक व जादूटोणा यांचा प्रसार फार आहे. एखाद्या मनुष्यानें कोणाचा कोंबडा चोरून आणून मारून खाल्ला तर तें चेटकें त्याच्या पोटांत गेलेल्या कोंबड्यालाहि आरवावयास लावतील. हें आरवणें मीं कितीतरी वेळां ऐकलें आहे व इतरांनींहि मला तसें सांगितलें आहे!'

## पोवाडे

गोंधळी व तमासगीर हेहि जनतेची करमणूक करीत. गोंधळ्यांचे पोवाडे व तमासगिरांच्या लावण्या यांत रचनेच्या दृष्टीनें फारसा फरक नसे. पोवाडे प्रायः राजकीय व शूर वीरांचें गुणगान करणारे असत आणि लावण्या सामाजिक चालीरीतींचें दिग्दर्शन व विडंबन करीत. पोवाडे रचणारास शाहीर म्हणत. या दोन्ही प्रकारांच्या गुणिजनांना राजाश्रय व लोकाश्रय चांगला मिळे. शिवकालांतील प्रसंगांवर दत्ताजी जाधव, अफजलखानाचा वध, तानाजीची मर्दुमकी व बाजी पासलकराचें शौर्य यांजवरील पोवाडेच सांप्रत उपलब्ध आहेत. तानाजीचा पोवाडा तानाजी सिंहगड घेतांना पतन पावला या रोमांचकारी घटनेवर आहे.

तानाजीचा पोवाडा तुळशीदास शाहिरानें रचला. तुळशीदास पुणें शहरीं मंडईच्या बाजारांत राहत होता. शिवाजीमहाराज राजगडावर

होते. त्यांनीं पंताजी गोपीनाथ यांजकडे हुजऱ्याला पाठवून त्यांस बोलावून आणिलें व पुण्यास जाऊन तुळशीदासास राजगडीं घेऊन येण्यास त्यांस सांगितलें. त्याप्रमाणें तुळशीदास डफ-तुणतुणें घेऊन राजगडीं सदरेस आला. तेथें सिंहगडावरील लढाईची तपशीलवार हकीगत ऐकून त्यानें पोवाडा रचला व महाराजांना गाऊन दाखविला. त्या वेळीं महाराजांनीं तुळशीदासाच्या हातांत एक हजार रुपयांचा तोडा घातला.

या पोवाड्यांत शिवाजी राजगडावरून निघून जिजाबाई प्रतापगडीं होती, तिला घोड्यावर स्वार होऊन भेटावयास गेला व तेथें तिजबरोबर फांशांचा डाव खेळत बसला, त्याचें चित्र शाहीर तुळशीदास येणेंप्रमाणें रंगवितो.

"शिवाजीमहाराज पांच पोषाख नटला। पाई तुमानी सुरवारी चढविल्या। अंगीं किनखाप घातले। शिरीं जरी टोप घातला। हातीं वाघनखें घालून। कृष्ण घोडीला जिन केला। ढाल पाठीवरी टाकिता झाला। सोनसाळी पट्टा हातांत घेतला। कृष्ण घोडीला चाबुक केला। आला मळ्याच्या घाटाला॥ घाट मळ्याचा उतरला। आला बिरवाडी गांवाला॥ गांव बिरवाडी सोडिला। आला पोलातपुराला॥ पोलातपुर सोडिलें। घाट पाराचा वेंघला। आले प्रतापगड किल्ल्याला। सलाम जिजाबाईला केला॥

पोवाडा तुळशीदासानें पुढील ओळींनीं संपविला.

शूरमर्दाचा पोवाडा शूरमर्दानें ऐकावा॥ शिवाजीच्या राज्यांत। ऐसा उमराव होणें नाहीं॥"

## शुद्धीकरण

मुसलमान राज्यकर्त्यांचा प्रयत्न हिंदूंना बाटविण्याचा असलेला पाहून त्याला प्रतिक्रिया करण्याचा विचार शिवकालीन समाजधुरीणांना आल्या-वांचून कसा राहील? या कामीं हिंदु राज्यकर्त्यांनींच पुढाकार घ्यावयास पाहिजे होता तसा छत्रपतींनींहि घेतला होता. शिवाजीमहाराजांचे पंडित-राव मोरेश्वरपंत यांनीं चैत्र शुद्ध २ शके १६०८ रोजीं कसबे हरसूल प्रांत अवरंगाबाद व समस्त महाराष्ट्र कोंकण-देशस्थ विद्वद्वैदिक आणि देशमुख व देशपांडे यांस पाठविलेलें आज्ञापत्र या दृष्टीनें उद्बोधक आहे. त्या पत्राचा सारांश असा – "गंगाधर रंगनाथ कुळकर्णी कसबे हरसूल हा ब्राह्मण

मोंगलापाशीं सेवेस होता. तो कित्येक दिवस चाकरी करीत असतां मोगलांनीं त्याजवर बलात्कार करून त्यास बाटविला. त्यानंतर त्यास तीन महिनेपर्यंत बंदिखान्यांत ठेवण्यांत आलें, त्यामुळें त्याचा तेथें यवनाशीं अन्नोदक संसर्ग घडला. पुढे तो एकंदर पांच वर्षें चाकरींत होता. त्या स्थितींत स्नानसंध्यादिक कर्म व्हावयाचें राहिलें. चाकरींत असतां त्याला भाग्याचें सुख लाभलें होतें. पण त्या सुखाचा वीट येऊन व सर्व दौलतसंपत्ति टाकून तो रायगडावर राजश्री छत्रपति स्वामीपाशीं आला. आणि तेथें एक वर्ष राहून सरकारकून, न्यायाधीश, उपाध्ये, दानाध्यक्ष भले-भले व ब्राह्मण यांस ‘ दरबारीं आपणांस प्रायश्चित्त द्या ’ असें म्हणून प्रायश्चित्त मागत होता.

“ त्याउपरीं राजश्री समस्त राज्यधुरंधर वर्णाश्रमधर्मप्रतिपालक, छंदोगामात्यस्वामी यांस सर्व वर्तमान विदित झालें. त्यांनीं त्या ब्राह्मणाचे कष्ट व अनुताप बहुत देखून राजश्री छत्रपति स्वामीस वृत्तान्त विदित केला. तेव्हा छत्रपतींनीं ( संभाजी राजे ) कृपाळू होऊन प्रायश्चित्त द्यावयास आज्ञा दिली. त्याउपरीं आम्ही छंदोगामात्य ( कलुशा ) यांचे सभेसी समस्त विद्वद्वैदिक ब्राह्मणांचे संमतीनें मिताक्षरादि निबंध पाहून प्रायश्चित्त निर्वाह करून गंगाधर रंगनाथ यासी प्रायश्चित्त संकल्प सांगोन श्रीयात्रेस पाठविला. तेथें श्रीगिरीप्रदक्षिणा तीनशे साठ व यात्रा दोन्ही इतुके चतुर्विंशत्यब्द प्रायश्चित्त पूर्वोत्तरांगसहित केलें. प्रायश्चित्त यथासांग विधियुक्त केलें. त्यावरून आम्ही त्यास आपले पंक्तीस भोजन देऊन शुद्धिपत्र दिलें. हा ब्राह्मण शुद्ध झाला. संव्यवहार्य जाहाला. याउपरी यासी तुम्ही अन्नोदकादि व्यवहार यथापूर्व करीत जाणे. जो कोणी याच्या ब्राह्मण्याविषयीं संदेह मानील तो देव-ब्राह्मणद्रोही, महापातकी जाणिजे.” याखालीं मोरेश्वर पंडितराय, कविकलश, वैदिक व प्रल्हाद निराजी यांच्या सह्या आहेत ( इतिहासमंजरी, पृ.११४ ).

### ब्राह्मणांतील भांडण

क्षेत्रोपाध्यांचा चरितार्थ क्षेत्रांत जे यात्रेकरू येतील त्यांचीं धार्मिक कृत्यें करून दक्षिणा मिळेल तिजवर चालावयाचा. यामुळें कोणी यात्रेकरू क्षेत्रांत आला कीं उपाध्येमंडळी त्याच्या भोंवतीं जमतात व आपलीं जुनीं बाडें काढून त्यांत त्यांच्या पूर्वजांच्या नांवाचा शोध घेतात. आणि तो लागल्यास विशिष्ट उपाध्याय यजमानास आपल्या घरीं येऊन जातो. याचा

अनुभव नाशिक, त्र्यंबकेश्वर, काशी, प्रयाग इत्यादि क्षेत्रांत नेहमीं येतो. पण पूर्वजाचा पत्ता बाडांत न लागल्यास आलेल्या यात्रेकरूची जी ओढाताण होते ती सांगतां पुरवत नाहीं. हा प्रकार आजच नव्हे तर शेंकडों वर्षे चालत आला आहे. त्र्यंबकेश्वरीं इ. स. १६५१ च्या सुमारास ऋग्वेदी व यजुर्वेदी यांजमध्यें यजमानकृत्यासंबंधीं लढा कसा लागून राहिला होता त्याचें प्रत्यंतर खालील पत्रांत पाहावयास सांपडतें.

श. १५७२–७३.

इ. स. १६५०–५१.

" समस्त ब्राह्मण महास्थळ त्रिंबक सुरू सन १०५१. ऋग्वेदी व यजुर्वेदी आपणांमध्यें भांडत होते. यावरी निवाडा हुजूर केला ऐसाजे – जो यजमान ऋग्वेदी व यजुर्वेदी येईल त्यास तो ज्या वेदाचा असेल त्यानेंच कर्म सांगावें. ऋग्वेदीचा ऋग्वेदी लावणें, यजुर्वेदीचा यजुर्वेदी लावणें, स्नानविधि करविणें. जो यजमान समाराधना करील, तो ज्यास बोलावील त्यानें त्याजकडे जेवावयास जावें." ( शि. च. सा. खं. ४ था, पृ. ५८ ).

## चित्तपावन ब्राह्मण

शिवाजीच्या राज्यकारभरांत चित्तपावन ब्राह्मणांचा समावेश झाला नव्हता, फक्त देशस्थांचाच होता असा एक समज आहे. तो निराधार आहे. देशस्थांप्रमाणेंच कऱ्हाडे व शेणवी शिवाजीच्या कारभारांत होते. रावजी सोमनाथ पंडित हा शिवाजीनें कुडाळ व राजापूर इकडे नेमलेला सुभेदार होता. तो कोंकणचा रहिवासी व पंडित हें त्याचें आडनांव असेल तर त्यावरून तो कऱ्हाडा वा चित्पावनहि असावा. असेल तर म्हणण्याचें कारण हें कीं त्या काळीं सर्व ब्राह्मणांच्या नांवापुढें पंडित हें उपपद लावत असत. कऱ्हाड्यांशिवाय शिवाजीच्या पदरीं नारायण शेणवी व पितांबर शेणवी हे दोघे सारस्वत वकील होते. ते पोर्तुगीज व इंग्रज यांजकडे जाऊन शिवाजीचीं परराष्ट्रीय कामें करीत.

शिवाजीच्या पदरीं ब्राह्मण सुभेदार व कारकून पुष्कळ होते. पण त्यांपैकीं बऱ्याच जणांनीं आडनांवें न लावल्यामुळें ते ब्राह्मणांतील कोणत्या पोटजातीचे हें सांगणें शक्य नाहीं; तथापि त्याच्या सुभेदारांत प्रांत कोळे याजवर इ. स. १६७२ त गणेश जोगदेव हें नांव आढळतें

( सेनकृत ' Administrative system of Saivaji ', पृ. ३५ ). शिवाजीचें राज्य देश व कोंकण या दोन्ही भागांत असल्यानें कोंकणांतील चित्तपावन ब्राह्मण त्याच्या सेवेंत असणें अगदीं संभवनीय आहे. त्याची राजधानी रायगड हीहि कोंकणांतच होती. शिवाजी व शहाजी यांची जहागीर पुणें प्रांतीं पूर्वीपासून असल्यानें त्यांतील कुलकर्णी, देशपांडे इत्यादि वतनदार देशस्थ ब्राह्मण त्याच्या सेवेंत आधींच असलेले सहाजिक शिवाजीला प्रारंभीं उपयोगी पडून आपल्या गुणांच्या जोराबर प्रधानपदांवरहि चढले. चित्तपावनांचा प्रवेश त्यांच्या मागून झाला म्हणून ते देशस्थांपेक्षां संख्येनें कमी असतील इतकेंच. चित्तपावनांपैकीं बाळाजी विश्वनाथ यास रामचंद्र नीलकंठ अमात्य यांनीं आपलें सबनिसीचें काम चालविण्याकरितां इ. स. १६९८ प्रतापगडावरील देवस्थानाकडे मुतालिक या नात्यानें नेमलें ( शि. च. सा. खं. १० ). पुढें बाळाजी विश्वनाथ पेशवा झाला व तो आडनांवानें भट व चित्तपावन आहे ही गोष्ट जगजाहीर झाली. पण तो पेशवा झाला नसता व प्रतापगडावर मुतालिकच राहिला असता तर बाळाजी विश्वनाथ या मामुली नांवानेंच इतिहासजमा होऊन तो चित्तपावन कीं दुसरा कोणी हें कोणास ओळखूंहि आलें नसतें. हीच गोष्ट, चौलचा सुभेदार बहिरोपंत यांसारख्यासहि लागू आहे. चिटणीस आपल्या बखरींत म्हणतात, ' सुभेदार व सबनीस ब्राह्मण देशस्थ, कराडे, कोकणस्थ, माध्यंदिन ऐसे विश्वासू शाहाणे, मर्द, सेवातत्पर पाहून योजिले ' ( चिटणीसविरचित शिवचरित्र, पृ. १७४ ). त्यावरून कोंकणस्थ ब्राह्मणहि इतर ब्राह्मणांप्रमाणें शिवाजीच्या सेवेला होते. याचें आणखी एक उदाहरण –

अफजलखान शिवाजीवर चालून आला. तेव्हां त्याला सामना देण्याकरितां शिवाजी प्रतापगडापाशीं येऊन राहिला. अफजलखानानें वाईहून त्याच्या भेटीस येण्याचें कबूल केल्यावर शिवाजी त्याच्या वाटेंतील बंदोबस्तास लागला. त्यानें वाटेंत चौक्या बसविल्या व त्यांचा बंदोबस्त ठेवण्यास शिवाजीनें आबाजी रघुनाथ केळकर यांस सांगितलें ( श्रीशिवदिग्विजय ). शके १५६८ ते शके १५७३ पर्यंत अंजनवेल येथें राघो बल्लाळ अत्रे, आबाजी महादेव, महादाजी अनंत, राघो वासुदेव व त्यानंतर अंताजी रघुनाथ केळकर असे अनुक्रमानें अधिकारी होते. यांतील अंताजी रघुनाथ हा आबाजी रघुनाथ

याचा भाऊ असेल किंवा दुसरा कोणी असेल ( भा. इ. सं. मं. वार्षिक इतिवृत्त शके १८३५, पृ. ३२३ ).

राजवाडे चित्तपावनावरील आपल्या लेखांत अनेक आधार देऊन म्हणतात, "शके १२०० नंतर शिलाहारांचा अंमल कोंकणांतून उठून यादवांचें राज्य कोंकणांत झाल्यावर व विशेषतः मुसलमानी अमलांत चित्पावन ब्राह्मणांनीं आपला पिढीजात धंदा जो यज्ञकर्माचा व वैदिकीचा तो किंचित् सोडून कुलकरण, जोसपण, सराफी, खोती, महाजनकी, देशमुखी व देशपांडेगिरी आस्ते आस्ते आक्रमण केली. शिलाहारांच्या नाशाबरोबर कऱ्हाडे जसे खालावत चालले तसतशी चित्पावनांची ब्रह्मवृत्ति किंचित् सुटून व्यावहारिक वृत्ति सुरू झाली" ( भा. इ. सं. मं. इतिवृत्त शके १८३५ ). तथापि ते ब्राह्मणांचें मुख्य कर्म जो वेदशास्त्राभ्यास त्यांतच बहुसंख्येनें गुंतलेले होते. ते शेती व भिक्षुकी या दोहोंवर गरिबीनें निर्वाह करीत होते. म्हणूनहि त्यांचा शिवाजीच्या राज्यकारभारांत मोठ्या प्रमाणांत शिरकाव झाला नसावा. त्यांचा तसा शिरकाव शाहु कालांत झाला व तो पायंडा प्रथम बाळाजी विश्वनाथ भट यांनी पाडला. त्यांचेंच अनुकरण पुढील अनेक चित्तपावन घराण्यांनीं केलें. अलीकडे चित्तपावन घराण्यांचे इतिहास झाले आहेत. ते पाहिले असतां बहुतेक चित्तपावन कुटुंबांचे २५०–३०० वर्षांपूर्वींचे पुरुष भिक्षुक होते असेंच दिसून येतें.

इतर पंचद्राविड ब्राह्मणांपेक्षां चित्तपावन हीन आहेत असाहि कांहींचा गुप्त समज आहे. पण त्यालाहि ऐतिहासिक आधार कांहीं नाहीं. आणि प्रत्यक्ष व्यवहार पाहिल्यास ते आचार, विचार व विद्वत्ता यांपैकीं कोणत्याहि गुणांत इतर पंच द्राविडांपेक्षां हीन नाहींत हें कोणीहि कबूल करील. शिवकालांतहि त्यांची गणना इतर पंचद्राविडांच्या बरोबरीनें होत होती हें शिवाजीच्या अष्टप्रधानांपैकीं मोरेश्वर पंडितराव यांनीं १९ फेब्रु. १६७७ रोजीं पाठविलेल्या आज्ञापत्रांत नमूद आहे.

धर्माजी नागनाथ व गिरमाजी तुकदेव देशाधिकारी व देशलेखक व देशमुख प्रांत फोंड्या व डिचोली प्रांत मर्दनगड व भिवगड यांस –

"उभय देशीं देशस्थ, कराडे, चितपावन जोतिसी व पद्ये ब्राह्मण आहेत, या सकलांची परीक्षा घेऊन वृत्ती चालविणें" (प. सा. सं. खं. २, पृ. ५५९).

शिवाजीनें समुद्रावर आपलें नौदल स्थापणें जरूर आहे असें लक्षांत आल्यावर २५ नोव्हेंबर १६६४ रोजीं मालवणाजवळ कुरटें बेटावर एक किल्ला बांधून त्याचें नांव सिंधुदुर्ग असें ठेवलें. त्या वेळीं दादंभट व त्यांचे मामा जान भट अभ्यंकर यांस शिवाजीनें तेथील उपाध्येपण दिलें. पुढें संभाजीच्या कारकीर्दींत मोंगलांचा पाय कोंकणास लागला, तेव्हां कुडाळच्या सावंतांनीं विजापूरकरांची ताबेदारी सोडून मोगलांची पत्करली. आणि महमद अब्बास व अबदुल राजखान यांची 'स्वारी येऊन कित्येक लुटी नागाव करून मनुष्यें धरून नेलीं. अशा स्थितींत जान भट अभ्यंकर परागंदा झाला. पण त्याचा भाचा दादंभट टिकाव धरून राहिला. दादंभटानें कितीएक काळ दुष्काळ काढला, भाजीपाला खाऊन सोबत दिली, कित्येक महार्णवाचे प्रसंग सोसिले." याबद्दल जंजिऱ्याचें ( सिंधुदुर्ग ) उपाध्येपण पुत्र-पौत्रादि वंशपरंपरेनें दादंभटास मिळालें. दादंभट एका पायानें क्षीण होता" ( शिवाजी सावनीर, पृ. १८२ ).

वरील दादंभट हा चित्तपावन ब्राह्मण असल्याचें स्पष्ट आहे. शिवकालीं चित्तपावन ब्राह्मण प्रायः भिक्षुकी करून असत व ते इतर द्राविड ब्राह्मणांच्या बरोबरीचे मानले जात याचा हाहि एक पुरावा आहे.

चित्तपावन ब्राह्मण इतर द्राविड ब्राह्मणांप्रमाणें काशीस वेदशास्त्रांच्या अध्ययनासाठीं जात असून त्यांपैकीं अनंत भट्ट चित्तल ( चितळे ) हे काशीचे प्रसिद्ध पंडित गागाभट्ट यांचे पूर्वज रामेश्वरभट्ट यांजपाशीं विद्या शिकण्याकरितां कोंकणांतून गेले होते १ काशींत अकबर कालापासून चित्तपावन ब्राह्मण राहत असून त्यांचा मोंगल बादशहाकडूनहि सन्मान होत असे. कोंकणांत दाभोळाच्या दक्षिणेस पालशेत नांवाचें गांव आहे. 'त्या नगरांत परशुरामानें ज्यांना मान दिला आहे अशा चित्पावन कुलांतील शाण्डिल्य गोत्राचें भूषण असा गणितविद् केशव नांवाचा ब्राह्मण राहत असे, त्यापासून नृसिंह झाला. तो काशींत होता. त्याला जातक, संहिता व गणित या तिन्ही स्कन्धांवरील अनेक ग्रंथ करतलामलकवत् होते. त्याला सार्वभौम दिल्लीश्वर अकबर बादशहाकडून असेरी किल्ला घेतला त्या वेळीं 'ज्योतिर्वित्सरस' ही पदवी मिळाली. त्याचा मुलगा रघुनाथ यानें विश्वेश्वरपुरी ( काशी ) येथें व्यवहारांत प्रथम लागणारा मुहूर्तमाला ग्रंथ

रचिला. दारा, सुजा, मुराद यांना जिंकून औरंगजेब बादशहा राज्य करीत असतां मीं ( रघुनाथ ) हा उद्योग केला. ' ही माहिती मुहूर्तमाला म्हणून मुहूर्तशास्त्रावर एक ग्रंथ आहे त्याच्या शेवटीं दिली आहे ( पां. वा. काणे, मुंबई, भा. इ. सं. मं. त्रैमासिक शके १८४८ ).

### हिंदु-मुसलमान ऐक्य

अहमदनगर जिल्ह्यांतील शेवगांव तालुक्यांत मढी म्हणून एक गांव आहे. तेथें जी समाधि आहे तिला हिंदु लोक कानीफनाथाची समाधि समजतात. कान्होबाच्या समाधीमुळें मढीची बरीच प्रसिद्धि असून तेथें फाल्गुन वद्य पंचमीस प्रचंड यात्रा भरते. अहमदनगरापासून हें स्थान सुमारें बारा कोस व तीसगांवापासून कोस-दीडकोस आडरस्त्याला आहे. या देवळाची एकंदर रचना, त्यावरील घुमट, कळस इत्यादि सुंदर आहेत. येथील पुजारी मुसलमान आहेत व कान्होबा हा हिंदु व मुसलमान यांचा देव झाला आहे व त्यास उभयता भक्तीनें भजतात.

एकंदर देऊळ व खुद्द कान्होबाची समाधि ही मुसलमानी पद्धतीप्रमाणें आहेत. हिंदु व मुसलमान हे दोघेहि कान्होबास आपला साधु समजतात. मुख्य गाभाऱ्यांत कान्होबाची समाधि आहे व ती मुसलमानी पीराप्रमाणें आहे. पण समाधि पीराप्रमाणें उंच नसून थोडी पसरट आहे. तिजवर नेहमीं गलफ असतो. शोभेकरितां वर शहामृगाचीं अंडीं टांगलेलीं आहेत. कान्होजी आंग्रे यांनीं देवास अर्पण केलेला सुमारें दोन विती उंचीचा पितंळेचा एक घोडा आहे. तसेंच दिल्लीचा शहा अलम बादशहा यानें देवास अर्पण केलेलीं माही-मरातबाचीं चिन्हें देवाजवळ आहेत. हीं दोन्ही चिन्हें एका पितळी दांडीवर जाळीदार पंजाप्रमाणें आहेत. माहीचें चिन्ह बदामी आकाराचें आहे व मरातब वरच्या बाजूस थोडें पसरट आहे. दोन्हींवर उत्तम नक्षीदार जाळीचें काम असून तींत कुराणांतील वचनें कोरलेलीं आहेत.

गाभारा सभामंडपापेक्षां थोडा उंचीवर असून गाभाऱ्याच्या जोत्यावर दरवाज्यापुढें ॥ श्रीचरनीं दृढभाव । पीलाजी गायकवाड ॥ असा मराठी लेख आहे आणि दरवाज्याच्या वरच्या बाजूस 'बिसमिला हिर रहमा निररहीम लाहिलाल्ला इल् इल्लिला हो महमद रुसिलिला' हा सुप्रसिद्ध मंत्र अरबी अक्षरांत कोरला आहे. देवळाच्या पाठीमागे शहा रमजानचा

दरगा आहे. शहारमजानं व कान्होबा हीं नांवें एकाच सत्पुरुषाचीं आहेत असें मानण्यांत येतें.

कान्होबा हा हिंदु व मुसलमान यांचा देव कां मानण्यांत येतो याविषयीं एक दंतकथा आहे. ती अशी कीं, शहा रमजान महीसवार हा इ. स. १३५० त पैठण येथें आला. तो मंत्रविद्येंत प्रवीण असून गोदावरी नदींतून एका मोठ्या माशावर बसून आला. म्हणून त्याला महीसवार हें नांव मिळालें. तो मूळ हिंदु होता. पण तो पैठणास आल्यावर सादतअल्ली नांवाच्या एका इसमानें त्याला मुसलमानी धर्माची दीक्षा दिली. तो त्यानतर कांहीं वर्षें पैठणास राहिला व पुढें सात वर्षें प्रवास करीत इ. स. १३८० त मढी येथें येऊन तेथेंच ९० व्या वर्षी मरण पावला ( भा. इ. स. मं. पुणें इतिवृत्त शके १८३७ ).

## रत्नकलेशीं शादी

हिंदु व मुसलमान हे दोन समाज एकमेकाशेजारीं आल्यावर त्यांचा जो संघर्ष सुरू झाला त्याचे हिंदुसमाजावर विचित्र परिणाम दिसून येऊं लागले. मुसलमान राज्यकर्त्यांच्या दडपणामुळें कित्येक हिंदु बाटून मुसलमान झाले. हिंदु स्त्रियांचीं लग्नें मुसलमानांशीं लागलीं. मुसलमान साधु हिंदु देवतांना भजूं लागले, हिंदूंनीं मुसलमानी भाषा आत्मसात् केली, हिंदु मुसलमानांच्या पीरांचे भक्त बनले व ज्याला मुसलमान आपला पीर म्हणत त्याला हिंदु आपल्यांतील साधु समजून हिंदु व मुसलमान हे दोघेहि त्याच्या कबरीची वा समाधीची पूजा करूं लागल. मुसलमानांनीं ज्याप्रमाणें हिन्दु स्त्रियांना खुशीनें वा सक्तीनें जनानखान्यांत खेंचलें, त्याप्रमाणेंच कांहीं हिंदूनींहि मुसलमान युवतींना सक्तीनें नसलें तरी प्रेमानें कवटाळलें. उत्तरेकडील जगन्नाथ पंडिताचें उदाहरण या बाबतींत प्रसिद्ध आहे. जगन्नाथ पंडित हा कवि होता. तसाच एक कवि महाराष्ट्रांतहि शिवकालांत विद्यमान होता. त्याचें नांव लोलिंबराज. हा जुन्नरच्या दिवाकर भट्ट नामक विद्वानाचा स्वच्छंदी पुत्र. तो सप्तशृंगीस जाऊन शके १५५२ त भवानीच्या आराधनेनें जुन्नरास लोकादरास पात्र झाला. त्यानंतर त्याला काय लहर लागली कोण जाणें, त्यानें जुन्नरच्या यवन सुभेदाराच्या कन्येवर फिदा होऊन तिजबरोबर विवाह केला व तिला आपल्या आवडीचें रत्नकला हें नांव ठेवलें.

लोलिंबराजानें शके १५५५ त वैद्यजीवन नांवाचा संस्कृत ग्रंथ व हरिविलासादि ग्रंथ रचिले. त्यानें रत्नकलाचरित्र हें रत्नकलेच्या स्तुतिपर काव्य लिहिलें असून त्यांत खालील श्लोक आढळतो –

"ज्याची कीर्ति जगत्रयीं प्रगटली मंदाकिनीचे परी। जो येके घटकेंत शंभर नवीं पद्यें विनोदें करी। ज्याला कीं कविपातशाह पदवी विद्वज्जनीं दीधली। तो हा रत्नकले तुला विनवितो लोलीमराजःकवि॥"

## शिवकालीन दुष्काळ

शके १५५३ त महाराष्ट्रांत भयंकर दुष्काळ पडला. तो सारखा २–३ वर्षें सुरू असावा. अहमदनगर जिल्हा हें तर दुष्काळाचें आजहि आगर आहे. त्याच जिल्ह्यांत शके १५५३ त दुष्काळानें कसा कहर उडवून दिला होता त्याची कल्पना त्या जिल्ह्यांतील अंबरापूरचे निंबरे यांनीं चांदगांवचे दादोबा यांस लिहून दिलेल्या कागदावरून येते. हीं दोन्ही गांवें शेवगांव तालुक्यांत जवळ जवळ आहेत. त्या पत्रांत निंबरे हे शके १५५३ प्रजापति नाम संवत्सरे आषाढशुद्ध पंचमी गुरुवार या दिवशीं लिहितात :–

"काळ थोर पडला. आपणहि अन्नाविणें मरूं लागलों. जोंपर्यंत आपले पदरीं होतें तोंपर्यंत तें सारें विकून खादलें. तेंहि पुरेना. तेव्हां जमीन व इमारती विक्रीस काढल्या. पेठेंत कुणबी लोक व गृहस्थ होते त्यांस सांगितलें कीं, माझी जमीन, वाडा व इमारती घेऊन मज वांचवा. त्यास कोणी कबूल न करीत. मग तुम्ही आमचे शेजारी होतेत. तेव्हां तुम्हीं करार केला. त्याप्रमाणें आपण आत्मखुषीनें राजी होऊन तुम्हांस घरवाडा, जमीन, भुइ व इमारतीचीं लाकडें ऐसी विकत दिधलीं. किमती करून आपण तुम्हांपासून रोख होनू एकूनईस व गला जोरी पाईली ८॥· दर पाइलीस होनु एक एकूण होनु ६ व सर्व मिळून होनु पंचवीस घेऊन तुम्हांस मिरासी करून दिधली." ( भा. इ. सं. मं. अहवाल शके १८३८ ).

## प्रकरण चवथें

# शिवविज्ञान

### शिवजन्मातिथि

लोकमान्य टिळकांनीं शिवजन्मोत्सव इ. स. १८९५ सालीं सुरू केला. तेव्हांपासून शिवाजीमहाराजांची जन्मातिथि वैशाख शु. २ शके १५४९ अशी समजण्यांत येत होती. परंतु त्या वेळीं सुद्धां तिजविषयीं एकवाक्यता नव्हती. तिचा खल टिळकांनीं ता. २४।४।१९०० च्या केसरींत ( चैत्र व. १०।१८२२ ) करून तिथिनिश्चयाच्या बाबतींत कोणत्या अडचणी येतात हें स्पष्ट करून दाखविलें. ते म्हणतात, तीथ, वार, नक्षत्र या तिहींवरून जर कोणती वेळ कायम होईल तर तीच ग्राह्य मानली पाहिजे. पण तीथ आहे तर वार नाहीं आणि वार आहे तर नक्षत्र नाहीं, आणि तीथवार जुळलीं तर साल जुळत नाहीं, अशी स्थिति हल्लीं उत्पन्न झालेल्या लेखांवरून निष्पन्न होते! इतकें लिहून ते उपसंहारांत तिथि, वार व नक्षत्र यांचा मेळ बसण्याच्या दृष्टीनें शके १५४९ प्रभव, वैशाख शु. १ गुरुवार ता. ६ एप्रिल १६२७ ही तिथि निश्चित करतात. लोकमान्यांनीं इ. स. १९०० मधील शिवजन्मोत्सव प्रतिपदेसच साजरा केला.

लो. टिळकांनीं अशा रीतीनें तिथिनिश्चय केला तरी त्याविषयीं त्यांची संशयनिवृत्ति न झाल्यामुळें जुने विश्वसनीय कागदपत्र पुढें आल्यास तिचा फेरविचार करण्याची त्यांनीं तयारी दर्शविली होती. परंतु योग असा कीं टिळकांच्या संग्रहीं असलेल्या जेधे शकावलीनेंच

तिथीचा घोटाळा पुढें दूर केला. जिला जेधे शकावलि म्हणतात ती शकावली दयाजीराव सर्जेराव ऊर्फ दाजीसाहेब देशमुख यांनीं शके १८२८ तच लोकमान्यांच्या स्वाधीन केली होती. ती प्रसिद्ध होण्यास अनेक कारणांमुळें शके १८३८ साल उजाडावें लागलें. ती पाहतां तींत शिवजन्मशक १५५१ शुक्लसंवत्सर फाल्गुन व० ३ शुक्रवार ( १९ फेब्रु. १६३० ) हा दिसून आला व सर्व दृष्टींनीं गणिताधारेंहि सिद्ध झालें. जेधे शकावलींत एकूण १५० मित्या असून त्यांपैकीं ९६ टक्के मित्या बिनचूक आहेत. ही शकावली शिवकालीन आहे व तींत दिलेला शिवजन्मकाल शिवभारतांतील जन्मकालाशीं तंतोतंत जमतो. ज्यांच्या आधारें शक १५४९ ही मिति स्वीकारण्यांत आली होती ते सर्व लेखक पेशवाईतील व इंग्रजी अमदानींतील असून त्यांचा परस्परांशीं मेळ नाहीं व त्यांपैकीं एकाचीहि जन्मतिथि गणिताच्या कसोटीस उतरत नाहीं. म्हणून नवीन स्वीकारलेली मितीच सर्वथा प्रमाण मानण्यांत येतें. ही तिथि सिद्ध व रूढ करण्याच्या कामीं कै. द. वि. आपटे, कै. वासुदेवशास्त्री खरे व श्री. ज. स. करंदीकर यांचे परिश्रम कारण झाले.

शिवभारत व जेधे शकावली यांत शिवाजीची हीच जन्मतिथि दिली आहे. तंजावर येथें इ. स. १८०३ मध्यें तेथील भोसल्यांनीं आपल्या एकंदर हकीकतीचा एक शिलालेख खोदविला आहे. त्यांत तीच शिवजन्मतिथि दिली आहे. तसेंच जोधपूर संस्थानांतील प्रसिद्ध चण्डु ज्योतिष्यांच्या प्राचीन घराण्यांत अनेक हिंदु व मुसलमान राजांच्या कुंडल्या संग्रहित केल्या आहेत. त्यांत शिवाजीमहाराजांच्या कुंडलींत हीच मिति नमूद आहे. ह्यांशिवाय आणखी एक पुरावा म्हणजे रामचंद्रपंत अमात्य यांनीं राजनीति म्हणून लिहिलेला महत्त्वाचा लेख. त्यांत शिवाजीमहाराजांनीं पंधराव्या वर्षीं स्वराज्याचा आक्रम करण्यास प्रारंभ केल्याचें लिहिलेलें आहे. इ. स. १६४५ त शिवाजीमहाराजांनीं राजगड काबीज करून स्वराज्यस्थापनेचा प्रारंभ दादाजी नरस प्रभु या रोहिड खोऱ्याच्या देशमुखाच्या मदतीनें केला असा त्या वेळचा कागद सांपडला आहे. अर्थात् शिवाजीमहाराजांचा जन्म इ. स. १६३० त धरला तरच त्यांनीं १५ व्या वर्षीं पराक्रम करण्यास आरंभ केला हा अमात्यांचा लेख संगत होतो ( म. स्व. सं. श्रीशिवाजीमहाराज पृ. १०, ले. – चिं. वि. वैद्य ).

वरील तिथिनिश्चयास दुजोरा देणारा आणखी एक पुरावा अलीकडे उपलब्ध झाला आहे. कोंकणांतील इतिहाससंशोधक श्री. आवळसकर यांनीं पोलादपूर येथील चित्रे घराण्यांतील रा. रावजी गोविंद चित्रे यांचें दप्तर तपासलें. हे चित्रे बाळाजी आवजी चिटणीस व खंडो बल्लाळ चिटणीस यांचे वंशज होत. त्यांच्या संग्रहीं श्री. आवळसकर यांस एक शकावलीवजा टिपण सांपडलें; तें त्यांनीं शिवचरित्र साहित्य खंड १० वा (पृ. ५५) यांत प्रसिद्ध केलें असून त्यांत शिवराज्याभिषेकाचा काल देतांना त्या वेळीं शिवाजीराजे ४५ वर्षांचे होते असें म्हटलें आहे. त्यावरून शिवाजीचा जन्म इ. स. १६३० त झाला या नवीन शोधास पुष्टि मिळते. कारण या शोधाप्रमाणें शिवजन्मतिथि फाल्गुन व. ३ शके १५५१ ठरते. शिवाजीला राज्याभिषेक ज्येष्ठ शु. १३ शके १५९६ रोजीं झाला. त्या दृष्टीनें शिवाजी राज्याभिषेकसमयीं ४५ वर्षांचा होता ही चित्रे यांच्या दप्तरांतील माहिती बिनचूक असल्याचें सिद्ध होतें.


शिवाजीची खरी जन्मतिथि बखरकारांना माहीत नव्हती. त्याप्रमाणें त्याची खरी कुंडलीहि त्यांना अवगत नव्हती. म्हणून त्यांनीं जी कुंडली खरी म्हणून मानली होती तिचाहि गणित दृष्ट्या कोठेंच मेळ बसत नव्हता.

या बाबतींत जन्मतिथीचा व वेळेचा उलगडा शिवभारतकारांनीं येणेंप्रमाणें केला —

भूबाणप्राणचंद्राब्दैः संमिते शालिवाहने ।
शके संवत्सरे शुक्ले प्रवृत्ते चोत्तरायणे ॥
शिशिरर्तौ वर्तमाने प्रशस्ते मासि फाल्गुने ।
कृष्णपक्षे तृतीयायां निशि लग्ने सुशोभने ॥

म्हणजे शके १५५१ शुक्ल संवत्सर, उत्तरायण, शिशिरऋतु, फाल्गुन वद्य ३ रात्रीं अशी माहिती दिलेली आहे. या माहितीशीं मेळ बसेल अशी कुंडली बिआवर संस्थानांतील पंडित मीठालाल व्यास यांच्या संग्रहामधील जुन्या बाडांत उपलब्ध झाली आहे. या बाडांत शिवकालीन अनेक कुंडल्या आहेत व त्या विश्वसनीय आहेत याविषयीं अजमीर येथील संशोधनखात्याचे मुख्याधिकारी रायबहादुर पंडित गौरीशंकर ओझा यांनीं सवि-

स्तर विवेचन केलें आहे. त्यावरून या बाडांतील शिवाजीमहाराजांच्या कुंडलीचें हस्ताक्षर शिवराम ज्योतिषी याचें असून हा शिवराम शिवकालीन होता. त्याचा जन्म शके १५५९ व मृत्यु शके १६४२ त झाला. ती कुंडली येणेंप्रमाणें –




त्यावरून शिवछत्रपतींचा जन्म शिवभारतकार म्हणतो त्याप्रमाणें 'निशि' सूर्यास्तानंतर लवकरच झाला असें दिसून येतें. वरील टिपण शिवाजीच्या वेळींच लिहिलें गेलें व त्या स्थितींतच तें उपलब्ध झालें.

## शिवरायाची मूर्ति

शिवाजी दिसण्यांत कसा होता याचें वर्णन इंग्रजांचा वकील हेन्री ऑक्झिंडेन यानें त्यास पाहून पुढीलप्रमाणें केलें आहे. – "चेहरा सुंदर व पाणीदार, इतर मराठ्यांच्या मानानें वर्ण गोरा, डोळे तीक्ष्ण, नाक लांब, बांकदार व जरासें खालीं आलेलें, दाढी कापून हनुवटीचे खालीं टोंकदार केलेली, मिशी बारीक व मुद्रेंत त्वरा, निश्चय, कठोरपणा व जागरूकता हे गुण स्पष्ट दिसतात." रे. एस्कालिअट हा पाहिलेल्यांच्या तोंडच्या माहितीवरून लिहितो, "शिवाजी मध्यम उंचीचा, ताठ व बांधेसूद आहे. तो चलाख असून सास्मित बोलतो. त्याची नजर तीक्ष्ण व ( quick ) तरल आहे व तो इतर मराठ्यांपेक्षां गोरा आहे" ( भा. इ. सं. मंडळ, चै. शके १८४० ).

## शिवाजीची दिनचर्या

"उषःकालीं उठावें. ते समयीं गायक यांनीं स्तुतिपाठ करावे. वीणा, मृदंग इत्यादि मंगलवाद्यें, नगारखाना यांचें श्रवण करून उठावें. कांहीं प्रातः-

स्मरण करून सर्वकर्ता भगवान् हे संकल्प करून शौच विधियुक्त करावा. नंतर गोसेवनदर्शन, मंगलालंभन करून स्नानगंगादि महानदी-उदकें (उदक घालून) करावें. जपध्यान देवतार्चन करावें, ते समयीं सर्व शिष्ट ब्राह्मण सभापंडित याणीं धर्मचर्चा करावी. पुराणश्रवण करून चार घटका दिवसास तिलक, वस्त्रें, अलंकार भूषणें घेऊन तिरंदाजी व निशाण एक घटका करून सभेस यावें. तेथें सर्व कार्यकर्ते कारभारी वगैरे यांणीं आपलालीं कार्यें विचारून करावीं. जे जे दर्शनास येतील त्यांजकडे कृपायुक्त अवलोकन करून त्यांचे मुजरे घ्यावे. कोणाकडे अवलोकन करून किंचित् हास्य करावें. कोणाशीं कांहीं भाषण करावें; कोणास कार्यें सांगावीं. ऐशीं सर्वांचीं अंतःकरणें वेधून घ्यावीं. सर्वांस भासावें जें माझे ठायीं कृपाविशेष आहे. ऐसा सर्वत्र आले त्यांचा गौरव करावा.

"दहा घटका दिवस आलियावरी दोन चार घटका विविक्त स्थानीं ज्याचा करणें त्याशीं मंत्रविचार करावा. नंतर बारा घटका दिवसास ब्राह्मण-भोजनाचें उदक सोडून, नैवेद्य करून सर्व पंक्तिभोजन करणार यांसह-वर्तमान भोजन करावें. आणि तांबूल घेऊन चार घटका पुनः मंत्र-सभेचे ठायीं पत्रें आलीं व पाठविणें तीं अवलोकन करणें व कार्ययोजना व मागील दिवशीं आयव्यय झाला, दुसरे दिवशीं किती करणें हें पाहून चार घटका अन्तःपुरांत वामकुक्ष करावा. बारा घटका दिवस रहातां पुनः सभेस येऊन सर्व कारखाने, महाल यांची चौकशी, पहाणें, आपण जाऊन करावें. सभा करून न्यायमनसुबी जाली केली ती अवलोकन करून दादफिर्याद मनास आणावी.

"सहा चार घटका दिवस रहातां बाहेर स्वारी बाग, आराम, देवालयें अथवा कारखाने यांत जावी. घोडी फेरणें, बोंथाट्या वगैरे खेळून सायंकाळ जाला असतां येऊन सभेस बसून सर्वांचे मुजरे घेऊन दोन घटका रात्रीं जप-ध्यान करून कांही पुराण व दासबोध दोन समास श्रवण करून भोजन करावें. तांबुल घेऊन सभेस दोन घटका बसोन कारभार-विचार करून एकांतीं चार घटका बसावें. बातमी, नाजूक कामें, पत्रें आलीं तीं व चोरबातमी हेर ठेवून आली ती व द्रव्याचे, धान्यांचे निरख हें श्रवण करून अन्तःपुरांत जावें" (चिटणीसविरचित शिवछत्रपतींचें चरित्र पृ. १८७–१८८).

चिटणिसांनीं महाराजांची वर्णिलेली दिनचर्या हल्लींच्या वेळापत्रकांत पुढील-प्रमाणें बसवितां येईल. चिटणिसांचें वेळापत्रक तितकेसें व्यवस्थित नाहीं. म्हणून त्यांत सुधारणा करून तें देत आहें.

महाराज पहाटेंस उठत, मंगलवाद्यें श्रवण करीत, नंतर प्रातःस्मरण होई. तें उरकल्यावर शौच-मुखमार्जन व गोसेवन आटोपून ते स्नान करीत. स्नानाच्या पाण्यांत गंगोदक टाकण्यांत येई. स्नान झाल्यावर देवपूजा, जप-ध्यान, विद्वान् ब्राह्मणांबरोबर धर्मचर्चा करीत व मग पुराणश्रवणास बसत. आठ वाजण्याच्या आंत पोशाख करून तिरंदाजी व निशाणबाजी करण्यास जात. आठ वाजण्याच्या पुढें सभेस येऊन बसत. दहा वाजतां मंत्र्यांबरोबर एकांतांत विचार करीत. अकरा वाजतां जेवावयास बसत. भोजनोत्तर तांबूल भक्षण व वामकुक्षी झाल्यावर बारा वाजतां मंत्र्यास बोलावून पत्रव्यवहार पाहत. दुपारीं एक वाजतां न्यायदानाचें काम सुरू होत असे. सायंकाळीं ५ वाजण्याच्या सुमारास राजवाड्यांतून बाहेर पडून बागा पाहण्यास व देवदर्शनास जात. ६ वाजतां घोडीं फेरणें व बोथाटी. ७ वाजतां सभेस येऊन मानकरी व सेवक यांचे मुजरे घेणें. रात्रीं आठ वाजतां पुराण व दासबोधाचे दोन समास यांचें श्रवण व भोजन. ९ वाजतां पुनः कारभाराचा विचार करणें, नाजूक बातम्या ऐकणें इत्यादि. नंतर अन्तःपुरांत जाऊन शयन.

## शिवकालीन राजपत्रें

शहाजीचा शिक्का अष्टकोनी, पाऊण इंच रुंदीचा असून त्याजवर 'बंदा शहाजी भोसला' असें लिहिलेलें असावें. जिजाबाईचा शिक्का फारशीच होता. त्याचा आकार कोयरीसारखा, लांबी ६/८ इंच व रुंदी १/२ इंच आहे.

शिवाजीची मुद्रा त्याच्या हयातीभर एकच होती. ती म्हणजे 'प्रतिपच्चंद्रलेखेव वर्धिष्णुर्विश्ववंदिता शाहसूनोः शिवस्यैषा मुद्रा भद्राय राजते' अशी होती. 'मर्यादेयं विराजते' ही शिवाजीची मोहर असून तिची लांबी व रुंदी अनुक्रमें १/२ इंच व ५/८ इंच अशी आहे. मोहर षट्कोनी आहे.

शिवाजीचे प्रधान तीन झाले व त्यांच्या मुद्रा सहा आहेत. पहिला प्रधान शामराज रांझेकर, याची मुद्रा वाटोळी १ इंच व्यासाची, 'श्रीशिव

नरपतिहर्षनिदान सामराजमतिमत प्रधान ' अशी होती. ती शके १५८४ वैशाख शु. १३ पर्यंत आढळते.

दुसरा प्रधान महादजी. याची मुद्राहि वाटोळी १॥ इंच व्यासाची व 'श्रीशिव नरपातिहर्षनिदान महादेव मतिमत प्रधान' अशी आहे. ही शके १५९४ फाल्गुनपर्यंत चालू होती.

शिवाजीचा तिसरा प्रधान मोरोपंत. याच्या मुद्रा तीन आहेत. एक कुयरीच्या आकाराची असून 'श्रीशिवचरणीं तत्पर त्र्यंबकसुत मोरेश्वर' अशी होती. दुसरी लंब वर्तुळाकार १×१॥ इंच व्यासाची व 'श्रीशिवराजेंद्र हर्षनिदान त्र्यंबकसुत मोरेश्वर मुख्य प्रधान' अशी आहे. तिसरी मुद्रा दुसरीएवढीच, पण 'एषा श्रीशिवराजेंद्र, मुख्यामात्यस्य सत्यधृक् ॥ मुद्रा मोरेश्वरस्यास्तां भद्रा सद्रागदायिनी' अशी होती.

पहिली मुद्रा शक १५९७ च्या विजयादशमीपर्यंत खात्रीनें चालू होती. दुसरी मुद्रा या विजयादशमीनंतर चालू झाली असावी. यानंतर मोरोपंतांच्या दोन मुद्रा एकदम चालू असाव्या. तिसरी मुद्रा शक १६०२ च्या कार्तिक महिन्यांतील दिसते. पण ती शिवाजीच्या मरणापूर्वीची असावी. मोरोपंतांची मोहोर वाटोळी व 'विलसति लेखनावधिर्मुद्रा' अशा मजकुराची आहे.

शिवाजीच्या प्रधानमंडळापैकीं सेनापति प्रतापराव गुजर यांची मुद्रा चौकोनी असून तींत 'श्री शिवसेनाधिपमुद्रा जयति सुभद्रा प्रतापरायस्य' असा मजकूर आहे. शिवाजीचा दुसरा सेनापति हंबीरराव मोहिते याच्या दोन मुद्रा होत्या. पहिली वाटोळी व 'श्री मच्छिव महानुभाव सेनाधीश हंबीरराव' या वाक्यानें मुद्रित होती व दुसरीवर 'श्रीशिवचरणीं दृढभाव सर लष्कर मोहिते हंबीरराव' असे शब्द होते. पहिली मुद्रा शक १६०६ तील व दुसरी शक १६२७ मधील आहे. अनाजी दत्तोची मुद्रा षट्कोनी व 'श्रीशिवचरणीं तत्पर दत्तसुत अनाजीपंत निरंतर' अशी आहे. त्याची मोहोर वाटोळी आहे व तिजवर 'लेख नावधिरे, धते' अशीं अक्षरें आहे.

शिवाजीचे धर्माधिकारी पंडितराय यांची मुद्रा लंबवर्तुळाकार व 'श्रीचिंतामणिचरणशरण' अशी आहे. मोहोर षट्कोनी व 'सुभंभवतु' या शब्दांनीं युक्त आहे.

दत्ताजी त्रिमल वाकेनवीस यांची मुद्रा आढळत नाहीं. फक्त अष्टकोनी ' मोर्तब सुद 'च पाहण्यांत येतो ( शिवाजी निबंधावली, भाग २ ).

### थटी

" गाई म्हशी बहुत. दोन चार हजार गाई, त्यांचीं खिलारें केलीं, तीं मात्र देशीं, भिंवरथडी वगैरें गवताचीं रानें पाहून जागां जागां ठेवलीं. त्यांची शुश्रूषा गौळी चाकर ठेवून बहुत रीतीनें व्हावी ऐसें करविलें. तसेंच महिषी पांच हजार, खिलारें करून त्यांस गौळी व धनगर यांचे स्वाधीन केलें. त्यांणीं देशांत व कोंकणांत सड्यावरून जागां जागां रहावें. त्यांचे धारे व मोजदादी करून लोणी वगैरे उत्पन्न यावें. एकादे समयीं जिकडे जसें खर्चास दूध वगैरे ब्राह्मणभोजनास पाहिजे तरी तसे हजारो शेर एकदाच यावें. तसेंच लोणी तूप यावें. ऐसे करविलें. तसेंच मेंढरें यांचे धनगर करून खिलारें पंचवीस हजार करविलीं. त्यांची मोजदाद वर्षांतून दोन वेळां ठेवावी. उत्पन्न खर्च पाहून खर्चास देववावें. दसऱ्याचे खर्चाची वगैरे येण्याच्या मोइनी केल्या " ( चिटणीसकृत शिवछत्रपतींचें चरित्र, पृ. १८६ ).

### शिवकालीन रत्नें व अलंकार

तुरा, पदक, धुग्धुगी ( गळ्यांतील हार ), कुडक्या ( कर्णभूषण ), बिजवरा ( तिलक ), नथ, बाजूबंद ( बाहुमणि ), तोबंद ( अंगद ), पहूंच्या ( मणिकटः ), अंगठी, हस्तकडे ( हस्तकंकण ), तानवड ( कर्णिका ), वांकी ( कर्पूरभूषणम् ), मोहनमाळा ( प्रालंबिका ), घुंगुर, जंजेरिया ( शृंङ्खलिका ) पैंजण ( नूपुर ), हंसक ( वाळा ), हिरा, माणिक्य, लाल ( नीलः ), लसणिया ( गोमेद ), प्रवाल.

### वसनें

( मुंडासें ), झगा ( कञ्चुकः ), मंदिल, ( उष्णीषं स्वर्णरौप्यजम् ), कमरबंद ( कटिबंधः ), विजार, चादर ( प्रावरणी ), दुटु ( निचोल ), डगला ( कार्पासकंचुकः पान्थकंचुकः ), कुडती ( कूर्परकंचुकः ), तिरमा ( पार्वतीयोर्णा ), पल्लोदार ( पल्लवी ), भर्जरी ( स्वर्णभरितं ), चर्मपोस्तनी ( गन्धाली ), शाल ( ऊर्णावस्त्र ), दुर्मा ( रांकवं ), सखलाद ( द्वीपकम्बलः ), छीट ( चित्रवस्त्रम् ), बुटेदारानिलखः ( पुष्पितपटः ), चिकंद्रोजी ( पुष्पितोर्णा ), खिसा, दुपठा ( उपावरणं ), पासोडी, साडी ( स्त्रीवसनं ), तोहबंद-

( अन्तरीयं ), चोळी ( कर्पास ), पाटाव ( चित्रकौशेयम् ), मुकटा ( दुकूलम् ), गोश्पेचः ( कर्णबन्धः ).

## तुळजादेवी व शिवाजी

संकटसमयीं तुळजादेवीची प्रार्थना केली असतां देवी शिवाजीमहाराजांच्या अंगांत येऊन त्यांना संकटांतून मुक्त होण्याचा मार्ग सुचवीत असे. हा प्रकार महाराज आपल्या मुखानें जनास सांगत असून त्याचा उल्लेख तत्कालीन इंग्रज लेखकांनीं आपल्या पत्रांतून केला आहे. या प्रकारावर तत्कालीन महाराष्ट्रियांचा विश्वास असावा व त्याचें वर्णन सभासदानेंहि आपल्या शिवचरित्रांत करावें हें स्वाभाविक होय. शिवाजीपाशीं भवानी तरवार होती व ती त्यास तुळजाभवानीनें दिली असल्यामुळें तिचें नांवहि भवानी तरवार असेंच होतें, अशी आख्यायिका आजहि प्रचलित आहे. शिवभारतकार परमानंद यानें रचिलेल्या शिवभारतांत अफझलखानाचा वध हें प्रकरण प्रमुख होय. शिवाजीच्या अंगांत संकटसमयीं भवानी येण्यास याच कठीण प्रसंगीं सुरुवात होऊन 'भवानी तरवार' हा शब्दप्रयोग याच वेळेपासून रूढ झाला. तो प्रसंग कसा घडला याचें चित्र परमानंदानें सहृदयतेनें रंगविलें आहे.

तो लिहितो :–

जणूं काय टवटवीत कल्पलताच समोर उभी आहे अशी रत्नालंकारयुक्त, आरक्तचरण, सोनचाफ्याच्या फुलाप्रमाणें कांतिमान्, झगझगीत नीलवसन परिधान केलेली, काळ्या बुचड्यानें-खोप्यानें शोभणारी, अत्यंत सुकुमार, कुमारीचा वेष धारण करणारी, पूर्णेंदूप्रमाणें सुंदर मुख असलेली, नीलकमलाप्रमाणें सुंदर नेत्र असलेली, मंदस्मित करणारी, नव्या पोवळ्याप्रमाणें लाल ओठ असलेली, तेजस्वी कुंकुम-तिलक लावलेली, रत्नजडित कर्णभूषणें घातलेली, सुंदर नासिकेंत चित्रविचित्र रत्नजडित नथ घातलेली, कोमल भुज असलेली, कमलाप्रमाणें हातांची, नाजूक बोटांची, रत्नांच्या तेजानें चमकणाऱ्या बांगड्या घातलेली, शुभलक्षणी, गळ्यांत मोत्यांचे अनेकपदरी लहान-मोठे हार व रत्नांची कंठी घातलेली, जरीच्या फुलांची काळी चोळी घातलेली, नाभीपर्यंत लोंबणारा हार घातलेली, रत्नजडित कमरपट्टयानें शोभणारी, वरदात्री अशी ती विश्वमाता राजानें पाहिली.

अशी ती देवता साक्षात् समोर उभी राहिलेली पाहून शिवाजी आनंदानें अत्यंत गोंधळून गेला व त्यानें त्या मनःस्थितींत त्या आदिमायेला वारंवार नमस्कार केला. त्या प्रणाम करणाऱ्या आपल्या भक्तास त्या जगदीश्वरीनें आपल्या हातानें उठवून त्याजकडे दयार्द्रदृष्टीनें पाहिलें व ती त्यास म्हणाली :–

अफजलखान नांवाचा यवनश्रेष्ठ, वत्सा! तुजकडे येत असून तो कपटी आहे. त्यानें माझा अपमान केला आहे. त्याचा मृत्यु तुझ्या हातानें व्हावा अशी ब्रह्मदेवानें योजना केली आहे. म्हणून हे राजा! मी तुझी तलवार होऊन राहत आहे. याप्रमाणे बोलून भवानी त्याच्या तलवारींत शिरली. मग तो आपल्या अन्तःकरणांत तिचें वारंवार ध्यान करून सगळा पृथ्वीचा भार आपण नाहींसा केला असें मानता झाला. यासंबंधीं परमानंदानें पुढील दोन श्लोक लिहिले आहेत, ते महत्त्वाचे आहेत –

विधिना विहितोऽस्त्यस्य मृत्युस्त्वत्पाणिनामुना ।
अतस्तिष्ठामि भूत्वाहं कृपाणी भूमणे तव ॥
व्याहरन्तीति शर्वाणी तत्कृपाणीमवीविशत् ।
असौ जाग्रदावस्थोऽपि तत्स्वप्नमवमन्यत ॥

शिवाजीच्या भवानी तलवारीचा इतिहास या प्रकारचा आहे. पण परमानंदानें वर्णिलेला हा भाग दृष्टान्ताचा झाला. दृष्टान्त म्हणजे स्वप्न. दृष्टान्ताशिवायहि देवी शिवाजीच्या अंगांतहि येत असे. हनुमानस्वामीची बखर व सभासद देवीच्या या संचाराचें वर्णन करतात. देवी अंगांत येऊन शिवाजीच्या मुखानें बोलूं लागली म्हणजे बाळाजी आवजी तें बोलणें टिपून घेत असे व शिवाजी भानावर आल्यानंतर त्यास सांगत असे. यासंबंधी हनुमानस्वामी श्रीसमर्थांच्या बखरींत लिहितात, "समर्थ व शिवाजी यांची पहिली भेट झाली त्या वेळीं समर्थांनीं शिवाजीस सांगितलें तें असें –

जसा प्रसंग येईल तशी मसलत करून काम करीत असावें. कारण आम्ही सतत तुम्हांपाशीं नाहीं. शुचिर्भूत होऊन तूं व आप्तवर्गापैकीं एक चांगला लिहिणारा व एक प्रश्न विचारणारा अशा त्रिवर्गांनीं एकांतीं बसून ज्या कार्याचा उद्देश असेल तो प्रश्न विचारणारानें करावा. म्हणजे तुमचें

अंगीं देवी संचारून तुमच्या मुखेंकरून बोलेल. त्याप्रमाणें लिहिणारानें लिहावें व त्यानंतर तुम्ही त्या लेखाचें अवलोकन करून त्यांत जशी आज्ञा झाली असेल तसें करावें."

अंगांत पिशाचांचा संचार असल्याच्या कथा अनेकांनीं ऐकलेल्या व पाहिलेल्या आहेत. पिशाचाची बाधा झालेले पुरुष, विशेषतः स्त्रिया श्रीदत्तात्रेयाची सेवा करून मुक्त झाल्याचीं उदाहरणें पुष्कळ आहेत. त्यांपैकीं कांहीं उदाहरणें खोटीं असलीं तरी कित्येक खरीं असतात व त्यांवर सुबुद्ध, वयोवृद्ध व अनुभवी गृहस्थांना विश्वास ठेवणें भाग पडलें आहे. त्यांपैकीं १–२ उदाहरणें प्रस्तुत लेखकाच्या वाचण्यांत आलीं.

पुण्यांत सदाशिव पेठेंत रावबहादुर गणेश रामचंद्र पटवर्धन, बी. ए., एल्एल्. बी. सेवानिवृत्त फर्स्ट क्लास सबजज्ज राहतात. त्यांचें वय नव्वद वर्षांच्या घरांत आहे. त्यांनीं लिहिलेल्या आत्मचरित्रांत पिशाचबाधेच्या कांहीं कथा सांगितल्या असून त्यांतील एक कथा उल्लेखनीय आहे. ते लिहितात –

"शिरोळास आमच्या घराशेजारीं भीमाबाई बोंद्रे नांवाची स्त्री राहत होती. शिरोळास दत्तात्रेयाचें मंदिर असून त्यांत सायंकाळीं आरती सुरू झाली कीं ती बाई पळत जाऊन त्या देवापुढें बसे आणि चमत्कार असा कीं तेव्हां ती रुद्र म्हणूं लागे. तिचा सासरा चांगला वैदिक ब्राह्मण असलेला तिच्या अंगांत येत होता. ती बाई सासरा अंगांत आल्यावर रुद्रच काय पण वेदहि म्हणत असे. यानंतर कांहीं दिवसांनीं तेथून जवळच कृष्णातीरीं नृसिंहवाडी हें प्रसिद्ध क्षेत्र आहे तेथें ती जाऊन राहिली. तेथें आरतीच्या वेळीं तिच्या अंगांत येई. कांहीं दिवस वाडीस राहून देवाची सेवा केल्यावर तिच्या अंगांत येईनासें झालें."

ही गोष्ट पिशाच अंगांत येण्याची झाली. मनुष्ययोनीप्रमाणें पिशाच हीहि योनी असून तिचें सामर्थ्य मनुष्याहून निराळें व अधिक असतें. कित्येक माणसें मनाच्या अतृप्तस्थितींत पिशाचयोनींत जातात. सारांश, पिशाच ही जशी ईश्वराची एक अदृश्य शक्ति आहे, तशा त्याच्या इतर शक्ति अनंत व अदृश्य आहेत. त्या मनुष्याला अनन्यभक्तीनें वश करून घेतां येतात व त्या त्याच्या इष्टकामना सिद्धीस नेतात, असें भगवद्गीता आपणांस सांगत आहे. पिशाचें जर अंगांत येतात तर शिवाजीची अशीच भक्ति तुळजादेवीवर

असल्यानें ती संकटकालीं त्यानें धावा केला असतां त्याच्या अंगांत येऊन वा दृष्टान्त देऊन त्याला संकटावस्थेंतून बाहेर पडण्याचा मार्ग तिनें कां सुचवूं नये ? शिवाजीच्या भवानी तलवारीविषयीं पुष्कळ बोलणें ऐकूं येतें. तें खरें असो वा नसो. त्यापासून इतकें समजावयाचें कीं भवानी तलवार हा शिवाजीस मिळालेला दैवी प्रसाद असल्याचें लोक मानतात.

शिवाजीस ही तलवार तो कोकणांतील स्वारीवर असतां गोवलेकर (गोळवलकर ?) सावंतापासून मिळाली. सावंत शिवाजीस भेटावयास आले. त्यांस नांवाजून शिवाजीनें चाकरीस ठेवलें. त्यांजपाशीं तीनशें होन किंमतीची नामांकित तलवार होती. ती त्यांजपासून शिवाजीनें तीनशें होन व पोशाख देऊन घेतली ( चिटणीसकृत शिवचरित्र, पृष्ठ ६८ ).

## भवानी तरवार

शिवाजीच्या या तरवारीस भवानी हें नांव कां पडलें याचा इतिहास वरील प्रकारचा आहे. आतां ही तरवार कशी होती व कोठें आहे याविषयीं सर्वांसच कुतूहल वाटत आहे. ती माहिती बडोद्याचे प्रसिद्ध मल्लविद्या-विशारद कै. माणिकराव यांनीं 'शिवाजी सावनीर' या ग्रंथांत पुढीलप्रमाणें दिली आहे. ते लिहितात :–

"या तलवारीचें बाह्य वर्णन म्हणजे तिच्या दोन्ही बाजूंला दोन खोल रेघा, मुठीजवळील जाड पोलादी भागावर सोनेरी फुलांची नकशी, मूठ आच्छादित असून लोखंडी, सांध्याजवळील भाग चांगला रुंद व गोल, मुठीच्या टोंकाला मोगरा, त्यावर देखील सोनेरी फुलांची नकशी व त्यामध्यें अगदीं जवळ जवळ बसविलेले हिरे व लाल असें आहे. तिची ( करवीरकर महाराजांच्या ) देव्हाऱ्यांत पूजा करण्यांत येत असे" ( शिवाजी साबनीर, पृष्ठें १५०–१५१ ).

वर माणिकरावांनीं शिवाजीच्या तरवारीचें केलेलें वर्णन पुष्कळ अंशीं खरें आहे. माणिकरावांचें वर्णन ऐकीव दिसतें. त्या वर्णनाप्रमाणें भवानी तरवार खरोखरच लंडनमधील पदार्थ-संग्रहालयांत आहे किंवा काय याची शहानिशा ठाण्याचे कै. विनायकराव भावे यांनीं इ. स. १९१५ सालीं ब्रिटिश म्यूझियमचे प्रमुख हरक्यूलिस यांस पत्र लिहून त्यांजकडून करवून घेतली. हरक्यूलिस आपल्या दि. २१ मार्च १९१५ च्या पत्रांत

कळवितात कीं, 'शिवाजीची भवानी तरवार ब्रिटिश म्यूझियममध्यें नाहीं.' पण हा झाला तरी पत्रद्वारें केलेला खुलासा. त्याहीपेक्षां लंडनच्या ब्रिटिश म्यूझियममध्यें जाऊन समक्ष पाहून खात्री करून घेण्याची गोष्ट वेगळी आहे. म्हणून पुण्याच्या भा. इ. सं. मंडळाचे एक उत्साही सदस्य रा. वा. सि. बेंद्रे हे लंडनला गेले असतां त्यांनीं शके १८६० सालीं पाठविलेली माहिती निर्णायक समजली पाहिजे.

माणिकराव म्हणतात ती तरवार कोल्हापूरच्या महाराजांनीं सातवे एडवर्ड बादशहा प्रिन्स ऑफ वेल्स ( युवराज ) असतां इ. स. १८७५ सालीं हिंदुस्थानांत आले तेव्हां त्यांस नजर केली होती. ती तरवार बकिंग-हॅम राजवाड्यांत असल्याचें बेंद्रे यांस चौकशी अंतीं समजलें. म्हणून त्यांनीं ता. १६ मे रोजीं ती प्रत्यक्ष पण दुरून पाहिली व तिचे फोटोहि घेतले. सदर तरवार माणिकराव यांनीं वर्णिल्याप्रमाणेंच अगदी हुबेहूब आहे. अधिक म्हणजे तिजवर J. H. S. अशीं अक्षरें आहेत. त्यांचा अर्थ Jesus Humanum Salvator म्हणजे मानवाचा त्राता जीजस असा आहे. हिला त्या पदार्थसंग्रहालयांत शिवाजीची तरवार असेंच समजण्यांत येत आहे. व ती कोल्हापूरच्या महाराजांनीं नजर केली असल्यानें शिवाजीचीच असणें शक्य आहे. पण शिवाजीपाशीं ही एकच तरवार असेल असें नाहीं. त्याजपाशीं किती तरी इतर तरवारी असतील यांत शंका नाहीं. त्यांपैकीं हीच भवानी तरवार असें खात्रीपूर्वक म्हणतां येत नाहीं. तथापि ती पुष्कळ अंशीं भवानी तरवारच असेल असाहि संभव आहे. तिजवर रोमन अक्षरें आहेत यावरून पोर्तुगीज वा इंग्रज यांजपासून सावंतांनीं ती विकत घेतली असेल व त्यांजपासून वर लिहिल्याप्रमाणें शिवाजीनें ती खरीदिली असावी.

## जिजापूर

शके १५७७ पौष वद्य १३

इ. स. १६५८ जानेवारी २

पुण्याजवळ वायव्य दिशेस पाषाण नांवाचें लहान पण टुमदार खेडें आहे. तेथील शंकराचें स्थान प्रसिद्ध आहे. त्या गांवापाशीं शिवाजीमहाराजांनीं आपल्या पूज्य मातुश्रीच्या नांवानें इ. स. १६५७ त एक पेठ वसविली. त्या पेठेकरितां शेटेपण, बिडवाईपण, महाजनपणा, कोतवालकी, महतरकी,

पानसरंकी इत्यादि वतनेंहि त्या त्या अधिकाऱ्यांना देण्यांत आलीं. पण आज त्या पेठेचा मागमूसहि लागत नाहीं. यावरून पेठेची वाढ तिच्या स्थापनेनंतर पुढील धामधुमींत मुळींच झाली नसावी.

## फत्तेखानाची स्वारी

फत्तेखानानें शिवाजीवर स्वारी केव्हां केली याची नक्की तारीख मीं शिवचरित्र लिहिलें त्या वेळीं समजली नव्हती. मी त्या चरित्रांत त्या उभयतांचें युद्ध १० ऑगस्ट १६४९ पूर्वी झाल्याचें पत्र सारसंग्रह खंड १ ला पृ. १२२ याच्या आधारें दिलें होतें. पण श्री. ग. ह. खरे यांनीं हें युद्ध ८ ऑगस्ट १६४८ रोजीं झाल्याचें भा. इ. सं. मं. त्रैमासिक वर्ष १५ वें अंक ३।४ म्हणजे ऐतिहासिक फार्सी साहित्य खंड २ पृ. २४।२५ यांच्या आधारें दाखविलें आहे. अफजलखानानें शहाजीस कैद करून १० मार्च १६४९ रोजीं विजापुरास नेलें आणि त्याची कैदेंतून सुटका १६ मे १६४९ रोजीं झाली. ही सुटका शिवाजीनें कोंढाणा किल्ला सोडावा व त्याचा भाऊ संभाजी यानें बेंगळूर विजापूरकरांच्या स्वाधीन करावें या अटीवर झाली. हें सर्व फत्तेखानाच्या वरील तारखेशीं सुसंगत आहे व त्यामुळें १० ऑगस्ट १६४९ या तारखेनें जी विसंगति उत्पन्न झाली होती ती टळते. तथापि ३० नोव्हेंबर १६४९ रोजीं मुरादबक्षानें शहाजीस जें पत्र लिहिलें आहे त्यावरून ३० नोव्हेंबर रोजीं शहाजीची सुटका झाली नव्हती असें दिसतें. १६ मे १६४९ रोजींच त्याची सुटका झाली असती तर ती मुरादास कळण्यास पुढील सहा महिन्यांचा अवधि लागू नये. १४ ऑगस्ट १६४९ चें पत्र मुरादाकडून शिवाजीस आलें आहे तें लक्षांत घेतां १६ मे १६४९ रोजीं शहाजी सुटला नसावा असें निष्पन्न होतें.

## शहाजीची जहागीर

खालील फर्मान ता. २६ मे १६५८ रोजीं अल्लीअदिलशहा दुसरा यानें शिवाजीच्या बाबतींत शहाजीस अभय देण्याकरितां लिहिलें आहे ( हौस ऑफ शिवाजी सरकारकृत ).

" महाराज फर्जंद शहाजी भोसले यांस – आमची तुम्हांवर पूर्ण कृपा असून तुम्हांला कळविण्यांत येत आहे. यावेळीं शिवाजी भोसला हा आम्हां-

बरोबर अराजनिष्ठेनें व उद्धटपणानें वागत आहे. त्याच्या अपराधांचें खापर तुमच्या माथीं फुटेल या समजुतीनें तुम्हीं घाबरलां असाल. परंतु तुम्ही आमचो राजनिष्ठ प्रजाजन असून शिवाजीची गैरवर्तणूक व कृति हुजुरांस समजून चुकली आहे. म्हणून शिवाजीच्या अपराधाबद्दल तुम्हांला दोषी समजण्यांत येणार नाहीं हें लक्षांत ठेवा. त्याच्या अपराधांचा धनी तोच आहे. यास्तव तुम्ही आपलें मन शांत ठेवावें. आणि मागील बादशहाच्या ( महमद आदिलशहा ) कारकीर्दीत तुमच्यावर जी कृपा करण्यांत आली होती ती तशीच पुढें अढळ राहील; इतकेंच नव्हे तर त्याहूनहि अधिक कृपा करण्यांत येईल. तुमच्या हुद्यांत बदल होणार नाहीं. किंवा तो काढून घेण्यांत येणार नाहीं. तुमची जहागीरहि तुमच्याकडे पूर्ववत् राहील.

"तुमच्याकडे बेंगळूरचा किल्ला व त्याच्या भोवतालचा प्रदेश पूर्वीं होता तो परत देण्यांत येत आहे. तुमच्याविरुद्ध जर कोणी कांहीं सांगेल तर तें मी खोटें समजेन व त्यास माझ्या मनांत थारा देणार नाहीं. आतां तुम्ही स्वस्थ राहावें. कारण हें मी शपथ घेऊन व अल्लाची प्रार्थना करून सांगत आहें."

या फर्मानावरून इतकें स्पष्ट होतें कीं, शिवाजीच्या कृत्यांनीं शहाजी-विषयीं विजापूरकरांस संशय उत्पन्न होऊन त्यांनीं १० मार्च १६४९ रोजीं शहाजीस कैद केलें होतें व त्याची पुढें कांहीं दिवसांनीं सुटका झाली तरी बेंगळूर व त्या भोंवतालची त्याची जहागीर जप्तींत होती. ती जप्ती पुढें ९ वर्षें टिकली.

### ज्येष्ठ बंधु संभाजी

शिवाजीला जसा संभाजी हा पुत्र होता तसाच संभाजी हा ज्येष्ठ बंधूहि होता. त्याचा जन्म वेरूळ येथें इ. स. १६२३ त झाला. त्याच्या बारशाच्या समारंभास खुद्द मूर्तिजा निजामशहा उपस्थित होता. संभाजी शहाजीबरोबर पुणें प्रांत सोडून इ. स. १६३६ त कर्नाटकांत गेला व तो अखेरपर्यंत त्याच प्रांतीं होता. शिवनेरीचा किल्लेदार विश्वासराव यानें आपली कन्या जयंती संभाजीस दिली होती. तिच्याशिवाय गौरीबाई व पार्वतीबाई अशा आणखी दोन भार्या त्यास होत्या. संभाजीला उमाजी नांवाचा मुलगा ता. २५ नोव्हेंबर सन १६५४ रोजीं झाला. त्याचें पुढे लग्न होऊन त्याच्या

बायकोचें नांव सखूबाई असें ठेवण्यांत आलें. संभाजीस सुरतसिंग हा आणखी एक मुलगा होता. तो संभाजीच्या पश्चात् कोलार येथें राहूं लागला होता. संभाजीची ज्येष्ठ पत्नी जयंतीबाई हिनें ५ जून १६६६ रोजीं भाऊजीपंत या ब्राह्मणास भूदान केल्याचा उल्लेख सांपडतो. संभाजी इ. स. १६६४त मरण पावला. त्याचें वास्तव्य बहुधा कोलार येथें असे. ही व्यवस्था शहाजीनें राज्याच्या सोयीकरितां केली होती कीं तिच्या मुळाशीं सापत्नभावाची कुरबुर होती न कळे. कोलार प्रांत पूर्वीं चिक्करायल तिम्मा गौडा याचा होता. तो त्यांजपासून शहाजीनें जिंकून घेतला होता ( शिवाजी सावनीर ).

## कनिष्ठ बंधु व्यंकोजी

शिवाजी १६७७ त व्यंकोजीवर स्वारी करीपर्यंत व्यंकोजीच्या मनांत शिवाजीविषयीं वाकुडपणा उत्पन्न होण्यास कांहींहि निमित्त झालें नव्हतें. शिवाजी जयसिंगासह विजापुरावरील मोहिमेस निघाला असतां त्यास व्यंकोजीशीं दोन हात करण्याचा प्रसंग आला होता. तसेंच शिवाजीपासून रांगणा किल्ला परत घेण्याकरितां बहिलोलखानाबरोबर व्यंकोजी गेला होता. पण हे दोन्ही प्रसंग राजकीय होते. त्यांत द्वेषबुद्धि नव्हती. व्यंकोजी परतंत्र व शिवाजी स्वतंत्र. शिवाजी स्वतंत्र राहून अचाट कृत्यें करीत होता. याचें कौतुक व्यंकोजीस वाटे व त्याबद्दलचीं स्तुतिस्तोत्रें जयराम कविसारख्यांच्या काव्यांतून ऐकून त्यास आनंदहि होई. किंबहुना शिवाजीचा गौरव तो आपला गौरव अशीहि त्याची भावना असेल. शिवाजी हा आपला वडील भाऊ आहे व तो एवढा पराक्रमी निघाला आहे याचा अभिमानहि व्यंकोजी बाळगीत असला पाहिजे.

पण शिवाजीनें कर्नाटकांत जाऊन त्याजपाशीं राज्याची निम्मी वांटणी मागितली तेव्हा मात्र त्याला शिवाजीचा राग आला. त्यांचा समज असा कीं, शिवाजीनें महाराष्ट्रांत जर एवढें स्वतंत्र राज्य संपादिलें आहे तर मजसारख्या लहान सरदारापासून निम्मी जहागीर घेण्याचा अभिलाष कां धरावा ? शिवाय ही जहागीर नोकरीकरितां आहे, वतनदारीची नव्हे. त्या विमनस्कावस्थेंत दोघांच्या सैन्यांच्या मोठाल्या लढाया होऊन व्यंकोजीस नामोहरम व्हावें लागलें. पण ही मनःस्थिति कायम टिकली नाहीं. शिवाजीनें मागाहून व्यंकोजीचें राज्य त्याचें त्यास दिलें. तेव्हां उभयतांत पुनरपि गोडी

उत्पन्न झाली व पर्णालपर्वतग्रहणाख्यान जयराम कवीच्या तोंडून गाइलेलें ऐकण्यास तो उत्सुक झाला. व्यंकोजी शिवाजीस बंधुप्रेमानें दाजी म्हणत असे.

एकीकडे शिवाजी विजापूरकरांशीं लढत होता आणि दुसरीकडे व्यंकोजी विजापूरकरांपाशीं चाकरी करीत होता. अशा स्थितींत शिवाजीची निंदा करणारीं फर्मानें व्यंकोजीकडे येत. ह्या भावाभावांना वागविण्यामधील विरोधाभास उद्वेगजनक वाटल्याशिवाय राहत नाहीं. खालील फर्मान अल्ली आदिलशहा दुसरा यानें ३ मार्च १६६० रोजीं लिहिलें आहे तें वाचनीय आहे.

"व्यंकोजी भोसले यांस – तुम्हावर आमची पूर्ण कृपा आहे व आमचा नेहमीचा प्रयत्न पैगंबरांपैकीं सय्यद याच्या धर्माचा प्रसार करण्याचा असल्यामुळें माझ्या सेनापतीचा ध्वज सतत विजयाच्या वायु-लहरीबरोबर डुलत असतो. याचें प्रत्यक्ष प्रमाण हें आहे कीं, सांप्रत तो नास्तिक अधम बंडखोर शिवा हा डोकें वर काढून आम्हांबरोबर अतिशय उद्धटपणानें वागत आहे. ...... आम्हीं सिद्दी जोहार सलाबतखान यास त्या धर्मद्वेष्ट्या ( infidel ) बंडखोराचीं पाळेंमुळें खणून काढण्याकरितां सैन्य व अधिकारी यांसह त्याजवर पाठविलें होतें. पण त्या अपवित्र काफिरानें त्या इस्लामी फौजेशीं लढण्याची ताकद नसल्यामुळें पाठ फिरवून पळ काढला; आणि त्याजभोंवतीं गोळा झालेली काफीर सेना जंगली कुत्र्यांप्रमाणें दाही दिशांना पळून गेली. इस्लामांचें सैन्य त्याचा पाठलाग करीत असून अल्लाच्या कृपेनें अल्पावधींत तें त्याला बंदिवान करील किंवा त्याचा नाश करील. ही आनंददायक बातमी ऐकून तुम्ही बादशहाच्या अक्षय दैवाचे आभार माना" ( हौस ऑफ शिवाजी – सरकार ).

व्यंकोजीची आई तुकाबाई हिजबरोबर शहाजीचें लग्न इ. स. १६२७ त झालें. त्या वेळीं ती सात वर्षांची होती असें मानलें तर इ. स. १६६० त तिचें वय ४० वर्षांचें असलें पाहिजे. तर मग वरील फर्मान व्यंकोजीस इ. स. १६६० त आलें, हें खरें धरल्यास व व्यंकोजी तुकाबाईस तिच्या वयाच्या १८ व्या वर्षीं झाला असें कल्पिल्यास व्यंकोजी या वेळीं २२ वर्षांचा असावा व त्याला हें फर्मान शहाजीच्या हयातींत आलें असावें. त्या अर्थीं व्यंकोजी या वेळीं विजापूरकरांचा स्वतःहि सेवक असावा.

## युवराज संभाजी

शिवाजी संभाजीस आपल्याकडून ममतेनें वागवीत होता. त्याला तो अवघा नऊ वर्षांचा असतांच आपणाबरोबर आग्ऱ्यास घेऊन गेला होता. त्याच्या अकराव्या वर्षींच मोगलांकडे सरदारकी करण्याकरितां शिवाजीनें त्यास औरंगाबादेस पाठविलें आणि चौदाव्या वर्षीं त्याला राज्यकारभारहि सांगितला. अशा रीतीनें राज्याच्या गाड्यास जुंपून शिवाजी त्याला आपल्या पश्चात् राजा या नात्यानें राज्यकारभार करण्यास लायक बनवीत होता. परंतु त्याची सावत्र आई सोयराबाई त्याला पाण्यांत पहात असावी. तो व संभाजी एकत्र असत तेव्हां त्यांचीं कांहींना कांहीं घरगुती कारणावरून भांडणें होत असावीं. म्हणून त्या दोघांना एकमेकांपासून दूर ठेवणेंच शिवाजीस शहाणपणाचें वाटलें. अर्थात् त्यास रायगडीं वा राजगडीं न ठेवतां त्याची योजना इतरत्र करण्याशिवाय दुसरा इलाज नव्हता. त्याला राज्यकारभारांत तर असूं द्यावयाचें पण राजधानींत तर राहूं द्यावयाचें नाहीं, अशा स्थितींत आहे या राज्याचा एखादा भाग त्याजकडे सोपविणें हा एकच उपाय होता.

शिवाजीनें कर्नाटकाच्या स्वारीवर जाण्याचें ठरविलें तें संभाजीस वेगळें राज्य मिळवून देण्यासाठीं. तिकडे त्याचे बरेच दिवस मोडणार होते. त्या मुदतींत गृहकलह टाळण्यासाठीं त्यानें तात्पुरती एक नवी योजना आंखली. सोयराबाई – हिला लाडिकपणानें ममता म्हणत, हिनें व मोरोपंतादि मंत्री यांनीं राजधानींत राहावें आणि शंभूजीनें दक्षिण कोकणांत शृंगारपुरीं असावें असें त्यानें ठरविलें. शृंगारपूरचें राज्य शिवाजीनें इ. स. १६६१ त सुर्व्यांपासून जिंकून घेतलें होतें. सुर्व्यांच्या राज्यांत शृंगारपूर ते प्रभावळी अथवा प्रचीतगड ते विशाळगड म्हणजे हल्लींचा सबंध संगमेश्वर तालुका मोडत होता. शृंगारपूर संगमेश्वरपासून पूर्वेस सह्याद्रीच्या अगदी पायथ्याशीं दहा मैलांवर असून ती सुर्व्यांची राजधानी होती. तेथें राहावयास सुर्व्यांचा वाडा होताच व गांवहि हवाशीर, रम्य व उंचावर या कारणानें त्या ठिकाणीं संभाजी व त्याचे कारभारी यांची स्थापना शके १५९८ कार्तिक शु. रविवारीं करण्यांत आली. या व्यवस्थेनें गृहकलहहि मिटत होता व संभाजीस स्वतंत्रपणें राज्यकारभार पाहण्याची संधीहि मिळत होती.

शिवाजीला कर्नाटकांतील स्वारींत जितकें यश आलें तितकें येईल अशी त्याची प्रारंभीं कल्पनाहि नसेल. त्याचा विचार प्रथम फक्त व्यंकोजीपासून पित्याची वांटणी घेऊन ती शंभूजीच्या स्वाधीन करण्याचा असावा. त्याला राज्यलोभाकरितां व्यंकोजीपासून वांटणी घ्यावयाची नव्हती. पण नाइलाजानें केवळ शंभूजीच्या व्यवस्थेकरितां त्याला व्यंकोजीस दुखवून ती घ्यावयाची होती. पण कर्नाटकांत कुतुबशाहीच्या मदतीनें त्याला कल्पनातीत यश आल्यावर व्यंकोजीस पित्याचें सर्व राज्य देऊन टाकण्यास शिवाजी तयार झाला. कारण त्यानें स्वतंत्रपणें कर्नाटकांत मिळविलेलें राज्य इतकें मोठें होतें कीं संभाजीचें समाधान तेवढ्यावर करतां येईल असें त्यास वाटलें. शिवाय संभाजीच्या शौर्याची, पराक्रमाची, कर्तृत्वाची व शहाणपणाची त्यास परीक्षा पाहावयाची असल्यामुळें त्या गुणांच्या जोरावर शंभूजीस आदिलशाही व कुतुबशाही यांजबरोबर त्या बाजूनें लढून स्वतःचें राज्य वाढवितांहि आलें असतें. तसेंच पश्चिम व उत्तर या दिशांकडून शिवाजी व दक्षिणेकडून त्याचा पुत्र संभाजी असे दोन प्रबळ शत्रु उठल्यावर त्या दोन्ही राज्यांची चटणी उडण्यासहि विलंब लागणार नव्हता.

पण हें व्हावें कसें ? शिवाजी कर्नाटकांतून परत राजधानींत येतो तों त्यास विपरीत बातम्या कळल्या. संभाजी आपला अपमान करतो व दिल्लीश्वराच्या मदतीनें राज्य घेऊं इच्छितो, अशा कागाळ्या मोरोपंतादि मंत्र्यांनीं शिवाजीस सांगितल्या. पण हें एकच कारण नसून संभाजीच्या शृंगारपुरांतील दुराचरणाच्या व छांदिष्टपणाच्या वार्ताहि शिवाजीच्या कानावर आल्या असल्या पाहिजेत. म्हणून त्यानें संभाजीस पत्र लिहून शृंगारपूर सोडून ताबडतोब सज्जनगडीं समर्थासन्निध जाण्यास फर्मावलें.

## सज्जनगडावर संभाजी

संभाजी शृंगारपुरास असतां त्याला भवानीबाई नामक कन्या झाली. ती शाहूबरोबर औरंगजेबाच्या कैदेंत पडली. तेव्हा तिचें लग्न तारळ्याचे महाडिक हरजी राजे यांचे पुत्र शंकराजी राजे यांजबरोबर झालें. संभाजी एका वेगळ्याच जाळ्यांत सांपडला होता. त्याला राज्यप्राप्तीचें एक चमत्कारिक तंत्र त्याचा सल्लागार कान्यकुब्ज ब्राह्मण कलश ( कलुषा ) यानें सांगितलें. त्यानें शाक्तपंथाचें तंत्र शिकून घेण्याकरितां शिवयोगी नांवाच्या

ब्राह्मणास बंगाल्यांत पाठविलें आणि तें तंत्र शिकून परत आल्यानंतर गणेश भट जांभेकर व केशव उपाध्ये यांच्या साहाय्यानें शिवयोग्यानें कलशाच्या देखरेखीखालीं शृंगारपुरास एक यज्ञ केला. त्या यज्ञांत मद्य व मांस यांचा यज्ञदेवतेचा प्रसाद म्हणून वापर करण्यांत आला. महाराष्ट्रास अपरिचित व अपवित्र असा हा प्रकार घडल्याचें शिवाजीस मंत्र्यांकडून कळलें. तेव्हां विशेषतः असले चाळे थांबविण्याकरितां शिवाजीनें वर लिहिल्याप्रमाणें संभाजीस शृंगारपुराहून ताबडतोब निघून सज्जनगडावर येऊन राहण्याची आज्ञा केली. सज्जनगडीं श्रीसमर्थ रामदासस्वामी वास करीत. त्यांच्या निवासाचा उल्लेख कवीनें परमानंद काव्यांत केला नसला तरी इतर गड सोडून सज्जनगडावर संभाजीस ठेवण्यांत शिवाजीचा अन्य उद्देश असणें शक्य नाहीं. सज्जनगडाचें मूळ नांव परळी. तें बदलून सज्जनगड हें नांव समर्थ गडावर राहूं लागले म्हणूनच पडलें किंवा ठेवण्यांत आलें हें उघड आहे. प्रस्तुत काव्यांतहि त्यास सज्जन पर्वत असेंच म्हटलें आहे. तेथील वातावरण शृंगारपुराहून अगदींच निराळें. समर्थांच्या श्वासोच्छ्वासानें तें अत्यंत पवित्र व सात्त्विक बनलें होतें. त्या पवित्रतेनें व समर्थांच्या सदुपदेशानें संभाजीस उपरति होऊन तो नीट स्थितीवर येईल, अशी श्रीशिवाजीमहाराजांची श्रद्धा होती. परंतु संभाजी इतका मर्यादेबाहेर गेला होता कीं समर्थांनाहि त्याजपुढें हात टेकावे लागले असावे. संभाजीला महाराजांनीं सज्जनगडावर अगदींच मोकळा सोडला होता असें नाहीं. तो किल्लेदाराच्या नजरेखालीं होता.

संभाजीनें कांहीं काळ सज्जनगडावर घालविल्यानंतर तो त्या कैचींतून सुटण्याचें निमित्तच पाहत होता. त्याचा शृंगारपुरीं असल्यापासूनच दिलीरखानाशीं गुप्त पत्रव्यवहार चालू होता. संभाजीला कर्नाटकांतील तें लहानसें राज्य नको होतें. त्याला शिवाजीचें सबंध राज्यच पाहिजे होतें. तें मिळवून देण्याचें दिलीरखानानें त्यास कबूल केलें होतें. त्याला अट एवढीच कीं, त्यानें मोगलांकडे निघून यावें. तसा तो निघून आल्यावर तेवढेंच काय, पण त्याहूनहि अधिक राज्य मिळवून देण्याचें आमिष औरंगजेबाच्या आधारावर दिलीरखानानें त्यास लावून ठेवलें होतें. हें सर्व शिवाजी जिवंत असतांनाच घडून यावयाचें कीं त्याच्या मृत्यूनंतर व्हावयाचें एवढाच काय तो प्रश्न. बहुधा मोगलांच्या मदतीनें बापाशीं लढून राज्य मिळविण्याचा

संभाजीस हिय्या होण्यासारखा नव्हता. शिवाजी विद्यमान आहे तोंपर्यंत मोगलांची चाकरी करून औरंगजेबाची मर्जी संपादावी व शिवाजीच्या पश्चात् त्याची गादी मिळवून मोगलांचें मांडलिकत्व पत्करावें असा त्याचा बेत असावा.

सज्जनगडीं आल्यावरहि संभाजीचें गुप्त दळणवळण दिलीरखानाशीं असलें पाहिजे. त्यांत संकेत ठरल्याप्रमाणें संभाजी एके दिवशीं पहाटें कृष्णा-वेण्णेच्या संगमावर स्नानाला जाण्याचें निमित्त किल्लेदारास सांगून आपल्या परिवारासह माहुलीस ( महाबली ) गेला व तेथें स्नान व दान-धर्म करून दिलीरखानाच्या छावणींत अकस्मात् चालता झाला.

प्रस्तुत काव्याचा हा अध्याय परमानंदानें लिहिला आहे. त्यांत खालील दोन पंक्ति चिन्त्य आहेत. त्यांत म्हटलें आहे –

अश्लीलभावं बिभ्राणा किंवदन्तीयमुत्थिता ।
ह्रेपयत्यद्य सह्याद्रिं नाथस्य तव पश्यतः ।।

शिवाजीला मोरोपंतादि मंत्री म्हणाले, 'अश्लील म्हणजे अमंगल अशी वार्ता उठली असून ती तुमच्या देखत सह्याद्रीला लाज आणीत आहे.' यावरून संभाजी शाक्त पंथाचें अनुष्ठान शृंगारपुरांत करीत होता असें अनुमान निघतें. शिवाजीस लिहितां वाचतां येत होतें याचा स्पष्ट पुरावा परमानंदाच्या या काव्यांतहि सांपडतो. कवि लिहितो –

तदुक्तामुक्तिमाकर्ण्य स तु नीतिमदग्रणीः ।
लेखनीमादितकरे साश्रुणी दधदक्षिणी ॥
प्रजाभ्यो ह्यभयं दत्वा निरुणत्सि धनागमम् ।
अवजानासि चामात्यान्ममात्मान इवान्वहम् ॥
उत्तिष्ठ शृंगारपुरात्तिष्ठ सज्जनपर्वते ।
इङ्गितज्ञाय कषया किं सौजात्यवतेऽर्हते ॥
पद्यद्वयमिदं सम्यग्विलिख्य स्वयमीशिता ।
शम्भवे प्रापयामास पुरुषेण विजानता ॥

अर्थ – मंत्र्यांचें भाषण ऐकून त्या नीतिमानांतील अग्रणीनें हातांत लेखणी घेऊन डोळ्यांत अश्रु आणून संभाजीस पत्र लिहिलें. 'प्रजेला अभय

देऊन धन मिळविण्याचें तूं बंद केलें आहेस आणि नेहमीं माझ्या प्राणासारख्या मंत्र्यांचा अपमान करतोस. तरी तूं शृंगारपुरांतून नीघ व सज्जनपर्वतावर राहा. उत्तम कुलांत जन्मलेल्या व शहाण्या अशा तुजसारख्याला चाबूक मारावयास का पाहिजे ? ( कारण शहाण्याला शब्दांचा व मूर्खाला टोणप्याचा मार उचित आहे. ) या दोन पद्यांतील मजकूर शिवाजीनें स्वतः लिहून चांगल्या सुज्ञ माणसाबरोबर संभाजीकडे पाठविला.

संभाजी १३ डिसेंबर १६७८ रोजीं सज्जनगडाहून पळाला. त्याजबरोबर त्याची भार्या येसूबाईहि होती, कारण संभाजी शृंगारपुराहून सज्जनगडास सपरिवार आला होता. म्हणजे त्याची पत्नी येसूबाईहि त्याजबरोबर होतीच. तिला सज्जनगडावर एकटीला मागें ठेवण्याचें संभाजीस प्रयोजन नव्हतें. शिवाय तो मोंगलास कायमचा जाऊन मिळणार असल्यामुळें त्याचा परिवार त्याजबरोबर पाहिजेच होता.

दिलीरखानानें त्याचा सत्कार चांगला केला. परमानंदानें हा प्रसंग वर्णितांना मनाचा समतोलपणा राखण्याचा प्रयत्न केला आहे. एकीकडे तो संभाजीच्या गुणांची थोरवी गातो व दुसरीकडे तो शिवाजीचें महानुभावित्व पदोपदीं आठवतो. दिलीरखान माहुलीपासून जवळच कोठें-तरी मुक्कामास असला पाहिजे. दिलीरखानानें संभाजीचें पुष्कळ कोडकौतुक चालविलें. दिलीरखानाकडे संभाजी गेल्यानंतरचा एकच युद्धप्रसंग परमानंदानें निर्देशिला आहे. माहुली सातार्‍यापासून दीड कोसावर आहे, आणि सातार्‍याच्या आग्नेयीस सुमारें पंचवीस कोसांवर खानापूर तालुक्यांत भूपाळगड नांवाचा किल्ला आहे. तो डोंगरी आहे. पण त्याची प्रसिद्धि सिंहगड, पन्हाळगड यांप्रमाणें हल्लीं नाहीं. हा गडहि तितका उंच व मोठा नाहीं. शिवाजीचे युद्धप्रसंग पूर्वेस मोंगल व विजापूरकर यांजबरोबर चालू होते, त्या वेळीं त्याच्या सैन्यास जवळपास कोठें तरी आश्रयस्थान पाहिजे, यासाठीं त्याला एक गड हवा होता. म्हणून बाणूर गांवाजवळची एक टेकडी तिला तटबंदी करून शिवाजीनें लढाऊ बनविली. शिवाजीचें हें एकुलतें एक आश्रयस्थान मोंगल वा विजापूर केव्हां तरी हिरावून घेणार याची कल्पना शिवाजीस असल्यामुळें त्यानें भूपाळगडावर सैन्यहि बरेंच ठेवलें होतें व त्याचें

आधिपत्य शाइस्तेखानापुढें चाकणचा किल्ला मर्दुमकीनें लढविणारा प्रसिद्ध रणधुरंधर फिरंगोजी नरसाळा याजकडे सोपविलें होतें.

## फिरंगोजी नरसाळा

संभाजी दिलीरखानाबरोबर होता व दिलीरखान भूपाळगड घेण्याच्या विचारांत होता. तो संभाजीसमवेत भूपाळगडाच्या रोखानें निघाला. ही गोष्ट संभाजी दिलीरखानाकडे गेल्यानंतर सरासरी साडेतीन महिन्यांतील. तो एप्रिल महिन्याचा प्रारंभ होता. खानापूर तालुका हा अगदींच कोरडा, त्यांत हा चैत्र-वैशाखाचा महिना; त्या बाजूला नद्याहि कमी आहेत व त्याहि लहान, आणि पावसाळ्यांतहि त्यांत पाण्याचा खडखडाट असतो. मग उन्हाळयांत काय, बोलावयासच नको. अशा स्थितींत मोगलांच्या सैन्याचे पाण्याविणें हाल झाले असल्यास नवल काय ? गड लहान होता व तो मोगलांना सहज जिंकतां आला असता. पण त्यांची गांठ जबरदस्त अशा फिरंगोजीशीं व शिवरायासाठीं प्राणार्पण करण्यास सिद्ध असलेल्या मराठा सैनिकांशीं. या कारणानें गड लवकर हस्तगत होईना. गडावरून दगडांचा वर्षाव होत होता. तो मोगल सैन्याला सहन होईना. यास्तव ही निर्वाणीची कामगिरी दिलीरखानानें संभाजीवर सोंपविली असें परमानंद म्हणतो. आतां हें युद्ध मराठ्या-मराठ्यांत जुंपलें. संभाजीनें बाणांच्या वृष्टीनें दुर्गरक्षकांच्या ठिकऱ्या उडविल्या व किल्लेकांना घायाळ करून विव्हळत पाडलें. तेव्हां फिरंगजित् त्या पर्वतावरून गर्वपरिहार होत्साता पळून शिवाजीकडे आला व संभाजीशीं कसें लढावें म्हणून विचारूं लागला. तेव्हां शिवाजीनें त्याची निर्भत्सना करून त्याला तोफेच्या तोंडीं दिलें.

इत्थं राजकुमारेण कुमारेणेव कुप्यता ।
शकारिषु समग्रेषु दुर्गरक्षेष्वनेकशः ॥
इषुभिः शकलीकृत्य पातितेषु समन्ततः ।
स्वप्रदष्टेष्विवाशेषेष्वपि नष्टेषु विव्हलः ॥
अपद्रुत्याचलादस्मादकस्मात्क्वापि निर्गतः ।
सकलं स्वस्य गर्वस्य फलं प्राप फिरंगजित् ॥

इत्यनुपुराणे सूर्यवंशे निवासकरकवीन्द्रपरमानंदप्रकाशितायां शुभलक्षणलक्षितायामध्यायशतसम्मितायां वैयासिक्यां संहितायामध्यायः ।

वरील श्लोकांत फिरंगोजी कोठें तरी पळाला असें परमानंद म्हणत असला तरी तो शिवाजीकडे गेला व त्याला शिवाजीनें तोफेच्या तोंडीं दिलें असें शिवदिग्विजयकार सांगतो. 'परमानंदकाव्यम्' या नांवानें ओळखल्या जाणाऱ्या व रा. ब. सरदेसाई यांनीं नव्यानें संपादिलेल्या वरील काव्यांत शिवाजीच्या मृत्यूनंतर माजलेल्या गोंधळावर कांहीं नवीन प्रकाश पडत आहे. त्यांत म्हटलें आहे, 'शिवाजीच्या निधनोत्तर संभाजीनें पन्हाळ्यावर वडिलांचें श्राद्ध केलें. त्यामागून त्याच्या हेरांनीं बातमी आणली कीं, रायगडावरील मोरोपंतादि मुत्सद्दी व सोयराबाई यांनीं कट करून राजारामास गादीवर बसविण्याचें ठरविलें आहे. मोरोपंत पन्हाळ्यावर सैन्यानिशीं येऊन संभाजीस कैद करण्याचा व जरूर तर ठार मारण्याच्या विचारांत आहे. हें समजल्यावर मुत्सद्दी व सेनापति यांत फूट पाडण्याचा संभाजीनें व्यूह रचिला. त्यानें सेनापति हंबीरराव मोहिते यास पत्र लिहून त्यास व आनंदरावास मंत्रिमंडळाच्या कटांतून फोडलें आणि मुत्सद्द्यांपैकीं प्रल्हाद निराजीवरहि ती मात्रा लागू पडली. हंबीररावानें मग मोरोपंत व अण्णाजीपंत या मुख्य मुत्सद्द्यांचेंहि मन वळवून त्यास संभाजीच्या पक्षांत ओढण्याचा डाव टाकला; पण त्यांनीं आपण शिवाजीपाशीं राजारामास सिंहासनाधिष्ठित करण्याचें वचन दिलें असल्यामुळें त्या वचनास जागण्याचा आपला निर्धार व्यक्त केला. तेव्हां ते पन्हाळ्यावर जावयास निघाले असतां त्यांच्या सैन्याचा मोड करून त्यांस व त्यांच्या बायकांमुलांस हंबीररावानें अटकेंत ठेवलें.

### कल्याणच्या सुभेदारांची सून

मीं 'युगप्रवर्तक श्रीशिवाजीमहाराज यांचें चरित्र' लिहून प्रसिद्ध केलें. तें सर्व ऐतिहासिक कागदपत्रांच्या आधारें लिहिलें आहे. त्यामुळें साहजिकच महाराजांविषयीं ज्या अद्भुत कथा प्रचलित आहेत त्यांचा प्रस्तुत चरित्रांत समावेश करण्यांत आला नाहीं. या कारणानें तें चरित्र ज्यांनीं वाचलें त्यांपैकीं कांहीं जणांनीं या अद्भुत कथांच्या सत्यतेविषयीं मला पृच्छा केली आहे. यास्तव त्यासंबंधीं दोन शब्द येथें प्रकट करण्याचें मीं योजिलें आहे.

महाराजांविषयीं अद्भुत कथा सर्वांस अवगत आहेत त्या अशा—(१)

महाराजांस त्यांच्या बालपणीं शहाजी राजे विजापुरास बादशहाच्या दर्शनास घेऊन गेले असतां त्यांनीं बादशहास तो मुसलमान म्हणून मुजरा करण्याचें साफ नाकारिलें. ( २ ) त्यांचे कारभारी दादाजी कोंडदेव यांनीं महाराजांच्या शिवापूरच्या बागेंतील एक पाडाचा आंबा तोडला. ती चूक त्यांच्या लक्षांत येतांच ते आपला तो हात तोडण्यास उद्युक्त झाले. त्यावेळीं महाराज त्यांजबरोबर होते, त्यांनीं सांगितलें "हें करणें श्रेयस्कर नव्हे, तुम्ही मालिकच आहां." तें ऐकून पंतांनीं अंगरख्याची एक अस्तनी कापून लांडी केली आणि सर्वांस सुचविलें जें "याप्रमाणें महाराजांचे आज्ञेखेरीज चालूं नये." ( ३ ) आबाजी सोनदेव यांजकडे कल्याण प्रांताचा सुभा होता. त्या प्रांतांतील किल्ले कोट यांच्या इमारतीची कामगिरी महाराजांनीं त्यांजवर सोपविली. ज्यावेळीं कल्याण प्रांत महाराजांनीं घेतला त्यावेळीं मुलाणा हयाती हा विजापूरकरांचा सुभेदार त्या प्रांतावर होता. त्याविषयीं चिटणीसकृत शिवचरित्रांत पुढील मजकूर आहे :–

"महाराजे कल्याण प्रांत पहावयास स्वारीस गेले. तेथें गेल्यावर मालमावेशा ( द्रव्य ) सांपडली तें पाहून मोजदाद करून राजगडास पाठविली. बहुत द्रव्य सांपडलें. महाराजांस संतोष झाला. हें पाहून आबाजीपंतीं अर्ज केला जे 'एक स्त्री बहुत सुंदर लावण्यवान महाराजांचे सेवेशी योग्य जाणोन ठेविली आहे.' ऐसे बोलल्यावरी मातबर दरबार करून आबाजीपंतास 'तुम्ही स्त्री चांगली आहे बोललां ती पहाण्यास घेऊन येणें' म्हणून सांगितल्यावरून तिला वस्त्रें भूषणें देऊन आणिली. महाराजांनीं तिला पाहून परम संतोषी जाले आणि बोलले जे 'इचे लावण्य असेंच आमचे मातुश्रीचें असतें तर आमचेंहि स्वरूप असेंच झालें असतें.'

याप्रमाणें दरबारांत बोललियांवरि सर्वांस आश्चर्य वाटतें झालें. आबाजीपंतास सांगितलें 'राजांनीं ज्यांस यश पाहिजे त्यांनीं उच्छिष्ट स्त्री–अंगिकार करूं नये; परस्त्री अभिलाष करून रावणादिक क्षयास गेले. त्यांत राजास प्रजा सर्व अपत्याचे जागा. स्त्रिया करणें तरी शतावधि शक्ती पाहून कराव्या असा राजधर्म आहे.' तेव्हां महाराज थोर होत असें सर्व मानते झाले. आणि त्या समयीं त्या स्त्रीस वस्त्रें अलंकार देऊन तिचा सासरा विजापुरास गेला होता त्याजकडे पाठविली" ( पृ. ८० ).

हीच आख्यायिका शिवदिग्विजय या बखरींत थोड्या फरकानें येणेंप्रमाणें दिली आहे – " पंतांनीं ( आबाजी सोनदेव ) कल्याणचे सुभ्यांत काजी मुलाणा याची कन्या बहुत चांगली होती. तें वृत्त कळोन त्या काजी-पासोन राजीपणानीं महाराजांस नजर करावयास ती मुलगी पैका देऊन संतोषी करून घेतली. तिजवर दहापांच हजारांचे दागिने घालोन वस्त्रपात्र तयार करून सरकारांत आणोन विनंती केली कीं, ' नाटकशाळेकरितां जनानखान्यांत सरकारचे चाकरीचे उपयोगी अशी सुंदर रूपवान लावण्यवती आहे. ठेवावयास योग्य आहे. ' बोलतांच महाराजांनीं दरचे ( ३ ) समयीं कचेरींत सर्व जमा झाले असतां त्या जागीं आणावयाची आज्ञा केली. तें सर्वत्रांनीं ऐकलें. समानशीलांत चर्चा करूं लागले. ' धणी आहेत. हा पडतपोशी कारभार. दरबारांत आणवणें कारण काय ? होईल तें पहावें ' तों पंतांनीं ते स्त्रीस आणोन दरबारांत नजर केली. तिचें लावण्य पाहून बोलते जाले कीं ' हे स्त्री लावण्यवती, सुंदर स्वरूपवान् आहे. आमचे मातुश्रीची तसबीर अशी असती तरी आम्हीहि चांगले सौंदर्यवान् विशेष आपले मातुश्रीचे उदरीं जन्मतो. '

हे सभाजनांचे श्रवणीं पडतांच चकित होऊन पाहूं लागले. महा-राजांनीं वस्त्रें अलंकार आणवोन ते स्त्रियेस दिले. पालखी देऊन माघारी पाठविली. सुभेदारास आज्ञा केली कीं " तिजला भ्रतार करून देणें आणि तिचा निर्वाह चालवणें. बोभाट येऊं न देणें. या उपरी अशी करणी कोणी केल्यास कार्यास येणार नाहीं. असा संबंध करावा, धर्माचा लोप व्हावा, तेव्हां जनास शिक्षा कशी लागेल ? आपले धर्मानीं संपूर्ण ज्ञातीनें वर्तावें. कोण्ही वाईट नाहीं. " अशी निविष्ट ताकीद होतांच सर्वांस दहशत पडली. महाराज स्वस्त्रीशिवाय अन्य स्त्रीशीं रत नाहींत. अशी जितेंद्रियपणाची खात्री सर्वांची झाली " ( पृ. १८९, ९० ).

वरील दोन कथांत मेळ बऱ्याच बाबतींत कसा नाहीं तो पहा. पहिली कथा मल्हार रामराव चिटणीस यांनीं आपल्या ' शककर्ते श्री शिव-छत्रपतीमहाराज ' या बखरींत दिली आहे व दुसरी श्रीशिवदिग्विजयकारांनीं दिली आहे. पहिलींत ती स्त्री कल्याणचा सुभेदार मुलाणा हयाती याची सून म्हटलें आहे व दुसरींत ती काजी मुलाणा याची कन्या ठरविण्यांत

आली आहे. या दोन कथांचे लेखक अनुक्रमें मल्हार रामराव चिटणीस व खंडोबल्लाळ चिटणीस हे होत. हे दोघेहि शिवाजीमहाराजांचे चिटणीस सुप्रसिद्ध बाळाजी आवजी यांच्या वंशांतील होते. मल्हाररावांनीं आपलें शिवचरित्र इ. स. १८१० त साताऱ्याचे तत्कालीन महाराज प्रतापसिंह यांच्या आज्ञेवरून लिहिलें. प्रतापसिंहांनीं त्यांना म्हटलें, ‘ तुम्ही पुरातन लेखक, लेखनाधिकारी यांजकरिता श्री शिवछत्रपति यांचें चरित्र पूर्वील दाखले वगैरे लेहून ठेविलें असेल त्या अन्वयें लेहून आणावें. ’ त्यावरून त्यांनीं कारकिर्दी वडिलार्जित होत्या, दिनचर्या व पराक्रम कथाहि ( संग्रहीं ) होत्या त्यांच्या आश्रयेंकरून लेहून निवेदन केलें. ’ अर्थात् हें चरित्र मल्हाररावांनीं घरच्या कागदपत्रांच्या आधारें लिहिलें हें स्पष्ट आहे.

‘ शिवदिग्विजय ’ हें दुसरें चरित्र बडोद्यास पांडुरंग रामचंद्र नंदुरबारकर व लक्ष्मण काशीनाथ दांडेकर यांनीं शके १८१७ त ( इ. स. १८९५ ) प्रकाशित केलें. प्रकाशकांना या बखरीची मूळ प्रत कोणापासून मिळाली ही गोष्ट त्यांनीं गुलदस्तांत ठेवली आहे. ते म्हणतात, “ ही बखर मूळ शके १६४० म्हणजे शिवाजीमहाराज समाधिस्त झाल्यावर सदतीस आडतीस वर्षांनीं ‘नर्मदा दक्षिणतटे’ अर्थात् महाराष्ट्र देशांत लिहिली गेली. मालकाच्या तोंडी माहितीवरून व शोधाअंतीं असें समजतें कीं ही बखर शिवाजीमहाराजांचे चिटणीस बाळाजी आवजी म्हणून होते त्यांचा पुत्र परमस्वामिभक्त खंडोबल्लाळ या गृहस्थानें लिहिली. ”

ही माहिती खरी धरल्यास शिवदिग्विजय ही बखर आधीची व मल्हाररावांची बखर नंतरची. पण दोन्ही बखरी चिटणीस घराण्यांतील पुरुषांनीं लिहिलेल्या. मात्र मल्हाररावांनीं जसें आपल्या जवळच्या कागदपत्राच्या आधारें शिवाजीची बखर लिहिल्याचें छातीठोकपणें सांगितलें आहे, तसें विधान श्रीशिवदिग्विजयकारांनीं आपल्या बखरींत केलें नाही हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. त्या दृष्टीनें शिवदिग्विजयापेक्षां मल्हाररावकृत शिवचरित्रच अधिक विश्वसनीय मानावें लागतें.

शिवदिग्विजयकारांनीं वरील माहिती देतांना किती तरी चुका केल्या आहेत. मुलाणा हा जर सुभेदार वा काजी होता तर तो पैसे घेऊन आपली कन्या आबाजी सोनदेवास देईल कसा ! हा उघड उघड कन्याविक्रय

असून तो सुभेदारासारखा वा काजीसारखा उच्चपदस्थ व इभ्रतदार माणूस केव्हांहि करणें शक्य नाहीं. आबाजीनें कल्याण घेऊन त्याची लूट केल्यावर त्याला ही मुलगी सांपडणें व ती गुलाम म्हणून नेणें हें मल्हाररावांनीं म्हटल्याप्रमाणें अधिक संभवनीय आहे.

आतां या ठिकाणीं महत्त्वाचा प्रश्न असा उत्पन्न होतो कीं, शिवाजी-महाराजांपाशीं नाटकशाळा, गणिका वा उपवस्त्रें असत काय ? महाराजांना ७–८ भार्या असल्याचें इतिहासांत नमूद आहे. परंतु त्यांजपाशीं नाटकशाळा असल्याचा विस्तृत उल्लेख कोठें आढळत नाहीं. महाराज परस्त्री मातेसमान मानीत असत हें प्रसिद्ध आहे. तरी पण राजे या नात्यानें त्यांना नाटक-शाळा ठेवण्यास कांहीं प्रत्यवाय नव्हता. कारण तसा त्या काळांत भारतभर सर्वत्र रिवाजच होता. शहाजी, संभाजी, राजाराम यांच्या नाटकशाळा होत्या. मुसलमान बादशहांच्या नाटकशाळांविषयीं तर बोलावयासच नको. अशा स्थितींत शिवाजीमहाराजांपाशीं त्या असल्यास त्यांत आश्चर्य मानण्यासारखें कांहीं नाहीं.

तथापि त्यासंबंधीं कांहीं पुरावा मिळतो का हें पाहूं. शिवाजीमहाराजांच्या ज्या सात-आठ स्त्रिया होत्या त्या सर्व लग्नाच्या होत्या कीं त्यांपैकीं कांहीं रक्षा होत्या याविषयीं शंका उत्पन्न व्हावी अशी माहिती क्वचित् दृष्टोत्पत्तीस येते. हनुमानस्वामींच्या बखरींत शिवाजीस मुख्य तीन व दोन उपस्त्रिया होत्या असें म्हटलें आहे व त्याचा उल्लेख इतिहासाचार्य कै. विश्वनाथ काशीनाथ राजवाडे यांनी मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें खंड ४ यांत केला आहे. तसेंच मल्हारराव चिटणिसांनी आपल्या शिवचरित्रांत शिवाजीच्या आठरा कारखान्यांची नामावळी दिली आहे. तींत नाटकशाळा हा एक कारखाना नमूद आहे. तो लक्षांत घेतल्यास इतर राजांप्रमाणें शिवाजीपाशींहि नाटकशाळा होत्या असें म्हणणें धाडसाचें ठरणार नाहीं.

इतकें जरी म्हटलें तरी कल्याणास घडलेली हकीकत खरी कीं काल्पनिक अशी शंका शिल्लक राहतेच. कल्याण-प्रसंगाशीं संबद्ध असा आबाजी सोनदेव हा शिवाजीचा सुभेदार असल्याचें मल्हारराव चिटणिसांच्या बखरींत अनेकवार सांगण्यांत आलें आहे. त्याला शिवाजीनें जंजिऱ्याच्या सिद्दीवर पाठविलें होतें. पण त्याला तें राजकारण साधलें नाहीं असें मल्हारराव म्हणतात.

शिवाजीनें सिद्दीवर पाठविलेल्या सरदारांत आबाजी असल्याचा कागदोपत्रीं पुरावा नाहीं. त्याजवर शामराजपंत व दत्ताजीपंत रवाना केल्याचा पुरावा उपलब्ध आहे. अर्थात् हा प्रकार सिद्दीवरील प्रारंभाच्या मोहिमांचा. यानंतर दौलतखान, मयाजी नाईक व मोरोपंत पेशवे यांचींच नांवें पुढें येतात. मात्र आबाजी हा शिवाजीच्या अधिकारीवर्गांत होता यांत शंका नाहीं. कारण १० नोव्हेंबर १६७० मधील एक खरेदीपत्र उपलब्ध आहे तें असें :– " मौजे तांदळी तर्फ रांजणगांव परगणें जुन्नर येथील गांव कुलकर्ण व जोसपण तेथील वतनदारांचें नकल झाल्यामुळें गांवकरी मुतालिक ठेवून त्याजकडून चालवीत होते. पण त्यांना कायमचे इसम त्या कामाकरितां पाहिजे होते. यासाठीं निळो सोनदेव व आबाजी सोनदेव या दोघा भावांना रायगडाहून बोलावून आणून घर देऊन तें वतन त्यांच्या स्वाधीन गावकऱ्यांनीं केलें. त्याशिवाय त्यांस दहा बिघे जमीनहि दिली व त्याबद्दल त्या उभयतांकडून १५० होन घेतले. " यावर कोणी असें विचारील कीं आबाजी हा जर सुभेदारासारख्या उच्च पदावर होता तर त्यानें हें क्षुल्लक वतन खरेदी केलें कसें ? त्याचें उत्तर एवढेंच कीं त्या काळीं वतनाची मातब्बरी सर्वांनाच विशेष वाटत असून त्यामुळें मोठीं माणसेंहि तें संपादण्याकरितां प्रयत्नांची शिकस्त करीत.

यापासून आबाजी सुभेदारीवर असल्याचें कबूल केलें तरी आबाजीनें कल्याणावर स्वारी केव्हां केली हा प्रश्न उरतोच. ग्रँट डफ् म्हणतो कीं, शिवाजीनें मुलाणा अहमदाला शके १५७०त ( इ. स. १६४८ ) लुटलें; पण ग्रँट डफ्चें हें विधान उपलब्ध माहितीवरून चुकीचें दिसतें. कारण इ. स. १६४८ पर्यंत शिवाजीचें आक्रमण पुण्याच्या मावळ भागापलीकडे झालेंच नव्हतें. त्यानें कल्याण, भिवंडी हा प्रदेश इ. स. १६५७च्या सुमारास जिंकून घेतला. त्यावेळींच कल्याणच्या मुसलमान स्त्रीची कथा घडली असली पाहिजे. आणि चिटणिसासारख्या साधनसंपन्न बखरकारानें ती दिली असल्यामुळें विश्वसनीय समजण्यासहि हरकत नाहीं. शिवाजीपाशीं नाटकशाळा असत म्हणूनच आबाजी त्यास ती नजर करण्यास प्रवृत्त झाला. एरव्ही नाटकशाळा ठेवण्याच्या तो विरुद्ध असता तर आबाजी तसें करण्यास धजलाच नसता. पण शिवाजीस त्याची उच्च नीतिमत्ता लक्षांत घेतां कोणाहि बऱ्या

गृहस्थाची सून वा कन्या सुंदर म्हणून जबरदस्तीनें धरून आणून आपल्या अन्तःपुरांत कोंबणें केव्हांहि मान्य होण्यासारखें नव्हतें. त्याजपाशीं नाटकशाळा असतील तर त्या आपखुषीनें आलेल्या असल्या पाहिजेत व ती स्त्री मल्हाररावावर विश्वासून, सुभेदाराची कन्या नसून सून असली पाहिजे. अर्थात् महाराजांनीं तिचा स्वीकार केला नाहीं हें त्यांच्या थोर दानतीस उचितच होय.

## प्रकरण पांचवें

# शिवाजीचें व्यक्तिमत्त्व

### राजकीय धोरण

शिवाजीचें राजकीय धोरण त्याच्याभोंवतीं जीं राज्यें पसरलीं होतीं त्यांच्या धोरणाशीं सुसंगत असेंच होतें. त्याचें विशदीकरण सोनोपंत डबीर यांनीं शिवभारतांत शिवाजीशीं झालेल्या संवादांत केलें आहे. शहाजीनें आपल्या सुटकेकरितां सिंहगड सोडून देण्याची अट शिवाजीवर लादली याचा शिवाजीस राग येऊन तो शहाजीस दोष लावूं लागला, त्या वेळीं सोनोपंतानें त्यास केलेल्या बोधांत तत्कालीन राजकारणाचें सार उतरलें आहे. शिवाजीचे प्रधान नुसतेच मुत्सद्दी नसून विद्वान्हि असत. सोनोपंत डबीर हा शिवाजीस राजकारण शिकविण्याइतक्या तोलाचा अधिकारी पुरुष दिसतो. बंगलुराहून शिवाजीबरोबर जे मंत्री शहाजीनें पाठविले त्यांपैकीं हा होता. त्यानें शिवाजीस केलेल्या उपदेशांत त्याचा शहाजीवरील रागाबद्दल निषेध करण्यास मागें-पुढें पाहिलें नाही. कारण तो शिवाजी-पेक्षां वयानें व ज्ञानानें फार मोठा होता. सुवर्णशर्मा शिवाजीस म्हणाला –

" आपणांहून अधिक सामर्थ्यवान् शत्रूस खंडणी द्यावी. शत्रु बरोबरीचा असेल तर त्याच्याशीं सलोखा करावा. शत्रु आपणांहून कमी सामर्थ्यवान् असल्यास त्याचें दंडन करावें. भेद हा उपाय असा आहे कीं तो आपल्या-

हून प्रबळ, निर्बळ वा समबळ अशा कोणाहि शत्रूविरुद्ध अमलांत आणावा. कारण भेदानें बरोबरीचा शत्रु दिवसानुदिवस कमी सामर्थ्यवान् होत जातो व आपल्यामागें पडतो, अधिक सामर्थ्यवान् बरोबरीस येतो. समबळ वा प्रबल शत्रूच्या बाबतींतच तेवढा भेद उपयुक्त आहे असें नव्हे तर कमी सामर्थ्यवानाविरुद्धहि भेदनीति वापरावी. कारण आज जो शत्रु दुर्बल आहे तो उद्यां प्रबळ, व प्रबळ शत्रु दुर्बल होण्याचा संभव कालमाहात्म्यानें उत्पन्न होतो." शिवाजीनें मोगल, विजापूरकर, मोरे, सावंत इत्यादिकांविरुद्ध वरील प्रयोग अनेकवार करून यश मिळविलें.

आपल्या सैन्यांत स्त्रिया, वेश्या यांना बरोबर घेण्याचा शिवाजीनें प्रतिबंध केला होता, तशी मद्यपानासहि त्याची बंदी होती. कारण सुवर्णशर्मा सांगतो, 'स्त्रिया या पुरुषाची शक्ति हरण करतात आणि मदिरासेवनानें बुद्धीला भ्रम उत्पन्न होऊन राजकारण नासतें. राजा कद्रु असतां कामा नये. कारण प्रसंग पाहून पाण्यासारखा पैसा खर्चण्यास राजानें तयार असलें पाहिजे.' म्हणून शिवाजीनें सढळ हातानें शूरांना बक्षिसें दिलीं व नोकरवर्गास योग्य तनखा देऊन संतुष्ट ठेवलें.

"राजानें कठोर भाषण करूं नये. त्यामुळें मनुष्याचीं मनें बिथरून ते शत्रु बनतात. कठोर भाषणाप्रमाणें कडक शासनहि एकंदरींत वर्ज्य होय. त्यानें राजाची अपकीर्ति होऊन प्रजेंत असंतोष पसरतो. राजानें आळसाचा त्याग करावा व व्यसनासक्तहि नसावें. आळसानें कार्यनाश होतो. काम वेळेवर न केल्यामुळें नुकसान होतें. आणि मद्य, वेश्या वा जुगार यांच्यापायीं द्रव्यहानि झाल्यानें राजाला लक्ष्मी सोडून जाते." शिवाजी निरलस व सततोद्योगी असल्याबद्दल युरोपियन लेखकांनींहि त्याचीं स्तुतिस्तोत्रें गाइलीं आहेत आणि व्यसन तर त्याला काडीचेंहि नव्हतें.

"राज्याचें सामर्थ्य सात ठिकाणीं विभागलें आहे. त्या सात अंगांत राजा हें सर्वश्रेष्ठ अंग होय. त्यानंतर त्याचे मंत्री, मित्र, विपुल धन, राष्ट्र, गड व सैन्य यांचा क्रम लागतो. राज्याची मानवी शरिराशीं तुलना करावयाची झाल्यास राजा हें मस्तक आहे, मंत्री हें मुख आहे, धन व सैन्य हे भुज आहेत, राष्ट्र हें शरीर आहे, मित्र हे शरिरांतील सांधे आहेत व दुर्ग ही शरिराची मजबूत हाडें आहेत."

"धर्म हा राज्याचा आत्मा आहे, मसलत हा प्राण आहे. नीति हें बळ, अनीति हें दौर्बल्य, यथोचित दंड हें शौर्य, शत्रूला बेफाम होऊं देणें हा अधर्म, आपसांतील फूट हा मद, दृढैक्य हें दीर्घायुष्य, लोकरंजन हा राज्याचा उत्कर्ष, दूरदर्शित्व ही दृष्टि, प्रताप हें उज्ज्वल रूप, शस्त्र ही विमल बुद्धि, बलवानाशीं वैर हें विघ्न, बेसावधपणा ही निद्रा व सावधानता ही जागृति होय."

## दुर्गाची दुर्गमता

इतकें सांगून सुवर्णशर्म्यानें शिवाजीला सावधगिरीचा इशारा दिला. तो त्याला म्हणाला, "आदिलशहा व दिल्लीचा बादशहा हे दोन शत्रु प्रबळ असल्यानें ते केव्हां तुमचा घात करतील याचा नेम नाहीं. यासाठीं त्यांच्या हातीं एकाएकीं तुम्ही लागणार नाहीं अशा ठिकाणीं राहत जा. असें दुर्गम स्थान म्हणजे दुर्ग होय. तेथें राहून जग जिंकण्याचा प्रयत्न करा. दुर्गाला केवळ तो दुर्ग म्हणून लोक दुर्ग मानीत नाहींत तर त्याचा स्वामी दुर्गम म्हणजे हातीं लागण्यासारखा नसला पाहिजे हीच दुर्गाची खरी दुर्गमता होय. तुमचे जे दुर्ग आहेत ते सर्व ज्या योगें दुर्गम होतील असे ताबडतोब करा. म्हणजे त्यांची तटबंदी व दरवाजे भक्कम करा."

हें सर्व श्रवण करून शिवाजीनें आपल्या कर्तव्याची रूपरेखा येणें-प्रमाणें थोडक्यांत सांगितली—"ही देवी वसुंधरा खरोखर धर्माच्या योगानें धारण केली जाते. धर्माचें रक्षण देव करतो. देवांचें रक्षण ब्राह्मण करतात. म्हणून सर्व लोकांचा आधार जे ब्राह्मण त्यांचें सर्व प्रयत्नानें पालन व पूजन केलें पाहिजे. देव, ब्राह्मण व गाई यांचें पालन मीच (विष्णु) प्रतियुगीं अवतार घेऊन करतों."

परमानंदानें ज्या शब्दांनीं राजधर्म सांगितला आहे तेच शब्द शिवाजीनें उच्चारले असोत वा नसोत, पण त्यांचा मथितार्थ हा कीं राष्ट्राचा पाया धर्म आहे. देवालयें व त्यांतून चालणारी पूजा-अर्चा, कथा-कीर्तनें व पुराणें या योगें धर्माचें रक्षण होतें आणि हीं कार्यें ब्राह्मण करीत असल्यामुळें ब्राह्मण हेच देवांचे रक्षक होत. यासाठीं देव व ब्राह्मण आणि संसारोपयोगी गोमाता यांचें पालन मी करीन अशी ग्वाही शिवाजीमहाराज देत आहेत.

जें काम करावयाचें तें पद्धतशीर रीतीनें व चोख करावयाचें असा शिवाजीचा शिरस्ता होता, मग तें काम राज्यकारभारापैकीं असो वा लुंठनासारखें असो. लुंठन ( लूट ) अटळ आहे, तर मग तें नियमबद्ध व व्यवस्थितपणें केल्यानेंच खरें लाभप्रद होईल हें शिवाजी जाणून होता व त्यांत कांहीं पातक नाहीं याविषयींहि त्याच्या पंडितांनीं त्याची खात्री शास्त्राधारें करून दिली होती.

## लुटीचें समर्थन

शिवाजी शत्रूंचीं नगरें लुटीत असे व त्याच्या मुलुखांत शिरून जाळ-पोळहि करीत असे. त्या काळीं हा प्रकार पाश्चात्त्य देशांतील राजे करीत असले तरी तो कितपत न्यायास धरून आहे याविषयीं पुष्कळांचीं मनें साशंक असतात. या प्रकाराच्या युक्तायुक्ततेची मीमांसा महाभारताच्या शांतिपर्वांत व शुक्रनीतींतहि केली आहे. सर्व सामान्य जनतेच्या नीतीहून राजनीति कित्येक बाबतींत कांहींशी वेगळी असते. सर्व राजे सारख्या दर्जाचे नसतात. कांहीं दुर्बल असतात व कांहीं प्रबल असतात. राजांची स्थिति सर्वकाळ सारखी नसते. सामान्य लोकांप्रमाणें त्यांनाहि विपन्ना· वस्था प्राप्त होते. तिचा विचार करतांना जगाला चकित करून सोडण्या-सारखीं मतें वरील ग्रंथांत प्रतिपादलीं आहेत. शिवाजीची गांठ मोगल व विजापूरकर या प्रबल राज्यकर्त्यांशीं पडली असून त्यांजपासून त्याला स्वसंरक्षण करावयाचें होतें, तसेंच त्यांजपासून मुलूख जिंकून आपला राज्य-विस्तारहि करावयाचा होता. या अडचणींत सांपडलेल्या राजानें कोणता मार्ग अवलंबावा याचें विवेचन शांतिपर्वांत करण्यांत आलें आहे.

त्यांत म्हटलें आहे, "राजानें शत्रूच्या प्रदेशांत शिरून गौळवाडे उद्ध्वस्त करावे, गांवें उजाड करावीं आणि धनिक व बलवान् यांना चुचकारून धन हरावें आणि ज्या प्रदेशांत प्रवेश अशक्य होईल तो प्रदेश जाळून टाकावा; इतकेंच काय पण शेतांतील धान्य जाळावें, तलावादि जलाशय फोडावे व तें न जमल्यास त्यांत विष घालावें. राज्यरक्षण हा राजाचा मुख्य धर्म आहे. तो पाळतांना त्यानें नित्याच्या न्यायान्यायाचा विचार करतां कामा नये. त्यानें आपला कोश रिता पडला तर प्रजेचें द्रव्य घेऊन तो भरून काढावा आणि काल अनुकूल आल्यावर प्रजेचें झालेलें नुकसान भरून द्यावें.

शुक्रनीति म्हणते –

> विना परस्वहरणान्न कश्चित्स्यान्महाधनः ।
> मायया तु विना तद्धि न साध्यं स्याद्यथेप्सितम् ।
> स्वधर्मं परमं मत्वा परस्परहरणं नृपाः ॥
> (शुक्रनीति अध्याय ५ वा, श्लोक ३३।३४)

अर्थ – परधन हरण केल्यावांचून कोणीहि धनाढ्य होत नाहीं. हें धन कपटावांचून साध्य व्हावयाचें नाहीं. यास्तव राजांनीं राजधर्म हा श्रेष्ठ समजून प्रसंगीं परधनहरण करण्यास सिद्ध व्हावें.

शिवाजीनें नगरें लुटलीं व जाळलीं तीं या राजधर्मास अनुसरूनच होय.

## मुत्सद्दीपणा

युद्धकर्म हें ब्राह्मणांचें कर्तव्य नव्हे. तरीहि पुराणकालांत व मध्ययुगीन हिंदुराज्यांत ब्राह्मणांनीं क्षात्रवृत्ति स्वीकारल्याचीं अनेक उदाहरणें आहेत. देवगिरीच्या यादव राजांचे सेनापति ब्राह्मणच होते. तथापि चातुर्वर्ण्यदृष्ट्या ते अपवाद समजले पाहिजेत. परंतु विशिष्ट कालांत उच्चपदीं चढण्याचें शौर्य हेंच मुख्य साधन समजलें गेल्यावर ब्राह्मणांपैकींहि कित्येकांना तरवार गाजविण्याची उमेद उत्पन्न होत असे. शिवाजीच्या अष्टप्रधानांपैकीं पंडितराव व न्यायाधीश हीं दोन पदें सोडल्यास बाकीच्या पदाधिकाऱ्यांना आपलें मुख्य कर्तव्य करून युद्धप्रसंगासहि सिद्ध राहवें लागत असे. अशांपैकींच मोरोपंत पेशवे हे असून ते मोठमोठ्या मोहिमांवर सेनापति या नात्यानें स्वतः जात असत. त्यांच्या या दुहेरी कर्तबगारीमुळें त्यांस शिवाजीच्या सहकाऱ्यांत अनन्य साधारण महत्त्व प्राप्त झालें. तें पाहून ज्यांच्या अंगांत तीहि धमक होती अशा इतर प्रधानांना त्यांचा हेवा वाटूं लागून आपणाहि मोरोपंतांची बरोबरी कां करूं नये हा विचार त्यांच्या मनांत वावरूं लागला. या वृत्तीचे निळो सोनदेव मुजुमदार ऊर्फ अमात्य हे होते. अमात्यपद निळोपंताकडे इ. स. १६६५ पासून होतें. सर्व राज्यांतील जमा-खर्च खातें त्यांजकडे होतें. ह्याशिवाय युद्धप्रसंग करणें व तालुका जतन करणें हींहि त्यांचीं कामें होतीं, पण तीं गौण होतीं. तरी पण मोरोपंतांचा

वर्चष्मा पाहून त्यानेंहि शिवाजीमागें आपणांस मोहिमेवर पाठविण्याचें टुमणें लावलें. शिवाजीला प्रश्न पडला कीं, निळोपंतास या कामगिरीवर पाठविल्यास त्याचें काम कोण करणार? म्हणून त्यानें त्याची समजूत घातली. तो पत्रव्यवहार उद्बोधक व शिवाजीच्या चातुर्याचा निदर्शक असल्यामुळें वाचनीय आहे.

शक १५९२ भाद्रपद

इ. स. १६७० ऑगस्ट-सप्टेंबर.

राजश्री निळोपंत मजमूदार यांस वतनीचा कारभार करावयास ठेविलें. माहुलीपासून भीमगडपावेतो व इंदापूर, पुणें, चाकण कदीम वतनीचा कारभार करावा. यांसी पंडित मशारइलेनें साहेबासी अर्ज केला कीं,–"आजी कामाचे दिवस आहेत. वतनीचा कारभार आणीक कोणास सांगावा. आपण बराबरी येऊन दहा लोक कामें करतील तैसी करून देऊं." त्यास साहेबीं उत्तर दिधलें कीं, वतनी रहाणें हेंहि काम थोर आहे. वतनी रहाणें, येथें तुम्हास बक्षीस इमारती पैके पावतील त्यास दर सदे होन २ दोनीप्रमाणे पावतील. ऐसे साहेब बोललियावरी पंडित मशारइले बोलले कीं "जरी वतनीचेंहि काम थोर आहे तरी बहुत बरें. एकानें सिद्ध संरक्षण करावें. एकानें साध्य करावें. दोन्ही कामें साहेब बरोबरीनें मानिताती. तरी आपण वतनी राहीन. परंतु इमारतीचे पैके पाठवून बक्षीस घेणार नाहीं. मोरोपंत त्रिंबक, शिवनेर येथें पाठविले आहेत. ते गड घेतील, व मुलुक घेतील, कामें करतील. साहेब थोर कामासी जाताती; तें काम श्रींचे कृपेनें होऊन येईल. त्या राजश्री मोरोपंतास मेहेरबानीनें पंचवीस फुलें दिधलीं तरी आम्हांसहि वीस फुलें द्यावीं. ऐसा साहेबीं निश्चय केला पाहिजे."

"त्यावरी साहेबीं ऐसाच तह दिधला कीं वतनी राहोन कारभार करावा. इमारतीचे पैके पाववून बक्षीस न घ्यावें. राजश्री मोरोपंत काम करतील, गड घेतील, पैके मिळवितील. सुरगिरीचा (त्र्यंबक) प्रयत्न करून घेतील. त्यास मेहेरबान होऊन पेशवे आहेत याकरितां पंचवीस फुलें दिलीं तरी तुम्हास मजमूच्या कायद्यानें वतनीचें काम व तें काम बरोबरीचें ऐसें समजोन त्यास द्यावी तेच वर्त्ती तुम्हांसहि वीस फुलें पाठवावीं. या

हिशेबानें जैसें त्यास पावेल तैसें तुम्हांस देऊं ! ऐसा साहेबी निश्चय करून पंडित मशारइलेस वतनीचा कारभार करावयास ठेविलें असे. पंडित मशारइलेनेंहि सदरहूप्रमाणें मान्य केलें असे. मोर्तब खुद ( मर्यादेयं विराजते )" ( प. सारसंग्रह, पृ. ३७१।३७२ ).

### डोळस मातृभक्ति

शिवाजी लहानपणीं मातेच्या आज्ञेंत वागत असे हें स्वाभाविक होय. परंतु तो मोठा होऊन स्वतंत्र राजा या नात्यानें राज्यकारभार पाहूं लागल्यावर कित्येक प्रश्न असे उपस्थित होत कीं ते जिजाबाईच्या आटोक्याबाहेरचे असत. अशा प्रश्नांत त्या जर ढवळाढवळ करूं लागल्या तर सारी मसलत फसण्याचा संभव असे. म्हणून महाराजांनीं असें ठरविलें कीं, 'त्यांनीं कारभारांत बोलूं नये. कदाचित् उत्तम गोष्ट बोलणें तरी आग्रह न करतां महाराजांची मर्जी पाहून विनंती मात्र करावी. करणें न करणें पाहून महाराज करतील तसें मर्जीनें आज्ञेनें वागावें. याप्रमाणें धारा करून दिल्हा.' हा राजकीय विषय सोडल्यास इतर बाबतींत त्यांची व्यवस्था उत्तम ठेवण्यांत आली होती. 'मातुश्री जिजाबाईसाहेब यांचे खासगीचे लोक, सेवेचे व शिबिका व पुराणिक, नित्यदान वगैरे धर्म करणें यास खासगी खर्च पाहिजे तसा नेमून देऊन त्यांस दिवाण कारभारी करून दिले. चार महाल यास लोक व सेवेचे लोक व बायका व खाजगी खर्च वगैरे यांची नेमणूक करून देऊन त्याजप्रमाणें तनखा लावून देऊन दिवाण एक व दरखदार चिटणीस, फडणीस यांजकडील कारकून नेमून देऊन पुराणिक ब्राह्मण ऐसे निराळे बंदोबस्त करून राजधर्माप्रमाणे खोजे व सेवेच्या बायका यांच्या चौक्या केल्या. पुराणिक यांजपासून नित्यपुराण, स्त्रियांचे धर्म, पातिव्रत्य धर्म व इतिहास श्रवण करावें ऐसें करविलें' (चिटणीसकृत शिवचरित्र, पृ. १७२–७३ ).

### कडक शिस्त

फिरंगोजी नरसाळा हा शहाजीच्या वेळेपासून भोसल्यांच्या सेवेंत होता. त्यास त्यानें चाकणच्या किल्ल्यावर हवालदार नेमलें होतें. शाइस्ताखानानें चाकणच्या किल्ल्यास वेढा घातला असतां फिरंगोजीनें तो मोठ्या शौर्यानें लढविला. पण शेवटीं त्याचा शाइस्तेखानापुढें टिकाव न लागून त्याला खानास शरण जाणें भाग पडलें. तेव्हां खानानें त्याजवर खूष होऊन त्यास

मोगलांच्या पदरीं राहण्याचा आग्रह केला; पण नरसाळा यानें महाराजांच्या मिठास जागून मोगलांची सेवा करण्याचें नाकारलें. तें पाहून शाइस्ताखानास त्याजविषयीं अधिकच आदर वाटूं लागला. शाइस्ताखान त्यास म्हणाला, ‘ शिवाजीनें जर तुला चाकरीस न ठेवलें तर तूं माझ्याकडे ये. ’ त्यानंतर फिरंगोजी चाकणचा किल्ला कां खालीं करून द्यावा लागला याचीं कारणें सांगण्यास शिवाजीकडे गेला. शिवाजीस फिरंगोजीचें हें वर्तन आवडलें नाहीं. त्याला वाटलें यवनांशीं लीनतेनें वागून एक एक सेनापति जर शरण जाऊं लागला तर राज्य टिकेल कसें ? यासाठीं फिरंगोजीवर महाराजांची मर्जी खप्पा होऊन त्यांनीं त्याला घरीं बसावयास सांगितलें.

त्यामुळें फिरंगोजी साहजिकच मनांत खट्टू झाला. त्याच्यासारख्या शूरास घरीं माशा मारीत स्वस्थ बसणें कसें रुचणार ! तो परत शाइस्ता-खानाकडे गेला. त्यास खानानें पांचशें लोकांनिशीं आपणापाशीं ठेवून घेतलें व चाकण परगण्यांतील मरकळ गांवीं त्या ठाण्याच्या बंदोबस्तास पाठविलें. ही बातमी महाराजांस समजतांच असा मातबर माणूस मोगलांकडे गेला याची चुटपुट लागून त्यांनीं त्याची समजूत घालण्याकरितां नेताजी पालकरास पाठविलें. त्यानें जाऊन फौजेसह त्यास धरून आणलें आणि अशी बेइमानी पुनः करणार नाहीं अशी देवतेची त्याजकडून शपथ घेऊन खानापूर तालुक्यांत भूपाळगडाचा हवालदार नेमून रवाना केलें.

महाराजांनीं भूपाळगडावर फिरंगोजीची नेमणूक कां केली याचा खुलासा करणें जरूर आहे. त्याचें कारण असें कीं शहाजीचें लग्न तुकाबाईशीं झालें. या वेळीं विजापूरच्या बादशहानें शहाजीस कासेगांव, आटपाडी व खानापूर हीं गांवें पागेकरितां आहेर म्हणून दिलीं. त्यांतच भूपाळगड आला असावा व तो प्रदेश शहाजीची पुणें प्रांतांतील जहागीर शिवाजीकडे वहिवाटीस आली त्या सुमारास मिळाला असावा. त्यानंतर कांहीं वर्षांनीं संभाजी शिवाजीविरुद्ध दिलीरखानास मिळून भूपाळगड घ्यावयास गेला. त्या वेळीं संभाजीवर म्हणजे आपल्या धन्याच्या पुत्रावर शस्त्र कसें उचलावें असा प्रश्न पडून त्यानें तो किल्ला संभाजीच्या ताब्यांत दिला व आपण शिवाजीस भेटावयास गेला. शिवाजीला या कृत्याचा राग आला. चाकणा-नंतर फिरंगोजीची ही दुसरी चूक. ‘ संभाजी आपला लेक झाला, म्हणून

काय झालें ! तो शत्रूस मिळाल्यानंतर त्यास शत्रु समजून त्याजबरोबर फिरंगोजीनें जिवावर उदार होऊन लढावयास पाहिजे होतें. तसें न करतां तो पळून आला,' याचा संताप येऊन शिवाजीनें आपल्या सर्व सैनिकांस धडा घालून देण्याकरितां त्याला तोफेच्या तोंडीं दिलें (श्रीशिवदिग्विजय).

## धार्मिक धोरण

शिवाजीचें धार्मिक धोरण उदार होतें. तो मुसलमानांचा परकीय राज्यकर्ते या नात्यानें जरी द्वेष्टा होता तरी त्यांच्या धर्माचा द्वेष्टा नव्हता. त्याचा प्रतिकार धार्मिक चढाईचा नसून स्वधर्मरक्षणासाठी होता. म्हणून एकदा मुलूख जिंकला व त्यांतील सर्व प्रजा अंकित झाली म्हणजे हिंदु, मुसलमान व इतर धर्म यांना तो समभावानें वागवीत असे. याचा अर्थ त्याचें राज्य निधर्मी होतें असा नव्हे. निधर्मी याचा अर्थ कोणत्याहि धर्माचा राजाला अभिमान नाहीं व राजा कोणत्याहि धर्माचा नाहीं असा होतो. शिवाजीचें राज्य त्या प्रकारचें नव्हतें. तो हिंदु धर्माचा कट्टा अभिमानी असून त्या धर्माच्या उत्कर्षाकरितां सर्व प्रयत्न करीत असे. पण ते करीत असतां इतर धर्मीयांचा उच्छेद करीत नव्हता वा त्यांच्या धर्माचरणास विघ्नेंहि आणीत नव्हता. मुसलमानी राज्यांत मुसलमानांना व पोर्तुगीज राज्यांत ख्रिस्त्यांना जीं वतनें व उत्पन्नें चालू होतीं तीं त्यांजकडे अबाधित ठेवून त्यानें त्यांचा संतोष राखला.

सभासद लिहितो – "देव-देवस्थानांस दिवाबत्ती, नैवेद्य, अभिषेक, स्थान पाहून (शिवाजीनें) यथायोग्य चालविलें, विद्वान, वेदशास्त्रसंपन्न ब्राह्मण, ज्योतिषी, अनुष्ठानी, तपस्वी, गांवोगांवीं सत्पुरुष पाहून अन्नवस्त्र त्यांचें कुटुंब पाहून गांवचे गांवीं वा महालीं (महालाच्या कचेरींत) नेमून दिलें. ब्राह्मणांनीं तें अन्न भक्षून स्नानसन्ध्या करून राजियासी कल्याण चिंतून असावें."

मुसलमानांच्या बाबतींत त्याचें धार्मिक धोरण खालील पत्रांत स्पष्ट झालें आहे (श. १५७९ श्रावण शु. १५, इ. स. १६५७ ऑगस्ट १३).

"अजर शिवाजी राजे – कारकून व देशमुख तपे खेडे बारें यांस इनामदार तपे मजकूर यांनीं हुजूर येऊन सांगितलें कीं आपणास तपे मजकुरीं इनाम हिंदु-मुसलमान जमीन चावर व रोजमुरे व रोषनाई आहे; यांस साहेबांचे

कारकून माहालास आले आहेत. ते साहेबांचे खुर्दखताचा उजूर करतात. साहेबी मेहेरबान होऊन खुर्दखत देविलें पाहिजे म्हणून. यावर साहेबांचा हुकूम असा कीं तपे मजकुरीं इनामदार हिंदु व मुसलमान यांसी तपे मजकुरीं जमीन चावर व रोजमुरे रोषनाई असेल तें जैसे सालगुदस्त चालिलें असेल तेणेप्रमाणें सालमजकुरींहि चालविणें. उजूर न करणें " ( प. सा. सं. खंड १, पृ. १६० ).

सरंजामी वटहुकूम ( श. १५८२ मार्गशीर्ष व. ११, इ. स. १६६० डिसे. १८ ) पुणें व इंदापूर व चाकण, सुपें, बारामती ऐसे इनाम हिंदु व मुसलमान यांसी आहेत. त्यास पेशजी आपणास ( शिवाजीस ) मुकासा असतां अफजलखानाआधी जेणेप्रमाणे तसलमाती ज्यास जें पावत असेल त्यास तेणेप्रमाणें देणें. ऐसा तह केला असे ( प. सा. सं. खंड १ पृ. १९६ ).

## शिवाजीचें सौहार्द

मनुष्याच्या अंतरंगाचा ठाव त्याच्या खासगी वर्तनांत व खासगी पत्रव्यवहारांत लागतो. शिवाजीला राजकारणांत कितीहि कठोरपणा दाखविणें भाग पडलें तरी मनाचा तो कसा ममताळू होता याची कांहींशी कल्पना त्यानें कान्होजी जेध्यास लिहिलेल्या पत्रानें येते.

शक १५८२ भाद्रपद शु. ८

इ. स. १६६० सप्टेंबर २

म॥ अनाम कान्होजी जेधे देशमुख ता. भोर, किले रोहिडा प्रति राजश्री शिवाजी राजे – तुम्ही कागद पाठविला तेथे समाचार तपशीलवार लिहिला. लिहिलेप्रमाणें कळो आलें. दिवसाचे १५–२० वेग होताती व रात्रीचे तैसेच. व्यथा बहुत म्हणून लिहिलें तरी औषध घेऊन शरीरासी आरोग्य होय तें करणें. उपचाराचे विषयीं आळस न करणें. ईश्वराचे कृपेकरून बरेच होईल. तुम्ही लिहिलें कीं आपलीं मुलें सहा जण व देशमुखी साहेबाच्या पायापाशी आहे, त्यांचा सांभाळ केला पाहिजे. तसें आता नवें लिहिणें काय लागलें! पहिलेचपासून तुम्हां-आम्हांत घरोबा आहे. जैसा सांभाळ करतां येईल तसा करूं. मूल व स्वार साहेबाच्या पायापाशी पाठवावयाचे, पण व्यथेकरितां पाठवितां येते नाहींत म्हणोन तुम्ही लिहिलें. तरी व्यथा बरी जाहालियावरी

त्यांस पाठवावें. व्यथा बरी होय तोवरी आपल्याजवळ असो देणें. व्यथा बरी होय तें करणें ( शि. च. सा. खं. ५, पृ. १४ ).

भाद्रपदाचा महिना म्हणजे पावसाळा. तशांत भोर हा मावळी भाग त्याच्या पलीकडचा रोहिडा किल्ला, त्यावरची पावसाळ्यांतील हवा काय विचारावी ! अतिशय सर्द. त्यामुळें उतार वयाचा कान्होजी अमांशानें आजारी पडून फारच हैराण झाला. त्या काळांत वैद्य क्वचित् असावयाचा. त्यानें औषध दिलें तरी त्याचा हल्लींच्या डॉक्टरासारखा त्वरित गुण थोडाच यावयाचा ! अशा स्थितींत कान्होजीनें जिवाची आशा सोडलेली दिसते. त्याला चिंता हीच कीं आपल्यामागें आपल्या पोराबाळांचें कसें होईल ! महाराजांनीं देशमुखीचें वतन त्यांजकडे न चालविलें तर त्यांचा चरितार्थ कसा चालेल ? म्हणून त्यानें काकुळतीला येऊन शिवाजीपाशीं पदर पसरलेला दिसतो. त्यास शिवाजीनें दिलेलें उत्तर किती ममतेनें ओथंबलेलें आहे ! त्याचें सार एकाच वाक्यांत आहे, 'आता नवीन तें काय लिहावयाचें ! तुमचा आमचा घरोबा जुना आहे.'

### बंधुप्रेम

कर्नाटकांतील स्वारी आटोपल्यावर व व्यंकोजीची सर्व जहागीर त्याची त्यास दिल्यावर शिवाजी त्याजबरोबर फारच प्रेमानें वागूं लागला व त्यास वडील बंधु या नात्यानें उपदेश करूं लागला. शिवाजीस कळलें कीं, व्यंकोजीच्या ठिकाणीं वैराग्य उत्पन्न होऊन तो राज्यकारभारांत लक्ष घालीनासा झाला व राज्यवृद्धीचे प्रयत्न करीनासा झाला. तेव्हा त्यानें त्यास पाठविलेलें पत्र उपदेशपर व बिनमोल आहे. त्यांत राजधर्म म्हणजे काय याचें त्यानें सांगितलेलें मर्म लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

श्री

" श्रियासह चिरंजीव अखंडित लक्ष्मी अलंकृत राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री महाराज व्यंकोजी राजे प्रति राजश्री शिवाजी राजे आशिर्वाद. येथील क्षेम जाणोन स्वकीय कुशल लेखन करणें विशेष :- कित्येक दिवस जालें तुमचें पत्र येत नाही. याकरितां समाधान वाटत नाही. सांप्रत राजश्री रघुनाथपंती लिहिलें कीं तुम्ही आपले ठायीं उदासवृत्ति धरून पहिलेसारखे आपलें शरीरसंरक्षण करीत नाही. सणवार उत्सवादिक हेंहि

कांहीं करीत नाहीं. सेना बहुत आहे. परंतु उद्योग करून कार्यप्रयोजन करवावें हेंहि कांहीं करीत नाहीं. वैराग्य धरिलें आहे. एखादे तीर्थाचे ठायीं बसून कालक्रमणा करूं, ऐशा गोष्टी सांगतां म्हणोन विस्तारें लिहिलें होतें. तरी या गोष्टी आम्हास बहुत अपूर्व वाटल्या कीं, कैलासवासी स्वामींनीं कसे कसे प्रसंग पडले ते निर्वाह करून यवनांच्या सेवा करून, आपल्या पुरुषार्थे बाजी सावरून, उत्कर्ष करून घेतला. शेवट बरा निर्वाह केला. तें सर्व तुम्ही जाणतां. त्यांच्या साहाय्यतेस त्यांच्या बुद्धियुक्ति सर्वहि तुम्हांस उपतिष्ठोन त्यापासून शहाणे जाले आहां. त्या उपरी आम्हीहि जे जे प्रसंग पडले ते निर्वाह करून कोणे तऱ्हेनें राज्य मिळविलें हें जाणतां व देखत आहां. असें असोन तुम्हाला असा कोणता प्रसंग पडला जे इतक्याच्याचमध्ये आपल्या संसाराची कृतकृत्यता मानून नसतें वैराग्य मनावरी आणून कार्यप्रयोजनांचा उद्योग सोडून, लोकांहातीं रिकामेपणीं द्रव्य खाऊन नाश करवणें व आपल्या शरिराची उपेक्षा करणें हें कोण शहाणपण व कोणती नीति? व आम्ही तुम्हांस वडील मस्तकीं असतां चिंता कोणे गोष्टीची आहे? या उपरी सहसा वैराग्य न धरितां मनांतून विषण्णता ( काढून ) कालक्रमणा करीत जाणे. सणवार उत्साह पूर्ववत् करीत जाणे. जमेती सेवक लोकांना रिकामें न ठेवून, कार्यप्रयोजनाचा उद्योग करून त्यांपासून सेवा करून पुरुषार्थ कीर्ति अर्जणें.

तुम्ही त्या प्रांतें पुरुषार्थ करून संतोषरूप असलिया आम्हास समाधान व श्लाघ्य आहे कीं कनिष्ठ बंधु असे पुरुषार्थी आहेती. रा. रघुनाथ पंडित त्या प्रांतीं आहेती. ते कांहीं इतर नव्हेती. आपले पुरातन. तुम्हासीं कोणे रीतीनें वर्तावें हें निपुण जाणतात. आम्हास मानितात तसें तुम्हांस मानितात. आम्ही त्यांचे ठायीं विश्वास ठेविला आहे. तैसा विश्वास तुम्हीहि ठेवून कार्यप्रयोजनास परस्परें अनुकूल व साह्य होऊन वर्तत जाणे. पुरुषार्थ व कीर्ति अर्जणें. रिकामें बैसोन लोकाहातीं नाचीज खाववून काल व्यर्थ न गमविणें. कार्यप्रयोजनाचे दिवस हे आहेती. वैराग्य उत्तरवयीं कराल तें थोडें. आज उद्योग करून आम्हांसहि तमासे दाखविणें. बहुत काय लिहिणें. तुम्ही सुज्ञ असा" ( मोर्तब. मर्यादेयं विराजते ).

( इतिहाससंग्रह – तंजावरचें घराणं, पृ. ४२ ).

वरील पत्रांतील रघुनाथपंत म्हणजे रघुनाथ नारायण हणमंते यांना शिवाजीनें जिंजीचें राज्य घेतल्यावर त्याचा कारभार पाहण्यास नेमलें होतें. त्यांची सल्लामसलत घेऊन वागण्याचा त्यानें व्यंकोजीस उपदेश केला आहे.

## गुरुभक्ति

शिवाजीमहाराजांस कोणी सत्पुरुष भेटला कीं त्याजविषयीं पूज्यभाव वाटत असे. त्या सर्वांत त्यांची रामदासांच्या ठिकाणीं निस्सीम भक्ति होती. तिचें चित्र त्यांनीं चाफळ संस्थानास दिलेल्या सनदेंत सांपडतें.

श्री शक १६०० अश्विन शु १०

श्री सद्‌गुरुवर्य, सकलतीर्थरूप, श्रीकैवल्यधाम, श्री महाराजस्वामीचे सेवेसी.

चरणरज शिवाजीराजे यांनीं चरणावर मस्तक ठेऊन विज्ञापना जे. मजवर कृपा करून सनाथ केलें. आज्ञा केली कीं, ' तुमचा मुख्य धर्म राज्यसाधन करून धर्मस्थापना, देव-ब्राह्मणांची सेवा, प्रजेची पीडा दूर करून पाळण रक्षण करावें. हें व्रत संपादून त्यांत परमार्थ करावा. तुम्ही जें मनीं धराल तें श्री सिद्धीस पावील. ' त्याजवरून जो जो उद्योग सुरू केला व दुष्ट तुरुख लोकांचा नाश करावा, विपुल द्रव्य करून राज्यपरंपरा अक्षय चाले ऐसी स्थळें दुर्घट करावीं ऐसें जें जें मनीं धरलें तें तें स्वामींनीं आशीर्वादाप्रमाणें मनोरथ पूर्ण केलें.

याउपरीं राज्य सर्व संपादिलें. तें चरणीं अर्पण करून सर्व काळ सेवा घडावी ऐसा विचार मनीं आणिला. तेव्हां आज्ञा जाली कीं " तुम्हांस पूर्वी धर्म सांगितले तेच करावे. तीच सेवा होय. " ऐसें आज्ञापिलें. यावरून निकटवास करून, वारंवार दर्शन घडावें; श्रीची स्थापना कोठें तरी होऊन सांप्रदाय, शिष्यभक्ति विस्तीर्ण घडावी ऐसी प्रार्थना केली. तेहि आपमंतात् गिरिगव्हरीं वास करून, चाफळी श्रीची स्थापना करून सांप्रदाय शिष्य दिगंत विस्तीर्णता घडली. त्यास चाफळीं श्रीची पूजा, महोत्सव, ब्राह्मणभोजन, अतिथि इमारत सर्व यथासांग घडावें. जेथें जेथें श्रीच्या मूर्ति स्थापन जाहल्या तेथें उत्सवपूजा घडावी. यास राज्य संपादिलें त्यांतील ग्रामभूमि कोठें काय नेमावी ते आज्ञा व्हावी.

तेव्हा आज्ञा जाली कीं ' विशेष उपाधीचें कारण काय ! तथापि तुमचे

मनीं श्रीची सेवा घडावी हा निश्चय जाहला. त्यास यथावकाशें जेथें जें नेमावेसें वाटेल तें नेमावें व पुढें जसा सांप्रदायाचा व राज्याच्या वंशाचा विस्तार होईल तसें करीत जावें.' याप्रकारें आज्ञा जाहली. यावरून देशांत सांप्रदाय व श्रीच्या स्थापना जाहल्या, त्यास ग्रामभूमीचीं पत्रें करून पाठविलीं. श्रीसंनिध चाफळीं १२१ गांव सर्वमान्य व १२१ गांवीं आकरा विटे ( बिघे ) प्रमाणें भूमि व आकरा स्थळीं श्रीची स्थापना जाहली तेथें नैवेद्य, पूजेस भूमि, आकरा बिघेप्रमाणें नेमिली आहे. ऐसा संकल्प केला. तो परंपरेनें शेवटाचा न्यावा ऐसी आज्ञा जाहली. त्यावरून सांप्रत गांव व भूमि नेमिले. तपशील –

१ मौजे चाफळ, मौजे नाणेगांव ...... वगैरे गांवें ३३.

२ मौजे दहीफळ बुद्रुक परगणे ढवळी श्रीजेष्ठांचे समाधीकडे देहे ( गांव ) २.

३ गांवगन्ना जमीन बिघे ४१९.

धान्यगल्ला हरजिनसी खंडी १२१ एकूण बंदोबस्त सर्वमान्य गांव ३३ व जमीन बिघे गांव गन्ना ४१९ व कुरण एक श्रीचे पूजा उत्साहाबद्दल संकल्पांतील सांप्रत नेमलें व उत्साहाचे दिवसांस व इमारतीस नक्की ऐवज व धान्य समयाचे समयास प्रविष्ट करीन. येणें करून अक्षय उत्साहादि चालविण्याविषयीं आज्ञा असावी. राज्याभिषेक शके ५ कालयुक्ताक्षि नाम संवत्सरे अश्विन शुद्ध दशमी. बहुत काय लिहिणें हें विज्ञापना ( इतिहास मंजरी पृ. ९५ ते ९७ ).

शिवाजीमहाराजांनीं दिलेली ही सनद फार महत्त्वाची आहे. ती वाचून शिवाजी व रामदास यांचें साहचर्य स्वराज्यस्थापनेपासून वारंवार होत असून शिवाजी वेळोवेळीं समर्थांचा सल्ला घेत असे व समर्थ त्यास योग्य तो सल्ला देत हें स्पष्ट होतें. तसेंच समर्थांचें दर्शन वारंवार घडावें ही शिवाजीची इच्छा लक्षांत घेऊन समर्थ शिवथर या आसमंतांतील गिरिगव्हरांत म्हणजे रायगड व राजगड यांच्या आसपास फार आधींपासून राहूं लागले होते हेंहि मनावर सहजच ठसतें. समर्थांनीं जिंजीपर्यंत मठहि शिवकालाच्या अखेरीपर्यंत कसे स्थापलें याचाहि उलगडा या सनदेनें होतो.

## शिवाजीची न्यायनिष्ठुरता

शिवाजीची शिस्त फार कडक होती. कोणास हुकूम केला असतां त्याची तामिली ताबडतोब झालीच पाहिजे यास तो जपत असे. ब्राह्मणाला तो फार मान देई. पण नोकरींतील ब्राह्मण केवढाहि मोठा अधिकारी असला पण आज्ञापालनांत कसूर करणारा आढळला तर त्याची जरबेच्या शब्दांनीं कानउघाडणी करण्यास तो कमी करीत नसे. त्याच्या सैन्यानें दंडाराजपुरीस वेढा घातला होता. वेढ्याचें काम रेंगाळत राहून मोहिमेचा निकाल लागेना. यास्तव शिवाजीनें निर्वाणीचा उपाय म्हणून खासा मोरोपंत पेशवा याची त्या कामावर नेमणूक केली व त्यास द्रव्यादि साहाय्य करण्यास जिवाजी विनायक सुभेदार व कारकून सुबे मामले प्रभावळी यांस सांगितलें. पण त्याजकडून याबाबतींत कसूर दिसून आल्यावर शिवाजीनें त्याला जरबेचें पत्र पाठविलें.

### श्रीशंकर प्रसन्न

शक १५९५ माघ शु. ३
इ. स. १६७५ जानेवारी १८

राजश्री शिवाजीराजे यांचा दंडवत – दौलतखान व दर्यासारंग यांसी ऐवज व गल्ला राजश्री मोरोपंत यांणीं वराता सुबे मजकुरावरी दिधल्या. त्यांस तुम्ही पावलें ( पाठविलें ) नाही, म्हणोन कळों आलें. त्यावरून अजब वाटलें की, ऐसे नादान थोडे असतील. तुम्हांस समजलें असेल कीं, याला ऐवज कोठें तरी ऐवज खजाना रसद पाठविल्या मजरा होईल म्हणत असाल. तरी पद्मदुर्ग वसवून राजपुरीच्या उरावरी दुसरी राजपुरी केली आहे. त्याची मदत व्हावी, पाणी, फाटी आदिकरून सामान पावावें, या कामास आरमार वेगीनें पावावें, तें नाहीं.

पद्मदुर्ग हबशी फौजा चौफेर जेर करीत असतील. आणि तुम्ही ऐवज न पाववून आरमार खोळंबून पाडाल! एवढी हरामखोरी तुम्ही कराल. आणि रसद पाठवून मजरा करूं म्हणाल, त्यावरी साहेब रिझतील कीं काय ? ही गोष्ट घडावयाची तऱ्ही होय. न कळे कीं, हबशियांनीं कांहीं देऊन आपले चाकर तुम्हांला केले असतील ! त्याकरितां ऐसी बुद्धि केली

असेल ! तरी ऐशा चाकरास ठीक ठीक केले पाहिजेत. ब्राह्मण म्हणून कोण मुलाजा करूं पाहतों ! याउपरी तऱ्ही त्याला ऐवज व गल्ला राजश्री मोरोपंतीं देविला असे तो देवितील. तो खजाना रसद पावलियाहून अधिक जाणून येणेंप्रमाणें आदा करणें कीं, ते तुमची फिर्याद न करीत. व त्यांचें पोटास पावोन आरमार घेऊन पद्मदुर्गाचें मदतीस राहात तें करणें. याउपरी बोभाटा आलिया उपरी तुमचा मुलाहिजा करणार नाहीं. गनिमाचे चाकर गनीम जालेस ऐसे जाणून बरा नतीजा तुम्हास पावेल. ताकीद असे. रवाना ( प. सा. सं. खंड २, पृ. ५१३ ).

## प्रकरण सहावें

# शिवाजीची राजनीति

### मुलकी कारभार

शिवाजी महाराष्ट्रांत स्वराज्य निर्माण करीत असतां महाराष्ट्रांत व महाराष्ट्राभोंवतालीं निजामशाही संपली असली तरी आदिलशाही व कुतुबशाही राजवट सुरू होती. त्या राजवटींत जें राज्ययंत्र उभें होतें तेंच राज्ययंत्र शिवाजीनें स्वीकारलें. कोणतेंहि नवें राज्य उत्पन्न झालें तरी त्याला प्रारंभीं आधींच्या राजवटींतील राज्ययंत्राचाच अंगीकार करावा लागतो. मुसलमानांपूर्वी दक्षिणेंत हिंदु राज्यें होतीं, त्यांची पद्धति मुसलमान राज्यकर्त्यांनीं उचलली व मुसलमान राज्यकर्त्यांची पद्धति शिवाजीनें उचलली. शिवाजीनंतर शिवाजीनें अवलंबिलेली राज्यपद्धति पेशवाईत सुरू राहिली. अर्थात् मुसलमानपूर्व हिंदु राजांची जी पद्धति होती, ती जशीच्या तशी पेशवाईपर्यंत आली नाहीं. तिच्यांत प्रत्येक राजवटींत कांहीं तरी बदल होत गेलेच.

आपणांस आज मागील सर्व राजवटींची जी माहिती ज्ञात आहे तींत मुसलमानपूर्व काळ व पेशवे काळ यांची माहिती अधिक प्रमाणांत मिळते. त्या मानानें दक्षिणेंतील मुसलमानी राजवट व शिवकाल यांच्या माहितीचें प्रमाण कमी आहे. यासाठीं तिजवर अधिक प्रकाश पडावयास पाहिजे असेल

तर मुसलमांनपूर्व काळ व पेशवे काळ यांजकडे अधिक नजर टाकावयास पाहिजे. हे दोन प्रकाश दोन्ही बाजूंनीं पडले म्हणजे मधला संधिकाळ अधिक स्पष्ट दिसूं लागेल. म्हणून प्रथम मुसलमानपूर्व काळाचा विचार करूं व तो झाल्यावर पेशवाईकडे वळूं.

महाराष्ट्रावर राष्ट्रकूटांचा अंमल इ. स. ७५० ते ९७३ पर्यंत होता. त्यांच्या काळांत राज्याचे विभाग कारभाराच्या सोयीसाठीं राष्ट्र, विषय, भुक्ति व ग्राम असे पाडण्यांत आले होते. त्यांजवरील अधिकाऱ्यांचे हुद्दे राष्ट्रपति, विषयपति, भोगपति व ग्रामकूट असे होते. सर्वांत मोठा विभाग म्हणजे राष्ट्र व त्याच्या खालचा विषय. पूनक ( पुणें ), करहाटक ( कऱ्हाड ) व नासिक हे विषय होते. विषयाखाली भुक्ति हा कांहीं गांवांचा समूह असे. भुक्तींतील गांवांचे वेगळाले समूह असून त्या समूहाखालीं गांवें व खेडीं येत. राष्ट्र हा भाग आपल्या हल्लींच्या राज्यांतील ७।८ किंवा त्याहून अधिक जिल्ह्यांचा जेवढा विभाग ( डिव्हिजन ) असतो त्याच्या तोडीचा असे. विषय हा सामान्यतः जिल्ह्याएवढा असे. भुक्ति म्हणजे हल्लीचा तालुका. त्याजवरचा अधिकारी हा भोगिक वा भोगपति.

## राष्ट्रपति

राष्ट्रपति हे राष्ट्रकूटकालांत शक्य तर राजपुत्र असत व त्यांच्या अभावीं ज्यांनीं युद्धांत मोठा नांव-लौकिक मिळविला आहे असे सेनापति असत. राष्ट्रपति आपल्या अखत्यारींतील प्रदेशाच्या रक्षणाकरितां मोठा फौजफाटा ठेवीत व त्याचा उपयोग ते हाताखालच्या अधिकाऱ्यांना व मांडलिकांना दाबांत ठेवण्याकडे करीत. राष्ट्रपति हेच वसुली खात्यावरील मुख्य अधिकारी असत. खेड्यांतील जमिनींची मोजणी व तरम आकारणी ते स्थानिक अधिकाऱ्यांच्या सहकार्यानें करीत. त्यांच्या हाताखालचे विषयपति व भोगपति यांची नेमणूक सम्राटाकडून होत असे. विषयपति व भोगपतीहि फौजा बाळगून असत. विषयपतींना वसुली अधिकार असतच. ते राष्ट्रपतीला जबाबदार समजले जात. कराची सूट देण्याची अखत्यारी विषयपतींना होती. विषयपतींच्या मदतीस राज्यकारभारांत महत्तरांचें मंत्रिमंडळ असे. या मंडळांत विषयांतील मातबर लोक व महाजन यांस घेत.

विषयाखाली भुक्ति. तींत शंभर ते पांचशेपर्यंत गांवें असत. भुक्तीवरचा जो अधिकारी भोगिक वा भोगपति तो सैनिकी माणूस असे. भुक्तींत पोट-विभाग असून प्रत्येक पोट-विभागांत १० ते ३० गांवें असत. त्यांजवरहि मुख्य म्हणून सैनिकी अधिकाऱ्यासच नेमीत. भुक्ति व विषय यांजवरील सरकारी वसुली अधिकाऱ्याच्या मदतीला वतनदार अधिकाऱ्यांची योजना करण्यांत आली होती. जमीनमहसूल धान्यरूपानें घेण्याची पद्धति होती. नगरांच्या प्रमुखांचा हुद्दा पुरपति वा नगरपति असा असून त्या जागेवर बहुधा लष्करी अधिकाऱ्यांनाच नेमीत, व त्यांना बिनसरकारी समित्या मदत करीत. कोणत्याहि जागेवर अधिकारी नेमतांना त्याच्या अंगचे क्षात्र-गुण, वंशपरंपरा व शिक्षण यांपैकी एक वा अधिक बाबी लक्षांत घेत. अधिकाऱ्यांना वेतनादाखल कधीं इनामें, कधीं रोख पगार तर कधीं निम्मा रोकड पगार व निम्मा धान्य अगर अन्य रूपाचा मोबदला देत. गांवाच्या पाटलाला जी जमीन मिळे तिला देशग्रामकूटक्षेत्र अशी संज्ञा होती. ग्रामाधिपतीची जागा पिढीजाद असे. त्याला सरकारी नोकर म्हणण्यापेक्षां लोक-प्रतिनिधीच म्हणणें शोभेल. त्याला महाराष्ट्रांत ग्रामकूट व कर्नाटकांत गोवंडा असा हुद्दा होता. कांहीं गांवें लष्करी अधिकाऱ्यांना व कांहीं विद्वान् ब्राह्मणांना इनाम असत.

### ग्रामकूट

ग्रामरक्षणाची जोखीम ग्रामकूटांवर होती. युद्धप्रसंग वारंवार घडत असल्यामुळें लोकांना हत्यारांचा चांगला सराव होता. प्रत्येक गांवांत स्वयं-सैनिकांचें पथक असून त्यांतूनच साम्राज्य-सैन्यांत सैनिकांची भरती करीत. ग्रामकूट हाच त्या पथकाचा नायक असे.

ग्रामकूटाचा जमीनबाबीशीं दृढ संबंध होता. ग्रामपंचायतींतहि तोच प्रमुख असे. ग्रामकूटाला वर लिहिल्याप्रमाणें नोकरीसाठीं इनाम जमिनी असतच. शिवाय मनूनें सांगितलेलें धान्य, सरपण व चिल्लर जिन्नस यांवरील कर ग्रामकूटालाच मिळत. तत्कालीन ताम्रपटांतून ग्रामकूट, ग्राममहत्तर यांच्यानंतर युक्त, आयुक्त, नियुक्त वा उपयुक्त हा हुद्दा दर्शविला आहे.

गांवांतील पोलिसबंदोबस्तावर ग्रामपतीची देखरेख असे. गांवांत होणाऱ्या चोऱ्यांचा तपास लावण्याचें काम येसकर करी. त्याला चोरीचा

माग आसपासच्या गांवांस भिडवितां न आल्यास चोरीनें झालेलें नुकसान त्याला भरून द्यावें लागे. त्यानें नुकसान भरून न दिल्यास त्याचें बलुतें बंद करीत, त्याचें नोकरी इनाम त्याच्या भाऊबंदाकडे जाई किंवा दंड, तुरुंग, वा शारीर शिक्षा त्याच्या वांट्यास येई.

राष्ट्रकूटांनंतर महाराष्ट्राचें असें राजघराणें देवगिरीच्या यादवांचें. यांच्या मागून मुसलमानी राजवट महाराष्ट्रांत सुरू झाल्यामुळें यादवांची राज्यपद्धति महाराष्ट्रांत मुसलमान राज्यकर्त्यांनीं स्वाभाविकच उचलली. यादवकाळांत राष्ट्र व विषय हे प्रादेशिक विभाग मागें पडून देश हा राजकीय विभाग मोठ्या प्रमाणांत वापरण्यांत येऊं लागला. त्यामुळें देशमुख व देशपांडे या पदव्या व वतनें हीं यांच्या किंवा कल्याणकर चालुक्यांच्या काळांत महाराष्ट्रांत विशेष रूढ होत चाललीं असावीं. नाईक, महाजन, पाटील, गुरव, कुलकरणी व तराळ यांचीं वतनें व हुद्दे एव्हां स्थापन झाले होते. महारकी, जोसकी, कुंभारकी हींहि वतनें या वेळीं जारी होतीं. नाण्यांत दाम, विश्वा, निष्क, धरण, कवड्या यांचा समावेश होता. माळव्याच्या परमार राजांनीं आपल्या राज्यांत रूपक, अर्धरूपक हींहि नाणीं सुरू केलीं होतीं.

पेशवाईत देशाच्या राजकीय विभागांचीं नांवें मुसलमानपूर्व काळांतील राहिलीं नव्हतीं. त्यांचीं नांवें मुसलमानी काळांत जीं बदललीं होतीं तींच पेशवाईत कायम राहिलीं. राष्ट्र वा देश हा राजकीय विभाग जाऊन त्याऐवजीं सरकार हा विभाग आला. सरकार या विभागाच्या तोडीचा प्रांत हा विभाग होता. या विभागांच्या नांवांत व क्षेत्रफळांत कांटेकोरपणा नव्हता. त्यांची कल्पना खालील नामावलीवरून कांहींशी येणार आहे.

( १ ) मौजे पाषाण, तर्फ हवेली, कर्यात मावळ

( २ ) मौजे वाटार, कर्यात वडगांव, प्रांत पन्हाळा

( ३ ) मौजे कामेरी, तर्फ वाळवें, प्रांत कऱ्हाड

( ४ ) मौजे राजूरी, परगणे बेलापूर, सरकार संगमनेर

( ५ ) मौजे दहिटणें, परगणे रांजणगांव, सरकार जुन्नर

यांत मौजे, तर्फ, कर्यात, प्रांत व सरकार अशीं नांवें आलीं असलीं तरी राजकीय विभाग असे तीनच दृष्टीस पडतात. सर्वांत मौजे हें साधारण

आहे. तर्फ, कर्यात व परगणे हे पर्यायवाचक शब्द दिसतात. तसेंच कर्यात, प्रांत व सरकार हेहि पर्यायवाचक शब्द वाटतात. म्हणजे मुसलमानपूर्व-काळांत ग्राम, भुक्ति, विषय व राष्ट्र असे चार मुख्य राजकीय विभाग असत, त्याऐवजीं पेशवाईत तीन राजकीय विभाग शिल्लक राहिले. राष्ट्र हा विभाग त्या काळांत क्वचितच आढळत असून ग्राम, भुक्ति व विषय हेच तीन विभाग सर्वत्र होते. त्यांच्याच जागीं पेशवाईत मौजे, परगणे व प्रान्त हे विभाग प्रचलित झाले असें समजण्यास हरकत नाही.

सगळ्यांत धाकटा विभाग मौजे. त्याचे मुख्य मुलकी अधिकारी पाटील व कुलकर्णी. मौजावरचा विभाग परगणा; त्याच्यावरचा अधिकारी कमा-विसदार वा मामलेदार. परगण्यावरचा विभाग प्रांत वा सरकार. त्याज-वरील अधिकारी सुभेदार. या सर्वांवरचे खुद्द पेशवे वा त्यांचा दरबार. अशा प्रकारें पेशव्यांच्या मुलकी खात्यांत एका टोंकाला पाटील-कुलकर्णी व दुसऱ्या टोंकाला पेशवे वा पुणें-दरबार होता.

पाटील व कुलकर्णी हे वतनी अधिकारी व त्यांचे मदतनीस चौगुला, पोतदार, महार हेहि वतनी नोकरच. पाटील गांवाचें रक्षण गांवांतील हत्यारबंद जवानांकडून परचक्रापासून वा दरोड्यापासून करीत असे. कारण सैनिकी शिक्षणाचें बाळकडू त्या काळीं सर्व जनतेसच होतें. पाटील-कुलकर्ण्या-वरचा मोठा अधिकारी कमाविसदार वा मामलेदार. त्याच्या हाताखालीं शिबंदी असून तिजकडून तो परगण्यांत शांतता राखी व पाटलाच्या मद-तीस तिला देऊन जरूर तेव्हां तिच्या साहाय्यानें गांवाचा वसूलहि करून घेई. मामलेदारांना त्यांच्या योग्यतेस व त्यांजवरील जोखमेस शोभेल असा पगार व लवाजमा असे. त्यांच्या तैनातीस चोपदार, दिवट्या व अफता-गिऱ्या असे.

मामलेदार हा पगारी मोठा अधिकारी असला तरी त्या अस्वस्थतेच्या काळांत ह्याला देशमुख-देशपांड्यांची मदत घ्यावीच लागे. सुभेदार म्हणजे जिल्हाधिकारी. ते क्वचितच असत. बहुधा पुण्यापासून दूर असलेल्या प्रदेशांतील मामलेदारांचें नियंत्रण करण्याकरितां त्यांची योजना करण्यांत येत असली पाहिजे. अशा रीतीनें जुनी वतनदारी पद्धति व नवी पगारी पद्धति यांचा मेळ पेशवाईत घालण्यांत आला होता.

पाटील व कुलकर्णी यांस साहाय्य करण्याकरितां गांवांत जसे वतनदार नोकर असत, तसे मुख्य गांवीं देशमुख व देशपांडे यांच्या मदतीकरितां वरिष्ठ प्रतीचे वतनदार नोकर असत. दिवाण, फडणीस, पोतनीस इत्यादि नोकर मूळ देशमुख व देशपांडे यांच्या हाताखालचेच असावे. शेतसारा वसूल होण्याच्या बाबतींत अधिकार चालवावयाचा देशमुखानें व वसूल आल्यावर त्याचा हिशेब ठेवावयाचा देशपांड्यानें. देशमुख हा जातीनें बहुधा मराठा म्हणून साहजिकच लिहिणारा व वाचणारा नसल्यामुळें त्याचा कारभार करावयाचा दिवाणानें, हिशेब तपासावयाचे मजुमदारानें, दस्तऐवज नोंदावयाचे फडनविसानें, जाबजबाब लिहावयाचे दप्तरदारानें, वसूल संभाळावयाचा पोतनिसानें व तो पोतनिसाकडे जाण्यापूर्वी नीट पारखून घ्यावयाचा पोतदारानें, अशी देशमुखाच्या कचेरींतील कामाची व्यवस्था होती.

## पाटलाची चावडी

कनिष्ठ कचेरी जी गांवच्या पाटलाची चावडी तेथील कामाची रीत याच प्रकारची होती. पाटलाच्या हुकमावरून महारानें शेतकऱ्याला चावडींत बोलावून आणावें, त्यानें आणिलेला पैसा पोतदारानें पारखावा व पाटलाच्या ताब्यांत द्यावा, त्याची पावती कुळकर्ण्यानें शेतकऱ्यास द्यावी व पाटलानें बराच पैसा वसूल झाल्यावर तो महाराबरोबर देशमुखाकडे पाठवावा. वसुलाची ही पद्धत पेशव्यांना कार्यक्षम वाटली नसावी. म्हणून त्यांनीं देशमुख व देशपांडे यांजकडील वसुलीचें काम काढून घेऊन तें एक पगारीवर्ग निर्माण करून त्याजवर सोंपविलें. त्यांतच मामलेदार, कमाविसदार, तरफदार, शेखदार इत्यादि अधिकारी मोडतात. तालुक्यावरचा वा परगण्यावरचा अधिकारी तो मामलेदार वा कमाविसदार, तरफेवरचा तो तरफदार व त्याहून लहान टापूवरचा तो शेखदार वा कारकून. कमाविसदारापासूनचे खालील सर्व अधिकारी मामलेदाराच्या ताब्यांत असून त्यानें त्यांच्या साहाय्यानें पाटील व कुळकर्णी यांजकडून गांवच्या इनाम जमिनी, रयतावा व पडजमिनी यांचें पत्रक तयार करावें. हेंच जमाबंदीचें अंदाजपत्रक होय. याच्याच आधारावर गांवचा वसूल व्हावयाचा.

देशमुख-देशपांडे हे एका अर्थानें मामलेदाराच्या बरोबरीचे जुने अधिकारी. त्यांच्या खालचे दिवाण, फडणीस, पोतनीस, मुजुमदार इत्यादि

अधिकारीहि मोठ्या योग्यतेचे. यासाठीं सदर वतनदार अधिकाऱ्यांचा दाब मामलेदार वगैरे उपरी पगारी अधिकाऱ्यांवर ठेवण्यांत आला होता. पेशवाईत देशमुख व देशपांडे हे शेतकरीवर्गाचे हितकर्ते समजले जात. मामलेदाराकडून वसुलाच्या बाबतींत कुळावर जुलूम होऊं लागला किंवा जरूर ती सूट मिळेनाशी झाली तर पाटील हे देशमुख व देशपांडे यांच्या मध्यस्थीनें आपला हेतु साधून घेत.

गांवचें पोतें पाटील महाराबरोबर मामलेदार कचेरींत भरणा करण्याकरितां पाठवी; त्या वेळीं अर्जदास्तीची एक नक्कल देशमुख-देशपांड्याकडेहि त्यानें पाठवावी. या योगानें झालेल्या वसुलाचा पडताळा दोन जागीं पाहावयास सांपडावा. देशमुख व देशपांडे यांशिवाय उरलेले वतनदार अधिकारी म्हणजे दिवाण वगैरे दरकदार. हे पिढीजाद व सरकारनें नेमलेले असून त्यांची सही जरुरीप्रमाणे सर्व कागदांवर आवश्यक असे. दिवाण हा मामलेदाराचा दुय्यम अधिकारी. मामलेदाराच्या सहीशेजारीं त्यानें सही करावी. मुजुमदारानें हिशेब तपासावे. फडणिसानें सनदापत्रें नोंदावीं. या सर्वांना वतनाखेरीज पगार मिळत असे. उदाहरणार्थ, दिवाणाला सालिना ५९० रु. मुजुमदाराला ४९० रु., फडणविसाला ६१० रु., दप्तरदाराला २८० रु. व चिटणिसाला १०० रु. हे सर्व अधिकारी मिळून मामलेदार कचेरी. मामलेदार एकटा काय तो नुसता पगारी व त्याच्या मदतीला हे सर्व अधिकारी मुख्यतः वतनी व अंशतः पगारी.

कमाविसदार, तरफदार व शेखदार हे मामलेदार कचेरींतील अधिकारी नसून त्यांची नेमणूक वसुलाच्या बाबतींत मामलेदारास मदत करण्यासाठीं तालुक्याच्या पाडलेल्या लहान लहान पोटविभागांत केलेली असे. त्यांनींच आपल्या विभागांतील गांवीं जाऊन पाटलासमक्ष पिकें पाहावीं व पिकें तयार झाल्यांवर व पिकांच्या प्रत्यक्ष पाहणीनंतर तीं अंदाजपत्रकें पक्कीं व्हावीं व वर्षअखेर वसूल झाल्यावर मामलेदारानें वसुली-हिशेबाचे कागद पेशवेसरकाराकडे पाठवावे.

देशमुख हे मुसलमानी राज्यांत फौजबंद अधिकारी होते. त्यांच्याजवळची फौज व वसुलीचा अधिकार पेशव्यांनीं हिरावल्यामुळें त्यांचीं नखें काढून घेतल्यासारखीं झालीं. ते निरुपद्रवी बनले. त्यांजपासून मुसलमान व

शिवाजी यांच्या काळांत राजसत्तेस भय होतें तें पेशवाईत उरलें नाहीं हा महत्त्वाचा फरक होय. वसुली-कामास व प्रदेशाच्या बंदोबस्तास सैन्याची जरुरी असे. तें सैन्य मामलेदाराच्या हाताखालीं ठेवण्यांत येई. म्हणजे वतनदारी पद्धतीचें मुख्य भय तेंच निर्मूल झालें.

शिवकाल हा मुसलमानी काळास जोडून आहे. किंबहुना त्यांतूनच तो बाहेर निघाला आहे. तो सर्वच काळ लढायांचा व धामधुमीचा असल्या-मुळें शिवाजीला आपणास हवें तसें राज्ययंत्र खालपासून वरपर्यंत उभें करण्यास उसंतच मिळाली नाहीं. या कारणानें त्यानें मुसलमानी राज्ययंत्रच बहुतांशीं उचलून आपला राज्यशकट हाकला. म्हणून इस्लामी राज्यशकटाचें वर्णन केलें असतां तेंच कांहींसें शिवाजीच्या राज्यशकटाचें वर्णन असें समजून चालण्यास हरकत नाहीं.

शिवपूर्वकालांत राज्याचे विभाग गांव, तर्फ, तपे, कर्यात, मामला, परगणा, सुभा व सरसुभा असे आढळतात. याचीं कांहीं उदाहरणें –

१ देशमुख तर्फ भोर तपे रोहिडा यांस.

२ बहिरो गणपत मजमूदार तपे रोहिडा कारकून व देशमुख परगणे पुणें यांजकडून.

३ कारकून व मोकदम कसबे पेडगांव परगणे पाडे पेडगांव.

४ बाळंभट हरभट बिन लखंभट, मौजे माडखोल, परगणे कुडाळ.

५ कारकुनानी व मुतालिकानी मोकाशी व मोकदम कसबे ओतूर परगणे पुणें.

६ कारकून मामले गुलशनाबाद ( नाशिक ).

७ अज दिवाण ठाणें कर्यात पाटस, परगणे पुणें.

८ कारकून व देसाई, अधिकारी मामले मूर्तजाबाद ऊर्फ चेऊल.

या आठ उदाहरणांपासून पुढील अनुमानें निघतात. राज्याचे सर्व-साधारण विभाग ग्राम, तर्फ, तपे व परगणा असे असत. सर्व परगणे सारख्या क्षेत्रफळांचे नसत. पुणें परगणा फार मोठा दिसतो. त्यांत तपे रोहिडा, कसबे ओतूर व कर्यात पाटस इतक्यांचा समावेश होतो. म्हणजे नैर्ऋत्येस भोर, पूर्वेस पाटस व उत्तरेस ओतूर इतका विस्तीर्ण पट्टा पुणें परगण्यांत

मोडत होता. याचा अर्थ पश्चिमेस २५ मैल, पूर्वेस ३०–३५ मैल व उत्तरेस सुमारें ५० मैल, त्याशिवाय दक्षिणेसहि २०।२५ मैल इतक्या मोठ्या प्रदेशावर पुणें परगण्याचा अंमल होता. अर्थात् हल्लींच्या पुणें जिल्ह्याचा किमान पाऊण हिस्सा पुणें परगण्यांत होता. यापासून असें समजावयाचें नाहीं कीं सर्व परगणे सारख्या क्षेत्रफळाचे होते. कांहीं याहून लहान असतीलहि.

मामला हा शब्द वरील उदाहरणांत दोन ठिकाणीं आला आहे. मामले गुलशनाबाद (नाशिक) व मामले मूर्तजाबाद ऊर्फ चेऊल. यावरून मामला हा परगण्याचा प्रतिशब्द वाटतो. तपे व कर्यात हे विभाग तुल्यबल दिसतात. तर्फ फक्त एकेच ठिकाणीं निर्दिष्ट आहे. गांवांचे दर्जे मौजे व कसबे यांचा उल्लेख आहे. मौजे हा लहान गांव व कसबे हा मोठा गांव. मजरे म्हणजे वाडी, ती उल्लेखण्याचें वरिष्ठ अधिकाऱ्याला कारण नाहीं म्हणून ती येथें दिसत नाहीं. तथापि तो गांवाचा दर्जा या काळीं अस्तित्वांत असावा. सारांश गांव, तर्फ, तप व परगणा हे चार विभाग बहुतेक ठिकाणीं असावे. कदाचित् कोठें तर्फ असेल तर कोठें तप असेल. या विभागांची मुसलमानपूर्व काळाशीं तुलना करावयाची झाल्यास मुसलमानपूर्व काळांतील विषय हा मुसलमानी काळांत परगणा झाला. भुक्तीच्या जागीं तप वा तर्फ यांची योजना झाली आणि गांव होतें तसेंच राहिलें.

## सुभेदार व हवालदार

सरकारी अधिकाऱ्यांपैकीं एका वा अधिक परगण्यांवर सुभेदार असे व त्याच्या मदतीस हवालदार असे. सुभेदार हा सेनाधिकारी व हवालदार हा मुलकी अधिकारी. हे बहुधा मुसलमान असत. परगण्याचा सुभेदार व हवालदार हे बरेचसे समान दर्जाचे अधिकारी असावे. सुभेदाराच्या हाताखालीं सेना असून तिच्या जोरावर तो परगणा ताब्यांत ठेवी व स्थानिक वतनदारांवर वचक बसवून त्यांजकडून जमीन-महसूल व इतर कर यांची उगारणी करवी. सुभेदार व हवालदार यांस अंशतः पगार व अंशतः इनाम असलें पाहिजे. सुभेदार तर युरोपियन वखारवाल्याकडून जहागीरदारच समजला जाई. इ. स. १६५९ त अफजलखान हा सरसुभेदार असून तो एकाच वेळीं वाई, तेरदाळ व शिरवळ या तीन परगण्यांवर अंमल चालवीत होता. इ. स. १६५५ त रुस्तुमजमा यास अदिलशहानें दाक्षिण

कोंकणावर सरसुभेदार नेमलें होतें. त्याजविषयीं गोव्याचा गव्हर्नर हा पोर्तुगालच्या बादशहास लिहितो, 'मोठा सरदार रणदुल्लाखान याचा मुलगा रुस्तुमजमा हा कोंकणचा मुख्य सरदार नेमला गेला असून तो कोंकणांत आला आहे. त्याचा इकडे येण्याचा उद्देश लखम सावंत यास जिंकणें हा आहे ( ५ मे १६५८, प. सा. सं. खं. १, पृ. १६५ ). सुभेदार विशेषतः सरसुभेदार हा सेनापतीहि असल्यामुळें त्याला आपला प्रदेश सोडून इतरत्र बादशहानें फर्मावल्यास स्वारीवर जावें लागे. या दृष्टीनें त्याचा मुक्काम त्याच्या सुभ्यांत नेहमीं नसल्यानें सतत ठाण्यावर राहणारा हवालदार हा मुलकी अधिकारी नेमण्यांत येई. इ. स. १६५९ त अफझल-खान सरसुभा तसा सरहवालदारहि होता ( प. सा. सं. खंड १, पृ. १७४ ). याचा अर्थ सरसुभेदार व सरहवालदार हे समानदर्जाचे असत.

सुभेदारापेक्षां सरसुभेदार मोठा, तथापि त्या दोघांवरहि बादशहाचाच अधिकार. म्हणजे सुभेदार व सरसुभेदार हे बादशहास जबाबदार असत. सरसुभेदार व सरहवालदार जसे समान तसे सुभेदार व हवालदार हेहि समान. सरहवालदार व हवालदार यांनाहि मुलकी कामाबरोबर कधीं कधीं सैनिकी कामगिरी बजवावी लागे. हबसखान हा तळ-कोंकणचा हवालदार होता. तो इ. स. १६२८ त कान्होजी देशमुख तपे रोहिडा यास लिहितो, "हजरती साहेबाची आतां व मागेंहि दाभोळचे मसलतीविषयीं आज्ञा झाली म्हणून आम्ही स्वार जालों. आम्हांमध्यें व दाभोळमध्यें तीन-चार कोसांचें अंतर आहे. दाभोळचें काम बहुत असान आहे. तुम्हासारखे जाती असलियानें फतेच असे. तरी जमेतिनसी सिताब आलें पाहिजे. याबद्दल तमाजी पाठविले आहेती" ( प. सा. सं. खंड १, पृ. ६१ ). परगण्याच्या अधि-काऱ्याला कोठें कोठें सुभेदाराऐवजीं मामलेदार अशीहि संज्ञा होती. उदा-हरणार्थ, "बादशहा विजापूर याजकडून मामलेदार व देशमुख परगणे सुपें यांस – मोरया गोसावी ( चिंचवड ) यांस निजामशहा, मलिकंबर व शहाजी राजे यांचे पत्रावरून इनाम आहे. कागद हरवले आहेत. तरी त्यांचा इनाम चालू ठेवणें. इ. स. १६५३ एप्रिल २१" ( प. सा. सं. खंड १, पृ. १३७ ).

परगणा हा सामान्यतः सुभा ठरल्यानंतर तेथील अधिकारी जो सुभे-दार त्याच्या मदतीस इतर हुद्देदार कोण असत हें पाहणें आवश्यक होय.

सभासद लिहितो त्याप्रमाणें शिवाजीच्या काळांत कारकून, दप्तरदार, हवालदार, मजुमदार हे हुद्देदार होते. पेशवाईत मामलेदाराच्या कचेरींत दिवाण, फडणीस, पोतनीस, मजूमदार इत्यादि अधिकारी असत. सभासदानें ज्यास नुसते कारकून म्हटलें आहे तो पेशवाईतील दिवाण असावा. पेशवाईत दिवाणाला सालिना ५९० रु., मजुमदाराला ४९० रु., फडणिसाला ६१० रु., दप्तरदाराला २८० रु. व चिटणिसाला १०० रु. पगार असे. शिवकालांत सुभेदाराला सालिना चारशें होन: तैनात व त्याच्या मजुमदारास १००–१२५ होन मिळत. सुभेदारास पालखी व मजुमदारास अबदागीर असे. हवालदारास महाल पाहून ३–५ होन व मजुमदारास तितकेच होन मिळत. सभासद बिनसैनिकी खात्याला मुलकीखातें असें नांव देतो. मुलकीखातें म्हणजे ज्याचा मुलखाच्या राज्यकारभाराशीं संबंध येतो तें खातें. त्या खात्याची रचना शिवाजीनें कशी केली होती याची कल्पना तत्कालीन अव्यवस्थित लिहिण्यांतूनहि बरीचशी स्पष्ट करतां येते. त्या लिहिण्याचा मथितार्थ असा :– पेशवाईत फड ही मुख्य केंद्रीय कचेरी असून तींत कारकुनीचें प्राथमिक शिक्षण नवीन होतकरू मनुष्यास मिळत असे. फडाला सभासद दप्तर म्हणजे दप्तरखाना असें संबोधितो. तेथें त्यानें अनुभव मिळवून पात्रता सिद्ध केली म्हणजे मुलखांत ठिकठिकाणीं ज्या कचेऱ्या होत्या त्यांजवर त्यास पाठवीत. प्रथम एखाद्यास महालाची मजमू सांगावी. त्यांत त्याची हुशारी दिसून आल्यावर त्याची बढती सुभ्याच्या कचेरींत मजमूदारीवर करावी. सुभ्याच्या कचेरींत तो फर्डा लेखक, चौकस व हिशेब जाणणारा आहे असें सिद्ध झाल्यावर त्याला महालाचा हवालदार नेमावें. महालाचा कारभार चोख केल्यावर त्याला दोन महालाएवढ्या मुलखाचा म्हणजे परगण्याचा वा सुभ्याचा सुभेदार नेमावें. अष्टप्रधान व सरकारकून यांच्याखालची श्रेष्ठ जागा सुभेदाराची. ज्याला लिहिणें येत नाहीं व ज्यानें कमाविशी केली नाहीं त्याला मुलकीखात्यांत नेमूं नये. सभासदानें सांगितलें हें स्थूल स्वरूप आहे. याची अंमलबजावणी काटेकोरपणानें होत असावी असें दिसत नाहीं. 'मुलखाच्या बंदोबस्ताकरितां सुभेदाराच्या मदतीस सैन्य ठेवीत. सरहद्दीवरच्या धामधुमीच्या मुलखांत कारकुनासमागमे लष्कर, स्वार व हशम जरुरीप्रमाणें कमी जास्ती असत!' (सभासद).

आतां आपण देशमुखांचा विचार करूं. देशमुख हे सुभेदाराच्या जोडीस परगण्यांत असतच. तसेंच ते तर्फ, तपे यांनाहि असत. त्यांचीं उदाहरणें – ( १ ) " अज सरसुभे अफजलखान महमदशाही याजकडून त॥ विठोजी हैबतराऊ देशमुख तर्फ गुंजन मावळ यांस तुमचे बाबे कृष्णाजी भास्कर यांनी तुम्ही लोक कामाचे नामासी. हा वख्त कामाचा. जरा अंदेशा न करितां जावळीजवळी देखील आपले लोक येऊन फर्मावतील ते बरहुकूम मसलहतेस सुशरीक होणें. मजुरा व सरफराजी होईल " ( इ. स. १६५९; प. सा. सं. खंड १, पृ. १७८ ).

( २ ) " अज दिवाण मामले राएर व बारा मावळे हवाले इब्राइमखान हवालदार व कारकून मामले मजकूर – कान्होजी झुंझारराव देशमुख तपे कानदखोरे कान्होजी मालूम केले जे ' साहेबास महाल अर्जानी जाला आहे. साहेबी मसलतीबद्दल आपणासी लोक फर्माविलें. आपलें इनामाचें खुर्दखत होए.' तरी इनामती वगैरे दुमाल केली असे " ( ७ मे १६२४; प. सा. सं. खंड १, पृ. ४७ ).

( ३ ) " बादशाह विजापूर – मामलेदार व देशमुख परगणे सुपे यांस मोरया गोसावी ( चिंचवड ) यांस निजामशा, मलिकंबर व शहाजी राजे यांचे पत्रावरून इनाम चालू आहे. कागद हरवले आहेत. तरी त्यांचा इनाम चालू ठेवणें " ( २१ एप्रिल १६५३; प. सा. सं. खंड १, पृ. १३७ ).

एवंच गांवावर पाटील व कुलकर्णी हे मुलकी अधिकारी असत. ते सोडून दिल्यास तर्फ, तपे व परगणा हे जे वरचे राजकीय विभाग त्या प्रत्येकावर देशमुख हा मुलकी वतनदार अधिकारी असे. ते सर्व समान दर्जाचे नसून विभागाच्या लहान-मोठेपणाप्रमाणे त्यांचे अधिकार लहान-मोठे असत. त्यांच्याजवळ विभागास अनुसरून लहानमोठी फौज असून तिच्या जोरावर ते आपल्या विभागांत शांतता राखीत व वसुलाच्या बाबतींत गांवकामगारांना जरुरीप्रमाणें मदत करीत. या सर्वांवर हुकमत परगण्याच्या सुभेदाराची. देशमुखाच्या जोडीस देशपांडे असे. जें काम गांवांत पाटील-कुलकर्ण्याचें, तेंच काम त्या त्या विभागांत देशमुख देशपांड्याचें. ते आपआपल्या विभागांतील वसुलास जबाबदार असत. पाटील परगण्याला

पोतें पाठवी तेव्हां त्याबरोबर जी अर्जदास्त परगण्यास रवाना करी. तिची एक नक्कल आपल्या विभागावरील देशमुखाकडेहि देत असे.

गांवचे पाटील व वरील विभागांचे देशमुख हे मुसलमानी राजवटींत सरकारास रयतेपासून घ्यावयाचा वसूल मक्त्याच्या पद्धतीने देत. ती पद्धत शिवाजीनें मोडून टाकली. या सुधारणेविषयीं सभासद लिहितो :–

## शिवाजीची सुधारणा

" मुलखांत जमीदार, देशमुख व देसाई यांना रयत नीट ताब्यांत ठेवण्याचें साधत नाहीं. शिवाजीनें निजामशाही, इदलशाही व मोंगलाई देश काबीज केला तेव्हां त्यांतील सर्व रयत पाटील, कुलकर्णी व देशमुख यांच्या हातीं होती. हे वतनदार रयतेपासून वसूल घेत व त्याचा मोघम हिस्सा सरकारांत देत. एखाद्या गांवांत या वतनदारांनीं हजार दोन हजार वसूल केले तर त्यांतील फक्त दोन-तीनशेचा खंड मक्ता दिवाणांत देत. त्यामुळे हे मिरासदार पैकेकरी होऊन गांवास हुडे, वाडे, कोट बांधून आणि प्यादे व बंदुखी ठेवून बळावले. ते दिवाणास भेटेनासे झाले. दिवाण उणेअधिक बोलला कीं त्याच्याशीं भांडावयास उभे रहात. हे स्वतः पुंड होऊन देश बळकावून बसत. म्हणून शिवाजी राजानें नवा मुलख घेतां क्षणींच त्यांचे हुडे, वाडे व कोट पाडले. ज्या गांवीं नामांकित कोट होते, त्या गांवीं आपल्या कचेऱ्या ठेवल्या. मिरासदारांकडे चालू असलेली मक्तेदारी बंद करून शिवाजीनें देशमुख व देशपांडे आणि पाटील व कुलकर्णी यांस गांवांच्या मानानें गल्ला व नख्त रकम बांधून टाकली आणि बाकीचा सर्व वसूल दिवाणांत घेण्याची व्यवस्था केली."

वसुली पद्धतींत ही सुधारणा करून सरकारी उत्पन्न वाढविल्यावर शिवाजीनें जमिनीची मोजणी केली व रयतेनें सरकारास द्यावयाच्या वसुलाचें प्रमाण ठरवून टाकलें. तें असें –

" जमिनीची मोजणी करून व चाहुराचें क्षेत्रफळ ठरवून आकार केला. पांच हात व पांच मुठी यांची काठी. चौदा तसूंचा एक हात. आणि औरस चौरस वीस काठ्यांचा एक बिघा. व १२० बिघ्यांचा एक चाहूर. अशी जमीन मोजून व आकारून गांवची गांवास दिली. दर बिघ्यास पिकाचा आकार करून पिकाच्या पांच तक्षिमा केल्या. त्यांपैकी तीन तक्षिमा रयतेस

द्याव्या व दोन तक्षिमा दिवाणांत घ्याव्या. गांवची वसाहत करण्यास नवीन रयत आली असतां तिला जमीन लागणीस लावून जमिनीच्या मशागतीस लागणारीं गुरें ढोरें रयतेस दिवाणांतून द्यावीं. पेरणीकरितां बीं व पैका द्यावा. पोटासाठींहि दाणे व पैका द्यावा आणि त्याची फेड दोनचार वर्षांत करून घ्यावी. गांव व रयत पाहून कारकुनानें वसूल पिकाचे पिकावर घ्यावा."

वरील विवरणावरून शिवाजीनें केलेल्या सुधारणा लक्षांत येतात. त्यानें मक्त्याची पद्धत नाहीशी करून मिरासदारांचा अधिकार कमी केला, सरकारी वसूल वाढविला आणि गांवांच्या हद्दी ठरवून दिल्या; प्रत्येक शेतकऱ्याकडे असलेल्या जमिनीचें क्षेत्रफळ नक्की केलें, शेतकऱ्यानें एकंदर उत्पन्नाचे तीन हिस्से आपणाकडे ठेवावे व दोन हिस्से सरकारांत द्यावे. देशमुख व देशपांडे आणि पाटील व कुलकर्णी यांस उत्पन्न येईल त्या प्रमाणांत धान्य व रोख रक्कम द्यावयाची ती निश्चित केली. या योगानें वसुलाच्या बाबतींतील अंदाधुंदी व अव्यवस्था दूर झाली. रयत म्हटली कीं तिची आर्थिक स्थिति हलाखीची असावयाची हें त्रिकालाबाधित सत्य असून त्यास शिवकाल अपवादात्मक नव्हता. अस्मानी सुलतानीमुळें गांव वारंवार ओस पडत. रयत गांव सोडून वाट फुटेल तिकडे निघून जाई. हल्लींप्रमाणें गांवांतील वस्ती स्थिर नव्हती व लोकसंख्याहि बेसुमार वाढली नव्हती. या कारणानें जमिनीच्या वाटण्या होणें व लहान लहान लंगोट्या पडणें या आपत्तीपेक्षां रयतेस गांवीं परत बोलावून पडित जमिनी वहींत कशा आणाव्या व त्या रयतेस देऊन सरकारी वसूल कसा वाढवावा हा सरकारापुढें प्रश्न असल्यामुळें संन्याशाच्या लग्नाची तयारी त्याच्या शेंडीपासून करावयाची म्हणतात त्याप्रमाणें सरकार ओस पडलेल्या गांवीं रयतेची स्थापना करी, तिला जमिनी देई, पोटास दाणा देई, मेहनतीकरितां गुरें देई, पेरणीच्या हंगामांत बीं पुरवी आणि हा खर्च तिजपासून तिच्या सोयीनें चार-दोन वर्षांत वसूल करून घेई.

शिवकालांत सुभेदार व देशमुख यांचा सांधा राज्ययंत्रानें कसा जोडण्यांत आला होता हें पाहूं. त्याला पेशवाईतील दाखला फार उपयोगी पडेल. पेशवाईतील मामलेदार कचेरींत (सुभेदार) मामलेदाराच्या हाताखालीं दिवाण, फडणीस, दप्तरदार, पोतनीस व मजुमदार इत्यादि अधिकारी

असत. ते मूळ देशमुखाचेच सहायक असून मामलेदार व देशमुख यांचें सहकार्य असल्यामुळें देशमुख मामलेदार कचेरींत जात व मामलेदारास मदत करीत. दिवाण हा मामलेदार व देशमुख या दोघांच्याहि उपयोगीं पडे. तो देशमुखास लिहितां-वाचतां येत नसल्यानें त्याचेंहि काम करी. मुजुमदार हिशेब तपाशी, फडणवीस दस्तऐवजांची नोंद ठेवी, दप्तरदार जाब-जबाब लिहून घेई, पोतनीस वसूल संभाळी. हीच शिस्त शिवकालांतील सुभेदाराच्या कचेरींत कमीजास्ती प्रमाणांत असली पाहिजे. देशमुखाची स्वतःची अशी स्वतंत्र कचेरी असून तींत देशपांडे, पोतदार असे थोडे अधिकारी असत. गांवांत जें काम कुळकर्ण्याचें तेंच काम परगणा, तपे व तर्फ येथील देशमुखांच्या कचेरींत देशपांड्याचें. त्या काळीं नाणीं निरनिराळ्या राजांचीं व निरनिराळ्या शिक्क्यांचीं असत. त्यांत कांहीं बनावट नाणींहि घुसडलीं जात. यासाठीं तीं नीट पाहून घेणें हें काम फार जोखमीचें व अवघड असे. तें देशमुखाच्या कचेरींत व तसेंच पाटलाच्या चावडींत पोतदार करी.

पेशवाईत परगण्याच्या खालचे जे विभाग असत त्यांजवर कमावीसदार, तरफदार व शेखदार असे सरकारी अधिकारी असत.

तात्पर्य, पेशवाईत मामलेदाराच्या हाताखालीं दिवाण, फडणीस, दप्तरदार, पोतनीस, मुजुमदार इत्यादि अधिकारी असत तेंच शिवशाहींतहि बहुतांशीं असले पाहिजेत. कारण हीं हुद्देदारांचीं नांवें मुसलमानी राजवटींतील असून तीं शिवशाहीमधून पेशवाईपर्यंत चालत आलीं.

शिवाजीनें राज्याभिषेक करून घेतल्यानंतर त्याच्या राज्यास स्थैर्य प्राप्त झालें. सुदैवानें तेव्हांचीं कांहीं पत्रें उपलब्ध आहेत त्यांत खालील हुद्दे आढळतात :–

( १ ) बजाजी नागनाथ हवालदार व कारकून तर्फ हवेली परगणे पुणें यांसी प्रति सेवक त्रिंबक गोपाळ सुभेदार व कारकून सुभा पुणें ( इ. स. १६७८ ).

( २ ) अंताजी गोविंद हवालदार व कारकून कसबे सासवड ( इ. स. १६८३ ).

( ३ ) विसाजी गंगाधर हवालदार व कारकून परगणे सुपे यांस प्रति त्रिंबक गोपाळ सुभेदार व कारकून परगणे पुणें ( इ. स. १६७७ ).

( ४ ) काळो विश्वनाथ हवालदार व कारकून तर्फ कऱ्हे पठार प्रति त्रिंबक गोपाळ सुभेदार व कारकून परगणे पुणें.

वरील चारहि हुद्द्यांची व विभागांची छाननी केली असतां राज्य-कारभाराचें स्वरूप पुढीलप्रमाणें व्यक्त होतें. शिवकालीं परगणे मुसल-मानी अमलापेक्षां लहान झाले होते. सुभेदारांचा दर्जाहि कमी झाला होता. प्रत्येक परगण्यावर एक सुभेदार वा हवालदार व त्याचे कारकून असत. तर्फ व कसबा यांजवर हवालदार व त्याचे कारकून असत.

ता. १० आक्टोबर १६७५ त एका महत्त्वाच्या खटल्यांत मजलस भरविण्यांत आली, तिला पुढील अधिकारा उपस्थित होते :-

( १ ) रा. महादाजी सामराज सुभेदार तर्फ मावळ.

( २ ) रा. महादाजी नरसिंह परभु हवालदार कर्यात मावळ.

( ३ ) जैताजी नाईक बिन मल्हारजी नाईक करंजवणें देशमुख कर्यात मावळ.

( ४ ) उधोराम सर मजमूदार तर्फ मावळ.

( ५ ) सोनाजी तमाजी परभु मजमूदार कर्यात मावळ.

( ६ ) आपाजी जानदेव लाडे देश कुलकर्णी कर्यात मावळ ( शि. च. सा. खंड २, पृ. २७५ ).

मागील हुद्देदारांत या हुद्देदारांची भर घातली म्हणजे पुढील अनु-मानें निघतात. तत्त्वतः व मूलतः सुभेदार हा हवालदारापेक्षां श्रेष्ठ असला तरी पुढें सुभेदार व हवालदार यांच्या दर्जांत फरक राहिला नव्हता. सुभे-दार परगण्यावरच काय पण तर्फेवर नेमले जात. सुभेदार सोडल्यास हवाल-दार हे सर्व विभागावरचे प्रमुख अधिकारी होते. तर्फ व कर्यात यांतील कचे-ऱ्यांतून इतर कारकुनांबरोबर मजमूदार वा सर मजमूदार हेहि होते.

## पेशवाईतील दाखले

याखालीं पेशवाईतील कांहीं स्पष्ट असे दाखले दिल्यास नीट कल्पना येईल. यमाजी शिवदेव हे प्रतिनिधींचे मुतालिक जावळी तालुक्यांत बाह्म-णोली येथें इ. सन १७६३ पूर्वी राहत. त्यांच्या ताब्यांत तीन सुभे होते. त्यांचीं नांवें जावळी, व्याघ्रगड व मंगळगड. त्या प्रत्येक सुभ्यावर सुभेदार, मजमदार,

फडणीस व दप्तरदार असे अधिकारी होते. हे सुभे लहान असल्यामुळें त्यांजवरील अधिकाऱ्यांची संख्या कमी असेल. असो. त्यावरूनहि शिवशाहींतील अधिकाऱ्यांचा बोध होण्यास मदत मिळेल. म्हणून शिवकाळांतील मोठ्या परगण्यांत सुभेदारापाशीं मजमदार, फडणीस, दप्तरदार, पोतनीस इत्यादि अधिकारी असले पाहिजेत.

पेशवाईत परगण्यांच्या तरफा हा एक राजकीय विभाग होता. यमाजी शिवदेव याच्या सुभ्यांत म्हणजे परगण्यांत तरफा होत्या. त्या प्रत्येक तरफेवर हवालदार, मजमदार व देशमुख हे अधिकारी होते. शिवकालींहि तरफेवर व तर्पेवरहि तेच अधिकारी असतील. सभासद लिहितो, "मुलकी अधिकारी, कारकून, दप्तरदार, हवालदार, मजूमदार, सुभेदार असे नेमले व मुलखाचे महाल, सुभा असे भाग पाडले. सुभेदारास पालखी व मुजुमदारास अबदागिरी ठेवली, हवालदारास महाल पाहून ३।५ होन, मजमूदारास ३।४।५ होन. दोन महाल मिळून सवा लाख, पाऊण लाख वसूल येत असल्यास त्याचा एक सुभा बनवून त्यावर एक सुभेदार व एक कारकून नेमावा. त्या प्रत्येकास ४०० होन तैनात. सुभ्याच्या मजमूदारास १००–१२५ होन. मुलूख सीमेवरचा असल्यास त्यांत अंदाधुंदी माजे. यास्तव ती मोडण्याकरितां त्या धामधुमीच्या मुलखांत कारकुना समागमें लष्कर, स्वार व हशम जरुरीप्रमाणें कमीजास्त असत."

या ठिकाणीं कारकून हा शब्द मोघम आहे. कारकून या शब्दाचा सर्वसाधारण अर्थ मुलकी अधिकारी. हा शब्द खालच्या लहान अधिकाऱ्यापासून पेशव्यापर्यंत लावण्यांत येत असे. कारकून हा सुभेदार, सरसुभेदार, उपमंत्री या अर्थांनीं वापरीत. सरकारकून हा मोठा कारकून म्हणजे अष्टप्रधानांतील पेशवा. मोरोपंत पेशव्यास कांहीं ठिकाणीं सरकारकूनहि म्हटलें आहे. सुभेदारापाशीं धामधुमीच्या मुलखाशिवाय इतरहि भागांत वसुलीच्या व नित्याच्या बंदोबस्ताकरितां सैन्याची तुकडी ठेवावीच लागे.

शिवाजीनें नवीन मुलूख जिंकला कीं त्याचा बंदोबस्त करण्याची त्याची पद्धत गार्डा याच्या माहितीप्रमाणें अशी होती :– " तो तेथील रहिवाश्यांना आपणांपासून कौल ( अभय ) घ्यावयास सांगे. तो त्यांनीं घेतल्यावर त्यांना तो घरें बांधावयास, तळीं खोदावयास व बागा लावावयास सांगून

स्वतः जातीनें मदत करी. त्यानंतर त्या भागावर आपला सुभेदार नेमी. कित्येकदां गांवकऱ्यांना आपण कोण आहों हें कळूं न देतां तो त्यांच्यांत मिसळे व तलवार भुईवर टेकवून व तिजवर आपण टेकून त्यांची बारीक विचारपूस करी आणि महत्त्वाच्या बाबी हातांत कागद घेऊन त्यावर टिपी. त्याजबरोबर एक दौत-लेखणी घेतलेला माणूसहि असे. बहुधा किल्ले न लढतां किल्लेदाराला बक्षिसें देऊन घेई. किल्ल्यावर गेल्यानंतर सर्व शत्रुसैन्यास खैरात करून जे त्याजपाशीं राहावयास राजी असतील त्यांना ठेवून घेई व बाकीच्यांना जाऊं देई. ते मात्र त्याची कीर्ति गात जात. गुणी मनुष्यास बक्षीस व गुन्हेगारास शिक्षा त्याजपासून ठेवलेली. यामुळें त्याजवर सर्व शूर व सज्जन लोभ करीत. तो रस्त्यांतून एकटा वा कांहीं सोबती घेऊन जाई व लोकांपाशीं आपली निंदा करून लोकमत समजून घेई, माहिती मिळवी व त्यांची तक्रार दूर करी. असले गुण या दरोडेखोरांत होते हें नवल नव्हे काय ! तो सैनिकांच्या कोठड्यांत रात्रीं जाऊन ते काय म्हणतात हें चोरून ऐके व अधिकाऱ्यांविषयीं त्यांचें मत समजून घेई. जे अधिकारी अपराधी असल्याचें दिसून येई त्यांस तो तत्काळ शासन करी.

" शिवाजी प्रजापालनदक्ष होता. त्याला राज्यकारभारांत लक्ष घालण्यास युद्धांच्या धामधुमींत फुरसत थोडी मिळे. पण ती मिळाली कीं, स्वराज्य हें सुराज्य बनविण्यांत आणि राज्यकारभाराची घडी आपल्या मंत्र्यांच्या साहाय्यानें नीट बसविण्यांत तो कसूर करीत नसे. स्वराज्यांतील लोकस्थिति पाहण्याकरितां स्वतः तो सर्वत्र हिंडून येई. कर्नाटकांत जाण्यापूर्वी त्यानें असाच मोठा दौरा काढला होता. त्या वेळीं त्यानें किल्ल्यांची पाहणी करून त्यांवर सामग्रीचा जय्यत पुरवठा केला. सर्व लोकांना भेटून त्यांस न्याय मिळेल अशी व्यवस्था केली. सर्वत्र शांतता, सुव्यवस्था व आबादानी राहावी इकडे त्यानें लक्ष पुरविलें. त्यानें नवे कायदे जरी केले नाहींत तरी त्याचे हुकूम हेच कायदे असत व ते कोणी मोडूं नयेत यावर त्याची सक्त नजर असे. त्याचा हुकूम कोणी मोडला कीं त्याला शिक्षा हटकून व्हावयाचीच. आपल्या राज्यांत मारामाऱ्या, चोऱ्या, दरोडे कोणीं घातले तर त्यास तो देहान्त शासन करी. त्याच्या राज्यांतून प्रवास करणारास प्रजेकडून कसलाहि उपसर्ग पोचूं नये अशी त्याची आज्ञा असे. त्यास कोणा उपद्रव देऊं

लागला आणि त्यानें शिवाजीचें नांव घेतलें कीं लोक त्याच्या केंसालाहि धक्का लावीत नसत. त्याजवर त्याच्या प्रजेचें जसें प्रेम होतें तशी त्याची तिला भीतीहि वाटत असे" (गार्डा). बार्थेलेमी कार हा फ्रेंच गृहस्थ इ. स. १६६८ त सुरतेस आला होता. त्यास सुरतेस फ्रेंच ईस्ट इंडिया कंपनीचा जनरल डायरेक्टर नेमण्यांत आलें होतें. तो सुरतेहून फ्रान्समध्यें इ. स. १६७१ त गेला व इ. स. १६७२ त परत सुरतेस आला. त्यानें चौल बंदरास इ. स. १६७३ त भेट दिली होती. तो लिहितो :—

"शिवाजीनें पोर्तुगीजांना हुसकून लावून जुनें चौल आपल्या ताब्यांत घेतलें होतें; आणि तेथें आपला सुभेदार भोंवतालच्या मुलुखाची व्यवस्था पाहण्याकरितां नेमला होता. पोर्तुगीजांच्या नव्या चौलापेक्षां जुनें चौल पुष्कळ मोठें आहे. परंतु मांडणी व्यवस्थितः नाहीं व त्याला तटबंदीहि चांगली नाहीं. बहुतेक लोक मूर्तिपूजक (हिंदु) आहेत व बाकीचे मुसलमान आहेत. हा गांव समुद्रापासून सहा मैल दूर असला तरी व्यापाराला कमी सोयीचा नाहीं. कारण गांवापाशीं असलेल्या नदीनें गांव सुपीक बनला आहे व व्यापाराचीहि सोय झाली आहे. येथील व्यापारीहि श्रीमंत व ऐष-आरामांत राहणारे आहेत. नवें चौल पोर्तुगीजांकडे आहे. त्यांत त्यांचीं उद्यानें, घरें व शेतें असून त्यांभोंवतीं कित्येक मैल पसरलेला तट आहे. एवढा टापू सोडला कीं भोंवतालचा सर्व प्रदेश शिवाजीचा असल्यामुळें पोर्तुगीजांची मोठी कुचंबणा झाली आहे. भोंवतालच्या प्रदेशांत शिवाजीचे प्रजाजन राहतात, यांना पोर्तुगीज लोक मुळींच आवडत नाहींत."

## चौलचा सुभेदार

"मला शिवाजीच्या चौल येथील सुभेदारास भेटण्याशिवाय गत्यंतर नव्हतें. कारण आतां मला जमिनीवरून प्रवास करावयाचा असून तो विस्तीर्ण प्रदेश शिवाजीच्या राज्यांत मोडत होता. मी सुभेदारास भेटावयास गेलों तेव्हां त्यानें माझें हार्दिक स्वागत केलें. तो माणूस हिंदु, देखणा व उंच होता. मी फ्रेंच माणूस असून मला राजापुरास कामासाठीं जावयाचें आहे, राजापूर शिवाजीच्या राज्यांत आहे व तेथें फ्रेंच ईस्ट इ. कंपनीची वखार आहे, हें ऐकून सुभेदारानें आनंद प्रदर्शित केला व वाटेवरच्या अधिकाऱ्यांना माझा नीट बंदोबस्त ठेवण्यासाठीं मजपाशीं पत्रें

दिलीं. नंतर आम्ही बोलत बसलों असतां त्यानें किती तरी माहिती मला विचारली. फ्रान्सच्या राजाची सत्ता केवढी आहे, त्याचें सैन्य किती मोठें आहे, हें त्यानें मला विचारलें. मग मीं त्याला शिवाजीविषयीं माहिती सांगण्यास विनंती केली. तो म्हणाला, शिवाजीचा विचार सिंधूपासून बंगालपर्यंतचा मुलूख जिंकण्याचा आहे. त्याची महत्त्वाकांक्षा अमर्याद आहे आणि त्याचें सामर्थ्य महत्त्वाकांक्षेपेक्षांहि मोठें आहे. तो मोठा योद्धा आहे, मोठा राजकारणी आहे. कोणतेंहि कार्य हातीं घेण्यास व तें पार पाडण्यास समर्थ आहे. तो कितीहि मेहनत पडली तरी दमत नाही व अतिशय शूर-वीरापेक्षांहि कष्टाळू आहे. संकटें आलीं असतां त्याचें धैर्य वृद्धिंगत होतें आणि तो मोठाले प्रदेश जिंकण्यास निघतो, त्याचें कारण असें कीं, त्यांतील दुर्लंघ्य विघ्नें उल्लंघावयास सांपडावीं.

"सेनापति व सैनिक यांच्या कर्तव्यांचा अभ्यास त्यानें फार काळजीपूर्वक केला आहे. त्याचा विशेष अभ्यास तटबंदीचा असून त्यांत त्याची मति अत्यंत हुशार अशा इंजिनियरांनाहि मागें सारणारी आहे. त्यानें भूगोलहि तसाच अभ्यासिला आहे. त्याला नुसतीं नगरेंच काय, पण देशांतील खेडींपाडीं, जंगलें व प्रदेश पूर्णपणें माहीत आहेत. त्यानें त्यांचे बरोबर नकाशे ( Chart ) काढून घेतले आहेत. तो अत्यंत जागरूक असतो. व इतका तल्लख आहे कीं, शत्रूला कल्पनाहि येणार नाहीं, इतक्या थोड्या वेळांत तो एका देशांतून दुसऱ्या देशांत जातो. शिवाजी आपल्या शौर्यावर व सेनेवर भिस्त ठेवून असला तरी तो इतका चतुर आहे कीं, त्यानें आपलीं माणसें व हेर सर्व दरबारांत ठेवले आहेत. त्यांना तो माहिती पुरविण्याकरितां मोठाल्या रकमा देतो. ही माहिती त्याला इतकी तत्परतेनें देण्यांत येते कीं शेजारच्या राजांच्या दरबारांत काय मसलत ठरली आहे हें ती अमलांत येण्यापूर्वीच त्याला माहीत असतें.

"शिवाजीनें आपला मुलगा संभाजी यास औरंगजेबाच्या एका पुत्राशीं ( मुआझ्झम ) खलबतें करण्यास खंबायतेस पाठवून दिलें होतें. त्या दोघांचा स्नेह फार झाला होता. त्या दोघांचा स्वभाव, संवयी व वय समान असल्यामुळें शहाजादा त्याजबरोबर खुल्या दिलानें बोलत असे. आपणास बापाकडून कसा जाच होतो व तो आपल्याशीं कसा कपटानें वागतो,

त्यामुळें औरंगजेबाचे उमराव आपला कसा द्वेष करतात, म्हणून दिल्ली दरबार सोडून आपण इकडे कसे निघून आलों हें सर्व शहाजाद्यानें संभाजीस सांगितलें. तसेंच इकडील मोगलांचे सैनिक व सरदार आपणास अनुकूल असल्यामुळें आपण म्हणूं त्या वेळीं बादशहाविरुद्ध उठतील हेंहि त्यानें त्यास निवेदिलें.

धाकटा शिवाजी (संभाजी) यानें शिवाजीस ही बित्तंबातमी कळविल्यावर त्यानें त्याचा फायदा औरंगजेबाविरुद्ध कसा घ्यावा याचा मंत्र त्यास देऊन आपल्या राजनीतींत संभाजीस तयार होण्याचें शिक्षण दिलें.

शिवाजीनें हा मुलुख नव्यानें जिंकला असूनहि त्यांतील पोर्तुगीज, रामनगरचा कोळी राजा इत्यादिकांच्या सत्ता त्यानें कां राहूं दिल्या यांचें कोडें कार यास पडून त्यानें त्याचा खुलासा शिवाजीच्या सुभेदारापासून चौकस करून घेतला. तो म्हणाला, 'यांत शिवाजीचें राजकारण आहे. त्यानें मजबूत व नाक्याचीं अशीं सर्व ठिकाणें घेतलीं असून ज्यांना तटबंदी नाहीं व ज्यांत संपत्तीशिवाय विशेष कांहीं नाहीं अशीं ठिकाणें मुद्दाम मोकळीं सोडलीं आहेत. त्याचा त्याला व्यापाराच्या दृष्टीनें उपयोग होतो आणि शांततेचा मोबदला म्हणून शिवाजीला जेव्हां विजापूरकर वा मोगल यांवर हल्ला करावयाचा असतो तेव्हां ते शिवाजीच्या शत्रूंना द्रव्यबळ व मनुष्यबळ मिळूं देऊं शकत व इच्छीत नाहींत. यांतील कांहीं ठिकाणें इतकीं क्षुल्लक आहेत कीं तीं शिवाजीस न घेतांहि आपलींच वाटतात.' सारांश, शिवाजीचा दरारा मोठा असून त्याचे ग्रह उच्चीचे आहेत. माझ्याबरोबर माझ्या प्रवासांत शिवाजीचे अधिकारी फारच मित्रत्वानें व सलोख्यानें वागले."

## प्रकरण सातवें

# शिवाजीची युद्धनीति

साम, दान, दंड, भेद अशी चतुर्विध युद्धनीति प्राचीन काळापासून भारतास अवगत आहे. या चार प्रकारांत छद्म या पांचव्या प्रकाराचा समावेश करणें भाग आहे. मुसलमानांच्या युद्धनीतींत हा पांचवा प्रकार होता, तोच शिवाजीनेंहि आपल्या युद्धनीतींत घेतला. शिवाजीनें स्वराज्य मिळविण्यास सुरुवात केली तेव्हां तो वयानें लहान होता, तसेंच त्याचें सामर्थ्यहि लहान होतें. मोगल व विजापूरकर यांच्याशीं तुलना करतां त्याचें सामर्थ्य त्या दोन राजसत्तांपेक्षां शेवटपर्यंत कमीच होतें. शिवाजीचें सामर्थ्य जेव्हां शिखरास पोचलें तेव्हां सभासदाच्या माहितीप्रमाणें त्याजपाशीं १०५००० स्वार व एक लक्ष पायदळ होतें. म्हणजे घोडदळ व पायदळ हीं दोन्ही संख्येच्या प्रमाणांत बरीचशीं बरोबरीचीं असून पायदळापेक्षां घोडदळ थोडेसें अधिकच होतें. शिवाजी इ. १६७८ त कर्नाटकाच्या स्वारीवर गेला तेव्हां त्याजबरोबर २० हजार स्वार व ४० हजार पायदळ होतें.

शिवाजीला वेढा घालून गड घेतांना पायदळाचाच मुख्यतः उपयोग होत असे. याच मुलुखगिरीच्या वेळीं घोडदळ उपयोगी पडे. पायदळापेक्षां घोडदळ केव्हांहि जास्ती खर्चाचें. कारण त्यांत घोडा व राऊत या दोघांनाहि पोसावें लागे. पण शत्रूचा पाठलाग चुकविण्यास, अचानक जाऊन शत्रूवर

छापा घालण्यास आणि शत्रु येण्याच्या आंत गांव लुटून पसार होण्यास घोडदळाची आवश्यकता फार असे. अशा परिस्थितींत साम, दान, दंड, भेद व छद्म वा दगा या पंचविध साधनांपैकीं जें साधन ज्यावेळीं अधिक फलदायक त्या साधनाचा त्यावेळीं त्यानें अवलंब करावा. हें करतांना कार्याच्या शुद्धतेवर त्याची नजर असे, साधनशुद्धतेवर नसे.

त्याच्या राजकारणाची सुरुवात भेदापासून झाली. कोंडाणा किल्ला आदिलशाहीचा होता. किल्ला घेणें हें काम नेहमींच बिकट. कित्येक महिने मोठ्या सैन्यानिशी वेढा घालावा, हजारों सैनिक मृत्युमुखीं द्यावे तेव्हां किल्ला सर व्हावयाचा. म्हणून मोगल काय किंवा विजापूरकर काय, किल्ला घेतांना शक्य तितकी भेदावर भिस्त ठेवीत. त्यांच्या तुलनेनें शिवाजीचें बळ प्रारंभीं काय, अगदीच क्षुल्लक. या कारणानें त्यानें कोंडाणा भेदानें घेतला. पुरंदर गडहि आदिलशाहीचा, याजवरील प्रमुख नीलकंठराव मरण पावला. त्याच्या पश्चात् त्यांचे पुत्र आपसांत भांडूं लागले. त्याचा फायदा घेऊन शिवाजीनें त्यांना कैद केलें व गड आपलासा केला.

भेदाबरोबर छद्म किंवा कपटनीतीचाहि अवलंब त्यानें प्रसंग पाहून केला. जावळींत चंद्रराव मोरे राज्य करीत होता. त्याजपाशीं गड, कोट व दहाबारा हजार लष्कर होतें. त्याजपुढें आपला निभाव लागणार नाहीं असें पाहून त्याजकडे शिवाजीनें रघुनाथ बल्लाळ सबनीस यास पाठविलें. त्यानें चंद्ररावाची एकांतीं भेट घेऊन प्रसंग पाहून चंद्रराव व त्याचा भाऊ सूर्याजी-राव यांस कट्यारीचे वार करून ठार मारलें. सुपे महालाचा कारभारी संभाजी मोहिता यास शहाजीनें नेमलें होतें, तो शहाजीचा मेहुणा व शिवाजीचा सावत्र मामा. शिवाजी शिमग्यांत पोस्त मागण्याचें ढोंग करून त्याच्या भेटीस गेला, आणि मामास कैद करून सुपे परगणा शिवाजीनें घशाखालीं घातला.

अफजलखान व शाइस्ताखान या दोघांचीं सैन्यें प्रचंड व श्रेष्ठ प्रतीचीं. त्यांजबरोबर लढल्यास आपला चुराडा उडेल या शंकेनें शिवाजीनें युद्ध-प्रसंग टाळून अफजलखानास भेटींत वधिलें व शाइस्ताखानावरील छाप्यांत त्याचीं बोटें तोडून त्याला पुणें सोडून पळून जावयास लावलें. यांपैकीं दुसऱ्या प्रसंगीं त्यानें कपटनीतीच अवलंबिली असें म्हटलें पाहिजे.

अफझलखान व शाइस्ताखान यांजवरील प्रसंगानें जयसिंग शहाणा झाला. त्याजपुढें कपटाची मात्रा चालणार नाहीं अशी खात्री झाल्यामुळें शिवाजी शेवटीं सामास तयार झाला व त्यांतील एक अट म्हणून आग्र्यास औरंगजेबाच्या भेटीस गेला.

रुस्तुमजमा हा विजापूरकरांच्या प्रमुख सेनापतींपैकीं एक होता. त्याजकडे हुकेरी, कारवार व राजापूर हे प्रांत जहागीर असल्यामुळें त्याची शिवाजीच्या दक्षिण कोंकणांतील मुलखास वारंवार पीडा होत असे. ती टाळण्याकरितां शिवाजी त्याजवर दानाचा वर्षाव करी म्हणजे त्यास लांच देऊन खुष ठेवी.

इ. स. १६७६ च्या सुमारास विजापुरी सरदारांत अफगाण पक्ष व दक्षिणी पक्ष अशी फूट पडली. दक्षिणी पक्षाचे पुढारी शेख मिनाज़, सिद्दी मसाऊद, सर्जाखान आदि होते. आणि बहलोलखान अफगाण पक्षाचा पुढारी होता. या वेळीं मोगल सेनापति बहादूरखान शिवाजी व विजापूरकर यांविरुद्ध आला असून त्यानें दक्षिणी पक्षास वश करून घेतलें. शिवाजी दक्षिणी पक्षाचा पुढारी होता. त्याला बहादूरखान हा दक्षिणी पक्षाच्या मदतीनें आपणांस बुडविणार असें दिसतांच त्यानें बहादूरखानाची मूठ दाबून त्याजबरोबर सख्य जोडलें.

### गनिमी कावा

मराठ्यांच्या एका विशिष्ट युद्धपद्धतीस गनिमी कावा म्हणतात. गनीम म्हणजे शत्रु, त्याच्याशीं करावयाचा कावा तो गनिमी कावा. या युद्धपद्धतींत शिवाजी अगदीं तरबेज होता. किंबहुना त्या पद्धतीचा तो गुरु होता असें म्हटलें तरी चालेल. गनिमी कावा म्हणजे शत्रूला तोंड देऊन न लढतां त्याच्या भोंवतालीं घिरट्या घालून त्याची रसद तोडणें, त्याच्या सभोंवारचा मुलूख बेचिराक करून त्याला अन्नपाणी मिळूं न देणें, तो युद्धांत गुंतला असतां त्याच्या राज्यांत शिरून लूटमार करणें, या उपायानें त्याला आपल्या राज्याच्या रक्षणार्थ परत जाण्यास भाग पाडणें व त्याच्या छावणीवर वारंवार छापे घालून त्याचें बळ छाटणें. या पद्धतीचा अवलंब दुर्बल पक्षाला प्रबल पक्षाविरुद्ध करावा लागतो. यास विजयाचें धोरण न म्हणतां बचावाचें वा आत्मरक्षणाचें धोरण म्हणतां येईल. या धोरणास डोंगराळ व झाडीचा

प्रदेश सोयीचा. शिवाजीचें कोंकण व मावळ या प्रदेशांतील राज्य या धोरणास सोयीचें होतें. फत्तेखान, अफजलखान, रुस्तुमजमा, सिद्दी जोहार, शाहस्ताखान, जयसिंग इत्यादि सरदार त्याजवर चाल करून आले तेव्हां शिवाजीनें हेच डावपेंच लढविले. त्या योगानें त्याचा कांहीं काल बचाव झाला इतकेंच; पण त्याला शत्रुपक्षाचा पुरा मोड कधींच करतां आला नाहीं.

विजापुरावर दिलीरखानानें स्वारी केली व त्याजविरुद्ध मसाऊद यानें शिवाजीस मदतीस बोलावलें. दिलीरखान अगदीं विजापुराला येऊन भिडला होता. शिवाजी विजापुरास गेल्यावर दिलीरखानाशीं दोन हात करण्यापासून फायदा नाहीं असें दिसून येतांच मोगलांच्या मुलखांत शिरून लूटमार करूं लागला. त्यानें या वेळीं फारच मोठी धूम मांडली. तिचें वर्णन त्यानें व्यंकोजीस लिहिलेल्या पत्रांत इत्थंभूत केलें आहे. तेंच गनिमी कावा युद्ध-पद्धतीचें अधिकृत वर्णन होय. तो लिहितो :-

"दिलेलखान विजापूरची पातशाही कमकुवत देखोन जोरावरी धरून विजापूर घ्यावें या मतलबें विजापुरावर चाल केली. भिमा नदी उतरून शहरानजिक एऊन भिडला. हे वर्तमान अलीशान मसउदखान यांनीं आम्हास लिहिलें कीं गनिमे जोरावरी बहुत धरली आहे. एऊन मदत केली पाहिजे. त्यावरून आम्ही तेच क्षणीं स्वार होऊन मजली दर मजली पनालियास आलो. सारी कूळ जमेती जमा करून खासा लष्करानिशी विजापुरासन्निध गेलो. विचारे पहातां गनीम कट्टा. त्याहीमध्यें पठाण जाती हट्टी, याशी हुन्नरेच करून खजील होऊन नामोहरम होय तो हुन्नर करावा. म्हणून ऐशी तजवीज केली कीं त्याचें मुलकांत फौजाचा पैसावा करून ओढ लावावा. त्यावरून दिलेलखानास ती (न) गावांचें अंतरें सोडून भिमानदी उतरून तहद जालनापूर पावेतो मुलूख तारख्त ताराज करीत चाललो. जालनापुरास जाऊन चार दिवस मुक्काम करून पेठ मारली. बहूत मालमत्ता (हाती) लागली. जालनापुरास म्हणजे औरंगाबादेहून चार गांवे ते जागा शहाजादा असता त्याचा हिसाब न धरितां पेठ लुटली. सोनें, रुपें, हती, घोडे, यांखेरीज मत्ता बहुत सांपडली. ती घेऊन पट्टागड तरकीस स्वार होऊन कुच करून येता, मध्यें रणमस्तखान, व आसफखान व जाबीत-खान असेच आणीक पांच सात उमराऊ आठ दहा हजार स्वारांनिशी

आले. त्यास शाहाबाजीच्या हुन्नरे जैशी तंबी करून ये तैशी तंबी करून घोडे व हत्ती पाडाव करून व पटियास ( पट्टा गड ) आलो. मागती लष्कर मुलकांत धुंदी करावयास पाठविलें ! ! "

पण गनिमीकाव्यानें शत्रूचा पुरा निःपात होत नाहीं याचा अनुभव याहि वेळीं आल्यावांचून राहिला नाहीं. शिवाजीनें इतकें केलें तरी अली-शानाची किताबती शिवाजीस आली कीं, 'या जागाहून गनीम उखळत नाहीं. बहुतच बळ धरून कोटा नजीक भिडला आहे. ए समयीं येऊन मदत करून पातशाही राखिली पाहिजे.'

शिवाजी व त्याचें सैन्य गनिमीकाव्यांत तरबेज होतें, याचा अर्थ असा नव्हे कीं, मराठे पळपुटे व मरणाला भिणारे होते. मृत्यूविषयीं बेफिकिरी हें तर मराठ्यांचें ब्रीद होतें. त्यासंबंधीं त्यांचा एक श्लोक प्रसिद्ध आहे. तो सभासदानें आपल्या शिवचरित्रांत दिला आहे व पुढें पेशवाईतहि थोरल्या माधवराव पेशव्याच्या तोंडीं तो होता –

जितेन लभते लक्ष्मीं मृत्युनापि सुरांगनाः।
क्षणविध्वंसिनी काया का चिंता मरणे रणे ॥

शिवाजीच्या गनिमी काव्याचीं वर्णनें बखरींतून अनेक आलीं आहेत. तीं अतिशयोक्तीचीं वाटून आपला त्यांजवर विश्वास बसत नाहीं. त्याचें एक कारण असें सांगण्यांत येतें कीं, बखरी या समकालीन नसून शिवाजीनंतर पुष्कळ वर्षांनीं लिहिलेल्या आहेत. पण कास्म ड गार्डा हा पोर्तुगीज लेखक शिवकालीन होता. त्यानें लिहिलेलीं वर्णनें अगदीं बखरींतल्याप्रमाणें आहेत. त्यांवरून बखरींतून ऐकींव म्हणून लिहिलेल्या कथांत तथ्यांश पुष्कळ असला पाहिजे असें मानण्यास प्रत्यवाय नाहीं. यासाठीं या ठिकाणीं गार्डाच्या वर्णनांतील कांहीं मासलेवाईक प्रसंग वाचकांस सादर करतों.

## गुप्तवेषांत शिवाजी

मुसलमानांच्या लष्करी छावणींतील अन्तर्गत व्यवस्था शिवाजी पुढीलप्रमाणें समजून घेई. " तो अंगावरचे सगळे कपडे काढून लंगोटी लावलेला माणूस शिबिरांत पाठवी. त्यानें डोक्यावर गवताचा भारा घेऊन खानाच्या छावणींत जावें व गवत विकण्याकरितां पागेची वाट धरावी

आणि जातां-येतां शिबिरांत जाण्याच्या व येण्याच्या वाटा नीट पाहून मिळेल ती माहिती आणावी. ही माहिती अपुरी वाटल्यास शिवाजीनें स्वतः नेताजीस बरोबर घेऊन शिबिरांत गवत विकावयास जावें. तेथें जात असतां शत्रूचा विश्वास बसण्याकरितां त्यानें आपणास कशा जखमा केल्या याविषयीं त्यांनीं आपसांत गोष्टी बोलाव्या, आणि चोहोंकडे बारीक नजरेनें टेहेळणी करावी. तिला हवा तितका वेळ न मिळाल्यास भारे सुटल्याचें मिष करून तेथेंच बसावें. आणि ते बांधतां बांधता आणखी कांहीं हेरून ठेवून निघून यावें." शाइस्तखानावर छापा घालण्यास जाण्यापूर्वी शिवाजी त्याच्या शिबिरांत याच मिषानें जाऊन तेथील जागा नीट पाहून आला असला पाहिजे.

"एकदां विजापूरकराच्या सैन्यानें घाटाची नाकेबंदी केली होती. आणि शिवाजी घाटाखालीं अडकला होता. त्याला घाट चढून सैन्यानिशीं देशावर यावयाचें होतें. त्यासाठीं त्यानें आपली झालेली कोंडी पुढील उपायानें फोडली. त्यानें आपल्या सैन्याच्या लहान टोळ्या करून एका मागून एक टोळी वेगवेगळ्या वाटांनीं घाटावर पाठविली. एका टोळींतील सैनिकांनीं प्रथम चौकीपाशीं येऊन बसावें. त्यांनीं दमल्याचा बहाणा करावा व कां बसलांत म्हणून चौकीवरील शिपयांनीं विचारल्यावर आपण तुमच्या सैन्यांत भरती होण्यास आलों आहों असें सांगावें. नंतर दुसऱ्या टोळीनें दुसरीकडून चौकीपाशीं यावें व शिपायास म्हणावें 'त्या चांडाळ शिवाजीनें आमचें गांव लुटलें नि आमचीं माणसें मारलीं हो! आम्हीं तेथून कसेबसे सुटून आलों आहों. आम्हांला त्याजवर सूड घ्यावयाचा आहे.' पहाऱ्यावर विजापुराकडील एकंदर तीस शिपाई होते. शिवाजीचे सैनिक होत होत तिसांना पुरून उरतील इतके जमले. त्यांतील कांहींनीं विजापुरी शिपायांस बोलण्यांत गुंतवून बाकीच्यांनीं त्यांस वेढलें व सर्वांनीं मिळून त्यांस ठार केलें. असल्याच हिकमती इतर चौक्यांवर करून शिवसेनेनें सारे शिपाई लंबे केले व बाकीच्यांना पळवून लावून घाटामधील वाटा मोकळ्या केल्या.

"शाइस्ताखान शिवाजीस जिंकण्यास आला असतां त्याच्या सैनिकांनीं शिवाजी कसा तो पाहिला नव्हता. म्हणून मोंगलांच्या सैन्यांतील सर्वांना शिवाजीचे सैनिक शिवाजीच वाटत असत. पुरंदराकडून शाइस्ताखान

पुण्याकडे येत होता व त्याच्या छावणीवर सारखे छापे घालून नेताजी त्यास हैराण करीत होता. शिवसेनेच्या तुकड्या करण्यांत आल्या असून त्या कोठून, कशा व केव्हां येतील याचा नेम नसे. शिवाजीचे सगळे सैनिक शरीरानें व पोशाखानें सारखेच दिसत. या कारणानें शिवसेना छापा घालावयास आली कीं मोंगलांच्या छावणींत 'शिवाजी आले' असा ओरडा उठे." सारांश, शिवाजी हें सामान्यनाम होऊन मराठे म्हणजेच शिवाजी असा समानार्थक शब्द बनला.

तुकारामबुवांची कथा लोहगांवास चालल्याची व कथेस शिवाजी आल्याची एक आख्यायिका आहे. ही वार्ता समजतांच मुसलमान सरदार शिवाजीस पकडण्यास आला. पण त्याला सभामंडपांत जिकडे तिकडे शिवाजीच दिसले. शिवाजी आपण ओळखला जाऊं नये म्हणून आपण हल्लीं तसबिरींत पाहतों तसा विशिष्ट पोशाख एरवीं न करतां आपल्या लोकांत मिसळत असावा व त्यामुळें सारेच शिवाजी असा मुसलमानांना भ्रम पडून तो वरील आख्यायिकेंत सांगितल्याप्रमाणें सुटून जात असावा.

तथापि सर्वकाल गनिमी काव्यानें शिवाजीला लढणें शक्य नसे. गनिमी काव्यानें लढतांनाहि त्याला सामन्यास उभें राहून शत्रूच्या छातीला छाती भिडविण्याची पाळी येई. पण त्याहि कसोटीस शिवसेना उतरल्याचीं उदाहरणें थोडींथोडकीं नाहींत.

## मैदानी लढाया

(१) अफजलखानाच्या वधानंतर राजाच्या लष्करी लोकांनीं व मावळे लोकांनीं पायउतारा होऊन त्याच्या सैन्याशीं भयंकर मारामारी केली व त्यास पळतां भुई थोडी करून सोडली.

(२) पुरंदरापाशीं मुरारबाजीनें सातशें माणूस घेऊन दिलीरखानाच्या पांच हजार पठाणांशीं युद्ध केलें. त्यांत शिवाजीचें पांचशें लष्कर ठार होऊन खासा मुरारबाजी कामास आला.

(३) सुरत लुटून परत येतांना शिवाजी वाटेंत वणी-दिंडोरीजवळ दहा हजार स्वारांनिशीं मोहबतखान व दाऊदखान या दोन मोंगल सरदारांशीं लढला. शिवाजीचे सेनापति प्रतापराव गुजर, सरनोबत व्यंकोजी

दत्तो व आनंदराव यांनीं मोठी कत्तल केली. तीन सहस्र मोंगल मारले, दोन प्रहर युद्ध झालें, तीन चार सहस्र घोडे पाडाव केले. फत्ते केली.

(४) मोरोपंत पेशवे यानें सालेरीकडे बारा हजार मावळे रवाना केले. दिलीरखान व बेलोलखान यांनीं वीस हजार स्वारानिशीं वेढा घातला होता. त्यांजबरोबर रामाजी पांगेरा व सातशें माणूस उघडे बोडके होऊन लढले. एकएकास वीस-वीस, तीस-तीस जखमा तीर व बरच्या यांच्या लागल्या. लोक मेले. त्यानंतर कोंकणांतून मोरोपंत व प्रतापराव वरघाट आले. एका तर्फेनें घोडीं व दुसऱ्या तर्फेनें मावळे एक होऊन चार प्रहर बेलोलखानाशीं लढले. इखलासखान व बेलोलखान पाडाव झाले (सभासद).

शिवाजी शत्रूच्या हालचालींची बातमी काढण्यांत फार सावध होता. बहिरजी नाईक हा त्याच्या गुप्त हेरांचा नायक प्रसिद्ध आहे. शत्रूचीं निरनिराळ्या ठिकाणीं असलेलीं सैन्यें एकत्र येण्यापूर्वी त्यांपैकीं एका सैन्याला अकस्मात् गांठून धूळधाण उडविल्यानें पुढील मोठें युद्ध व त्यानें होणारी मोठी प्राणहानि टळते. हें तत्त्व लक्षांत घेऊन शिवाजीवर विजापुराहून चालून येणाऱ्या बहलोलखानास सिद्दी मसाऊद, अबदुल अजीज व खिदिरखान मिळण्यापूर्वी त्यांजवर पन्हाळ्याहून प्रतापराव, आनंदराव, कृष्णाजी भास्करप्रभृतींच्या हाताखालीं सैन्य देऊन त्यानें रवाना केलें. त्यांनीं बहलोलखानास एकट्यालाच जतेजवळ उमराणी गांवीं म्हणजे ऐन मैदानी प्रदेशांत गांठून त्याजबरोबर अगदीं अटीतटीचा सामना दिला. उभय पक्षांकडील घोडदळ व पायदळ यांचें चार घटका मोठें युद्ध झालें. बाण, तलवार, भाले इत्यादि आयुधांचा सर्रास मारा करण्यांत आला. तरवारीला तरवार व छातीला छाती भिडून उभयपक्ष लढले. दिपाजी राऊतराव व कृष्णाजी भास्कर नागव्या तरवारी उगारून चिलखत घातलेल्या बरकीच्या अंगावर तुटून पडले. उलट बरकीनें मोठें धनुष्य उचलून दिपाजीच्या अंगावर बाण सोडला. तेव्हां दिपाजीचा घोडा बाणानें प्राणास मुकला. मग दिपाजी दुसऱ्या उत्तम घोड्यावर स्वार झाला. त्या घोड्याच्याहि कुशींत, पाठीवर तरवारीचे तीन घाव बसले. तरी तो घोडा डगमगला नाहीं. नंतर दिपाजीनें बरकीला खांद्याच्या उघड्या सांध्यांवर प्रहार करून भूमीवर पाडला आणि दिपाजी आपला जखमी घोडा सोडून बरकीच्या घोड्यावर

बसला. बरकीच्या मृत्यूनें बहलोल दुःखी झाला. पण त्याला न धरतां प्रतापरावानें जाऊं दिलें. मागाहून कृष्णाजी भास्करानें शत्रूचे हत्ती, घोडे व रथ यांचें मिश्र सैन्य लुटलें ( पर्णालपर्वतग्रहणाख्यान ).

शिवाजीपेक्षां त्याच्या सेनापतींनींच अधिक युद्धप्रसंग केले. मोठमोठाल्या लढाया त्यांनींच मारल्या आणि तें स्वाभाविक होय. पुढाऱ्याचा मुख्य गुण हाच आहे. जो सेनापति आपल्यासारखे नवे सेनापति निर्माण करतो तोच खरा सेनानी होय. या दृष्टीनें प्रतापराव, आनंदराव, नेताजी, तानाजी, मोरोपंत, हंबीरराव यांसारखे कैक सेनापति शिवाजीच्या तालमींत तयार झाले व त्यामुळें स्वराज्य-संपादनाचा त्याजवरील भार पुष्कळ हलका झाला. तरी त्यानें स्वतः फोंडा किल्ला निकरानें लढून विजापूरकरांपासून घेतला. कर्नाटकाच्या मोठ्या स्वारीवर तो जातीनें गेला. त्याला धाडसाची फार हौस होती. त्या कामीं तो स्वतःचा जीव आनंदानें धोक्यांत घालीत असे. अफजलखानाचा वध व शाइस्ताखानावरचा हल्ला हीं धाडसीं कृत्यें दुसऱ्या कोणावर न सोपवितां त्यानें स्वतः मोठ्या शिताफीनें पार पाडलीं.

जशी साहसाची त्याला हौस होती तशी लुटीचीहि होती. लुटीवर त्याचे प्रतापरावासारखे सेनापति जात असले तरी इतरांपेक्षां त्यानें स्वतःच कितीतरी अधिक गांवें लुटलीं. पेठेचें मोठालें गांव तो लुटीसाठीं निवडीत असे. त्या दृष्टीनें गुजराथ, कर्नाटक यांप्रमाणें महाराष्ट्रांतील पेठेचे पुष्कळ गांव त्यानें लुटले. त्यांचीं नांवेंच सांगावयाचीं झाल्यास जुन्नर, अहमदनगर, कल्याण, भिवंडी, कारंजा, जालना, धरणगाव, चोपडें, राजापूर, मलकापूर यांचीं सांगतां येतील. त्या मानानें महाराष्ट्राबाहेरचीं गांवें अगदींच थोडीं. तीं सुरत, मुलगुंद, लक्ष्मेश्वर, गदग, हुबळी, बसनूर, श्रीरंगपट्टण हीं होत.

### लुटीचें तंत्र

शिवाजीनें लुटीचें एक तंत्रच बनविलें होतें. त्या तंत्रानें कल्याण, भिवंडी व जुन्नर हीं नगरें त्यानें कशीं लुटलीं याची खुलासेवार हकीकत कास्म ड गार्डा यानें दिली आहे. "शिवाजी मोंगली मुलुखांत जाळपोळ व लूट करी. कल्याण हें मोठें बंदर व व्यापारी पेठ. तेथील व्यापारी फार श्रीमंत. त्यामुळें शिवाजीस त्या नगरांत द्रव्यलाभ खूप झाला. कल्याणाहून तो भिवंडीस गेला. प्रथम गांवांत हिंडून जी लूट मिळाली ती त्यानें

घेतलीच. पण तेवढ्यानें त्याची तृप्ति झाली नाहीं. कारण त्याच्या अंदाजा-इतकी लूट त्यास मिळाली नाहीं. म्हणून तो आपल्याबरोबर कुदळी, फावडीं, पहारा व घमेली असलेले लोक घेऊन निघाला. जसें पायाळू माणसास भूगर्भांतील पाणी समजतें असें सांगतात, त्याप्रमाणें शिवाजीला धनिक लोक आपलें द्रव्य कोठें पुरून ठेवतात याचें उपजत ज्ञान होतें. त्या ज्ञानानें तो रस्त्यावरच्या घरांचें निरीक्षण करून विवक्षित घरापाशीं थांबून अमुक भिंतीचा अमुक भाग उकरा असें आपल्या कामगारांना सांगे आणि आश्चर्य हें कीं नेमका त्याच ठिकाणीं द्रव्याचा हंडा सापडून त्याला सोनें, मोहरा, पुतळ्या, नाणीं यांचा मोठा संचय हस्तगत होई.

"या रीतीनें भिवंडी लुटल्यावर जुनरावर जाण्याचा त्यानें बेत केला. पण आपण जुन्नरावर जाणार ही बातमी या कानाची त्या कानास समजूं देणें घातक असल्यामुळें निघण्यापूर्वी घाटाखालचा माणूस घाटावर जाऊं न देण्याकरितां त्यानें आपले अनेक सैनिक पाऊलवाटांनीं घाटावर पाठवून वाटा रोखून धरल्या. त्यांतील कित्येक वाटा अतिशय बिकट. दोन्ही बाजूंनीं डोळे फिरावे असे कडे तुटलेले. मधली वाट अगदीं अरुंद. एकाच मनुष्यानें जावें अशी. समोरून मनुष्य आल्यास एकानें सपशेल पालथें पडावें तेव्हांच त्याच्या पाठीवर पाय देऊन दुसऱ्यानें पलीकडे जावें.

"शिवाजी रात्रीं भिवंडीहून निघून उजाडतां जुन्नरच्या वेशीपाशीं आला. त्या वेळीं रात्रीच्या बंद केलेल्या वेशी पहाटे नुकत्याच उघडल्या होत्या. शिवाजीनें पुढें घोडदळ पाठवून दिलें होतें व आपण मागून पायदळ घेऊन गेला. लोकांनीं आपलें द्रव्य नित्याच्या अनुभवानें पुरून ठेवलें होतें. तरीहि त्यानें त्यांना छळून जितकें धन उकळतां आलें तितकें उकळलें. नंतर हवालदारालाहि छळलें. त्यानें सुभेदार कुतुबुद्दिन याचा व आपला पैसा त्यास काढून दिला. कुतुबुद्दिनाची ती जहागीर असून तिचे दोन वर्षांचे वीस लाख रुपये शिल्लक होते ते शिवाजीस मिळाले."

शिवाजींत मराठे, मुसलमान व युरोपियन या त्रिवर्गाचे गुण एक-वटले होते. तो निरलस, उद्योगी, धडाडीचा, शिस्तबाज, तडफदार, निर्व्यसनी, साध्या राहणीचा, चिकाटीचा, चलाख, मेहेनती, धूर्त, निश्चयी व विचारी होता. त्याच्या या गुणांची थोरवी इंग्रजांनींहि गाइली आहे. ते

लिहितात, "त्याचें शरीर वायुमय असून त्याला पंखहि आहेत असें म्हणतात. त्याच्या अंगीं भीमाचें सामर्थ्य आहे. आज तो एके ठिकाणीं असल्याचें खात्रीलायक समजावें तर १।२ दिवसांत तो दुसऱ्याच ठिकाणीं असल्याची बातमी यावी. शिवाजी आग्र्याहून सुटून आल्यामुळें शांततेची आशा नष्ट झाली आहे. तो आपला उद्योग इतक्या चतुराईनें करतो कीं बादशहाच्या संतापाची मात्रा त्याजपुढें चालत नाहीं. तो चलाख व धोरणी योद्धा आहे. तो मोठ्या चिकाटीनें व सावधगिरीनें लढतो. तो सरळ तोंड क्वचितच देतो. परंतु सर्व प्रकारच्या युक्त्या योजून असे छापे घालतो कीं त्यांत सिद्दीची ( जंजिरा ) बरींच माणसें जाया होतात. त्याच्या चळवळ्या स्वभावामुळें त्याच्या शेजाऱ्यांना शांतता लाभत नाहीं."

शिवाजीनें ज्यांच्या बळावर लहान-मोठे विजय मिळविले ते मावळे व मराठे उंचीनें खुजे वा बेताचे, शरीरानें सडपातळ पण काटक, चलाख, कष्टाळू व विलासशून्य होते. त्यांजपुढें पठाण, सिद्दी, मोंगल हे धिप्पाड, उंच, बलवान् पण मिजासी व सुखलोलुप होते. फ्रायर म्हणतो त्याप्रमाणें 'त्यांना आधी काळजी भोजनाची, मग लुटीची. त्यांना घोड्यावर ऐटींत बसावयास पाहिजे. त्यांच्या सरदारांना स्वतःचीं हत्यारें बाळगण्यास शागीर्द शिष्य लागतात. त्यांच्या बायका छावणींत त्यांजबरोबर हव्या. ते आपण होऊन शत्रूचा पाठलाग करणार नाहींत, पण त्यांजवर शत्रु चालून आला तरच ते जागे होतील.' हेच मुसलमानांचे दोष त्यांच्या नाशास कारण झाले. मराठ्यांचे गुण त्यांच्या यशास कारण झाले. शिवकालीन युद्धें कशीं होत याची कल्पना खालील वर्णनावरून येणार आहे.

## शिवकालीन हत्यारें

" युद्धांत पाश, भाले, तरवारी, पट्टे, फरस ( परशु ) मुद्गर, परिघ, त्रिशूळ, तोमर ( रवीसारखें ), गदा, धनुष्यें. बाणांचे भाते, ढाली, चक्रें, सुऱ्या, कट्यारी, कवचें, शिरस्त्राणें, चामड्याचे हातमोजे व पंजे, बंदुका व तोफा हीं आयुधें असत. पताका, ध्वज, बिरुदें, छत्र्या, चवऱ्या यांचाहि उपयोग करण्यांत येई. सैन्याच्या अग्रभागीं पताका घेतलेले योद्धे चालत. सैन्याबरोबर दुंदुभि, क्रचक, कहाळ, पणव, गोमुख, शिंगें, ढक्का ( डंका ) हीं वाद्यें असून तीं सैन्याचें कूच होतांना व योद्ध्यांत रणमद आणण्याकरितां

वाजवीत. दोन्ही सैन्यें एकमेकांस भिडण्यापूर्वी हीं वाद्यें वाजविण्यांत येत. तीं एकमेकांस भिडल्यावर योद्धे प्रतिपक्षांतील सेनापतींना वा सरदारांना ओळखून त्यांच्या नांवांनीं हांका मारीत. लढाईत धनुष्यें कशीं वापरीत याचें ज्ञान आपणांस नाहीं. पण त्या काळीं धनुष्य व बाण यांचा वापर फार असे. धनुष्यांतील बाण तरवारीप्रमाणें शत्रूचीं मुंडकीं उडविण्यास समर्थ असत. याशिवाय शत्रूच्या अंगावर फेंकावयाचे दारूचे बाण वेगळे असत. सेनापति भोंवतालीं गजसमूहाचा दुर्ग बनवून त्यांत उभे राहत. प्रमुख सैनिकांच्या अंगांवर अलंकार असल्यानें शत्रु पराभूत झाल्यावर या अलंकारांची लूटच शत्रूला पुष्कळ मिळे. कांहीं सैनिकांपाशीं जीं वाघनखें असत तीं प्रत्यक्ष वाघाचीं नसून लोखंडाचीं असत. वाघनख म्हणजे पोलादी हत्याराची रचना. पट्टींत पाव इंच अंतरानें बसविलेलीं चार तीक्ष्ण नखें. प्रत्येक नख सव्वा इंच लांबीचें असून त्यास तिन्ही बाजूंनीं शिरा व खालच्या बाजूस धार असते. नखें ज्या पट्टींत बसवितात त्या पट्टीच्या दोन्ही बाजूंस आंगठ्या असतात. हें हत्यार हातांत धरून सहज मुठींत लपवितां येतें."

भाला ही एक लांबलचक मजबूत मोठी काठी व तिला पुढें तीक्ष्ण पातें लावलेलें. भाल्याचा दांडा भक्कम पांच साडेपांच फूट लांब असून त्याचा परीघ चार इंचांचा असतो. या दांड्याच्या निमुळत्या टोंकाला भाल्याचें पातें तीन इंच खोल घातलेलें असतें. याची बाहेर असलेली लांबी दोन फूट एक इंच व दुधारी असते. हें शस्त्र घोड्यावरून वापरावयाचें असतें.

ढाल हें आपणांकडील एक महत्त्वाचें शस्त्र आहे. याचा उपयोग फक्त बचावाच्या कामींच होतो असें नाहीं. त्याला जर अणकुचीदार खिळे लावले असले तर हल्ला करण्याच्या वेळींहि त्याजकडून महत्त्वाचें कार्य होतें. कांहीं ढाली गेंड्याच्या कातड्याच्या असतात व कांहीं पोलादाच्या असतात. त्यांजवर सोन्याची नक्षीहि करतात.

आपणाकडील जुन्यांत जुनें शस्त्र धनुष्य. बडोद्याचे माणिकराव त्यांजजवळील संग्रहांतील धनुष्याविषयीं लिहितात, 'या धनुष्याची पट्टी मध्य भागांत दोन फुटांपर्यंत सरळ आहे व नंतर टोकांना वांकली आहे. धनुष्य धरण्यासाठीं पट्टीच्या मध्याला गोल मूठ ठेवलेली आहे. पट्टीच्या दोन्ही

टोंकाना खांचा असून त्यांतून बकऱ्याची तांत अडकविली आहे. तांतेच्या भोंवतीं रेशीम गुंडाळलें आहे. पट्टी दीड इंच रुंद व पोलादाची आहे.'

**पेषकवच** – योद्ध्यांपैकीं कित्येक डोक्याला जिरेटोप खोंवीत. कित्येक जण पटके घालून त्यांचे शमले पाठीवर सोडीत. या पोशाखांत अंगरख्या वरून कमरेभोंवतीं गुंडाळलेला रुमाल किंवा पट्टा व या पट्टयांतच कमरेचें हत्यार अडकविलेलें असे. त्याचें पातें एक फूट लांबीचें. त्यास पेषकवच म्हणत.

**कट्यार** – हा एक तर तरवारीचाच प्रकार. तिच्या पात्याची लांबी १० ते १४ इंच. तिच्या मुठीला दोन कांबी असून त्या दाबून धरावयाच्या.

**जंबिया** – याची लांबी ८ ते १० इंच. पातीं निरनिराळ्या आकारांचीं.

**माडू** – शत्रूंनीं भोंवतालीं गर्दी केली म्हणजे त्यांजपासून बचाव करीत करीत शत्रूची फळी फोडून जाण्याच्या कामीं याचा उपयोग. माडूच्या मध्यभागीं साधी मूठ व दोन्ही बाजूस प्रत्येकी ९ इंच पातें.

**पट्टा** – माडूचें जें कार्य तेंच कांहीं अंशीं पट्टयाचें. त्याचें पातें साधारणपणें ३$\frac{1}{2}$ फूट लांब असतें व १॥ इंचाहून जास्ती रुंद नसतें. पातें वळतें पण तुटत नाहीं. योद्धे हा पट्टा गर्दींत फिरवून बचाव करीत. 'तोंडाचा पट्टा' ही म्हण यावरूनच पडली.

**खांडा** – ही एक तरवारीचीच जात. खांडा कमरेस लटकावतात. त्याच्या पात्याची लांबी २ फूट २॥ इंच व रुंदी ३ इंचांपर्यंत. त्याला धार पुढील बाजूस व टोंकाला दोन्ही बाजूंस. खांडा तलवारीप्रमाणेंच वापरीत.

**बरछी** – हिलाच अंकुश म्हणतात. हत्तीला त्यानें टोंचून त्याजकडून कामें करवून घेत. गुरगुज ही एक तऱ्हेची गदा आहे.

**कडाबिन** – बंदुकीच्या जातीचें लहान हत्यार. लांबी १ फूट ७ इंच. तींत प्रथम दारू ठासतात व नंतर खडे, तांब्याचे तुकडे इत्यादि कठीण पदार्थ भरतात. बंदुकीप्रमाणें सरळ नेम धरून मारण्याचें हें हत्यार नव्हे. दोन्ही हातांनीं धरून गरंदिशीं वाटोळें फिरविल्यानें अधिक लोकांस मार देतां येतो.

**सोटा** – ही मोठी पोलादी काठी आहे. तिच्या आठ बाजूंना धारा व कांटे असतात. लांबी २–२॥ फूट.

**तीरं-कमठा** – म्हणजेच धनुष्यबाण. कमठा पोलादी असून त्यावरून तीर पल्ला घेतो.

**पंचहत्यार** – पांच हत्यारें बाळगणारा तो पंचहत्यारी. पेषकवच, जंबिया, कट्यार, कडाबिन इत्यादि पांच हत्यारें पंचहत्यारी अंगावर धारण करी.

युद्धास चाललेल्या लढवय्यांचीं वर्णनें पोवाड्यांतून पुढीलप्रमाणें आढळतात. ' खासा तीर जोडी उरी '; ' डेऱ्यासन्निध नगारखाना '; ' खांद्यावर भाले '; ' वाजति पट्टे खांडे खणखण '; ' बाणांच्या उंटावर कैच्या दारू गोळा '; ' दर तोफे संगें हत्ती छकड्यांची माळ '; ' डंक्यावर टिपरी पडतां हुशार झाले '; ' गजपृष्ठीं आदर्श अंबारी '; ' चोपदार ललकारी भारी '; ' भालदार नजर रखो महाराज म्हणे '; ' शिरीं शमले लावुनि निकरानें '; ' जंबुरे जोडुनि उंटावरतीं '; ' घोड्याला तंग तोबरी जिनबंद कोरी '; ' फक्कड सोटेवाले '; हें सर्वच वर्णन सर्वस्वीं शिवसेनेला लागू आहे असें नाहीं.

बाणांचे बंद बांधण्यास कातडें लागत असे. बाण करणारास बाणदार म्हणत.

इ. स. १६७९ त मोगलांची दक्षिणेवर स्वारी होणार अशी वार्ता शिवाजीस कळतांच त्यानें सर्व प्रकारची लष्करी तयारी करण्यास मोरोपंत पेशवे यांस सांगितलें. मराठ्यांचें मुख्य हत्यार भाला; त्याकरितां लागणाऱ्या काठ्या विशिष्ट प्रकारच्या असत. त्या रोहिड खोऱ्याच्या हद्दीवर, सह्याद्रीच्या कड्याखालीं व माथ्यावर, जावळी भागांत व वेळवंड खोऱ्यांत कड्याखालीं जें रान होतें त्यांतून दादाजी नरस प्रभु व बाजीप्रभु देश कुलकर्णी तर्फ हिरडस मावळ यांनीं कावळ्याच्या जंगलांतून ५।७ शे काठ्या काढून त्या शिवापूरच्या पागेकडे रवाना कराव्या अशी शिवाजीनें आज्ञापत्रें काढलीं व त्याप्रमाणें त्या काठ्या आल्यावर हजार-पंधराशें फळें व बूड भाल्यास तयार करावीं असें मोरोपंतास कळविलें.

## हेरगिरी

' शतक्रोशभवां वार्तां हरेदेकदिनेन वै '

– शुक्रनीति

अर्थ – शंभर कोसांवर घडलेलें वृत्त एका दिवसांत समजण्याची योजना राजानें करावयास पाहिजे.

हेर किंवा चर ठेवण्याची पद्धति भारतांत पुरातन कालापासून अवगत आहे. रामाला आपणाविषयीं लोक काय बोलतात हें समजून घेण्यास चर ठेवावे लागत. त्यांनीच आणिलेल्या बातमीवरून वनवासाहून परत आल्यावर कित्येक वर्षांनीं रामानें सीतेचा त्याग केला. जर प्रजाजनांचें मनोगत कळण्यास हेर हवे असत तर पर-राजांच्या हालचाली समजण्यास हेरांची जरुरी किती तरी अधिक पटींनीं असेल हें सांगावयास नकोच. शिवाजीचें हेरखातें त्याच्या इतर सैनिकी खात्याप्रमाणें अत्यंत कार्यकुशल होतें. त्याचा बहिर्जी नाईक हा हेर तर इतिहासप्रसिद्ध आहे. सुरतेची लूट करण्यास जाण्यापूर्वी सुरतेची कच्ची माहिती काढण्यासाठीं शिवाजीनें बहिर्जी नाइकासच पाठविलें होतें आणि त्याजकडून बित्तंबातमी कळल्यावरच तो सुरतेवर जाण्यास प्रवृत्त झाला.

अफजलखानाची जावळी खोऱ्यांत भेट घेण्यापूर्वी त्याच्या हालचालींची माहिती काढण्याकरितां आपला पांच सहस्र मावळ्यांचा एक सरदार विश्वासराव नानाजी प्रभु मुसेखोरेकर यास शिवाजीनें नेमलें होतें. तो दररोज़ रात्रीं फकिराचा वेश घेऊन खानाच्या छावणींत भिक्षेच्या मिषानें जात असे व अफजलखानाच्या बैठकींत जें खलबत चाले त्याची बारीक माहिती घेऊन येत असे ( शि. दि. पान १५९ ). कर्नाटकांतील दिग्विजयास निघण्यापूर्वी त्या प्रांतांत त्यानें असेंच हेरांचें जाळें पसरून ठेवलें होतें. सभासद लिहितो, "पुढें जितकीं शहरें मोगलाईत होतीं ते जागा चार पांच माणसें वेषधारी करून पाळतीस ठेविलीं. पाळती घेऊन दोघे खबर ध्यावयास यावें. दोघांनीं तेथे हुशार रहावे. मग लष्कर पाठवून हवेलिया, शहरें मारावीं. ही तजवीज केली." शिवाजीनें वर लिहिल्याप्रमाणें कित्येक शहरें लुटलीं. तीं लुटण्यापूर्वी तेथील संपत्ति, बंदोबस्त यांची बरोबर माहिती काढणें त्यास सर्व दृष्टींनीं इष्ट असेंच होतें.

मुंबईतील इंग्रजांकडील माहिती काढण्याकरितां शिवाजीनें सुंदरजी प्रभूची नेमणूक केली होती. तो शिवाजीच्या दूताची, तशी हेराचीहि कामगिरी बजावी. त्यानें एकदां भिकाऱ्याचें सोंग घेऊन मुंबईबेटांत प्रवेश केला. पण तेथील इंग्रज अधिकाऱ्यांना त्याचा संशय येऊन त्यांनीं त्याला अटक केली. व्यापारी पेशाच्या माणसाचाहि शिवाजी हेर म्हणून उपयोग करून

घेत असे. वल्लभ गंगादास या व्यापाऱ्यास सुरतेच्या मोगल सुभेदारानें शिवाजीचा हेर या संशयावरून पकडलें. शिवाजी भारतीयांनाच केवळ हेर म्हणून नेमी, असें नव्हे तर तो गोऱ्या लोकांचीहि त्या कामावर योजना करी. इ. स. १६६९ त दोन पोर्तुगीजांना शिवचर या अंदेशावरून पकडण्यांत आलें होतें.

शिवाजीनें सुरत लुटण्यापूर्वी बहिरजी नाइकासारख्या हेराकरवीं बित्तंबातमी आणलीच होती. त्याशिवाय त्यानें एक फार मोठी योजना केली होती. त्यानें आपले दोन हजार सैनिक, खलाशी यांस व्यापारी, वाणी, उदमी यांचा पोशाख देऊन कित्येक दिवस आधीपासून सुरत शहरास पाठविलें होतें. त्यांनीं शिवाजी येण्यापूर्वी कोठें कोणापाशीं किती संपत्ति आहे याची माहिती मिळवून ठेवून शिवाजी सुरतेंत येतांच त्यास पुरविली व त्यांच्याच मदतीनें शिवाजीला सुरतेंत अपार संपत्ति मिळवितां आली.

हेरांकडून त्याचप्रमाणे इतरांकडूनहि माहिती गोळा करण्याच्या कामीं शिवाजी अगदीं तत्पर असे. त्याचा जेथें मुक्काम पडे त्या स्थलाभोंवतालच्या रस्त्यावर तो आपले विश्वासू हेर ठेवी. दिवसा कोणीहि त्यास भेटावयास येत असल्यास त्याला आपल्याकडे ताबडतोब घेऊन येण्याचा हुकूम त्यानें पहारेकऱ्यांना दिलेला असे. तो त्या इसमाशीं बोलत बसे व त्याजपासून उपयुक्त असें कांहीं कळल्यास त्यास योग्य तें बक्षीस देत असे. यामुळें सर्व लोक त्याजवर खूष असत व त्याची मर्जी संपादण्यास झटत असत. जर त्यास त्या इसमानें एखादें पत्र वा दुसरी माहिती दिली तर तो त्या पत्राची व तें रवाना करण्यांत आल्याची तारीख टिपून ठेवीत असे.

### रामदासी व हेरगिरी

रामदासांचे शिष्य सर्वत्र फिरत असत व त्यांचे मठहि ठिकठिकाणीं असत. शिवाजी सारखा फिरतीवर असल्यामुळें ह्या शिष्यांना जर महत्त्वाची बातमी कळली तर ती त्यांनीं त्यास ताबडतोब पोचवावी हें नैसर्गिक होय. रामदासांचे समकालीन चरित्रकार गिरिधर यांनीं समर्थप्रताप ग्रंथांत जें लिहिलें आहे त्यावरून वरील तर्क करतां येण्यासारखा आहे. समर्थांचा कृष्णा नांवाचा शिष्य तापीतीरीं होता. जयराम कर्नाटकांत, जनार्दन सुरत प्रांतांत, श्रीधर नागपुराकडे रामटेक भागांत, भैरव गोकर्णाकडे व शिवराम

तैलंगणांत होता. ते त्या त्या ठिकाणीं जगदोद्धारण करीत असत. यांपैकीं कित्येक नाना कार्यभागाची विवंचना नाना राजकारण दीर्घसूचना करीत. ते "नाना देशकाळे प्रसंगें वर्तती। नाना राजयोगें राजकारणें करिती। नाना अध्यात्मग्रंथीं विवरणें विवरिती। विवेक-विचारें परमार्थ॥" असें दासविश्रामधामांत म्हटलें आहे.

हे असो काननीं विसावा घेत। शिष्यसमेळीं राहिले समर्थ। बोध शोध करिती अधिकारपरत्वे। धाडिती जाणत्या महंती करूं॥

सन्निध ठेविती आस्थावंता। आणवोन घेती चहूकडील वार्ता। नेणत्या बाळासी घालऊनि कित्ता। शहाणे करिती त्या कृपे॥ (शिवाजीची राजनीति, दा. वि. धाम, पृ. २१३).

समर्थ स्वतः प्रचलित राजकारणाविषयीं आस्था बाळगणारे होते हें निर्विवाद असल्यामुळें देशांत कोठें काय चाललें आहे याची माहिती मिळविण्यास साहजिकच उत्सुक असत. ती त्यास जसे त्यांचे शिष्य कळवीत, तसे शिवाजीस व शिवाजीच्या अधिकाऱ्यांस कळवीत असतीलच. लो. टिळकांच्या काळांत सरकारदरबारीं चाललेलीं खलबतें व कारस्थानें सरकारी नोकरहि त्यांस गुप्तपणें भेटून सांगत. यास पोलिसखातेंहि अपवाद नसे. तोच न्याय शिवकालास लागू केल्यास समर्थांच्या संघटनेचा त्यास किती उपयोग होत असेल याची कल्पना कोणासहि करतां येईल.

शिवाजीचे हेर बहुजनसमाजांत पसरले होते. इतकेंच नव्हे तर राजदरबारांतसुद्धां त्यानें आपले हेर पेरले होते. त्यांस तो विपुल द्रव्य देऊन राजी राखीत असे. हे हेर परराजांच्या दरबारांत ज्या गोष्टी घडत त्यांविषयीं माहिती इतक्या नियमितपणें देत असत कीं, ती त्यास वेळेवर मिळून शत्रूवर हल्ला चढविण्यास वा शत्रूकडून त्याजवर होणाऱ्या हल्ल्यास तोंड देण्यास तिचा उपयोग होत असे. विजापूरकर व मोगल यांजकडून त्याच्या जिवास अपाय करण्याचे प्रयत्न नेहमीं सुरू असत. त्यांपासून त्यानें आत्मरक्षण या युक्तीनें केलें (Foreign Biographies of Shivaji, page 246).

# प्रकरण आठवें

# शिवाजीचें प्रधानमंडळ

यद्यप्यल्पतरं कर्म तदप्येकेन दुष्करम् ।
पुरुषेणासहायेन किमु राज्यं महोदयम् ।।

— शुक्रनीति, अध्याय २, श्लोक १

अर्थ – काम लहानसें असलें तरी तें एकट्याच्यानें पार पडणें कठीण असतें, मग राज्यासारखें महत्कार्य एक माणूस दुसऱ्याच्या मदतीवांचून कसें करणार ?

शिवाजीनें आपलें प्रधान-मंडळ कोणता नमुना डोळ्यापुढें ठेवून निर्मिलें हा एक विवाद्य विषय आहे. त्यानें प्रधान-मंडळ निर्मिलें व तें अष्ट-प्रधानांचें होतें. तसेंच आठांचें मंत्रिमंडळ अल्लाउद्दिन बहामनी याचा पुत्र महमद याजपाशींहि होतें, यावरून त्याचीच पुनरावृत्ति शिवाजीनें काढली अशी कित्येकांची समजूत आहे. परंतु शिवाजी आपलें प्रधानमंडळ निर्माण करण्यापूर्वी महमद सुमारें तीनशें वर्षें होऊन गेला असल्यामुळें त्यावरून शिवाजीस अष्टप्रधानांची कल्पना सुचली असें अनुमान काढणें दूरान्वित होय. महमदाच्या अष्टप्रधानांत ( १ ) वकील उस सलतनह हा राजाचा मुख्य प्रातिनिधि, ( २ ) वझीर-इ-कुल हा मुख्य प्रधान, ( ३ ) अमीर-इ-जुमला हा

अमात्य, ( ४ ) वझीर-इ-अश्राफ हा सुमंत वा मंत्री, ( ५ ) नझीर हा दुय्यम अमात्य, ( ६ ) पिशवा हा दुय्यम प्रतिनिधि वा सचिव, ( ७ ) कोतवाल हा सेनापति, ( ८ ) सद्र-इ-जहान हा न्यायाधीश वा पंडितराव हे असत.

वरील बहामनी अष्टप्रधानांत व शिवाजीच्या अष्टप्रधानांत संख्येहून इतर साम्य फार थोडें आहे. शिवाजीचे मूळ हुद्दे जरी फार्सी होते तरी त्यांत पेशवा हा एकच हुद्दा बहामनी अष्टप्रधानांपैकीं दिसतो. बाकीचे सर्व हुद्दे अगदींच वेगळे आहेत. तथापि केवळ संख्येवरूनच शिवाजीचे अष्टप्रधान ही बहामनी अष्टप्रधानांची नक्कल समजावयाची तर त्यापेक्षां रामायणांत वर्णिलेल्या दशरथाच्या अष्टप्रधानांची ती नक्कल मानणें अधिक सयुक्तिक होय. त्यांत धृष्टि, जयंत, विजय, सुराष्ट्र, राष्ट्रवर्धन, अकोप, धर्मपाल व सुमंत्र यांची गणना वाल्मीकिमहर्षींनीं केली आहे. यांपैकीं सुमंत्र या एकट्याचेंच नामसादृश्य शिवाजीच्या सुमंताशीं दिसतें.

रामायणकालीन अष्टप्रधानांच्या पदव्यांचा अर्थ लावावयाचा तर विजय म्हणजे सेनापति, सुराष्ट्र म्हणजे राज्यांत शांतता व सुव्यवस्था ठेवणारा दंडनायक वा कोतवाल, अकोप हा न्यायाधीश, धर्मपाल हा पंडितराव व सुमंत्र हा परराष्ट्रीय खात्याचा वकील असावा. शिवाजीनें अष्टप्रधानांची घटना राज्याभिषेकाच्या वेळीं केली. ती त्यानें गागाभट्ट व त्याजजवळील विद्वान् व धर्मज्ञ ब्राह्मण यांच्या सल्ल्यावरूनच केली असली पाहिजे. शुक्रनीति ही त्या सर्वांस परिचित होती. तिच्यांत प्रकृतींची म्हणजे मंत्र्यांची एकूण संख्या दहापर्यंत दिली आहे. मंत्र्यांत पुरोहितास अग्रस्थान मिळालें असून त्यापुढें प्रतिनिधि, प्रधान, सचिव, मंत्री, प्राड्विवाक, पंडित, सुमंत्रक, अमात्य, दूत असे हुद्दे आहेत. या सर्वांत श्रेष्ठ पुरोहित. दशरथाचे पुरोहित वसिष्ठ होत. त्यांचीहि गणना रामायणांत मंत्रिमंडळामध्यें अग्रस्थानीं केली आहे.

पुरोहित हा नीतिशास्त्र, अस्त्रविद्या व व्यूहादि यांत कुशल असावा. त्याच्याखालीं प्रतिनिधि. त्यानें राजानें काय करावें व काय न करावें तें सांगावें. राज्याचा सर्व कारभार पाहणारा तो प्रधान. सैन्याची खडान् खडा माहिती असणारा तो सचिव. नीतिकुशल तो मंत्री. धर्मतत्त्व जाणणारा तो पंडित. लोक व शास्त्र यांची नीति ज्यास माहीत आहे तो प्राड्विवाक

( न्यायाधीश ), देशकालज्ञ तो अमात्य, आणि आयव्ययावरील मुख्य अधिकारी तो सुमंत्र.

शिवाजीपाशीं पुरोहित व त्याशिवाय अष्टप्रधान होते ते :–( १ ) मुख्य प्रधान, ( २ ) अमात्य, ( ३ ) मंत्री, ( ४ ) सुमंत, ( ५ ) सचिव, ( ६ ) पंडितराव, ( ७ ) सेनापति, ( ८ ) न्यायाधीश. यांत शुक्रनीतींतील प्रतिनिधि हें एकच पद कमी आहे. तें पुढें राजारामानें भरून काढलें. प्रधान म्हणजे मुख्य प्रधान. त्याचें काम शुक्रनीतींतील प्रधानाप्रमाणेंच होतें. पंडित व पंडितराव यांचीं कामें एकच. प्राड्विवाक म्हणजे न्यायाधीश. साचिव म्हणजे सेनापति. सुमंत म्हणजे सुमंत्रक हा परराष्ट्रमंत्री. अमात्य व मंत्री हे शिवाजीचे पदाधिकारी शुक्रनीतींतील पदाधिकाऱ्यांहून भिन्न कामें करणारे होते असें मानण्याचें कारण नाहीं. शिवाजीचा साचिव हा मुख्यतः राजपत्रें शोधणारा होता, सेनापति नव्हता. त्याचा सेनापति हा हुद्दा वेगळा होता. सारांश, शिवाजीनें शुक्रनीतीस धरूनच आपलें प्रधानमंडळ बनविलें. राजानें एकट्यानें सर्व राज्यकारभाराचा भार वाहूं नये हें तत्त्व फार प्राचीन काळींहि भारतांत सर्वमान्य होतें. त्यास मदतीस मंत्री घ्यावे लागत. राजा स्वतः धैर्यवान्, नीतिमान्, शूर, पराक्रमी, संयमी व विचारवंत असावा. परंतु हे सर्व गुण त्याच्या ठिकाणीं असोत वा नसोत, तथापि त्याचे मंत्री मात्र आपआपला राज्यकारभाराचा वांटा योग्य रीतीनें उचलण्यास सर्वस्वीं पात्र असले पाहिजेत. चातुर्वर्ण्यपद्धतीप्रमाणें गुणांची श्रेणीच वर्ण, आनुवंशिक गुण व गृहशिक्षण या दृष्टीनें लावावयाची झाल्यास सर्वसाधारण रीतीनें ब्राह्मण हाच सर्वश्रेष्ठ समजावा लागे; आणि आजहि वर्णाचा विचार न करतां राज्यकारभारांत यदृच्छेनें जे लोक प्रमुख पदांवर आढळतात त्यांत ब्राह्मणच बाहुल्यानें आहेत हें लक्षांत ठेवल्यास प्राचीन काळीं राजाच्या मंत्रिमंडळांत मुख्यतः ब्राह्मणच असावे असें तत्कालीन शास्त्रकारांनीं ठरविलें याबद्दल त्यांस कोणीहि विचारी माणूस दोष देणार नाहीं. म्हणून पुरोहितादि जे मंत्री राजानें नेमावयाचे ते मुख्य सेनापतीशिवाय बाकीचे ब्राह्मण असावे असें शुक्रनीतींत म्हटलें आहे. मात्र ब्राह्मण लायक असा न मिळाल्यास क्षत्रिय व क्षत्रिय न मिळाल्यास वैश्य नेमावा असें तो सांगतो. पण शूद्राची नेमणूक मंत्रिपदावर कधींच करूं नये यावर शुक्राचा कटाक्ष आहे. कारण

हा वैदिक संस्कारहीन असे आणि बाकीचे त्रैवर्णिक वैदिक संस्कारयुक्त असत. मुख्य सेनापति क्षत्रिय असावा; पण क्षत्रिय नच मिळेल तर ब्राह्मण असावा. तथापि वैश्यहि असूं नये. कारण वणिग्वृत्तीचा माणूस व्यवसाय-वैशिष्ट्यामुळें शूर निघण्याचा संभव कमी.

कोणी म्हणेल कीं सर्वच ब्राह्मण काय लायक असत ? त्यांत कोणीहि अपात्र नसेच कीं काय ? हा आक्षेप खरा आहे व तो लक्षांत घेऊनच शुक्र सांगतो, ‘ नुसत्या जातीनें व कुळानें मनुष्यास श्रेष्ठत्व येत नाहीं. लग्नाच्या व भोजनाच्या प्रसंगीं जात लक्षांत घेणें अवश्य आहे; म्हणून सत्यवचनी, गुणवान्, विख्यात, द्रव्यवान्, सत्कुलोत्पन्न, सुशील, सुकर्मा, निरलस, आपल्या स्वतःच्या कामापेक्षां धन्याचें काम अधिक चांगल्या प्रकारें करणारा अशास मंत्रिपदासाठीं पसंत करावा.

भृत्यं परीक्षयेन्नित्यं विश्वास्यं विश्वसेत्तदा। नैव जातिर्न च कुलं केवलं लक्षयेदपि। कर्मशीलगुणाः पूज्यास्तथा जातिकुलेन हि। न जात्या न कुलेनैव श्रेष्ठत्वं प्रतिपद्यते। विवाहे भोजने नित्यं कुलजातिविवेचनम्। सत्यवाग्गुणसंपन्नस्तथाभिजनवान् धनी॥ सुकुलश्च सुशीलश्च सुकर्मा च निरालसः। यथा करोत्यात्मकार्यं स्वामिकार्यं ततोधिकम्॥ (शुक्रनीति, अ. २) शिवाजीचें धोरण हेंच होतें. त्याच्या अष्टप्रधानांतील सेनापतीशिवाय बाकीचे सर्व मंत्री ब्राह्मणच होते. त्यांची नेमणूक त्यानें ब्राह्मण म्हणून केली नसून त्यांच्या पात्रतेवरून केली होती याची साक्ष त्यांची कामगिरीच जगास देत आहे.

सरकारकून म्हणजे मंत्री वा प्रधान; त्याविषयीं रामचंद्रपंत अमात्य लिहितात – सरकारकुनी कोणासहि एकदम देऊं नये. त्या पदावर कोणाहि माणसास त्याची परीक्षा करून खालपासून वाढवीत न्यावें. तो कुलीन, कर्तबगार, विवेकी, शासन व राजधर्मविशारद, पापभीरु, सेव्यसेवकभाव जाणणारा, दैवतैकनिष्ठ, दर्शनीय, दयाळू, शूर, धैर्यवान्, समंजस, स्पष्टवक्ता, निरलस, निराग्रही, निर्व्यसनी, निष्पाप, पुण्यशील, उद्योगी, कार्यसूची, अलालची, अहिंसक, साम, दाम, दंड, भेद, संधि, विग्रह, मित्रभेद, मित्र-संधानादि अनेक उपायांनीं शत्रुसंधानी, चतुर असा असावा.

त्या काळीं हल्लींप्रमाणें शिक्षण देऊन परीक्षा घेण्याची पद्धत नसल्यामुळें बापाच्या तालमींत तयार झालेल्यास त्याच्या जागेवर नेमण्याचा प्रघात

होता. अमात्यांचें मत या बाबतींत येणेंप्रमाणें :– " कुलीन, सन्मान्य अथवा थोर, परंतु परंपरागत सेवक ज्यांचे वडिलांनीं बहुत सेवा केल्या आहेत अशांस नांवाजावें हें उचित आहे. परंतु तो जर दुराग्रही, व्यसनी, एकाचे बहुमानें दुःख पावणारा, ईर्षा करणारा असा असला तर त्याचा त्याग करावा व त्याच्या भाऊबंदांत जो लायक असेल त्यास हातीं धरावें."

अमात्यांनीं सांगितला हा ध्येयवाद झाला. तो डोळ्यापुढें ठेवून शिवाजीनें आपल्या प्रधानमंडळाची निवड केली होती हें स्पष्ट आहे. रामचंद्रपंत अमात्य विद्वान् दिसतो. तसेंच विद्वान् पुरुष शिवाजीच्या प्रधानमंडळांत होते. त्याचें प्रधानमंडळ पुढीलप्रमाणें होतें :–

( १ ) पेशवा वा मुख्य प्रधान, ( २ ) मुजुमदार वा अमात्य, ( ३ ) वाकनीस वा मंत्री, ( ४ ) डबीर वा सुमंत, ( ५ ) सुरनीस वा सचिव, ( ६ ) पंडितराव वा राजपुरोहित, ( ७ ) सेनापति, ( ८ ) न्यायाधीश. त्यांचीं कामें :–

**मुख्य प्रधान** – यांनीं राजकार्य करावें, राजपत्रावर शिक्का करावा, सेना घेऊन युद्धप्रसंग व स्वारी करावी, मुलूख ताब्यांत येईल तो रक्षून व त्याचा बंदोबस्त करून आज्ञेंत वर्तावें. सर्व सरदारांनीं त्याजबरोबर जावें.

**अमात्य** – यांनीं राज्यांतील जमाखर्चाची चौकशी करावी. दप्तरदार व फडणवीस त्याच्या स्वाधीन असावे. लिहिणें चौकशीनें आकारावें. फडणिसी व चिटणिसी पत्रांवर निशाण करावें. युद्धप्रसंग करावे. तालुका जतन करून आज्ञेंत वर्तावें.

**सचिव** – यांनीं राजपत्रें शोधून व त्यांत अधिक-उणें करून मजकूर शुद्ध करावा. युद्धप्रसंग करून तालुका स्वाधीन होईल तो रक्षून वर्तावें, राजपत्रावर संमत-चिन्ह करावें.

**मंत्री** – यांनीं सर्व मंत्र, विचार, राजकारण यांचा सावधानतेनें विचार करावा. आमंत्रण, वाकनिसी, त्यांचे स्वाधीन. त्यांचा तालुका जतन करून युद्धादि प्रसंग करावे. राजपत्रांवर संमत-चिन्ह करावें.

**सेनापति** – यांनीं सर्व सैन्याचें रक्षण करून युद्धप्रसंग व स्वारी करावी. तालुका स्वाधीन होईल तो रक्षून हिशेब रुजू करून आज्ञेंत वर्तावें. फौजेच्या लोकांचें बोलणें ( बाजू ) बोलावें. सर्व फौजेचे सरदार यांनीं त्याजबरोबर चालावें.

**पंडितराव** — यांनीं सर्व धर्माधिकार, धर्म व अधर्म पाहून विचक्षा करावी. शिष्टांचे सत्कार करावे. आचार, व्यवहार, प्रायश्चित्तपत्रें होतील त्यांजवर संमत-चिन्ह करावें. दानप्रसंग, शांति, अनुष्ठान तत्काळ करावें.

**न्यायाधीश** — यांनी सर्व राज्यांतील न्याय धर्में करून करावे. न्यायाचीं निवाडपत्रें यांजवर संमत-चिन्ह करावें.

**सुमंत** — यांनी परराज्यांतील विचार करावा. त्यांचे वकील येतील त्यांचे सत्कार करावे. युद्धादि प्रसंग करावे. राजपत्रांवर संमत-चिन्ह करावें.

शिवाजीच्या राज्यारोहणप्रसंगीं त्याच्या अष्टप्रधानांत पुढील पदाधिकारी होते :—

अष्टप्रधान — ( १ ) मोरो त्रिंबक — पेशवे, ( २ ) नारो नीलकंठ व रामचंद्र नीलकंठ — मुजुमदार, ( ३ ) रघुनाथ पंडितराव — दानाध्यक्ष, ( ४ ) हंबीरराव मोहिते — सेनापति, ( ५ ) दत्ताजी त्रिंबक — वाकनीस, ( ६ ) त्रिंबकजी सोनदेव डबीर यांचे पुत्र रामचंद्रपंत — सुमंत, ( ७ ) अण्णाजीपंत — सुरनीस ( सचिव ), ( ८ ) निराजी रावजी — न्यायाधीश ( सभासदकृत चरित्र ).

हुजरे लोक — ( १ ) हिरोजी फरजंद, ( २ ) बाबाजी घाटगे, ( ३ ) बाजी कदम, ( ४ ) मुधोजी सरखवास, ( ५ ) सूर्याजी मालुसरा, ( ६ ) महादजी नाईक पानसंबळ.

सांप्रत हुजऱ्या म्हटला कीं यःकश्चित् समजण्यांत येतो. वास्तविक हुजुराजवळ जो असतो तो हुजऱ्या. हुजऱ्या हा राजाचा शरीरसंरक्षक व अतिशय विश्वासू मनुष्य होय. या दृष्टीनें त्याची योग्यता मोठी समजली पाहिजे. हिरोजी फर्जंद यानें आग्र्याहून शिवाजीनें सुटका करून घेतली तेव्हां आपला जीव कसा धोक्यांत घातला हें सर्वश्रुत आहे.

### अष्टप्रधानांची कचेरी

प्रत्येक प्रधानापाशीं पुढील कारकून असत :— ( १ ) दिवाण, ( २ ) मुजुमदार म्हणजे हिशेबतपासनीस व हिशेबनीस, ( ३ ) फडणीस म्हणजे सहायक हिशेबनीस, ( ४ ) सबनीस म्हणजे दप्तरदार, ( ५ ) कारखानीस ( commissary ), ( ६ ) चिटणीस ( पत्रव्यवहार करणारा ), ( ७ ) जामदार ( खजिनदार ), ( ८ ) पोतनीस ( Cash-keeper ).

## अठरा कारखाने

अष्टप्रधानांच्या हातांखालीं अठरा कारखान्यांवरील अधिकारी व बारा महाल असत. ते अठरा कारखाने येणेंप्रमाणें :– ( १ ) खजिना, ( २ ) जवाहिरखाना, ( ३ ) अंबरखाना ( हत्तींचें सामान ), ( ४ ) शरबतखाना ( औषधें ), ( ५ ) तोफखाना, ( ६ ) दप्तरखाना, ( ७ ) जामदारखाना ( सर्व प्रकारचीं नाणीं वगैरे ), ( ८ ) जिरातखाना ( शेती ), ( ९ ) मुतबखखाना, ( १० ) उष्टरखाना ( उंट व त्यांचें सामान ), ( ११ ) नगारखाना, ( १२ ) तालीमखाना, ( १३ ) पीलखाना, ( १४ ) फरासखाना ( गालिचे, सतरंज्या, जाजमें इत्यादि ), ( १५ ) अबदारखाना ( पेयें ), ( १६ ) शिकारखाना, ( १७ ) दारूखाना, ( १८ ) शरतखाना ( Conservancy department ).

बारा महाल :– ( १ ) पोतें ( खजिना ), ( २ ) सौदागीर ( माल ), ( ३ ) पालखी, ( ४ ) कोठी, ( ५ ) इमारत, ( ६ ) बहिली ( रथ ), ( ७ ) पागा, ( ८ ) शेरी ( comforts ), ( ९ ) दरुनी ( अन्तःपुर ), ( १० ) थट्टी ( गोठा ), ( ११ ) टांकसाळ, ( १२ ) छबिना ( Guards ).

वर दिलेले १८ कारखाने दौलतीचे व बारा महाल हे राजाच्या मालकीचे.

शिवाजीनें राजधानींत कारभाराच्या सोयीकरितां इमारतींची वांटणी पुढीलप्रमाणें केली होती :– ( १ ) राजसभा, कचेरीची जागा. ( २ ) विवेकसभेच्या ठिकाणीं पंडितांनीं बसून पूर्वोत्तरपक्ष करावे आणि महाराजांनीं पुराण, कथा, इतिहास श्रवण करावा. ( ३ ) प्रकट सभा ही न्यायदानाची जागा. येथें जनतेनें येऊन आपल्या फिर्यादी सांगाव्या. ( ४ ) प्रबोधसभा-येथें कीर्तन-पुराण होत असे. ( ५ ) नीतिसभा – परका माणूस आला म्हणजे त्याची येथें भेट घेऊन त्याजबरोबर देशविदेश चर्चा करणें, मंगलकार्यें करणें. त्याशिवाय राजमंदिर, भोजनशाळा, शयनागार व राणीवसा या इमारती होत्या ( शिवदिग्विजय ).

बारा महालांचे अधिकारी यांणीं आपआपलें काम दुरुस्त राखून हिशेब आकारून दप्तरांत गुदरावे.

दरुणी महालचें कामकाज, दिवाण नेमून दिले, त्यांनीं सर्व पाहून करावें. चिटणीस, फडणीस, यांनीं आपआपले दरखाचे कागदपत्र लिहावे. त्याजवर निशाणचिन्ह दिवाणांनीं करून व त्यास समजाऊन हुजूर मोर्तब समक्ष करावें.

पोतनीस यांनीं पोतें जमाखर्च लिहिणें करावें. नजर पेशकशी जमा करावी, पोतदार यांनीं पारख करावी.

आबदारखान चिटणीस यांजकडे सराफखानासुद्धां अधिकार सांगितला. मज्यालसी, विडे, अत्तर, गुलाब व हारतुरे, फळफळावळ, खुशबोई खरेदी जमाखर्च यांणी करून हिशेब दप्तरीं गुजरावा.

पागा, जुमालेदार, सरदार यांनीं कैद करून दिल्ही त्याप्रमाणें चालून सेनापति व प्रधान यांचे समागमें कामें काजें करावीं.

शिवाजीनें आपल्या अष्टप्रधानांत सर्व खातीं वांटून दिलीं होतीं. हल्लीं मंत्रिमंडळ व त्याच्या मदतीस सचिवालय असतें. त्यांचे परस्परांशीं जसे संबंध असतात तसेच कांहीं अंशीं प्रधानमंडळाचे चिटणीस, फडणीस, मुजुमदार, सबनीस, बक्षी, पोतनीस, दिवाण इत्यादिकांशीं असत. अष्टप्रधानांतील प्रत्येकाची वेगळी कचेरी असून तींत प्रत्येकाचे अंकित अधिकारी असत. त्यांना शिवाजीच्या खासगी खात्याशीं सहकार्य करावें लागे. सारांश अष्टप्रधान, शिवाजीच्या हाताखालचे चिटणिसादि वेगळे अधिकारी, अष्टप्रधानांच्या कचेऱ्यांतील अंकित अधिकारी हे मिळून दौलत म्हणजे सरकार होतें. त्याशिवाय त्याचें खासगी खातें असून दौलत व खासगी हीं दोन अंगें एकमेकांशीं सहकार्यानें वागत.

अष्टप्रधानांच्या वर निर्दिष्ट केलेल्या कामाखेरीज अष्टप्रधानांपैकीं कांहींच्या ताब्यांत बंदोबस्ताकरितां राजाचा मुलूखहि असे. ते जेव्हां राजधानींत नसत तेव्हां राजाजवळ त्यांचे मुतालिक म्हणजे प्रतिनिधि असत. मुतालिक हा प्रधानाचा प्रतिनिधि असला तरी त्याला मंजुरी राजाची लागे.

चिटणीस — चिटणीस पद प्रधानमंडळाबाहेरचें होतें. बाळाजी आवजी हा शिवाजीचा श्रेष्ठ प्रतीचा चिटणीस होता. त्याचें काम म्हणजे त्यानें सर्व राजपत्रें लिहावीं, व राजकारणपत्रें लिहावीं, राजाचें हृद्गत

जाणून तत्काल नानाप्रकारचे कल्प करून चतुरपणें लेखन करावें; जें युद्ध करून आयासानें कार्य होणें तें पत्राचे भाव पाहूनच होत असावें; पत्रें येतील त्यांचीं उत्तरें लिहावीं. सनदी दानपत्रें वगैरे महाली हुकमी याचा जाबता फडनिशी, चिटणिशी अलाहिदा त्याप्रमाणें लिहावा. हातरोखा, नाजूक पत्रें यांजवर मोर्तब अथवा खास दस्तक मात्र चिटणिसांनींच करावें.

फौजेचे सबनीस, बक्षी यांनीं सर्व फौजेची हजेरी चौकशी करावी. यादी करून समजवावे, रोजमरा वांटावा, सत्कार करावा व युद्धादि प्रसंग करावा. सेनाधुरंधर यांनीं बिनी करावी, आघाडीस जावें, उतरावें, फडफर्मास जमा करावी. लूट करणें मना करणें, चौकशी, ताकीद यांजकडे असावी. सेना रक्षण करावी.

अधिकारीवर्ग व इतर नोकरवर्ग यांविषयीं महाराजांनीं पुढीलप्रमाणें कांहीं नियम घालून दिले होते त्यांत त्यांची दूरदृष्टि दिसून येते.— प्रधान म्हणजे कारभारी यांनीं ज्याच्याकडे जो कारभार सोपविण्यांत आला तो त्यानें करावा. एकानें दुसऱ्याचें काम करूं नये व ज्याच्याकडे जें काम असेल त्यास दुसऱ्यानें भीड घालूं नये व त्याचा द्वेष करूं नये. तथापि कोणांत द्वेष वा हेवादावा असल्यास तो महाराजांनीं मध्यस्थी करून मोडावा. कांहीं नोकर महाराजांचे जवळ असत. त्यांचा महाराजांशीं घनिष्ठ संबंध, या जोरावर ते त्यांच्याहून वरिष्ठ अधिकाऱ्यांचा उपमर्द करण्याचा संभव असे. तसें त्यांनीं करूं नये व महाराजांपाशीं त्यांजविरुद्ध चुगलीहि सांगूं नये. ज्यानें त्यानें मर्यादेनें वागावें व जो मर्यादा सोडून वागेल त्यास शिक्षा करण्यांत यावी. महाराजांचे शरीरसंबंधी व इतर लोक तसेच पागे, सरदार व शिलेदार यांनीं आपआपल्या तक्रारी केवळ महाराजांपाशीं आपण आहों याचा फायदा घेऊन परस्पर महाराजांस न सांगतां आपल्या वरिष्ठाकडे करून दाद मागावी. जे लोक महाराजांपाशीं असतील त्यांनीं कोणाची निंदास्तुति न करतां शिपायीगिरीच्या व घोड्यांच्या गोष्टी बोलाव्या.

कामाची वांटणी पुढीलप्रमाणें करण्यांत आली. रघुनाथ बल्लाळ कोरडे हे सबनीस होते. त्यांजकडे इमारत, किल्लेकोट यांचें बांधकाम सांगण्यांत आलें. आबाजी सोनदेव हे कल्याण प्रांताचे सुभेदार होते. त्यांना तिकडील

किल्लेकोट यांच्या इमारतींचें काम देण्यांत आलें. राघो बल्लाळ अत्रे यांजकडे स्वारांचा सुभा सोपविण्यांत आला. राघो मित्र मऱ्हाटे यांस हुजरे लोकांचा हवाला दिला. खास बारदार, इटेकरी, पटेकरी, ढालाईत, जासूद, काशीद वगैरे जिलिबीचे चाकरीचे लोक यांस एक सबनीस, एक हवालदार नाईक, नेमून दिले. गोमाजी नाईक पानसंबळ यांस कापडाचे जामदारखान्याचा हवाला दिला. मातबर सरदार व शरीरसंबंधी असे निंबाळकर, घाटगे, शिर्के, मोहिते, महाडिक, जाधव, पालकर, मानसिंग मोरे, रूपाजी भोसले, मकाजी आनंदराव यांस पागांच्या सुभेदाऱ्या दिल्या. पायदळाची सरनोबती येसाजी कंक यास दिली.

## प्रकरण नववें

# शिवाजीचा अधिकारीवर्ग

### कामाची विभागणी

शिवाजी बेंगरुळाहून पुण्यास आला त्या वेळीं त्याजबरोबर ( १ ) शामराज नीलकंठ पेशवे, ( २ ) बाळकृष्ण त्रिमल ह्मणंते मुजुमदार, ( ३ ) सोनोपंत डबीर व ( ४ ) रघुनाथ बल्लाळ सबनीस हे अधिकारी होते. त्यांत व इतरांत शिवाजीनें कामाची वांटणी कशी केली त्याची माहिती खाली दिली आहे.

### शामराज नीलकंठ रोझेकर

वतन असलें म्हणजे मनुष्याला चरितार्थाची व व्यवसायाची काळजी रहात नाहीं. म्हणून प्रत्येकजण वतन संपादन करण्याच्या खटपटींत असे. शामराज हा पेशवा असतांनाहि वतनाकडे त्याचा ओढा असून तो बेंगळुराहून पुण्यास आल्यावर वतनें संपादण्याच्या उद्योगास लागलेला दिसतो. मोसे खोऱ्यांतील सहा गांवांचें कुलकर्ण रंगो त्रिमल वाकडा हा चालवीत होता. पण त्यानें एका ब्राह्मण विधवेशीं बदकर्म केलें. त्यावरून आपणांवर खटला होणार या भीतीनें तो चंद्रराव मोरे यांजकडे जावलीस आश्रयार्थ गेला. तो शिवछत्रपतीच्या हद्दींतील शिक्षा चुकविण्याकरितां निघून गेल्यावर तिकडेच मरण पावला ( २१ डिसेंबर १६५२ ). तो निपुत्रिक मेल्यामुळें

त्या गांवांच्या मोकदमांनीं आणि साबाजी यशवंतराव देशमुख व देश-कुलकर्णी यांनीं शामराज नीलकंठ यांजपासून ५० होन शेरणी घेऊन त्यांस कुलकर्ण देऊं केलें व त्यास शिवाजी राजे यांनीं मान्यता दिली ( प. सा. सं. खंड १, पृ. १३५ ). मोसे खोऱ्यांतील सहा गांवांचें वतन येणेप्रमाणें संपादल्यावर दुसऱ्याच वर्षी मुठें खोऱ्यांतील सात गांवांचें कुलकर्ण विसाजी, सोन व एकोजी प्रभु देशकुलकर्णी ( देशपांडे ) तर्फ मुठेंखारें यांनीं शामराजास दिलें. त्याविषयीं पत्र

शके १५७५ कार्तिक वद्य १
इ. स. १६५३ ऑक्टोबर २७

महा. रा. शामराज पंडित पेशवे यांस –

" स्वामीस तर्फ मजकूरचे सात गांव कुळकर्ण दिलें. त्याबद्दल वाघोजी खोपडे याबरोबर २५० होन दिले ते पावले " ( प. सा. सं. खंड १, पृ. १३९ ).

शामराजानें सरकारतर्फेचे विसाजीप्रभृतीस २५० होन देऊन हें वतन विकत घेतलें. शामराजाची आतां कुलकर्णी वतनाचीं तेरा गांवें झालीं.

गुंजणमावळचे देशमुखीवतनाचा तंटा शके १५५९ माघ वद्य ७ ( इ. स. १६३८ जानेवारी ता. २६ ) या दिवशीं दादाजी कोंडदेव सुभेदार किले कोंडाणा व देशमूख व देशकुलकर्णी यांचे विद्यमानें निकालांत निघाला होता. पण त्या निकालानें पक्षकारांचें समाधान न झाल्यामुळें तो वाद पुनः उपस्थित होऊन त्याचा फेरविचार व निर्णय शके १५७९ चैत्र वद्य २ ( इ. स. १६५७ मार्च २१ ) या दिवशीं करण्यांत आला. दावा महत्त्वाचा असल्यामुळें त्या वेळीं मजालसीस खुद्द शिवाजीराजे, ( १ ) सामराज नीलकंठ – पेशवे ( २ ) वासुदेव बाळकृष्ण – मुजुमदार, ( ३ ) सोमाजी विश्वनाथ – डबीर, ( ४ ) महादजी सामराज – सुरनीस, ( ५ ) माणकोजी दहातोंडे – सरनोबत, ( ६ ) रघुनाथ बल्लाळ – सरसबनीस, ( ७ ) नूरबेग सरनोबत – पाऊलोक, ( ८ ) सामराज पद्मनाभी – सबनीस, पाऊलोक ( पायदळ ? ) देशमुख व देश-कुलकर्णी इत्यादि उपस्थित होते ( प. सा. सं. खं. १, पृ. १५८ ).

शहाजीनें शिवाजीबरोबर सन १६४२ मध्यें जे मंत्री पाठविले त्यांपैकीं सन १६५७ मध्यें शामराज नीलकंठ, सोनोपंत डबीर, रघुनाथ बल्लाळ

सबनीस हे मंत्रिपदावर असून बाळकृष्णपंत मुजुमदाराच्या जागीं त्यांचा पुत्र वासुदेव आला होता. शामराजाचें गांव हिवरे नागेश हें सोलापूर जिल्हा व मोगलाई यांच्या हद्दीवर आहे. शामराज केव्हां मृत्यु पावला तें समजत नाहीं. परंतु त्याच्या जागीं शक १५८३ च्या भाद्रपदांत नरहरी आनंदराव याची नेमणूक झाली. शामराज नाकर्ता निघाल्यामुळें त्याला काढून टाकण्यांत आलें असें सभासद म्हणतो. शामराजाचा पुत्र महादाजी शामराज हा शिवाजीच्या कारकीर्दीत पुष्कळ दिवस सुभेदार असून त्याला शिवाजीनें वतनें दिलीं होतीं. नरहरपंत शक १५८४ त मरण पावल्यावर मोरोपंत पिंगळे पेशवा झाला ( शि. च. सा. खं. ७ वा, प्रस्तावना ).

शामराजास शिवाजीनें इ. स. १६५५ त जंजिऱ्याच्या सिद्दीवर पाठविलें होतें. पण सिद्दी खैर्यत यानें त्यास विश्वासघातानें धरून कैद केलें. या कैदेंतून शामराजानें माफी मागून आपली सुटका करून घेतल्यामुळें शिवाजीनें त्यास पेशवेपदावरून वर लिहिल्याप्रमाणें कमी केलें. त्यानंतर थोड्या दिवसांनीं त्या दुःखानें तो मृत्यु पावला असावा.

## बाळकृष्णपंत हणमंते

शिवाजीचा पहिला अमात्य बाळकृष्ण त्रिमल हणमंते. हा नारोपंत हणमंत्याचा भाऊ. हणमंते हे इंदापुराचे वतनदार जोशी. इंदापूर परगणा व इंदापूर कसबा यांच्याशीं भोसले घराण्याचा जुना संबंध. या कारणानें भोसले व हणमंते यांचा घरोबा वाढून नारो त्रिमल व त्याचे पुत्र जनार्दनपंत, रघुनाथपंत व त्रिंबकपंत शहाजीच्या पदरीं मोठ्या कामावर राहिले. बाळकृष्णपंताचा प्रवेश शहाजी व शिवाजी यांच्या कारभारांत नारोपंताच्या वगीने झाला असावा. बाळकृष्णपंतानें शके १५५९ ते शके १५८२ पर्यंत मुजुमदारी केली. राज्याचा सर्व हिशेब करणें व स्वराज्यांत आलेल्या प्रदेशाची मुलकी व्यवस्था लावणें हें मुजुमदाराचें काम. बाळकृष्णपंतानंतर त्याचा पुत्र वासुदेव बाळकृष्ण याची नेमणूक शिवाजीनें अमात्यपदावर ( मुजुमदार ) इ. स. १६५६ त केली ( शि. च. सा. खं. ७ वा, प्रस्तावना ). त्याच्या मागून निळो सोनदेव हा अमात्यपदावर आला. त्या पदावर तो ता. २१।३।१६६२ पासून इ. स. १६७४ पर्यंत होता. इ. स. १६७४ त

शिवाजीस राज्याभिषेक झाला. तेव्हां नारो नीलकंठ व रामचंद्र नीलकंठ हे त्याचे दोघे पुत्र अमात्यपदाचा कारभार करीत होते. बाळकृष्णपंत ह्मणंल्याचा भाऊ नारोपंत याचे दोघे पुत्र जनार्दनपंत व रघुनाथपंत कर्नाटकांत व्यंकोजीच्या पदरीं होते. त्यांस बरोबर घेऊन शिवाजी गोवळकोंड्यास गेला.

## निळो सोनदेव अमात्य

अमात्याचें काम – राज्यांतील जमाखर्च ठेवावा. दप्तरदार व फडणीस यांजकडून त्यांचीं कामें करवून घ्यावीं; लिहिणें चौकशीनें करावें; फडणविसी व चिटनविसी पत्रांवर निशाण करावें व तालुका ( ताब्यांतील मुलूख ) जतन करून ( राजाच्या ) आज्ञेंत वर्तावें.

शिवाजीस इ. स. १६७४ त राज्याभिषेक झाला तेव्हां नारो नीलकंठ व रामचंद्र नीलकंठ हे दोघे मुजुमदारीचा ( अमात्यपद ) कारभार पहात होते. निळो सोनदेव हा त्यांचा पिता. निळोपंत हा शहाजीबरोबर आलेल्या सोनोपंत डबीराचा पुत्र. इ. स. १६६५ त निळोपंत अमात्यपदावर आला. तेव्हांपासून तो त्या पदावर असून शिवाजीच्या राज्याभिषेकसमयीं त्याच्या वतीनें त्याचे वरील दोन पुत्र त्याचें काम पहात असावे.

इ. स. १६६५ त निळो सोनदेव मुजुमदारीवर होता. त्यानें शिवाजीकडे त्या वर्षी पुढील आशयाचें निवेदन केलें :– " राजगडावर केसो नारायण हा सबनीस होता. त्याचा कारभार प्रथमपासूनच चांगला नव्हता. शिवाजीराजे राजगडाहून मिर्झा राजाच्या भेटीस गेले तेव्हां राजगडावर हवालदार नव्हता व पद्मावतीस सरनोबत नव्हता. राजगडावर एकटा केसोपंत होता. त्या वेळीं राजगडाचे खर्चाकरितां तीन हजार लारी अंबाजीपंताकडून व राघोपंताकडून आल्या. त्यांतील चौदाशे लारी केसोपंतानें गोविंद राउताचे हवालीं केल्या आणि उरलेल्या १६०० लारी आपल्या हवालगिरापाशीं ठेवल्या. त्यावर घालमेल करून या प्याद्यापासून त्या प्याद्यास असे १५ दिवस करून सोळाशेंपैकीं सहाशें लारी कमी झाल्या व बाकीच्या एक हजार लारी नाईकवाडीपाशीं ठेवल्या. ही खबर निळो सोनदेव यास कळतांच त्यानें रखमाजीपंतास सांगून त्याजकडून सर्व नाईकवाडी यांस बोलावून आणिलें. तेव्हां दादुजी व गुंडा नाईकवाडी यांजपाशीं एक हजार लारी

आढळली. तेव्हां निळो सोनदेव व रखमाजीपंत यांनीं नाईकवाडी यांस एक हजार लारी आपल्या परवानगीशिवाय खर्च करतां कामा नये अशी ताकीद दिली व तसें केसो नारायण यासहि कळविलें. ”

या एकंदर प्रकरणांत केसो नारायण यानें कांहीं अफरातफर केल्याचें दिसून येत नाहीं. परंतु रक्कम नीट न ठेवतां गबाळया कारभार केला. या बाबींत निळो सोनदेव व रखमाजी शिवदेव यांनीं दक्षतेनें लक्ष घालून ती शिवाजीच्या नजरेस आणिली. यावरून शिवाजीनें नेमलेले अधिकारी कसे प्रामाणिक, सावध व कर्तव्यदक्ष होते हें समजतें.

### खुर्दखत

शके १५९२ जेष्ठ वद्य २
इ. स. १५७० मे २६

निळो सोनदेव – गंगाजी मुद्गल हवालदार व कारकून परगणे सुपे यांस – ‘ पर. सुपे यांत महादाजी गोसाव्याचा जो इनाम आहे तो पूर्वीप्रमाणें चालविणें. ’ यावर निळोची मुद्रा ‘ श्री सीतापातिचरणपरायण नीलकंठ सोनाजी नारायण ’ अशी आहे. यावरून निळोपंत समर्थांच्या शिष्यवृंदापैकीं असावा असें अनुमान निघतें ( प. सा. सं. खंड १, पृ. ३६६ ).

मोरोपंत पेशवे व निळो सोनदेव या दोघांनीं १० डिसेंबर १६७५ ( शके १५९७ पौष शुद्ध ४ ) रोजीं विनायक भट ठकार याजपासून २५ रु. उचापती नेल्याचे दादाजी बयाजी प्रभु हवालदार व कारकून तर्फ खडकवासले व माण यास कळविलें ( प. सा. सं. खंड २, पृ. ५३६ ).

मौजे किवाड तर्फ खेडेबारें हें लहानसें गांव आहे. तेथील एक चावर जमीन हरि गोविंद यास इनाम होती. तिचा भोगवटा मध्यंतरीं तुटला होता. निळोपंतास कांहीं इनाम देणें जिजाऊसाहेबांस जरूर वाटल्यावरून त्यांनीं ती जमीन निळो सोनदेवाच्या हवाली केली ( प. सा. सं. खंड २, पृ. ३८९ ).

विजापूर-दरबार व शिवाजी यांच्यामध्ये ओझर्डें किल्ले वंदन या गांवाबद्दल लढा लागला. त्याबाबत विजापूरकरांतर्फे दियानतराव व शिवाजीतर्फे निळो सोनदेव यांचा पत्रव्यवहार झाला. शिवाजीनें सदर

गांव चंद्रराव मोऱ्याचा समजून नूरखानास दिला. उलटपक्षीं दियानतरावाचें ( शके १५७८, इ. स. १६५७ ) म्हणणें कीं, तो गांव चंद्ररावाचा नसून विजापूरकरांचा असल्यामुळें तो निळो सोनदेवानें आपल्या स्वाधीन करावा ( प. सा. सं. खंड १, पृ. १५७ ).

निळो सोनदेव हा मोरोपंताची स्पर्धा करीत असतां शिवाजीनें त्यास वतनी कारभार करून रहावयास सांगितलें तोच हा वतनी कारभार.

## अण्णाजी दत्तो सचिव ( सुरनीस )

सचिवाचें काम – राजपत्रें वाचून त्यांतील अधिकउणा मजकूर शुद्ध करावा, युद्धप्रसंग करून तालुका स्वाधीन होईल तो रक्षून आज्ञेंत वर्तावें व राजपत्रावर संमत-चिन्ह करावें.

वरील कामगिरींत युद्धप्रसंग ही सचिवाकडे महत्त्वाची कामगिरी होती. ती अण्णाजी दत्तो बजावीत असे. तो फोंड्याच्या स्वारींत ( ३ ऑक्टोबर १६७४ ) होता. शिवाजीचा सेनापति या नात्याने फोंड्यावर अचानक छापा घालण्याकरितां अण्णाजी कुडाळास गेला होता. पण विजापूरचा सरदार महमदखान यास त्याचा बेत अगाऊच कळल्यामुळें याला तेव्हां यश आलें नाहीं. तथापि त्यानंतर शिवाजीनें फोंडा घेतला ( ३ जून १६७५ ). त्या वेळीं अण्णाजी त्याच्या स्वारींत असून फोंड्याची डागडुजी व बंदोबस्त करण्याकरितां फोंड्यावर राहिला होता ( प. सा. सं. खंड २, पृ. ५२५ ). पुढें अण्णाजीस राजापूरचा सरसुभेदार नेमण्यांत आलें. राजापूरच्या लुटीबाबत इंग्रजांशीं शिवाजीचा रायगडावर तह ठरला ( शके १५९६ वैशाख वद्य १; इ. स. १६७४ मे ). त्या तहाचीं कलमें ठरत असतांना अण्णाजी त्या बैठकीस उपस्थित होता. त्यास इंग्रजांनीं दोन सोन्याचे गोफ वजन तोळे ७ किं. १२५ रुपये नजर करण्याचें योजिलें. राजापुरास अण्णाजी सरसुभेदार, जिवाजी पंडित सुभेदार व आरमारी सेनापति दौलतखान यांचें इंग्रजांचा वकील चाइल्ड याजबरोबर तहासंबंधीं बोलणें झालें ( इ. स. १६७५ फेब्रुवारी ६ ).

अण्णाजीच्या योग्यतेविषयीं सुरतेचे इंग्रज राजापूरच्या इंग्रजांना लिहितात, "अण्णाजी हा राजापुराकडील व्हाइसरॉयाच्या अधिकारावरचा

अंमलदार असल्यामुळें आपल्या दर्जाप्रमाणें मान ठेवला जावा असें त्याला वाटणें साहजिक आहे. तरी त्याचा योग्य मान ठेवा. आपल्या दर्जाला शोभेल असेंच तुम्ही वागा. उद्दामपणा व कृतघ्नपणा करूं नका. ज्यांच्याशीं तुम्हांला वागावयाचें आहे ते लोक ( मराठे ) चतुर व चौकस आहेत. शिवाजीचा सेनापति कारवारला आला तेव्हां तुम्ही त्यास भेटावयास गेला नाहीं हें बरें केलें नाहीं. याच्या सर्व सेनापतींना व प्रधानांना चांगल्या रीतीनें वागविलें पाहिजे ! " ( इ. स. १६७५ मे १३; प. सा. सं. खंड २, पृ. ५२३ ).

वरील माहितीवरून हें सिद्ध होतें कीं, अण्णाजी सचिव असतां सेनापति व सुभेदार यांचींहि कामें करीत असे. त्याशिवाय महसूल-मंत्र्याचेंहि काम त्याजकडे असे.

## कौलनामा

शके १६००

इ. स. १६७८–७९

रा. आनाजी दत्तो – देशमूख, देशकुलकर्णी व पाटील व रया. ता. रोहिडखोरे यांस –

" तुम्ही कौल मागितला व हकीकत सांगितली. तरी गांवांचे गांव फिरून जमिनीची प्रत ठरवून पिकाचा अंदाज करावा व त्याप्रमाणें धारा बांधून द्यावा. एकंदर देश लावणीस येईल असें करावें " ( प. सा. सं. खं. २, पृ. ६२८ ).

इनामांची व देवस्थानांची व्यवस्था तोच पहात होता.

शके १६०१ कार्तिक शुद्ध २

इ. स. १६७९ ऑक्टोबर २६

अनाजी दत्तो – बाबाजी विठ्ठल सुभेदार व कारकून तालुका मलकापूर यांस –

" मौजे बिळाशी येथील श्रीदेवाचा इनाम पूर्वीप्रमाणें रघुनाथभट अग्निहोत्री यांजकडे चालविणें. देवतार्चन त्यांचे स्वाधीन आहे " ( प. सा. सं. खंड २, पृ. ६४७ ).

शके १६०१ कार्तिक शुद्ध २
इ. स. १६७९ ऑक्टोबर २६

अनाजी दत्तो – भानाजी गोपाळ सुभेदार व कारकून प्रांत कऱ्हाड यांस " चाफळचे उत्सवास पूर्वीच्या मोईनप्रमाणें माणसें, सामग्री व द्रव्य देत जाणें " ( प. सा. सं. खंड २, पृ. ६४७ ).

अण्णाजी दत्तो शके १५८३ ते शके १५८४ पर्यंत वाकनीसपदावर होता. त्या पदावरून शके १५८४ च्या भाद्रपदांत त्याची नेमणूक सचिव-पदावर ( सुरनीस ) झाली. तेव्हांपासून आमरण तें पद त्याजकडेच राहिलें. अण्णाजीनें ६ मार्च १६७३ रोजीं पन्हाळा किल्ला दोराच्या शिड्या लावून वाघनखवाले व घोरपडवाले जमवून मोठ्या शिताफीनें घेतला. अनाजीचें शौर्य व कारभारांतील वाकबगारी पाहून शिवाजीनें चेऊल, दाभोळ, राजापूर, कुडाळ, बांदे, फोंडापर्यंतचा कोंकणांतील मुलूख त्याच्या स्वाधीन केला ( सभासद ). कारभारी या दृष्टीनें त्याची योग्यता मोरोपंताच्या खालोखाल समजली जात होती. शिवाजीच्या मृत्यूनंतर गादीवर कोणास बसवावें याविषयीं जेव्हां प्रश्न उत्पन्न झाला तेव्हां अण्णाजी राजारामाच्या पक्षाचा होता. संभाजीस ही गोष्ट कळतांच त्यानें त्याला प्रथम कैद केलें व मागाहून ठार मारलें. अण्णाजीचा शेवट अशा हृदयद्रावक रीतीनें झाला.

## रघुनाथ व मोरेश्वर पंडितराव

पंडितरावाचे अधिकार – याजकडे सर्व धर्माधिकार होता. त्यानें धर्माधर्म पाहून शिक्षा करावी. शिष्टांचे सत्कार करावे; आचार, व्यवहार यासंबंधीं प्रायश्चित्त पत्रें होतील त्यांजवर संमतिचिन्ह करावें. दान, प्रसंग, शांति व अनुष्ठान तात्काळ करावें.

शहाजी व शिवाजी यांचीं कार्यक्षेत्रें भिन्न असलीं तरीं शहाजी आपल्या पदरचीं लायक माणसें शिवाजीकडे पाठवीत असे व कांहीं आपण होऊनहि जात असत. रघुनाथ ऊर्फ रघुनाथ पंडित चाऊरकर ऊर्फ चावरे हे यांपैकीं होत. ते शहाजीपाशीं बंगलोरास पंडितरावपदावर होते. तेथून ते शिवाजीच्या कारभारांत त्यास मदत करण्यास आले. शिवाजीनें त्यांची पंडितरावपदावर सन १६६१ त नेमणूक केली. जयसिंग शिवाजीवर आला

तेव्हां त्याजबरोबर शिष्टाई करण्यास शिवाजीनें रघुनाथ पंडितासच पाठविलें. पंडितरावपदावर असलेला हा रघुनाथ पंडित चांगला शास्त्रज्ञ असला पाहिजे.

सभासदानें शिवाजीच्या अष्टप्रधानांची जी यादी दिली आहे तिच्यांत पाठभेद आहेत. प्रतापगड-पाठांत ' रावजी पंडितराव होते त्यांचे पुत्र रायजी-राव ' असें म्हटलें आहे. महाडप्रतींत ' रघुनाथ पंडितराव यांचे पुत्र दानाध्यक्ष ' असा उल्लेख आहे. ग्रँटडफ यानें हें पद रघुनाथपंत पंडितराव यांस दिलें आहे. सभासदाच्या ' रावजी पंडितराव होते. त्यांचे पुत्र रायजी-राव ' या लिहिण्यापासून कांहींच बोध होत नाहीं. त्यापेक्षां महाडप्रतच अधिक ग्राह्य असून तिजवरून रघुनाथ पंडिताचा पुत्र मोरेश्वर पंडित हाच दानाध्यक्ष शिवराज्याभिषेकसमयींहि असावा असें अनुमान निघतें. मोरेश्वर पंडित ती कामगिरी इ. स. १६७२ पासून म्हणजे राज्याभिषेकाच्या पूर्वी-पासून बजावीत होता, त्या अर्थी राज्याभिषेकसमयीं तोच दानाध्यक्ष-पदावर म्हणजे पंडितराव-पदावर असून त्याचा पिता रघुनाथ पंडित इ. स. १६७२ च्या पूर्वीच सेवानिवृत्त झाला असला पाहिजे.

रघुनाथ पंडित वृद्ध वा दुखणाईत झाल्यामुळें त्याचा भार मोरेश्वर वहात असावा. रघुनाथ पंडित शिवाजीच्या मृत्यूपूर्वी इ. स. १६८० त मरण पावला. अर्थात् इ. स. १६७२ पासून मोरेश्वर पंडित जसा दानाध्य-क्षाचें काम करीत होता तसाच तो त्याच्या मृत्यूनंतर म्हणजे संभाजीच्या कारकीर्दीतहि इ. स. १६८५ पर्यंत करीत राहिला. याचा अर्थ मोरेश्वर पंडित एकूण चौदा वर्षे तें कार्य करीत होता.

मोरेश्वर पंडितरावानें शके १५९६ माघ शुद्ध १०, इ. स. १६७५ जानेवारी ता. २६ या दिवशीं जिवाजी विनायक सुभेदार व कारकून प्रभावळी यास पुढील आज्ञा केली –

" श्रीधर विनायक जोशी यांस भले ब्राह्मण म्हणून दहा मण तांदूळ द्यावे व सवत्स चार गायींची वण-माफी दिली आहे " ( प. सा. सं. खंड २, पृ. ५१४ ).

पुढील आज्ञापत्र ज्योतिष सांगणाऱ्या जोशासंबंधीं आहे. –

शके १५९८ माघ वद्य १३
इ. स. १६७७ फेब्रुवारी १९.

मोरेश्वर पंडितराय – गिरमाजी तुकदेव देशमुख व देशपांडे देश भिवगड यांस –

“ राम नारायण जोशी रहाणार मूळगांव यांस डिचोली भागांत ज्योतिष सांगण्याकरितां १० मण तांदूळ देविले असत ” ( प. सा. सं. खंड २, पृ. ५५९ ).

डिचोली हा भाग पूर्वी पोर्तुगीज हद्दींत होता. तो शिवाजीच्या ताब्यांत कायमचा आल्यावर जी धर्मविषयक तात्पुरती व्यवस्था करण्यांत आली त्याप्रमाणें राम जोशास जोसकीचें कायम वतन न देतां फक्त उक्ते तांदूळ देण्यांत येऊं लागले.

मोरेश्वर पंडित हा लायक माणूस दिसतो. खेड्यांतील जोशी आपली कामगिरी चोख बजावीत नाहींत, त्यांना याज्ञिकीचें व धर्मशास्त्राचें आवश्यक तेवढेंहि ज्ञान नसतें. ते जनतेच्या अज्ञानाचा फायदा घेऊन त्यांचीं धर्मकृत्यें यथास्थित न करतां त्यांस फसवितात असा त्यांजविरुद्ध सांप्रतहि आरोप करण्यांत येतो. यावर उत्तम उपाय म्हणजे जोशी व उपाध्ये यांच्या परीक्षा घेणें हाच होय. शिवकालीं पोर्तुगीजांच्या ताब्यांत असलेल्या प्रदेशांत धर्मग्लानि फारच झाली असली पाहिजे. म्हणून मोरेश्वर पंडितानें परीक्षा घेण्याचें आज्ञापत्र काढलें.

मोरेश्वर पंडितराऊ – धर्माजी नागनाथ व गिरमाजी तुकदेव देशाधिकारी व देशलेखक व देशमुख प्रांत फोंडा व डिचोली प्रांत मर्दनगड व भिवगड यांस –

“ उभय देशीं देशस्थ, कराडे, चितपावन, जोतिषी व पद्ये ब्राह्मण आहेत. या सकलांची परीक्षा घेऊन वृत्ति चालविणें ” ( शके १५९८ माघ वद्य १३, इ. स. १६७७ फेब्रुवारी १९, प. सा. सं. खंड २, पृ. ५५९ ).

मोरेश्वर पंडिताची चौफेर दृष्टि होती. धर्मजागृतीस ज्या ज्या रीतीनें उत्तेजन देतां येईल त्या त्या रीतीनें तो देत असे. अग्निहोत्र हें आर्य संस्कृतीचें महत्त्वाचें अंग आहे. अग्निहोत्र ठेवण्यास स्वास्थ्य पाहिजे व घरीं गायहि बाळगण्याची ऐपत पाहिजे. या सोयी लक्षांत घेऊन त्यानें भानाजीपंत देशाधिकारी व लेखक प्रांत कऱ्हाड यांस कळविलें.

शके १६०१ चैत्र वद्य १
इ. स. १६७९ मार्च १८

" चाफळ येथील रघुनाथ गणेश अग्निहोत्री यांस परम योग्य व अग्निहोत्री म्हणून एक खंडी जोंधळे व चार गाईपर्यंतचा कर माफ केला आहे. आदा करीत जाणें " ( प्र. सा. सं. खंड २, पृ. ६३० ).

## मोरोपंत पिंगळे

मोरोपंत मूळचा रहाणारा सिन्नर तालुक्यांतील वडगांवाचा. तो भोसल्यांचा दोन पिढ्यांचा नोकर होता. त्याचा भाऊ केसोपंत हा जिंजी-तंजावराकडे भोसल्यांच्या पदरीं अधिकाराच्या जागेवर होता. मोरोपंताचा उल्लेख मोरो त्रिमल असा आढळतो. त्यास मोरो त्रिमलाचार्यहि म्हणत, यावरून तो विद्वान् असावा. मोरोपंत सामान्य कारकुनाच्या जागेपासून चढत गेला. शके १५८४ त ( इ. स. १६६२ ) शिवाजीनें त्याची कर्तबगारी पाहून त्याची नेमणूक पेशवेपदावर केली.

शिवाजीच्या मृत्यूपर्यंत व त्यानंतर संभाजीच्या कारकीर्दीत प्रारंभा-पर्यंत मोरोपंत तें पद संभाळून होता. पेशवा म्हणजे मोगलांच्या भाषेत बोलावयाचें तर वजीर. त्याची योग्यता शिवाजीच्या खालोखाल. तो वस्तुतः मुलकी अधिकारी. राज्याची सर्व व्यवस्था त्यानें पहावी. पण त्यास सव्य-साचीहि असावें लागे. मोरोपंत मुलकी व सैनिकी या दोन्ही अंगांत पटाईत होता. या कारणानें शिवाजीला स्वराज्यस्थापनेंत त्याच्याइतकें साहाय्य दुसऱ्या कोणाचेंहि झालें नाहीं. पण प्रारंभींच्या काळांत तो मुलकी अधिकारी या नात्यानेंच प्रसिद्धीस आला. पुढें पांच वर्षांनीं सेनापत्य स्वीकारून तो स्वाऱ्यांवरहि जाऊं लागला. मुलकी अधिकारी या नात्यानें त्याला कोणकोणतीं कामें करावीं लागत हें खालील विवेचनांत दिसून येणार आहे –

रा. मोरो त्रिमल प्रधान यांनीं परगणे शिरवळ युद्धाच्या धामधुमींत उठून गेला होता, त्याची वसाहत करून ज्या जमिनी कीर्दीत आल्या त्यांचा धारा बांधून दिला ( इ. स. १६६७ ).

देशमुख हे त्यांच्या टापूचे अधिपति. त्यांनीं आपल्या प्रदेशाचा बंदोबस्त करून रयतेपासून वसूल करावा व त्यापैकीं सरकारी हिस्सा सरकारांत भरावा. पण कांहीं देशमुख शिवाजी व आदिलशहा यांच्या लढ्यांत जिवाच्या भीतीनें परागंदा झाल्यावर वसुलीचें व बंदोबस्ताचें काम अडून पडे. विठोजी हैबतराव सिलिंबकर हा आदिलशाहीच्या बाजूचा असल्यानें शिवाजीच्या ताब्यांत गुंजण मावळ आल्यावर शिवाजीच्या भीतीनें निघून गेला होता. तरी शिवाजीनें व त्यानंतर मोरोपंतानें त्यास अभय देऊन भेटीस बोलावलें ( ३ मे १६६८ ).

पंताजी गोपिनाथ हा शिवाजीचा वकील. याचें आडनांव बोकील. त्यानें अफझलखानप्रकरणीं वकील या नात्यानें बहुमोल कामगिरी बजावली होती. शिवाय तो सत्पात्र ब्राह्मणांचा भक्त होता. हे गुण लक्षांत घेऊन त्यास मोरो त्रिमल पेशवे यानें वाल्हे गांवाजवळ मांडकी येथें दोन चावर व शिरवळाजवळ भवाळी ( भोळी ) येथें एक चावर जमीन इनाम दिली ( २४ फेब्रुवारी १६६९ ), व तशी आज्ञा परगणे शिरवळच्या हवालदारास केली. मांडकी हा गांव वाल्हे स्टेशनापासून व निरा नदीपासून जवळ आहे. येथें संभाजीच्या नांवानें संभापूर नामक पेठ वसविण्याचीहि आज्ञा मोरोपंतानें केली ( ६ डिसेंबर १६६९ ).

पुण्याचे देशमुख व देशपांडे यांस पुणें परगण्याच्या वसुलांतून अनुक्रमें ३०५ व ९५ अशी दरसाल खंडणी देण्यांत येत होती. परंतु अलीकडील ५।७ वर्षांत महाल खराब पडल्यावर तितकी खंडणी त्यांस मिळेनाशी झाली. ती आतां फिरून त्यांस देण्यांत यावी अशी आज्ञा मोरोपंतानें जुन्नरचे सुभेदार राघो बल्लाळ यांस केली ( १५ मे १६७५ ).

मोरोपंताजवळ खर्चास कपर्दिकहि नाहीं अशी वेळ केव्हां केव्हां येत असे. ती वेळ कोणाकडून तरी उसनवार पैसे काढून त्यानें भागवावी. मोरोपंताच्या जोडीस निळो सोनदेव मुजुमदार हाहि मोठा अधिकारी होता. पण तोहि मोरोपंताप्रमाणेंच कफल्लक म्हणून त्या दोघांनीं मिळून विनायक भट ठकार याजपासून २५ रु. उचापतीनें नेले व ते केव्हां तरी परत करणें जरूर असल्यामुळें या व्यवहाराची माहिती त्यांनीं खडकवासलें व माण येथील हवालदार दादाजी बयाजी प्रभु व कारकून यांस कळविली ( १०

डिसेंबर १६७५ ). परराष्ट्रांशीं देण्याघेण्याच्या व्यवहारांची दखल मोरोपंतास ध्यावी लागे. राजापूर येथील लुटीच्या बाबतींत तह होऊन जो करार झाला त्यास अनुसरून शिवाजीनें कांहीं रकम इंग्रजांना द्यावयाची राहिली होती. शिवाजीची स्थिति नेहमींच ओढगस्तपणाची असे. ती सुधारावी हा एक हेतु गोवळकोंड्यावर स्वारी करण्यांत त्याचा होता. गोवळकोंड्यास गेल्यावर शिवाजीस बराच पैका मिळाला. त्यांतून कांहीं रकमेची हुंडी शिवाजीनें मुंबईस इंग्रजांकडे पाठविली. पण त्या बाबतींत ज्या सावकाराकडून ती हुंडी पाठविण्यांत आली, त्याजकडे रकमेचा भरणा वेळेवर न झाल्यानें सदर हुंडी पटली नाहीं. म्हणून इंग्रजांकडून मोरो पंडिताकडे तसें लिहून आलें. तेव्हां कांहीं घोटाळ्यामुळें रकमेचा भरणा झाला नव्हता, तरी शिवाजीकडे तुम्हीं आपला माणूस पाठवावा म्हणजे रकम मिळेल असें मोरोपंतानें इंग्रजांस कळविलें ( १९ फेब्रुवारी १६७६ ).

जमीनबाब व नक्त रकमा यांचीं हडदीं मोरोपंतास मिटवावीं लागत तशी इनामांच्या भानगडींचीहि दाद घ्यावी लागे. पुरंदर किल्ल्यावरील माजी सुभेदार नीलकंठराव याच्या वंशाकडे सासवडाजवळील चांबळी या गांवीं इनाम जमीन होती. ती वादांत पडली होती. पण तो वाद मिटविणें मोरोपंत व नारो नीलकंठ मुजुमदार यांच्या अधिकाराबाहेरचें होतें. शिवछत्रपति यांनींच त्या प्रश्नाचा निकाल लावावयाचा होता. पण ते त्या वेळीं कर्नाटकांत स्वारीवर होते. यास्तव प्रस्तुत प्रकरण ते येईपर्यंत तहकूब ठेवावें असें या दोघां अधिकाऱ्यांनीं त्रिंबक गोपाळ देशाधिकारी व लेखक परगणे पुणें यांस कळविलें.

महाराष्ट्रांत शूरांचा तुटवडा होता असें नाहीं. पण जोखमीचीं व महत्त्वाचीं कामें करण्यास जरूर तितके मुत्सद्दी व सेनापति ठेवण्यासाठीं लागणारें द्रव्यबळ शिवाजीपाशीं नसल्यामुळें अनेक कामगिऱ्या एकाच इसमावर सोपवाव्या लागत. मुलकी कारभार टाकून मोरोपंतास स्वाऱ्यावर जाण्याचा प्रसंग याच कारणानें येई. शिवाय मुत्सद्दी व सेनापति यांची तुलना केल्यास जो मान व महत्त्व सेनापतीस तें मुत्सद्द्याच्या वांट्यास साहजिकच येणार नसल्यामुळे ज्यांच्या अंगीं वीर्य सळसळत आहे असे मुत्सद्दी मोहिमांवर जाण्याची संधि सहसा दवडीत नसत. मोरोपंत त्याच कोटींतला

असामी असल्यानें तो सन १६५९ त अफजलखानाच्या सैन्याचा धुव्वा उडवून देणारांपैकीं एक होता. त्याचें शौर्य शिवाजीच्या नजरेंत जसजसें भरूं लागलें तसतसा तो त्याला महत्त्वाच्या मोहिमांवर नेमूं लागला. रामनगर व जव्हार जिंकण्यास जाणारा मोरोपंतच. बागलाणांतील साल्हेर-मुल्हेरच्या घनघोर युद्धांत दिलीरखानास धूळ चारणारा मोरोपंतच. धरणगांवास इंग्रजांची वखार लुटणारा मोरोपंतच. सिद्दी कांहीं केल्या हतबल होईना असें पाहून राजपुरी प्रकरणाचा अखेरचा सोक्षमोक्ष लावण्यासाठीं शिवाजीनें बोलावलें मोरोपंतालाच. पण त्याचेंहि या नाविक युद्धांत जलचर राष्ट्रापुढें चालेना हा भाग अलाहिदा. मोरोपंताचें स्थान इतकें अद्वितीय असतां त्याचीहि संभाजीनें क्रोधाग्नींत आहुति देऊन स्वराज्यावर जणूं काय अग्नीच ठेवला. मोरोपंताचा पुत्र बहिरो व निळो हे होते. बहिरो हा मोरोपंताच्या पश्चात् पेशवा झाला. तो शाहूमहाराजांच्या कारकीर्दीपर्यंत असून त्याचें पद पुढें बाळाजी विश्वनाथास मिळालें. बहिरोचा भाऊ निळो हा करवीरकर छत्रपतींचा पेशवा होता. पण हे दोघेहि भाऊ विशेष कर्तबगार निघाल्याचें दिसून येत नाहीं.

## दत्ताजी त्रिंबक वाकेनवीस ( मंत्री )

मंत्री – यानें राजकारणांत सल्ला द्यावा, राजकारणाचा सावधानपणानें विचार करावा, राजेरजवाडयांना निमंत्रण करावें, राजापाशीं ज्या राजकीय मसलती चालतील त्यांचा वृत्तान्त लिहून ठेवावा ( वाकनवीसो वृत्तान्त-लेखक ), आपल्या ताब्यांतील मुलखाचें रक्षण करावें आणि युद्ध-प्रसंग करावे.

शिवाजीनें अष्टप्रधानमंडळ इ. स. १६७४ त राज्याभिषेकसमयीं जाहीर केलें असलें तरी त्याचे कित्येक प्रधान त्या पूर्वीपासूनच आपआपल्या हुद्दयावर होते. त्यांपैकींच दत्ताजी त्रिंबक वाकेनवीस हा होय. त्यांच्या पूर्वी गंगाजी मंगाजी हा वाकनीस होता. तो मेल्यावर त्याच्या जागीं आबाजी-पंतानंतर शके १५८४ त दत्ताजी वाकनीस झाला. त्यास शिवाजीराजांनीं इ. स. १६७२ जुलै २२, शके १५९४ श्रावण शुद्ध ८ रोजीं पुढील पत्र लिहिलें आहे :–

शिवाजी राजे – दत्ताजीपंत वाकेनवीस यांस ‘चाफळ येथे यात्रा

भरते. महोत्सव चालतो. तेथे कटकीचे सिपाही व बाजे लोक देवाची मर्यादा ठेवीत नाहींत. यात्रेकरूस तसवीस देताती. दिवाण बळे कालगती करताती. तरी तुम्ही अंगें जातीनें जाऊन तसवीस, उपद्रव होऊं न देणें व रामदास गोसावी यांचाहि परामर्श करीत जाणें ( प. सा. सं. खंड २, पृ. ४२२ ).

राज्याभिषेकापूर्वींच रामदासस्वामींवर शिवाजीची श्रद्धा बसली असून उत्सवाची व्यवस्था सरकारतर्फे प्रतिवर्षी ठेवण्यांत येत असे व यात्रेच्या बंदोबस्ताचें काम मंत्र्याकडे असे. खराडे व काळभोर यांजमध्यें पालीच्या मोकदमीचा तंटा लागला असतां दिव्य होऊन खराडे खोटे ठरले ( शके १५९७ माघ वद्य १३, इ. स. १६७६ फेब्रुवारी १ ). या दिव्याचे वेळीं शिवछत्रपति, हरजीराजे महाडीक, रघुनाथ नारायण, मोरो त्रिमल, दत्ताजी त्रिमल, निराजी रावजी, नारो नीलकंठ, प्रतापराव इत्यादि गृहस्थ हजर होते. हा निकाल पाली येथे झाला ( ही पाली म्हणजे सुधागड पेठ्यांतील पाली काय ? ). ( प. सा. सं. खंड २, पृ. ५३९ ).

वरील निवाड्यांत दत्ताजीपंत एकंदर सभासदांपैकीं एक होता. पण पुढील कार्य त्याचें स्वतःच्या अधिकारांतील दिसतें. शिवाजीनें अथणीची पेठ ( इ. स. १६७६ ) लुटल्यावर तेथील कांहीं सावकारांना पन्हाळ्यास पकडून ठेवलें. हेतु हा कीं, जी रक्कम द्यावयास ते कबूल नव्हते ती देण्यास त्यांना भाग पाडावें. त्या कामीं दत्ताजीपंतानें आज्ञापिलें.

**कौल**

शके १५९८ चैत्र शुद्ध १०
इ. स. १६७६ मार्च १४

अज दि. दत्ताजीपंत वाकेनवीस माहानाड व बाजे पेठ अथणी यांस —

" लष्कर अथणीस जाऊन तुम्हास दस्त करून पन्हाळ्यास ठेवलें. तुम्ही खंड सातु हजार होन कबूल केले. तरी दोन महिने मुदतींत देणें व सुखे उदीम करून असणें " ( प. सा. सं. खंड २, पृ. ५४४ ).

ऑक्झिडेन इंग्रजांचा वकील रायगडावर शिष्टाईस गेला असतां त्यानें शिवाजीच्या प्रधानांना नजराणा दिला, त्यांत दत्ताजीपंतास ( Public Intelligener ) १२५ रु. ची एक अंगठी देण्याचें ठरलें.

लिंब, ता. सातारा येथें सदानंदाचा मठ होता. त्या मठास इनाम होता. तो चालविण्याबद्दल दत्ताजीपंतानें महादाजी अनंत सुभेदार व कारकून तर्फ सातारा यांस कळविलें ( इ. स. १६७६ जून २९ ).

चाफळ येथील रामास शिवाजीनें दिलेल्या उत्पन्नाविषयीं दत्ताजीपंतानें पुढील व्यवस्था केली ( इ. स. १६७७ सप्टेंबर ३ ).

दत्ताजी त्रिमल – महादाजी सामराज, वेंकाजी रुद्र सुभेदार व कारकून महाला निहाय अनुक्रमें तरफ सातारा व तपे कोळे यांस,

" शिवाजीराजे श्रीरामदासांना भेटण्याकरितां शिवतरीं गेले व श्रीरघुनाथ देवास ११ गांवें इनाम दिलीं. ते गांव देवाचे नांवें लिहोन त्या गांवींचें उत्पन्न देवाचा प्रसाद म्हणोन राजगृहीं जमा करणें असें समर्थांनीं सांगितलें. पण या गांवांच्या प्रत्येकी २१ बिघ्यांचें इनाम समर्थांकडे अखेर चालू केलें. बाकीचे दिवाणांत घेतलें. त्याच्या सनदा दिवाकर गोसावी याजपाशीं दिल्या. याखेरीज इदिलशाही इनाम चालत असेल तोहि चालविणें" ( प. सा. सं. खंड २, पृ. ५८९ ).

दत्ताजी कर्नाटकाचा माहीतगार होता. दत्ताजी व त्याचा भाऊ रायाजी हे कर्नाटकांतच कामगिरी करून प्रसिद्धीस आले होते. दत्ताजी उमदा शिपाई होता. तो शके १६०० च्या पौषांत मरण पावला.

## निराजी रावजी न्यायाधीश

न्यायाधिशाचीं कामें – सर्व राज्यांतील न्याय करावा, न्यायाच्या निवाडापत्रावर संमतचिन्ह करावें.

न्यायाधिशाच्या कामांत युद्धप्रसंगाचा समावेश करण्यांत आलेला नाहीं. तरी निराजी ५००० घोडदळ घेऊन सुभेदार मुअज्झम याजबरोबर ठरलेल्या तहाप्रमाणें औरंगाबादेस गेला होताच ( इ. स. १६६८ ).

राजापूरच्या लुटीविषयीं इंग्रज व शिवाजी यांजमध्यें तहाची वाटाघाट चालू होती, तींत निराजीनें प्रामुख्यानें भाग घेतला होता. तो नेहमीं शिवाजीपाशीं असे. त्याच्या शहाणपणावर इंग्रजांचा फार विश्वास होता. इंग्रज वकील ऑक्झिडेन त्यांजविषयीं लिहितो –

" शिवाजीच्या मुख्य प्रधानांपैकीं निराजी पंडित हा कंपनीला विशेष अनुकूल असल्यामुळें शिवाजीला काय सांगावयाचें असेल तें निराजीला कळवून व त्याचा सल्ला घेऊन सांगावें. युद्धामुळें होणारी हानि व शांततेपासून होणारा लाभ यांबद्दल निराजीशीं चर्चा करून त्याचें मन वळवावें. भिमाजी पंडिताशीं राजापूरच्या बाबतींत झालेला करार इतक्या योग्य रीतीनें पुरा करण्यांत निराजीचीच मध्यस्थी उपयोगीं पडली. म्हणून आम्हांस मिळावयाच्या रकमेपैकीं ५०० होन त्यास देण्याचें अभिवचन आम्हीं त्याला दिलें ( प. सा. सं. खंड २, पृ. ४८७ ) ( इ. स. १६७४ मे ११ ).

शिवाजीविषयीं ऑक्झिडेननें पुढील मत दिलें--" २० मे १६७४ रोजीं माझें निराजीशीं बोलणें झालें. शिवाजी बालपणापासूनच शिपाईपेशाचा मनुष्य असल्यामुळें व्यापाराच्या बाबी त्याला नीट समजत नाहींत; त्या त्याला नीट समजून सांगण्यास मी निराजीस सांगितलें. "

शिवाजीचे सर्व बेत व विचार निराजीला माहीत असत. इतका निराजी शिवाजीच्या विश्वासास पात्र झाला होता. इ. स. १६७४ च्या सुमारास शिवाजीचें सिद्दीशीं युद्ध चालू होतें. त्यासंबंधानें निराजी ऑक्झिडेनपाशीं म्हणाला, " राज्याभिषेक झाल्यावर दंडाराजपुरीवर जोराचा हल्ला चढवून येत्या किंवा पुढच्या पावसाळ्यांत दंडा घेण्याच्या इरायानें सैन्याची तयारी जारीनें सुरू असून शिवाजीनें तोफखान्यांत १५ तोफांची भर घातली आहे. सिद्दीनें किल्ला ताब्यांत द्यावा व वाटेल तेवढी मनसब त्या मोबदल्यांत मागावी असें शिवाजीनें त्यास कळविलें. त्याला सिद्दीनें नकार दिल्यामुळें आतां त्यानें शिवाजीसारख्या कट्टया शत्रूशीं दोन हात करण्यास तयार राहावें " ( इ. स. १६७४ में १३ ते जून १३ ) ( प. सा. सं. खंड २, पृ. ४८९ ).

" राज्याभिषेकानंतर शिवाजी स्वतःची टांकसाळ काढून त्यांतील फायदा मिळविण्याचें ठरवीत असल्यामुळें शिवाजी इंग्रजांचीं नाणीं आपल्या मुलखांत चालू देणार नाहीं असें निराजी म्हणतो. निराजी आपल्यास अनुकूल आहे हें लक्षांत घेऊन शिवाजीस द्यावयाच्या नजरांण्यापैकीं एका अंगठीवर त्याचें मन बसल्यामुळें ती आम्हीं त्याला दिली. राजावरील त्याच्या वजनाचा उपयोग शिवाजीच्या मुलखांत वखारी घालतांना आपणांस पुष्कळ होईल " – ऑक्झिडेन ( प. सा. सं. खंड २, पृ. ४९३ ).

## नेताजी पालकर

नेताजी पालकर हा शिवाजीच्या अत्यंत पराक्रमी सेनापतींपैकीं एक होता. तो त्याच्या पराक्रमावरून व भरारीवरून प्रतिशिवाजी समजला जात होता. शिवाजीच्या कारकीर्दीच्या प्रारंभापासून त्याचा तो सहायक असावा. अफजलखानाच्या स्वारीच्या वेळीं त्याचें नांव प्रामुख्यानें पुढें आलेलें दिसतें. शिवाजीनें जावळीस अफजलखानाशीं सामना देण्यास जाण्याचें योजलें तेव्हां त्यानें आपल्या राज्याचें बाहेरून संरक्षण करण्याची कामगिरी नेताजीवर सोपविली होती. पण तींत विजापुरी सैन्यापुढें त्यास यश आलें नाहीं.

अफजलखानाचा वध करून शिवाजी मुलुखगिरीस निघाल्यावर त्यानें आपल्याबरोबर नेताजीसहि घेतलें होतें. या मोहिमेंत त्या दोघांनीं मिळून वाई ते पन्हाळगडापर्यंतचा मुलूख जिंकला. त्यानंतर लागलीच शिवाजी पन्हाळगडाच्या वेढ्यांत अडकून पडला तेव्हां विजापुरी सैन्यास पायबंद देण्याकरितां शिवाजीनें नेताजीस विजापूकरांच्या पिछाडीवर ठेवलें होतें. शिवाजी पन्हाळ्यांत सांपडण्यापूर्वीं रायबागेजवळ शिवाजीचें रुस्तुमजमा व फाजलखान यांबरोबर युद्ध झालें त्यांत नेताजीनें फाजलखानाची दाणादाण उडवून त्यास पळवून लावलें आणि कवठें, मालगांव, कुंडल, मिरज हीं गांवें घेतलीं.

महाराज पन्हाळगडांत अडकून पडल्या वेळीं शाइस्ताखान पुण्यावर चालून आला होता. त्या प्रसंगीं त्यास तोंड न देतां महाराज कोंकणांत जाऊन त्यांनीं राजापूर लुटलें. नेताजीस त्यांनीं आपल्याबरोबर न घेतां देशावरच्या मुलखाचें रक्षण करण्यास ठेवलें होतें. तो मोगली मुलखांत लुटालूट करीत होता व मोगली सैन्यास झुकांड्या देत मोठमोठ्या मजली मारीत होता. महाराजांनीं उंबर खिंडींत मोगल सरदार कारतलबखान याचा मोड केल्यावर त्या मुलखाचा बंदोबस्त ठेवण्यास नेताजीस नेमलें होतें.

नेताजी पालकर हा सेनापति होता, तरी न्यायनिवाड्याचीं कामें त्याचा मुक्काम ज्या भागांत पडे त्या भागांतील रयतेचीं तो करीत असे. कऱ्हाडाजवळ वसंतगडाच्या पायथ्याशीं तळबीड गांव आहे. त्या गांवाचे पाटील मोहिते आहेत. त्यांजमध्ये ( शके १५८५ आश्विन शुद्ध २, इ. स. १६६३

सप्टेंबर २३ ) पाटीलकी वतनाविषयीं तंटा लागला होता. तो तंटा नेताजी पालकर सरनोबत सुभेदार याच्या विद्यमानें तोडण्यांत आला. म्हणजे नेताजी सरनोबत असून या वेळीं सुभेदारीचें काम करीत होता ( पारें हें गांव तळबीडच्या पूर्वेस २६ मैलांवर विट्यापाशीं आहे ). त्याचा मुक्काम पार येथें असतां त्याजसमोर अग्रवादी साऊजी बिन सूर्याजी मोहिते व पश्चिमवादी नेताजी बिन राणोजी मोहिते हे येऊन गोतसभा भरविण्यांत आली. तिनें पुढीलप्रमाणें निकाल दिला – 'प्रत्येकानें बरोबरीच्या मानपानासह निमी मोकदमी घ्यावी. साउजीस मात्र देशमुखी नाहीं' ( प. सा. सं. खंड १, पृ. २३५ ). म्हणजे पाटीलकीचें वतन दोघांस निमेंनिम मिळालें. पण पाटीलकीच्या जोडीस मोहित्यांकडे देशमुखी होती, ती फक्त नेताजी मोहिते यासच मिळाली.

नेताजी पालकर सेनापति असल्यामुळें त्याजबरोबर अश्वारोह व पायदळ या दोन्ही प्रकारचें सैन्य असे. त्या सैन्याचा उपद्रव आजूबाजूच्या लोकांस व प्रदेशास लागावा हें स्वाभाविक होय. नेताजी मोहिते कसबे तळबाडाजवळ मौजे येलफळ येथें सहकुटुंब राहत असत. येलफळ पालकरांच्या छावणीपासून जवळ असल्यामुळें नेताजी मोहित्यांच्या कुटुंबास तसवीस लागत असे, ती लागणार नाहीं असें आश्वासन पालकरांनीं मोहित्यांना दिलें ( प. सा. सं. खंड १, पृ. २३९ ).

नेताजी हा पिढीजाद बडा देशमुख असावा. त्याला व त्याच्या घराण्यांतील इतर प्रमुखांना राजे हा किताब होता. पुणें व अहमदनगर या दोन जिल्ह्यांमधील सीमेवर घोडनदीच्या दक्षिणेस चार मैलांवर करडें नांवाचा गांव आहे. त्या करडें परगण्यांत मौजे तांदळी हा गांव होता. तो गांव पालकर घराण्यांत पिढी-दरपिढी चालत आला होता. परंतु निजामशाहीच्या समयास कळस गांवचे भाऊबंद, मुसलमान होऊन नेताजी राजे व नरहरसिंगजी राजे पालकर यांजबरोबर वतनाकरितां भांडूं लागले. तेव्हां निवाडा होऊन वतन या दोघां पालकरांचें असें शाबीत झालें. तेवढ्यावर स्वस्थ न बसतां कळसकरांनीं पुनः भांडण उकरून काढलें. त्याचा निर्णय रा. साहेबाजवळ ( शिवाजी ) होऊन कळसकर खोटे ठरले. हल्लींहि ते भांडत आहेत. तरी वतनाचा भोगवटा आमच्याकडे चालत आहे हें

ध्यानांत आणून विचार करावा असें दोघां पालकरांनीं गोपाल शंकर यास कळविलें. ( शके १५८३ ). गोपाळ शंकर त्या भागाचा सुभेदार असावा ( प. सा. सं. खंड २, पृ. ७०९ ).

नेताजी व शिवाजी हे दोघे जयसिंगाबरोबर विजापूरच्या स्वारीवर चालले असतां वाटेंत शिवाजी पन्हाळगड व खेळणा इकडे गेला. तिकडे गेल्यावर शिवाजी व नेताजी यांचें भांडण झालें. परंतु शिवाजीच्या वर्तनाकडे इंग्रज लोक इतक्या साशंक वृत्तीनें पहात होते कीं, हें दोघांचें भांडण खोटेंच समजून त्यांनीं कांहीं डाव मनांत धरून भांडणाचें उगीच ढोंग केलें आहे असें ते मानीत होते. पण हें भांडण करून नेताजी जो निघाला तो विजापूर-दरबाराकडे गेला. तेथील शहाला खूष करून त्यानें त्याजपासून दरसाल तीन लक्ष होनांची नेमणूक व मोगलांच्या सरहद्दीवरील कांहीं मुलूख मिळविला. हा मुलूख ताब्यांत आल्यावर त्यानें आपली राजनिष्ठा व्यक्त करण्याकरितां राजा जयसिंगाकडे पत्र लिहून मोगली मुलखाच्या रक्षणार्थ त्याजपाशीं कांहीं सैन्य मागितलें.

जयसिंगानें त्याजकडे लोक पाठविले. परंतु त्यांना नेताजीला पकडून आणण्याचा गुप्त हुकूम केला. त्याप्रमाणें त्यांनीं त्यास पकडून जयसिंगाच्या छावणींत आणिलें व ही बातमी जयसिंगानें औरंगजेबास दिल्लीस कळविली. तेव्हां औरंगजेबानें त्यास आपणाकडे पाठविण्यास लिहिलें. त्याप्रमाणें तो व त्याचा चुलता कोंडाजी हे दिल्लीस गेल्यावर औरंगजेबानें त्यांचा उपयोग शिवाजीविरुद्ध करण्याकरितां त्यास बाटवून मुसलमान बनवून व सुंता करून त्याचें नांव महमद कुलीखान ठेवलें ( फेब्रुवारी १६६७ ) व त्याचीं बायकांमुलेंहि दक्षिणेंतून दिल्लीस आणविलीं. शिवाय त्यास तीन हजारांची मनसब देऊन अफगाणिस्तानाच्या युद्धांत महाबतखानाच्या हाताखालीं देऊन तिकडे रवाना केलें. तिकडे त्याने चांगलीच बहादुरी करून दाखविली. उत्तरेंत आठ वर्षें घालविल्यावर तो दक्षिणेंत मोगली सैन्याबरोबर आला असतां शिवाजीनें त्यास आपणाकडे बोलावून व शुद्ध करून घेऊन आपल्यापाशीं ठेवलें ( २४ जुलई १६७६ ), ( प. सा. सं. खंड २, पृ. ५५० ).

नेताजीनें कारकून व दशमुख परगणे पुणें यांस शके १५८८ श्रावण वद्य ३, इ. स. १६६६ ऑगस्ट ७ रोजीं खुर्दखत लिहिलें. त्यांत

'महाराज रा. नेताजी राजे' असा मायना आहे. नेताजीस प्रतिशिवाजी समजत असत त्याचें हें द्योतक होय.

"रामजोशी बिन धनजोशी कसबे मांडवगण याजकडे इनाम चालू होतें. त्याचें इनाम सुपे परगण्यांत होतें. तो परगणा शिवाजीकडे आला. तेव्हां सुप्याचे कारकून, देशमुख व महाली कारकून यांनीं रामजोशापाशीं इनाम चालविण्याच्या दृष्टीनें ताजें खुर्द खत मागितलें. तें नेताजीनें त्यास दिलें" (प. सा. सं. खंड २, पृ. १७२).

सारांश, नेताजी सरनोबत असूनहि प्रसंगवशात् सुभेदारीचें काम करीत होता.

## प्रभाकरभट्ट राजोपाध्ये

भोसल्यांचे पुरोहित राजोपाध्ये हे देशस्थ ऋग्वेदी आश्वालायनसूत्री व शाकल्यगोत्रज ब्राह्मण. या घराण्याचे कुलस्वामी मौजे आर्वी तालुका श्रीगोंदें जिल्हा अहमदनगर येथील श्रीमुद्गलेश्वर हे होत. शिवाजीमहाराजांचे पणजे बाबाजी भोसले हे आर्वी, देऊळगांव, हिंगणी, पेडगांव, वडगांव व शिरापूर या गांवांचे मोकाशी व पाटिलकीचे वतनदार होते, त्या वेळीं मल्हारभट व रामेश्वरभट हे त्याच गांवांचे वतनदार कुलकर्णी व जोशी, मुद्गलेश्वर देवस्थानाचे वहिवाटदार व भोसले घराण्याचे उपाध्ये होते. रामेश्वरभट बिन नारायणभट यांच्या नांवाचा उल्लेख असलेलीं शके १५१९ ते शके १५५५ पर्यंतचीं पत्रें उपलब्ध आहेत. रामेश्वर भटास दिलेल्या आर्वी वगैरे गांवांतील जमिनी चालविण्याबद्दल भोसल्यांचीं आज्ञापत्रेंहि आहेत.

रामेश्वरभट यांनीं (१) बाबाजी, (२) मालोजी व विठोजी आणि (३) शहाजी अशा तीन पिढ्यांच्या कारकीर्दीपैकीं दुसरी सबंध, आणि पहिली व तिसरी अंशतः पाहिली होती. ते विशेषतः आर्वीसच राहत होते. मल्हारभट हे बाबाजी भोसले यांजबरोबर वेरुळास गेले होते. मल्हारभटांचे पुत्र लक्ष्मणभट यांनीं मालोजीचें लग्न फलटणचे निंबाळकर नाईक देशमुख यांच्या बहिणीशीं जमविलें. शहाजीच्या दरबारीं असलेले मल्हारभट पुरोहित हे या लक्ष्मणभटांचे पुत्र व त्याच दरबारीं असलेले प्रभाकरभट हे रामेश्वरभटांचे पुत्र होत. शहाजीराजे शके १५५८ च्या सुमारास कर्नाटकांत गेले तेव्हां त्यांजबरोबर हे दोघे गेले असावे.

प्रभाकरभट शके १५४० त आर्वीस राहत असत. पुढें शहाजीराजे यांजबरोबर कर्नाटकांत गेल्यावर राजांकडे येणाऱ्या विद्वानांची दाद लावण्याचें व त्यांचा परामर्श घेण्याचें काम प्रभाकरभट करीत. शिवाजीची रवानगी महाराष्ट्रांत झाल्यावर प्रभाकरभट त्याजकडे आले असावे. शके १५७४ फाल्गुन शुद्ध १ (इ. स. १६५३ फेब्रुवारी १८) या दिवशीं वेदमूर्ति गोपाळभट्ट बिन श्रीधरभट्ट यांजपासून शिवछत्रपति व जिजाबाई यांनीं मंत्रोपदेश घेतला व त्यांस आपल्या अभ्युदयार्थ सूर्यप्रीत्यर्थ अनुष्ठान सांगितलें. ही गोष्ट त्यांनीं वेदमूर्ति प्रभाकरभट उपाध्ये यांच्या विद्यमानें केली. पुढे अफजलखानाच्या भेटीच्या प्रसंगीं प्रभाकरभट शिवाजीमहाराजापाशीं होते. त्या वेळीं त्यांनीं महाराजांकडून श्रीशंकराची पूजा करविली व नंतर महाराज तुळजादेवीचें चिंतन करून व पुरोहित ( प्रभाकरभट ) व इतर ब्राह्मण यांस नमस्कार करून खानाच्या भेटीस निघाले. राजापुरास धर्मनिर्णयार्थ सभा भरली होती. तिला प्रभाकरभट्ट उपाध्याय उपस्थित होते. प्रभाकरभटजी शिवराज्याभिषेकापूर्वींच दिवंगत झाले.

त्यांच्या मृत्यूनंतर बाळंभट शिवाजीच्या आश्रयास होते. महाराजांचे पश्चात् ते तंजावराकडे गेले. शके १६०९ सालीं शहाजीची उपस्त्री नरसंबा ( संताजीची आई ) इनें तंजावराकडील एका गांवाचें पूर्वीचें नांव बदलून व त्यास नरसांबापूर असें नांव ठेवून तो गांव अर्धोदयपर्वानिमित्त ब्राह्मणांस अग्रहार दिला व त्या गांवाचीं २३ क्षेत्रेंकरून एक क्षेत्र बाळंभट यांस दिलें.

( शिवाजी – निबंधावली; 'श्रीशिवाजीमहाराजांचे कुलोपाध्याय' ले. गोविंद रामचंद्र राजोपाध्ये, सातारा. )

## पंताजी गोपिनाथ बोकिल

पंताजी गोपिनाथ हा शिवाजीचा अफजलखानप्रकरणांतील प्रसिद्ध वकील. तो पुरंदर तालुक्यांतील भोंडी गांवचा रहिवासी. त्याचा सर्वांत जुना उल्लेख ता. १८ ऑक्टोबर १६४७ च्या पत्रांत सांपडतो. त्या वेळीं पुणें प्रांताचा ठाणेदार मुकुंद बल्लाळ व मुजुमदार पंताजी गोपिनाथ हा होता. त्याशिवाय परगणे सुपें व कर्यात बारामती येथील तो पूर्वापार देशकुलकर्णी ( देशपांडे ) होता. मजुमदारीच्या कामामुळें त्याला देशपांडे-

पणाचें वतन स्वतः करण्यास सवड नसल्यानें तो तें काम आपल्या मुखत्याराकडून ( मुतालिक ) करून घेई ( प. सा. सं. खंड २, पृ. १०७ ). मलिक अंबर, रणदुल्लाखान, शिवाजीराजे, शाइस्ताखान व जसवंतसिंग यांचे महजर व पत्रें त्यास वतनाचे बाबतींत मिळालीं होतीं. पुण्याचा मजुमदार असतां तो शिवाजीचा नोकर असावा असें वाटतें. तेव्हांपासून त्यानें शिवाजीची निरनिराळ्या हुद्दयांवरील नोकरी केल्याचें दिसून येतें. त्याला निरनिराळीं वतनें मिळविण्याचा जणूं काय हव्यासच होता. वरील देशपांडे वतनाशिवाय पंताजीनें वाई देशांत यमाजी रंगनाथ बोकील यास येळके गांवाची वृत्ति मिळवून देण्याच्या कामीं मदत करून आपण बक्षिसादाखल त्या गांवाची निम्मी वृत्ति संपादिली ( शके १५९३ माघ वद्य १०, इ. स. १६७२ फेब्रुवारी १३ ). ही वृत्ति म्हणजे त्या गांवाचें कुलकर्ण व जोसकी असावी.

शिवाजी राजकारणांतील आपली वकिली करण्यास कोणा एकाच इसमास नेहमीं पाठवीत होता असें नाहीं. ज्या वेळीं जो इसम विशिष्ट मसलतीस योग्य वाटेल त्याजकडे त्या वेळीं तो तें काम सोंपवी. अफजलखानप्रकरणापूर्वी पंताजी शिवाजीचा चिटणीस होता ( शके १५७८, इ. स. १६५६; प. सा. सं. खंड १, पृ. १५७ ).

अफजलखानाचा वध इ. स. १६५९ त झाला. त्यानंतर पंताजी पुनः आपलें चिटणिशीचें काम पाहूं लागला. तो इ. स. १६६८ त चिटणीस होता असें खालील मजकुरावरून दिसतें.

शके १५९० श्रावण<br>इ. स. १६६८ ऑगस्ट

हरि दिनानाथ – पंताजी गोपिनाथ यांस "बहिरो नारायणास घेऊन येण्याबद्दल आपण मला लिहिलें. तसेंच अंबाजीपंताकडे कागद पावते करण्याबद्दलहि लिहिलें. त्याप्रमाणें बहिरोपंत व अंबाजीपंत यांस मी बोलावणें पाठविलें असून ते पत्र पोंचतांच शीघ्र येतील" ( प. सा. सं. खंड १, पृ. ३४० ). इ. स. १६७५ तहि पंताजीकडे चिटणिशीच नव्हे तर सबनिशीहि होती.

शके १५९७ श्रावण वद्य ३
इ. स. १६७५ जुलै २९

त्रिंबक वासुदेव हवालदार व कारकून तर्फ कऱ्हे पठार – रा. पंताजी गोपीनाथ सबनीस व चिटणीस कसबे सासवड यांस, " कसबे सासवडची सबनिशी व चिटणिशी तुमची. तुमचा गुमास्ता कृष्णाजी गोविंद खळदकर यास आवंदा ( यंदा ) मोगलाचे धामधुमेकरितां कांहीं पावलें नाहीं, म्हणून रुसून तुम्हांकडे आला आहे. तरी माघारी पाठविणें. झाडा करून देऊं " ( प. सा. सं. खंड २, पृ. ५२७ ).

शिवाजीमहाराजांची पंताजीवर फार मर्जी होती. त्यांजवर खूष होऊन महाराजांनीं त्यास शिरवळ येथें घर बांधावयास जागा मिरास करून दिली. त्यानें पुण्याजवळ लोहगांवास घर बांधण्यास १८ ऑक्टोबर १६४७ त जागा मिळविली होती.

मल्हारजी यशवंतराऊ व महादाजी राम परगणे शिरवळ – पंताजीपंत बोकील यांस " छत्रपति स्वामींच्या आज्ञेप्रमाणें शिरवळ येथें आपणांस घर बांधावयास जागा मिरास करून दिली आहे " ( इ. स. १६७५ सप्टेंबर १७; प. सा. सं. खंड २, पृ. ५३२ ).

पंताजीकडे सबनिशी, चिटणिशीप्रमाणें वाकनिशीहि होती.



पोटपत्र

शके १५९९ श्रावण वद्य १२
इ. स. १६७७ ऑगस्ट १४

अज दि. ठाणें स॥ कोरेगांव – मोकदम शेटे, महाजन, व रयत मौजे चिमणगांव यांसि " पंताजीपंत वाकेनिवीस व येसाजी मल्हार सुभेदार यांचे कागदाप्रमाणें चिमणगांवचे ज्योतिष व कुलकर्ण विसाजी चिंतामण याचें दुमाला करणें. यानतरायें लायणी हरकत केली होती " ( प. सा. सं. खंड २, पृ. ५८७ ).

## रावजी सोमनाथ पंडित

शिवाजीचें सैन्य इ. स. १६६० त राजापुरास गेलें व त्याच वर्षी कुडाळच्या सांवतावरहि स्वारी करून त्याचा कांहीं मुलूख त्यानें जिंकला. हा मुलूख

व राजापुराजवळचा इतर प्रदेश यांचा कारभार पाहण्यास शिवाजीनें रावजी सोमनाथ पंडित यास सुभेदार नेमलें. इ.स. १६६१च्या मार्च महिन्यांत त्यानें राजापूर लुटून रेव्हिंग्टन, ग्रिफिथ, रँडाल्फ टेलर प्रभृतींना पकडलें व महाडाजवळच्या सोनगडावर त्यांस कैदेंत ठेवलें. एव्हापासून राजापुरास शिवाजीनें केलेल्या लुटीची भरपाई याविषयीं शिवाजी व इंग्रज यांची घासाघीस सुरू झाली. इंग्रज लोकांची चिकाटी दांडगी व शिवाजीचेहि डावपेंच फार या कारणानें हें प्रकरण पुढें कित्येक वर्षें भिजत पडलें. रेव्हिंग्टन प्रभृति कैद्यांची दोन वर्षांत सुटका झाली ( ६ फेब्रुवारी १६६३ ). अर्थात् हीं दोन्ही प्रकरणें फार भानगडीचीं व नाजूक होतीं. त्याशिवाय पोर्तुगीजांशींहि शिवाजीचा कुडाळ-प्रकरणीं व अन्य रीतीनें संघर्ष सुरू झाला. अशा रीतीनें दोन युरोपीय राष्ट्रें व कुडाळ येथील विजापूरकरांचे मांडलिक बनलेले सावंत यांच्या बाबतींत जे गुंतागुंतीचे प्रश्न उत्पन्न झाले ते सोडविण्याची जोखीम रावजी पंडितानें यशस्वीपणें पार पाडली. रावजीचा कुडाळ प्रांताचा सुभेदार असा उल्लेख गोव्याचा पोर्तुगीज व्हाइसरॉय ता. २३ जुलई १६६३ रोजीं रावजीस लिहिलेल्या पत्रांत पुढीलप्रमाणें करतो :—

"आपणाकडील पत्र आतां मिळालें. त्यावरून कुडाळ प्रांताच्या सुभेदारीवर शिवाजीराजांकडून आपली नेमणूक झाली असें कळतें. शिवाजीराजे कुडाळपर्यंत येऊन पोचल्याबद्दल येथें बातमी कळतांच रामजी शेणवी कोठारी यास नजराणा देऊन त्यांजकडे पाठविलें. परंतु शिवाजीराजे उत्तरेकडे जाण्यास निघाल्यामुळें तो तसाच परत आला."

रावजीनें इंग्रजांच्या सुटकेच्या बाबतींत फार खबरदारी घेतली होती. त्यांना प्रथम रायरीहून राजापुरास आणण्यांत आलें. त्या वेळीं रावजी खारेपाटणास होता. तेथून तो राजापुराला आला. तोंपर्यंत इंग्रजांच्या पायांत बेड्या होत्या, व त्यांस भेटीस बोलावून त्यांची पूर्ण सुटका एकदम न करतां 'आपण राजापूर तुमच्या परवानगीशिवाय सोडणार नाहीं' अशी त्यांजपासून शपथ घेऊन मग रावजीनें त्यांस सोडलें ( ६ फेब्रुवारी १६६३ ). अशा स्थानबद्धतेंत त्यांस सुमारें दोन महिने ठेवल्यावर रावजीनें त्यांची बिनशर्त सुटका पुढें केली ( ३० मार्च १६६३ ).

रेंडॉल्फ प्रभृति इंग्रज सुटल्यावर नुकसाभरपाईचा प्रश्न शिल्लक राहिला. त्या कामीं बोलणें करण्याकरितां सुरतेच्या इंग्रज प्रेसिडेंटानें कोणा तरी बनियास पाठवावें असें रावजीनें सुचविलें. रावजी फार मनमिळाऊ होता. राजापूरचे इंग्रज व रावजी यांच्या राजापुरास वारंवार भेटी होत व खलबतेंहि चालत. रावजी हा शिवाजीच्या विश्वासांतला मुत्सद्दी होता. त्यास शिवाजीनें स्वतः लिहिलेलें महत्त्वाचें पत्र आलें असून त्यांत आपण चारशें निवडक लोकांसह पुण्यास शाइस्ताखानाच्या छावणीवर कसा छापा घातला व त्यांत काय घडलें तें लिहिलें होतें. त्यांतील मजकूर त्यानें गिफर्डला सांगितला ( १२ एप्रिल १६६३ ). त्याच वर्षी मे महिन्यांत शिवाजी कुडाळ प्रांतात चार हजार घोडेस्वार व दहा हजार पायदळ घेऊन आला. त्या वेळीं त्यानें कुडाळ प्रांत आपल्यास आदिलशहानें दिला असल्याचें सांगून त्यांतील लोकांस आपणाकडून उपद्रव होणार नाहीं असा त्यानें रावजीच्या सांगण्यावरून त्याजबरोबर हिंडून कुडाळ, वेंगुर्लें इत्यादि प्रमुख ठिकाणच्या लोकांना कौल दिला. कारण शिवाजी, विजापूरकर व सावंत या त्रिकूटाच्या लढ्यांत सांपडलेल्या रयतेचें सहकार्य अशा आश्वासनाशिवाय रावजीस मिळणें शक्य नव्हतें.

आतां राजापुरावरहि शिवाजीचा अंमल बसला असल्यामुळें रावजी तेथील व्यापार भरभराटीस येण्यासाठीं इंग्रज, फ्रेंच व डच या पाश्चात्त्यांना राजापुरास परत येण्याचा आग्रह करीत होता. त्याप्रमाणें रावजीस कुडाळ येथें जाऊन सौंत व्हिलिएट नांवाचा डच व्यापारी भेटला (नोव्हेंबर १६६३). पण डचांची मुख्य वसाहत बटेव्हियांत असून तेथील डच प्रमुखाची परवानगी इकडील डचांना घेणें जरूर असल्यानें ती घेण्यासहि रावजीनें सौंत व्हिलिएट यास सुचविलें. शिवाजीला आरब व इराकी घोडे हिंदुस्थानांत पैदा करणें शक्य होतें व ते तसे त्यास मिळतहि. परंतु हॉलंडमधील घोडे विशेष चांगले असतात असें रावजीस कळल्यावरून कीं काय कोण जाणें, रावजीनें व्हिलिएटपाशीं एक डच घोडा आपल्या धन्याकरितां मागितला. परंतु असा घोडा इतक्या दूरदेशीं आणणें दुरापस्त, अशा त्यानें सांगितलेल्या अडचणी ऐकून रावजी खट्टू झाला ( ३ ऑगस्ट १६६४ ). इंग्रजांचेंहि मन राजापुरास येऊन राहण्याकडे वळवावें असाहि सल्ला रावजीनें व्हिलिएटला दिला.

रावजी हा खरा लढवय्या नव्हे, तो मुलकी अधिकारी होता. तरीहि तत्कालीन लढाऊ परिस्थितींत मुलकी अधिकाऱ्यालाहि मुलखाच्या रक्षणार्थ तलवारबहाद्दरहि व्हावें लागे. रावजीची तीहि तयारी होती. विजापूरचा अजीजखान ८ मे १६६४ रोजीं बालाघाट उतरून कुडाळ प्रांतांत रावजीवर सैन्य घेऊन आला. तो व कुडाळचा लखम सावंत या उभयतांनीं विचार-विनिमय करून एकट्या लखम सावंतानें कुडाळावर जाऊन शिवसेनेपासून कुडाळ गांव घ्यावें असें ठरविलें. त्या संग्रामांत शिवसेनेचा निरुपाय होऊन तिला कुडाळ सोडावें लागलें आणि रावजीस राजापुरास परत जावें लागलें (ऑक्टोबर १६६४). राजापुरास तो स्वस्थ बसला नाहीं. स्वराज्याच्या उन्नतीप्रीत्यर्थ त्याचे तेथेंहि प्रयत्न चालू होते. त्यानें इंग्रजांकडे कारवारास पत्र लिहून मालाचें एखादें जहाज तरी राजापुराला नेऊन लावा म्हणजे कांहीं निष्पन्न होईल असा हितोपदेश केला. वेंगुर्ल्यास भिकाजी पंडित हा विजापूरकरांचा अधिकारी होता व रावजी राजापुरास होता. रावजी व भिकाजी या दोघांनीं डचांना वेंगुर्ल्यास धोका नसल्याचें आश्वासन दिल्यावर डच निर्धास्त राहिले ( ९ ऑक्टोबर १६६४ ).

शिवाजीनें वश केलेला रुस्तुमजमा त्याचा फायदा करून देण्याची एकहि संधि दवडीत नसे. इ. स. १६६६ त रुस्तुमला सेनापत्य देऊन आदिलशहानें कोकणांत शिवाजीविरुद्ध पाठविल्यावर त्याजकडे रावजीनें संधान बांधून कुडाळच्या हद्दीवरचा रांगणा किल्ला फुकटांत मिळविला. त्यामुळें आदिलशहा चिडला ( ५ सप्टेंबर १६६६ ). कुडाळचे देसाई शिवाजीची स्वारी आली कीं, गोवेंकरांच्या आश्रयास जात. शिवाजीनें गोव्याच्या पोर्तुगीजांस त्यांना थारा न देण्यास बजावलें. त्याप्रमाणें पोर्तुगीज वागतात कीं नाहीं हें पाहण्याचें काम रावजीचें होतें. रावजीच्या सततच्या तगाद्या-मुळें, 'सर्व देसायांना पोर्तुगीज प्रान्तातून घालविलें आहे' असें पोर्तुगीज व्हाइसरायानें त्यास कळविलें ( २८ मे १६६८ ). शिवाजीच्या राज्याभिषेक-समयीं त्याच्या बड्या अधिकाऱ्यांना नजराणा देण्यासंबंधानें जी यादी इंग्र-जांनीं केली होती तींत मोरो पंडित, अण्णाजी पंडित व निराजी पंडित यांच्या खालीं रावजी सोमनाथाचे कारभारी ( सेक्रेटरी ) म्हणून नांव असून त्यास ७० रु. किमतीच्या दोन पायऱ्या देण्याचें ठरलें होतें ( ८ मे १६७४ )

औरंगाबादेचा सुभेदार मुअज्झम याजबरोबर शिवाजीचा तह होऊन संभाजीस सप्तहजारी मिळाली. तेव्हां संभाजीस वऱ्हाडांत १५ लक्ष होनांची जी जहागीर देण्यांत आली तिचा सरसुभेदार रावजी सोमनाथ यास नेमण्यांत आलें.

रावजी शिवाजीच्या नोकरींत वीस वर्षें म्हणजे इ. स. १६८० पर्यंत होताच, पण शिवाजीनंतरहि त्यानें संभाजी व राजाराम या दोघांची कारकीर्द पाहिली होती. संभाजीस पकडून औरंगजेबानें त्याचा वध तुळापुरास शके १६१० फाल्गुन वद्य ३० रोजीं केला. त्या वेळीं त्यास संगमेश्वरीं धरणें आलें होतें. संगमेश्वर ही एक त्याची राजधानीच होऊन राहिली असल्यामुळें त्याजबरोबर त्याचें मंत्रिमंडळहि होतें. त्यांतील एक अमात्य नारोपंत याचा वित्तविषय त्या धामधुमींत संगमेश्वराहून रायगडास जात असतां मौजे पेडवें ( पेडें – परशुराम ) तालुका चिपळूण येथें लुटण्यांत आला, ही बातमी राजाराममहाराजांस समजल्यावर त्यांनीं तो आपले लोक पाठवून लुटारूंपासून मिळविला. त्यांत एक सोन्याचें कलमदान होतें. तें राजारामानें आपल्या रत्नशाळेंत ठेवून घेतलें व त्याच्या मोबदल्यांत रत्नशाळेंतील सोनें नारोपंतास देवविलें ( २३ एप्रिल १६८९ ). त्या वेळीं रावजी सोमनाथ हा रत्नशाळेवरचा अधिकारी होता.

रावजीस कांहीं पत्रांतून मोडींत राउजी म्हटलें आहे. रावजीपेक्षां मोडींत राउजी लिहिणें सोपें म्हणून रावजीचा राउजी झाला. रावजीस वतनाचा अभिलाष इतरांप्रमाणेंच होता. अण्णाजी दत्तो यास संगमेश्वराचें देशकुलकर्ण मिळालें होतें, तसें रावजीपंतानेंहि चिपळूणचें देशकुलकर्ण संपादलें होतें. त्या बाबतींत संभाजीच्या कारकीर्दींत वाद उपस्थित झाला व त्यांत संभाजीचा मुख्य प्रधान कबजीबाबा यास लक्ष घालावें लागलें. त्या वेळीं कबजी संगमेश्वराहून चिपळुणाजवळील परशुरामास येऊन राहिला होता. त्यास रावजीपंताचा वादी कृष्णाजीपंत भेटला व त्यानें न्याय मिळविण्याकरितां बोंबहि मारली. कारण तें वतन मूळ कृष्णाजीपंताचें होतें.

रावजीपंत डोलींत बसून कबजीबाबाबरोबर होता. त्याला डोली उभी करवून कृष्णाजीपंत बोलला, ‘ राउजी नाना, तूं म्हातारा जाला आहेस. उद्यां मरून जाशील. तुजपाशीं पटकुल ( द्रव्य ) अपरंपार असतां तुझ्या

पुत्रास काय उणें आहे ? हें टाकून माझ्या अंगावरची घोंगडी बलात्कारें घेतोस हें तुझें कोण भूषण ? ' तें ऐकून राउजीपंतीं दोन्ही हात जोडून म्हणाला, ' या उपरी तुझ्या वतनाच्या वाटेस आजपासून जाईल तो तुझ्या बटकीचा लेक असेल. '

"त्याउपरी राउजीपंत मृत्यु पावले व त्यांच्या मागें काशी राउजी व त्र्यंबक राउजी हे पुत्र होते. त्यांना घेऊन राउजीपंताची स्त्री विशाळगडास रामचंद्रपंत अमात्य यांजकडे गेली. त्यांचा दावेदार कृष्णाजीपंत विशाळगडावर आपला हजर ! तो गडाच्या दरवाजापाशीं योगासन घालून व धरणें धरून बसला होता. तथापि रामचंद्रपंतांनीं देशकुलकर्णपणाच्या तीन तक्षिमा करून दोन तक्षिमा रावजीपंताच्या पुत्रास व एक तक्षीम कृष्णाजीपंतास दिली. पुढें औरंगजेबाचा अंमल तळ-कोंकणांत बसून पळापळ झाल्यावर रावजीपंताचे दोघे मुलगे पाटण तालुक्यांतील मोरगिरीस जाऊन राहिले. त्यानंतर राजारामाची कारकीर्द सुरू होऊन त्यानें सदर वतन कृष्णाजीपंताच्या वंशजास बहाल केलें" ( इतिहास-मंजरी, पृ. १२६–३० ).

## बाळाजी आवजी चिटणीस

बाळाजीचे पूर्वज सिद्दीच्या राज्यांत राहत होते. बाळाजीची आई बुलगाई तिचा भ्रतार व दीर यांना सिद्यांनीं धरून वधिलें आणि बाळाजी, त्याचे बंधु व मातुश्री यांस पकडून व बाटवून द्वीपांतरीं पाठविण्याचें ठरविण्यांत आलें. त्याप्रमाणें त्यांचें जहाज निघालें असतां तें राजापूर बंदरीं आलें. तेथें बुलगाईच्या भावानें त्यांस सोडवून घेतलें. सुटकेनंतर ती मंडळी राजापुरासच होती व बाळाजी हा कसबेदारच्या हाताखालीं लेखक म्हणून राहिला. पुढें शिवाजीनें राजापुरास जाऊन त्याची नाकेबंदी केली तेव्हां बाळाजीस पकडून शिवाजीपुढें उभें करण्यांत आलें. त्या वेळीं बाळाजीची आई बुलगाई महाराजांपुढें उभी राहून म्हणाली, ' आम्हीं रंजलीं गांजलेलीं माणसें, शेर मिळेल तो घेऊन खातों. या पोराला नेऊन तूं मारशील तर मग मी रंडक्या बायकोनें काय करावें ? ' तें ऐकून महाराजांनीं बाईस अभय देऊन म्हटलें, ' तुमचे तिघे पुत्र मला भेटले. तसाच मला तुमचा चौथा लेंक समजा म्हणजे झालें. ' मग महाराजांनीं बाळाजी, चिमणाजी व शामजी असे तिघे भाऊ आपणाजवळ ठेवून घेतले व त्या तिघांस वेगळालीं कामें सांगितलीं.

बाळाजीवर महाराजांचा पुढें इतका विश्वास बसला कीं, त्यांच्या अंगांत देवी येऊं लागली तेव्हां बाळाजीनें एकटें जवळ असावें. महाराजांस देवीला जें कांहीं विचारावयाचें असेल तें त्यांनीं बाळाजीस आधींच सांगून ठेवावें. तो प्रश्न बाळाजीनें देवीस प्रार्थना करून विचारावा आणि जें उत्तर येईल तें लिहून ठेवावें व नंतर तें महाराजांस दाखवावें.

बाळाजीस महाराजांनीं चिटणिशीचें काम सांगितलें व त्याचे बंधु चिमणाजी यास दप्तरदारी व शामजीस रायगडाची कारखाननिशी देण्यांत आली.

## मुरारबाजी

मुरारबाजीचा बाप बाजी मुरार महाडकर हा चंद्रराव मोरे याच्या पथकांत सन १६३७ पासून नोकरीस होता. मोगलाबरोबर चाललेल्या युद्धांत विजापूरकरातर्फे बाजीनें विशेष पराक्रम केल्यावरून त्यास आदिलशहानें उमराव असा किताब देऊन हुजुरांत ठेवून घेतलें. त्याच्या बदल्यांत मोऱ्यांनीं आपल्या पदरीं त्याचा वडील पुत्र मुरार यास नोकरी दिली. मुरार याचा जन्म सन १६१६ त झाला. त्यास त्रिंबकजी, शंकराजी, संभाजी व महादजी असे चार भाऊ होते. या पांच भावांच्या वंशास पंच बाजीचा वंश असें म्हणतात. चंद्रराव मोरे यांजवरील स्वारींत मुरारबाजी शिवाजीच्या फौजेशीं मोठ्या निकरानें लढला. परंतु तो हतवीर्य होऊन मोरे यांचीं मुलेंमाणसें शिवाजीच्या हातीं पडलीं. मुरारबाजीस आमच्या नोकरीस याल तर तुमचा जीव वांचवितों असें शिवाजीनें कळविल्यावर मुरारबाजी आपल्या सर्व भावांसह शिवाजीकडे आला. त्यानंतर शिवाजीनें मुरारबाजीस पुरंदरावर किल्लेदार नेमलें ( शककर्ता शिवाजी ). मुरारबाजी यानेंच पुरंदरच्या वेढ्यांत धारातीर्थीं देह ठेवला. तो पांच हजार दशमांचा सरदार होता.

## मायनाईक

शिवाजीच्या आरमारावरील अधिकाऱ्यांत दर्यासारंग व्यंकाजी, दौलतखान व मयाजी नाईक भाटकर यांचीं नांवें झळकतात. सिद्दीबरोबर लढण्यांत तेच प्रमुख होते. मयाजी सोनकोळी जातीपैकी असून त्याचें घराणें कोळवाड कसबा चौल तर्फ अष्टागर येथील होय. शिवाजीने राजपुरीपाशीं

पद्मदुर्गनामक किल्ला राजपुरीवर मारा करण्याकरितां बांधला. त्यावर सुभानजी खराडे हा सरनोबत व सुभानजी मोहिते हा हवालदार होता. त्या दोघांनीं मयाजीस किल्ल्यावर नोकरींत घेतलें. शिवाजीनें राजपुरी जिंकण्याकरितां कित्येक वर्षें शर्थ केली. पण कांहीं इलाज चालत नाहीं असें पाहून मोरोपंतांची या कामगिरीवर नेमणूक करण्यांत आली. या वेळीं मोरोपंतानें मायपाटलास विचारलें, 'तुम्ही चाकर छत्रपतीचे. सरकारची चाकरी निकडीची पडली तर कराल कीं नाहीं?' मायपाटलानें आज्ञा प्रमाण म्हणतांच मोरोपंतानें सांगितलें, 'जंजेरियास शिड्या लावून मात्र द्याव्या. आम्ही हजार-बाराशें धारकरी तयार केले आहेत.' किल्ल्यावरील पहारा चुकवून किल्ल्याला शिड्या लावण्याची कामगिरी पाटलानें केली, पण धारकरी येईनात. यामुळें मायनाईकाची कामगिरी फुकट गेली.

दुसऱ्या दिवशीं नाइकानें मोरोपंतास घडलेली हकीकत सांगितली. मोरोपंतानें आपली चूक कबूल करून शिवाजीपाशीं नाइकाची शिफारस केली. शिवाजीनें मोरोपंतास कोताई केलीत, कार्य राहून गेलें असा बोल लावला आणि पद्मदुर्गाचे हवालदार सरनोबत, सबनीस व मायपाटील यांस पालखीचा मान देऊं केला. पाटलानें पालखीच्या मानास आपण पात्र नाहीं असें समजून नम्रपणें 'सेवकास पावली' एवढेंच म्हटलें. पाटलानें पालखी स्वीकारण्याचें नाकारलेलें पाहून शिवाजीनें त्यास पालखी नांवाचें गलबत देण्याचें फर्मावून छत्री व निशाण बक्षीस दिलें (शिवाजी सावनीर, पृ. १९७).

### बहिरजी नाईक

बहिरजी नाईक हा शिवाजीचा मुख्य हेर होता. महत्त्वाच्या बातम्या त्याजकडून शिवाजीस मिळत असून त्याजवर शिवाजीचा इतबार होता. स्वराज्य, परराज्य, सरकारकून, सरनोबत, सुभे, मामले व शहरें, किल्ले इकडील बातमी आणण्यास हरकारे ठेवलेले असत व ते बहिरजीच्या हाताखालीं काम करीत. निरनिराळ्या अधिकाऱ्यांना लखोटे पोचविणें व त्यांचे लखोटे महाराजांकडे आणणें हीं कामें बहिरजी हा हरकाऱ्यांकडून करून घेई. आलेलीं पत्रें चिटणिसाकडे पोंचविण्यांत येत. त्यांनीं त्यांचे सारांश लिहून घ्यावे, यादी करावी व त्यांतील महत्त्वाचा मजकूर चिटणिसांनीं महाराजांस निवेदन करावा.

# प्रकरण दहावें

# सैन्य व आरमार

सैन्याद्विना नैवराज्यं न धनं न पराक्रमः।

– शुक्रनीति, अध्याय ४

अर्थ – सैन्यावांचून राज्य, धन आणि पराक्रम प्राप्त होत नाहींत.

शिवाजीनें आपल्या सैन्याची उभारणी व रचना वरील त्रिविध साध्य डोळ्यापुढें ठेवूनच केली होती. त्यासाठीं त्यानें पदाति, अश्ववाहिनी नौदल व तोफखाना बनविला व देशरक्षणार्थ नवे दुर्ग बांधले व जुने ताब्यांत घेतले.

## पायदळ

पायदळांत दहा पाइकांचा एक गट व त्यावर एक नाईक असे. अशा पांच गटांवर एक हवालदार व दोन तीन हवालदारांवर एक जुमलेदार. दहा जुमल्यांवर एक हजारी व सात हजाऱ्यांवर एक सरनोबत. जुमलेदाराचा सालीना पगार १०० होन. त्याच्या सबनिसास ४० होन, हजारीस ५०० होन व त्याच्या सबनिसास १०० ते १२५ होन.

## घोडदळ

घोडदळांत बारगीर व शिलेदार असे दोन वर्ग असत. बारगिरापाशीं घोडा व हत्यार सरकारी असे. शिलेदारापाशीं त्याचाच घोडा असे.

शिलेदार युद्धप्रसंगीं आपल्याबरोबर स्वखर्चानें हवे तितके स्वार घेऊन येई. बारगीर पागेच्या दिमतीस असे. त्याजपेक्षां शिलेदार कमी दर्जाचा. शिलेदारावर हुकमत पागेची. पंचवीस बारगिरांवर एक मराठा धारकरी हवालदार. पांच हवालदारांचा एक जुमला. जुमलेदारांना सालिना पगार ५०० होन व एक पालखी. मजुमदाराला पगार १०० ते १२५ होन. २५ घोड्यांमागे एक पखाली व एक नालबंद. दहा जुमल्यांवर एक हजारी. त्याला पगार एक हजार होन. त्याजपाशीं एक मजुमदार, एक मराठा कारभारी व एक जमेनीस प्रभु कायस्थ असे. पांच हजार स्वारांवर एक पंचहजारी, त्याला सालिना पगार दोन हजार होन. पंचहजाऱ्यावर एक सरनोबत; बारगीर व शिलेदार या दोघांवर हुकमत सरनोबताची. शिवाजीच्या सैन्यांत हिंदूंप्रमाणेंच फिरंगी ( पोर्तुगीज ) व मुसलमान पठाणहि असत.

एकंदर सैन्यांत घोडेराऊत संख्या १ लक्ष ५ हजार; आणि हशम व मावळे सरदार असामी एक लक्ष. हत्ती, हत्तिणी व छावे १२६०. पाण्यांतील जहाजांवरील सरदार दर्यासारंग इब्राहिमखान व मायनाईक. पागेकडील सरदार – हंबीरराव मोहिते, संताजी घोरपडे इत्यादि २९; शिलेदार व मुलखीचे सुभेदार – नागोजी बल्लाळ, गणेश शिवदेव, जानराव वाघमारे इत्यादि ३१; हशम मावळे सरदार – येसाजी कंक सरनोबत, गणोजी दरेकर, कृष्णाजी भास्कर, त्रिंबकजीप्रभु इत्यादि ३६; गडकोट, जंजिरे एकूण ४९; राजानें नवे गड वसविले १११; कर्नाटकांतील गडकोट ३८; घाटाखालीं गडकोट ७९; एकंदर गड २४०.

तत्कालीन मावळा म्हटला म्हणजे अंगांत एक कंबरेइतकें कुडतें, ढुंगणाला लंगोटी, डोक्याला पागोटेवजा चिंधी, खांद्यावर घोंगडी, हातांत काठी व पायांत जोडा अगर वहाणा असें चित्र डोळ्यापुढें उभें राहतें. शिवाजीच्या सैन्यांत असलेल्या लोकांचा पोशाख याहून नीटनेटका व टाकठिकीत असला पाहिजे. त्याचें वर्णन फ्रायरनें केलें आहे तें येणेप्रमाणें :– "शिवाजीच्या सैनिकांच्या पायांत चोळणा, अंगांत कुडतें व डोक्याला पागोटें असे. त्यांच्या हातांत लहान मोठ्या तरवारी, भाले, बरच्या, बाण, तीर व तोड्याच्या बंदुका असत."

वरील सैनिकांतून निवडक दोन सहस्र काढून त्यांचीं त्यानें चार पथकें पाडलीं व त्यांत दोन सहस्र माणूस ठेवलें. "त्यांत कांहीं बंदुकी, कांहीं विटेकरी, वरकड आडहत्यारी, फिरंग असें माणूस सजलें. तितके माणसास साज करून दिले. डोईस मंदिल, अंगास सखलादी फंतू ( डगला ), दोहो हातीं दोन सोन्याचीं कडीं, कोणास रुप्याचीं कडीं, तरवारीस अबनाळ तैनाळ ( म्यानाच्या वरील बाजूचें व खालच्या बाजूचें अडकवण ), बंदुकीस कट रुप्याचे व विटियास कट तैसेच, कानास जोडी कुडक्याची, येणेंप्रमाणें अवघे लोकांस साज सरकार निसबतीनें देऊन लोक सजविले. अवघ्यांचे एकच साज. मर्दानें म्हणावे तर एकापेक्षा एक अधिक. अशी परीक्षा करून हमेशा दोन हजार मावळे लोक पालखीबरोबर जवळ असावे " ( सभासद ).

## स्वारीचें धोरण

पावसाळ्यांत सैन्यानें देशांत छावणीस यावें. दसरा होतांच छावणींतून सैन्यानें कूच करून जावें. आठ महिने लष्करानें बाहेर परमुलखांत पोट भरावें, खंडण्या घ्याव्या. लष्करांत बायको, बटीक व कलावंतीण नसावी. वैशाख मासीं छावणीस येतांच आपले मुलखाच्या सीमेवर सर्व लष्कराचा झाडा घ्यावा. विशेष करून सोनें, रुपें, जडजवाहीर व कापड वस्तभाव सर्व सरदारांनीं बरोबर घेऊन राजाच्या दर्शनास जावें. तेथें हिशेब समजावून देऊन माल हुजूर द्यावा. आणि लष्कराच्या लोकांचे हिशेब द्यावे. फाजील समजावीस जो ऐवज मागणें तो हुजूर मागावा. मग छावणीस यावें. काम कष्ट केलिया लोकांस सरंजामा द्यावा. गैरवागणूक वा नामर्दी केली असेल त्यास शासन करावें.

## पगाराची पद्धत

सरनोबत, मजुमदार, कारकून व हुजुरांतील लोक यांस तनखे, वराता देत होते. लष्करांत, हशमास व गडास मोकाशे, महाल, गाव मुळीच देणें नाहीं. जें देणें तें वरातेनें अगर पोत्यांतून रोख द्यावें. मोकाशी झाल्यानें रयत अव्यवस्थित होईल व बळावेल. कमाविशीची कैद चालणार नाहीं. ज्यांस मोकासे द्यावे तो व जमीदार एक झाल्यानें बेकैद होईल. म्हणून मोकासे कोणास देणेचे नाहींत.

## सैन्याची शिस्त

शिवाजीच्या स्वारीची पद्धति पुरातन कालची होती. रघुकुलांतील राजेहि आश्विन महिन्यांत दिग्विजयास निघत. ते आठ महिने दिग्विजय करून व आपल्या सैन्याचें पोट परमुलखांत भागवून पावसाळयांत वैशाखापासून पुढें चार महिने देशीं विश्रांतीस येत. मध्ययुगीन हिंदु राजांचीहि तीच वहिवाट होती. शिवाजी आपलें सैन्य पावसाळयाच्या प्रारंभीं विसर्जन करी. त्याचें खडें सैन्य छावणी करून असे. त्याची व्यवस्था लावण्यासाठीं त्यानें शके १५९३ वैशाख शुद्ध १५, इ. स. १६७१ मे १३ या दिवशीं चिपळुणाजवळ आलेल्या आपल्या सेनाधिकाऱ्यांना पुढीप्रमाणें हुकूम पाठविला –

### श्रीभवानीशंकर

रा. शिवाजीराजे – म. अ. जुमलेदारांनीं व हवालदारांनी व कारकून दिमत पायगो मुकाम मौंजे हलवर्ण ताा चिपळूण मामले दाभोळ यांस " कसबे चिपळुणी साहेबीं लष्कराची विले केली आणि या उपरी घाटावरी कटक जावें ऐसा मान नाहीं. म्हणून एव्हां छावणीस रवाना केलें. ऐसियास, चिपळुणीं कटकाचा मुकाम होता. याकरितां दाभोळच्या सुभ्यांत पावसाळयाकारणें पागेस सामा ( सांठा ) दाणा व वरकड केला होता. तो कितेक खर्च होऊन गेला. व चिपळुणाआसपास विलायतेंतील लष्कराची तसवीस, गवताची व वरकड हरएक बाब लागली. त्याकरितां हाल कांहीं एक उरला नाहीं. ऐसें असतां वैशाखाचे वीस दिवस उन्हाळा. हेहि पागेस अधिक बैठी पडली. परंतु जरूर झालें त्याकरितां कारकुनाकडून व गडोगडीं गल्ला असेल तो देववून जैसी तैसी पागेची बेगमी केली आहे. त्यास तुम्ही मनास वांटेल ऐसा दाणा, रतीब, गवत मागाल, असेल तोंवरी धुंदी करून चाराल, नाहींसें झालें म्हणजे मग कांहीं पडत्या पावसांत मिळणार नाहीं; उपास पडतील, घोडीं मरायास लागतील. म्हणजे घोडीं तुम्हीच मारलीं ऐसें होईल व विलातीस ( मुलुख ) तसवीस देऊं लागाल. ऐशास लोक जातील, कोण्हीं कुणब्याचे येथील दाणे आणील, कोण्ही भाकरी, कोण्ही गवत, कोण्ही फांटे, कोण्ही भाजी, कोण्ही पाले; ऐसे करूं लागलेत म्हणजे जे कुणबी घर धरून जीव मात्र घेऊन राहिले आहेत तेहि जाऊं लागतील. कित्येक उपाशी मराया लागतील. म्हणजे त्याला ऐसे होईल कीं, मोगल

मुलुखांत आले त्याहूनहि अधिक तुम्ही! ऐसा तळतळाट होईल! तेव्हां रयतेची व घोडियांची सारी बदनामी तुम्हावर येईल; हें तुम्ही बरें जाणून, सिपाही हो अगर पावखलक हो, बहुत यादी धरून वर्तणूक करणें. कोणी पागेस अगर मुलुखांत गांवोगांव राहिले असाल त्याणी रयतेस काडीचा आजार द्यावया गरज नाहीं. आपल्या राहिला जागाहून बाहीर पाय घालाया गरज नाहीं. साहेबी खजानांतून वाटणीया पदरी घातलिया आहेती. ज्याला जे पाहिजे, दाणा हो अगर गुरेढोरे वागवीत असाल त्यास गवत हो, अगर फाटे, भाजिपाले व वरकड विकावया येईल ते रास घ्यावे, बाजारास जावे, रास विकत आणावे. कोणावरही जुल्म अगर ज्याजती अगर कोण्हासी कलागती करावयाची गरज नाहीं. व पागेस सामा ( सांठा ) केला आहे तो पावसाळा पुरला पाहिजे. ऐसे तजविजीनें दाणा रतीब कारकून देत जातील तेणेप्रमाणेंच घेत जावे. कीं उपास न पडतां रोज बरोज खायाला सांपडेल आणि होत होत घोडी तबाना होत ऐसे करणें. नसतीच कारकूनासी धसपस कराया अगर अमकेच द्या तमकेच द्या ऐसे म्हणाया धुंदी करून खासदार कोठींत कोठारांत शिरून लुटाया गरज नाहीं. व हाली उन्हाळ्याला आहे तैसे खलक पागेच्या आहेत. खण धरून राहिले असतील व राहतील. कोणी आगट्या करतील, कोणी भलते जागा चुली रंधनाला करतील, कोणी तंबाखूला अग्नी घेतील, गवत पडले आहे ऐसे, अगर वारे लागले आहे असें मनांत न आणतां म्हणजे अविसाच एखादा दगा होईल. एका खणास आगी लागली म्हणजे सारे खण जळून जातील. गवताच्या लव्हाळ्यास कोणीकडोन तरी विस्तव जाऊन पडला म्हणजे सारें गवत व लव्हाळ्या आहेत तितक्या एकेएक जाळो जातील. तेव्हां मग कांहीं कुणबियांच्या गर्दना मारल्या अगर कारकुनास ताकीद करावी तैसी केली तरी कांहीं खण कराया एक लाकूड मिळणार नाहीं; एक खण होणार नाहीं. हे तों अवघियाला कळते. या कारणें बरी ताकीद करून खासे खासे असाल ते हमेसा फिरत जाऊन रंधनेकरिता आगट्या जाळिता, अगर रात्री दिवा घरात असेल, अविस्ताच उंदिर वात नेईल ते गोष्टी न हो, आगीचा दगा न हो. खण, गवत वाचेल ते करणे. म्हणजे पावसाळा घोडी वाचतील. नाहीतर मग घोडी बांधावी न लगेत. खायास घालावे न लगेत.

पागाच बुडाली. तुम्ही निसुर झालात ऐसे होईल. या कारणे तपशिले तुम्हांस लिहिले असे. जितके खासे खासे, जुमलेदार, हवालदार, कारकून आहे तितके हा रोखा तपशिले ऐकणे आण ... हुशार रहाणे. वरचेवरी रोजचा रोज खबर घेऊन, ताकीद करून. येणेप्रमाणें वर्तणूक करितां ज्यापासून अंतर पडेल, ज्याचा गुन्हा होईल, बदनामी ज्यावर येईल त्यास मराठियांची तो इज्जत वांचणार नाहीं, मग रोजगार कैसा ! "( प. सा. सं. खंड २, पृ. ३९२ ).

शिवाजी सैनिकांचा पगार रोख वा वरातीनें देत असे. त्यांना तो जहागीर देत नसे. पण सैनिक शेतकरी असल्यास त्यानें सरकारांत भरावयाचा सारा न भरतां त्याच्या पगारांत धरण्यांत येई. पगाराची बाकी तो तुंबू देत नसे. या कारणानें पेशवाईतल्याप्रमाणें पगार भारी द्यावा लागत नसे. "पायदळांतील सैनिकांना दरमहा तीन ते पांच रुपये, घोडदळांतील सैनिकांना दरमहा सहा ते वीस रुपये असत. अधिकारी वगैरेंनी मोठी मर्दुमकी गाजवली म्हणजे त्यांना तो मोठालीं बक्षिसें देई. लढाईत जखमी झालेल्यांना त्यांच्या जखमा जशा असतील त्या प्रमाणांत नेमणुका मिळत. लढाईत जे सैनिक ठार झाले त्यांच्या बायका-मुलांना तैनात ( बालपरवेशी ) असे. अफजलखानाशीं झालेल्या युद्धांत जे पडले त्यांच्या पुत्रहीन विधवांना नवऱ्याच्या पगाराच्या निम्मे तैनात त्यानें मंजूर केली. तसेच ज्यांचे मुलगे कामावर घेण्याजोगे होते त्यांना बापाच्या कामावर नेमण्यांत आलें. जखमींना माणसी २५ होन, ५० होन, १०० व २०० होन याप्रमाणें बक्षिसें देण्यांत आलीं. सेनापति व बडे योद्धे यांना हत्ती, घोडे मिळाले. कांहींना कडी, तोडे, हार, तुरे, चौकडे, कंठे मिळाले. कांहींना गांव इनाम दिले " ( सभासद ).

## युरोपियनांचें मत

शिवाजीच्या सैन्याविषयीं युरोपियन ग्रंथकारांचें मत काय होतें हें सांगणें अप्रस्तुत ठरणार नाहीं. फॉरिन बायॉग्रफीज ऑफ शिवाजी या ग्रंथाच्या आधारें खालील माहिती मिळते.

" शिवाजीच्या सैन्यांत सगळेच लोक युद्धकलाविशारद नसत. त्यांपैकीं कांहीं भरती केलेले उमेदवार नवशिके असत. त्यांना युद्धकला शिकविण्यासाठीं हल्लीसारखीं लष्करी विद्यालयें त्या काळीं नसल्यामुळें शिवाजी त्यांना शेतांतच तसें शिक्षण देत असे. त्यांना तीन महिने ठेवून घेऊन त्यांनी

घोड्यावर कसें बसावें, युद्धकलेचे डावपेंच कसे खेळावे व कसें लढावें हें काळजीपूर्वक शिकवावें. ( दासविश्रामधामग्रंथांत म्हटल्याप्रमाणें तो मारुतीरायाची मूर्ति असलेला ताईत त्यांस दंडांत बांधावयास देई. हेतु असा कीं, त्या योगानें त्यांस धैर्य येऊन आणीबाणीच्या प्रसंगीं शत्रूशीं लढतांना त्यांनीं जिवाची तमा बाळगूं नये ).

" शिवाजी सेनाधिकाऱ्यांना सन्मानानें वागवी. आपले सैनिक नोकरी सोडून जाऊं नयेत याकरितां जे सैनिक ज्या प्रदेशांतील रहिवासी असत त्यांना त्याच प्रदेशांत ठेवण्याची तो काळजी घेत असे. यामुळें ते आपल्या घरापाशीं असत व नोकरीस कंटाळत नसत. सैनिकांना त्यानें पगार भरपूर व महिन्याच्या महिन्याला दर शुद्ध प्रतिपदेस द्यावे. त्याच्या स्वारास प्रतिमास पगार दोन पागोडा ( होन ) मिळावा. पागेंतील सर्व घोडीं त्याच्या मालकीचीं असून त्यांची निगा ठेवण्यास तो मोतद्दार नेमी. दोन मोतद्दार तीन घोड्यांची चाकरी करीत.

" सैनिकांच्या मनांत कोणते विचार घोळतात याचाहि छडा त्यानें लावावा. रात्रीच्या वेळीं गोटांत हिंडून सैनिक काय बोलतात हें ऐकून त्यांजवरील अधिकाऱ्यांच्या कृत्यांची त्यानें माहिती मिळवावी. जर कोणीं कांहीं गुन्हा केला तर त्यास त्यानें कडक शासन करावें. तो म्हणे, कोणत्याहि राजानें त्याच्या कोणत्याहि अधिकाऱ्याच्या गैरवर्तणुकीकडे दुर्लक्ष करूं नये; एवढेंच नव्हे तर आपल्या अधिकाऱ्यांच्या दुष्कृत्यांकडे दुर्लक्ष केलें तर त्यांचीं कृत्यें त्याला संमत आहेत असा लोक त्याचा अर्थ करतात. त्यांस शिक्षा केल्यानें तो न्यायप्रिय आहे असा समज होऊन अधिक दुष्कृत्यें घडण्याचीं टळतात. कारण पक्षपात न करतां सर्वांस सारखा न्याय दिल्यानें राजाविषयीं सैनिकांत असंतोष उत्पन्न होत नाहीं. सैनिकांनीं युद्धांत पराक्रम केल्याचें समजल्यावर त्यानें ज्याच्या त्याच्या योग्यतेप्रमाणें त्यास पारितोषिक देऊन त्यास हुरूप आणावा.

" शिवाजी आपल्या सैनिकांच्या प्राणास फार जपत असे. होतां होईतों सैनिकांचे बळी कमी पडतील याविषयीं तो दक्ष असल्यानें सैनिक त्याजवर खुष असत. म्हणूनच शाइस्ताखान व शिवाजी यांच्या संग्रामांत शिवाजीचें नुकसान कमी होत असल्याचें पाहून शाइस्ताखान विस्मय

घावला. युद्धांत वा इतरत्र मिळालेल्या लुटीपैकीं सोनें, चांदी खेरीजकरून बाकीच्या वस्तु त्यानें सैनिकांना बहाल कराव्या.

"शिवाजीच्या सैन्यांतील सर्व शिपायांना कोणाहि स्त्रीस उपद्रव देतां कामा नये अशी सक्त ताकीद होती. हा हुकूम जर कोणी एखाद्यानें मोडला तर त्यास इतकी कडक शिक्षा करण्यांत येई कीं तिचा धाक इतर सैनिकांना बसून त्यांनीं तसलें कृत्य करण्यास धजूं नये. शिवाजीचा सेनापति नेताजी पालकर यानें स्त्रियांना कोणत्याहि प्रकारचा उपसर्ग दिला नाहीं. कारण हिंदुस्थानांत स्त्रियांना मोठ्या आदरानें वागविण्याचा प्रघात असून ते युरोपियन लोकांहूनहि स्त्रियांना अधिक मान देतात.

"स्त्रियांप्रमाणें निरपराधी लोकांशींहि त्यांचें वर्तन सौजन्याचें असे. ज्या माणसाकडून प्रतिकार केला जाणार नाहीं, त्याजवर त्याच्या सैनिकानें शस्त्र चालवूं नये. मद्यपानानें सैनिक बेफाम होऊन वाटेल तें दुष्कृत्य करण्यास प्रवृत्त होतात म्हणून त्याच्या लष्करांत मद्यपानास बंदी होती.

"शिवाजी जरूरीप्रमाणें योग्य त्या ठिकाणीं सैन्य ठेवी व त्या ठिकाणाचा कारभार ज्या सेनानीकडे सोपवी त्याला त्यानें इतका भरपूर पगार द्यावा कीं त्याच्या भपकेबाज राहणीनें तो शिवाजीच आहे असा इतरांचा समज व्हावा. तो सैन्याच्या निरनिराळ्या विभागांवरील अधिकाऱ्यांना शिवाजी हेंच नांव देई (?) त्या योगानें त्याची चमू जेथें म्हणून असेल तेथें तिच्यांत प्रत्यक्ष शिवाजीच आहे असा शत्रूचा समज व्हावा. म्हणून त्याच्या सैन्यांत जे नवे लोक दाखल होत त्यांचा समज त्या वाहिनीवरील अंमलदार खुद्द शिवाजीच आहे असा व्हावा. यामुळें शिवाजी एकाच ठिकाणीं असतां तो सर्वत्र असल्याचा भ्रम जगांत पसरे."

## आरमार

आरमार हें एक स्वतंत्र राज्यांगच आहे. जसें ज्यास अश्वबल तशी त्याची वृद्धिप्रथा. तद्वतच ज्याजवळ आरमार त्याचा समुद्र (आज्ञापत्र, पृ. ३६).

शिवाजीचें मुख्य राज्य कोंकणांत असल्यामुळें तें राज्य मिळविण्यास, वाढविण्यास व रक्षण्यास त्याला लढाऊ जहाजांची जरूरी प्रारंभापासून असावी हें स्वाभाविक होय. त्यानें इ. स. १६५९ त आरमाराच्या बांध-

कामास सुरुवात केलेली दिसते. भिवंडी, कल्याण व पनवेल या बंदरांत त्याचीं लढाऊ जहाजें बांधण्यांत आलीं व त्याची पोर्तुगीजांना भीति उत्पन्न झाली. त्याचीं जहाजें कारंजा, त्रुंबें, चौल व माहीम या बंदरांत इ. स. १६७० त फिरत असून त्यांना इंग्रजांनीं दोरखंडें वळण्याकरितां पुष्कळ काथ्या दिला. इ. स. १६६५ त शिवाजी गोव्यावरून गोकर्णाकडे गेला तेव्हां त्याजपाशीं ८५ लहान व ३ मोठीं गलबतें होतीं. त्यांपैकीं १२ छोटीं तरांडीं होतीं. इ. स. १६६६ त शिवाजीचें आरमार इतकें मोठें झालें होतें कीं त्याचा प्रतिकार करण्याचें सामर्थ्य इंग्रजांत नव्हतें अशी त्यांचीच कबुली आहे. इ. स. १६६८ त त्याच्या दोन गलबतांची राजापुराजवळ कॅप्टन स्मिथ याजबरोबर लहानशी चकमक उडाली. इ. स. १६७० त मुंबईस शिवाजीचीं ६०।७० जहाजें आलीं व त्यांनीं इंग्रजांना भय दाखविलें. त्या वर्षी शिवाजीच्या आरमारांत १६० छोटीं जहाजें असून वेंकाजी हा त्याचा दर्यासारंग होता. इ. स. १६७५ त जैतापुरास शिवाजीकरितां मोठें आरमार बांधण्याचें काम चालू असून त्याकरितां सुतार, लोहार व आर्क-सदार त्यानें नेमले होते. त्यांतच कांहीं गुराबा असून त्याचा उद्देश दंडा-राजपुरीवर हल्ला करण्याचा होता. शिवाजीचें एक जहाज २५० टनी होतें. त्यावरून शिवाजीच्या आरमारी सामर्थ्याची कल्पना करतां येणार आहे. सभासदाच्या मतें त्याचीं एकंदर जहाजें चारशें होतीं. त्यांत गुरबा, तरांडी, तारवें, गलबतें, पगार, शिबाडे इत्यादि प्रकार असत व त्यांजवर तोफा, जंबुरे, बंदुका व दारूगोळा हें साहित्य असे. व्यंकाजी, दौलतखान व मायनाईक हे त्याचे आरमारावरील मुख्य अधिकारी होते. आरमाराचे सुभे केले असून प्रत्येक सुभ्यांत पांच गुराबा व पंधरा गलबतें असत. सर्व आरमारी सुभे सरसुभ्याच्या हाताखालीं असत. त्याच्या एकंदर लहानमोठ्या जहाजांची संख्या, सभासदाचें मत बाजूला ठेवल्यास, निदान दोनशेंपर्यंत होती. तीं हाकारण्याचें काम कोळी, भंडारी व हेटकरी करीत. मालवणचा सिंधुदुर्ग हें त्याचें मुख्य आरमारी ठाणें होतें. तेथे एक योद्धयाचा पुतळा असून त्याला कोळी लोक घालीत तशी टोपी घातलेली आहे.

आरमाराची उपयुक्तता व कार्यपद्धति रामचंद्रपंत अमात्य यांनीं खालीलप्रमाणें वर्णिली आहे :—

"आरमारकरी यांणीं हमेशा दर्यात फिरून गनीम राखावा. जंजिरीयाची सीमा जवादां वरीचेवरी पावीत जावा. येविषयीं जंजिरेकरी याचा बोभाट हुजूर येऊं न द्यावा. सर्वकाळ दर्यावर्दी गनिमाचे खबरेंत राहून गनिमाचा मुलूख मारावा. हवी पाळती घालून गनिमाचे स्थळाचे लाग करावे. दर्यात कोळी, साहुकारी, तरांडी यांची अमदरफ्ती करावी. कोळी सावकारांचे वाटेस जाऊं नये. त्यास कोणाचे उपद्रव लागत असेल तरी तो परिहार करावा. गनिमाचे मुलुखाखेरीज विदेशींचे गैरकौली असे साहुकारांचीं तरांडीं येत जात असलीं तरी तीं परभारें जाऊं न द्यावीं. भये नये तरी हाताखालीं घालून त्यांचे दसोडीस हात न लावतां दिलासा करून बंदरास घेऊन यावीं. बहुत प्रकारे त्यांणीं व मुलुखगिरीचे कारभारी यांणी जाऊन त्यांचें समाधान करावें. लाकडे, पाणी घेतील तें त्यांस घेऊं द्यावें. नारळाचीं शाळीं आदिकरून जो जिन्नस त्यांस पाहिजे असेल तो त्यांस विकत अनुकूल करून द्यावा.

"याविरहित आणखी खरेदी प्रोक्त आत्मसंतोषें करतील तो अल्पस्वल्प जकात घेऊन सुखरूप करूं द्यावा. थोर माणूस सावकार कोणी असला तरी त्याचे योग्यतेनुरूप दिवाणाचे तर्फेनें त्याची थोडीबहुत मेहेमानी ( सरबराई ) करावी. तो खर्च दिवाणांतून मजुरा घ्यावा. कोणी एका प्रकारें त्या परकी साहुकारास सौख्य दिसे, माया लागे, ते राज्याला अमदरपत्ती ( मदत ) करतील, असें करावें.

"गनिमाचे मुलुखांतील साहुकारी तरांडी दर्यात असालिया कस्त करून घ्यावी, धरून बंदरांत आणावी. पालांत काडीइतकी तसनस न करितां तमाम माल जप्त करून महालाचे कारकुनांनीं व आरमारकरी याणी हुजूर लिहून पाठवावे; आज्ञा होईल तैसी वर्तणूक करावी. आरमारास गनिमास गांठ पडोन झुंज मांडलें तरी सर्वांनीं कस्त करून जमावें. गनीम दमानी घालऊन झुंजावें. वारियाच्या बळें गनीम दमानी नयेत, आपण दमानी पडलो, आपलें गलबत वारियावरी न चालेल असें जाहलें, तरी कसेंहि बळ आपलें असो तरी गनिमास गाठ न घालतां, गाठ तोडीत तोडीत आपले जंजिरियाचे आश्रयास यावें. तरांडियांस व लोकांस सर्वथा दगा होऊं देऊं नये. आपणास राखून गनीम घ्यावा. गनीम दमानी पडोन हारीस आला,

जेर जाहला, तरी एकाएकी उडी घालूं नये. दुरूनच चौगीर्द घेरून भांडियाचा मार देत असावें.

"दगेखोर गनीम आपण जेर झालों असें जाणवून दगलबाजीनें कौल घेतो, म्हणून त्यास जवळ बोलावूं नये. कारण तो जवळ आल्यावर पायाळास आगी टाकून तरांडिया जाया करतो. याजकरितां त्याचा विश्वास न मानतां कौलास आला तरी दुरूनच कौल देऊन त्याचेच बतेऱ्यावरून सरदार लोक आपणाजवळ आणावे. मग त्याच्या तरांडियावरी आपले लोक चढवावे. नाहीं तरी माल बिसातीची तमा न धरतां भांडियाचे माराखाली तरांडे फोडून टाकून सलाबत पाडावी."

पावसाळा सुरू झाल्यावर दर्यावर आरमाराच्या हालचाली बंद ठेवाव्या लागत व आरमाराची छावणी एखाद्या ठिकाणीं करावी लागे. ती समुद्रकांठच्या किल्ल्याच्या आश्रयानें खाडींत करावी. छावणी प्रतिवर्षी एकाच ठिकाणीं केल्यास प्रजेस उपद्रव दरसाल व्हावयाचा. यास्तव ती निरनिराळ्या ठिकाणीं करावी असें रामचंद्रपंत अमात्य यांचें मत होतें.

शिवाजीपाशीं कांहीं व्यापारी जहाजेंहि होतीं. इ. स. १६६४ त शिवाजीच्या ताब्यांत ८।९ बंदरें असून तेथून त्याचीं जहाजें मोचा, कांगो, इराण, मस्कत इत्यादि ठिकाणीं जात. त्याचा सुभेदार रावजी सोमनाथ पंडित यानें वरील ठिकाणीं जाण्याकरितां ८।९ जहाजें बांधलीं, पण त्यांच्याआड मुंबईचे इंग्रज व्यापारी आले. इ. स. १६७० त शिवाजीनें तीन जहाजें माठ आणण्याकरितां मुंबईस पाठविलीं.

### तोफखाना

शिवाजीपाशीं तोफा होत्या, पण तोफखाना नव्हता. गडकोट, जंजिरे यांवर तोफा होत्या तशा लढाऊ गलबतांवरहि होत्या. तोफखाना म्हणजे सैन्याबरोबर न्यावयाचा तो. तशा प्रकारचा तोफखाना त्याजपाशीं नव्हताच. तो त्याच्यानंतर पहिल्या बाजीरावानें पहिल्यानेंच तयार केला. मात्र त्याजपाशीं अद्ययावत् पद्धतीच्या तोफा व दारूगोळा होता. इंग्रज लोक त्यास दारूगोळा पुरवीत व तोफाहि विकीत. फ्रेंचांपासून त्यानें ८८ तोफा व तीन हजार मण शिसें घेतलें होतें ( इ. स. १६७४ ).

## प्रकरण अकरावें

# गड व गडकरी

एकशतं योधयति दुर्गस्थोऽस्त्रधरो यदि ।
शतं दशसहस्राणि तस्माद्दुर्गं समाश्रयेत् ॥

— शुक्रनीति, अध्याय ४

अर्थ — गडाच्या म्हणजे दुर्गाच्या आश्रयानें एक सहस्त्र मनुष्य शंभराशीं लढूं शकतो. शंभर माणसें दहा सहस्त्रांशीं लढूं शकतात. यास्तव राजानें किल्ल्याचा आश्रय करावा.

शिवाजीच्या राज्याची मजबुती मुख्यतः गडांवर होती. महाराष्ट्रांत त्या वेळीं गड २५०।३०० पर्यंत असतील. गडांच्या समुद्रकाठांपासून पूर्वेस अंतराअंतरावर चार रांगा होत्या. एक रांग कोंकणपट्टींत समुद्रकांठावरील गडांची व जलदुर्गांची. ही रांग दक्षिणेस गोवें ते उत्तरेस वसईपर्यंत दोनशें-अडीचशें मैल लांबीची होती. तिचा उद्देश समुद्रावरील आरमारी हल्ल्यांपासून कोंकणपट्टीचें रक्षण करण्याचा होता. त्यानंतरची दुसरी रांग समुद्रकांठ व सह्याद्रीचा घाट यांमधली. तीहि वरीलप्रमाणेंच दोनशें-अडीचशें मैल लांबीची होती. कोंकणांत या दोन रांगा झाल्या. त्याशिवाय घाटावर दोन तितक्याच किंबहुना त्याहूनहि अधिक लांबीच्या रांगा होत्या. एक घाटावरील गडांची व दुसरी मावळांतील गडांची. या चार रांगा मुख्य रांगा. जर्मनी व फ्रान्स

या दोन राष्ट्रांच्या दरम्यान जर्मनीची आधुनिक पद्धतीची सिजफ्रिड रांग व दुसरी फ्रान्सची मॅगिनो रांग होती, तशाच महाराष्ट्रांत या संरक्षणाच्या चार रांगा होत्या.

शिवाजीनें या चारी रांगांपैकीं बहुतेक गड व दुर्ग हस्तगत केले होते. त्यांशिवाय मावळापासून देशाकडे पश्चिम-पूर्व लांबीवर मधून मधून गड होते, त्यांतील बरेचसे त्यानें कार्बाज केले होते. बहुतेक गड शिलाहारादि हिंदु-राजांनीं पूर्वींच बांधून ठेवले होते व कांहीं शिवाजीनें जरुरीप्रमाणें बांधले. डोंगरांच्या माथ्यावरील हे गड भू-दुर्गापेक्षा बांधावयास सोपे असत. त्यांना खर्च कमी येई व वेळहि थोडा लागे. शिवाजीनें राजगड स्वतः बांधला व त्यावर त्यास आपली राजधानी ठेवावयाची होती हा त्याचा उद्देश त्याच्या नांवावरून स्पष्ट दिसतो. त्याचें पहिलें नांव मुरुमदेव असें होतें. या किल्ल्याच्या बांधकामास त्यानें शके १५७१ त सुरुवात केली. वास्तुशास्त्राप्रमाणें प्रारंभ पूर्वेकडून करण्यांत आला व जी माची तेथें बांधली तिचें नांव सुवेळा ठेवण्यांत आलें. नंतर दक्षिणेचा भाग बांधीत असतां अपघातानें गडावरील दारूखान्याचा स्फोट होऊन त्यांत तेथील हवालदार उडून जाऊन दूर पडला. पण सुदैवानें त्यास फारशी दुखापत न होतां तो बचावला. म्हणून दक्षिण अंगाच्या माचीस संजीवनी असें सूचक नांव मिळालें.

अफजलखानाच्या स्वारीच्या वेळीं राजगडावरील बाले किल्ल्याचें काम सुरू होतें. यानंतर शके १५८५ पर्यंत चार वर्षें गडाची उत्तर अंगाची माची जी पद्मावती ती बांधली जात होती. तेथेंच महाराजांच्या राजवाड्याची सदर म्हणजे सभेची जागा आहे. त्याची वास्तुशांत गुंजवणेकर पुरोहित यांनीं शके १५८५ त केली ( भा. इ. सं. मं. ऐ. संकीर्ण साहित्य खंड ३, पृ. ११८।११९ ). राजगडाप्रमाणें तोरण्यावर विशेष बांधकाम न करतां तो शिवाजीनें दुरुस्त केला. या गडावर तीन दरवाजे आहेत. त्यांतील पश्चिमेचा तो कोंकण दरवाजा, बिनी दरवाजा, महादरवाजा तो उत्तरेचा. गडावर मेंगाई, तोरणजाई, म्हसोबा ( टाकें ) बालणजाई, घंगालजाई व वरदानी अशीं देवस्थानें आहेत. मेटीं सात आहेत आणि बालेकिल्ला, माची बुधला व माची झुंझारमल अशा तीन सदरा आहेत ( ऐ. संकीर्ण साहित्य खंड ३, पृ. २३७ ).

शिवाजीनें बाणकोटाच्या खाडीजवळ पालवणी गांवापाशीं मंडनगड बांधला. बेदरचा बादशहा, विजापूरचा बादशहा व अहमदनगरचा निजामशहा यांचें स्वामित्व महाराष्ट्रावर प्रस्थापित झाल्यानंतर त्यांनीं नवीन गड बांधले नसले तरी कांहीं जुने दुरुस्त केले. गड बांधतांना किंवा दुरुस्त करतांना बांधकाम नीट चढेनासें झाल्यावर त्या बांधकामांत कोणाचा तरी बळी देण्याची चाल होती. तशा प्रकारचे प्रवाद अद्यापहि आपल्या कानावर येतात. अमुक एका तटाखालीं एक महार वा महारीण पुरली तेव्हां तें तटाचें काम पुरें झालें असें सांगणारीं जुनीं माणसें गांवोगांवीं आढळतात. त्या केवळ अवास्तव दंतकथा नसून त्यांच्यांत तथ्यांश आहे असें खालील हकीकत वाचून कोणच्याहि लक्षांत येणार आहे.

## किल्ल्याचें बांधकाम

" बेदरच्या बादशहाचा अंमल महाराष्ट्रांत असतां पुरंदर किल्याचें बांधकाम सुरू होतें. पण त्यापैकीं शेंदरी बुरुजाचें काम शेवटास जाईना. तेव्हां बादशहास दृष्टान्त झाला कीं जर कोणी आपला पुत्र व सून बुरुजाखालीं पुरण्यास देईल तर बुरुजाचें काम वर चढेल. त्यानें हा दृष्टान्त येसाजी नाईक चिबे यास सांगितला. येसाजी हा एक मुलगा व सून यांस बुरुजाखालीं गाडण्यास कबूल झाला. त्याप्रमाणें बहिरनाकाचा पुत्र नाथनाक व सून देवकाई यांस आश्विन वद्य ८ स शेंदरी बुरुजांत गाडली व मग बुरुजाचें काम सिद्धीस गेलें. हें काम पाहण्यास बादशहा:बेदराहून पुरंदराला आला, व काम पाहून खुष होऊन येसाजी नाइकास पुरंदर किल्ला सरंजामासुद्धा पातशहानें बक्षिस दिला आणि बहिरनाक सोननाक यास २०५ होन पुरंदर येथे देऊन शिवाय न्हावी, भोंगोली हे दोन गांव ७०५ होनांचे दिले. ही गोष्ट इ. स. १५८७ त घडली " ( सनदापत्रांतील माहिती, पृ. ७ ).

शिवाजीनें शक १५९३ ( इ. स. १६७१-७२ ) मध्यें कांहीं गडांवर इमारती बांधण्यांत व कांहींची दुरुस्ती करण्यांत मोठी रक्कम खर्च करण्याचें ठरविलें. त्याचा तपशील—रायगड ही पुढें राजधानी व्हावयाची असल्यामुळें तिला नगराचें स्वरूप आणणें भाग होतें. तेथें घरांपासूनच मुळी तुटवडा. कोणी सन्मान्य पाहुणा आला तर त्यास राहण्याजोगीं सोयिस्कर व सुंदर घरें नव्हतीं. यासाठीं घरांकरितां ३५००० होन, तळ्यांकरितां २०००० होन

दोन गच्चया बांधण्याकरितां १०००० होन व खुद्द रायगड किल्ल्याची सुधारणा करण्याकरितां ५०००० होन मंजूर करण्यांत आले.

रायगडाशिवाय इतर गडांकडे लक्ष पुरविण्यास याच वेळीं शिवाजी-च्या हाताशीं पैसा आला होता असें दिसतें. त्यानें सिंहगड, सिंधुदुर्ग, विजयदुर्ग, सुवर्णदुर्ग, प्रतापगड, पुरंदर व राजगड यांच्या तटांत पडझड झाली होती, त्यांची डागडुजी करण्यास प्रत्येकी १०००० होन; तोरणा, प्रसिद्धगड, विशाळगड, महिमतगड, सुधागड, लोहगड, सबळगड, श्रीवर्धन-गड व मनोरंजन यांजकरितां प्रत्येकी ५००० होन, कोरीगडासाठीं ३००० होन, सारसगड व महीधरगड यांसाठीं २००० होन, मनोहरगडासाठीं १००० होन व किरकोळ ७००० होन याप्रमाणें खर्चाची वाटणी केली ( प. सारसंग्रह खंड २, पृ. ४१३ ).

शिवाजीच काय, पण तत्कालीन सर्वच राजे शत्रूंचे किल्ले घेण्यास झटपटत. कर्नाटकाच्या स्वारींत, शिवाजी हा किल्ला ताब्यांत आला कीं, त्यांत सुधारणा अगदीं अद्ययावत् करण्यासाठीं भगीरथ प्रयत्न करीत असे. नवीन सर्व सुधारणा आत्मसात करण्यांत तो तत्पर असे. त्यासंबंधीं जेसुइटांनीं लिहिलें आहे, "जुलमी शिवाजीनें जिंजीचें राज्य घेतल्यावर आणि एक वर्ष वेढा घालून वेलोरचा किल्ला जिंकल्यावर हिंदुस्थानांतील मुसलमानांचें बळ लक्षांत घेऊन भविष्यत्कालीं त्यांच्या सर्व एकवटलेल्या सामर्थ्याचाहि प्रतिकार करतां यावा म्हणून बंदोबस्तास सुरुवात केली... त्यानें जिंजी किल्ल्याची पुनः डागडुजी केली. पहिले तट पाडून नवे तट व बुरूज असे कौशल्यानें बांधले कीं तें काम हिंदी लोकांचें नसून युरोपीयांचेंच असावें असें वाटतें. कांहीं जुने निरुपयोगी किल्ले पाडून त्यानें कित्येक नवे भुईकोट व डोंगरी किल्ले बांधले. पाश्चात्त्यांच्या पद्धतीचें अवलंबन करून त्यानें मोठे खडक फोडले, तलाव बांधले आणि युद्धोपयोगी इतर इमारती वगैरे रचना केली ( प. सारसंग्रह खं. २, पृ. ५७१ ).

गव्हर्नर लेगहॉर्न यास शिवाजी लिहितो,

२२ सप्टेंबर १६७७

"मी कर्नाटकांत आल्यापासून अनेक किल्ले जिंकले. कित्येक किल्ल्यांत मला नवीन बांधकामें करावयाचीं आहेत. मोठ्या तोफांचे गाडे कसे करावे

व सुरुंग कसे लावावे हें जाणणारीं माणसें असतील तर तीं आम्हांस द्यावीं. दगडी भिंती उडविण्यास त्यांची जरुरी आहे. गोवें व वेंगुर्लें येथून या कामासाठीं आणलेलीं माणसें मरून गेलीं. तरी तुम्हांकडे २०।२५ किंवा निदान १०।५ सुरुंगे मिळाले तरी चालेल. त्यांना चांगला तनखा देऊं" (प. सा. सं. खंड २, पृ. ५९१ ).

शिवाजी गडांचें महत्त्व इतकें ओळखून होता कीं, जेव्हां फुरसत सांपडे तेव्हां तो गडांची पाहणी करावयास जाण्याला चुकत नसे. त्यासंबंधाचें एक पत्र खालील अधिकाऱ्यानें मोरो त्रिमळ, निळो सोनदेव, जगन्नाथपंत व त्रिंबक व्यंकटेश गोसावी यांस चौकशीखातर लिहिलें आहे ( शके १५९३ कार्तिक शुद्ध ५, इ. स. १६७१ ऑक्टोबर २७ ).

" राजेसाहेब ( शिवाजी ) शिवापट्टणीं ( शिवापूर ) मुक्काम किती दिवस करणार, व लोहगडतर्फेनें इमारती पहावयास जाणार, तिकडे जातील किंवा नच जात, रोहिड्याहून पांडवगड पाहोन येणार होते, ते तिकडे जातील किंवा नच जातील, हें कांहीं वर्तमान ( तुम्ही ) लिहिलें नाहीं. तरी सविस्तर वर्तमान लिहून पाठविणें " ( प. सा. सं. खंड २, पृ. ४०१-२ ).

गड हे शालूवरील बुट्ट्यांसारखे शोभेकरितां नसून गादीवरील टाक्यांसारखी वा पटावरील कटींसारखीं सत्तासंरक्षणाचीं लहान केंद्रें होतीं. गडाभोंवतालच्या प्रदेशाचें रक्षण गडकऱ्यांनीं करावयाचें असल्यामुळें गडावर ती व्यवस्था पाहणारे अधिकारी असत. त्यांनीं गड रक्षावा व गडाभोंवतालचा प्रदेशहि रक्षावा. गडावर हवालदार, सबनीस व सरनोबत हे तीन समान दर्जाचे अधिकारी असत. त्या तिघांनीं मिळून गडावरील कारभार करावा. गडावरील धान्याची कोठी व युद्धसाहित्य कारखाननिसाच्या ताब्यांत असावें. त्याच्या नजरेखालीं जमाखर्च लिहिला जावा. गड मोठा असेल तर त्याजवर पांच-सात तट-सरनोबत असावे. गडावरील दहा पायिकांमागें एक नाईक असावा. नाईक त्याचें कुलशील पाहून नेमण्यांत येई. पाइकांत बंदुखी ( बरकंदाज ), इटेकरी, तिरंदाज व आड हत्यारी असे चार प्रकार असत. पाईक, हवालदार व सरनोबत चांगल्या कुळांतील मराठे असत. सबनीस ब्राह्मण व कारखाननीस प्रभु असे. गडाचा मुख्य हवालदार. गडाच्या किल्ल्या त्याजपाशीं असत.

सबनिसाच्या ताब्यांत रोकड, खजिना व हिशेब असावा. त्यानें प्रत्येक हुकमावर शिक्का करावा व त्याखालीं कारखाननिसानें मान्यतेची सही करावी. रोजचा हिशेब ( रोजकीर्द ) सबनीस व कारखाननीस या दोघांनीं मिळून लिहावा. शिल्लक सबनिसानें लिहावी, त्या कागदावर हवालदारानें शिक्का करावा व त्याखालीं कारखाननिसानें मान्यतेची सही करावी. हजेरी सबनिसानें घ्यावी व ती कारखाननिसाच्या कारकुनानें तपासावी. सरकाराशीं वा प्रांतिक अधिकाऱ्यांशीं व्हावयाचा पत्रव्यवहार सबनिसानें करावा.

कारखाननिसानें कुणबिणी ( दासी ), पोरे, घोडीं व जनावरें आलीं म्हणजे आपल्या ताब्यांत घ्यावीं. त्या यादीवर सबनिसानें सही-शिक्का करावा. किल्ल्यावरील बांधकाम कारखाननिसाच्या नजरेखालीं चालावें व त्याची तपासणी सबनिसानें करावी. कामावरील लोकांना पगार व कपडे कारखाननिसाच्या सांगण्याप्रमाणें देण्यांत यावे. त्यांस वांटावयाचें धान्य सबनिसाच्या पसंतीनें कारखाननिसानें द्यावें.

कोठीची व्यवस्था कारखाननिसानें पाहावी. कोठींत धान्य व इतर जिनसा असत, त्या सर्व गडाभोंवतालच्या गांवांपासून कररूपानें वसूल करण्यांत येत. किल्ल्यांवरील इमारतींची शाकारणी करण्यास कवलें, ओमण, रात्रीं किल्ल्यांत घालावयाच्या गस्तीस लागणाऱ्या चुड्या, बुरुजांकरितां दोरांचे गुंडे, पहारेकऱ्यांना आगटी पेटविण्याकरितां लांकडाचे ओंडे, तट्टे, पाट्या, केरसुण्या, सुपें, इरलीं, कोंबड्या, भोपळे इत्यादि साहित्य भोंवर गांवांच्या कुळांपासून विवक्षित पद्धतीनें व हिशेबानें मिळत असे. राबते महार यांनीं किल्ल्याचे कोटाकरितां एक महिना सरकारांत खपावें व पोटास अडशेरी घ्यावी. राबते गुरव यांनीं दर आठवड्यास पानांचा एक भारा ( पत्रावळीकरितां ) आणून द्यावा व पोटास सरकारांतून घ्यावें. हा सर्व व्यवहार कारखाननिसानें करावा. कोठींतील धान्य ज्यास द्यावयाचें तें त्यानें द्यावें व त्यावर नजर ठेवण्यास सबनिसाचा कारकून हजर असावा. या रीतीनें हवालदार, सबनीस व कारखाननीस यांत सहकार्य उत्पन्न होऊन एक-मेकांचा दाब एकमेकांवर राही.

गडावर शेंकडों लोक व अधिकारी असल्यामुळें त्यांचीं कामें नियमित वेळीं सुरू होण्याकरितां घड्याळासारखें कालनिदर्शक साधन आवश्यक होतें;

परंतु त्या काळांत घड्याळें नव्हतीं. त्यांची उणीव भरून काढणारीं घटिकापात्रें असत. हल्लींहि विवाह-उपनयनसमयीं भटजी घटिकापात्राच्या साहाय्यानें कालगणना मुहूर्त साधण्यासाठीं करतात. हेंच घटिकायंत्र सिंहगड, पुरंदर इत्यादि महत्त्वपूर्ण गडांवर ठेवण्यांत येत असे. तेव्हां कालगणना घटकेवरून करीत व दिवसा वा रात्रीं किती घटका झाल्या हें समजण्याकरितां तासावर ठोके देत. गडावरील घटिका मोजण्याचें काम साहजिकच भटजीकडे सोपविण्यांत येई. पुरंदर किल्ल्यावर अशीच व्यवस्था होती. ती नारायणभट बिन रामभट व शिवभट बिन दादंभट पुरंदरे यांजकडे देण्याचा ठराव कार्तिक शुद्ध ७ शके १६०५ या दिवशीं झाला. दोन ब्राह्मण ठेवण्याचें कारण असें कीं, त्यांस रात्रपाळी व दिवसपाळी करावी लागत असे. प्रत्येकाला वेतन दरमहा दाभोळी १५ लारी. रात्रीच्या दिवाबत्तीसाठीं दररोज तेल देण्याचीहि सोय अर्थात् होतीच.

गड जसा लहान-मोठा वा कमी-अधिक महत्त्वाचा असे त्या प्रमाणांत त्यावर सैन्य ठेवण्यांत येई. त्याला सर्व सामग्री तेथे हवीच. गडाला वेढा पडल्यावर ही सामग्री जितकी असेल तितकी थोडीच. शिवाजीनें पन्हाळगड दुसऱ्या खेपेस घेतला त्या वेळीं त्यावर तोफा, बाण, गोफणी, तरवारी, भाले, गोटे, लोखंडी गोळे, धनुष्यें, गवत, सर्पण, तूप, तेल, मीठ, मद्य इत्यादि सामग्री शिवाजीस मिळाल्याचें जयराम कवि वर्णितो. शिवाजीची शिस्त अशी होती कीं, कोणाहि सैनिकानें मद्य सेवन करतां कामा नये. असें असतांहि पन्हाळगडावर मद्य सापडलें तें तो गड आधीं विजापूरकरांच्या ताब्यांत होता यामुळें. कारण मुसलमान सैनिक ख्यालीखुशालीच्या वेळीं दारू पिऊन धुंद असावयाचे.

गडकऱ्यांना गाफिल ठेवून गड छापा घालून घ्यावयाचा असला म्हणजे विशिष्ट प्रकारचीं आयुधें वापरावीं लागत. दोरावरून वा घोरपडीच्या साहाय्यानें गड घेतल्याचें आपण वाचतों. त्या वेळीं वापरण्याचीं आयुधें जयरामकवीनें सांगितलीं आहेत. पन्हाळगड घेण्यापूर्वी अण्णाजी दत्तोनें राजापुरास जाऊन दोराच्या शिड्या बाळगणारे, वाघनखवाले, मेखावाले, घोरपडवाले या सर्वांस जमा केलें. त्यांस घेऊन अण्णाजी रात्रीं पन्हाळ्याच्या पायथ्याशीं पोंचला. तेथून तो ससैन्य तुटलेल्या कड्यापाशीं आला. सैनिक

एकमेकांस हात देऊन कड्यावर चढले. तेथून पठारावर गेले आणि पठारावर पोंचल्यानंतर त्यांनीं कर्णा वाजविला.

किल्ल्यावरील बंदोबस्ताप्रमाणें त्याच्या पायथ्याजवळच्या प्रदेशाचाहि बंदोबस्त ठेवणें भाग असे. किल्ल्याच्या तटाखालीं प्रत्येक माचीवर मेटें असे व तें राखण्याचें काम मेटकऱ्यांनीं करावें. त्यांनीं आपल्या चौक्यांवर हजर राहून आसपास शत्रूच्या हालचाली होत असल्यास त्यांवर नजर ठेवावी व तेथील रान राखावें. किल्ल्याच्या पायथ्याशीं प्रत्येक नाक्यावर रामोशी, पटवारी, मांग, बेरड यांच्या चौक्या असत. त्यांनीं हरएक प्रकारची बातमी राखून ती गडावरील अधिकाऱ्यांस कळवावी. गडावर फितुरी करण्यास कोणी येत असल्यास त्यास भलतेंच सांगून चकवावें व शत्रूचे लोक गडाच्या आसपास घिरट्या घालूं लागल्यास त्यांजवर अचानक छापे घालून त्यांस कापून काढावें.

संध्याकाळ झाल्यावर गडाचा दरवाजा कुलूप लावून आंतून बंद करण्यांत येत असे. हवालदारानें स्वतः येऊन कुलूप ओढून पाहावें व किल्ल्या नेऊन आपल्या उशाशीं ठेवाव्या. गडावरील अंमलदारांनीं रात्रीं आळीपाळीनें गस्त घालावी आणि जागोजाग पहारे आहेत कीं नाहीं हें हवालदारानें रात्रीं एक-दोन वेळां स्वतः जाऊन पाहावें. त्यानें रात्रंदिवस सदरेंत हत्यारबंद लोकांसह जागृत राहावें.

गडावर दाणागल्ला, लाकूडफाटा, दारूगोळा, कुटलेला चुना इत्यादि जिनसांची बेगमी ४।२ वर्षें पुरेल इतकी करून ठेवीत. अमक्या किल्ल्यास अमूक सामान पोंचवावें असे धारे बांधून दिलेले असत. प्रत्येक किल्ला आसपासच्या तालुक्याच्या निसबतीस लावून दिला असून त्यावर सामानाची भरती करण्याचें काम तालुकदारानें करावें. किल्ल्यावरील नोकरांपैकीं कोणाची तगिरी, बहाली वा गयाळी करणें ती हुजूरच्या आज्ञेप्रमाणें करीत. कांहीं प्रमुख किल्ल्यांच्या प्रत्येक बाजूवरील तटावर एक तट-सरनोबत नेमलेला असे.

फौज बाळगून युद्धाच्या वेळीं सरकारची नोकरी करण्याच्या शर्तीवर राज्यांतील गांवें वा जमिनी देण्याची पूर्वापार पद्धत होती. तिला मोकासा म्हणत व तसें इनाम ज्यास मिळालें आहे तो मोकाशी वा मोकासदार सैनिक. हशम व गड यांजकरितां गांवें वा जमिनी लावून देण्यांत येत असत.

पण गडांना अशीं इनामी गांवें देण्याचें शिवाजीनें बंद केलें. सभासद म्हणतो, " जें देणें तें वरातेनें द्यावें, अगर पोत्याहून रोख ऐवज द्यावा. मुलखांत कारकुनाखेरीज ( मंत्री ) कोणाचाहि अंमल चालतां कामा नये. लष्करास व हशमास व गडास देणें तें कारकुनानें द्यावें. मोकाशी जाहलियानें रयत अफरा होईल, आणि बळावेल, कमाविशीची कैद ( शिस्त ) चालणार नाहीं. रयत बळावली म्हणजे जागोजागीं बंडें होतील. ज्यास मोकाशे द्यावे तो व जमीनदार एक जाहलियानें बेकैद होतील. म्हणून मोकाशे कोणास देणेचे नाहींत. "

शिवाजीचे गड जिंकण्यास अवघड कां याचीं कारणें जयरामानें बहादुरखान व दिलीरखान यांच्या तोंडीं पुढीलप्रमाणें घातलीं आहेत. ते औरंगजेबास महाराष्ट्रांतून कळवितात, " गडावर ( आसपास ) शेंकडों खंडी ( ? ) धान्य उत्पन्न होतें. प्रत्येक गडावर दोन तीन सहस्र सैन्य असतें. गडावरील पायिक ( पत्तयः ) गडाखालीं उतरून व भोंवतालच्या प्रदेशांतील धान्य लुटून उंदराप्रमाणें चुटदिशीं गडावर पळून जातात. आमच्या घोडेस्वारांचें सैन्य एकत्र जमून मैदानांत उभें असलें म्हणजे शिवाजी गडावरून अचानक खालीं उतरून बहिरीससाण्याप्रमाणें आम्हांवर झडप घालतो. "

प्रकरण बारावें

# सरकारी करभार

शिवकालांत इतर कर पुढीलप्रमाणें असत :–( १ ) वेठबिगार, ( २ ) फरमायसी ( स्थानिक जिनसा विकत घेण्यासाठीं कर ), ( ३ ) बेलकटी – बेलदारांवरील कर, ( ४ ) पायपोसी – चांभारांवरील कर, ( ५ ) मोहीमपट्टी – मोहिमेसाठीं कर, ( ६ ) मेजवानी – भोजन कर, ( ७ ) कर्जपट्टी, ( ८ ) तेलपट्टी, ( ९ ) तूप, ( १० ) फसकी – भाजीवरील कर, ( ११ ) सादिलवार, ( १२ ) तूटपट्टी, ( १३ ) ईद शु भराती, ( १४ ) रणभेरी, ( १५ ) उंट – वाहतुकीच्या उंटांवर कर, ( १६ ) आंबे, ( १७ ) कारूजाती, ( १८ ) हेजीब, ( १९ ) पटवारी, ( २० ) अश्वजकाती, ( २१ ) शेतसारा, ( २२ ) बरहादटका, ( २३ ) बैलविक्री, ( २४ ) जंगमपट्टी – जंगमावर कर, ( २५ ) पेशकस, ( २६ ) पट्टी शिके हुमायून, ( २७ ) कर इ. हुमायुनी – राजाच्या वाढदिवसानिमित्त कर, ( २८ ) ठाणें भेट, ( २९ ) दसरा पट्टी, ( ३० ) हुजूर-भेट, ( ३१ ) हेल-पट्टी, ( ३२ ) अहिष्टान, ( ३३ ) विरहिस्थान, ( ३४ ) मोहतर्फा ( दुकानांवरील कर ), ( ३५ ) थळजकाती – हद्दींतून जाणाऱ्या मालावर कर, ( ३६ ) पलभारा-पालेभाजीवर कर, ( ३७ ) उलफा-पट्टी – धार्मिक कर, ( ३८ ) बक्रीद, ( ३९ ) सरदेशमुखी, ( ४० ) मुशाहिरा – रसद, ( ४१ ) गावखंडी, ( ४२ ) दाणी –

धान्यावर कर, ( ४३ ) पासोडी – प्रत्येक कोष्टयापासून कर, ( ४४ ) तेजी भेटी, ( ४५ ) झाडझाडोरा – फळझाडावरील कर, ( ४६ ) बार गुजार, ( ४७ ) इनामपट्टी – विशेष प्रसंगीं, ( ४८ ) कर-इमारती इमारत बांधण्यावर, ( ४९ ) अखदुल दिवाणी, ( ५० ) विहीरं हुंडा – मोटस्थळावर, ( ५१ ) सिंहासनपट्टी – राज्याभिषेकसमयीं शिवाजीनें फार मोठ्या प्रमाणावर समारंभ साजरा करण्याचें योजिलें होतें; त्यासाठीं अनेक मार्गांनीं त्यानें द्रव्यसंचय केला, त्यांपैकींच सिंहासनपट्टी ही एक होती. कानद खोऱ्यांतील मरळ देशमुखांचे करीन्यांत " त्यावरी महाराज राजश्री शिवाजीमहाराज छत्रपति स्वामी सिंहासनारूढ झाले ते समयीं तमाम अवघ्या महालोमहालाच्या वतनदारावरी सिंहासन-पट्टी घातली. ते वेळेस आपणावरी होन ' एक हजार होन ' पट्टी घातली ! " असें स्पष्ट वाक्य आहे. हिला दुसरें नांव मिरास-पट्टी असेंहि होतें ( शि. च. सा. खंड ८, प्रस्तावना ).

घाटावरचे बैल पर्जन्यकाळीं कोंकणांत गांवगन्ना चारणीस जात. त्यांजपासून दर बैलास अर्धा रुपया कर घेत. भेरली माड अरण्यांत इतस्ततः उगवलेले असत. ते बांधून त्यांची माडी महार लोक काढीत. त्यांस दस्त दर माडास चार आणे असे. ज्या गांवीं खैरांचें रान असेल त्या गांवांतील खैर तोडून कातकरी व गावडे कात पिकवीत. त्याबद्दल कांहीं पैका त्यांनीं द्यावा ( भा. इ. सं. मं. वार्षिक इतिवृत्त, शके १८३५; पृ. ३३७ ).

ही करांची यादी फार मोठी आहे. हे सर्व एकाच व्यक्तीला द्यावे लागत नव्हते, असें त्यांच्या नांवावरून स्पष्ट दिसतें. कांहीं करांचा अर्थहि समजत नाहीं. मोहीमपट्टी, मेजवानी, कर्जपट्टी, इनामपट्टी इत्यादि कर प्रासंगिक होत. तेलपट्टी तेल्यानें, पायपोसी चांभारानें, जंगमपट्टी जंगमानें द्यावयाची असे. शेतसारा हा फक्त शेतकऱ्यानें द्यावयाचा असतो. पण शेतकऱ्याशिवाय पांढरींत उदीम करणारे अठरापगड लोक असत. शेतकऱ्यांप्रमाणें सुराज्यापासून व्हावयाचे फायदे जर इतरांनाहि मिळत तर त्यांनींहि कांहीं प्रमाणांत करभार सहन करणें रास्त आहे. त्या काळीं अरण्यांत गाईम्हशी बाळगून असणारे हेडे व धनगर असत. ते तूप विकण्याचा व बैल विकण्याचा धंदा करीत. त्यांना जंगलपट्टी द्यावी लागत होती असें दिसत नाहीं. त्यांजपासून तुपावर व बैलावर कर घेण्यांत येई. आंब्यांचें असेंच

आहे. आंब्याच्या सराईत रानोमाळ अगणित आंबे पिकत व ते विकून मालक पैसा करीत. म्हणून त्यांजवरहि कर बसविण्यांत आला होता. राजाला भेटावयास येणारा त्यास नजराणा देई, ती हुजूरभेट. अशी कित्येक करांची उपपात्ति आपणांस सांगतां येते.

वर दिलेली सर्वच्या सर्व यादी शिवकालीन करांची आहे असें खात्रीलायक कोणीहि म्हणत नाहीं; परंतु त्यांतील बरेचसे कर नांवावरून मोगल व बहामनी राजे यांच्या काळांतील दिसतात. पेशकस, मेजवानी, फरमायसी, बक्रीद, उलफापट्टी, कर-ई-हुमायुनी इत्यादि कर मुसलमानांनीं प्रथम बसविले असावे. तथापि या नसल्या तरी इतर करांचा वारसा मुसलमानपूर्व हिंदुराजांकडे जातोच. राष्ट्रकूटकाळीं असेच अनेक कर होते. त्यांतील कांहीं नियमित होते व कांहीं प्रासंगिक होते. त्यांच्या वेळीं विष्टि म्हणजे वेठ होती, तीच मुसलमानांनीं पुढे चालविली. शातभटप्रवेशदण्ड, राजसेवकांसाठीं वसतिदंड, प्रयाणदंड हे प्रासंगिक कर होत. त्या सर्व करांचा उद्देश राजाकडून प्रजेस मिळणाऱ्या संरक्षणाचा मोबदला प्रजाजनांपैकीं प्रत्येकास कोणत्या ना कोणत्या रूपानें द्यावा लागावा.

वरील यादी श्री. सेन यांनीं आपल्या पुस्तकांत ( Administrative system of Shivaji ) दिली असून ती त्यांनीं राजवाडेकृत ' मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें ', विश्राम मावजी व पारसनीस यांनीं प्रसिद्ध केलेल्या सनदा व पत्रें आणि भा. इ. सं. मंडळानें वेळोवेळीं छापलेले जुने कागद यांच्या आधारें तयार केली आहे. पेशवेपूर्वकालीन ही यादी आहे असें सेन यांनींच म्हटलें आहे. यावरून सेन हेहि ती यादी शिवकालीन असल्याची ग्वाही देत नाहींत. तथापि एकंदर परिस्थितीचा विचार करतां शिवकालांत हे कर असतील हें संभवनीय आहे.

कोंकणांतील चौल गांवच्या करांत खालील करांचा निर्देश आहे. पट्टी पायपोसी, राखनुकसान पट्टी, सादिलवारपट्टी, नाजीरपट्टी, सरनाजीरपट्टी, देशमुखपट्टी, मिरासदार-पट्ट्या, कापडावर जकात, गडछावणी, वोखार टका, कापुरपाईक, सराफपट्टी, वऱ्हाड टका, शेतसारा, निपुत्रिकाची मिळकत वारसाच्या स्वाधीन करतांना निपुत्रिक म्हणून कर, चौलच्या खऱ्यास माग घालण्याबद्दल पेठेंत जकात ६। लारी व दरमण रेशमामागें ८॥ लारी, घरटका, मीठटका, कोतवाली, वणटका, नफरटका, खुळगे-म्हशी यांवर जकात, धान्यविक्रीवर कर, कारुक, शिंगोटी.

## प्रकरण तेरावें

# चौथाई व सरदेशमुखी

शिवाजीचा पेशवा मोरोपंत यानें सन १६७४ च्या सुमारास रामनगरच्या कोळी राजावर स्वारी केली व त्याचा बराचसा भाग शिवाजीनें आपल्या राज्यास जोडला. रामनगरच्या राजाला दमणकडील पोर्तुगीज प्रदेशांतील लोक फार काळापासून चौथाईचा हक्क देत असत. त्या चौथाईच्या हक्काबद्दल गोव्यांतील पोर्तुगालच्या सरकारी दप्तरांत विपुल माहिती असून इ. स. १५९५ च्या एका सरकारी हुकमांत येणेंप्रमाणें उल्लेख आढळतो :– "सार्सेतच्या (रामनगर) राजानें दमणच्या प्रदेशांतील १२॥ टक्के चौथ वसूल न्यावा असें पूर्वी ठरविलें असूनहि सदर राजास पुष्कळ अधिक चौथ देतात." पोर्तुगालच्या ग्रंथसंग्रहालयांत अँटोनियो बोकारो ह्या इतिहाससंशोधकाचा इ. स. १६३४ मध्ये लिहिलेला एक हस्तलिखित ग्रंथ आहे. या ग्रंथांत म्हटलें आहे, "दमणपासून चार-पांच कोसांवर डोंगराळ प्रदेशांत चौत्या नांवाचा ( रामनगरचा ) राजा असून त्यास दमण प्रांतांतून चौथ नामक कर देतात. दमण प्रांत पोर्तुगीजांकडे येण्यापूर्वीहि चौथचा हक्क त्या राजास देत असत व हा हक्क त्यास देण्याचा अद्यापिहि बंद झाला नाहीं !" चौथ म्हणजे $\frac{1}{4}$ हिस्सा. बोकारोच्या लिहिण्यावरून त्याच्या काळीं 'चौथाईची पद्धत फार जुनी असावी!' असें मत प्रचलित होतें. यावरून चौथाईची पद्धत शिवाजीनें प्रथम सुरू केली नाहीं हें

स्पष्ट आहे. इ. स. १६७० मध्यें रामनगरचा राजा व फिरंगी सरकार यांज-मध्यें जो एक तह झाला होता त्यावरून कळून येतें कीं, रामनगरच्या राजाला दमण प्रांतांतील कित्येक गांवांतून शेंकडा १७ टक्के तर कित्येक गांवांतून १२॥ व १४ टक्के चौथ देत असत.

वर लिहिल्याप्रमाणें शिवाजीनें रामनगर राज्याचा बराचसा भाग काबीज केला; अर्थात् फिरंगी सरकार जो चौथचा हक्क रामनगरच्या राजास देत असत तो हक्क आपणांसहि द्यावा म्हणून शिवाजीनें गोवेंकर सरकारा-पाशीं मागणी केली आणि या कामीं सुप्रसिद्ध पितांबर शेणव्याची नेमणूक केली. पितांबर शेणवी इ. स. १६७७ च्या डिसेंबरांत गोव्यास पोंचला; पण ५ सप्टेंबर १६७८ च्या पूर्वी कांहीं दिवस तो मरण पावल्यामुळें त्याच्या जागीं त्याचा नातू जिवाजी शेणवी आजाची कामगिरी शेवटास नेण्यास गोव्यास गेला. त्याच कामगिरीवर १५ मार्च १६७९ च्या सुमारास शिवाजीनें गणेश शेट या वकिलास गोव्यास पाठविलें. शिवाजीस हा चौथचा हक्क देण्यास फिरंगी सरकार कबूल झालें. पण तो गोवेंकर सरकाराने शिवाजीस वेळोवेळीं दिल्याचा दाखला नाहीं. नाहीं म्हटल्यास गोवें सरकाराच्या दप्तरांत आधार मिळतो तो हा कीं, 'गावखंडी' नामक हक्क दमण प्रांतांतून पोर्तुगीजांनीं वसूल करून तो शिवाजीचा प्रधान मोरो त्रिमल यास दोन-तीन वर्षें ( १६७६ ते ७८ ) दिला. इ. स. १६७९ सालीं रामनगरच्या राजानें आपलें बहुतेक राज्य शिवाजीपासून लढून परत घेतलें, त्यामुळें चौथाईचा हक्क फिरंग्यांनीं शिवाजीस न देतां रामनगरच्या राजास गुप्तपणें दिला. मराठ्यांच्या बखरींत शिवाजीस पोर्तुगीजांनीं वारंवार खंडणी दिल्याचे उल्लेख आढळतात. ते उल्लेख 'गांवखंडी' हक्काबद्दल असावे ( पां. पिसुर्लेकर – शिवचरित्रप्रदीप, पृ. १८०-१८२ ). 'गांवखंडी' हा कर मुसलमानी राजवटींत अनेक करांपैकीं एक होता. तो एकट्या फिरंग्यांचाच होता असें नाहीं.

पिसुर्लेकरांनी चौथाईचा निर्देश केला आहे. ती चौथाई शिवाजी इ. स. १६७४ नंतर पोर्तुगीजांपाशीं मागूं लागला. चौथाई म्हणजे जो मुलूख आपला नाहीं त्या मुलखापासून घ्यावयाची खंडणी. तिला शिवाजीनें इ. स. १६६१ पासूनच सुरुवात केली होती. पिसुर्लेकरांच्या मजकुरांत चौथाई या शब्दाचा अर्थ सरकारानें करावयाच्या वसुलाचा चौथा हिस्सा असा नाहीं.

कांहीं तरी हिस्सा इतकाच आहे. त्या अर्थानें शिवाजी इ. स. १६६१ पासूनच खंडणी वसूल करीत होता. तिला चौथाई म्हणण्याचा प्रघात कदाचित् इ. स. १६७४ नंतर त्यानें .पाडला असेल. चौथाई म्हणजे चौथा हिस्सा नव्हे असें समजण्याचें दुसरें एक गमक पिसुर्लेकरांच्या लेखांत सांपडतें. ते म्हणतात कीं, चौत्या नांवाचा राजा दमणजवळील डोंगराळ प्रदेशांत होता, त्यास भोंवतालचे लोक कर देत. त्या कराचें नांव चौत्याच्या नांवावरून चौत वा चौथ असें पडलें. त्यांच्या या विधानास दुजोरा मनुचीच्या आत्मवृत्तांतहि मिळतो. मनुचीस जयसिंगानें रामनगर इत्यादि ठिकाणच्या राजांकडे पाठविलें होतें. त्या दौऱ्यांत तो रामनगरच्या व इतर आसपासच्या राजांना भेटला. त्यांत 'चुतियाचा राजा' ( Rajah of Chottia [ Chutia ] ) हा एक होता. त्यावरून चौत वा चौथ म्हणजे चुतियास द्यावयाचा कर हा शब्द रूढ झाला. त्याचेंच रूपांतर पुढें कदाचित् चौथ वा चौथाई यांत झालें असेलहि; पण त्याचा अर्थ एकंदर उत्पन्नाचा चौथा हिस्सा असा नसून कांही तरी हिस्सा इतकाच समजावयाचा.

शिवाजीनें विजापूरकर यांच्या मुलखांत चौथाई वसूल करण्यास इ. स. १६६१ त व मोगलाईत इ. स. १६६३ त सुरुवात केली, ती विजापूरकर वा मोगल यांजबरोबर करारमदार करून झाली नव्हती. ती वसुली त्यानें मनगटाच्या जोरावरच चालविली. तिला प्रथम स्वरूप लुटीचें होतें, मागाहून त्यानें चौथाईचें स्वरूप दिलें असेल. कारण इ. स. १६६१ त राजापूरची लूट म्हणूनच त्यानें केली व त्याप्रमाणें मागाहून, हुबळी, अथणी इत्यादि गांवेंहि लुटलीं. तसेंच मोगलाईतील सुरत शहर त्यानें इ. स. १६६३ त लुटलें व नंतर खानदेशांत नंदुरबार, धरणगांव आणि वऱ्हाडांत मलकापूर व कारंजा यांची लूट केली आणि तिचें समर्थन त्यानें मोगल व विजापूरकर यांच्या सैन्याशीं लढण्याकरितां व त्यांजपासून आपल्या मुलखाचा बचाव करण्याकरितां फौज बाळगावी लागते या युक्तिवादानें केलें. शिवाजीला द्रव्याची टंचाई सैन्याचा पगार देतांना भासूं लागली हें वर लिहिल्याप्रमाणें चौथाईची क्लृप्ति सुचण्याचें मुख्य कारण होय. शिवाजी पन्हाळयाच्या वेढ्यांतून सुटून राजगडावर आला तेव्हांच त्याला शाइस्ताखानाच्या स्वारीस तोंड देण्याचा प्रसंग आला असतां त्याजपुढें हा प्रश्न

उभा राहिला. त्या वेळीं त्याजभोंवतालच्या मुत्सद्द्यांनीं जो बुद्धिवाद केला तो कवीन्द्र परमानंदानें शिवभारतांत वर्णिला आहे. ते त्यास म्हणाले, 'हे राजा पैसा हा सामर्थ्यवान् आहे. सर्व लोकांपाशीं जो पैसा आहे तो तुझाच आहे, हें आम्हीं जाणतों. म्हणून हे महातेजस्वी राजा, आपण मुलुखगिरीवर जावें.' त्याचा श्लोक येणेंप्रमाणें –

योऽर्थः सर्वेषु लोकेषु स तवैवेति विद्महे ।
तथा हि जैत्रयात्रार्थे शिवराज महाद्युते ॥

असा सल्ला शिवाजीस मिळाल्यावर तो राजापूर व रत्नागिरी जिल्ह्यांतील इतर गांवांपासून खंडणी वा लूट घ्यावयास गेला.

शिवाजीनें इ. स. १६६४ त सुरतेवर स्वारी केली तेव्हां प्रथम सुरत न लुटतां तेथील प्रमुख व्यापाऱ्यांपाशीं खंडणीच मागितली. ती त्यांनीं न दिल्यामुळेंच शिवाजीला सुरतेची लूट करावी लागली. तो म्हणे, 'मोगल सरदार माझ्या राज्यावर स्वारी करतात, त्यांजपासून माझ्या राज्याचें रक्षण करण्याकरितां अधिक सैन्य ठेवावें लागतें. यास्तव त्या सैन्याचा खर्च मोगलांच्या प्रजेनेंच देणें भाग आहे.' त्यानें इ. स. १६७० त सुरत दुसऱ्यांदा लुटली तेव्हांहि तशीच मागणी केली होती; पण तीहि सुरतेच्या व्यापाऱ्यांनीं पुरविली नाहीं. म्हणून त्यानें सुरत सोडतांना तेथील प्रमुख व्यापारी व अधिकारी यांस बजावलें कीं, 'दरसाल बारा लाख रुपये न द्याल तर पुनः पुढच्या वर्षी येऊन शहराचा उरलेला भाग जाळून टाकीन.' (प. सा. सं. खं. २, पृ. ३८२).

## सरदेशमुखी

चौथाईप्रमाणें सरदेशमुखी हा एक हक्क शिवाजीनें प्रस्थापित केला. मात्र ती बाब त्यानें नवीन निर्मिली असें नाहीं. देशमुखांवर सरदेशमुख हे वतनदार पूर्वीपासून होते. रत्नागिरी जिल्ह्यांत मामले प्रभावळींत मावळंगकर हे सरदेशमुख होते. प्रभावळीकरांना जिंकून त्यांचें राज्य शिवाजीनें घेतल्यावर त्यानें जीं वतनें अनामत ठेवलीं त्यांत मावळंगकरांचें सरदेशमुखीचें वतन असून तें वतन आपणांकडे पुढें चालावें असा अर्ज शिवाजीराजाकडे त्यांनीं केला होता (२१ एप्रिल १६६२) व त्याप्रमाणें शिवाजीनें त्यास तें

वतन परत दिलेंहि. त्याच सुमारास शिवाजी आपणास आपल्या राज्यांतील देशमुखांचा सरदेशमुख म्हणवूं लागला व त्याप्रमाणें कल्याणास नारो भिकाजी सुभेदार याजकडे जी कामगिरी होती तींत सरदेशमुखीचा हक्क वसूल करणें हीहि असल्याचें दिसून येतें ( शके १५९० माघ शु. ४ ).

सारांश, असे सरदेशमुख कांहीं ठिकाणीं शिवाजीपूर्वीच होते. शिवाजीनें स्वराज्य स्थापल्यावर छत्रपति हाच एकंदर स्वराज्याचा सरदेशमुख झाला. तो हें वतन आपल्या मर्जीप्रमाणें वाटेल त्यास देऊं शके. देशमुखाचें जें काम तेंच सरदेशमुखाचें. ठराविक टापूंतील जमीनमहसूल गोळा करून सरकारांत भरणें, त्या टापूचा बंदोबस्त ठेवणें, सरकारची दौलत राखणें, गुन्हेगारांचें पारिपत्य करणें, त्यासाठीं फौज बाळगणें, उजाड गांवांची वसाहत करणें, चोरांस शिक्षा करणें, ज्याचा माल त्यास देणें हीं कामें देशमुखाचीं असत; तींच देशमुखांवरचा वरिष्ठ म्हणून सरदेशमुखहि करी. या कामगिरीबद्दल त्यास सरकारी साऱ्यापैकीं दहा टक्के उत्पन्न मिळे व तें शिवाजीच्या खासगी उत्पन्नाकडे जमा होई. हा वसूल शिवाजी स्वराज्यांत करीत असे. परराज्यांत करीत असल्याचें दिसून येत नाहीं. तो हक्क शिवाजीच्या पश्चात् शाहूनें चौथाईबरोबर मोगल बादशहापासून मिळविला व त्याच्या सनदा दिल्लीहून बादशहापासून बाळाजी विश्वनाथ पेशव्यानें आणिल्या. शिवाजी मोगली राज्यांत चौथाईहि वसूल करी. पण तो त्याचा हक्क मोगल बादशहानें मान्य केला नसावा.

सरदेशमुखीचें आणखी एक उदाहरण येणेंप्रमाणें आहे. दादाजी कोंडदेव यानें इ. स. १६४५ त बाबाजी झुंझारराव देशमुख तर्फ कानदखोरें यास पत्र लिहिलें आहे. यांत तो म्हणतो, ‘ तुझें अंतुरली येथील इनाम सरदेशमुखीस दिलें. त्याबद्दल तुला दापोडी येथें इनाम देण्याविषयीं लिहिलें आहे.’ याचा अर्थ असा कीं, बाबाजी हा कानदखोऱ्याचा देशमुख होता त्याबद्दल त्याला अंतुरली हा गांव होता. तो त्याजकडून दादाजीनें कोणा त्याजवरील सरदेशमुखास दिला. त्यामुळें बाबाजीचें जें नुकसान झालें तें दादाजीनें बाबाजीस दापोडी गांवीं इनाम देऊन भरून काढलें. ही गोष्ट अर्थात् शिवाजी पंधरा वर्षांचा असतांच दादाजीनें केली.

प्रकरण चौदावें

# शिवाजी व वतनदारी

वतनदारी पद्धति, भारतांत, विशेषतः दक्षिणेंत फार प्राचीन आहे. अखिल समाजाची उभारणीच वतनावर झालेली होती. वतनाचा संबंध भूमीशीं येतो. मानवाच्या निर्वाहाचें भूमि हेंच साधन होतें. व्यापार व उद्योगधंदे यांची वाढ हल्लींप्रमाणें तेव्हां झाली नव्हती. अन्न व वस्त्र याच त्या काळांतील मुख्य गरजा असून एक वेळ वस्त्र नसलें तरी चालेल पण अन्न पाहिजे, इतकें अन्नास मनुष्याच्या जीवनांत अद्वितीय स्थान होतें. त्यांची निवांता झाली म्हणजे मनुष्य बिनघोर होत असे. तें अन्न भूमीपासून मिळत असल्यामुळें मनुष्य भूमि म्हणजे जमीन संपादण्याकरितां जिवाचें रान करीत असे. जमीन ही सुद्धां एका पिढीपुरती मिळावयाची नसून एकाच घराण्यांत ती पिढ्यानुपिढ्या चालत राही. ही जमीन खरेदी करून मिळे किंवा गांवाची वा सरकाराची सेवा करण्याकरितां मिळे. गांवांत दोन प्रकारचे नोकर असतात. एक गांवाचा नोकर व दुसरा सरकारचा नोकर. गांवापाशीं नोकराला द्यावयास पैसा नसे. तसा सरकारापाशींहि आपला सर्व राज्यकारभार चालविण्यास जी नक्त रक्कम प्रत्यहीं लागावयाची ती नसे. या कारणानें गांव व सरकार आपआपलीं कामें आपल्या सेवकांना भूमि इनाम देऊनच करून घेत. बारा बलुत्यांची पद्धति या भूदानावरच अधिष्ठित झालेली होती.

गांव काय वा सरकार काय, त्याजपाशीं सेवकांची पात्रता ठरविण्यास परीक्षा नसत व शाळाहि नसत. बापाचें घर हीच शाळा व त्यानें घेतली तीच परीक्षा. म्हणून बापाचें वतन मुलाकडे, थोडे अपवाद सोडल्यास, हटकून चालावयाचेंच. यामुळेंच वतनाला पारंपर्य आलें. ही पद्धति मन्वादिकांपासून सुरू होऊन भारतांतील सर्व हिंदु राजांनीं व त्यांच्या-मागून मुसलमान राज्यकर्त्यांनींहि चालविली. राजशास्त्र व अर्थशास्त्र तिजशीं इतकें निगडित झालें होतें कीं, गांवच्या येसकरापासून तों थेट राजाच्या मंत्रिमंडळापर्यंत सर्व सेवक व जनता वस्त्राप्रमाणें वतनानें एकत्र विणली गेली होती. गांवचें मुख्य सरकारी उत्पन्न हल्लींप्रमाणें तेव्हांहि काळीचें होतें. तें उत्पन्न व गांवावर सरकारनें बसविलेले इतर कर गांवचा पाटील सरकाराकरितां वसूल करी. बरेच गांव मिळून देश म्हणजे प्रदेश वा परगणा व त्यावरचा अधिकारी देशमुख याचा त्याच्या टापूंतील पाटलां-वर अंमल चालत असे व अशा अनेक देशमुखांवर मुसलमानी काळांत एक सुभेदार असे. पाटील हा गांवाचा राजा, देशमुख हा देशाचा राजा. पाटलापाशीं आपल्या अधिकाराची बजावणी करण्याकरितां व गांवाच्या रक्षणाकरितां सैनिक असत. त्याहून फार मोठें सैन्य देशमुखापाशीं असे.

ही वतनदार पद्धति शिवाजी मुसलमान राज्यकर्त्यांपासून मुलूख जिंकून घेऊं लागला तेव्हां त्यास नडूं लागली. मुख्यतः मावळांतील देशमुख त्याच्या आड येत. ते आदिलशाहीचे ताबेदार असल्यामुळें आपलें वतन संभाळण्याकरितां त्याला वश होत नसत. इतकेंच नव्हे तर, ते आदिलशाहीच्या बाजूनें त्याच्याशीं लढत. क्वचित् एखादा दुसरा देशमूख त्यास वश झाला तरी वरील मुसलमान सुभेदारानें दरडावतांच घाबरून शिवाजीचा विश्वासघात करण्यासहि कचरत नसे. यामुळे शिवाजी मनांतून वतनदारीचा शत्रु बनला. त्याविषयीं सभासद लिहितो, “ इद्दिलशाही, निजामशाही, मोगलाई देश ( शिवाजीनें ) कबज केला. त्या देशांतील रयत पाटील, कुळकर्णी व देशमुख यांचे हातीं. यानीं कमावीस करावी व सरकारांत मोघम टक्का द्यावा. या मिरासदारांनीं हजार दोन हजार रुपये गांवांतील रयतेपासून वसूल करावे व त्यापैकीं दोनतीनशें रुपये दिवाणांत ( सरकार ) खंडमक्ता म्हणून भरावे. त्यामुळे मिरासदार

पैकेकरी होऊन गांवांत हुडे, वाडे, कोट बांधून, प्यादे व बंदुखी ठेवून बळावले. दिवाणास ( सरकारी अधिकाऱ्यास ) भेटणें नाहीं. दिवाणानें त्यांस दोष दिल्यास हे मिरासदार त्याच्याशीं भांडावयास उभे राहत. या प्रकारें मिरासदार पुंड होऊन बळावले. म्हणून राजानें देश काबीज करून हुडे, वाडे, कोट पाडिले. एखादा कोट नामांकित असला तर त्यांत सरकारी ठाणें ठेवलें. मिरासदारांच्या हातांतली सत्ता काढून घेतली. देशमूख, देशपांडे, पाटील, कुलकर्णी यांस सरकारी करांच्या वसुलीबद्दल द्यावयाचा हक्क बांधून दिला. जमीनदारांनीं वाडा बुरुजांचा बांधूं नये, घर बांधून राहावें, ऐसा मुलुखाचा बंदोबस्त केला !" प्रल्हाद निराजीनें इ. स. १६८६ जानेवारी १७ च्या एका निवाड्यांत शिवाजीच्या वतनविषयक धोरणाचें एक सूत्र सांगितलें आहे, "छत्रपतिस्वामींचा तह कीं वतनदाराचें वतन कोणी विकत घेऊं नये व वतनदारानेंहि तें विकूं नये. जो विकत घेईल त्याजपासून गुन्हेगारीः घ्यावी व विकील त्यास ताकीद द्यावी" ( छत्रपतिसाहित्य खंड १० वा, पृ. २३ ).

सभासद व प्रल्हाद निराजी यांचीं शिवाजीच्या वतनदारी धोरणाविषयींचीं वैय्यक्तिक मतें होत. त्यापेक्षां शिवाजीनें स्वतः या बाबतींत काय केलें तें अधिक ग्राह्य. ई. स. १६५० मध्यें शिवाजीनें गुंजण मावळच्या सिलीमकर देशमुखांना पुढीलप्रमाणें पत्र लिहिलें – "गलबल्यामध्यें आपले जमेतीनसी साहेबाचे मसलतेस येऊन एलगारी केली. त्यावरून देशमुखावरी मेहेरबान होऊन आजरामऱ्हामती इनाम मौजे चिचले बुद्रुक देह, आजमोजा तक्षिमा तीन बापूजी हैबतराव, हाबाजी हैबतराव व बाळाजी नाईक खेरीज नखायाती महसूल इत्यादि." त्याच वर्षी झुंजारराव मरळ देशमुख यांना कोंढावळे बुद्रुक हें गांव इनाम देण्यांत आलें. या देशमुखांनीं शिवाजीस सैनिकी मदत केली, तो प्रसंग कोणता याचा निर्देश त्या पत्रांत नाहीं. बहुधा इ. स. १६४९ त फत्तेखानानें शिवाजीवर स्वारी केली तो प्रसंग असावा.

इ. स. १६६३ त शिवाजीनें पुण्यास शाइस्ताखानाच्या गोटावर छापा घातला, त्यांत खानाचीं बोटें तुटलीं व त्याजकडील इतरहि प्राणहानि झाली. त्या वेळीं शिवाजीला मदत करणारांत कोयाजी बांदल हा होता. त्याजकडे मौजे आळंदे तर्फ हिरडस मावळ या गांवाची निम्मी पाटीलकी पूर्वीपासून

होती. त्यास शिवाजीनें त्याच्या सैनिकी साहाय्याबद्दल त्या गावची १७॥ टक्के जमीन इनाम दिली ( शिवचरित्र साहित्य खंड ५, लेखांक ७७४ ). या इनामाचा पाटीलकी इनामाशीं कांहीं संबंध नाही. याचा अर्थ असा की मूळ पाटीलकीच्या वतनांत पुढे हिस्से पडले तरी त्याबरोबर या इनामाचे हिस्से पडावयाचे नाहीत. कारण जेव्हा आबाजी व तुळाजी बांदल हे या इनामांतहि हिस्सा मागूं लागले, तेव्हा हें इनाम स्वामिकार्यार्थ आहे, गांवकीच्या कामासाठी नव्हे असा खुलासा करण्यांत आला.

शिवाजी आग्ऱ्याहून सुटून आल्यावर व त्याचा मोगलांशीं बेबनाव होऊन तो आपले जयसिंगाशीं झालेल्या तहांत गेलेले किल्ले भराभर मिळवूं लागल्यावर त्यानें इ. स. १६७० त बाबाजी सावंताबरोबर एक तह केला ( शि. च. सा. खं. ८, पृ. १५, लेखांक १९ ). त्यांत म्हटलें आहे :– ‘ आपणास ( तुम्ही ) कोट घेऊन द्या व ५०० घोड्यांचे जितराब घ्या. त्यासाठी आम्ही तुम्हाकडे ५ गावें चालवूं. ’ थोडक्यांत म्हणजे तुम्ही कोट लढवून आम्हास द्या. त्यासाठीं पांचशें घोडीं बाळगा व त्याच्या मोबदला पांच गांवें आम्हापासून इनाम घ्या.

पुरंदर किल्ला शिवाजीनें मोगलांपासून घेतला. त्यापूर्वी किल्ल्यावरील तास वाजविण्याची वृत्ति मिरासदार ज्योतिषी शिवभट बिन दादभट व नारायणभट बिन रामभट पुरंदरे यांजकडे होती. पण किल्ला घेतल्यावर शिवाजीचे प्रधान निळो सोनदेव यांनी तें काम वेदमूर्ति राजश्री विश्वनाथभट ठकार व सखंभट ठकार यांस सांगितलें. यानंतर शिवाजीमहाराज पुरंदरावर आल्याची संधि साधून शिवभट व नारायणभट यांनीं महाराजांस भेटून आपल्या पिढीजात वृत्तीची त्याजपाशीं मागणी केली. त्या वेळीं वृत्यांशींयाची वृत्ति व तास त्यांस देण्याचें योजून तूर्त तें वतन जप्त केलें व मागाहून शिवभट व नारायणभट यांस द्यावयाचें तरें महाराजांची आणि शिवभट व नारायणभट यांची भेट पुनः झाली नाहीं व महाराज मरून गेले. पश्चात् संभाजी महाराजांच्या कारकीर्दीत या प्रकरणाची चौकशी होऊन शिवभट व नारायणभट यांजपासून शेरणी घेऊन कार्तिक शु. ७ शके १६०५ मध्यें पुरंदरावरील तासांची मिरास त्यांस देण्यांत आली ( शि. च. सा. खंड १, पृ. ८४।८५ ).

शिवाजीस रायगडावर राज्याभिषेक झाला त्या वेळीं अष्टप्रधानांस

त्यांचीं पदें वंशपरंपरें करण्यांत आलीं नव्हतीं. ही गोष्ट गागाभट्टांनीं महाराजांच्या नजरेस आणिल्यावर महाराजांनीं बेल-भंडार, दवणा व आंब्रेचें हळद-कुंकू व निर्माल्य उचलून अष्टप्रधानांना समक्ष सांगितलें की, 'हीं पदें तुम्हास दिल्हीं. यांत जो कोणी तुमचा यावत् वंश असेल तावत् खलेल करील त्याचा श्रीशंभु व तुळजा भवानी वंशक्षय करील. हें समस्त ब्राह्मण जगद्वंद्य यांचे समक्ष त्रिवाचा सत्य, सत्य, सत्य असें बोलून पूर्वयुगवत् यथा यथा स्थानी उभे राहावयास आज्ञा केली. तेव्हा भटजींनींहि (गागाभट) अतःपर निःसंदेह उभे राहावे येसे सांगून प्रतिस्तंभीचे मंत्र उच्चारून यथास्थानीं उभे केलें आणि याज्ञिक संपविलें' (सभासद बखर शके १७०० मार्गशीर्ष शु. १ या दिवशीं सासवड येथील हरसे यांनी नकलेली सभासद बखर) (शि. च. सा. खंड १, पृ. १०८।१०९).

यावरून सर्व वतनें काढून घेण्याचा शिवाजीचा इरादा नव्हताच, उलट तो नवीन वतनें देतहि होता. कारण त्यानें सर्व वतनें काढून घेतलीं असतीं तर ती एक फार मोठी क्रान्ति ठरली असती. अशी क्रान्ति सर्व समाजरचनेची उलथापालथ करणारी असल्यामुळें त्याला ती शक्य नव्हती. आपल्या राज्यकारभाराला वतनदारीपासून व्यत्यय येऊं नये एवढाच त्याचा उद्देश असून तो साध्य करण्यापुरतेच फेरबदल वतनदारी पद्धतींत त्यानें केले. कारण समग्र वतनदारी त्यास बुडवावयाची असती तर खालपासून वरपर्यंत सर्वत्र पगारी नोकर त्यास नेमावे लागले असते. पण त्यास लागणारें अपार द्रव्य त्याजपाशीं नव्हतें. सैन्य व मुख्य अधिकारीवर्ग यांचा तनखा भागविण्याकरितां लागणारें द्रव्यच जर मुळीं तो लुटीवर जमवीत होता तर इतक्या असंख्य नोकरांकरितां आवश्यक असा निधि तो आणणार कसा व कोठून ? हीच अडचण तत्कालीन व तत्पूर्वीच्या राज्यकर्त्यांपुढें असल्यामुळें वतनदारी पद्धति अस्तित्वांत आली होती हें विसरतां कामा नये. शिवाय त्याची सत्ताहि बराच काळ अस्थिर असल्यानें ही नवी पद्धत अमलांत आणणें त्यास अशक्य होतें.

वतनदारीची उपयुक्तता इंग्रज सरकारासहि पटून त्यांनी गांवाचा कारभार वतनदार गांवकामगारांपासूनच करून घेतला. फक्त अलीकडे तीस-पसतीस वर्षांत गांवांतला कुलकर्णी तेवढा त्यांनीं उडविला. पण आतांच्या सरकारानें

गांवकीच्या म्हणजे ग्रामोपयोगाकरितां बलुतेदारांना असलेलीं इनामें खालसा करून सरकारोपयोगी इनामें म्हणजे वतनें अद्यापि चालू ठेवलीं आहेत. याचें कारण तरी आधुनिक काळांत गांवगाडा मोडल्यामुळें बलुतेदारी नाममात्र उरली. आतां शिवकालांत वतनदारीचें स्वरूप कसें होतें हें कांहीं उदाहरणांनीं दाखविणें बरें.

## सरदेसाई

शृंगारपूर, जि. रत्नागिरी येथें सुर्वे या नांवाचे जहागीरदार होते. त्यांस जिंकून शिवाजीनें त्यांची जहागीर खालसा केली व त्यांच्या हद्दींत जे वतनदार होते त्यांचीं वतनें जप्त केलीं. त्यांपैकींच रंगोनाईक मावळंगकर हे प्रभावळी मामल्याचे सरदेसाई होते. त्यांचेंहि वतन शिवाजीनें जप्त केल्यामुळें ता. २१ एप्रिल १६६२ रोजीं त्यांनीं राजगडास शिवाजीकडे जाऊन प्रभावळी व दाभोळ येथील आपलें वतन चालू करण्याविषयीं राजास विनंती केली. तेव्हां राजानें प्रभावळीचें वतन रंगो नाइकाकडे चालू करण्याचा प्रभावळीचे सुभेदार नामजाद पिलाजी नीलकंठराव यांस हुकूम केला व दाभोळच्या वतनाचा विचार योग्य वेळीं करण्याचें आश्वासन दिलें.

## सामराज मुद्रा व सीका

शिवाजीराजे – पिलाजी नीलकंठराव सुभेदार नामजाद मामले प्रभावळी यांस "साल गुदस्त तळ-कोकण मुलकाची कबजात बदल खासा स्वारी तळ-कोकणांत होउनु मुलूक कबज जाहाला. ते वक्तीं शृंगारपूरकर सुर्वे व कोकणांतील पातशाही अमलदार याणी बेमानी केली. तेव्हां ते नतीजा पोहचोन उधळून गेले. मुलकांतील रयतीस सरंजामाबद्दल वतनदार व रयत यांस सरकारांतून कौल सादर जाहालेवर केसो नायक बिन राघोनाईक मावळंगकर व सारे वतनदार मामले मजकूर सरकारी खिजमतीस हाजीर जाहाले. साल मजकुरी रंगोनाईक मावळंगकर सरदेसाई मामले मजकूर याणीं किल्ले राजगडच्या मुकामीं हुजूर येऊन अर्ज केला जे 'आपलें सरदेशमुखीचें वतन मामले मजकूर व मामले दाभोळ पिढी दर पिढी मात कदम इस्तकबिल पासून सालगुदस्त पावेतों चालत आलें. हालीं तळ कोकण साहेबांस अर्जानी जालेवर साहेबीं सेवकावर मेहेरबान होऊन कौल सादर केले. यावर आपण वतनाचे बाबे खिजमतीस हाजीर जाहालो. हालीं

दिवाणांतून ( सरकारांतून ) सारी वतनें अमानत जाली. आपले हक, लवाजिमा व इनामती अमानत जाल्या. आपण तो साहेबाचे खिजमतीस एक सान असो. साहेबीं मेहेरबान होऊन सेवकाची वतनावर स्थापना केलिया व कुटुंबास अन्न देऊन उस्तवारी केलिया उमेद धरून एक चाकरी करूं.' ये बाबे तुम्हीं इलतिमास लिहिली. ही इलतिमास खातरेस आणून व रयत मामुलीवर नजर देऊन बेकदीम वतनदार याबद्दल नाइक मजकूर यांस दोनी मामले मजकूर सरदेशमुखी वंशपरंपरेनें करार करून नाईक मजकूर यांस मामले प्रभावळीचे जमाबंदीवर पट्टी, पासोडी, हक, लारी दोन हजारांची शिस्त दरसाल देववीत जाणें. दरसाल ताज्या सनदेचा उजूर न धरणें. मामले दाभोळची पट्टी पासोडी हक यांची शिस्त होणें आहे. त्यास मामले मजकूरचे अंमलदार व वतनदार हुजूर आणविले आहेत. ते आलियावर होईल ..." ( शके १५८४ वैशाख शुद्ध १३; इ. स. १६६२ एप्रिल २१ ) ( प. सा. सं. खंड १, पृ. २१२।२१३ ).

पूर्वी सत्तान्तर झाल्यानंतर पहिल्या राजवटींतील इनामें व हकसंबंध जप्त करण्याचा रिवाज असे. प्रथम जप्ती झाली म्हणजे मग चौकशी करून व युक्तायुक्तता पाहून जप्त केलेलीं इनामें व हकसंबंध पुनः सुरू करण्यांत येत. त्या पद्धतिप्रमाणें शिवाजीनें केसो नाईक मावळंगकर यांचें इनाम व हकसंबंध जप्त करून मागाहून तें आपलें काम इमानानें करण्याविषयीं त्यांज-पासून खात्री करून घेतल्यावर त्यांचें सरदेसाईपणाचें वतन पुनः सुरू केलें. सरदेसाई हा सरदेशमुख या शब्दाचा पर्यायवाचक शब्द आहे.

शिवाजीला वतनदारी अजिबात नष्ट करावयाची असती तर सर-देसाईपणाचें हें वतन शिवाजीनें मावळंगकरास पुनः बहाल केलें नसतें. प्रभावळी मामल्याचा जो वसूल मावळंगकर यांजमार्फत होईल त्यांतून त्यांनीं पट्टी, पासोडी, हक व दोन हज़ार लाऱ्या ( एक नाणें ) घ्यावा असें ठरविण्यांत आलें. सभासदानें म्हटल्याप्रमाणें दोन हजार लाऱ्या ही रक्कम शिवाजीनें निश्चित केली असावी; व पूर्वी सरदेसायानें रयतेपासून किती रक्कम घ्यावी हें निश्चित नसून सरकारांत वसुलापैकीं किती रक्कम भरावी हें निश्चित असेल. शिवाजीनें या वतनदारींत जर फरक केला असेल तर तो एवढाच दिसतो.

## देशमुख

वर सरदेसायांचें उदाहरण दिलें, आतां देशमुखांचें उदाहरण देतों. हे रोहिड खोऱ्यांतील जेधे देशमूख असून त्यांचेहि इनाम व हक्क शिवाजीनें इ. स. १६६८ त असेच जप्त केले होते. ते पुनः चालू करण्याविषयीं शिवाजीनें मावळचे सुभेदार कृष्णाजी भास्कर यांस खालीलप्रमाणें आज्ञापत्र लिहिलें :–

आश्विन वद्य १
शक १५९०

" मसहुरल हजरत राजश्री कृष्णाजी भास्कर सुभेदार व कारकून सुबा त॥ मावळे प्रति राजश्री शिवाजीराजे – दंडवत सर्जाराऊ जेधे देशमुख त॥ भोर त॥ रोहिडखोरे हुजूर येऊन अर्ज केला जे ' आपला हक्क व इनाम गांव कुल अमानत केलें आहे. आपणांस कांहीं पावत नाहीं. याकरितां आपला अवकात चालत नाहीं. बहुत जबून वख्त तंगतुरासी जाहाली आहे. तरी साहेबी मेहेरबान होऊन आपला अवकात चालेल आणि साहेबाचे चाकरीस हजर राहो ऐसे केलें पाहिजे ? ' म्हणून त्यावरून याचें इनाम व हक कूल मनास आणून त्यांपैकीं साल मजकुरापासून दुबाले केले असे. "

या आज्ञापत्रांत देशमुखीच्या वतनाबद्दल जेधे यांना वसुलाच्या पोटीं नक्की रक्कम शिवाजीनें निश्चित करून दिलेली दिसत नाहीं. यावरून जुनी वहिवाटच पुढें चालू ठेवलेली असावी.

## देशपांडे

देशपांडे व देशकुलकर्णी एकच. साधा कुळकर्णी हा एका गांवाचा वतनदार अधिकारी व देशकुळकर्णी हा अनेक गांवांवरचा वतनदार अधिकारी. अर्थात् त्याच्या हाताखालीं देशपांड्याप्रमाणें अनेक कुलकर्णी असत. विभूते हे हुकेरीचे देशकुलकर्णी होते. त्यांना कर्नाटकावरील स्वारींत प्रतापराव गुजर सरनौबत यांनीं इ. स. १६७३ च्या डिसेंबर महिन्यांत कैद करून रायगडावर ठेवलें. शिवाजीस राज्याभिषेक झाला त्या वेळीं कैद्यांना मुक्त करण्याची एक नामी संधि आली होती. ती साधून रघुनाथपंत कोरडे व रायगडावरील इमारतींचे हवालदार हिरोजी इंदुलकर यांनीं विभूत्याविषयीं महाराजांपाशीं शिफारस करून त्यांची आदबखान्यांतून सुटका घडवून आणिली व त्यांस

हुकेरी परगण्याचें देशपांडेपण व सरदेसाईपणहि दिलें. पण त्यास अट अशा घातली कीं त्यांनीं एका वर्षांत चार हप्त्यांनीं वीस सहस्र होन आणून द्यावे.

पुण्याचे बाजीराव होनप हे शिवकालांत देशकुलकर्णी होते. ते मोगलांस सामील झाल्यामुळें शिवाजीनें त्यांचें वतन जप्त केलें. पुढें बाबाजीराव यांनीं आपणास महाराजांकडून अभयवचन मिळेल तर आपण वतनावर येऊन काम करूं असें बोलणें सुरू केलें. त्यांच्या बाजूनें निराजी पंडित यांनींहि रदबदली केल्यावरून शिवाजीनें त्यास संमति दिली. तथापि होनप यांच्या मार्गात एक नवेंच विघ्न उपस्थित झालें. त्यांनीं लांडे या नांवाचा एक इसम आपलें काम पहाण्यास गुमास्ता म्हणून नेमला होता. तोच हें वतन बळकावूं लागला व त्याला पाठिंबा शिवाजीच्या अष्टप्रधानांपैकीं निळो सोनदेव यानें दिला. तरीपण महाराजांनीं या एकंदर प्रकरणाची नीट चौकशी करून देशपांडेपणाचें वतन होनप यांसच दिलें.

## कुलकर्णी

देशमुखाचा मुशाहिरा ठरला नसला तरी शिवाजीच्यां पूर्वीहि मुसलमानांच्या राजवटींत कुलकर्ण्यांचा मुशाहिरा ठरलेला दिसतो. कुलकर्णी हा देशमुख व देशपांडे यांचा ताबेदार. पण हे देशमुख व देशपांडे केव्हां केव्हां पूर्ववहिवाट मोडून आपल्या अधिकारांत कुलकर्ण्यांचा मुशाहिरा बंद करीत. असा अन्याय कल्याणच्या देशमुख-देशपांड्यांनीं केल्यामुळें तेथील कुलकर्णी त्रिंबकजी नरस प्रभु यांनीं शिवाजीराजांकडे येऊन तक्रार केली. तेव्हां राजानें ता. २५ जानेवारी १६६९ रोजीं नारो भिकाजी सुभेदार मामले कल्याण यांस पुढीलप्रमाणें आज्ञापत्र पाठविलें.

शके १५९० माघ शुद्ध ४

" मशरूल अनाम राजश्री नारो भिकाजी सुभेदार व कारकून सरदेशमुख सरकार महालानिहाय तळ कोकण व देशमुख व देशपांडे कल्याण मामले यांस प्रति राजश्री शिवाजीराजे. त्रिंबकजी नरस प्रभु हुजूर येऊन मालुम केलें कीं कसबे कल्याणचे कुलकर्ण व हुदेदारी आपली मिरास सालाबाद माहात कदीम कारकिर्द मालिक अंबर बाजे कारकिर्द दर कारकिर्द चालत आलें असे. हल्लीं मोगलाचे कमाविशीमध्यें देशमुख व देशपांडे यांनीं कसूर करून चालू देत नाहींत. चिटणीस व नाइकवाडी यांचा मुशारा

सरकारी पोत्यांत खर्च पडत होता तो हाली मिरासदारांनीं रयते निसबत लावून त्यांचें चालवितात. आणि आपणासी हुदेदारी मुशारा दरमाहे टके १० व कागद बाब दरमाहे टका १, एकूण टके ११ होते ते चालवीत नाहींत. तरी आपलाहि मुशारा सदरहू रयतेनिसबतीनें लावूनहि चालवीत व कुलकर्णहि बिना कसूर चालवीत ऐसें केलें पाहिजे.' म्हणून मालुम केलें. तर बाजे मिरासदारांच्या मिरासीच्या मिरासी चालवाया आणि यासी कसूर करावयास काय गरज आहे ? हाली तुम्ही देशमुख देशपांडे यांसी ताकीद करून त्रिंबक प्रभु मजकुराचे कुलकर्ण व हुदेदारी सालबादप्रमाणें हुदेदारीचा मुशारा बाजे मिरासप्रमाणें रयतेनिसबतीनें देत तें करणें. बोभाट येऊं न देणें."

वरील आज्ञापत्रांत तेव्हांची अधिकार-प्रणाली प्रत्ययास येते. सर्वांत वरचा सुभेदार, त्याच्या खालीं अनुक्रमें सरदेशमुख, देशमुख-देशपांडे व पाटील-कुलकर्णी. नारो भिकाजी हा तळकोंकण म्हणजे रत्नागिरी जिल्हा व कल्याणप्रांत यांवरचा सुभेदार होता. सरकारी नोकरांचे पगार वसुलांतून देण्याची वहिवाट होती. तीस अनुसरून आपलाहि मुशारा मिळावा व आपणास देशमुख-देशपांड्यांच्या मर्जीवर अवलंबून राहावें लागूं नये अशी कुलकर्णी त्रिंबकजी नरस प्रभु याची इच्छा होती, ती शिवाजीनें पूर्ण केली.

## जोसपण व कुलकर्ण

पंताजी गोपिनाथ हा शिवाजीचा बडा मुत्सद्दी होता. अफजलखान शिवाजीवर चालून आला तेव्हां त्याजबरोबर शिष्टाई करण्याकरितां शिवाजीनें वकील या नात्यानें पंताजी गोपिनाथ यासच पाठविलें होतें. सबनीस, चिटणीस, बाकनीस इत्यादि अनेक हुद्द्यांवर त्याची नेमणूक करण्यांत आली होती. पंताजीचें आडनांव बोकील. तो कदाचित् सासवडाजवळील हिवऱ्याचा राहणारा असून पेशवाईतील सखाराम बापू बोकिलाचा पूर्वज असावा. कारण इ. स. १६७५ त तो सासवड येथेंच सबनीस व चिटणीस होता. त्याला वतनाचा फार हव्यास दिसतो. याजकडे परगणे सुपें व कर्यात बारामती येथील देशकुलकर्ण म्हणजे देशपांडेपण पूर्वापार होतें. शिवाजीनें त्याला घर बांधून राहण्यास शिरवळास जागाहि दिली होती. असा त्याचा सर्वत्र पसारा असतांहि त्यास जोसपण व कुलकर्णपण मिळविण्याची हांव

होतीच. त्यासाठीं त्यानें परगणे शिरवळ व वाई येथील बाळाजी त्रिमल व हरि विश्वनाथ कुलकर्णी व जोशी यांजबरोबर करार केला होता. पण पंताजी-पंताचें काय बिनसलें कोण जाणें त्यानें वृत्तीचा हिस्सा पत्करण्याचें नाकारलें.

शके १५९३ माघ वद्य १०
इ. स. १६७२ फेब्रुवारी १३

बाळाजी त्रिमल व हरि विश्वनाथ कुलकर्णी व ज्योतिषी परगणे शिरवळ व वाई यांसी प्रति यमाजी रंगनाथ बोकील – 'आपली वायदेशची मिरासी बहुत दिवस गेली. त्यापैकीं निमे आपण साधिली. पंताजीपंत यांस नेम केला होता कीं, निमे वृत्ति साधल्या निमे गांव देऊं. पंताजीपंत नाकबूल गेले. आपण मान्य केलें. तरी आपणांस येळकें गांवची अर्धी वृत्ति दिली आहे.' शिवाजीभोंवतालच्या अधिकारीवर्गांत वतनाचा हव्यास किती होता व ते वतनें संपादण्याकरितां केवढ्या खटपटी करीत, याचें हें एक ढळढळीत उदाहरण आहे.

## पाटीलकी

बकाजी फर्जंद हा शिवाजीच्या मर्जीतील नोकर होता. तो जिवापाड मेहनत करून शिवाजीनें सोंपविलेली कामगिरी पार पाडीत असे. त्याला वतन असें कांहीं नव्हतें. पण त्याची इच्छा फार कीं, आपल्याला पाटीलकीचें वतन मिळावें. गांवांत हल्लींहि उपरी व वतनदार असे दोन प्रकारचे रहिवासी असतात. उपऱ्यांना वतन नसल्यामुळें गांवांत मान नसतो. गांवांत मोठ्यांत मोठा वतनदार म्हणजे पाटील. तो गांवचा राजा. ती पाटीलकी आपणास मिळावी अशी बकाजीला तळमळ म्हणून त्यानें शिवाजीराजास ती आपणास देण्याविषयीं गळ घातली, तेव्हां राजानें त्याची मनीषा पुरविली. शिवाजीला-सुद्धां वतनाचा हव्यास असून त्यानें मौजे नांदेड तर्फ खडकवासलें येथील निमी मोकदमी तेथील पोळ आडनांवाच्या पाटलापासून विकत घेतली होती ती त्यानें बकाजीस १०० होनांस विकली (प. सा. सं. खंड २, पृ. ४७६).

मौजे नांदेड येथील पाटीलकीशिवाय मावळांतील मौजे खामगाव येथील पाटीलकीचें वतनहि शिवाजीनें आपणाकरितां घेतलें होतें तेंहि त्यानें बकाजीस दिलें.

शके १५९७ आश्विन शुद्ध ४
इ. सं. १६७५ सप्टेंबर १३

महादाजी सामराज सुबे व कारकून तर्फ मावळ यांसी प्रति रा. शिवाजीराजे – 'बकाजी फर्जंद (हा) साहेब कामावरी कष्ट मशागती करितो. याबद्दल साहेबीं मौजे खामगांव येथील स्वतःचें पाटिलकीचें वतन बकाजीस दिलें असे. तें चालविणें' (प. सा. सं. खंड २, पृ. ५३१).

बकाजीस पाटीलकीच्या वतनाची मातबरी किती वाटत होती हें शिवाजीनें बकाजीस लिहिलेल्या खालील पत्रांत प्रतिबिंबित झालें आहे. "बकाजी फर्जंद प्रति अजर. रा. शिवाजीराजे, कष्ट मशागत केलीस व पाटिलकी जाहालिया गोतांत इज्जत आहे. सबब ती (खामगांवची) पाटिलकी दिली आहे." (प. सा. सं. खंड २ पृ. ५३२)

फर्जंद म्हणजे मानसपुत्र. शिवाजी बकाजीस पुत्रासारखा मानीत होता, इतकी त्याजवर त्याची कृपा होती.

भोरच्या बाजूस किकवीजवळ भोवळी (भोळी) नांवाचें लहान गांव आहे. तेथील पाटीलकी शिवाजीनें दादाजी कोंडदेव (देशमुख) याजपासून खरेदी केली होती. ती त्यानें माणकोजी बिन वालोजी यास (२५ ऑगस्ट १५७६) दुमाला करून दिली (शिवचरित्र साहित्य खंड १०, पृ. १८).

## जुन्नर – अहमदनगरची देशमुखी

खुद्द शिवाजीस पाटीलकीचें वतन विकत घेण्यास एकप्रकारचा मान वाटत असे, हें वर दर्शविण्यांत आलेंच आहे. पाटीलकीपेक्षां देशमुखीचा मान केव्हांहि मोठा. तो आपणांस मिळावा यासाठीं शिवाजीनें औरंगजेबाचा भाऊ मुरादबक्ष याजबरोबर पत्रव्यवहार केला. त्याविषयीं मुरादबक्ष शिवाजीस लिहितो.

## फारशीचें भाषांतर

शके १५७१ मार्ग शुद्ध ७
इ. स. १६४९ नोव्हेंबर ३०

मुरादबक्ष – शिवाजी भोसले, "तुमचें पत्र राघोपंत याजबरोबर पाठविलें तें पावलें. जुन्नर व अहमदनगर येथील देशमुखीविषयीं लिहिलें.

त्यास आम्हीं हुजूर गेल्यानंतर हा मजकोर घडोन येईल. खातरजमा ठेवावी. आपणांकडील एक वकिल पाठवून द्यावा. मजकूर समजून घेऊन अमलांत येईल. वकीलास जो मजकूर विचारूं त्याचें उत्तर द्यावें. म्हणजे काम होण्यास दिरंग लागणार नाहीं. जाणोन उद्योग करावा व लोभ पूर्ण जाणावा" (प. सा. सं. खंड १, पृ. १२४).

हें पत्र शिवाजीनें आपल्या कारकीर्दीच्या प्रारंभीं लिहिलें आहे. त्या वेळीं तो केवळ १९ वर्षांचा होता. त्या वयांत आपण ज्या शिवनेरीवर जन्मलों त्याची म्हणजे जुन्नरची देशमुखी आपणांस मिळावी, तसेंच ज्या अहमदनगरच्या निजामशाहींत आपला पिता शहाजी नोकर होता त्या अहमदनगरची देशमुखी आपणांकडे असावी यांत मोठेपणा आहे अशी शिवाजीची तारुण्यांत भावना असावी.

## चिटणीसपद

पंताजी गोपिनाथ व बकाजी फर्जंद यांजपेक्षांहि शिवाजीचे निकटवर्ती बाळाजी आवजी चिटणीस. देवी भवानी महाराजांच्या अंगांत आली तर त्या वेळचा तिचा आदेश बाळप्रभूनीं टिपून घ्यावा. त्यांचाहि वतनाचा हव्यास शिवाजीच्या सहवासांत असतांहि सुटला नाहीं व शिवाजी वतनदारांविरुद्ध असल्यास त्यांना तें तत्त्व पटलें नाहीं. असें म्हटलें पाहिजे शिवाजीनें राज्याभिषेकसमयीं बाळाजी चिटणिसास आपल्या अष्टप्रधानांत स्थान देऊं केलें होतें, पण तें आपणांस नको, त्याऐवजीं चिटणिसीचा दरक आपल्या घराण्यांत वंशपरंपरा चालावा व त्याच्या जोडीस कारखाननिसी व जमनिसीहि आपणांस असावी अशी इच्छा बाळाजीनें महाराजांपाशीं प्रदर्शित केली. ती महाराजांस पुरविणें भाग पडलें.

शके १५८६ ज्येष्ठ व. १
इ. स. १६७४ जून ९

बाळाजी आवजी प्रभु चिटणीस प्रति श्रीशिवाजीराजे—तुम्ही स्वामीसेवा निष्ठेनें करून श्रमसाहस पुरें केलें. राज्यवृद्धीचे कामीं आला, यावरून तुम्हावर कृपाळू होऊन अष्टप्रधानांतील पद द्यावें मनीं धरलें असतां तुम्ही विनंति (केली) कीं, 'आपणाकडे चिटणिसीचा दरक चालत आहे, हा अक्षय वतनी वंशपरंपरेनें संनिध व सर्व राज्यांतील चालवावा. कारखाननिसी व

जमनिसी दोन धंदे राज्यांतील आपल्याकडे दिले ते अक्षय्य असावे.' यावरून तसे तुम्हाकडे दिले असे. स्वामींचे वंशीचा कोणीहि अन्यथा करणार नाहीं. लिहिलेप्रमाणें सदरहू प्रयोजनाचे व्यापाराची सेवा करून पुत्रपौत्री अनुभवणें (प. सा. सं. खंड २, पृ. ४९६).

बाळाजीनें महाराजांपासून वरील तीन वतनें मिळविलीं, त्यांशिवाय दाभोळ वगैरे गावांची खोतींसुद्धां मिळविली.

### आज्ञापत्र

शके १५९६ आषाढ शु. १
इ. स. १६७४ जून २४

आण्णाजीपंत सचीव प्रति श्रीराजा छत्रपति – 'बाळाजी आवजी चिटणीस याजकडे दाभोळ वगैरे गांवांचा खोतीसुद्धां मोकासा दिला आहे. कामावर हुसेन याकुब दळवी ठेवला आहे. त्याचेकडून काम घेणें' (प. सा. सं. खंड २, पृ. ४९७).

राज्याभिषेकानंतर शिवाजीनें आपल्या सेवकांवर संतुष्ट होऊन त्यांची कामना तृप्त करण्याचा जो उपक्रम सुरू केला त्यांत बाळाजीनें आपला हा फायदा करून घेतला.

### सबनिसी वतन

रामचंद्र नीलकंठ हे शिवाजीनंतरच्या राजवटींत पंत अमात्य झाले. त्यांनीं राजनीतीवर एक निबंध लिहून त्यांत वतनदारीचा निषेध केला आहे. शिवाजीच्या काळांत ते नुकतेच उदयास येत असून सबनिशीच्या हुद्द्यापर्यंत चढले होते. शिवकालांत प्रत्येक गडावर हवालदार, सबनीस व सरनोबत हे मुख्य अधिकारी असत. पैशाचा व्यवहार सबनीस करी. कोंकणांत सिंधुदुर्गावरचें तें वतन रामचंद्रपंतानें शिवाजीपासून मिळविलें.

### आज्ञापत्र

शके १५९० वैशाख शु. १२
इ. स. १६६८ एप्रिल १३

रायाजी भोसले हवालदार जंजिरे सिंधुदुर्ग प्रति रा. शिवाजीराजे – रामचंद्र नीलकंठ यांस जंजिरे मजकूरची सबनिसी वतन दिली आहे. यास

शंभर पातशाही होन शिरस्ता केला आहे. तेणेंप्रमाणें आदा करणें. यारदी व कागदबाब माजीप्रमाणें लिहिण्यास देत जाणें. मशारइले आपला मुतालिक जंजिरे मजकुरास पाठवितील. त्याचे हातीं सबनिशीचा कारभार घेत जाणें (प. सा. सं. खंड ३, पृ. १०५).

## जांवयास पाटीलकी

शिवाजीमहाराजांनीं स्वतःकरितां पाटीलकी संपादलीच, पण आपला जावई महादजी नाईक निंबाळकर यासहि त्याचा मान म्हणून मिळवून दिली. हें वतन पुणें जिल्ह्यांतील वाल्हे गांवाचें असून तें महाराजांनीं स्वतः खरेदी करून मग जांवयास अर्पिलें.

## ताकीदपत्र

शके १५७९ कार्तिक शु. १
इ. स. १६५७ आक्टोबर २७

ठाणेदार हजरतखान मौजे वाल्हे प्रांत पुणें प्रति रा. शिवाजी राजेसाहेब–'वाल्हेरकर बरवोजी मोकदमी चालवीत असतां बाळ जोशी कुलकर्णी यास त्यानें जिवें मारिल्यावरून शिरवळचा हवालदार त्रिंबकराव यानें धावणी करून बरवोजीस धरून नेलें. यास नागवण खंड होन १२०० केलें. व उगवणीबद्दल म्हाकोजी भापकर मोकदम लोणी यास जमान (जामीन) दिलें. पुढें पैशाच्या अडचणीमुळें बरवोजीनें कसूर केला म्हणून दोघास हुजूर बोलावून ९०० होन खंडोजीस व ३०० होन बरवोजीस देऊन पाटिलकी विकत घेऊन रा. महादजी नाईक निंबाळकर आमचे जावई यास दिली. तरी त्यास तुम्ही राजी होऊन असणें' (प. सा. सं. खंड १, पृ. १६१).

वरील ताकीदपत्रांतील १।२ घटना नजरेस आल्याशिवाय राहत नाहीत. वाल्ह्याचा पाटील बरवोजी यानें बाळ जोशी या कुळकर्ण्यास ठार मारलें व या अपराधाबद्दल त्याजपासून १२०० होन काय तो दंड घेण्यांत आला. वास्तविक हा गुन्हा केवळ द्रव्य-दंडावर न सुटतां त्यास देहदंड व्हावयास पाहिजे होता.

## तत्त्व कीं व्यवहार?

शिवाजी असलेलीं वतनें चालवीत असे, स्वतः विकत घेत असे व इतरांना नवीन देत असे; इतकेंच नव्हे तर, जे भीतीनें वतन सोडून गेले

त्यांना परत बोलावून व अभय देऊन वतनावर ठेवीत असे. हा प्रकार केदारजी नाईक खोपडे देशमुख उतरवली तर्फे रोहिडखोरे याच्या बाबतींत झाला.

शके १५८३ भाद्रपद वद्य ७
इ. स. १६६१ सप्टेंबर ५

केदारजी नाईक खोपडे देशमुख उतरवली तर्फ रोहिडखोरे प्रति रा. शिवाजीराजे – जे वख्ती अफजलखान (हा) साहेबाचे (माझे) तरफेस आला होता ते वख्ती तुम्ही येकवजा समजोन गनिमास मिळाले. त्यावरी गनिमाचा अमल बरतरफ जाला. याकरितां शक आंदेश धरून तर्फ मजकुरास न येऊन आपल्या हकाबद्दल गावगनास आजार देत आहां. तरी यामधे तुम्ही आपला काय फायदा समजला आहां ? साहेबासी गैररुजू असावें, हकास खलाल करून घ्यावे हे अकल तुम्हास कोणे दिधली ? तरी याउपरी कोणे बाबे:शक अंदेशा न करून आपल्या वतनास येणें आणि आपले देशमुखीचा इनाम व हक खाऊन खुशालीनें रहाणें (प. सा. सं. खंड ३, पृ. ९० ).

केदारजी शिवाजीविरुद्ध वागून अफजलखानास मिळाला होता. खानाच्या वधानंतर परत वतनावर न येतां दांडगाईनें आपले देशमुखीचे हक मात्र वसूल करीत असे. सरकारी वसूल सरकारांत भरावयाचा नाहीं व आपला हक मात्र घ्यावयाचा हा गैरशिस्त प्रकार शिवाजीस दुःसह होऊन त्यास त्यानें कांहींहि शिक्षा न करतां व त्याच्या अधिकारांत व वतनांत कसलीहि न्यूनता न आणितां त्यास परत बोलावलें. यावरून शिवाजी तत्त्वापेक्षां व्यवहाराकडेच कसा पाहत असे हें समजतें. किंबहुना शिवाजीनें तें तत्त्व म्हणून स्वीकारलें नसून तसला व्यवहार तो फक्त आपल्या शत्रूशीं करीत असे.

## जहागीर

शिवाजीच्या राज्यांत जहागीरदार फारसे नव्हते. जे होते त्यांच्या जहागिरी जप्त न करतां शिवाजीनें त्यांजकडे त्या तशाच चालू ठेवल्या. त्यांपैकीच पिराजीराव घाटगे हे होत. ते कागलचे घाटगे.

शके १५९० माघ शुद्ध ७
इ. स. १६६९ जानेवारी २८

रा. पिराजीराव राजे घाटगे सर्जेराव वजीर गोसावी म. इ. मातमी दौलत राजमान्य प्रति महाराज,शिवछत्रपति " तुम्हांकडील पत्र सर्व सविस्तर मजकूर राजश्री मल्हारपंत नाडगौंडे यांणीं श्रुत केला. तो दिलांत आणून तुम्हांस हजरत पादशाहा याणी मेहेरबानी होऊन वजिरी, मोर्चेला, चवघडा वतनदारी, जहागिर कागल परगणा, कर्याती तीन गांव सुमार ६७॥ तुम्हास इनाम करून दिलें बरहुकूम अनुभवं केला. वतनदारीचे कागदपत्र ध्यानांत आणून तुम्हास राजपत्रें करून दिल्ही आहेत. शिवाय कलम.

( १ ) तुम्ही प्रत्यक्ष भेटीस याल ते समयीं मानमरातब कलम.

( २ ) चादर, खडा, कंठी व शिरपेच, पोशाख ५ सनगे कलाबुती निरोप समयीं, ताजीम समक्ष बसकाबरोबर, घोडे २ ( एकूण ६ ).

( ३ ) सदरहू वतनदारी व जहागिरी पूर्ववतप्रमाणें तुमचे वंशपरंपरा भोगवटा करून सुखरूप असावें.

( ४ ) एकूण कलम दोन सदरहू प्रमाणें तुमचे परगणें खून, खराबी वगैरे पूर्वीपासून तुम्ही मुख्त्यार. आम्हाकडून कांहीं दरोगा पाहणेचे कारण नाहीं. बहुत काय लिहिणें " ( प. सा. सं. खंड १, पृ. ३४७ ).

पिराजीरावांची जहागीर आदिलशाहीकडून चालत आली असून त्यास सर्जेराव व वजीर हे किताब आदिलशाहींतूनच मिळाले होते. पुढें शिवाजीचे अंकित घाडगे झाल्यावर त्यांची जहागीर त्यांजपासून काढून न घेतां शिवाजीनें त्यांजकडेच चालविली; इतकेंच नव्हे तर, जे अधिकार व मानमतराब आदिलशाहींत त्यांस होते त्यांतील एकहि कमी न करतां ते सर्व जसेच्या तसे त्यांजकडे सुरू ठेवण्यांत आले. देशमुखापेक्षांहि घाडग्यांची सत्ता व जहागीर मोठी होती हें विसरतां कामा नये. वतनदारींत दोष व गुण दोन्ही आहेत अथवा तें दुधारी शस्त्र आहे. कारण प्रस्थापित सत्तेस वतनदार बळकटी आणतात, पण ती सत्ता उलथून पाडणारांच्या ते आड येतात. शिवाजीची सत्ता प्रस्थापित झाल्यावर पूर्वीचे मुसलमानी सत्तेखालील वतनदार शिवाजीचे सहायक बनले.

### ब्राह्मणांना इनाम

शके १६०१ भाद्रपद वद्य ५
ता. १४।९।१६७९

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके ५ सिद्धार्थी नाम संवत्सरे भाद्रपद बहुल पंचमी रविवासरे क्षत्रिय कुलावतंस श्री राजा शिवछत्रपति याणी राजश्री त्र्यंबक गोपाळ देशाधिकारी तर्फ पुणें यांसी आज्ञा केली ऐसी जे. मौजे तुळापूरकर ब्राह्मण येऊन विदित केलें कीं आपणांस इनाम वृत्ति पुरातन चालिल्या आहेती. स्वामीच्याहि सनदा आहेती. तेणेंप्रमाणें चालतच आहेती. यंदा नव्या सनदा आणणें म्हणून गतवर्षींपासून कारकुनांनीं खलेल केलें असे. ताकीद पाहिजे म्हणून, तरी यांच्या वृत्ति इनाम जेणेंप्रमाणें दुबाले आसेती आणि चालत आहेती. पलीकडील साल ता भोगवटाप्रमाणें आतांहि चालविणें. गतवर्षी व यंदा कारण खलेल केलें असेल तें कांहीं न करणें. जैसे चालत आले असे तैसेच पुढेंहि चालवणें. ताकीद असे. लेखनालंकार मर्यादा विराजते (प. सा. सं. खंड २, पृ. १७५)

## प्रकरण पंधरावें

# वतनदारांचें काम व इतमाम

### देशमुख

देशमुखाचा अधिकार व इतमाम लहानशा मांडलिक राजासारखा होता. त्याचें स्वतःचें खाजगी काम करण्याकरिता पेशवा या हुद्द्याचा दिवाण क्वचित् त्याजपाशीं असे. आपल्या परगण्यांतील गांवांची वार्षिक जमाबंदी करणें, गांवगन्ना पेठांतून जे व्यापारी उदमी असत त्यांजवर कर बसविणें, इत्यादि बाबी देशमुखावरचा सुभेदार त्याच्या सल्ल्यानें ठरवी. परगण्यांतील दिवाणी व फौजदारी तंटे तोडणें, गांवाच्या सीमा निश्चित करणें, गुराढोरांवर व रयतेवर जुलूम होऊं न देणें, योग्य इसमास विशेष कामगिरीकरितां इनाम व मिरासी हक्क देणें याहि बाबी देशमुखाच्या कार्यक्षेत्रांत येत. याची विस्तृत कल्पना खालील पत्रांवरून वाचकांस येईल –

एका सुभेदाराच्या ताब्यांत एक वा अनेक परगणे असत. त्याच्या कचेरींत जे अंमलदार असत त्यांत मजमूदार हा एक असे. त्याचें काम परगण्यांत हिंडून पीक-पाहणी करणें, एखादी जमीन पड असल्यास ती लागवडीस आणणें हें असें. त्यास मदत देशमुख करी. देशमुखानें आपल्याच गांवीं नेहमीं न राहतां वरचेवर ठाण्याच्या गांवीं कचेरींत जाऊन तेथील

कामकाजास जरूर ती मदत करावयाची असे. कारण परगण्याचा सुभेदार आपल्या कचेरींत नेहेमींच नसे. त्याला मधूनअधून मुलखाच्या बंदोबस्ता-करितां स्वारीवर जावें लागे. अशी वहिवाट मलिक अंबराच्या वेळेपासून असल्याचा दाखला सांपडतो.

### खुर्दखत

श. १५४६ भाद्र. शु.११.
इ. स. १६२४ आगस्ट १४.

अजर. मलिक सर्क मालिक अंबर यांजकडून देशमुख भोर तपे रोहिडा यांस – " बहिरो गणपति लाइनी फिर्यादी लिहिताती कीं, देशमुख ठाणियास येऊन दिवाण काम चालवीत नाहींत. कमीन एक दो रोजा येऊन दिवाण काम चालवितो. तरी बहिरो गणपतीस लिहिलें आहे ( प. सा. सं. खंड १, पृ. ४८ ).

देशमुखानें ठाण्यास जाऊन काम करावयास पाहिजे. तें देशमुख न करतां कमीन हा हलका अधिकारी १।२ दिवसांनी येऊन चालवितो, असा बहिरो गणपतीनें देशमुखावर टपका ठेवला. मजमूदार बहिरोनें अशी तक्रार केल्यावर मलिक अंबरानें त्याची चौकशी देशमुखाकडे केली. देशमुखानें बहिरोचा कामचुकारपणा मलिक अंबराच्या नजरेस आणून दिला. तेव्हां बहिरोस मलिक अंबरानें पत्र लिहिलें.

बहिरो गणपत मजमूदार तपे रोहिडा यांस – देशमुखाची अर्दास कीं, " गांवगन्ना हिंडोन संचणी करा म्हटलें ते न होती. ठाणा कुणबी आल्यास मोकल द्यावे. विलायती गस्ती करून लावणी करीत नाहीं. " तरी उगाच कैफतीच लिहितोस. कीर्दी ( जमिनीची लावणी ) करवीत नाहीस. येणें अमले तुझी पैरवी नाहीं. तरी कीर्दी उगवणी करविजे ( प. सा. सं. खंड १, पृ. ४८ ).

ऑगस्ट महिन्यांत वरीलप्रमाणें पत्रव्यवहार झाल्यावर बहिरो गण-पतीचा चुकारपणा मलिकच्या लक्षांत आला तरी त्यानें त्यास कामावरून दूर न करतां त्यास फक्त ताकीद दिली व इतर दोघांना कामावरून काढून टाकलें. बहिरोस काम करण्यास उत्तेजन यावें, म्हणून माजी मजमूदारास पगार ६ होन होता, तो बहिरोस १२ होन करण्यांत आला.

शके १५४६ आश्विन शु. ३
इ. स. १६२४ सप्टेंबर ५.

अजर मलिक सर्क मलिक अंबर – देशमुख तर्फ भोर तपे रोहिडा यांस "बहिरो गणपति मजुमदार याजवली खु॥ दोनी होती. ( १ ) एको नारायण ठाणेदार व तिमाजी नरसिंह मजमूदार ( यांस ) दुरी करून बहिरो गणपति मजमूदार पाठविला आहे. ( २ ) मजमूदारास तैनाती दरमाहे होन १३ आदा करणें. माजी मजमूदारास तैनात होन ६ असेत. बहिरो गणपति लाइनी फिर्यादी लिहितो. लावणी करीत नाही. ठाणा बसून रहातो, याविषयी बहिरो गणपतीस अलाहिदा लिहिलें आहे " ( प. सा. सं. खं. १, पृ. ४८ ).

या पत्रावरून मजमूदारास पगार देशमुखाकडून आदा होत असे, दोन मजमूदार होते त्यांपैकी एक मजमूदार व एक ठाणेदार यांस मलिकनें कामावरून काढून टाकलें. याचा अर्थ बहाली-बडतर्फीचा अधिकार देशमुखास नसून फक्त सुभेदार व त्याजवरचे अंमलदार यांस होता. बहिरो गणपतीस पगार कमी आहे म्हणून तो कामांत टंगळमंगळ करतो असें मलिकच्या नजरेस आल्यावर त्यानें त्याचा पगार वाढविला व ठाण्याच्या गांवीं स्वस्थ बसून न राहतां आपल्या हद्दींत फिरावें, ज्या जमिनी पड असतील त्या लावणीकरितां कुळास द्याव्या अशी सक्त ताकीद बहिरोस दिली. दोन मजमूदार होते त्यांपैकी एकास बडतर्फ करण्याचा हेतु हा की, दोघांना थोडथोडा पगार असल्यामुळें ते काम लक्ष लावून करीत नाहीत, यासाठी दोघांऐवजीं एकासच ठेवून त्याजकडून काम चोपून घ्यावें. ठाण्याच्या गांवीं ठाणेदार हा एक निराळा अधिकारी असे. त्यानें ठाण्यांत राहून तेथील नोकरवर्गाकडून काम करवून घ्यावें. तपे रोहिडा याखालची भोर ही तर्फ होती. रोहिडा किल्ला राहण्यास गैरसोयीचा म्हणून ठाणेदाराची कचेरी भोर या गांवीं होती.

वतनाचें प्रेम जनतेंत इतकें दृढमूल झालें होतें कीं, एक देशमुख शेजारच्या देशमुखाच्या हद्दींतील जमीन लाटण्यास मागेंपुढें पाहत नसे. देशमुखाला उत्पन्न कमी नसतांनाहि स्वार्थाकरिता तो सुद्धा असा अन्यायानें वागे तर इतर लहानसहान जमीन-मालक व बारा बलुते त्याहूनहि अधिक अन्याय करण्यास प्रवृत्त झाले तर त्यांत आश्चर्य काय ! देशमुख हा आपल्या

टापूंत न्यायाधीश असे. तोच अन्याय करूं लागल्यास कुंपणानें शेत खाण्यांतलाच प्रकार झाला म्हणावयाचा. भोरापलीकडे राइरेश्वराचा ( रोहिडेश्वर ) डोंगर आहे. त्याच्या एका अंगास भोरचा मुलूख व दुसऱ्या अंगास हिरडस मावळचा मुलूख होता. ते दोन मुलूख दोघां देशमुखांत वांटलेले होते. त्या दोघांपैकीं कृष्णाजी बांदल देशमुख हा दोघांच्या हद्दी ठरलेल्या असतां मधील पठाराची जमीन सैनिकांच्या जोरावर आपली म्हणून आपल्या तप्यांत घालूं लागला. तेव्हां मलिक अंबराकडे तक्रार गेल्यावर त्यानें कृष्णाजीस पुढीलप्रमाणें पत्र लिहिलें –

### ताकीदपत्र

शके १५४६ आश्विन शु. ३
इ. स. १६२४ सप्टेंबर ५

अजर मलिक शके मलिक अंबर यांजकडून कृष्णाजी बांदल देशमुख यांस

" तर्फ भोर व रोहिडा येथून १२ साबानचा अर्ज आला तो २३ सवालला पोचला. त्यांत असा मजकूर आहे कीं " राइरेश्वराच्या डोंगराच्या एका बाजूस भोरचा मुलूख व दुसऱ्या बाजूस हिरडस मावळचा मुलूख आहे. असें असून कृष्णाजी बांदल हा सर्व पठाराची जमीन आपली असें म्हणून जमातीच्या बळें भूमि आपल्या तप्याखालीं घालतो. " तरी निरानदीच्या थडीच्या सिवेचा निवाडा झाला असोन उगाच करकसा करतोस. याबद्दल तुला ताकीत करणें योग्य आहे. नवी जिकीर न कीजे " ( प. सा. सं. खं. १, पृ. ४८ ).

भोर व हिरडस मावळ हा प्रदेश त्या वेळीं शिरवळाखालीं असला पाहिजे. पण शिरवळास या वेळीं कोणी सुभेदार नसल्यामुळें सर्व तक्रारी निजामशाहाचा वजीर मलिक अंबर याजकडे जात व तो तेथून असल्या तंट्यांचा निकाल लावी.

परगण्यांतील वा देशमुखाच्या अखत्यारींतील कारभारांत वरिष्ठ सरकार आपण होऊन हात घालीत नसे. एका अर्थानें देशमुख स्वायत्ततेचाच उपभोग घेत. जनतेच्या हिताचीं कृत्यें देशमुखांना आपल्या अधिकारांत करतां येत. त्यांना गांवच्या उत्पन्नांतून नवीन वर्षासनेंहि देतां येत. मात्र हा

अधिकार शहाणा देशमुख एकटा गाजवीत नसे. त्या कामीं इतर शेटे, महाजन, देशकुलकर्णी ( देशपांडे ), मेहेतर, चौधरी यांचीहि संमति घेत असे. शेटे म्हणजे पेठेंतील मुख्य व महाजन म्हणजे त्याचा मदतगार वजनदार माणूस. पुण्याजवळील चाकण गांवीं इ. स. १६२४ त पावसाळ्यांत एकाएकी अवर्षण झालें. लोक हवालदिल होऊन परागंदा होऊं लागले. तेव्हा गांवच्या ज्योतिष्याला विचारून पावसाचा योग आहे की नाहीं याचा शोध घेण्याचें ग्रामस्थांनीं ठरविलें व त्याप्रमाणें मुरार भटजी ब्रह्मे यांना विचारलें. त्यांनीं अमुक दिवसांत पाऊस पडेल असें भविष्य वर्तविलें व तसा पाऊस पडला. म्हणून गांवाने त्यांस धर्मादाय २५ टक्के वर्षासन दिलें.

### इनामपत्र

शके १५४६ आश्विन, शु. ७
इ. स. १६२४, सप्टें. ९

देशमुख, शेटे, महाजन, देशकुलकर्णी, मेहेतर, चौधरी समस्त लोक चाकण यांजकडून मुरार भट बिन गंगाधर भट ब्रह्मे यांस –

" सदरहू संवत्सराकारणें पाऊस मुलखा गेला. लोक परागंदा होऊं लागले. अवघे मिळून तुम्हांसी बोलले, ' रोजा १०।१२ मध्ये पाऊस पडेल कीं न पडेल ? ' उत्तर दिधलें ' दिवसा दहामध्ये पर्जन्य पडेल. ' उदंड पडिला. याकरितां तुम्हा वरसासन धर्मादाय टक्के २५ दिधले असती. "

देशमुखाच्या कामगिरीची जाणीव अफझलखान शके १५७८ कार्तिक शु. ११ स मल्हारजी देशमुख व महादजी देशकुलकर्णी परगणे शिरवळ यांस करून देतांना लिहितों, ' देशमुखानें आपल्या प्रदेशांत फिरून तसू-भरहि जमीन पड राहूं न द्यावी, सर्व जमीन कीर्द करावी, दरसाल जमिनीचा दस्त ( सारा ) वाढवीत जावा, सरकारचा पैसा सरकारांत वक्तशीर भरावा व रयतेस राजी राखावें ' ( शि. च. सा. खं. १, पृ. ६७ ).

( २ )

विजापूरच्या पादशहाच्या राज्यांत माण तालुक्यांतील मलवडीचे देशमुख प्रसिद्ध होते. त्यांजकडे देशमुखीचें वतन पिढी दर पिढी चालत असून त्यांजपैकी झुंजारराव हे अल्ली आदिलशहाच्या कारकीर्दीत त्यास

युद्धकर्मांत मदत करीत व देशमुखीचें वतन गुमास्ता नेमून चालवीत. त्यांच्या या वतनास त्यांच्या शत्रूकडून उपद्रव होऊं लागला. तेव्हा त्याचा बंदोबस्त पादशहाने त्यांस आश्विन व. ९ शके १५९१ मध्यें सनद देऊन केला.

झुंजारराव यांजकडे माण येथील सरदेशमुखी व कसबे मलवडी येथील देशमुखी चालत आली होती. त्या बाबतींत पातशहानें येणेप्रमाणें आज्ञा केली, "मौजे बोथे, मौजे शिंदी खुर्द, मौजे कुळकजाई व खेरीज चाहुरांत कुरणें वगैरेचा हक्क, पट्टी पछोडी व हक्क लवाजिमे व चतुःसीमा व विश्वा व जकात व याखेरीज कित्येक मानपान प्रतिवर्षांचे वहिवाटीप्रमाणें चालत आले आहेत ते चालावेत" ( सनदापत्रांतील माहिती, पृ. २३ ).

देसाई म्हणजेच देशमुख. जे देशमुख तेच केव्हां केव्हां सरदेशमुखहि ( मोठे देशमुख ) असत, हें वरील उदाहरणानें स्पष्टच झालेंच आहे. शंकराजी बिन मकाजी घारगे ( घाडगे ? ) हे सातारा जिल्ह्यांत राजारामाच्या कारकीर्दींत सरदेशमुख असून त्यांजकडे कर्यात निमसोड, कर्यात मायणी व कर्यात विटे अशा तीन कर्याती होत्या. हा राजकीय विभाग परगण्याएवढा किंवा परगण्याहून कांहींसा मोठा असावा. देशमुख केवळ परगण्यावरच असत असे नसून तर्फ, कर्यात, तपे या भागांवरहि असत. देसाई परगणे चिमलगा जिल्हा विजापूर याजकडे शके १६२५ त जे हक्क व मानपान होते त्याजवरून देशमुखांच्या सर्वसामान्य हक्कांची व मानपानाची कल्पना येईल. ते पुढीलप्रमाणें दर गांवास १० चिवटे, वाख १० पेंडे, दोन बकरी, तूप घागर एक, धनगराचे मागास घोंगडी एक, कडब्रा दर शेतास लाप एक हजारीं, कोष्टी मागास रुपये निमेप्रमाणे, नारळ, मीठ, तांदूळ दर गोणीस ८ ·। · कैली, चितव व गूळ वजन ८८ १ । · किरकोळ खोबरें वगैरे घेणें.

देशमुख हे एका अर्थी सरकार व रयत यांचे मध्यस्थ असत. एक सरकार जाऊन दुसरें सरकार आलें तरी त्याची बाधा देशमुखास न होतां त्याचें काम अव्याहत चालूच राहत असे. या दृष्टीनें देशमुख कांहीं अंशीं स्वतंत्र असत. ते आपलें काम नीट रीतीनें बजावीत असल्यास त्यांना आपलें वतन जाण्याची भीति बाळगण्याचें कारण नसे. देशमुखांचा

स्वतःचा असा शिक्का असून त्यावर नांगराचें चिन्ह असे. परगण्यासंबंधीं जमाबंदी-प्रकरणीं सर्व खतपत्रें, गोतमहजर व न्यायनिवाडापत्रें इत्यादिकांवर हा शिक्का असल्याशिवाय तीं प्रमाण मानलीं जात नसत. सारांश, देशमुख ही संस्था राज्यास अत्यंत उपयुक्त व अपरिहार्य होती. प्रस्थापित सत्तेशीं ती इमानानें वागत असे हा तिचा दोष नसून गुणच समजला पाहिजे. शिवाजीची सत्ता प्रस्थापित झाल्यावर ही संस्था त्याच्याशींहि इमानानें राहिली.

## देशपांडे

### (१)

परगणे शिरवळ येथें रामाजी व तिमाजी या दोघांत देशकुलकर्ण व गांवकुलकर्ण यासंबंधीं वाद उपस्थित झाला. तो शके १५६५ त साहेबांनीं हजीर मजालसी देखत तोडला. तिमाजी व रामाजी हे दोघे सख्खे चुलत भाऊ असून एकाच घरांत राहत असत. रामाजी हा वडील भावाचा पुत्र. तो आपणांस देशकुलकर्णाचा व गांवकुलकर्णाचा वांटा व इनामतीचा निम्मा वांटा आपणास देत नाही अशी तिमाजीची फिर्याद होती. तिचा निकाल साहेबांनीं असा तोडला – ‘ दोघेहि देशकुलकर्णी. दोघांनीहि कागदपत्रीं देशकुलकर्णी म्हणून नांवें लिहावीं. आधी रामाजी विठ्ठल याचें नांव लिहावें व मग तिमाजीचें लिहावें. दिवाणांतील तश्रीफ व पानें जे हरयेक ठायीची व टिळा व हरयेक मान मानतुक आधी रामाजी विठ्ठल यासी व मागाहून तिमाजी पुरुषोत्तमास येणेप्रमाणे मानमानतुक घेणें. देशकुलकरणाचा हकलाजिमा व इतर वृत्ती दो ठायीं दोघांनी येणेप्रमाणे वांटून खाणें. ’

देशकुलकर्णाचा एकंदर मुशाहिरा १६४० पैकी ८१५ याचा गावगन्ना ६० भोंगोली, ५० पळशी, ५० केळुखुर्द, ३० सुसाड, ४० बोरी, २५ सांगवी, ४० अजणोज, ५० पिंपरे बुद्रुक, ६० खंडाळें, ५० भादोडें, १५ पाडेगांव, ५० वडगांव, १५ वाघोसी, ४० जेऊर, २५ पेढ, ४० पाडळी, ६० भवाळी ( भोळी ), ३० पिंपरे खुर्द, ६० मांडकी, २५ भादवडें. अशा रीतीने देशपांडे-वतनाचीं गांवें वीस असून त्यांत रामाजीचा हिस्सा वर लिहिल्याप्रमाणें.

त्याशिवाय मौजे न्हावी येथें शेत व मळा जमीन चावर ·॥· पैकीं ·।१५. इनाम गल्ला बिघे ·।· पैकीं निमे ८१५; शेत-मळयावरी लाविले चावर निमेपैकीं निमे ·।·; सेत निसबती माळीपैकीं कसबे मजकूरपैकीं निमे. पत्रावळी गुरव दररोज १० पैकीं निमे ५; पालणूक जकाती निमे निसबती तांबोळी पानें रोजीनापैकीं निमे. गैर माहसुलास जे होन आहे त्याची निमे. याखेरीज देशकुलकरणास जें उत्पन्न होईल त्याचें निमें.

### तिमाजी पुरुषोत्तम

तिमाजीच्या वांट्यास १६३५ टक्यांपैकी ८२५ टक्के आले. त्याची वांटणी. ४० मोहतर्फा, ५० तोडिल ( तोंडल ), ५० नायगांव, ३० मोरटे, ४० – गुळवचे ( गुळुंचे ), २५ वाठार खुर्द, ४० पारगाव, ५० वाठार बुद्रुक, ६० भादे, ५० खोडी बुद्रुक, ५० वेळवें ( वेळे ), १५ रुटी, ५० कविटें ( कवठें ), १५ हरळी, ४० बावडें, २५ पिसुर्टी, ७५ नाहवी ( न्हावी ), ४० कापडें, ३० आणजुरी, ५० अहिरें, एकूण ८२० – (मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें खंड २०).

### ( २ )

देशकुलकर्णी म्हणजे देशपांडे. मोरो विठ्ठल होनप हे कर्यात मावळप्रांत पुणें येथील देशकुलकर्णी होते. त्यांजकडे हवेली, कडेपठार, सांडस खुर्द, कर्यात मावळ, पाटस, सांडस बुद्रुक व निरथडी अशा सात तर्फा असून त्या प्रत्येक तर्फेत अनुक्रमें ८२ । ४३ । २० । ३६ । ४३ । २९ व ३७ म्हणजे २९० गांव एकूण होते. हा सर्व मिळून एक परगणा निजामशहानें शहाजीस मुकासा दिला. त्या वेळीं प्रत्येक तर्फेस हवालदार व कारकून येऊन स्वतंत्रपणें कमावीस करीत असत. मोरो विठ्ठल यांच्या वडिलांनीं प्रत्येक तर्फेस कारभाराकरितां गुमास्ता दिला होता. मोरो विठ्ठल यांनीं या वतनासंबंधीं खुर्दखत देशमुख, मोकदम, कुळकर्णी यांस ताकीद करून द्यावें अशी विनंती शिवछत्रपतीकडे केली व छत्रपतींनी हक्क लाजिमा त्यांचा त्यास दिला ( सनदापत्रांतील माहिती, पृ. १०८ ).

## पाटीलकीचें वतन

### ( १ )

खंडोजी बिन येसाजी दाभाडे मौजे गार नजिक दौंड, तर्फ रांजणगांव प्रांत जुन्नर यांजकडे गारेचे पाटिलकीचें वतन चालत होतें. त्याबद्दल

त्यास १॥ चावर जमीन इनाम असून त्याशिवाय पुढील हक्क होते – तांबोळयाच्या खुमास ( जातीस ) दररोज पानें १००, तेल्याच्या घाण्यास तेल दररोज वजन ८८९, चांभाराच्या खुमास ( जातीस ) सालीना जोडा १, नांव नांगर, घरठाव १, लग्नास खोबऱ्याची वाटी व शेला, शिराळशेट, शिरपाव, टिळा-विडा, वाजंत्री दसरा-दिपवालीस, साळयाच्या खुमास सालीना सरूद १, धनगराच्या खुमास सालीना चवाळें, कोष्टयाच्या खुमास पासोडी, आडपाळें सालीना १, शिंप्याच्या खुमास दिवाळीस चोळखण सालीना ५, बकरी कसाई यास दररोज वजन ८८।· बकालाच्या दुकानास बाजाराचे दिवशीं सुपारी १, मोहरपेस पोळयाचा बैल, गौर-गणेश, होळीस पोळी, गुढेचा पाडवा, भावईचा दिवट, कोळयाचें पाणी, सेल पाटी, वेठबिगार माफ, पालभारी, फाळ्याची मोळी, शेव-सबजी, बाजाराचे दिवशीं गल्ल्याच्या दुकानास फसकी.

मौजे पारगांव माळा, तर्फ पाटस, प्रांत पुणें येथील ताकवणें या पाटील घराण्यांत पाटीलकीच्या वतनाविषयीं तंटा लागला होता. सदर तंटा वडील घराणें व धाकटें घराणें यांजमध्यें होता. त्याचा निवाडा श. १५८० आश्विन व. २ ता. ३–१०–१६५८ रोजीं करण्यांत आला. वडील घराण्याचा प्रमुख लुमाजी बिन तेज पाटील व धाकट्या घराण्याचा कोंडाजी बिन लखमोजी हा होता. वांटणी पुढीलप्रमाणें झाली.

वडील घराणें – ( १ ) वडील व नांवनांगर, शिरपाव अर्धा, शिराळशेट आधीं पुढें जावा, दसऱ्याची वाजंत्री आधीं वाजवावीं, दिपवाळीस आधीं ओवाळावें, होळीस पोळी आधीं, पोळयाचा बैल आधीं पुढें जाऊं देणें, इनाम निमे, हक्कबादे जमा घुगरी निमे, जोडा चांभार.

धाकटें घराणें – शिरपाव मागून, शिराळशेट मागून न्यावा, दिपवाळीस ओवाळणी मागून, होळीस पोळी मागून, बैल पोळयाचा मागून जावा, इनाम निमे, हक बादे जमा घुगरी, जोडा चांभाराचा ( शिवचरित्र-साहित्यखंड २, पृ. १२५–१२६ ).

### कुलकर्णी-वतन

परगणे शिरवळ येथील रामाजी व तिमाजी यांजमधील गांवकुलकर्णांची वांटणी झाली ती येणेंप्रमाणें –

### रामाजी

मुंजेरी येथून ६० टक्के गल्ला म्हणजे २ खंडी; जेऊर ३० टक्के म्हणजे १॥ खंडी जोरी; सांगवी नक्त १० टक्के, शिवाय १॥ खंडी जोरी; पळशी नक्त ३० टक्के, शिवाय २॥ खंडी जोरी. पळशीहून ५ होनांपैकी २॥ होन. दर गांवांस जुते ( जोडा ) निसबती चांभार जुते १; याच्या वांट्यास जे गांव आले आहेत त्यास गांवांस घेणें. शेत कसबे मजकूर ( शिरवळ ) शेत माडे-जलाल ( शेताचें नांव ) चावर १॥ पैकी निमे ·।॥·; शेत नागझरी चावर १ पैकी निमे ·॥·; एकूण चावर १।·; इनाम चावर १ पैकीं निमे ·॥·; कुणबिक चावर १॥ पैकीं ·।॥·.

### तिमाजी

मोहतर्फा टके ६०; केसुडी २० टक्के म्हणजे २ खंडी जोरी; नायगांव २० टक्के म्हणजे २ खंडी जोरी; पेठ टक्के २०. राजापूर पर. पुणें टक्के २५ म्हणजे १। खंडी; पळशी होन ५ पैकीं निमे २॥ होन. दर गांवास निसबती चांभार जुते १. शेतें, ·।॥· शेत माडेखालील चावर १॥ पैकीं ( ·॥· शेत, नागझरी चावर १ पैकीं निमे. ) इनाम चावर १ पैकीं निमे ·॥·; कुणबीक चावर १॥ पैकीं निमे ·।॥· सेत, निसबती माळी पैकीं कसबे मजकूर निमे पत्रावळी निसबत गुरव १० पैकीं ५.

### जोशीवतन

शके १५२२
इ. स. १६००

दामोदर पाध्ये, राघो पाध्ये व ‘ पनोपाध्ये ’ उपनाम गोळवलीकर हे संगमेश्वरीं राहत असत. त्यांना ज्योतिष, धर्माधिकरण, देशोपाध्येपण या संबंधीं अष्टाधिकार होते. त्यांजकडे ही वृत्ति १४७५ वर्षें चालत होती. त्याविषयीं पहिले ताम्रपट राजा सत्येश्वर ( चालुक्य ) याजपासून त्यांच्या पूर्वजांस मिळाले. त्यानंतर विद्यानगरच्या ( विजयानगर ) राजांचा अंमल कोंकणावर सुरू झाल्यानंतर रामराजानें त्यांस ताम्रपत्र करून दिलें. पुढें विजयानगरचें साम्राज्य बहामनी राजांनीं इ. सन १५६५ त बुडविलें, तेव्हां विजापूरच्या आदिलशाही अंमलाखालीं दक्षिण कोंकण गेलें. त्या वेळीं आदिलशहानें त्यांस फर्मान दिलें. या पाध्यांच्या ताब्यांत मौजे देवघर तर्फे

तुजारपूर मामले मुजाफुराबाद ऊर्फ प्रभोल (प्रभावळी) व किले खेळणा तें मौजे देवघर मामले हमजाबाद आमल बंदर मैमून मुस्तफाबाद ऊर्फ दाभोळ व मौजे सिरबाव (ची) नदी (सह्याद्रिघाट) एवढ्या प्रदेशाचा धर्माधिकार होता. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे दक्षिणेस प्रभावळी ते उत्तरेस दाभोळ हा प्रदेश त्यांच्या अधिकाराखालीं होता. त्यांत एकंदर गांवें १८५ होतीं. इतका मोठा टापू कोणाहि एकास संभाळतां येणें कठीण होतें. तरीपण पाध्ये घराण्यांत पुरुष अनेक असल्यानें त्यांनीं तो टापू राघो पाध्ये, पनो पाध्ये व दामोदर पाध्ये यांत वांटून घेतला होता. तथापि राघो पाध्ये व पनो पाध्ये वृद्धापकाळीं अशक्त झाल्यामुळें व गांवेंहि पुष्कळ असल्यामुळें त्यांनीं कित्येक गांवीं आपल्यातर्फें मुतालिकहि ठेवले होते. कांहीं गांवीं तेथील मोकाशी नूतन भट ठेवून त्यांजकडून कार्य-प्रयोजन उरकून घेत.

अशा स्थितींत दामोदर पाध्ये आपला पुत्र अंतो पाध्ये यास घेऊन महायात्रेस गेले. ते तिकडून ९ वर्षांनीं परत आले, तेव्हां त्यांच्या वतनाच्या बाबतींत बऱ्याच घडामोडी झाल्या होत्या. कित्येक गांवीं भलतेच लोक पुढें येऊन तेथील रहिवाश्यांचें पौरोहित्य करूं लागले होते. शृंगारपुरास तेथील राजे सुर्वे यांचें वेदमूर्ति विश्वनाथ भट, हरिभट व वासुदेव भट राजपुरोहित हे सरकारी कारकून व चाकरमाने यांचें पौरोहित्य करीत होते. संगमेश्वर गांवींहि सरकारी कारकून व चाकरमाने यांचें पौरोहित्य त्यांजकडेच आलें होतें. या राजपुरोहितांनीं पाध्ये पिता-पुत्र काशीयात्रेहून परत आल्यावर त्यांजबरोबर उपाध्येपणाचें मानाविषयीं जोरावारीनें कलह आरंभिला व त्यांचें कांहीं चालू देईनात.

आणखी एक भानगड उपस्थित झाली. ती अशी कीं पाध्ये यांच्या उपाध्येपणाच्या टापूंत मौजे कोलथें, आबावो बुद्रुक, वाडा वानेरी व मजरे चांदिवणें येथें देवरुखे ब्राह्मण राहत असून त्यांनीं पाध्यांना नवा पेंच टाकला. ते पाध्यांस म्हणाले, 'जर उपाध्येपणादिक कर्मे तुम्ही आमच्या घरीं चालविणार असाल तर आमच्या घरीं जेवलें ाहिजे.' कारण कऱ्हाडे ब्राह्मण हे देवरुख्यांच्या घरीं अन्नग्रहण करीत नसत. शिवाय श्री जोखमाता देवकोंड मौजे मजकूर येथें कसबा संगमेश्वर येथील थोडे लोक येऊन राहिले तरी संगमेश्वराचे जोशी येऊन उपाध्येपणाकरितां पाध्याबरोबर कज्जा

करूं लागले, म्हणून या एकंदर प्रकरणाची दाद लावून घेण्याकरितां पाध्ये मजकूर यांनीं शृंगारपूर राजधानीस येऊन कान्होजी राजे प्रभावलीकर यांजकडे फिर्याद दाखल केली. ती अशी – ' आपण राजे धर्मपरायण असतां वृत्तिलोप होतो, हा धर्म नव्हे. आमचें पुरातन वृत्त मनास आणून काय ती आज्ञा केली पाहिजे. ' त्यावरून राजश्री केशव नायक, सोमनायक सरदेसाई व महादजी विष्णु सरदेशकुलकर्णी मामले मजकूर यांनीं हुजूर भले लोक व शिष्ट ब्राह्मण व गांवगन्नाचे खोत आणून त्यांजपुढें ही फिर्याद मांडली. त्यावेळीं उभय पक्षांचें म्हणणें ऐकून घेऊन ज्योतिष, धर्माधिकरण व देशोपाध्येपण यांचा अष्टाधिकार पाध्ये यांचा असल्याचा त्यांनीं निवाडा केला.

देवरुखे ब्राह्मण म्हणाले, ' पाध्ये हे आमच्या घरीं अनुष्ठान करून अन्यत्र भोजनास जातात, आमच्या घरीं स्वयंपाकहि करून भोजन करीत नाहींत म्हणून आम्हांस खेद वाटून नेणतेपणानें पाध्ये यांस बोललों; परंतु तें आमचें म्हणणें प्रमाण मानूं नये. '

पाध्यांचे अष्टाधिकार येणेंप्रमाणें :– आचार, व्यवहार, प्रायश्चित्त, संकल्प, निबंध पूजा, आद्य गोदान, ब्रह्मदंड, अन्त्य गोदान, लग्नमुहूर्त, गणेशपूजन, स्तंभप्रतिष्ठा, घटिकायंत्र, कलश, ग्रहदान, ग्रहजप, पत्रिका, ब्रह्मत्व, पुराण, नामकरण, महानदेवप्रतिष्ठा, कुंड, मंडप, कलशारोपण, रुद्रानुष्ठान, आप, अध्यापन, वापी, कूप, तडाग, आराम, अनुष्ठान, सादस्य, व्रत, उद्यापन, श्रौतस्मार्तानुष्ठान शांतिक, पौष्टिक, लक्ष होम, कोटि होम, आचार्यत्वाग्रपूजन, मातृकापूजन, संस्कार, अन्त्यक्रिया, गोदान, वृषोत्सर्ग, वर्षश्राद्ध, यांखेरीज उपाध्येपणाचे मानाबद्दल भोगवटा.

" येणेंप्रमाणें पुरातन तुमचें चालिलें असे. त्याप्रमाणें आपले पुत्रपौत्रादि वंशपरंपरा उपभोग करून सुखी आसिजे. यास जो कोणी हरकत करील तो देव-ब्राह्मणद्रोही, पंचमहापातकी. याखेरीज हमजाबाद व तुजारपूरतर्फेत तुमचे वतनाचे गांव आहेत. तेथे कांहीं मोकाशी वगैरे लोकांनीं नवेच ब्राह्मण बोलावून कार्यप्रयोजन करतात. त्यांसहि आणून त्यांचा इन्साफ केला जाईल. याविषयीं तुम्ही आपलें मन समाधान असो देणें. जाणिजे शके १५२२ शार्वरीसंवत्सरे " ( शि. च. साहित्यखंड २, पृ. ३३९ । ४२ ).

## काजीस सनद

परगणे असअदनगर, सरकारसुभा दारुलजफर बिजापूर यास विजापूरच्या बादशहानें आज्ञा करून परगणे असअदनगर यांतील कसबा व कर्याती यांसुद्धा काजीपणाची चाकरी करण्यास सैयद मखदुम यास सांगितलें. पुढें त्याचा वंशज सैयद करिमुद्दिन यानें परगणे आकलूज येथील काजीपणाची सनद मागितली. त्यास ती बादशहानें दिली. त्यांत एक चाहूर जमीन, दरगांवीं हक्क हक्कदारी व मानपान त्यास मिळाले. काजीपणाचे हक्क पुढीलप्रमाणें :–

( १ ) धर्मशास्त्राच्या शिक्षा चालू करणें; ( २ ) ईश्वराची सेवा करणाऱ्या मनुष्यास, यांत मचें कल्याण आहे व अशीच सेवा कराल तर तुम्हांस ईश्वर सुख देईल अशी प्रीति उत्पन्न करणें; ( ३ ) कोणीहि अंतकाळीं बोध केल्याप्रमाणें इनाम देणें किंवा स्वाधीन करणें असेल तसें करावें; ( ४ ) शास्त्रांनीं जें वर्ज्य केलें आहे तें न मानतां पापाचरण करणारास शिक्षा करणें; ( ५ ) शुक्रवारच्या जमातीचा बंदोबस्त करणें; ( ६ ) कुलीन श्रेष्ठाशीं विवाह करविणें; ( ७ ) मयताचे पाठीमागें उरले द्रव्याचा यथाविभाग खर्च करणें; ( ८ ) कोणी द्रव्य वा इतर पदार्थ ठेवून गेला आहे, त्याचे संरक्षणाचा बंदोबस्त करणें; ( ९ ) मद्यप्राशन करणारे लोकांचें पारिपत्य करणें; ( १० ) सन्मार्गानें चालण्याविषयीं सल्ला देणें.

## शरीफ मीर आदल ( न्यायाधीश )

मुल्ला महंमद शरीफ मीर आदल ( न्यायाधीश ) व मोहेतसीब ( निरख वगैरे पाहणारा ) परगणे जाफराबाद ऊर्फ चांदवड, इलाका सरकार संगमनेर, अमले सुभे औरंगाबाद हे सदरहू चाकरी करीत असून त्यांस रोजमुरा मुकर केला नाही. तो आतां केला आहे. त्यांचीं कामें कज्जे फैसल करणें, मामले तोडणें, दावे व तंटे दूर करणें, माल व मेलेल्या माणसाचे जिंदगीची वांटणी करणें, जिनसाची, निरखाची, वजनाची व गजाची व मापाची चौकशी करणें, इमाम व मोअजन म्हणजे मशिदींतील चाकरी करणार यांचे हवाले व मशिदी व शाळा यांची मऱ्हामत करणें, शिक्षा देणें, फटके मारणें, मोठ्या रस्त्याची दुरुस्ती करणें, लोकांस निरा-

कारास भजण्यास बोलावणें, दारू पिणारे लोक व दुसरे कैफ करणारे लोक, वाईट काम करणारे लोक यांस मर्यादा घालणें, देवांच्या मूर्ति दगडाच्या वगैरे आकारी बिन आकारी मोडून टाकणें, शहरांमध्यें नवीन उत्पन्न झालेलें काम व जुलूम, जबरदस्ती वगैरे चालीचे लोक यांचा बंदोबस्त करणें, कोणी फिर्यादी आला तर शराप्रमाणें खरी चौकशी करीत जाणें.

या कामगिरीबद्दल शरीफ यास रोज आठ आणे, दोनशें बिघे जमीन लायक जिराईत द्यावी, त्याशिवाय दहींहंडी, नजराणा, बेगार इत्यादि देणें ( सनदा पत्रांतील माहिती पृ. ८२ ).

## शेटेपणाचें वतन

गांवाच्या पेठेंत शेट्यासहि कांहीं विशेष मान असत. त्यांचें स्पष्टीकरण चौल गांवासंबंधीं इ. स. १६०० च्या कागदांत सांपडतें तें असें – शेट्यास दरसाल दर घरास एक जेवण व एक लारी देत जाणें. ज्याचे घरीं वऱ्हाड ( लग्नाचें ) येईल त्यानें शेला द्यावा, ज्यास बेटा होईल त्यानें हरकी म्हणून एक लारी द्यावी. चौल कर्यातींत अकरा शिवांचे कालण, घोई, हजाम, शिंपी, सुतार, सोनार, कासार, लोहार, पाथरवट, रंगारी व मोची असतील यांनीं सालाचें जेवण म्हणून दर घरास लारी एक द्यावी.

## प्रकरण सोळावें

# न्यायदानपद्धति

मुसलमानांपूर्वीच्या काळांत न्यायदानाची पद्धति होती तीच मुसलमान राज्यकर्त्यांनीं थोड्या फरकानें स्वीकारली होती. शिवकालांतहि स्वाभाविकरीत्या तीच पद्धति चालू होती. त्या पद्धतीप्रमाणें ग्रामपंचायत हें न्यायदानाचें सर्वांत खालचें केंद्र होय. गांवांत कोणताहि वाद उत्पन्न झाला असतां त्याचा निवाडा करण्यास पक्षकार ग्रामपंचायतीकडे येत. या पंचायती म्हणजे गांवचें गोत. वादींनीं आपला दावा गोतास निवेदन करावा. गोत याचा अर्थ गांवांतील निरनिराळ्या जातींचा व निरनिराळे धंदे करणारांचा समूह. त्यांत गांवचा पाटील, कुलकर्णी, बारा बलुते, शेटे व महाजन यांचा समावेश होत असे.

साधारणपणें गोतसभा वा पंचायती गांवांतील देवालयांत भरत, क्वचित्प्रसंगीं नदीतीरीं वा दोन नद्यांच्या संगमावरहि भरत. गोतापुढें एकादा पक्षकार हजर न झाल्यास त्याला तलब करून आणण्यांत येई व दाव्याचा निर्णय अमूक एका रीतीनें करून घेण्याचें कबूल केल्यावर त्याजकडून जामीन घेऊन त्यास मुक्त करण्यांत येई. सर्व जातींच्या लोकांचा व्यवहारनिर्णय करण्याचा अधिकार गोतास असे.

गोताहून वरिष्ठ न्यायसंस्था देशक. देशकांनीं दिलेल्या निवाड्यास परगण्याचा अथवा देशकाचा महजर असें म्हणत. देशकांत परगण्याचा हवालदार, कारकून, सरनोबत, सबनीस, हेजीब, चिटणीस, कारखाननीस, नाईकवाडी, शेटे, महाजन व बलुते इतक्यांचा समावेश होत असे. गोताचा निवाडा वादी वा प्रतिवादी यांस मान्य न झाल्यास ते देशकाकडे आपला दावा घेऊन जात किंवा आपलें गांव सोडून दूरच्या गांवच्या गोताकडून आपला दावा चालावा अशीहि मागणी त्यांस करतां येई.

गोत व देशक यांनीं दिलेला निकालहि मान्य न करणारे कोणी असल्यास त्यांना त्या दोघांवरची न्यायाधीश ही संस्था होती. न्यायाधीश म्हणजे राजानें नेमलेला व राजमुद्रा दिलेला अधिकारी. त्याहि वरची न्यायसंस्था म्हणजे खुद्द राजा.

राजसत्तेच्या अनेक कार्यांपैकीं व्यवहारनिर्णय हें फार महत्त्वाचें कार्य होय. हें कार्य करण्याचा प्रसंग ग्रामस्थांना नेहमीं येत असल्यामुळें गांवांतील लोकांत सत्यनिष्ठा, सहकार्य, एकमेकांच्या वर्तनावर दाब ठेवण्याची संवय इत्यादि नैतिक गुणांचा परिपोष होऊन काल व द्रव्य यांचा अपव्ययहि थांबत असे.

व्यवहार निर्णयांतील वापरावयाची परिभाषाहि ठरलेली होती. तिजमधील संज्ञा अग्रवादी, पश्चिमवादी, व्यवहार, व्यवहारप्रवीण, सभा, धर्म, धर्माधिकारी, दिव्य इत्यादि असत. व्यवहारनिर्णय करतांना पुढील पद्धतीचा अवलंब करण्यांत येई. पहिली गोष्ट म्हणजे अग्रवादी व पश्चिमवादी या दोघांकडून गोताकडे वा देशकाकडे व्यवहारनिर्णयाचें काम सोपविण्यास राजी असल्याबद्दल लेख लिहून घेणें व निवाडा झाल्यावर त्या बरहुकूम बागण्याबद्दल जामीन घेणें.

जामीनदारानें लिहून दिलेल्या लेखास जामीन कदबा म्हणत. वाद्यांपैकीं एखादा वादी पंचांसमोर वाद करण्यास उभा न राहिल्यास क्वचित् प्रसंगीं त्याचा पक्ष राजानें पंचांपुढें मांडून वादाचा निकाल करून घेण्यांत येई. उभयतां अग्रवादी व पश्चिमवादी यांजकडून राजिनामे व जामीन कदबे लिहून घेतल्यानंतर वादाविषयीं परस्परांची हकीकत काय आहे ती लिहून घेऊन तिजवर उभयतांच्या सह्या घेण्यांत येत. या लेखी हकीकतीस

तकरीर म्हणत. एखादे वेळीं वाद सांगणें बरोबर न वाटून उभयतां वादींची आपसांत समजूत झाली तर त्याबद्दलचा जो लेख व्हावयाचा त्याला सवादपत्र म्हणत. गोताकडे व्यवहार-निर्णयाकरितां गेल्यानंतर गोताच्या मध्यस्थीनें उभयतां पक्षकारामध्यें आपसांत समजूत झाल्यास त्याप्रमाणें गोत निवाडा देत असे. असल्या निवाड्यास राजिनामापत्र म्हणत.

अग्रवादी व पश्चिमवादी यांच्या तक्रारी लिहून घेतल्यानंतर कागदपत्रांचा व तोंडी पुरावा घेण्यांत येई. एखाद्या व्यवहाराचा निवाडा खुद्द राजा वा राजातर्फे न्यायाधीश करीत असल्यास वादग्रस्त मुद्द्यांसंबंधीं साक्षीदारांच्या जबान्या घेण्याचें काम महालाच्या अधिकाऱ्याकडे सोंपविण्यांत येत असे. राजाच्या आज्ञापत्रांत नमूद केल्याप्रमाणें साक्षीदारांनीं सांगितलेला मजकूर लिहून घेऊन त्या लेखी जबान्या राजाकडे वा त्यानें नेमलेल्या अधिकाऱ्याकडे महालाचा अधिकारी रवाना करी. या लेखी जबान्यांस बखेर म्हणत. क्वचित्प्रसंगीं वादग्रस्त प्रश्नांबद्दल साक्षीदारानें सांगितलेली माहिती लिहून घेऊन तीवर साक्षीदारांच्या सह्या व मुद्रा घेण्यांत येत. या प्रकारच्या कागदास साक्षपत्र असें म्हणत.

साक्षीदारांच्या साक्षी घेण्यापूर्वी त्यांजकडून घ्यावयाच्या शपथाहि विशिष्ट पद्धतीनें घेण्यांत येत. कित्येक वेळां साक्षीदारांना नदींत प्रथम घालून मग सत्य असेल तें सांगा असें सांगण्याचा प्रघात होता. वाराणशीस गोहत्या केल्याचें पातक व ब्रह्महत्येचें पातक लागेल अशीहि त्यांजकडून शपथ घेत. तसेंच श्रीच्या देवालयांत नेऊनहि शपथ घेत.

एखाद्या दाव्यांत तोंडी वा लेखी पुरावा नसल्यास अथवा तोंडी पुराव्यावरून गोताची खात्री होत नसल्यास दिव्य करावयास सांगत. लेखी व तोंडी पुराव्याचा विचार करून गोत, देशक, न्यायाधिकारी वा खुद्द राजा जो निवाडा करी त्यास थळपत्र, गोतपत्र, गोत महजर, देशक महजर, निवाडापत्र, निर्णयपत्र या संज्ञा असत.

वाद्यांपैकीं ज्याचा वादांत जय होई त्यास गोत वा देशक जयपत्र लिहून देत व ज्याचा पराभव झाला त्यास यजित पत्र मिळे. जय पावलेल्या वाद्याकडून घ्यावयाच्या रकमेस शेरणी व पराभव पावलेल्याकडून घ्यावयाच्या रकमेस हरकी वा गुन्हेगारी म्हणत.

गोतापुढें व्यवहारनिर्णयाचें काम चालू असतां वादग्रस्त विषयांसंबंधीं उभयतां वागण्यास तयार असल्याची उभय पक्षकारांनीं कबुली दिल्यास त्याप्रमाणें क्रिया करून त्याबद्दलची माहिती वा दाखला मागावयाचा, त्यास सडीपत्र म्हणत.

पाटीलकी, देशमुखी, देशपांडेपण, कुळकर्णीपण, जोसकी यांसारख्या वृत्तींचे सर्व वा कांहीं भाग तिऱ्हाईत इसमास विकल्यास त्याबद्दल क्रयपत्र वा खरेदीखत करण्याचा प्रघात होता. परंतु असल्या स्वरूपाचे व्यवहार महत्त्वाचे असल्याकारणानें खरेदीखतांतच गोताचा, देशकाचा, ठाणा व राजमुद्रा यांचा महजर करून देण्याची शर्त असे (भा. इ. सं. मंडळ द्वितीय संमेलनवृत्त शके १८३६).

कार्यपद्धतीविषयीं इतकें विवेचन केल्यानंतर खुद्द व्यवहारनिर्णयाचीं कांहीं उदाहरणें देणें इष्ट असल्यामुळें तीं येथें देत आहें.

## न्यायनिवाडा

मौजे घाटण तपे करकंब व मौजे भोसर तपे उंदरगांव या दोन गांवांत शिवेचा तंटा होता. त्याचा निवाडा शके १५३० कीलकनाम संवत्सरे कार्तिक वद्य ११ ते दिवशीं दिव्य घेऊन लावण्यांत आला. त्या वेळीं मुनसिबदार, एको पंडित, नागो पंडित, राजीब तपे उंदरगांव व दाउदखान शाई मौजे भोसर हे हजर होते. गोतांत जे लोक होते त्यांत उभय पक्षांतर्फे प्रत्येकी आठ गांवांचे आठ पाटील हजर होते. त्याशिवाय देशमुखहि आले होते. या निवाड्याच्या वेळीं हुजुरून मिया अजम यांस पाठविण्यांत आलें होतें.

घाटण व भोसर येथील महार सभेस आले. भोसरच्या महाराचें नांव कान्ह्या बिन खेळो व घाटण्याचा महार यादु बिन उका, यांनीं दिव्य करावयाचें ठरून त्यांच्या हातांचीं नखें काढण्यांत आलीं. हात साबणानें धुतले; हातावरचे डाग व निशाणें कागदावर लिहून ठेवलीं. हातांस पिशव्या घातल्यावर मोकदमांचें कतबे लिहिले. दिवस ठरला व त्याला दोन्ही तप्यांचे देशमुख व मोकदम (पाटील) राजी झाले. दोघां महारांच्या हातांस पिंपळाचीं पानें बांधलीं, त्यावर दहींभात घातला व लोणी लावलें.

त्यांच्या हातांवर तापविलेली ऐरण ठेवली. ती हातांवरून काढून कडब्यावर टाकली तेव्हां कडबा पेटला. यावरून ऐरण चांगली तापली होती असें सिद्ध झाल्यामुळें दोघांच्या हातांस पिशव्या घातल्या. पुढें तीन दिवसांनीं पिशव्या काढल्या. तेव्हां भोसरचा महार कान्ह्या बिन खेळो याच्या उजव्या हाताचीं बोटें भाजलेलीं दिसलीं. पण धाटणीचा महार यादु बिन उका याचे हात चखोट निघाले. तो दिव्यीं उतरला. तो हद्दीवरून चालला. त्याच्या चालण्यानें जी हद्द ठरली ती धाटण व भोसर या गांवांची सरहद्द ठरली ( सनदापत्रांतील माहिती, पृ. १०–१३ ).

## नाशिकचे धर्माधिकारी

शके १५६८

नाशिक येथील धर्माधिकारी दत्तदेव व सोनप्रभु व महादप्रभु व हरदेव असे होते. त्यांचा आश्रित शिवभट क्षेमकल्याणी हा होता. नाशिकमध्यें जाखोजी सोनाराच्या घरीं लग्न होतें. लग्न चांदवडचे सोनार व नाशिकचे सोनार यांच्या दरम्यान होतें. त्या वेळीं लग्न लावण्याचा हक्क वरील धर्माधिकाऱ्यांचा असतां तो बाजूस ठेवून शिवभट लग्न लावण्यास पुढें झाला. त्याला वरील धर्माधिकाऱ्यांनीं हरकत घेतली. त्यांचें म्हणणें असें कीं, आम्ही नाशिकचे धर्माधिकारी आहों व गांवामध्यें मुळेपणाचा हक्क आमचा आहे. त्यांच्या हरकतीमुळें उभय पक्षांत मारामारी झाली. तींत सोनप्रभूच्या अंगाचें रक्त निघालें. म्हणून महादप्रभु व शिवभट यांस प्याद्यांनीं धरून चावडीवर नेलें व दिवाणानें त्या दोघांस अदबखान्यांत ( तुरुंग ) ८।१० दिवस ठेवलें. मग हा तंटा हकीमशरा व अमीन व करोडी ( जकात-अधिकारी ) व देशमुख व देशपांडे यांजपुढें चालून त्यांनीं निवाडा केला. त्यांत असें ठरलें कीं, देवकापासून साडेपर्यंतचा हक्क धर्माधिकारणी याचा आहे. तसेंच गणेशपूजन व कळसपूजन व पाणिग्रहण व देवकाची दक्षिणा व सप्तपदी व अंतरधान व नवग्रह व सेवतीची पूजा व फल व प्रदान, तेलसाडी व साडे व झालेची पूजा देवक उठे तोंवरी हिंदूचे घरचा हक्क तो धर्माधिकारणीचा हक्क होता तो हकिमानें त्यांस देवविला. सदरहू हक्कांपैकीं खोबऱ्याच्या दोन वाट्या, त्यांतील एक वाटी पाटलाची व एक मुळे याची. आश्रितपणाचा म्हणून शिवभटास कांहीं हक्क नाहीं. याप्रमाणें जो न वागेल

ते दिवाणीचा गुन्हेगार असे ( ही फिर्याद ज्येष्ठ वद्य ५ रविवार शके १५६८ रोजीं हकीमशरा व कारकून कसबे नाशिक यांजकडे गुदरण्यांत आली होती ) ( शिवचरित्र साहित्यखंड २, पृ. २९५ ).

रा. शिवाजीराजे – कृष्णाजी भास्कर देशाधिकारी बारा मावळ यांस मौजे कलबोली तर्फ पवनमावळ व मौजे रावळ तर्फ पौडखोरें या हरदो गांवांचा शिवेचा कथला लागला म्हणोन आज्ञापत्रावरून तुम्ही मौजे मजकुरास जाऊन कथला मनास आणिला. त्यासीं अरजोजी ढमाला हा म्हणों लागला कीं आपण दिव्य करूं. त्यावरून सर्व देशक मिळवून तह दिल्हा. इतक्यांत दुसऱ्या दिवशीं आरजोजी डमाला हा ( गैरहजर ) जाला. सबब नरहरि दिवाकर देशकुलकर्णी पवनमावळ व हावजी पाटील मौजे कलबोली तर्फ मजकूर याणीं हुजूर पुरंदरचे मुक्कामीं येऊन विदित केलें. त्यावर साहेब करणाटक प्रांतीं मसलतीस गेले. त्या प्रांतींहून आलियावर जो निवाडा करणें तो करतील. तोंपर्यंत हरदो गांवांमध्यें टकियाचे कासेची जमीन आहे ते अनामत असों देणें. मोर्तबखुद ( प. सा. सं. खंड.१, पृ. १६६ ) ( शके१५८० आश्विन शु. १५, इ. स. १६५८ आक्टोबर १ ).

### निवाडापत्र सुपें खुर्द

शके १५८० आश्विन वद्य २
इ. स. १६५८ आक्टोबर ३

रामाजी हवालदार महालानिहाय व पदो नारायण सभासद नामजाद किल्ले कोंडाणा

अग्रवादी – लुमाजी बोतरे मोकदम मौजे पारगांव माळा तर्फ पाटस प्रांत पुणें. राजेसाहेब यांपाशीं सांगितलें जें, कोंडाजी ताकवणे यानें आपले सहा खून केले; मोकदमीसी करकर करितात; गांवाला रहावत नाहीं. त्यावरून महाराज राजेश्री राजे यांनीं देशमुख, देशपांडे व हवालदार गोत वगैरेस निवाडा करण्यास सांगितलें. करीणा मनांत आणितां लुमाजीचे कोंडाजीनें सहा खून केले व लुमाजीनें कोंडाजीचे दोन खून केले. कोंडाजीनें पदर पसरला म्हणून लुमाजीनें खून माफ केले. निवाडा केला कीं कोंडाजीने आपली निमे पाटिलकी लुमाजीस द्यावी व लुमाजी वडील असल्यानें वडीलपणा त्यानें करावा ( प. सा. सं. खंड १, पृ. १६७ ).

### महजर

शके १५७६ वैशाख वद्य १०
इ. स. १६५४ मे १

तिमाजी नामाजी कुलकर्णी लोणी यानें ४५ होन देऊन मौजे लोणीचें कुलकर्ण विकत घेतलें. २५ वर्षें खाल्लें. दरम्यान नरसो खळदेव हा शहाजी राजे यांच्या कारकीर्दीपासून बळेंच कुलकर्ण खातो. त्यावर गोत नायकी जमून व साहेबीं मुनसफी केली जे खरेदीदारास व नरसो खळदेवास संबंध नाहीं. मौजे लोणीचें कुलकर्ण तिमाजी नामाजीचे दुमाला करणें ( प. सा. सं. खंड ३, पृ. ७० ).

वरील प्रकरणांत नरसो खळदेव याची वहिवाट बऱ्याच वर्षांची दिसते. तथापि गांवच्या लोकांना वतन तिमाजी नामाजीचें असतां त्यांस बाजूस सारून नरसो खळदेव हा जबरदस्तीनें तें खातो हें माहीत असल्यामुळें पंचायतीनें निकाल नरसोच्या वहिवाटीच्या हक्काकडे लक्ष न देतां तिमाजीच्या वतीनें दिला.

### महजर

शके १५७६
इ. स. १६५४-५५

मौजे रहाटवडे तर्फ खेडेवारे येथील मोकदमीच्या तर्फा दोन. एक चिटोजीची व दुसरी कान्होजीची. कान्होजी तर्फेची लावणी होईना. अशा रीतीनें जमीन पड राहून वा अन्य रीतीनें सरकाराचें नुकसान होऊं लागल्यावर दादाजीपंत ( दादाजी कोंडदेव ) यांनीं ती तर्फ दिवाणांत घातली. तेव्हां चिटोजी परागंदा झाला. पुढें बापूजी मुद्गल देशकुलकर्णी ( देशपांडे ) यांनीं कौल देववून चिटोजीस गांवीं आणिला व चिटोजीनें कान्होजी दुसरा तरफदार यांचें कर्ज वारलें. त्याजबद्दल कान्होजीच्या दोन तक्षिमांपैकीं एक तक्षिम कान्होजीनें चिटोजीस दिली. अशा रीतीनें चिटोजीनें एकूण तीन तक्षिमा खाव्या व एक तक्षिम कान्होजीनें खावी. वडीलपणाचा मान चिटोजीकडे असावा. हा न्याय गोतानें दिला. तो मोडील तो दिवाणाचा गुन्हेगार व गोताचा खोटा ठरेल ( प. सा. सं. खंड ३, पृ. ७२ ).

शके १५७९ मार्गशीर्ष वद्य १३
इ. स. १६५७ डिसेंबर २३

आलोजी बिन जसोजीराव मुसलमान कांदाटकर व तानाजी बिन चंद्रोजी कांदाटकर व धारोजीराव कांदाटकर यांजमध्ये मौजे सालासीचे पटेलगी बाबे गरगसा असून तो ते बाळाजी, दौलतराव व येसाजी सुरराव चंद्रराव या तीन कारकीर्दीत भांडत होते. यावर शिवाजीराजे साहेबास जावली अर्जी झाली. मग बामणोली येथे रव्याबद्दल (दिव्य) सदर (सभा) जाली. आलोजीराव जसोजीराव हा दिव्यीं उतरला. टाळी पिटली. तानाजीराव यानें सालासी हारविली. लेंकरालेकरी तुटलीं (प. सा. सं. खंड ३, पृ. ७९).

हा निवाडा दिव्य करून झाला हें उघड आहे. वाद पाटीलकीचा होता. वादी आलोजी हा मुसलमान व प्रतिवादी हिंदु होते. अर्थात् प्रथम सर्वच हिंदु असून आलोजी मागाहून मुसलमान झाला. ते सर्वच भाऊबंद असून आलोजी आपल्या हयातींत बाटला होता. त्याच्या नांवांत बाटल्यावरहि बदल झाला नाहीं हा विशेष होय. हिंदु पद्धतीप्रमाणें तो दिव्यास तयार राहिला; यावरून संस्कृतीनें तो हिंदूच होता. पण तो मुसलमान होता म्हणून त्यास पक्षपातानें न वागवितां शिवाजीनें योग्य न्याय दिला.

## राजाज्ञा

शके १५९८ चैत्र शु. ५
इ. स. १६७६ मार्च ९

सईबाई कोम बाबाजी नारायण व गोपाळ राम लाळे जोशी कुलकर्णी मौजे केंजळ किकवी पाडे सावरदर राजापूर तर्फ निरथडी परगणे पुणें यांस ‘कानभट बिन विश्वनाथभट तुमचा हाडभाऊ कजिया करीत होता तरी देशमुख-देशपांडे बैसोन पाटील, चौगुले व बलुते आणून शफतपूर्वक पुसतां कानभटाचा वृत्तीशीं संबंध नाहीं. वृत्तीमुळें कजिया जाला होता. ते समयीं मागें यानें पाठी राखून कजियास आला आहे. याजमुळें यासी काय येणें ते सुखरूप दिल्हे पाहिजे. येरव्ही यासी वृत्तीशीं संबंध नाहीं. त्यावरून त्यास नारोपंत लाळे यांनीं नीलकंठराऊ बोकील व चांदवडकराचे उपाध्येपणाची तकसीम करार करून देऊन भटमजकुराचें येजितखत लेहून घेऊन तुम्हांस

दिल्हे आहेत. तरी पत्राप्रमाणें वर्तावयासी हें पत्र दिल्हे असे. आपली वंश-परंपरावृत्ति अनुभवून सुखरूप असणें ( प. सा. सं. खंड ३, पृ. १२२ ).

कानभटाची जरी वृत्ति नव्हती तरी त्यानें सईबाई व गोपाळ लाळे यांच्या वृत्तीचें रक्षण केलें होतें. ती त्याची सेवा लक्षांत आणून त्यास चांद-वडकराचें उपाध्येपण देऊन खूष करण्यांत आलें व जोशीवृत्ति सईबाई व गोपाल लाळे यांची कायम करण्यांत आली.

शके १६०० पौष वद्य ८

इ. स. १६७८ डिसेंबर २६

श्रीराजा शिवछत्रपति – नारोबा मुतालिक देशमुख परगणे पुणें यांस,

"रायाजी पाटील मौजे हडपसर याचा व सोनाजी तुपे याचा वेव्हार तूं मनास आणून रायापासून गुन्हेगारी सवासे होनाची घेतली व गडावरी पैकियाबद्दल घातलें आहे. तरी मधल्यामध्येच मनसुफी करावयास तुजला गरज काय? रायाजीपासून पैके घेतले असतील ते परतोन देणें. गडावरून उतरून निरोप देवणें. स्वामी निवाडा करतील. खरा होईल तो पाटिलकी खाईल. तूं कांहीं इस्किल न करणें" ( प. सा. सं. खं. ३, पृ. १४१ ).

पुणें परगण्याच्या देशमुखाचा नारोबा हा मुखत्यार होता. त्याला एकट्याला दाव्याचा निकाल लावण्याचा अधिकार नव्हता; म्हणून शिवाजीनें त्यानें केलेला निवाडा रद्द ठरवून आपणाकडे दावा मागून घेतला.

शके १५९०।९१

अजरख्तखानें राजश्री राजेसाहेब दामदौलतहु ताहा बजानेब कार-कुनानी त॥ रोहिडखोरे मालूम बाद सु॥ तिसासितैन व अलफ सर्जेराव व शिवजी व चांदजी व नाइकजी व रायाजी व संभाजी बिन कान्होजी जेधे देशमुख त॥ मजकूर या भावाभावामधे वाटियाचा गर्गशा लागला होता याबद्दल शिवजी जेधे हुजूर येऊन मालूम केले, त्यावरून सर्जेरायासीहि आणिले व वरकडहि सदरहू भाऊ येथे आले. हकीकत मनास आणिता निवाडा होत नाहीं. यांचे बाप कान्होजी जेधे यांणी देशमुखीच्या तकसिमा वांटून कागद करून यास दिला असे. तेणेप्रमाणें तुम्ही यास वर्तवणें ( शिवचरित्र, साहित्यखंड ५ ).

## प्रकरण सतरावें

# व्यापार व उद्योगधंदे

फार प्राचीन काळापासून भारतीय समाज जातिनिबद्ध आहे. प्रत्येक जातीला तिचा व्यवसाय नेमून दिलेला होता. त्या जातीनें इतरांचा धंदा करूं नये व इतर जातींनीं त्या जातीचा धंदा करूं नये. या कारणानें प्रत्येक व्यक्तीच्या धंद्याला संरक्षण मिळे व तिला चरितार्थाची चिंता कधींहि वाटूं नये. प्रत्येक जात आपल्या धंद्यास चिटकून राहिल्यामुळें प्रत्येक धंदा अव्याहत चालत राहून समाजाचीं सर्व अंगें आपलीं कार्यें करीत असत व कोणताहि धंदा बंद न पडतां त्याची प्रगति धिमेपणानें होतच असे. या व्यवस्थेंत प्रत्येक गांव स्वयंपूर्ण व बहुतेक सर्व जीवनपयोगी वस्तु निर्माण करणारें असे; मग तें गांव कोंकणांत असो वा देशावर असो, भारताच्या दक्षिणेंत असो वा उत्तरेंत असो.

व्यवसायपरत्वें जातींच्या श्रेणी असत. शातवाहनकालीं महाराष्ट्रांत कोष्टी, तेली, सोनार, तांबट, बुरूड, गवंडी इत्यादिकांच्या श्रेणी होत्या. श्रेणी म्हणजे सहकारी मंडळ्या. प्रत्येक व्यक्तीपाशीं भांडवल थोडें असल्यामुळें तिला स्वतःचा धंदा चालविण्यास लागणारा कच्चा माल श्रेणीच्या सामायिक भांडवलानें व प्रयत्नानें आणणें शक्य होई. कोष्ट्यास आवश्यक असें सूत व रेशीम आणि धनगरास लोकर याच साधनानें प्राप्त व्हावी.

देशांतील कलाकौशल्यास याच साधनानें साहाय्य मिळून त्याची एकसारखी व सावकाश प्रगति होत असे. प्रगतीचें पाऊल वेगानें पुढें पडत नसे; तशी कोणत्याहि कलेस पिछेहाट माहीत नसे. या पद्धतशीर व्यवस्थेनें भारतांतील उद्योगधंदे वाढले व त्यांच्या बळावर त्याला जगांतील संपत्ति आपणाकडे ओढून घेतां आली. कच्चा व पक्का माल याच देशांत पैदा होत असल्यामुळें या देशास त्या बाबतींत कोणत्याहि देशाच्या तोंडाकडे पहावें लागूं नये. हिंदुस्थानांत एक वेळ सोन्याचा धूर निघत होता असें म्हणतात त्याचें कारण हें होय.

याचा अर्थ परदेशांतला कोणताहि माल भारतांत येत नव्हता असा नाहीं. तो आला तरी त्याचें प्रमाण अल्प व पूरक स्वरूपाचें होतें. उदाहरणार्थ कापूस, रेशीम व लोकर यांचीं वस्त्रें पांड्य, कलिंग, वंग, सिंहलद्वीप, तोंडी देश, महाचीन येथें तयार होत. ज्या गांवीं हीं वस्त्रें तयार होत त्यांत पोहालपूर, चिरभल्ली, अनिलवाडा ( राजपुताना ), अवन्ती, तंजावराजवळील नेगापट्टण, गुंजणस्थान ( मोगलाईतील गुंजोटी ) व रामदुर्ग संस्थानांतील सुरापूर यांची गणना होते. राजे लोक वसंतऋतूंत कार्पास व रेशमी वस्त्रें धारण करीत; पावसाळ्यांत लोंकरीच्या बारीक सुताचीं, पण दाट विणकरीचीं तांबडीं व मांजिष्ठ वस्त्रें परिधान करीत. पैठण्या, शाली, पीतांबर, पातळें व लुगडीं स्त्रिया नेशीत आणि पुरुष कद, पीतांबर, शेले व शाली घेत.

## कारागिरांचें स्वातंत्र्य

मुसलमानांनीं हा देश जिंकीपर्यंत ही प्रगति हजारों वर्षें सारखी होत गेली. तेव्हां प्रत्येक धंद्यांतला मनुष्य स्वतंत्र व संतुष्ट होता. राज्यक्रान्त्या होत. पण त्या झाल्या तरी एक हिंदु राजघराणें जाऊन त्याच्या जागीं दुसरें हिंदु राजघराणें यावें. जनतेच्या दैनंदिन आयुष्यक्रमाला त्यापासून व्यत्यय येऊं नये. कारण कोणाचेंहि राज्य झालें तरी तें धर्म व संस्कृति या बाबतींत पहिल्याहून वेगळें नसे. पण मुसलमानांचें आक्रमण झाल्यावर ही स्थिति पालटली. जाति-संस्था खिळखिळी झाली. तिचें रक्षण राजाकडून होईना. परधर्मीय व आडदांड राजे प्रजेच्या हितापेक्षां आपल्या विलासांत व चैनींत दंग झाले. ते आपल्यापुरतें पाहूं लागले. कारागिरांचें स्वातंत्र्य

गेलें. जनता अमीर-उमरावांकडून व राजेरजवाड्यांकडून पिळून निघाल्यामुळें तिला गरिबी आली. या योगानें कलाकौशल्याचे जिन्नस विकत घेण्याची ऐपत सामान्य जनांत राहिली नाहीं. राज्यकर्त्यांस जे जिन्नस लागत ते त्यांजपासून सक्तीनें बनवून घेत व त्यांस मोबदला पोटापुरता देत. त्याचा परिणाम असा झाला कीं, कारागिरांची संख्या घटत चालली, त्यांना उमेद वाटेनाशी झाली व त्यांचें कौशल्य ऱ्हास पावूं लागलें.

सतराव्या शतकांत फ्रेंच विद्वान् वैद्य ( डॉक्टर ) बर्नियर भारतांत आला, त्या वेळीं भारताची स्थिति अवनत झाली होती. तथापि पूर्व वैभवाच्या कांहीं खुणा कोठें कोठें दृष्टीस पडत होत्याच. बंगाल्यांत रेशमी व कार्पास वस्त्रें पैदा होत. गालिचे, भरजरी वस्त्रें व नकस कामें येथें तयार होऊन परदेशीं जात. तीं आशियासच काय, पण युरोपासहि पुरविलीं जात. तो म्हणतो, 'हरतऱ्हेचें कार्पासवस्त्र, तलम, पांढरें, जाडें व रंगीत पाहून मी थक्क झालों. कासीमबाजारांत डचांनीं चालविलेल्या कारखान्यांत ७।८ हजार बंगाली विणकर आहेत. येथें लाख, अफू, मेण, मिरीं व औषधी-पदार्थ पिकतात.' रोमन प्रवासी पीटर लिहितो, "सुरतेस कापड फार चांगलें व स्वस्त मिळतें. हिंदु स्त्रिया तांबडीं लुगडीं नेसतात; व हस्तिदंती कांकणें घालतात. भडोच बंदरांतून नुसत्या आशियांतच नव्हे तर युरोपांतहि कापड जातें."

बंगाल, गुजराथ यांप्रमाणेंच कुतुबशहाच्या ताब्यांतील तैलंगणांतहि कलाकौशल्य जिवंत होतें व खनिज पदार्थांची समृद्धि होती. हैदराबादेजवळच्या खाणींतून हिरे व सोनें निघे. निर्मळ व इंदूरबोधन येथें लोखंडाच्या खाणी होत्या. त्यांजपासून निर्मिलेलें पोलाद दमास्कसला पाणी देण्यास पाठविण्यांत येई. मच्छलीपट्टणचे विणकर तलम कापड विणीत. तेथील छीट आशियाभर प्रसिद्ध होतें. मच्छलीपट्टणच्या कोष्टयांना बऱ्हाणपूर व दिल्ली येथें नेऊन मोगल बादशहा त्यांजकडून आपल्या कारखान्यांत हवें तसें कापड विणून घेत. मच्छलीपट्टणाहून ब्रह्मदेश, सयाम, बंगाल, कोचीन, चीन, मनिल्ला, मक्का, मादागास्कर इकडे व्यापारी जहाजें जात-येत. गोवळकोंड्याचा प्रसिद्ध वजीर मीर जुमला यानें परदेशांशीं केवळ हिऱ्यांचा व्यापार करून पुष्कळ संपत्ति मिळविली. त्यानें हिंदु देवळांतील तांब्याच्या मूर्ति अटवून त्यांच्या तोफा ओतल्या. वेलोर येथील कसबी मुसलमान गालिचे विणीत;

दिल्लीच्या किल्ल्यांत बादशहानें विविध वस्तूंचे कारखाने ठेवले होते, त्यांत नकस काम, लाखेचें काम, रेशमी वस्त्रें होत व चांभार उंची प्रतीचे पायपोस बनवीत. बादशहाच्या अंतःपुरांत जरतार, साटीण, किनखाप, रेशमी वस्त्रें, कस्तुरी, मोती, अंबर यांचा फार मोठ्या प्रमाणांत खप होता.

## युरोपियन व्यापारी

पोर्तुगीज, इंग्रज, फ्रेंच व डच हे युरोपियन लोक हिंदुस्थानांत व्यापारावर गबर होण्याकरितांच आले होते. स्वधर्मप्रसार व मसाला ( व्यापार ) हें पोर्तुगीजांचें ब्रीद होतें. त्यांना येथील लोकांचें सुखदुःख काय ? येथील माल परदेशांत विकावा व परदेशचा माल येथें आणून विकून त्यावर पैसा कमवावा यावर त्यांचें लक्ष. त्यांजमार्फत वा मुसलमान व्यापाऱ्यांमार्फत हिंदुस्थानांत हबसाणांतून हस्तिदंत, गुलाम व शिंगें पुरविण्यांत येत. चीनमधून कस्तुरी व मातीचीं भांडीं आणि बेहेरीनहून मोत्यें येत. ते लोक मुसलमान राज्यकर्त्यांचें उदाहरण पाहून आपल्या पदरीं विणकर व रंगारी ठेवून त्यांजकडून कापड विणून व रंगवून घेत व तें परदेशी वा हिंदुस्थानांतील इतर बंदरांस रवाना करीत. या युरोपीय व्यापाऱ्यांशिवाय सुरत, राजापूर, गोवें इत्यादि प्रमुख बंदरांत आर्मीनियन, हबशी, तार्तार, ग्रीक, अरब प्रभृति व्यापारीहि आलेले असत. तेहि आयात-निर्यात व्यापार करीत. त्यांशिवाय मुसलमान सरदार, एतद्देशीय खाजगी लोक व शिवाजीराजेहि आपलीं जहाजें ठेवून त्यांजमधून मालाची नेआण स्वदेशाशीं व परदेशाशींहि करीत.

वरील विवेचनांत गुजराथ, बंगाल, तैलंगण या प्रांतांचीं नांवें कलाकौशल्यांत प्रसिद्ध म्हणून आलीं आहेत, पण महाराष्ट्राचें नांव त्यांत कोठें दिसत नाहीं म्हटलें तरी चालेल. अशा स्थितींत महाराष्ट्राचें स्थान समजून घेण्याकरितां महाराष्ट्राच्या आयात निर्गत व्यापाराचाच आपणांस प्रथम विचार करावा लागेल. आपल्या देशांत लोहमार्ग झाल्यापासून मालाच्या वाहतुकीची जागाच बदलली. मुंबई बंदर हें अखिल भारतांत व्यापार व उद्योगधंदे यांचें आद्य व प्रचंड केंद्र बनलें व तेथून महाराष्ट्रांतील व्यापाराची लोहमार्गानें वाहतूक सुरू झाली. या मार्गावर जीं गांवें होतीं तीं कांहींशीं भरभराटीस आलीं व जुन्या व्यापारी वाटा मोडून गेल्या. लोहमार्गाचें काम शांततेनें व एकतंत्रानें बिनबोभाट चालत असल्यामुळें त्याजमार्फत किती

व कोणत्या मालाची वाहतूक होते याची कल्पना सामान्य मनुष्यास यावयाची नाहीं. लोहमार्ग सुरू झाल्यापासून कोंकणांतील बंदरांची भरभराट संपली व तीं बंदरें व्यापारदृष्ट्या बऱ्याच अंशीं निकामी ठरलीं. पण त्यांचें यथातथ्य स्वरूप कळण्यास आपणांस इतिहासकालांतच शिरलें पाहिजे.

कोकणांत अद्यापिहि कारवार, गोवें, वेंगुर्लें, मालवण, राजापूर, जैतापूर, रायपाटण, खारेंपाटण, सातवळी, आचरें, रत्नागिरी, चिपळूण, हर्णई, दाभोळ, महाड, दंडाराजपुरी, नागांव, नागोठणें, चेऊल, पेण, पनवेल, अष्टमी, करंजा, मुंबई, कल्याण, भिवंडी, वसई, ठाणें इत्यादि किती तरी लहान मोठीं बंदरें आहेत. त्यांची संख्या अजमासें शंभरांहून अधिक भरेल. इंग्रजी राज्यापूर्वी हीं सर्व बंदरें कमीअधिक प्रमाणांत भरभराटींत होतीं. हीं शंभर बंदरें म्हणजे कोंकणांत माल घेऊन येणाऱ्या व जाणाऱ्या शंभर वाटा होत. हीं महाराष्ट्राचीं शंभर तोंडें असून त्यांजमार्फत महाराष्ट्रांत संपत्ति येत होती व महाराष्ट्राबाहेर जात होती. किंबहुना महाराष्ट्रांतील त्या रक्तवाहिन्या होत्या म्हटलें तरी चालेल.

शंभर बंदरें हीं शंभर नगरेंच गणण्यास कांहीं हरकत नाहीं. देशोदेशींचा माल व प्रवासी तेथें उतरत, त्यांचा फायदा घेणारीं व त्यांच्या गरजा पुरविणारीं कितीतरी कुटुंबें त्यांत जमा होत. सावकार, सराफ, हुंडीवाले, मोठे व्यापारी, किरकोळ व्यापारी, अडत्ये, तांबोळी, विणकर, खाणावळवाले, तेली, वैद्य, हकीम, जकात वसूल करणारे अंमलदार, कारखानदार, खलाशी, तारवें बांधणारे व तीं दुरुस्त करणारे, मद्यमांसमच्छर यांचे विक्रेते इत्यादि कित्येक व्यावसायिक तेथें राहून निर्वाह करीत. बहुतेक बंदरें खाड्यांवर असून या खाड्या समुद्रापासून घाटापर्यंत गेल्या असल्यामुळें व्यापारी गांवांची सांखळी समुद्रापासून घाटापर्यंत तीस-पसतीस मैल पसरलेली असे.

## परमानंदाचें निरीक्षण

कवीन्द्र परमानंद हा मार्मिक निरीक्षक व कोंकणपट्टीचा पुरा माहीतगार होता. शिवाजीनें राजापूर लुटलें त्या वेळीं त्यानें तेथून जो माल लांबविला त्याचा तपशील परमानंदानें दिला आहे, त्यांत पुढील जिनसांची

नोंद आहे. सोनें, रुपें, पितळ, शिसें, तांबें, लोखंड, कथील, काच, सुवर्ण-माक्षिक, मोतीं, पाच, हिरा, माणिक, पोवळीं, गेंड्याचें शिंग, चामर हस्तिदंत, कस्तुरी, केशर, चंदन, कापूर, कृष्णागरु, कंकोळ, रक्तचंदन, वेलदोडा, लवंगा, दालचिनी, चीनदारू ( दिवाळींत उडविण्याची ), वाळा, नागकेशर, जायफळ, भांग, अफू, तमालपत्र, चारोळी, अक्रोड, मनुका, खजूर, खर्बूर, मिरीं, सुपारी, देवदार, सुंठ, गांठी पिंपळमूळ, जटामांसी, हळद, सैंधव, पादेलोण, हिरडा, दशांग धूप, राळ, शिलाजीत, बेहडा, मोरचूद, निळा सुरमा, ओवा, हिंग, जिरें, लोध्र, गुग्गुळ, मंजिष्ठ, शेंदूर, पारा, हरताळ, गंधक, मनशीळ, लाख, रक्तयाबोळ, गोरोचन, अभ्रक, विषें, रेशीम, गवत, ताग, फळें, रंकुहरिणाची लोंकर, व इतर लोंकर, यांचीं वस्त्रें, व इतर पुष्कळ पदार्थ.

राजापूर हें सुरतेच्या खालोखाल कोंकणांतील बंदर असल्यामुळें ती एक मोठी पेठ होती. तेथील लोकसंख्याहि पंचवीस-तीस सहस्र सहज असावी. तेथील उंची व इतर माल, सोनें, रुपें व जडजवाहीर, विजापूर, गोवळकोंडें, येथपर्यंत म्हणजे दोन-तीनशें मैलांपर्यंत जात असावें. कोंकणाच्या डोंगराळ भागांत असंख्य वनस्पति आहेत. त्या गोळा करून राजापुरांत आणून विकण्याचा धंदा वन्य जातींचे शेंकडों लोक करीत असतील. तेथें गंधी औषधें बनवीत असतील व वैद्यहि मात्रा, गुटिका, भस्में, तयार करीत असतील. तांबट भांडीं घडवीत असतील. कांसार बांगड्या, सोनार अलंकार, रंगीत सामान करणारे गंजिफा, लाकडी चित्रें, खेळणीं, लगोऱ्या, सोंगट्या, बुद्धिबळें बनवीत असतील आणि कोष्टी वस्त्रें विणीत असतील. अशा रीतीनें प्रत्येक जातीस आप-आपला व्यवसाय करून निर्वाह करतां येत असेल. कलाकौशल्याच्या जिनसा यांतूनच तयार होत असतील.

हल्लीं कोंकण प्रांत दरिद्री समजला जातो. पण त्या काळांत त्याची सांपत्तिक स्थिति पुष्कळच चांगली असली पाहिजे व तीहि बंदरांच्या साहाय्यानें. नाहीं तर शिवाजीनें राजापुराहून परत जातांना वाटेंतील गांवांपासून खंडणी वसूल केली, ती त्यास वसूल कशी करतां आली असती ? त्यांपैकीं शेठवली, प्रौंदळ, हरचेरी, नेवरें, नाथवटें, कोतवडें, केळवली, कशेळी, पावस, धामणसें, बेलवडें, खारेंपाटण इत्यादि गांवें होत.

## चौल बंदराचा व्यापार

राजापुराचें परमानंदानें केलेलें वर्णन कोणास काव्यमय अतएव काल्पनिक वाटण्याचा संभव आहे. परंतु चौल येथील वर्णन तर कागद-पत्रांवर आधारलेलें असल्यानें सत्यकथा म्हणूनच समजलें पाहिजे. चौल हें अष्टागर प्रांतांत प्रमुख बंदर होतें. तो मामला म्हणजे सुभा असून तेथें सरकारी अधिकारी राहत असत. चौल – रेवदंड्याच्या खाडीवर एका टोंकाशीं कोर्लईचा किल्ला व त्याच्या शेजारीं रेवदंड्याचा कोट असून चौल बंदर थोडें आंत होतें. खाडीवर रामराज हें जुनें ठिकाण व आतां नष्ट झालेला भोनंगचा किल्ला असून ही खाडी रोहें व अष्टमी या गांवांपर्यंत पसरली आहे. उत्तर कोंकणांतील किनाऱ्यावर याशिवाय दुसरी महत्त्वाची खाडी दंडाराजपुरीची. राजपुरीच्या खाडीवर प्रवेशद्वारीं जंजिऱ्याचा प्रसिद्ध किल्ला असून आंत लगतच राजपुरी, दांडा, म्हशेळें हीं ठिकाणें आहेत व तिचा विस्तार गोरेगांवापर्यंत गेला आहे.

चौल हें बंदर त्याच खाडीवर किंचित् आंत समुद्राच्या लाटांपासून सुरक्षित व खोल होतें. त्या काळांत रेवदंडा हें स्वतंत्र नगर नसून चौल-च्याच तीन पाखाड्यांचें पोर्तुगीजांनी वसविलेलें नगर होतें. चौलच्या किनाऱ्यास बोटी लागण्यासाठीं धक्के बांधलेले होते. त्या बंदरांतून सतराव्या शतकांत पुढील जिनसांचा व्यापार चालत असे – पाटाव, चिनी ताफता, खारवा, मखमली-टोप्या, लाहोरी टोप्या, पीतांबर, सखलाद, कद, शेले, पटकें, धोतरें, लुगडीं सुती व रेशमी, गोधड्या, घोंगड्या, गोणपाट, नवार, रंगीत कापड, जायफळ, मायफळ, हिंगुळ, मणशील, हिंग, जायपत्री, शिलारस, लवंगा, चंदन, अफू, कापूर, पारा, काच, सुऱ्या, तलवारीचा बाईल (पातें ?), केशर, खारका, सूत, कंदील, पलंग, तबकें, खजूर, खोबरें, तंबाखू, अबीर, गुलाल, लाख, मोचेकरी यांचे पायपोस, लोखंड, साबण, फण्या, काकवी, कल्हें, बेगड, पारा, मिरीं, जिरें, शेंदूर, धाइटीची साल, तांदूळ, मेथी, उडीद, मसूर, वरणे, गहूं, मूग, वाटाणे, तुरी, हरभरे, फण्या, माडी, नारळ, गूळ इत्यादि.

वरील मालापैकीं कांहीं पक्का माल कोंकणांत होत असावा. खुद्द चौलास रेशमी वस्त्रें तयार होत. ज्यांवर रेशमाचे किडे असतात तीं

तुतीचीं झाडें तेथें होतीं. त्यांचा नाश पुढें पोर्तुगीजांनीं केला असें म्हणतात. भिवंडीस व ठाण्यासहि रेशमी वस्त्रें विणीत. कांहीं गांवांत साळी लोक लुगडीं विणीत. तो धंदा परवांपर्यंत जीव धरून होता. त्यास लागणारें सूत बंदरमार्गें येत असे. पितळ व तांबें यांचीं भांडीं मोठमोठ्या गांवीं घडविलीं जात. राजापूरचे पंचे व गडवे आजहि सर्वश्रुत आहेत. त्यांवरून कोकणांत पुरुषांचीं धोतरेंहि कोष्टी मागावर विणीत असतील असें अनुमान काढण्यास हरकत नाहीं. सारांश, नित्योपयोगी वस्तु कोंकणांतल्या कोंकणांतच बनविण्यांत येत.

कोंकणच्या बंदरांत माल उतरला म्हणजे तेथील राज्यकर्ते व्यापाऱ्यांपासून जकात वसूल करीत. तिचें उत्पन्न फार मोठें असे. त्यांतच निर्गत मालावरील जकातीच्या उत्पन्नाची भर पडे. माल पाहून त्याप्रमाणें त्याजवरील जकातीचे दर ठरविलेले असत. उदाहरणार्थ, एक शेर रेशमास रुके ८४, दर कदास लारी १॥।, रंगीत कापडाच्या गठलीस लारी ·॥·, काच दर ओझ्यास जकात रुके ८१०, जिरे दरमणीं जकात टके ·।·, धाइटीची साल दर ओझ्यास रुके ८१४, खाराका दरमणीं लारी ·।·, चंदन अष्टागरी दर शेरास रुके ८४, मलयागिरीस रुके ८३, पलंगास रुके ·॥·, कंदिलास रुके ८१०, भातास दर मुडीयास रुके ८९.

बंदरांत चढणाऱ्या व उतरणाऱ्या मालावरील ही जकात झाली. तिचें उत्पन्न पोर्तुगीज, निजामशाही अधिकारी वा ज्यांच्या सत्तेखालीं ज्या वेळीं हें बंदर असेल ती सत्ता त्या वेळीं तें वसूल करी. बंदरांत चढणाऱ्या व उतरणाऱ्या मालावर जशी जकात घेत तशी त्यापैकीं जो माल कोंकणांतून घाटावर जाई त्या मालावरहि घाटांत घेण्यांत येई. देशावर सत्ता कोंकणावरील सत्तेहून अन्य कोणाची असल्यास ते राज्यकर्ते ती वसूल करीत. बंदरांत मोठी पेठ असून तेथें हरतऱ्हेचा माल घाऊक भावानें देशावरचे व्यापारी खरेदी करीत व तो घोडीं, बैल, वा गाढव यांजवर लादून ते घेऊन जात. असे घोडीं व बैल यांचे तांडेच्या तांडे घाटाखालून देशावर येत व देशावरचा माल घेऊन घाटाखालीं नेत. घाटावरील नाक्यावर जकात वसूल करण्यास घाटपांडे नांवाचे अधिकारी नेमण्यांत येत. ते देशपांड्यांसारखेच वतनदार असत. त्यांच्या हाताखालीं डांगे व पंतकी असत. गोव्यापासून

बसईपर्यंत घाटांत शंभर ठिकाणीं नाकीं असलीं तर त्या ठिकाणीं वेगळाले घाटपांडे असत. कांहीं घाटपांडे पंचवीस तीस घाटांचाहि कारभार पाहत.

जुन्नराकडील वीस घाटांचें वतन पारनेरचा जोशी कुळकर्णी शिवाजी गोविंद यानें इ. १६३७ त मिळविलें होतें. त्याचा अधिकार मालसेज प्रभृति वीस घाटांवर होता. त्याच्या ताब्यांत ३६ चौक्या होत्या व त्याचा संबंध ३५ गांवांशीं येत होता. घाटपांड्यांचे सहकारी, मोढवे, पानसरे व पथकदार असे तीन अधिकारी असत. पानसरे यानें घाटांतील जकात वसूल करावी, मोढवे यानें घाट दुरुस्त करावा, व पथकदारानें आपल्या जवळच्या सैनिकांच्या मदतीनें माल वाहून नेणारांचें चोर-दरोडेखोर यांजपासून पुढील पेठ गांठीपर्यंत वाटेंत रक्षण करावें. बाजारपेठेंतील अधिकारी बिडवाई. तो महाजनास मदत करी. त्याजपाशीं पेठेंतील व्यापाऱ्यांची नोंद असावी. हेच व्यापारी म्हणजे घेवारी घाटांतून जा ये करीत. ते ठराविक व घाटांतील अधिकाऱ्यांच्या बहुधा परिचयाचे असत. बिडवाई पेठेंत व्यापाऱ्याचा तळ पडला म्हणजे त्यांचें संरक्षण करीत.

जुन्नरच्या घाटपांड्यापाशीं २४ पथकी होते. त्याच्या चौक्या ३५ पर्यंत होत्या. चौकीपाशीं चौत्रा असे. त्याजपाशीं माल वाहून नेणारीं घोडीं, गाढवें, व माणसें यांनीं थांबावें. त्यांजजवळचा माल तपासून जकात दामरूपानें घ्यावी. मावळांत तळेगांवापाशीं नवलाख उमरें नांवाचें गांव आहे. तेथील जकातीचा वसूल नऊ लाख दाम होता. घाटामधील जकात हा स्वतंत्र महाल असून त्यावर सभासद या हुद्याचा अधिकारी असे. त्याजकरवीं लष्करी अधिकाऱ्यांना वाणी लोकांना वाटेंत उपद्रव न देण्याविषयीं पत्रें जात. अशींच पत्रें घाटपांडे वा त्याचे अधिकारी यांजकडून ज्या पुढच्या गांवीं व्यापाऱ्यांचा तांडा जाई त्या गांवाच्या शेटे-महाजनांना गांवांत जागा देण्यास जात. घोडें, गाढव, बैल, खांदाडें, डोई ओझें, गोणी, दिंडें, कापड-बगी अशा ठोकळ मानानें जकात घेत. जकातीपैकीं घोड्यामागें निंमा, गाढवास तिजाई, खांदाडी, मोटलेकरी यांस चौथाई जकात रखवाली म्हणून द्यावी लागे. घाटांत मेटामेटावर दिवाणाचे चाकर रखवालीसाठीं ठेवीत. घाटांत देवता असत. त्यांचा म्हणून क्वचित् आकार घेत. पारघाटांत श्रीवरदायिनी

देवी आहे. तिच्याकरितां असाच आकार वसूल करीत. घाटांतून जाणाऱ्या या व्यापाऱ्यांची काळजी सरकार शेतकरी कुळांपेक्षांहि अधिक घेई.

### जकातीचे दर

सर्व घाट सर्व काळीं एकाच सत्तेखालीं नसत. चंद्रराव मोऱ्याचें राज्य जावली खोऱ्यांत होतें तेव्हां त्याच्या ताब्यांतील हातलोट घाट व पारघाट यांतील वसूल त्यानें घ्यावा व त्यावरील अधिकारीहि त्यानें नेमावे. या दोन घाटांत वतनदार डांगी, पतकी व हातलोटीकर होते. त्यांचे हक्क जकातीच्या उत्पन्नांतून त्यांना मिळत. ते येणेप्रमाणें – दर बैली भुसाचे व मिठाचे गोणीस रुके ८॥, तंबाखू गडीद यास रुके ८६, कापड-बगी यास रुके ·।·, कांबळे ओझे यास रुके ८९. या खेरीज श्रीवरदायिनीस दर बैलास एक रुका द्यावा. 'या खेरीज जकातीवर कोणाचा हक नाहीं. मेटकरी पारघाटी ठेवले ते दिवाणाचे चाकर, त्यांस हक नाहीं. गुथाडचे मेटकरी बहुळकर यांनीं रखवाली करावी. या निमित्त त्यांस दर बैली रुका एक द्यावा. येणेप्रमाणें पुरातन चालत आलें आहे. याखेरीज कोन्ही हकदार नाहीं' ( शि. च. सा. खंड ५, पृ. १५ ).

जकात ही शिवाजीच्या उत्पन्नाची मोठी बाब होती. शिवाजीच्या ताब्यांत समुद्र किनारा आल्यावर त्याजवरील मिठागरेंहि आलींच. मिठाचा खप मोठा व त्यावरील जकातीचें उत्पन्नहि दांडगें. पण मीठ हें केवळ शिवाजीच्या हद्दींत होत होतें असें नव्हे. तें शेजारच्या पोर्तुगीज हद्दींत व ब्रिटिश हद्दींतहि होत असे. एकदा पोर्तुगीज हद्दींतील मीठ शिवराज्यांतील मिठापेक्षा स्वस्त पडूं लागल्यानें शिवराज्यांतील उदमी पोर्तुगीज हद्दींत जाऊन तिकडील मीठ खरेदी करूं लागले. त्यामुळें शिवराज्यांतील मिठास कोणी विचारीनासे होऊन तीं मिठागरें बंद पडण्याचा प्रसंग आला. त्यावर उपाय एकच व तो हा कीं पोर्तुगीज हद्दींतील बारदेशाहून येणाऱ्या मिठावर जबर जकात बसवून तें मीठ महाग करणें. त्या उपायाचा अवलंब करावयास शिवाजीनें तर्फ कुडाळच्या सुभेदारास आज्ञा केली ( इ. स. १६७१ डिसेंबर ६, शके १५९३ मार्गशीर्ष वद्य २ ).

रा. शिवाजीराजे यांजकडून – नरहरि आनंद राऊ सर सुभेदार तर्फ कुडाळ प्रति दंडवत. साहेबी प्रभावळीपासून तहद कल्याण – भिवंडी

पावेतो मिठाचा जबर निरखाचा तह ( करार ) दिल्हा आहे. ऐसीयासी, बारदेशांत मीठ बंदरें आहेत. तेथून मीठ खरेदी करून उदमी नेत आहेत. ऐसीयासी, हाली आपणाकडे मिठाचा पाड जबर जाला, हे गोष्टी ऐकोन उदमी खळक कुल बारदेशाकडे जातील. तरी तुम्ही घाटीं जकाती जबर बैसवणें. बारदेशांत मीठ विकतें त्या हिशेबानें प्रभावळी व संगमेश्वर इकडे विकणारें मीठ जबर पडतें, तें मनास आणून त्या आजमासे जकाती जबर बैसवणें. संगमेश्वराहून बारदेशीचें मीठ महागच पडे ऐसा जकातीचा तह ( आकार ) देणें. जरी जबर जकातीचा तह न घाल व मुलाहिजा कराल तर कुल उदमी बारदेशाकडे वोहडेल ( ओढलें जाईल ). आपली कुल बंदरें ( बंद ) पडतील. ऐसी गोष्टी आहे. तरी रोखा ( आज्ञा ) पावेल तेच घटिकेस कुलघाटीं जकाती जबर करणें. संगमेश्वराहून बारदेशीच्या मिठास जबर निरख पडे ती गोष्ट करणें. ये गोष्टीचा एक जरा उजूर न करणें. ये गोष्टींत साहेबाचा बहुत फायदा आहे. हा लाख रुपये यावयाचा मामला आहे ( प. सा. सं. खंड २, पृ. ४०५ ).

व्यापार व उद्योगधंदे सर्वत्र गांवाच्या पेठेंत चालत. गांव जसा लहानमोठा असेल त्या प्रमाणांत गांवाची पेठ असे. बाजारपेठा या सरकारी उत्पन्नाच्या महत्त्वाच्या बाबी असत. कसब्याचा गांव, मोठ्या रस्त्यावरील गांव आणि गडांचे पायथे येथें पेठा स्थापण्यांत येत. पेठेचा कारभार व गांवाचा कारभार अगदीं पृथक्, इतकेंच नव्हे तर त्यांची वस्तीहि अलग. गांवाचे दोन भाग म्हणजे मुंजेरी व मोहतर्फा. मुंजेरी म्हणजे शेतकरी इत्यादिकांचा भाग आणि मोह तर्फा म्हणजे वाणी – बकालांच्या वस्तीचा भाग. पाटील, कुलकर्णी, चौगुला हे गांवाचे वतनदार आणि शेटे, महाजन, बिडवाई, चौधरी, पाणसरे हे पेठेचे वतनदार. ज्यानें पेठ वसविली तो त्या पेठेचा ‘ शेट्या ’ झाला. त्याचें काम बाजारभाव ठरविणें व माप बरोबर घालविणें. शेटयाचें लेखी काम करणारा तो महाजन. तो गांवचा मुख्य पंच. शेटे – महाजनांना पेठेंतील घडामोडींची माहिती देणारा तो चौधरी. गांवाचे बारा बलुते तर पेठेचे आठरा खूम. पेठेची भरभराट होणें राज्यास श्रेयस्कर व किफायतीचें असल्यामुळें तिच्या आबादानीकडे वतनदार व दिवाण-दरबार डोळयांत तेल घालून पाहत. पेठेंतील खुमांची संख्या वाढली कीं, पेठेचें उत्पन्न वाढून सरकारी तिजोरींत

भर पडावी. यामुळें शेटया व सरकार प्रत्येक खुमाच्या मेहेत्र्याची मर्जी राखून त्याकरवीं पेठेची भरभराट करीत. पेठेंतील उत्पन्नाच्या बाबी वसूल करून त्यांतील राजभाग सरकारांत पोंचविणें हें शेटे-महाजनांचें कर्तव्य. त्याबद्दल त्यांना वाणी-बकालाकडून जो हक्क म्हणून मिळे तो त्यांचा तनखा. पेठेच्या वतनदारांत बिडवाई हाहि एक वतनदार असे. मोठ्या कसब्याच्या गांवांत येणाऱ्या मालावर जकात घेत. त्या जकातीची खोती पाणसरा घेत असे. महाजनाचा जोडीदार बिडवाई. त्यानें कष्ट मशागत करून पेठेची मामुरी करावी. हवेली तालुक्यांतील मौजे चऱ्होलीचें बिडवाईपणाचें वतन वेदमूर्ति विनायकभट ठकार कसबे पुणें यास शहाजी राजे यांनीं शके १५७५ कार्तिक वद्य ३० करून दिलें (शि. च. सा. खंड १, पृ.५८।५९ व खंड ७ प्रस्ता.).

जकात नाकीं ओतूर, मोरगांव, सुपें इत्यादि गांवींहि होतीं. तेथें चौकीदार, पथकी, पाणसरे इत्यादि अधिकारी या कामावर असत. पाटील, महाजन, शेटे हे त्याजवरील प्रमुख अधिकारी होत ( शि. च. सा. खंड २, पृ. १८३ ). इतक्या लहान गांवांत इंग्रज, पोर्तुगीज, डच, फ्रेंच यांचीं दुकानें नसलीं तरी कोंकण, देश व भारताचे इतर प्रदेश यांतील लहान-मोठीं नगरें त्यांनीं व्यापिलीं होतीं. इंग्रजांच्या वखारी म्हणजे मोठालीं दुकानें. सुरत, अहमदाबाद, बऱ्हाणपूर, धरणगांव, दाभोळ, चौल, राजापूर, कोल्हापूर, अथणी, हुबळी, जैतापूर, खारेपाटण, रायपाटण, वेंगुर्ले, सातवळी, केळशी, आचरें, चिपळूण, कारवार इत्यादि ठिकाणीं होतीं. हुबळीच्या लुटींत शिवाजीस तांब्याचीं भांडीं, कापड, पोतीं, मिरीं, शिसें, काथ्या, कागदाचीं रिमें मिळालीं. जुन्नर, औरंगाबाद, रायबाग, विजापूर येथे इंग्रजांचा व्यापार थाटण्याचा विचार होता. इंग्रजांच्या मानानें महाराष्ट्रांत डचांचा व्याप कमी होता. ते वेंगुर्लें व गोवें येथें असून त्यापलीकडच्या दक्षिण किनाऱ्यावर त्यांचा व्यापार विशेष प्रमाणांत होता. त्यांनीं त्या बाजूस किलोन, कागानोर, काननूर, कोचीन, कालिचर, कालिकोट, नेगापट्टण हीं बंदरें पोर्तुगीजांपासून जिंकून त्यांत इ. स. १६५२ पासून आपला व्यापार थाटला होता.

वेंगुर्ल्याविषयीं टॅव्हरनियर लिहितो, "वेंगुर्लें हें शहर समुद्रकांठानें दीड मैल पसरलें आहे. तें विजापूरच्या राज्यांत भारतांतील एक उत्कृष्ट

बंदर आहे. याच बंदरांत डच लोक अन्नसामग्रीचा नवीन सांठा घेतात. येथें पाणी चांगलें आहे व तांदूळहि चांगला मिळतो. या बंदराची वेलदोड्याविषयीं फार प्रसिद्धी आहे. तो फार महाग, दुर्मिळ व इतर कोणत्याहि देशांत पैदा न होणारा आहे. : येथें जाडेंभरडें कॅलिको ( calecuts ) कापड पुष्कळ उतरतें व देशावर खपतें. गोणपाटहि पुष्कळ येतें. अशा या सोयीच्या बंदरांत डचांनीं आपली एक वखार ठेवली आहे. येथें बटेव्हिया, जपान, बंगाल, सीलोन, सुरत, तांबडा समुद्र, ओर्मस, बलसारा इकडील जहाजें येतात जातात. ''

## इंग्रजांचें बकध्यान

इंग्रज लोक आपल्या व्यापाराचा महाराष्ट्रांत प्रसार करण्याकरितां कसे दक्षतेनें व धूर्तपणानें प्रयत्न करीत होते, याचें प्रत्यंतर ईस्ट इंडिया कंपनीनें टॉमस निकल्स यास केलेल्या सूचनांत प्रत्ययास येतें. हें पत्र इ. स. १६७३ मे १ रोजीं लिहिलें होतें.

" मुंबई बेटांत कंपनीची स्थापना झाल्यापासून आजतागायत मोगल, शिवाजी व आम्ही यांत सलोखा नसल्यामुळें लगतच्या शिवाजीच्या मुलखाची व्यापारी दृष्टया पाहणी करण्यास सवड झाली नव्हती. त्या कामीं तुम्ही योग्य असल्याचें पाहून तुमची नेमणूक केली आहे. तरी प्रथम समोरच्या किनाऱ्यावर नागोठण्यास उतरून तेथील भौगोलिक स्थिति, नदीच्या पात्राची रुंदी व खोली, जाणाऱ्या होड्यांचा आकार, भरती-ओहटीची कमाल व किमान मर्यादा, धक्क्याची सोय यांची पाहणी करून शेजारींच पेण व भट्टी ( Batty ) हीं गांवें आहेत, तेथील माहिती मिळवून सर्वांचे नकाशे तयार करावे; लोकांना समजूं न देतां नदीची पाहणी झाल्यावर नागोठण्याला उतरून तेथून ३।४ दिवसांच्या अंतरावर असलेल्या जुन्नर शहरीं जा. त्याची रचना, नैसर्गिक मजबुती व रक्षणाची व्यवस्था, मोगलांची तेथील फौज, त्यांचे अधिकारी व कारभार यांचा दर्जा, शहराची बांधणी व लोकसंख्या, शहराचा व्यापार, आसपासच्या मुलखाशीं त्या शहराचें असलेलें दळणवळण, इंग्रजांच्या मालाला तेथें असलेली मागणी, या सर्व बाबतींत व विशेषतः व्यापाराविषयीं फार कसोशीनें व जबाबदारी समजून तुम्ही चौकशी करावी. अरबस्तान, मक्का, बसरा, इराण इकडीलहि कोणता माल

खपेल आणि खुद्द जुन्नरांतच व आसपासच्या प्रदेशांतहि कोणता विकाऊ माल पैदा करतां येईल याची बारकाईनें चौकशी करावी. बरोबर तज्ज्ञ बनिया दिला आहे. त्याच्या मदतीनें मालाच्या किमती, वर्णन वगैरे काळजी-पूर्वक टिपून घ्यावें, युरोपांत जो माल खपेल असें वाटेल त्याचे नमुने आणावे आणि तेथील व आसपासच्या मुलखांतील नाणीं, बाजारपेठा, अंतरें व दळणवळणाचीं साधनें यांची माहिती मिळवावी.

"नित्यक्रम व झालेली पाहणी यांची रोजनिशी ठेवावी. वाटेंतील सुभेदार व अधिकारी यांची भेट घेऊन व योग्यतेप्रमाणें त्यांस नजराणे देऊन त्यांच्याशीं बोलतांना इंग्लंडचा राजा व राज्य यांचें महत्त्व, कंपनीचें सामर्थ्य आणि त्यांचा शेजार व संबंध लाभला असतां त्यांजपासून होणारे फायदे यांचें रसभरित वर्णन करावें. लोकांशीं तुम्ही बोलाल तेव्हां आमच्या कौन्सिलानें किंवा मी ( गव्हर्नर ) तुम्हांला पाठविलें असल्याचें सांगूं नका. परंतु जुन्नरच्या सुभेदारापाशीं बोलतांना इंग्रजांनीं जुन्नरला वखार घाल-ण्याच्या दृष्टीनें तुम्हांला कांहीं माहिती विचारण्यास हरकत नाहीं. तेथील सुभेदार किंवा मोठे अंमलदार यांनीं मुंबईच्या गव्हर्नरला 'इंग्रजांनीं व्यापाराकरितां जुन्नराला यावें' असें पत्र लिहिलें तर फार बरें होईल. आपल्या खर्चाचा हिशेब ठेवून वाटेंत मोगल व शिवाजी यांच्या युद्धांबद्दल कळेल ती माहिती सांपडेल त्या मार्गानें अवश्य कळवावी. एकंदरींत सर्व प्रकारें व्यापारी दृष्टि ठेवून तपास करावा" ( प. सा. सं. खं. २, पृ. ४३४।३५ ).

हें पत्र फार महत्त्वाचें आहे. जुन्नर हें मोगलांचें पश्चिम महाराष्ट्रांतील मजबूत ठाणें असून तेथून पूर्वेस, उत्तरेस व दक्षिणेस असलेल्या मोगलांच्या मुलखाचें रक्षण शिवाजीपासून जुन्नरचा सुभेदार करीत असे. अहमदनगर जिल्हा, नाशिक जिल्ह्यांतील सिन्नर वगैरे तालुके आणि पुणें जिल्ह्यांतील खेड, जुन्नर, घोडनदी व आंबेगांव हे परगणे मोगलांचे असले पाहिजेत. जुन्नर हें मोठें नगर असून पुण्यापेक्षाहि त्याचें व्यापारी दृष्ट्या फार महत्त्व होतें. फार प्राचीन काळापासून कल्याण, सोपारें, चेऊल या बंदरांतून पैठणाकडे जाणाऱ्या-येणाऱ्या मालाची नाणेघाट चढल्यावर पहिली उतारपेठ जुन्नर हीच होती. जुन्नरास व आसपास, कापड व इतर पक्का माल तयार करून परदेशीं पाठविण्याचाहि इरादा इंग्रजांचा होता.

कल्याणजवळचें भिवंडी गांव आजहि विणकलेविषयीं प्रसिद्ध आहे. तेथील मोमीन मुसलमान लोक विणकर असून लुगडीं हा त्यांचा धंदा सतराव्या शतकांतहि चालू होता. कदाचित् ते पूर्वी हिंदु असून मागाहून बाटविले गेल्यामुळें मुसलमान झाले असावे. मुंबईकर इंग्रजांचा विचार त्यांना भिवंडीहून मुंबईस नेऊन त्यांजकडून आपणांस हवें तसें कापड आपल्या देखरेखीखालीं करून घेण्याचा होता. म्हणून मुंबईचे इंग्रज सुरतेच्या इंग्रजांस लिहितात, "आम्हीं पूर्वी भिवंडीच्या विणकरांविषयीं लिहिलेंच होतें. आम्ही त्यांचें मुंबईस येऊन राहण्यासाठीं मन वळवीत आहों. पण ते ऐकत नाहींत. मात्र त्यांनीं आम्हांला बराच माल पुरविण्याचें अभिवचन दिलें आहे" (३ एप्रिल १६७७; प. सा. सं. खंड २, पृ. २९२). या वेळीं भिवंडी शिवाजीच्या राज्यांत होती.

## सावकारी

पुरातन कालापासून सावकार हा राष्ट्रांतील अतीव उपयुक्त घटक गणला गेला आहे. मराठी राज्यकर्त्यांनाहि याची जाणीव कशी होती व त्यांचा मानमरातब ते कसा ठेवीत हें शिवकालीन रामचंद्रपंत अमात्य यांनीं लिहिलेल्या राजनीतीविषयक प्रकरणांत खालीलप्रमाणें नमूद आहे –

"साहुकार म्हणजे राज्याची व राजेश्रीची शोभा. साहुकाराच्या योगानें राज्य आबादान होतें. न मिळे त्या वस्तुजात राज्यांत येतात. तें राज्य श्रीमंत होतें. पडले संकटप्रसंगीं पाहिजे तें कर्जवाम मिळतें. तेणें-करून आलें संकट परिहार होतें. साहुकाराचे संरक्षणामध्यें बहुत फायदा आहे. याकरितां साहुकाराचा बहुमान चालवावा. पेठांत दुकानें, वखारी घालवून हत्ती, घोडे, जरमिनां, पशमी आदिकरून वस्त्रजात, रत्नें, शस्त्रें, आदिकरून अशेष वस्तुजात यांचा उदीम चालवावा. हुजूर बाजारामध्येंहि थोरथोर साहुकार आणून ठेवावे. वर्षसंबंधें तसेंच लग्नादि महोत्साहींहि त्यांचे त्यांचे योग्यतेनुरूप प्रतिष्ठेनें बोलावून आणून वस्त्रपात्र देऊन समाधान करीत जावें.

"परमुलखीं जे जे साहुकार असतील त्यांचीं समाधानें करून आणावे. त्यांस अनुकूल जागा देऊन ठेवावें. तसेंच दर्यावर्दी सावकार यांसहि बंदरो-बंदरीं कौल देऊन पाठवून आमदरफ्ती करावी. साहुकारामध्यें फिरंग्री,

इंग्रज, वलंदेज, फराशीस व डिंगमारादि ( डेन्मार्क ) टोपीकर हेहि साहुकारी करितात. परंतु ते वरकड सावकारांसारखे नव्हेत. त्यांचे खावंद प्रत्येक प्रत्येक राज्यच करीत आहेत. त्यांचे हुकुमानें हे लोक या प्रांतीं साहुकारीस येतात. टोपीकरांस या प्रांतीं प्रवेश करावा, राज्य वाढवावें, स्वमतें ( धर्म ) प्रतिष्ठावीं हा पूर्णाभिमान. तदनुरूप स्थलोस्थळीं कृतकार्यहि जाले आहेत. त्यास ही हट्टी जात. हातास आलें स्थळ मेल्यानें सोडावयाचे नव्हेत. यास्तव त्यांस नेहमीं जागा कधींहि देऊं नये.

"जंजिऱ्यासमीप तों या लोकांचें येणें जाणें सहसा होऊं देऊं नये. कदाचित् वखारीस जागा देणें जाली तर खाडीचे मोबारी समुद्रतीरीं न द्यावी. तसेंच जागा दिल्यास नेहमींच मर्यादेनें रहातील असें नाहीं. कारण आरमार, तोफा, दारूगोळा हेंच त्यांचें बळ. आरमार पाठीशीं देऊन त्यांचें बळ त्या बंदरीं नूतन किल्लाच निर्माण करणार. असें झालें म्हणजे इतकें स्थळ राज्यांतून गेलें. त्यांस इमारतीचें घर बांधूं देऊं नये. या प्रकारें राहिले तर बरें नाहीं तर त्यांची आपणास गरज नाहीं" ( इतिहासमंजरी, पृ. १३९–४० ).

## वाहतुकीचीं साधनें

बैल, घोडा, गाडी, उंट, हत्ती, रथ व पालखी हीं वाहतुकीचीं साधनें होतीं. त्यांविषयीं टॅव्हरनियर लिहितो –

"फ्रान्स व इताली या देशांपेक्षां भारतांतील वाहनें सोयीचीं व सुखाचीं आहेत. भारतांत तांदूळ, धान्य, मीठ इत्यादि माल बैलावरून वाहून नेतात. प्रत्येक बैलावर १५०।१७५ शेर माल लादतात. असा माल लादलेले दहा ते बारा सहस्र बैल एका जमावानें जात असतात. एका ठिकाणीं जो किराणा होत असेल तो न होणाऱ्या पेठेंत नेणें व त्या पेठेंतील विशिष्ट किराणा दुसऱ्या ठिकाणीं आणणें असा त्यांचा क्रम असतो. उंटहि या कामास लावतात, पण क्वचित्. बहुधा बड्या लोकांचें सामान ते नेतात. जेव्हां माल सुरतेसारख्या बंदरांत जलद न्यावयाचा असतो तेव्हां तो छकड्यांत न भरतां बैलांवर घालून नेण्यांत येतो.

"मोगलाईतील शेतांना खतपाणी चांगलें मिळतें. त्या शेतांना कुंपण-काटी लावलेली असते व विहिरी असतात. अशा दोन शेतांमधून जावयास

अंतर इतकें थोडें असतें कीं, बैलांचा तांडा त्यांतून चालला असतां समोरून येणारी रहदारी थांबवावी लागते. ती दोनतीन दिवसहि खोळंबून रहाते. बैलांच्या लमाणांचा नि त्यांचा व्यवसाय हाच असतो. त्यावांचून अन्य व्यवसाय ते मुळींच करीत नाहींत. त्यांना राहावयास घरहि नसतें. त्यांचें बिऱ्हाड गोगलगायीप्रमाणें पाठीवर. त्यांचीं बायका-मुलें त्यांजबरोबरच हिंडत असतात. लमाणापाशीं प्रत्येकाच्या मालकीचे कमीअधिक शंभर बैल भरतील. या सर्व लमाणांचा एक नाईक असतो. तो राजासारखा इतमामानें रहातो. तो गळ्यांत मोत्यांचा कंठा घालतो. हे तांडे समोरासमोरून आले म्हणजे त्यांचा वाट देण्याच्या बाबतींत तंटा लागतो. तो केव्हां इतक्या थरावर जातो कीं, त्यांत एकमेकांचीं डोकीं फुटतात. मोगल बादशहानें त्यांच्या या नित्याच्या मारामाऱ्या थांबविण्याकरितां त्यांना बोलावून घेऊन त्यांचा समेट घडवून आणिला व त्यांच्या नाइकांस प्रत्येकीं एक लाख रुपये व मोत्यांचा कंठा बक्षीस देऊन त्यांची बोळवण केली.

"लमाण हिंदु असून त्यांच्या चार जाती आहेत. ते वाटेनें प्रवासांत पालें ठोकून त्यांत रहातात. कोणी फक्त धान्य, कोणी तांदूळ, कोणी डाळी तर कोणी मीठ वहातात. त्यांजबरोबर त्यांचा एक भटजी असतो. तो त्यांच्या देवाची पूजा व सर्व धर्मकृत्यें करतो. या जाती निरनिराळ्या प्रकारचें गंध त्याजकडून लावून घेतात. कोणाच्या कपाळाला तांबडें, तर कोणाच्या पिवळें गंध असतें. कांहींच्या गळ्यांत लिंग असतें, तर कोणी ताईत व गंडे-दोरे बांधतात. बैलांच्या गळ्यांत भालदोरी वा बजरबट्टूच्या माळा वा घंटा असतात. ते आपल्या बैलांना पोटच्या पोराप्रमाणें मायेनें वागवितात. त्यांच्या बायका पांढरीं पातळें वा चिटें नेसतात आणि अंग नाना प्रकारांनीं गोंदवून घेतात.

"दररोज सकाळीं पुरुषांनीं बैलावर गोण्या लादण्यापूर्वीं व बायकांनीं पालें आवरण्यापूर्वीं ते उंच ठिकाणीं ठेवलेल्या बरोबरच्या देवाला गंधफूल वाहून पूजा करितात व त्यास बायका तीन प्रदक्षिणा घालतात. पूजा आटोपल्यावर भटजी देव उचलतो व तो पडशींत घालून बैलाच्या पाठीवर पडशी ठेवतो. या कामासाठीं एक बैल वेगळा ठेवलेला असतो.

"तांडा जेव्हां खटाऱ्यांचा निघतो तेव्हां त्यांत शंभर ते दोनशेंपर्यंत

खटारे असतात. खटाऱ्यांत माल फार व रस्ता बांधीव नसल्यामुळें तो ओढण्यास दहाबारा बैल जुंपतात. खटाऱ्यांतील माल गाडीवानांचा नसून त्यांनीं तें व्यापाऱ्यांचें भाडें केलेलें असल्यानें मालाच्या रक्षणाकरितां व्यापारी प्रत्येक गाडीबरोबर चार पगारी शिपाई देतो. गाडीच्या एका बाजूनें दोघे व दुसऱ्या बाजूनें दोघे असे शिपाई चालतात. गाडीच्या मालावरून आडवे दोन दोर टाकतात व त्यांचीं टोकें दोन्ही बाजूचे शिपाई हातांत धरतात. रस्त्याला चढउतार असल्यास गाडी एकारून कलंडण्याचा संभव असतो. तशी ती एका बाजूस कलंडूं लागली कीं दुसऱ्या बाजूचे शिपाई दोर खेंचून तिचा तोल संभाळतात.

" प्रवास घोड्याऐवजीं बैलावरून करतात. पण बैल बसण्यासाठीं भाड्यानें घेतांना एका गोष्टीस जपावें लागतें. बैलाचीं शिंगें एक फुटापेक्षां लांब असतां कामा नये. तीं जर का त्याहून लांब असलीं तर बैलाच्या कानाभोंवतीं गोमाशा घोंगावूं लागल्या म्हणजे त्या वारण्याकरितां बैलानें शिंगें हलविलीं कीं तीं आपल्या पोटांत शिरण्याची भीति असते. युरोपांत आम्ही बैलांच्या शिंगांना कांसरा बांधतों, पण हिंदुस्थानांत बैलांना नाकांतून वेसण घालतात, त्यांचा गळा कातडी पट्टयांनीं आंवळतात व तो गाडीला बांधतात. त्यासच जुंपण्या म्हणतात. त्याशिवाय वेगळा कांसरा असतो, तो गाडीवान हातांत धरून गाडी हांकतो.

" जलद प्रवासाकरितां खानदेश, वऱ्हाड या सपाटीच्या भागांत एक लहान हलकी गाडी असते. तिला भिरकें म्हणतात. त्यांत एकच किंवा फार तर दोन स्वाऱ्या बसतात. पण एका मनुष्यास मात्र त्यांत सुखानें बसतां येतें. याहि गाडीला दोन बैल जुंपतात. सामानासाठीं बसणाराच्या खालीं पुढच्या अंगास एक पेटी असते तींत सामान ठेवतात व तेंहि अगदीं जुजबी असतें. भिरक्याला दोन्ही बाजूंस पडदे सोडतात. मीं जेव्हां गाडींतून प्रवास करण्याचें ठरविलें तेव्हां दोन बैलांना सहाशें रुपये किंमत पडली. पण ते फार मजबूत असल्यामुळें एका दिवसांत वीस-बावीस कोसांची मजल मारीत. असे ते साठ दिवसहि चालूं शकतात. प्रवास अर्धा दिवस झाल्यावर गाडीवान बैलांना तूपगूळ घालून कणकेचे दोन-तीन गोळे चारतात. गाडी भाड्यानें केल्यास रोजीं अधिकउणा रुपया भाडें पडतें.

" ज्यांना ऐषआरामांत प्रवास करावयाचा असेल त्यानें पालखी करावी. पालखीचा डोक्यावरचा दांडा साटणीनें किंवा जरीच्या वस्त्रानें गुंडाळलेला असतो. प्रवासांत सूर्य ज्या बाजूला कलेल त्या बाजूला तिकडचा माणूस ऊन्ह निवारण्यासाठी पडदा सोडतो. पालखीस एका टोंकाशीं तिघे व दुसऱ्या टोंकाशीं तिघे भोई लागतात. या प्रत्येकाला दरमहा चार रुपये दिले कीं बस्स.

" प्रवास कसाहि करावयाचा झाला तरी खानदानीच्या प्रवाशानें बरोबर सशस्त्र असे २५।३० पायिक घेतलेच पाहिजेत. कांहीं जणांपाशीं धनुष्यबाण व कांहींपाशीं बंदुका असाव्या. डच, इंग्रज यांसारखे लोक आपआपल्या कंपन्यांच्या इतमामाखातर अफतागिरीहि बाळगतात. इतके पायिक रक्षणार्थ ठेवावेच लागतात. मोठाल्या नगरांत त्यांचा नाईक असतो. ते त्याचे चाकर त्याच्या विश्वासाचे असतात. तो त्यांजपासून माणशीं दोन रुपये स्वामित्वाबद्दल घेतो.

" मुशाफरांना वाटेंत शिधासामग्री लागल्यास ती पुरविणारे मोदी मोठ्या कसब्याच्या गांवीं असतात. तेथें मुसलमान खान-इ-सामान तुम्हांस सागोती, अंडीं वा कबुतरें पुरवितो. बनियापाशीं मात्र आटा, चावल, शाक व मिठाई यांशिवाय इतर कांहीं ओशट मिळावयाचें नाहीं.

" भारतांत उन्हाळा फार कडक, यामुळें दिवसा मुक्काम व रात्रीं वाटचाल करणें सुखाचें. पण शहरांत मुक्काम पडला कीं रात्रीं वेशी बंद होतात. म्हणून प्रवासाकरितां अपरात्रीं बाहेर पडणें शक्य नसतें. यास्तव मी शिधासामग्री दिवसा खरेदी करून रात्र पडण्यापूर्वी शहराबाहेर जाऊन उघड्या हवेंत झाडाखालीं राही व रात्रीं ठरल्या वेळीं पुढचा रस्ता चालू लागे."

महाराष्ट्र हा भारताचाच एक प्रांत असल्यानें अखिल भारतांत जो व्यापार व धंदे चालत त्यांचा कांहीं अंश महाराष्ट्राच्या वांट्यास यावा हें स्वाभाविक होय. या दृष्टीनें टॅव्हर्नियर यानें आपल्या ग्रंथांत संकलन स्वरूपानें तद्विषयक दिलेली माहिती महत्त्वाची समजून येथें उद्धरत आहे.

### भारतांतील समृद्धि

" बंगाल्यांतील कासिम बझार या गांवाहून परदेशीं दरसाल बावीस सहस्र टन रेशमाच्या गांठी जातात. प्रत्येक गांठ ५० शेर वजनाची असते.

यांतील ६।७ सहस्र गांठी डच्चच खरेदी करतात. कांहीं माल तार्तरीचे व्यापारी नेतात. हें सर्व रेशीम अहमदाबाद व सुरत येथें येऊन त्याचीं वस्त्रें विणलीं जातात. त्याचे गालिचेहि बनवितात. रेशमी वस्त्रावर जरतारी काम करण्यांत येतें. त्याची साटिन व इतर साधीं वस्त्रें होतात. अहमदाबादेस त्यांचीं पाटोळें विणतात. ( पाटोळे हा शब्द 'गवराई नेसली पाटोळें' या मुलांस सांगावयाच्या गोष्टींत आहे ). त्याजवर फुलें काढतात. त्याची नगामागे किंमत ८ ते ४० रुपये असते. डच्च लोक हीं वस्त्रें फिलिपाईन बेटें, बोर्निओ, जावा, सुमात्रा इत्यादि बेटांत पाठवितात.

"काशिम बाझारचें रेशीम प्रथम इराण व सिसिली येथील रेशमासारखें पिवळेंच असतें. पण उंबराच्या लाकडाची राख लावून तेथील कारागीर तें पांढरें शुभ्र करतात. चिटें गोवळकोंड्याच्या राज्यांत विशेषतः मच्छलीपट्टणास होतात. मोगली साम्राज्यांतील चिटें चित्रांत व तलमपणांत फारच सुंदर असतात. लाहोरासहि तीं बनवितात. पण जाडीभरडीं होतात. पलंगपोस, सरपोस, उशांचे व गाद्यागिर्द्यांचे अभ्रे चिटाचे वापरतात. सिरोंज व बऱ्हाणपूर यांचीहि त्याविषयीं ख्याति आहे. ताफता पांढरा हा आग्रा, लाहोर, बंगाल, बडोदें, भडोच, नवसारी येथें विणतात. ताफता लिंबाच्या रसानें पांढरा होतो. त्याची किंमत १७ रुपयांपासून ३।४ शें रुपयापर्यंत असते. पिळाचें ( twisted ) व बिनपिळाचें सूत बऱ्हाणपूर व गुजराथ येथें होतें. परदेशास फक्त पिळदार सूत जातें. तें इंग्रज व डच्च परदेशीं पाठवितात. त्यापासून मेणबत्तीच्या वाती करतात. नीळ मोगली साम्राज्यांत पुष्कळ ठिकाणीं पिकतें. सुरतेस एक मण निळीस ( ४२ ते ४४॥ शेर ) १५।२० रु. पडतात. नीळ बंगाल, बऱ्हाणपूर, आग्रा इत्यादि प्रदेशांत होतें. सैंधव ( Saltpetre ) आग्रा व पाटणा इकडून येतें. डच्चांनी पाटण्याजवळ त्याची एक वखारच घातली असून तें शुद्ध करून गंगेंतून हुगळीस पाठवितात. वेलदोडे, सुंठ, मिरीं, लवंगा, दालचिनी, nutmeg ( जायफळें ), nutmeg flower ( जायपत्री ) यास मसाला म्हणतात. वेलदोडे आदिलशाहींत व सुंठ मोगलाईंत पिकतें. वेलदोडे फार दुर्मिळ व महाग असतात. ते फक्त श्रीमंतांच्या व बड्या लोकांच्या सेवनांत येतात. सुंठ अहमदाबादेकडून फार मोठ्या

प्रमाणांत येते. तितकी सुंठ आशियाच्या कोणत्याहि इतर भागांत होत नाहीं. मिरीं मलबारांत तुतीकोरीन व कालिकत येथें मिळतात. बारीक व मोठीं अशा मिऱ्यांच्या दोन जाती आहेत. सुरतेस बारीक मिऱ्यांना मणामागें १३।१४ महमद्या किंमत पडते. इंग्रज लोक तीं ओर्मझ, बलसारा व तांबडा समुद्र इकडे निर्गत करतात. जायफळ, जायपत्री, लवंगा व दालचिनी यांचा व्यापार डचांनीं आपल्या हातांत ठेवला आहे. पहिलीं तीन मोलक्कांतून व दालचिनी सिंहलद्वीपांतून येते. साखर ( बारीक ) बंगाल्यांत होते. हुगळी, पाटणा, डाका इत्यादि ठिकाणीं तिचा मोठा व्यापार चालतो. तिची खडीसाखर ( Sugar loaves ) अहमदाबादेंत करतात. अफू बऱ्हाणपुराहून आणतात. हॉलंडर ( डच ) ती मोठ्या प्रमाणांत खरेदी करतात. तंबाकूहि बऱ्हाणपुरापाशींच फार पिकते. भारतांत कॉफी होत नाहीं. तेथील लोकांना ती लागतहि नाहीं.

" हिऱ्याच्या खाणी मीं प्रथम आदिलशाहींत कर्नाटकप्रांतीं रावळकोंडा येथें पाहिल्या. जेथें हिरे सांपडतात त्या जागीं वाळू व खडक असतात. त्या खडकांना शिरा असतात. त्या अर्धबोट रुंदीच्याहि आढळतात. त्यांत लोखंडाची आंकडी ( Hook ) घालून खाणीवाले आंतली माती व वाळू काढतात. ती ते पातेल्यांत घालतात. त्या मातींत त्यांना हिरे सांपडतात. या खाणीपाशीं हिरे कापणारे पुष्कळ राहतात.

" रावळकोंड्याची खाण पाहून मी गोवळकोंडा राज्यांतील गनी नामक गांवाजवळील हिऱ्यांची दुसरी खाण पाहावयास गेलों. ही खाण शंभर वर्षांपूर्वी सुरू झाली. तेथें एक शेतकरी जमीन नांगरीत असतां त्याला २५ कॅरेट वजनाचा एक कोचदार दगड सांपडला. तो चकाकत असल्याचें पाहून त्यानें तो गोवळकोंड्यास नेला. तो एका व्यापाऱ्यानें पाहिल्यावर त्याची परीक्षा होऊन तो हिरा ठरला. या रीतीनें खाणीचा शोध लागला. तिसरी खाण मीं ओरिसांत संबळपुरापाशीं पाहिली. "

## प्रकरण अठरावें

# चलनी नाणीं

शिवाजीच्या राज्यांत सर्व परराज्यांतीलहि नाणीं सुरू होतीं. खुद्द शिवाजीच्या खजिन्यांत त्यानें पाडलेले स्वतःचे होन बहुतेक नव्हतेच. इतरांचींच नाणीं होतीं. आतांपर्यंत त्याचे असे दोन-तीनच होन सांपडले आहेत. त्यांपैकीं एक लहान होन भारत-इतिहास-संशोधन-मंडळांत आहे. त्याजवर छत्रपति अशीं अक्षरें आहेत. याविषयीं खात्री पटविणारा निबंध श्री. दि. वि. काळे यांनीं वाचला ( भा. इ. सं. मं. त्रैमासिक, वर्ष १२ वें, अंक १ ). त्याची टांकसाळ रायगडावर होती. त्यानें आपलें नाणें सन १६७४ पूर्वी पाडलें नसावें. त्यानें बरींच तांब्याचीं नाणीं पाडलीं. सभासद म्हणतो कीं त्याच्या खजिन्यांत ३२ जातींचीं सोन्याचीं व सहा जातींचीं चांदीचीं नाणीं होतीं.

सोन्याचीं नाणीं ( १ ) गंबार, ( २ ) मोहोर, ( ३ ) पुतळी, ( ४ ) पातशाही होन, ( ५ ) सतलाम्या, ( ६ ) इब्राहिम्या, ( ७ ) शिवरायी होन, ( ८ ) कावेरीपाक, ( ९ ) सणगरी होन, ( १० ) अच्युतरायी होन, ( ११ ) देवरायी होन, ( १२ ) रामचंद्ररायी होन, ( १३ ) गुत्ती होन, ( १४ ) धारवाडी होन, ( १५ ) फलम, ( १६ ) प्रलखटी होन, ( १७ ) पावनायकी होन, ( १८ ) आदवाणी होन, ( १९ ) जडमाल होन, ( २० ) ताडपत्री होन, ( २१ ) अफ-

रजी होन, ( २२ ) त्रिबालरी होन, ( २३ ) त्रिशुळी होन, ( २४ ) चंदावरी ( तंजावरी ) होन, ( २५ ) विलधारी होन, ( २६ ) उलफकरी होन, ( २७ ) महमदशाही होन, ( २८ ) वेलुरी होन, ( २९ ) कटेरायी होन, ( ३० ) देव-जवळी होन, ( ३१ ) रामनाथपुरी होन, ( ३२ ) कुनगोटी ( कुनगोळी ? ) होन

चांदीचीं नाणीं ( १ ) रुपये ( २ ) आसरप्या ( ३ ) आबाशी ( ४ ) दाभोळी लायरी ( ५ ) चुली लायरी ( ६ ) बसरी लायरी.

या नाण्यांचा नीट बोध होण्याकरितां अधिक खुलासा करणें आव-श्यक आहे.

गंबार हें नाणें गब्बर या नांवानें श्री. सेन यांच्या मतें ओळखलें पाहिजे. त्याची किंमत सन १७६३ मध्यें मुंबईस ३ रु. १२ आणे होती. मोहोर प्रसिद्ध मोगली नाणें. तिची किंमत सुमारें १५ रुपये होती. ती सोन्याची असून तिचे अर्धी मोहोर व पाव मोहोर हे भाग प्रचारांत होते. पुतळी हें लहान सोन्याचें नाणें. त्याची किंमत ४ रुपये. होन हें नाणें सोन्याचें. त्याचीं नांवें शिवरायी, देवरायी, अच्युतरायी इत्यादि त्या त्या राजांच्या नांवावरून पडलीं. शिवरायी होन अर्थात् शिवाजीचा. देवरायी, अच्युतरायी रामचंद्ररायी हे होन विजयानगरच्या राजांचे. त्याच्या एका अंगास विष्णूची मूर्ति व दुसरें अंग बहुधा साधें असे. मद्रास व गोवळकोंडा येथें होन पाडीत ते विजयानगरच्या धर्तीचे असत. गोवळकोंड्याच्या होनावर विजयानगरच्या राजाचें देवनागरी लिपींत एका अंगास नांव असे व दुसऱ्या अंगास विष्णु व त्याच्या दोन भार्या असत. मद्रासच्या होनाला नवा होन व मच्छली-पट्टणच्या होनाला जुना होन म्हणत. पादशाही व इब्राहिमी होन विजापूरच्या बादशहांचे. कावेरीपाक, गुत्ती होन, धारवाडी होन, आदवाणी होन, तंजा-वरी होन इत्यादि नांवें त्या त्या गांवांच्या टांकसाळीवरून पडलीं.

चांदीच्या नाण्यांपैकींव महमदी रुपये मुसलमान बादशहाच्या नांवावरून पडलेले दिसतात. आबाशी हें इराणांतून आलेलें नाणें. इराणचा राजा शहा अबास हा इ. स. १५८८ ते १६२९ पर्यंत राज्य करीत होता, त्याच्या नांवानें पाडलेलें हें नाणें. सभासदानें दाभोळी कबरी, चुली कबरी व बसरी कबरी अशीं नांवें लिहिलीं आहेत. त्यांत लारीच्या किंवा लायरीच्या ऐवजीं कबरी हें नांव मोडी वाचनाच्या चुकीमुळे पडलेलें दिसतें. हें नाणें

इराणांतून येत असे. त्या लारीसारख्या लाऱ्या विजापूरकर व शिवाजी हे पाडीत असत. दाभोळी म्हणजे दाभोळांत पाडलेली लारी, चुली म्हणजे चौल येथें पाडलेली लारी व बसरी म्हणजे बसऱ्यास पाडलेली लारी. आसरफ्या किंवा अश्राफ्या हें नांव पोर्तुगीज झेराफीन ( Xerafeen ) यावरून पडलें आहे. याची किंमत १ शिलिंग ४ पेन्स. फालम म्हणजे पण. तें प्रथम फक्त सोन्याचें होतें. पण सतराव्या शतकांत तें चांदी व सोनें या दोन्ही धातूंचें पाडूं लागले.

राजव्यवहारकोशांत पुढील नाण्यांचीं नांवें आढळतात. होन, प्रताप ( अर्धा होन ), धरण, रुपया, चवल ( चवली ), दुवल ( आणा ), मोहरा, सुवर्णनिष्क, रजतनिष्क, लाहरी ( लायरी ) व पण. सांप्रत रुपयापासून अधेली, पावली, चवली, आणा व पैसा हीं नाणीं चालू आहेत. पैकीं शिवकालीं शिवरायी पैसा होताच. त्याशिवाय इतर राजांचेहि पैसे असतीलच. चवली व आणा हीं नाणीं होतीं. अधेली व पावली हींहि असल्याचें टॅव्हर्नियर लिहितो.

शिवाजीनें पाडलेलें होन हें नाणें दुर्मिळ आहे. याचें कारण त्यानें होन फारसे पाडलेच नसावे. तांब्याचा शिवराई पैसा सुमारें पन्नास वर्षांपूर्वीपर्यंत क्वचित् प्रचारांत होता. तो पाहिलेलीं माणसें अद्यापिहि असतील. तो पाडण्याचें काम पेशवाईतहि चालत असल्यामुळें तीं नाणीं १९ व्या शतकाच्या अखेरीपर्यंत पाहावयास मिळत होतीं. रेव्ह. मि. ॲबट यांनीं अशीं पंचवीस सहस्र नाणीं जमवून तीं तपासलीं होतीं. तीं सर्व सारख्या आकाराचीं नसून त्याजवर एका बाजूला श्रीराजा शिव व दुसऱ्या बाजूला छत्रपति हीं अक्षरें असत.

पुरुषार्थ मासिकाचे संपादक पंडित सातवळेकर यांनीं इ. स. १९३३ त 'शिवाजी अंक' प्रसिद्ध केला होता. त्यांत श्री. अ. ब. देशपांडे रायगांवकर यांनीं 'शिवकालीन चलन' या मथळ्याखालीं एक व्यासंगपूर्ण लेख लिहिला होता. त्यांतील माहिती उद्बोधक व नावीन्यपूर्ण वाटल्यावरून येथें देत आहें.

"शिवकालीं टक्का हें एक नाणें प्रचारांत होतें. त्याशिवाय रुकाहि होता. ४८ रुक्यांचा एक टका व १२ टक्यांचा होन. होनाचें मूल्य तीन

रुपये धरल्यास टका हें चार आणे किमतीचें रुप्याचें नाणें असावें ( होतें. ) १९२ रुक्यांचा रुपया होई. म्हणजे रुका हा अलीकडील एका पैएवढा असे. रुका हें ( तांब्याचें ) नाणें उपलब्ध असून त्याचें छायाचित्रहि प्रसिद्ध झालें आहे. सारांश होन, टका, रुका, शिवराई, आडका, दमडी, हीं नाणीं शिवकाळांत प्रचारांत असावीं."

'कोण म्हणतो टका घेतला' या खेळावरून टका हें नाणें होतें. नाणीं कोणासहि पाडतां येत. एका राज्यांतील नाणें दुसऱ्या कोणत्याहि राज्यांत चालत असे. परंतु सर्वच नाणीं सारख्या दर्जाचीं व कसाचीं नसल्यानें तीं पारखणारे सराफ त्यांचे बाजारभाव ठरवीत व त्याप्रमाणें त्यांची देवघेव चाले. हा सराफांना एक किफायतीचा धंदा होता. इंग्रज इकडे नाणीं पाडीत तीं सुबक असत. सुरतेस मोगल पाडीत तीं नाणीं सर्वमान्य समजलीं जात. इंग्रजांनीं सुरतेहून मुंबईस वखार नेली तेव्हां त्यांनीं सुरतेच्या नाण्यासारखीं सोनें, रुपें, तांबें यांचीं नाणीं पाडण्याचें ठरविलें. त्यासंबंधीं मुंबईचे इंग्रज अधिकारी इंग्लंडास लिहितात :-

"सोनें, रुपें व तांबें या धातूंचीं नाणीं सुरतेच्या नाण्यांप्रमाणेंच करण्याचें आम्हीं ठरविलें. तसें केलें म्हणजे तीं शेजारच्या पोर्तुगीजांच्या देशांत, शिवाजीच्या मुलखांत आणि दक्षिणेंतहि अप्रतिबंध वापरलीं जाऊन बेटावरील व्यापाराला फार सोईचें होईल" ( प. सा. सं. खंड २, पृ. ४२८ ) ( इ. स. १६७२ डिसेंबर २० ). याशिवाय नाणें पाडणें हें आर्थिक दृष्ट्या त्यांस फायदेशीर होतेंच.

याचसारखें आणखी एक पत्र मुंबईहून सुरतेस गेलें ( इ. स. १६७४ डिसेंबर २३ ) "मुंबईचा पैसा शिवाजीच्या मुलखांत चालतो. विलायतेहून १५०० तांब्याच्या पेट्या आल्या आहेत. त्या येथें टांकसाळीकरितां आम्ही उतरून घेतों. कारण आमचा पैसा शिवाजीच्या मुलखांत चालतो असें नसून पोर्तुगीज मुलखांतहि चालतो ( प. सा. सं. खंड २, पृ. ५१२ ).

भा. इ. सं. मंडळांत ईस्ट इंडिया कंपनीनें मुंबईस पाडलेलें एक तांब्याचें नाणें आहे. त्याच्या मध्यभागीं Moneta, Bombay, Anglic Regions A° 9° अशीं अक्षरें आहेत. हें नाणें बहुधा इ. स. १६७२

नंतरचें असावें. तो पैसा असावा. त्यावरून इंग्रज लोक बादशाही शिक्क्याचीं नाणीं सुरतेस किंवा मुंबईस न पाडतां आपल्या शिक्क्याचीं पाडीत असत.

आदिलशाहींत सर्वांत अधिक प्रचार होन या नाण्याचा होता. त्याचे प्रकार सुमारे पंचवीस होते. कांहीं थोड्या होनांस आदिलशहांचीं नांवेंहि होतीं. त्यांपैकीं दुसरा इब्राहिम आदिलशहा यानें नऊ होनांचें एक नाणें पाडलें होतें. त्याचें नांवच नवरस होतें. नवरस हें नांव त्याला फार प्रिय होतें. विजापूरच्या एका उपनगराला त्यानें नवरसपूर हें नांव दिलें होतें. जमिनीच्या क्षेत्रफळासहि नवरस हेंच नांव होतें. 'दोन नवरस जमीन' असा उल्लेख एके ठिकाणीं आढळतो. इब्राहिम बादशहा काव्याचा व गायनाचा षोकी होता. काव्यांतील नवरसांवरून त्याला हें नांव प्रिय झालें असावें. कारण तो सरस्वतीचीहि पूजा करीत असे. इब्राहिमाच्या नांवाचें इब्राहिमी हें एक वेगळें नाणें होतें.

इब्राहिमानंतर मुहमद आदिलशहानेंहि मुहमदशाही होन पाडला होता. पण त्याचें सोनें ४३ कशी म्हणजे हिकणस असल्यामुळें बाजारांत तें नाणें चालेना. तेव्हां तें न घेणारास शिक्षेचा धाक घालून मुहमदानें त्याच्या प्रचाराचा प्रयत्न केला ( ग. ह. खरे, सकाळ २६।८।१९५४ ).

वर दिलेल्या नाण्यांपैकीं लारी हें नाणें विशेषतः कोंकणांत चालत असे. हीं नाणीं आदिलशाही राज्यांत पाडीत असत. मराठी कागदपत्रांतून दाभोळी व हुरमुजी नाण्यांचा निर्देश आढळतो. त्यावरून लारी हें नाणें दाभोळास व होर्मझ येथें म्हणजे इराणांत पाडण्यांत येत असे. भा. इ. सं. मंडळाच्या संग्रहांत ज्या लाऱ्या आहेत त्यांजवर एका बाजूस सुलतान अली आदिलशाह व दुसऱ्या बाजूस 'जर्ब लारी दाबुली सनह' असा मजकूर आहे. कांहीं लाऱ्यांवर आदिलऐवजीं आदाल असा शब्द आहे. कित्येक लाऱ्यांवर 'शाह' शब्दापुढें एक उभी रेघ तर कित्येकांवर तीन उभ्या रेघा आहेत. एकीवर जर्ब या शब्दांतील 'ब'वर तारा आहे. हें नाणें लांबट व चेंडूफळीच्या आकाराचें असे. शिवाजीचे होन व तांब्याच्या शिवराया यावर कालाचा निर्देश करीत नसत.

मोगली नाण्यांचे दोन प्रकार आहेत. एक खुद्द मोगल अधिकाऱ्यांनीं पाडलेल्या नाण्यांचा व दुसरा फ्रेंच, इंग्रज इत्यादींनीं पाडलेल्या नाण्यांचा.

या दोन्हींपैकीं युरोपियनांनीं पाडलेलीं नाणीं जास्त सुबक व रेखीव आहेत आणि देशी नाणीं ओबडधोबड आहेत.

शिवकालांत महाराष्ट्रांतील चलनी व्यवहार, होन, लारी, टके, खुर्दा, रुपये आणि मोहरा या नाण्यांत चालत असे. पैकीं रुपये, मोहरा व आणे यांचा व्यवहार विशेषतः उत्तरेंत व महाराष्ट्रांतील मोगली मुलखांत चालत होता. लारी हें नाणें रुप्याचें असून त्याचा प्रचार विशेषतः कोंकणांत होता व देशावर कमी प्रमाणांत होता.

शिवाजीच्या खजिन्यांत जीं नाणीं होतीं, तीं एकट्या महाराष्ट्रांत चालणारीं नसून अखिल भारतांत चालणारीं होत. त्यांपैकीं कित्येक त्याला सुरत, जालना, धरणगांव, मलकापूर, कारंजा, हुबळी इत्यादि ठिकाणच्या लुटींतहि मिळालीं असतील. गंबार, अफराजी, उल फकरी या नांवांचा बोध होत नाहीं.

राजव्यवहार-कोशांत नाण्यांची जी माहिती दिली आहे तिजवरून खालीलप्रमाणें कोष्टक तयार करतां येतें :–

१ वराह = १ होन = ३ रुपये वा ४ रुपये
१ होन = २ प्रताप.
२ प्रताप = ४ धरण.
४ धरण = ८ चवल.
८ चवल = १६ दुवल वा दुगल.
१ फलम = १ पण.
१६ दुगल = ३२ पल वा फलम.

फ्रेंच प्रवासी टॅव्हरनियर यानें इकडील नाण्यांचा बारकाईनें अभ्यास केला होता. तो लिहितो –

" भारतांत रुपया, अधेली, पावली, आणा हीं नाणीं चालतात. लहान नाण्यांत पैसा, अर्धा पैसा ( अधेला ), दोन पैसे ( फद्या ), चार पैसे हीं नाणीं आहेत. सुरतेस रुपयास ४९ पैसे मिळतात. एक वेळ ते ५० मिळत व दुसऱ्या खेपेस ४६ मिळूं लागले होते. आग्रा व गेहनाबाद येथें रुपयाला ५५।५६ पैसे येत. याचा अर्थ असा कीं जों जों तांब्याच्या खाणीजवळ जावें

तों तों रुपयास मिळणाऱ्या खुर्दांचा भाव उतरत जातो. मोगली साम्राज्यांत बदामहि चालतात. ते कडू बदाम इराणांतून येतात. त्यांचा वापर फक्त गुजराथेंत होतो. ते पैशाला ३५।४० मिळतात.

" याशिवाय कवड्याहि चालतात. त्या मालदिव बेटांत सांपडतात. कवड्यांचा व्यापार मोठा चालतो. त्या विजापूर गोवळकोंडा व अमेरिका यांतहि चालतात. समुद्रकांठीं त्यांचा भाव एका पैशास ८० असा असतो, पण समुद्रापासून दूर अशा आग्ऱ्यासारख्या शहरीं त्या फक्त ५०।५५ मिळतात. द्रव्याची गणना लाख, कोटि, पद्म व रील ( Ril ) अशी करतात."

## प्रकरण एकोणिसावें

# नवीन उपक्रम

### राजव्यवहारकोश

शिवाजीनें रायगडीं आपणांस राज्याभिषेक करून घेतल्यावर त्याला राजा या नात्यानें जें कर्तव्य त्याविषयीं विशेष जाणीव उत्पन्न झाली. विद्वान् व लायक असे अष्टप्रधान त्याजपाशीं होतेच. त्यांना व शिवाजीला शिस्तवार राज्यकारभार करतांना अनेक उणिवा भासूं लागल्या. त्यांपैकीं राजव्यहारकोश ही एक होय. शिवाजीपूर्वी महाराष्ट्रांत तीनशें वर्षें मुसलमानांचा अंमल होता. त्यांत व्यावहारिक मराठी भाषा अगदींच भ्रष्ट होऊन गेली होती. सर्वत्र यावनी शब्दांचें प्रस्थ माजलें असून लोक पत्रव्यवहारांत असली धेडगुजरी भाषा वापरीत असत. तिची खंत स्वदेशाभिमानी व महाराष्ट्रभाषाभिमानी विद्वानांना वाटणें स्वाभाविक होय. शिवछत्रपतीस तेंच अभिप्रेत असल्यामुळें त्यांनीं त्यांचें एक अमात्य रघुनाथपंत हणमंते यांस राज्यकारभारांत उपयुक्त असा कोश तयार करण्यास सांगितलें.

रघुनाथपंतांचें संपूर्ण नांव रघुनाथ नारायण हणमंते. शिवाजीचा पहिला अमात्य बाळकृष्णपंत हणमंते. त्याचा चुलतभाऊ नारोपंत. तोच रघुनाथपंताचा पिता. हणमंते हे भोसल्यांचे पिढीजाद नोकर. त्रिमल हणमंते

हे भोसल्यांचे अमात्य होते. त्यांचा पुत्र नारायण व नारायणाचा पुत्र रघु-नाथ. नारायणानें म्हणजे नारोपंतांनें उतार वयांत अग्निहोत्र घेऊन यज्ञ केला. म्हणून त्यास नारायण अध्वरी असें नांव पडलें. शिवाजी व व्यंकोजी हे दोघेहि शहाजींचे पुत्र असल्यामुळें भोसले घराण्याचे जे पिढीजाद नोकर असत त्यांपैकीं कोणी शिवाजीकडे तर कोणी व्यंकोजीकडे नोकरीस राहत. त्याप्रमाणें रघुनाथपंत हा इ. स. १६५३ ते १६६४ पर्यंत शहाजींचा नोकर होता व त्यानंतर १६७३ पर्यंत व्यंकोजीचा कारभारी होता.

शहाजींच्या पश्चात् व्यंकोजीचा कारभार रघुनाथपंतास पसंत पडला नाहीं. म्हणून तो शिवाजीस तिकडील जहागिरीच्या बंदोबस्ताकरितां बोल-वावयास आला. त्याची त्यानें अमात्यपदावर नेमणूक केली. रघुनाथपंत कर्नाटकाच्या स्वारींत शिवाजीबरोबर असून त्याची त्यास पुष्कळ मदत झाली. ती लक्षांत घेऊन शिवाजीनें कर्नाटकांत नवीन जिंकलेल्या प्रदेशाचा कारभार रघुनाथपंतास सांगितला. शिवाजीच्या मृत्यूपर्यंत व नंतरहि रघुनाथपंतच कर्नाटकाचा कारभारी असून त्यानें बराचसा पैसा शिल्लक टाकला. संभाजी गादीवर आल्यानंतर त्यानें जुलूम-जबरदस्ती चालविली व शिवाजीच्या वेळच्या मुत्सद्यांपैकीं कांहींना वधिलें व कांहींना कैद केलें. हें वृत्त कळल्या-वर रघुनाथपंतानें संभाजीच्या भेटीस मुद्दाम येऊन त्याला हितोपदेश केला. त्याचा सुपरिणामः म्हणजेः रघुनाथपंताचा भाऊ जनार्दनपंत यास संभाजीनें अटकेंतून सोडलें. रघुनाथपंत हें कार्य आटोपून कर्नाटकांत परत जात असतां वाटेंत वलण मुक्कामीं त्याचा अंत झाला.

रघुनाथपंताच्या पत्नीचें नांव सीताबाई व पुत्र नारोबा व त्रिमप्पा ( नारायण व त्रिंबक ). तो स्वतः चांगला संस्कृतज्ञ असल्यामुळें शिवाजीनें त्याजवर राजव्यवहार कोशाची कामगिरी सोंपविली.

पण रघुनाथपंतास तशी फुरसत न सांपडल्यामुळें त्यानें ती कामगिरी दुंढीराज लक्ष्मण व्यास यास सांगितली. व्यंकोजीपाशीं रघुनाथपंत व लक्ष्मणपंत व्यास असे दोन मुत्सद्दी होते. त्यांपैकीं रघुनाथपंत संस्कृतज्ञ असल्यामुळें व्यंकोजीकडे आलेला जयराम कवि यास त्यानें एक समस्या घातली होती. रघुनाथपंताचा भाऊ लक्ष्मणपंत व त्याचा पुत्र दुंढिराज. तो लिहितो –

"पवना नदीचे काठीं चिंचवड गांवांत श्रीनारायण देव हे संतशिरोमणि रहातात. ते चिंतामणीचे प्रत्यक्ष अवतार आहेत. ते गणपतीचे भक्त आहेत. त्या बुद्धिमान अशा नारायणापासून शिवप्रभूला अनुग्रह मिळाला. शिवाजीचा मुद्गल वंशांत जन्मलेला त्रिमल हणमंते नांवाचा कुलामात्य होता. त्याचा पुत्र नारायण व नारायणाचा पुत्र रघुनाथ हा सन्मार्गगामी, कलावान् व पवित्र असा श्रेष्ठ ब्राह्मण आहे. शिवाजी धर्मानें राज्य करतो, ब्राह्मणांना वृत्ति देऊन त्यांचें पोषण करतो; त्यानें पृथ्वीवरील म्लेच्छांचा उच्छेद केल्यावर यवनांच्या शब्दांनीं सगळी सरणी बिघडून गेली होती; म्हणून राज्यव्यवहारांत संस्कृत भाषेचा प्रसार करण्याकरितां त्याच्या आज्ञेवरून अमात्यवर्य रघुनाथानें 'राजव्यवहारकोश' तयार करविला. शब्दाला प्रतिशब्द देतांना म्लेच्छ शब्द कोशांत घालावे लागले आहेत. परंतु त्यामुळें कोशाला दोष लागतो असें नाहीं. विद्वानांना संमत असा हा ग्रंथ असल्यानें त्याची विटंबना कांहीं अज्ञ जनांनीं केली तर काय बिघडलें? रत्नखचित अलंकार करतांना त्यांत लाख वापरतात. त्यासारखें हें आहे. पण वरील दूषकांना उद्देशून म्हणावेसें वाटतें कीं केळें गोड असलें तरी उंटाला तें कसें आवडावें?"

शिवाजीस त्याच्या समकालीन लोकहि पुढील पिढ्यांप्रमाणें अवतारी पुरुष समजत असत. कोणी त्यास त्याच्या घराण्यांत पूर्वापार शिवभक्ति चालत आली होती म्हणून शिवाचा अवतार मानीत, तर कोणी विष्णूचा अवतार मानीत. मुसलमानांच्या जुलमानें हिंदु लोक इतके हैराण होऊन गेले होते कीं देवानें अवतार घेतला तरच या जुलमांतून आपली सुटका होईल अशी त्यांना आशा उरली होती. त्याच भावनेनें राजव्यवहारकोशकर्ता ढुंढिराज प्रेरित झाला होता.

तो म्हणतो, "यवनरूपी दैत्यांच्या जुलमानें संतप्त झालेली पृथ्वी ब्रह्मदेवांकडे गेली व या दैत्यांच्या भयापासून आम्हांस सोडीव अशी तिनें त्यांची प्रार्थना केली. ब्रह्मदेव विष्णूकडे गेले आणि विष्णूंनीं शिवाजीमहाराजांच्या रूपानें अवतार घेऊन दिग्विजय केला."

राजव्यवहारकोशाचे राजवर्ग, कार्यस्थानवर्ग, भोग्यवर्ग, शस्त्रवर्ग, चतुरंगवर्ग, सामन्तवर्ग, दुर्गवर्ग, लेखनवर्ग, जनपदवर्ग, पण्यवर्ग असे दहा वर्ग

पाडण्यांत आले असून राजवर्गांत राजा, त्याचें प्रधानमंडळ व परिवार यांचा विचार केला आहे. कार्यस्थानवर्गांत खजिना, त्यावरील अधिकारी, व नाणीं यांचे प्रतिशब्द आहेत. भोग्यवर्गांत उपभोगाच्या वस्तु, शस्त्रवर्गांत शस्त्रास्त्रांचीं नांवें, चतुरंगवर्गांत हत्ती, घोडे यांचें सामान व नोकर यांचा तपशील, सामन्तवर्गांत सैन्य व त्यांतील कामगार, दुर्गवर्गांत दुर्गांचे प्रकार व त्यावरील अधिकारी यांची माहिती, लेखनवर्गांत लेखक, त्यांचें साहित्य व राज्यकारभारांतील कागदपत्रांचीं पारिभाषिक नांवें, जनपदवर्गांत देशाचे राजकीय विभाग, पण्यवर्गांत अठरा पगड जाती व त्यांचे व्यवसाय यांची नामावळी आहे. कोश लहानच पण आवश्यक ते मूळ शब्द व त्यांचे प्रतिशब्द देणारा आहे. सर्वच प्रतिशब्द म्लेच्छ शब्दांना प्रतिशब्द म्हणून दिलेले नसून कित्येक ठिकाणीं मराठी शब्दांनाहि संस्कृत प्रतिशब्द देण्यांत आले आहेत. उदाहरणार्थ वाणी याला वैश्य, कासाराला कंकणकार, चितारी याला चित्रकार इत्यादि. अशा रीतीनें छोटा का होईना कोश तयार झाला तरी त्यास अनुसरून भाषेचें शुद्धीकरण त्यानंतर झालेलें दिसत नाहीं.

## राजशक

शिवाजीनें राज्याभिषेकानंतर जे अनेक उपक्रम केले त्यांपैकीं राजशक हा महत्त्वाचा उपक्रम होय. शिवाजीपूर्वी असंख्य हिंदुराजे भरतखंडांत होऊन गेले, पण त्यांत स्वतःचा शक सुरू करणारे विक्रम व शातवाहन यांसारखे विरळा. मुसलमान राजे आपला जुलूस म्हणजे राजशक सुरू करीत, पण तो ज्याच्या त्याच्या मृत्यूबरोबर बंद पडत असे. शिवाजीच्या राजशकाचें तसें झालें नाहीं. तो विक्रम व शातवाहन यांसारखा अखंड सुरू राहिला नाहीं किंवा जुलुसासारखा ताबडतोब बंदहि पडला नाहीं. तो मराठी राज्याच्या अंतापर्यंत चालू राहिला. पण त्याचा वापर सरकारी सर्व कागदपत्रांत सतत व सर्वत्र चालू होता असें दिसत नाहीं. शिवकालांतहि कांहीं विशिष्ट प्रसंगींच तो वापरण्यांत येई. कारण त्याच्या कारकीर्दीतील असे कित्येक कागद आहेत कीं त्यावर तो घातलेला नाहीं.

शिवराजशक ज्येष्ठ शुद्ध १३ शके १५९६ पासून सुरू झाला. शक १५९८।१५९९।१६०० मध्यें शिवाजीनें पाठविलेल्या पत्रांवर राजशक नाहीं, शालिवाहन शकहि नाहीं, मात्र सुहुरसनच आहे. मोरोपंत पिंगळे व अण्णाजी

दत्तो सचीव यांच्या अगदीं थोड्या पत्रांवर राजशक आहे. मोरेश्वर पंडितराव यांच्या पत्रांवर राजशक आहे.

शिवाजीनंतर शाहूमहाराजांच्या कारकीर्दीकडे वळल्यास शाहू व संभाजी यांजमध्यें जो वारणेचा तह झाला त्यावर राजशक नाहीं. पेशवाईत सवाई माधवरावांच्या मरणानंतर दुसऱ्या शाहूछत्रपतींनीं नानाफडणविसास पुढील व्यवस्थेबद्दल लिहिलेल्या पत्रावर राजशक १२१ आहे. सातारच्या गादीवरील छत्रपति प्रतापसिंह महाराज इ. स. १८३९ सालीं काशीस जाईपर्यंत त्यांनीं दिलेल्या सनदांवर राजशक आहे. सारांश, शिवाजी व त्यानंतरचा काळ यांत राजशक चालू होता पण तो सतत न वापरतां कारण-परत्वें वापरला जाई ( शि. च. सा. खंड ८, प्रस्तावना ).

## नेताजी पालकर

नेताजी पालकर हा शिवाजीचा प्रमुख सेनापति होता. त्याला त्याच्या पराक्रमावरून प्रातिशिवाजी म्हणत असत. तो कोंकणांत शिवाजीशीं भांडून इ. स. १६६६ त मोगलास जाऊन मिळाला. तो जयसिंगाबरोबर असून जयसिंगानें मोगलाच्या पदरीं त्यास मनसबदारी दिली होती. शिवाजी मे महिन्यांत ( इ. स. १६६६ ) आग्र्यास पोंचल्यावर त्याला कैद करण्यांत आलें व त्यानंतर तो पळून महाराष्ट्रांत आला. औरंगजेबास या घटनेचा सहाजिकच राग येऊन त्याला नेताजीच्या इमानाविषयींहि संशय वाटूं लागला. म्हणून नेताजीस कैद करण्याचा हुकूम त्यानें दक्षिणेंत जयसिंगास पाठविला. त्याप्रमाणें जयसिंगानें त्यास युक्तीनें अटक करून दिल्लीस रवाना केलें. तेथें औरंगजेबानें त्याला कोतवालाच्या ताब्यांत देऊन 'तीन दिवसांच्या आंत बाटून मुसलमान तरी हो, नाहीं तर तुझा शिरच्छेद होईल अशी त्यास धमकी दिली. नेताजी मरणाच्या भीतीनें बाटला. त्याची सुंता झाली व त्याला महमद कुली हें नांव मिळालें. त्यानंतर त्याची बायको व मुलें यांनाहि दक्षिणेंत महमदी धर्माची दीक्षा देण्यांत आली. दिल्लीहून त्यास दहा वर्षेपर्यंत अफगाणिस्थानाच्या मोहिमेवर पाठविण्यांत आलें. तो मे १६७६ त शिवाजीकडे परत आला.

शिवाजीनें त्यास शुद्धीकरणानें इ. स. १६७६ त हिंदु करून घेतलें. त्याला शिवाजीनें दिलेलें व पुरातन असें वतनी उत्पन्न होतें. त्यांतच

पसरणी हा गांव त्याजकडे मोकासा होता. त्यानें परत आल्यावर आपल्या मुलाला गोतांत घेण्याबद्दल देशमुख देशपांडे व गोत मिळविलें व त्यांनीं त्यास गोतांत म्हणजे जातींत घेतलें. शुद्धीकरणाचा हा शिवाजीचा उपक्रम नवीनच असल्यामुळें नेताजीस व त्याच्या कुटुंबीय मंडळीस मराठा जातींत घेतलें असलें तरी त्याच्या प्रत्यक्ष व्यवहारास मराठे लोक खळखळ करूं लागले असावे, म्हणूनच नेताजीस वरीलप्रमाणें गोत जमविणें भाग पडलें ( शि. च. सा. खंड ८, पृ. ८२ ).

## बजाजी नाईक निंबाळकर

( जन्म इ. स. १६४४ व मृत्यु इ. स. १६७६ )

फलटणचे राजे बजाजी नाईक निंबाळकर यांस मुसलमानांनीं बाटविलें होतें, पण त्यांस शिवाजीनें शुद्ध करून घेतलें अशी प्रसिद्धि आहे. तिजवर प्रकाश पाडणारें एक पत्र रत्नाकर मासिकांत इ. स. १९२७ या वर्षी छापलें होतें. त्याचा सारांश – विजापूरच्या बादशहानें अफजलखानास इ. स. १६५९ त शिवाजीवर पाठविलें होतें. विजापुराहून वाईकडे येत असतां अफजलखान वाटेंत मलवडीस उतरला होता. त्याला बजाजी हा शिवाजीस सामील असल्याचा संशय येऊन त्यानें त्यास दस्त करून, गळ्यांत तोफ घालून व सुंता करून हत्तीच्या पायाखालीं घालून मारण्याचें ठरविलें. त्या वेळीं नाईकजी राजे पांढरे यांनीं साठ हजार होनांस जामीन राहून त्यास सोडविलें. सदर रकम बजाजी नाईक निंबाळकर व सावित्रीबाई भ्रतार बजाजी नाईक निंबाळकर यांनीं मलवडीचे सावकार जयचंदजीभाई व जमामाव बाबान-भाई यांजपासून पंचोत्राप्रमाणें व्याज कबूल करून दोन वर्षांच्या मुदतीनें कर्जाऊ काढून आपली मुक्तता करून घेतली ( शि. प. सा. सं. पृ. ५३४।३५). याचा मुलगा महादजी हा शिवाजीचा जांवई.

## मंदिरांचा पुनरुद्धार

मुसलमानांनीं हिंदूंचीं शेंकडों मंदिरें पाडून त्यांच्या मशिदी बनविल्या. त्या मशिदी पाडून पुनः त्या ठिकाणीं मंदिरें बांधणें हें हिंदुधर्माचा उद्धारक या दृष्टीनें शिवाजीचें कर्तव्य होतें. तें त्यानें कर्नाटकाच्या स्वारींत बजावलें असें खालील पत्रानें सिद्ध होतें –

" जिंजीच्या किल्ल्याची दुरुस्ती केल्यानंतर शिवाजी तिरुवन्नमालेकडे गेला. तो शिवभक्त होता. तिरुवन्नमाले येथील शिवाचें व समोत्तिपेरूमल याचें देवालय पाडून मुसलमानांनीं मशिदी बनविल्या होत्या. शिवाजीनें त्या दोन्ही मशिदी नष्ट केल्या आणि तेथें शिवालयांची स्थापना केली. समोत्तिपेरूमल याच्या देवालयांतील विटांचा उपयोग करून नायक राजांनीं एक हजार खांबांचा मंडप बांधला होता. त्यापुढें शिवाजीनें गोपुर बांधलें. तेथील टेकडीवर कार्तिक महिन्यांत दीपोत्सव शिवाजीनेंच सुरू केला " ( शि. च. सा. खंड ८, पृ. ५५।५६ ).

# प्रकरण विसावें

# शिवाजीचा राज्यविस्तार

शिवाजीच्या राज्याचा प्रारंभ शहाजीच्या जहागिरींतून झाला. प्रथम तो पुणें प्रांतांत शहाजीचा प्रतिनिधि वा मुखत्यार या नात्यानें त्याच्या जहागिरीचा कारभार पाहावयास आला व त्या जहागिरीच्या साहाय्यानें त्यानें स्वराज्याची उभारणी व विस्तार केला. शहाजीनें विजापूरकरांची नोकरी पत्करली तेव्हां निरा व भीमा या दोन नद्यांच्या त्रिकोणांतील प्रदेश त्याच्या ताब्यांत होता. या वेळीं पुणें परगण्यांत त्याचे २८८ गांव असून त्यांच्या सात तरफा होत्या व शहाजीस त्यांचा मोकासा मिळाला होता. यांपैकीं कर्यात मावळाचे फक्त ३६ गांव बाल शिवाजीच्या नांवाखालीं मोडत असत. सांडस खुर्दचे २० गांव शहाजीचा चुलत भाऊ संबाजी याजकडे होते आणि बाकीच्या २३२ गांवांची व्यवस्था दादाजी कोंडदेवाकडे होती.

पुणें परगण्यापलीकडे असलेल्या शहाजीच्या जहागिरींतील इतर परगण्यांची व्यवस्था हळूहळू शिवाजीकडे येत चालली. चाकण परगणा शके १५६१ त व इंदापूर परगणा शके १५६७ त शिवाजीस देण्यांत आला. सुपें परगण्याची वहिवाट शहाजीचा मेहुणा संभाजी मोहिते करीत होता. तो शिवाजीनें त्याजपासून युक्तीनें पुढें काढून घेतला. बारा मावळांपैकी गुंजण

मावळाचा मोकासा शहाजीकडे असून बाकीचीं मावळें निरनिराळ्या मोकासदारांकडे असावीं. मिळून शके १५६९ च्या सुमारास शहाजीच्या जहागिरींत दादाजी कोंडदेव, शिवाजी, मंबाजी व संभाजी मोहिते असे चौघे वहिवाटदार नांदत होते.

शिवाजीनें हा प्रदेश घेऊन त्या भांडवलावर आपलें राज्य वाढविलें. त्यासाठीं तो वयाच्या सतराव्या वर्षापासून लढाया मारीत होता व प्रदेश जिंकीत होता. हा त्याचा प्रचंड उद्योग अव्याहत तेहतीस वर्षें चालू होता. त्यांत त्यानें घेतलेले प्रदेश किती तरी वेळां त्याच्या हातून गेले व त्यानें ते पुनः परत मिळविले. अशा बेरीज-वजाबाकींतून मरणसमयीं त्याजपाशीं नक्की किती मुलूख शिल्लक राहिला होता हा मुख्य प्रश्न आहे; पण त्याला तितकेंच नक्की उत्तर देणें कठीण आहे. कै. न्या. रानडे यांनीं शिवाजीच्या राज्यांत सोळा प्रांत मोडत असल्याचें सांगून त्यांचीं नांवें पुढीलप्रमाणें दिलीं आहेत :– ( १ ) मावळ प्रांत, ( २ ) वाई, ( ३ ) सातारा, ( ४ ) कऱ्हाड, ( ५ ) पन्हाळा, ( ६ ) दक्षिण कोंकण, ( ७ ) ठाणें, ( ८ ) त्रिंबक, ( ९ ) बागलाण, ( १० ) वनगड, ( ११ ) बिदनूर, ( १२ ) कोल्हार, ( १३ ) श्रीरंगपट्टण, ( १४ ) कर्नाटक, ( १५ ) वेलोर, ( १६ ) तंजावर.

न्या. रानडे यांनीं दिलेलीं नांवें स्थूलमानानें बरोबर आहेत; परंतु त्यांवरून प्रत्येक प्रांताच्या क्षेत्रफळाचा नक्की बोध होईलच असें नाहीं. कारण दक्षिण कोंकण म्हटलें तरी त्यांतून जंजिरा संस्थानाचा कांहीं भाग व कुडाळ संस्थान वगळलें पाहिजे. कर्नाटक हें नांव उच्चारलें कीं, सध्या तरी विजापूर, धारवाड, बेळगांव, कारवार हे मुंबई राज्यांतील जिल्हे डोळ्यांसमोर येतात. त्यांशिवाय मद्रासराज्य व निजामराज्य यांतील कर्नाटकी जिल्हे आहेतच. पण शिवाजीच्या मरणसमयीं विजापूरचें आदिलशाही राज्य विद्यमान असल्यानें विजापूर जिल्हा, धारवाड व कारवार जिल्ह्याचा बराच भाग व बेळगांव जिल्ह्याचा कांहीं भाग शिवाजीच्या राज्यांतून वगळावाच लागेल.

मुंबईचे विश्राम मावजी यांनीं स्वराज्याचा जाबता प्रसिद्ध केला आहे. तो शाहू छत्रपतींच्या कारकीर्दींमधील उत्तरार्धांतील आहे. त्यांत पुढील प्रांतांचा समावेश करण्यांत आला आहे :–

(१) गणदेवीसुद्धां सुभा रामनगर, (२) सुभा-जव्हार प्रांत, (३) सुभा प्रांत भिवंडी – बारा तालुके, (४) सुभा कल्याण – वीस तालुके, (५) चेऊल सुभा – सहा तालुके, (६) राजपुरी सुभा – बारा तालुके, (७) सुभा जावळी – १८ तालुके, (८) सुभा दाभोळ – ११ तालुके, (९) सुभा राजापूर – १८ तालुके, (१०) सुभा कुडाळ – १५ तालुके, (११) सुभा प्रांत भीमगड – ५ तालुके, (१२) सुभा प्रांत अकोलें – ५ तालुके, (१३) सुभा पुणें – ६ तालुके, (१४) सुभा बारामती, (१५) इंदापूर, (१६) सुभा प्रांत मावळ – १३ तालुके, (१७) सुभा प्रांत वाई – ४ तालुके, (१८) सुभा प्रांत सातारा – ६ तालुके, (१९) सुभा प्रांत कऱ्हाड – ९ तालुके, (२०) सुभा प्रांत खटाव – ११ तालुके, (२१) सुभा प्रांत माण – ४ तालुके, (२२) सुभा प्रांत फलटण महाल, (२३) सुभा प्रांत बेळगांव, (२४) सुभा संपगांव, (२५) सुभा गदग, (२६) सुभा लक्ष्मेश्वर, (२७) सुभा नवलगुंद, (२८) सुभा कोपळ, (२९) सुभा हल्ल्याळ, (३०) सुभा बेटगिरी, (३१) सुभा मलकापूर – ४ तालुके, (३२) सुभा प्रांत पन्हाळा – १० तालुके, (३३) सुभा तारळें – ५ तालुके, (३४) सुभा आजरें – ५१ परगणे, (३५) सुभा प्रांत जुन्नर – २४ तालुके.

वरील दोन्ही याद्या श्री. सुरेंद्रनाथ सेन यांनी आपल्या ‘ अॅडमिनिस्ट्रेटिव्ह सिस्टिम ऑफ शिवाजी ’ या पुस्तकांत छापल्या आहेत. त्यांना दुसऱ्या यादीविषयीं साहजिकच संशय वाटून तिजमधील कांहीं प्रदेश शाहूच्या कारकीर्दीत मागाहून जिंकून घेतला असेल असें त्यांनीं म्हटलें आहे व तेंच खरें दिसतें. तींत ज्यांना तालुके असें नांव देण्यांत आलें आहे तें वाचून कोणासहि हल्लींच्या तालुक्याच्या विस्ताराची आठवण होईल. त्या दृष्टीनें त्यांजकडे पाहतां कामा नये इतके ते लहान असले पाहिजेत. खटाव सुभ्यांत हल्लींच्या एवढे ११ तालुके कोठून असणार ! सुभा जुन्नर यांतील जुन्नर गांव नानासाहेब पेशव्यानें मुसलमानांपासून जिंकून घेतलें. तें शिवाजीच्या राज्यांत कसें असेल ? फलटण हें संस्थान परवांपर्यंत विद्यमान होतें. तें पेशवाईतहि मराठी राज्यांत सामील नव्हतें. तेथील संस्थानिक निंबाळकर हे मात्र मराठी राज्याचे मांडलिक झाले होते. अशा स्थितींत फलटण महाल हा फलटण संस्थान सोडून लोणंदपासून शिरवळापर्यंतचा समजावा

लागेल. या दृष्टीनें दुसऱ्या यादीपेक्षा पहिली यादीच अधिक विश्वसनीय मानावयास पाहिजे.

शिवाजीच्या राज्यविस्ताराचा छडा लावण्याचा आणखी एक उपाय आहे. शिवचरित्रपत्रसारसंग्रहांत शिवाजीविषयीं बहुतेक सारा पत्रव्यवहार छापला आहे. शिवाजीच्या राज्यास स्थैर्य इ. स. १६७२ पासून आलें असें समजण्यास हरकत नाहीं. तेथून शिवाजीच्या मृत्यूपर्यंतचीं पत्रें तपासलीं म्हणजे त्याच्या राज्याचा बराचसा खात्रीलायक अंदाज करतां येईल. तसा प्रयत्न येथें करीत आहें. त्या कालांत आलेलीं गांवें व प्रांत अनुक्रमानें देणेंच सोयीचें आहे. प्रथम मावळापासून आरंभ करून इतर प्रदेशांकडे वळणें बरें.

गुंजण मावळ, कर्यात मावळ, मौजे नांदेड, तर्फ मावळ, रोहिडखोरें, प्रांत पुणें, प्रांत चाकण, तर्फ नीरथडी, सासवड, इंदापूर, सुपें, सुभा जावली, परगणे शिरवळ व वाई, सातारा, निगडी, तर्फ सातारा, सज्जनगड, निंब, संमत कोरेगांव, तपे कोळें, प्रांत कऱ्हाड, चाफळ, तपे शिराळें, तर्फ मलकापूर, पन्हाळा, पेण, चौल, अष्टमी, नागांव, निजामपूर, नागांव, पनवेल, महाड, तळें, कल्य ाण, भिवंडी, भीमगड, जव्हार, रामनगर, सरकार जुन्नर ( जुन्नर गांव सोडून ), जुन्नर ते कल्याण-भिवंडीपर्यंतचें कोंकण, साल्हेर, मुल्हेर, नासिक, त्रिंबक, पट्टागड, विजापुरी कोंकण म्हणजे राजापूर, दाभोळ, चिपळूण, संगमेश्वर तर्फ कुडाळ, मामलें प्रभावळी, फोंडा किल्ला, भिवगड ( डिचोली ), अंकोला, कारवार, शिवेश्वर, जिंजी, वेलोर, पिलुकोंडा.

ही यादी न्या. रानडे यांच्या यादीशीं पुष्कळ अंशीं जुळते. रानड्यांच्या यादींत श्रीरंगपट्टण आहे, पण तें शिवाजीनें लुटलें, घेतलें नाहीं. त्यानें ज्याला हल्लीं आपण कर्नाटक म्हणतों तें घेतलें नाहीं. पण त्यांतील मुळगुंड, लक्ष्मेश्वर, गदग या पेठा लुटून उद्ध्वस्त केल्या. तीच स्थिति हुबळी, अथणी या गांवांची झाली. जव्हार व रामनगर हीं संस्थानें प्रथम त्यानें घेतलीं, पण मागाहून त्याच्या हातून सुटलीं. या सर्वांची गोळाबेरीज केल्यास असें दिसून येतें कीं, कारवार जिल्ह्याचा बराच भाग, गोवें-राज्यांतील कांहीं भाग, ब्रिटिश राज्यांतील रत्नागिरी, कुलाबा, ठाणें हे जिल्हे, नाशिक जिल्ह्याचा पश्चिम भाग, पुणें जिल्ह्याचा भीमेच्या पश्चिमेकडील भाग, सातारा जिल्ह्याचा पाऊण हिस्सा व

कोल्हापूर संस्थानाचा पश्चिम भाग शिवाजीच्या राज्यांत-त्याच्या मरणसमयीं मोडत होता. त्याशिवाय जिंजीकडे १।२ जिल्ह्यांएवढा प्रदेश. थोडक्यांत हल्लींच्या भाषेंत बोलावयाचें तर ७।८ जिल्ह्यांइतका प्रदेश शिवाजीच्या पदरांत शेवटीं पडला होता.

सभासद शिवाजीच्या राज्यविस्तारासंबंधाने लिहितांना म्हणतो, ' त्याचें राज्य सालेरी किल्ल्यापासून गोदावरी नदीअलीकडे ( पश्चिम बाजू ), वरघाट, तळघाट, तुंगभद्रापावेतों हा एक प्रांत व तुंगभद्रेपलीकडे कोल्हार, बाळापूर, चंदी, येलूर ( वेलोर ) ते कावेरीपावेतों दुसरा प्रांत ( कर्नाटक ) असें होतें. ' पैकीं 'तुंगभद्रापावेतों' हें त्याचें विधान अतिशयोक्तीचें वाटतें. बेळगांव व धारवाड या तुंगभद्रेच्या दक्षिणेकडील जिल्ह्यांवर त्याचें राज्य नसावें. कर्नाटकांतील त्यानें दिलेला प्रदेश वर मीं म्हटल्याप्रमाणें १।२ जिल्ह्यांएवढा असावा.

आतां सभासदानें दिलेल्या किल्ल्यांच्या नांवावरून अधिक बोध होतो कीं काय हें पाहूं. त्यांतील सीमा दर्शविणाऱ्या किल्ल्यांचीं नांवें येणेप्रमाणें – रांगणा, चंदन-वंदन, जयगड, लोहगड, फोंडा, कोट मंगळूर, अंकोले, त्रिंबक, माहुली, सुवर्णदुर्ग, वारुगड, महिमानगड, मच्छिंद्रगड, नवलगुंद, घोसाळा, जंजिरे रत्नागिरी, जंजिरे कुलाबा, मंडनगड आणि कर्नाटकांत कोल्हार, बिदनूर, वेलोर, बाळापूर ( वरघाट ). यांत सातारा जिल्ह्याच्या पूर्व भागांतील कांहीं किल्ले आहेत. त्यावरून त्याभोंवतालचा प्रदेश शिवाजी-कडे असेलच असें म्हणवत नाहीं.

## प्रकरण एकविसावें

# ग्रंथकार व ग्रंथोत्तेजन

### (१) पंडित गागाभट्ट

गागाभट्ट यांचें खरें नांव विश्वेश्वर. त्यांचे वडील दिनकर ऊर्फ दिवाकर. त्यांनींच विश्वेश्वरास लाडिकपणानें गागा म्हणण्यास सुरुवात केल्यावर विश्वेश्वर हें नांव मागें पडून गागाभट्ट हेंच नांव रूढ झालें. यांचें मूळ घराणें पैठणचें. या घराण्यांत अनेक पंडित व ग्रंथकार जन्मास आले. त्यांतील एक पंडित रामेश्वरभट हे मीमांसा, व्याकरण, तर्क, वेदान्त इत्यादि शास्त्रांत पारंगत होते. श्रीहर्षाच्या नैषधीय चरिताशीं स्पर्धा करण्याकरितां त्यांनीं रामकुतूहल या नांवाचें काव्य रचिलें. पैठणांत ते राहत; त्या ठिकाणीं भारतवर्षांतून विद्यार्थ्यांच्या झुंडीच्या झुंडी विद्यार्जनास येत असत.

रामेश्वरभट पैठणाहून संगमनेरास गेले. तेथें असतांना अहमदनगरच्या निजामशाही दरबारांत जाफर मलिक नांवाचा उमराव होता. त्याच्या पुत्राला महारोग झाला होता, त्यापासून रामेश्वरभटांनीं त्यास बरें केलें असें भट्टवंशकाव्य व गाधिवंशानुचरित या दोन ग्रंथांत लिहिलें आहे.

संगमनेराहून रामेश्वरभट कोल्हापुरास आले. कोल्हापूरची महालक्ष्मी ही त्यांची कुलदेवता. पुत्रप्राप्तीकरितां तिची त्यांनीं तेथें आराधना केली. रामेश्वरभट कोल्हापुरास असतां विजयानगरास सम्राट् कृष्णदेवराय हा

राज्य करीत होता. त्याच्या भेटीस ते गेले. तेथून त्यांनीं द्वारकेची यात्रा केली. द्वारकेला जात असतांना वाटेंतच शके १४३५ च्या चैत्र महिन्यांत पहिला पुत्र झाला. त्याचें नांव नारायणभट. द्वारकेंत चार वर्षें राहून त्यांनीं तेथें महाभाष्य व सुरेश्वराचार्यांचे वार्तिक हे विषय तेथील विद्यार्थ्यांना शिकविले. द्वारकेहून ते परत पैठण येथें आले. पैठणास पुनरपि चार वर्षें वास्तव्य करून सर्व विद्यांचें आगर जें काशीक्षेत्र त्याचा त्यांनीं रस्ता धरला. काशीचा उल्लेख त्यांचे चिरंजीव नारायणभट यांनीं आपल्या 'त्रिस्थळी सेतु' या ग्रंथांत 'ती नगरी सुवर्णाचा पर्वत जो मेरु त्याच्याशीं सादृश्य पावते व तिजपेक्षां दुसरी कोणतीहि नगरी श्रेष्ठ नाहीं' असें म्हटलें आहे.

श्रिता वाराणशी तेन नगरी न गरीयसी ।
यतोन्या नगरी हेमनगरीतिमुपेयुषी ॥

काशीस जातांना वाटेंत त्यांना दुसरा पुत्र झाला, त्याचें नांव श्रीधर. काशीस पोंचल्यावर त्यास तिसरा पुत्र झाला. त्याचें नांव माधव. प्रथम पुत्र नारायण याच्या जन्मकाळींच रामेश्वरभट यांचें वय बरेंच झालें होतें, असें गाधिवंशानुचरितांत सांगितलें आहे. ( गागाभट्ट हे गाधिवंशांतील ).

काशीस त्यांजपाशीं अध्ययन करण्यास बरेच शिष्य आले. त्यांपैकीं कोंकणचे अनंतभट चित्तल ( चितळे ), दामोदर-सरस्वती व मधुसूदन-सरस्वती यांचे गुरु माधव-सरस्वती महेश ठक्कर, शंकरमिश्र हे प्रमुख होते. भटजी फार वृद्धपणीं कैलासवासी झाले. त्यांची पत्नी त्यांजबरोबर सती गेली. नारायण-भट श्रीधर व माधव या तीन पुत्रांनीं युक्त असे रामेश्वरभट परब्रह्मासारखे शोभत, असें भटजींचे नातू व माधवपुत्र रघुनाथ यांनीं आपल्या 'काल-तत्त्वविवेचन' या ग्रंथांत म्हटलें आहे.

येथून पुढे हें घराणें काशीचें म्हणून समजण्यांत येऊं लागलें. नारायणभट यांनीं सर्व शास्त्रांचें अध्ययन आपले वडील रामेश्वरभट यांजपाशींच केलें. काशींत मैथिल व गौड पंडितांशीं त्यांचीं तुमुल वाग्युद्धें होत. अकबराचा वसूलमंत्री प्रसिद्ध तोडरमल्ल यांची नारायणभटाशीं मैत्री होती. तोडरमल्लाच्या वाड्यांत त्यांनीं विद्यानिवासादि गौड-मैथिल पंडितांचा वाग्युद्धांत खरपूस समाचार घेतला, असें गाधिवंशानुचरितांत व भटवंश-

काव्यांत वर्णन आहे. नारायणभट्टांच्या विद्वत्तेमुळें दाक्षिणात्य पंडितांचें वर्चस्व वाराणसी क्षेत्रांत झालें व तें अजून कायम आहे. नारायणभट हे भटवंशांतील अत्यंत प्रसिद्ध असे पुरुष होत. त्यांनीं आपल्या गाढ विद्वत्तेनें, पवित्र आचरणानें व गीर्वाण ग्रंथांसाठीं केलेल्या सततोद्योगानें आपल्या कुळाला अत्यंत भूषविलें. स्वतः ग्रंथ लिहिणें व लिहवून घेणें व हस्तलिखित ग्रंथ जमविणें याचा त्यांना फार नाद होता.

भरतवर्षांतील सर्व पंडित नारायणभटांना आपला पुरस्कर्ता समजत असत. काशींतील विश्वेश्वराच्या मंदिराचा मुसलमानांनीं विध्वंस केला. त्यामुळें भयंकर दुष्काळ पडला. तेव्हां बादशहानें विश्वेश्वराची आराधना करून पाऊस पाडण्याविषयीं नारायणभटापाशीं विनवणी केली व नारायणभटांनीं विश्वेश्वराची आराधना करून पाऊस पाडला आणि बादशहाकडून विश्वेश्वराचें देवालय पुनः बांधण्याची परवानगी मिळविली अशी दंतकथा आहे. भट्टवंश काव्यांत ही कथा दिलेली आहे. नारायणभटांचा जन्म इ. स. १५१३ त झाला. त्या अर्थीं या वेळीं दिल्लीस सूर घराण्यांतील कोणी बादशहा वा अकबर असला पाहिजे. कारण नारायणभटांचा नातू नीलकंठ याचा दौहित्र दिवाकर यानें आपल्या 'दानहीरावलीप्रकाश' या ग्रंथांत नारायणभटांनीं विश्वेश्वराची स्थापना विधिपूर्वक केली असें म्हटलें आहे. त्याचप्रमाणे 'दिनकरोद्द्योत' या ग्रंथांत गागाभट्टांनीं हेंच सांगितलें आहे. भट्टवंश काव्यांतहि नारायणभट्टांनीं विश्वेश्वराचें देवालय पुनः बांधल्याचें वर्णन आहे. नारायणभटांची विद्वत्ता व सदाचरण यांवरून त्यांना जगद्गुरु ही पदवी लावण्यांत येऊं लागली. यावरून औरंगजेबापूर्वींहि काशीविश्वेश्वराच्या मंदिराचा मुसलमानांनीं विध्वंस केल्याचें दिसून येतें.

नारायणभटांना तीन पुत्र होते. नारायणभटांचे ज्येष्ठ पुत्र रामकृष्णभट यांना तीन पुत्र – दिनकर ऊर्फ दिवाकर, कमलाकर व लक्ष्मण – होते. दिनकरभट महाविद्वान् होते. त्यांना विश्वेश्वरभट नांवाचा पुत्र झाला. यालाच गागाभट्ट म्हणतात. गागाभट्टांनीं अनेक शास्त्रांवर ग्रंथ रचिले. पण त्यांचा मुख्य भर मीमांसा व धर्मशास्त्र यांवर होता. मीमांसाकुसुमाञ्जलि या नांवाचा ग्रंथ त्यांनीं लिहिला आहे. ही पूर्वमीमांसेची वृत्ति आहे. त्याच विषयावर त्यांनीं भाट्टचिन्तामणि हा ग्रंथ लिहिला. त्यांचा फार मोठा

ग्रंथ दिनकरोद्द्योत हा धर्मशास्त्रावर आहे. याची सुरुवात गागाभट्टांचे वडील दिनकरभट यांनीं केली होती. याशिवाय त्यांचा प्रसिद्ध ग्रंथ कायस्थ-प्रदीप. हा ग्रंथ शिवराज्याभिषेकानंतर लिहिलेला असून त्यांत अवरंगजेब, राजगिरि ( रायगड ), जीजा, बालाजी कायस्थ ( बाळाजी आवजी ) यांचा उल्लेख व कायस्थांचे संस्कार इत्यादि गोष्टी आहेत. त्यांत शिवाजीच्या वंशाला शिशुङ्गवंश ( सिसोदिया ) म्हटलें आहे. त्याची रचना शके १५९६ ज्येष्ठ शु. १३ रोजीं ( ६ जून १६७४ ) म्हणजे राज्याभिषेकानंतर लागलीच झाली. गागाभट्टांनीं पूर्वमीमांसेच्या बारा अध्यायांवर शिवछत्रपतींच्या आज्ञेनें शिवार्कोदय हा ग्रंथ लिहिला.

भटवंशांतील विद्वान् पुरुषांनीं वेळोवेळीं धैर्यानें पुढें येऊन पूर्वीच्या निबंधकारांना ज्या सुधारणा सुचविण्याचें धैर्य झालें नाहीं त्या केल्या असें दिसून येतें. त्याचप्रमाणें गागाभट्टांनीं धैर्य धरून क्षात्रकर्माचें आत्यंतिक पालन करणाऱ्या परंतु संस्कार बरेच दिवस लुप्त झालेल्या शिवाजीमहाराजांचा व्रतबंध व वैदिक पद्धतीनें राज्याभिषेक करून नवी प्रथा पाडिली. या दृष्टीनें या भट्ट घराण्याची व विशेषतः गागाभट्टांची कामगिरी कौतुक करण्यासारखी आहे ( शिवाजी निबंधावली १, शिवछत्रपति व गागाभट्ट – पां. वा. काणे, मुंबई).

गागाभट्टांचा मुक्काम रायगडावर शिवछत्रपतीपाशीं राज्याभिषेकापूर्वी व नंतर बरेच दिवस असल्याचें वरील माहितीच्या आधारें म्हणतां येतें. अष्ट-प्रधानांचीं संस्कृत नावें व अधिकार त्यांनींच सुचविले असावे. भट्टजींचें घराणें मूळ महाराष्ट्रीय व भाषाहि मराठी, या दृष्टीनें त्यांचा महाराष्ट्राशीं जिव्हाळ्याचा संबंध होता. त्यांचें महाराष्ट्रांत येणेंजाणेंहि शिवकालांत वारंवार होत असावें. महाराष्ट्रांत येऊन ते धार्मिक प्रश्न सोडविण्यास मदत करीत. शेणव्यांच्या जातीविषयीं वाद उत्पन्न झाल्यावर शिवाजीच्या कोंकणांतील दौऱ्यांत राजापुरास जी धर्मपरिषद् भरविण्यांत आली होती तिला भट्टजी उपस्थित होते. त्या अर्थी महाराजांचा व त्यांचा राज्याभिषेकापूर्वीपासून दाट परिचय असला पाहिजे. मुसलमानांनीं कसा प्रलय मांडला होता व त्यांच्या छळांतून भारतभूस सोडविण्याचें कंकण महाराजांनीं कसें बांधलें होतें, याचें अनुभव-सिद्ध ज्ञान असलेल्या गागाभट्टांनीं महाराजांचा वेदोक्तपद्धतीनें राज्या-भिषेक करावा, यांत त्यांची दूरदृष्टीच दिसून येते.

## करणकौस्तुभ

( ले. द. वि. आपटे, शिवचरित्र-प्रदीप )

शिवकालांत भाषाशुद्धीसाठी राजव्यवहारकोश तयार करण्यांत आला. त्याप्रमाणें पंचांगशुद्धीसाठीं करणकौस्तुभ नांवाचा ग्रंथ मुद्दाम कृष्ण ज्योतिष्यानें रचिला. ही गोष्ट कै. शंकर बाळकृष्ण दीक्षित यांनीं भारतीय ज्योतिःशास्त्र या ग्रंथांत प्रथम मराठी वाचकांच्या निदर्शनास आणिली. करणकौस्तुभांत चौदा भाग पुढीलप्रमाणें आहेत. –

( १ ) मध्यमग्रहसाधन, ( २ ) सूर्य-चंद्र-स्पष्टीकरण, ( ३ ) पंचतारा-स्पष्टीकरण, ( ४ ) त्रिप्रश्न, ( ५ ) चंद्रग्रहण, ( ६ ) सूर्यग्रहण, ( ७ ) तिथि-नक्षत्रावरून ग्रहण साधन, ( ८ ) उदयास्त, ( ९ ) ग्रहच्छाया, ( १० ) चंद्र-शृंगोन्नति, ( ११ ) ग्रहयुति, ( १२ ) नक्षत्रच्छाया, ( १३ ) पात, ( १४ ) पातसंभवासंभवलक्षण.

यावरून या ग्रंथाची मांडणी ग्रहलाघवपद्धतीची आहे असें ठोकळ मानानें दिसून येईल. ग्रंथाच्या प्रारंभीं ‘ वन्दे केशवदैवज्ञं सार्वभौमपदांबुजम् ’ असें नमन आहे. याचा अर्थ कृष्ण ज्योतिषी हा ग्रहलाघवकारांच्या पित्याच्या म्हणजे केशवाच्या ग्रंथाविषयीं आदर बाळगणारा दिसतो. परंतु ग्रहलाघव ग्रंथ शके १४४२ मध्यें रचल्यानंतर शेंसवाशें वर्षांतच त्याचा दृक्प्रत्यय येत नाहीं अशी तक्रार सुरू झाली. पण ती दूर होण्यासाठीं नवीन ग्रंथरचना करणारा नामांकित ज्योतिषी स्वयंस्फूर्तीनें पुढें आल्याचें दिसत नाहीं. तथापि शिवाजीमहाराजांच्या राजसभेंत विद्यावृद्धीकडे लक्ष देणारे लोक असल्यामुळें त्यांनीं असा ग्रंथ लिहिण्याचें काम कृष्ण ज्योतिष्यास सांगितल्यावरून त्यानें हा ग्रंथ रचिला असें:

प्रकुरु तत्करणं ग्रहसिद्धये। सुगमदृग्गणितैक्यविधायि यत्। इति नृपेन्द्रशिवाभिधनोदितः। प्रकुरुते कृतिकृष्णबिधिज्ञराट्॥ या श्लोका-वरून दिसतें.

कृष्ण दैवज्ञानें ग्रंथाच्या शेवटीं स्वतःची माहिती सांगतांना प्रारंभीं कश्यपऋषीचें महत्त्व वर्णन करून अशी हकीगत दिली आहे –

तदन्वये पावन एव तत्र वंशावतंसोऽभवदुन्नतांसः। श्रीमन्महा-ज्योतिषो विद्वदग्र्यो नाम्ना महादेव इति प्रसिद्धः॥

तज्जाया किमु जान्हवी विजयते बर्वाइनाम्नी सदा। तस्यां तज्जनितः सुपुण्यनिचयः श्रीरंगनाथानुजः ॥

कृष्णः कौंकण सत्तटाकनगरे देशस्थवर्यो वसन्। तेनायं करणेषु कौस्तुभ इति ग्रंथः कृतो धीमता ॥

यावरून कृष्ण दैवज्ञाच्या बापाचें नांव महादेव, आईचें बर्वाइ, वडील भावाचें रंगनाथ असून हा देशस्थ ब्राह्मण सह्याद्रिसन्निध मावळांत राहणारा होता असा कै. दीक्षितांचा अभिप्राय आहे.

## शिवार्कोदय

मीमांसाशास्त्राचे पूर्वमीमांसा व उत्तरमीमांसा असे दोन भाग आहेत. पूर्व मीमांसा जैमिनीने केली. तिचा उद्देश यज्ञयागादि कर्ममार्गाचें प्रतिपादन करणें हा होता. तिजवर शबरस्वामींचें पद्यात्मक भाष्य असून त्याजवर श्रीकुमारिलभट्टाच्या टीका आहेत. पहिल्या अध्यायाच्या पहिल्या पादावर केलेली पद्यात्मक टीका 'श्लोकवार्तिक' या नांवानें प्रसिद्ध आहे. दुसरी टीका 'वार्तिक' या नांवाची पहिल्या एक ते तीन अध्यायांवर आहे. त्याशिवाय त्यांचीच तिसरी 'टुप्टीका' म्हणून प्रसिद्ध आहे. श्लोकवार्तिक टीका प्रसिद्ध करण्यापूर्वीच श्रीकुमारिलभट्ट दिवंगत झाले. ह्या श्लोकवार्तिक टीकेची पूर्तता आपण शिवाजीमहाराजांच्या विनंतीवरून केली असें गागाभट्ट म्हणतात. सर्व लोक आचारधर्मकर्मक्षम व्हावे या उद्देशाने महाराजांनी हा ग्रंथ गागाभट्टांकडून राज्यारोहणानंतर करविला. त्यासंबंधीं भटजींनीं शिवार्कोदयांत पुढील श्लोक लिहिले आहेत.

श्रीमद्भोसलवंशभूषणमणिक्षोणीशशाहात्मजच्छत्राधीशशिवक्षितीशयशसः स्तंभो निखातोऽपरः। गागाभट्टमनीषिणाधिधरणिग्रंथः शिवार्कोदयो। येनाबद्धयशोध्वजेन सकलैवाश्वेति लोकत्रयी ॥

पूर्वोक्तयुक्त्या च निषेधतोपि सत्रा तथान्यार्थनिदर्शनाच्च। आर्त्विज्यमिष्टं खलु विप्रनिष्ठं भवेन्न वर्णत्रयगं कदाचित् ॥

श्रीभट्टनारायणवंशजबुद्धीपोत्थगागाभिधभट्टमेरोः। स्फुटे शिवार्कोदयनामभाज्यभूदब्दा द्वादशाध्यायचतुर्थपादः ॥

(शिवचरित्रप्रदीपांतील स. म. दिवेकर यांचा लेख.)

## ( २ ) कवि जयराम पिंड्ये

जयरामाचें आडनांव पिंड्ये, गोत्र जामदग्निवत्स. जयराम राहणारा बागलाणांतील. बागलाणांत लहानपणापासून तो राहत असल्यामुळे त्याला त्या प्रांताची बारीक माहिती असणें स्वाभाविक होय. त्याचें गांव सप्तशृंगी-समोरील मार्कंडा डोंगराच्या पायथ्याशीं होतें. आजहि त्या भागांत पिंड्ये आडनांवाचीं ब्राह्मण घराणीं आहेत. पिंड्ये या आडनांवावरून या घराण्यांतील पुरुष क्षेत्रोपाध्ये असून सप्तशृंगीवर आलेल्या यात्रेकरूंसाठी श्राद्धादि प्रसंगीं पिंड पाडण्याचें काम करीत असावे. त्याच्या काव्यग्रंथांत बागलाण या शब्दाचीहि व्युत्पत्ति लागते. बागलाणांतील पाटील बागुल ( बागल ? ) या आडनांवाचे होते व आहेत व बागलाणांतील बोलीहि बागुल आहे. आज बागलाण हा नाशिक जिल्ह्यांत एक तालुका आहे; पण शिवकालांत त्याचा विस्तार मोठा असून त्यांत हल्लींचा खानदेशहि बहुतांशीं समाविष्ट होता. सांप्रत जिला खानदेशी बोली म्हणतात तिला शिवकालांत बागुली बोली अशी संज्ञा असावी. तिचा निर्देश जयरामानें आपल्या काव्यांत बागुल या नांवानें केला आहे. जयरामाला संस्कृत, प्राकृत ( मराठी ), ग्वालेरी ऊर्फ व्रज, गुर्जर, बक्कर, ढुंढार, पंजाब, हिंदुस्थान, बागुल, यावनी ( फार्सी ), दाक्षिणात्य यावनी ( उर्दू ) व कर्नाटक अशा बारा भाषा येत असत. त्यांपैकीं बागुल ही एक भाषा होय.

जयरामाच्या मातेचें नांव गंगावा व पित्याचें नांव गंभीरराव. गंभीरराव भिक्षुकीचा पिढीजाद धंदा सोडून नोकरी पेशांत शिरला होता. तो मार्कंडेय पर्वतापासून अहिवंत पर्वतापर्यंतच्या सात किल्ल्यांचा अध्यक्ष होता. शहाजी प्रारंभीं निजामशाहीचा सरदार असतांना त्याचें नाशिक भागावर कांहीं काल प्रभुत्व होतें. त्या काळांत गंभीररावाच्या भेटी होऊन उभयतांचा ऋणानुबंध जमला होता. त्याच ओळखीवर जयरामानें शहाजीच्या राजसभेंत आपला प्रवेश करून घेतला.

जयरामानें शिवचरित्रांतील प्रसंगांवर बरींच लहानमोठीं काव्यें लिहिलीं होतीं व तीं शहाजी व व्यंकोजी यांस ऐकवलीं होतीं. त्यांपैकीं राधा-माधव-विलास-चंपू व पर्णालपर्वतग्रहणाख्यान हीं दोनच काव्यें आज उपलब्ध आहेत. राधा-माधव-विलास हा चंपू असल्यानें गद्य-पद्यात्मक

आहे. त्यांत संस्कृताबरोबर मधून मधून मराठीचा व हिंदीचा वापर त्यानें केला आहे.

चंपूंत जयरामानें संस्कृत व मराठी भाषांत कांहीं काव्यरचना केल्यावर श्रोत्यांना आतां हिंदीचा नमुना हवा आहे असें कल्पून त्यानें एक हिंदी दोहा लागलीच रचला. श्रोत्यांनीं त्याला विनविलें –

श्रोते म्हणती भला भला दुसरी भाषा बोल।
शब्द तुझे बहु चांगले श्रवण मनोहर खोल॥
वक्ता विनवी श्रोतयां तुम्ही मकरंद मिलिंद।
पुनरपि आतां आयका उत्तर भाषा छंद॥

उत्तर-भाषा म्हणजे उत्तरेकडील हिंदी भाषा. तिच्यांत त्यानें रचलेला दोहा पुढीलप्रमाणे :–

ॐ

आयो उत्तर देसतें घाटमपूरको भाट।
उन्ह गजमदसों देश लोकीनी चहपह बाट॥

या चंपूला राधा-माधव-विलास हें श्रीकृष्णवाचक नांव कवीनें दिलें असलें तरी त्यांत शहाजीचें चरित्रच प्रामुख्यानें गोवलें गेलें आहे.

श्लोक

द्वादशभाषाललित शाहनरेश्वरानें।
आकर्णिलें मग म्हणे मृदुलस्वरानें॥
ऐसे सिकोन कवि जे मजला पहाती।
त्यालागि देइन धुरंधर मस्त हातीं।
कांता धरामृत समुद्रतरंग गोडा॥
उक्तीस या त्रिभुवनांत नसेल-जोडा।
हें काव्य जाण नृप त्यांजपुढेचं सोडा॥
घ्या पालखी पदक मंदिल वेच घोडा॥

वरील श्लोकांत कवीनें आपली मनमुराद स्तुति करून घेतली आहे.

शिवाजीच्या उदयापूर्वी महाराष्ट्रीय कवींना महाराष्ट्रांत आश्रयदाता असा राजा ( सरदार ) क्वचित् असल्यामुळें त्यांची स्थिति केविलवाणी असली

पाहिजे. अशा स्थितींत त्यांना कर्नाटकांतील बडा मराठा नृपतुल्य सरदार शहाजी याजकडे धाव घ्यावी लागत होती. राधा-माधव-विलास-चंपूंतील वर्णनावरून शहाजीचें बेंगळूरराज्यांतील वैभव व थाट थेट राजासारखा होता. त्याच्या पदरीं शास्त्री, पंडित, कवि, ज्योतिषी, शाहीर, वैदिक, पुराणिक बरेच होते. त्यांतील बहुतेक महाराष्ट्रीयच होते. त्यांपैकीं शिवराय पंडितामार्फत जयरामाचा शहाजीपर्यंत प्रवेश झाला. शहाजीनें आपल्या सभेंतील कवि-पंडितांकडून घातलेल्या समस्यांची पूर्ति केल्यानें त्याची जयरामावर मर्जी बसून त्यानें त्याचा सन्मान केला. शहाजीनें त्याला बसावयास एक घोडा देऊन एकदा आपल्या स्वारींतहि घेतलें होतें.

## रक्षापुत्र कोयाजी

शहाजीची पुत्रसंतति सुसंस्कृत होती. त्याचा रक्षा-पुत्र कोयाजी यानें प्राकृत व संस्कृत या दोन्ही भाषांचा अभ्यास विश्वनाथ ज्योतिष्याजवळ केला होता. त्यानें काव्य, नाटक, इतिहास, संगीत, नाना भाषा इत्यादि परिज्ञानांत कौशल्य संपादिलें होतें. तो मल्लविद्याहि नरषट्टुसा नामक प्रख्यात जेठीपाशीं शिकला होता. कोयाजीसारखा रक्षा-पुत्र जर इतका शिक्षित व सुसंस्कृत होता तर शहाजीचे औरसपुत्र संभाजी व व्यंकोजी यांची तयारी त्यानें कोयाजीपेक्षां जास्ती नसली तरी तितकी करून घेतली असेलच. शिवाजीस त्यानें बाराव्या वर्षींच महाराष्ट्रांत पाठविलें असल्यानें त्याचा विद्याभ्यास इतर भावांइतका बेंगलुरास झाला नसला तरी महाराष्ट्रांत गेल्यावर तो पुरा व्हावा अशी खबरदारी शहाजीनें घ्यावी हें स्वाभाविक होय.

शहाजीच्या मृत्यूनंतर त्याची सरदारकी व्यंकोजीला प्राप्त झाली. एकोजीचीहि कृपा जयरामावर होतीच. एकोजीनें त्याच्या मुखांतून राधा-माधव-विलास-चंपू आकर्णिल्यावर प्रसन्न होऊन त्यास एक सहस्र वराहांचें वर्षासन चालू केलें. शहाजीस लोक महाराज व व्यंकोजीस सवाई महाराज म्हणत. व्यंकोजी जयरामावर इतका लुब्ध झाला कीं तो त्याला श्रीशैल मल्लिकार्जुनाच्या यात्रेंत आपल्यासमवेत घेऊन गेला होता. शहाजी व एकोजी यांजपाशीं प्रभाकरभट्ट राजगुरु, जनार्दन नारायण व रघुनाथ नारायण हणमंते इत्यादि भिक्षुक, शास्त्री व मुत्सद्दी होते. राजांनीं व श्रीमंतांनी मनोरंजनार्थ विदूषक जवळ ठेवण्याची चाल प्राचीन आहे. शाकुंतलांत दुष्यन्तापाशीं व

मृच्छकटिकांत चारुदत्तापाशीं मैत्रेय हा विदूषक असल्याचें प्रसिद्ध आहे. व्यंकोजीपाशींहि कृष्णभट्ट हा विदूषक म्हणजे खुषमस्कऱ्या होता.

व्यंकोजी सुसंस्कृत, रसिक व रंगेल होता. तो शूर होता, पण त्याच्या शौर्यास शहाजीच्या शौर्याची सर येणें शक्य नव्हतें. याच सुमारास शिवाजीचा कीर्तिसूर्य माध्यान्हीं येत चालल्यानें जयरामाचें लक्ष व्यंकोजी-पेक्षां शिवाजीकडेच वेधून त्यानें शहाजीवर जसें राधा-माधव-विलास-चंपू हें काव्य रचलें तशीं शिवाजीवरहि त्यानें अनेक काव्यें रचिलीं. त्यांपैकींच पर्णालपर्वतग्रहणाख्यान हें एक होय.

जशी शिवाजीवर त्याची भक्ति बसली तशी शिवाजीची माता जिजाई तिजवरहि बसली होती. तिजविषयीं तो लिहितो –

जशी चंपकेशीं खुले फुल्ल जाई ।
भली शोभली ज्यास जाया जिजाई ॥
जिचे कीर्तिचा चंबु जम्बुद्विपाला ।
करी साउली माउलीसी मुलाला ॥

शहाजी व जिजाबाई यांची जोडी चंपक वृक्षाला जशी फुललेली जाई त्याप्रमाणें असल्याची ग्वाही जयराम देतो. यावरून जिजाबाई व शहाजी यांचे प्रेमसंबंध कसे होते व जिजाबाई काय योग्यतेची स्त्री होती याची चुणूक कवीनें येथें दाखविली आहे.

शिवाजीचें अलौकिकत्व जयरामानें चार ओळींत व्यक्तविलें आहे –

टिकेचा धणी लेक ज्याचा शिवाजी ।
करी तो चहूं पातशाहीशि वाजी ॥
तयाला रणामाजि हे एक माने ।
अरी जैं गळा घालुनी ये कमाने ॥

अर्थ – शहाजीच्या पश्चात् धनीपणाचा' टिळा शिवाजीलाच लागावयास पाहिजे. त्यानें चारी पातशाहींना घोड्याला रंगणावर जसें धरावें तसें धरलें आणि शत्रूच्या गळ्यांत धनुष्य अडकवून त्याला शरण आणिलें.

जयराम शिवाजीच्या अखेरीपर्यंत हयात असावा. याची साक्ष ' पर्णाल-पर्वतग्रहणाख्यान ' हें एकच काव्य वाचलें तरी येण्यासारखी आहे. कारण त्यानें त्यांत शिवाजीच्या कारकीर्दीचें सिंहावलोकन करून त्यांतील मुख्य प्रसंगांचा

ओझरता निर्देश केला आहे. अफजलखानाचा वध, शाइस्ताखान व जयसिंग यांची शिवाजीवर स्वारी, सुरतेची दोनदां लूट, सालेरीचें युद्ध, कर्नाटकांतील दिग्विजय, वऱ्हाडांत कारंजाची लूट इत्यादि प्रसंग त्याला माहीत होते. शिवाजीचीं कृत्येंच अशीं अलौकिक व स्फूर्तिदायक होतीं कीं, जो कवि असेल त्याला त्यांचें काव्यरूपानें वर्णन करावें असें वाटावेंच. जयराम हा शिवाजीकडे राजगडावर येई, त्याच्या राजसभेंत कांहीं काल राही, तेथील दरबारी लोकांच्या तोंडून शिवाजीच्या महत्कृत्यांची स्तुति मनमुराद ऐके व त्यांवर लहर लागेल तसे श्लोक रचून काव्य बरेंचसें लिहून झाल्यावर बेंगळुरास किंवा तंजावरास जेथें व्यंकोजी असेल तेथें जाऊन त्यास तो वाचून दाखवी.

जयरामानें शिवराजावरील एक आख्यान व्यंकोजीपुढें वाचल्यास तीन वर्षे झालीं होतीं. त्या तीन वर्षांत व्यंकोजीपाशीं न राहतां नवीन पुंजी जमविण्याकरितां तो शिवाजीकडे गेला व ती पुंजी मिळवून त्यानें जें आख्यान लिहिलें तें 'पर्णाल-पर्वत-ग्रहणाख्यान' होय. त्यानें शिवचरित्रावर जीं अनेक आख्यानें रचलीं त्यांपैकीं हें एक होय. पण त्यानें किती आख्यानें लिहिलीं व त्यांत शिवचरित्राचा किती भाग आला हें समजत नाहीं. मात्र पूर्वीचें आख्यान त्यानें बेंगळुरास व्यंकोजी असतां त्याच्या गौरीमहाल या सभागृहांत त्यास ऐकविलें होतें. पर्णाल-पर्वत-ग्रहणाख्यान ऐकवितांना व्यंकोजी बेंगळूर सोडून तंजावरास राहावयास आला असावा.

तथापि प्रस्तुत काव्य त्यानें व्यंकोजीपाशीं केव्हां गाइलें असावें याचा विचार करणें आवश्यक आहे. पर्णाल-पर्वत-ग्रहणाख्यानाचे प्रकाशक व संपादक सदाशिव महादेव दिवेकर यांच्या मतें हें काव्य जयरामानें शिवाजीची कर्नाटकावर स्वारी होण्यापूर्वी म्हणजे शिवाजी व व्यंकोजी यांची गोडी होती तेव्हां व्यंकोजीस ऐकविलें असावें; परंतु श्री. दिवेकर यांचा तर्क 'पर्णाल-पर्वतांतील' अन्तःप्रमाणास विरुद्ध आहे. कारण प्रस्तुत आख्यानांत तो शिवाजी कर्नाटकांत गेल्यानंतर त्याचा मुक्काम तिरूवाडी येथें होता ती तिरुवाडी शिवाजीनें घेतल्याचें नमूद करतो.

अलंकुरंगतिंगलवाटिकानामथोद्धतम् ।
अहिवंतोऽचलगिरिर्मार्कण्डेयाभिधानकः ॥

या श्लोकांतील तिंगलवाटिका म्हणजे तिरूवाडीच.

तसेंच शिवाजीच्या कर्नाटकावरील स्वारींत त्याला कुतुबशहानें रोजचा तीन लाख होनांचा तनखा सुरू केला होता हें प्रसिद्ध आहे. तोहि जयरामास माहीत असल्यामुळें तो लिहितो.

लक्षद्वयं त्रयं चैव वराहाणां स्वमस्तके। गृहीत्वास्मै तुरुष्कोऽपि प्रददौ कुतुपोप्यसौ ॥ म्हणजे कुतुबशहानें दोन-तीन लक्ष होन आपल्या डोक्यावरून वाहून नेऊन शिवाजीकडे पोंचते केले.

सारांश, व्यंकोजीला हें काव्य जयरामानें वाचून दाखविलें तें शिवाजी कर्नाटकावरील स्वारी संपवून परत आल्यानंतर त्यानें व्यंकोजीचा मुलूख त्याचा त्यास देऊन त्याच्याशीं सख्य जोडल्यावरच.

## ( ३ ) शिवरामस्वामी

मोगलाईतील कल्याण नगर कर्नाटकाच्या सीमेवर आहे. तरी तेथील सत्पुरुष व कवि मराठींत ग्रंथरचना करणारे निघावे याचें सकृद्दर्शनीं आश्चर्य वाटतें. परंतु जरा खोल विचार केल्यास असें दिसून येतें कीं, महाराष्ट्रांतील पंढरीसारखीं क्षेत्रें व ज्ञानेश्वर ते रामदास यांजपर्यंत झालेले संत-साधु यांच्या आकर्षणानें मराठी भाषेची छाप कर्नाटकावरहि पडून कन्नड बंधूंनाहि मराठी भाषा शिकण्याची व तींत ग्रंथरचना करण्याची सुबुद्धि व्हावी. शिवाय ही ग्रंथरचनाहि अशी कीं, ती केवळ महाराष्ट्रियानें रचल्याप्रमाणें अगदीं शुद्ध मराठी स्वरूपाची असावी. यावनी अंमल सर्वत्र चालू असतां मराठी भाषेचा प्रसार व उत्कर्ष आंतून गुप्तगंगेप्रमाणें होत जावा याचें श्रेय महाराष्ट्रीय संतसज्जनांनाच द्यावयास पाहिजे.

केशवस्वामी हे रामदासांचे सहकारी व त्यांच्या प्रभावळीपैकीं एक होत. ते कल्याणचे रहिवासी, तसेच शिवरामस्वामी कल्याणकरच. फार काय पण दोघेहि समकालीन. असें असतां केशवस्वामींचा ओढा समर्थांकडे असावा व शिवरामस्वामींचा नसावा याचें कारण कांहींहि असो. शिवरामांच्या पूर्वजांची माहिती त्यांच्या आधीं दोनशें वर्षांपर्यंत मिळते. त्यांच्या बहुतेक पूर्वजांनीं संन्यास घेतला होता. यावरून हें सबंध घराणेंच निवृत्तिमार्गी होतें. शिवरामांचे वडील नारायण ऊर्फ पूर्णानंद हे संन्यासीच होते. पण शिवराम व त्यांच्यानंतरचे त्यांचे वंशज यांनीं संन्यास घेतला नसावा असें वाटतें.

शिवरामांचा पिता नारायण व माता लक्ष्मी. नारायणांनीं संन्यास घेतल्यावर पूर्णानंद हें नांव धारण केलें. पूर्णानंदांनींच शिवरामांस उपदेश केला. मातेच्या मृत्यूनंतर शिवराम विजापुरास गेले. विजापुरास राहूनहि त्यांची मराठी भाषेवरची भक्ति टिकली याचें कारण विजापूर-दरबारांतहि मराठीचें वर्चस्व होतें हेंच असावें.

शिवरामस्वामींचे फार प्राचीन पूर्वज सदानंद शके १३३० मध्यें समाधिस्थ झाले. ते कल्याणास राहत होते त्या मठास सदानंदांचा मठ म्हणतात. याच मठांत तेव्हांपासून आतांपर्यंत शिवरामस्वामींसुद्धां सदानंदांचे सर्व वंशज राहत आले आहेत. कल्याणांतील सद्यःकालीन रम्य स्थळ म्हणजे सदानंदस्वामींचा मठ. तो मठ कल्याणांत शिरतांना अगदीं तोंडाशींच लागतो. त्यांत शिरण्याचा दरवाजा खूप मोठा आहे. पण भोंवतालीं हवार झालें असल्यामुळें दरवाजाला न विचारतां मनुष्य परभारेंच मठांत जातो. वाटेंत पायऱ्यांची व मजबूत बांधणीची एक बारव आहे. त्याशिवाय अगदीं मठाच्या इमारतीस लागून एक आडहि असून त्यावरील चाकाचा कर्णमधुर ध्वनि दुरून ऐकूं येतो. चिंच, आंबा इत्यादि विशाल वृक्षांनीं मठाला छाया व गांभीर्य यांचा दुहेरी लाभ झाला आहे.

रस्त्यानें जाणारे-येणारे गाडीवान या वृक्षांच्या छायेंत आपल्या गाड्या सोडतात, बैलांना विसावा देतात, आपण न्याहारी करतात व शिळोप्याच्या वेळीं मार्गस्थ होतात. मठ अगदीं बंदिस्त आहे. गतकालीन शांततेचें, स्वास्थ्याचें व पवित्रतेचें तें जणूं काय आगरच आहे. तेथील मठपति व त्यांचे तरुण शिष्य पोथी वाचण्यांत निमग्न आहेत. बाहेर अंगणांत खुंट्याला बांधलेलें चपळ हरिण प्रतिबंधांतहि बागडत आहे, कुत्रीं सावधपणें बसलीं आहेत, पाळींव मांजरें पायांत घोटाळत आहेत व शेपटीचा गोंडा येणारा-जाणाराच्या अंगाला स्नेहभावानें लावीत आहेत. गोठ्यांत गायी वांसरें डोळे मिटून बिनघोर रवंथ करीत आहेत. इतरत्र न आढळणारा पाळींव वानर हें एक लहान पिलूं असून मठांत सर्वत्र वावरतें. ओळखीच्याच्या पाठीवर वा खांद्यावर अचानक जाऊन बसतें व त्याला घाबरवून सोडतें. मठपति उतारवयाचा ब्रह्मचारी आहे. त्याचीं सारीं कामें सकाळपासून संध्याकाळपर्यंत संथपणें चालत असतात. त्याला घाई माहीतच नाहीं.

अगदीं स्वच्छंदीपणा, यामुळें मठांतील भोजनास सायंकाळचे चार वाजतात. चालुक्यकालीन निर्जीव मूर्ति कल्याणांत रानोमाळ पडल्या आहेत. त्यांपैकीं एक हिंडती-फिरती सजीव मूर्ति तर ही नसेल ना? आज हा मठ असा आहे.

अशा या मठांत शिवराम स्वामी तीनशें वर्षांपूर्वी रहात असत. शिवरामांनीं लहानपणीं विजापुरास जाऊन रुक्मण्णा पंडितापाशीं शास्त्राध्ययन केलें. त्यांचें लग्न वयाच्या दहाव्या वर्षीं झालें. त्यांच्या प्रथम पत्नीचें नांव पार्वती. त्यांची दुसरी पत्नी कावेरी. ती त्यांच्या चौदाव्या वर्षीं धर्मपत्नीपद पावली.

कांहीं तरी उद्योग मागें लावून घेतला तरच मानवाला प्रत्येक दिवस नवीनासारखा वाटतो व आयुष्यहि वृद्धिंगत होतें. त्या काळीं ग्रंथरचना केल्यानें मोठीशी कीर्ति लाभत नसली तरी परिचितांनी वहावा केल्यास तेवढीहि पुरेशी संतोषदायक वाटत असे. त्याशिवाय त्यायोगानें पुण्यसंचय होत असून आत्मोद्धारास व सद्गति मिळण्यास तो उपयोगी पडणारा आहे अशी कवि श्रद्धा बाळगीत.

शिवरामस्वामींनीं लहानमोठे मिळून एकूण शंभर ग्रंथ लिहिले. त्यांच्याच गांवचे व त्यांच्याच काळचे केशवस्वामी यांजप्रमाणें ते चंगीभंगी नव्हते. त्यांनीं कथा-काम-धेनु या ग्रंथांत अठरा पुराणांचें सार दिलें आहे. अध्यात्मरामायण, भागवत, भगवद्गीता, योगवासिष्ठ यांवर त्यांनीं टीका लिहिल्या आहेत. राम, कृष्ण, परशुराम, वामन, नृसिंह, प्रल्हाद, गणपति, षडानन यांच्या जन्मकथाहि रचण्यांत आल्या आहेत. शिवरामांची गुरूच्या ठिकाणीं दृढभक्ति होती, ती गुरुप्रशंसा इत्यादि ग्रंथांत व्यक्त झाली आहे. गुरुमर्यादा हा त्यांचा संस्कृत ग्रंथ आहे. शिवरामांना महाराष्ट्रीय संतांची पूर्ण मांहिती कशी होती हें अध्यात्म-रामायणाच्या शेवटीं ज्या ओंव्या त्यांनीं लिहिल्या आहेत त्यांत दिसून येतें.

संतनामावळी बहुत। त्यांतहि चित्तासी जे आवडत। ते ज्ञानदेव, नामदेव, एकनाथ। रंगीरंगनाथ निजानंदी। यास्तव ज्ञानेश्वर समर्थ। स्वयेंचि होऊनि कोनेरीनाथ। श्री रामायण अस्ताव्यस्त। रूपा येथें आणिलें। शके १६०७ सोळाशहेसातोत्तरे। तैं टीका केली शिवरामेश्वरें। कोनेरी बाबा सादरें। जाला विचार लेखकु ॥

या शेवटच्या ओवींत ज्ञानेश्वरांचें अनुकरण स्पष्ट दिसतें. अर्थात् अध्यात्मरामायण त्यांनीं इ. स. १६८५ त म्हणजे शिवाजीच्या निधनोत्तर पांच वर्षांनीं पुरें केलें. शिवरामस्वामीसारखे संत कवि व आधुनिक कवि यांत दोन प्रमुख भेद दृष्टीस पडतात. संत कवि गाढे विद्वान् असत, तसे आधुनिक कवि नसतात. संत कवि जीवनाच्या मुळाशीं जाऊन त्याच्याशीं निगडित असलेल्या सनातन तत्त्वाशीं एकरूप झाले असल्यामुळें त्यांचीं काव्यें पठन करणारांच्या वृत्तीस गांभीर्य प्राप्त होऊन त्यांना त्यांच्या उद्धाराचा मार्ग सांपडतो. पण आधुनिक कवि जीवनांतील विकारांशीं खेळण्यांत दंग असल्यामुळें त्यांच्या काव्यवाचनापासून मनोरंजनापेक्षां अधिक लाभ होत नाहीं व तो टिकाऊ स्वरूपाचा नसतो. म्हणून संतकवींच्या काव्यांचीं पारायणें केलीं तरी तीं अपुरीं वाटतात व आधुनिक कवींचें काव्य एकदा वाचलें कीं, पुनः त्याजकडे वळण्याची आवश्यकता भासत नाहीं.

शिवरामांचे वडील पूर्णानंद यांनीं काशी-रामेश्वराची यात्रा त्या धामधुमीच्या काळांतहि सात वेळां केली. अशा पित्याच्या पोटीं आलेले शिवरामस्वामी अध्यात्मवादी कवि व्हावे यांत आश्चर्य तें काय? शिवरामांना सहा भावंडें होतीं. त्यांत भाऊ तिघे व बहिणी तिघी. भावांचीं नांवें तिमण्णा, अनंत व राम आणि बहिणींचीं नांवें कृष्णाबाई, विवेकम्मा व गोदूबाई. यावरूनहि शिवरामाचें कुटुंब महाराष्ट्र-कन्नडमिश्रित कसें होतें हें समजतें.

### (४) कवींद्र परमानंद

परमानंदानें शिवाजीचें चरित्रपर असें शिवभारत हें काव्य संस्कृतभाषेंत रचिलें. तो आपलें नांव परमानंद भट्ट गोविंदनंदन असें लिहितो. म्हणजे तो गोविंदभट्टाचा पुत्र. आता परमानंद हें ह्याचें मूळ नांव कीं कवि या नात्यानें मागाहून काव्यापुरतें घेतलेलें टोपण नांव याचा उलगडा होत नाहीं. परमानंद अहमदनगर जिल्ह्यांतील नेवासें या गांवचा रहिवासी. परंतु विद्या संपादण्याकरितां तो स्वतः काशीस जाऊन राहिला असावा. काशीस जरी तो राहत असे तरी त्याचें महाराष्ट्रांत येणें-जाणें होतेंच. काशीस राहून परमानंद मोठा शास्त्रज्ञ, अध्यात्मवेत्ता व पौराणिकप्रवर झाला. अर्थात् त्याचा नित्याचा व्यवसाय पुराण सांगण्याचा असावा. शके १५८६ च्या

वैशाखमासांत कोंकणांत राजापूर येथें धर्मनिर्णयार्थ मोठी सभा भरली होती. तिला गागाभट्टादि काशीस्थ पंडित आले होते. त्या सभेस परमानंद स्वतः उपस्थित होता.

परमानंद महाराष्ट्रांत येऊन जाऊन होता; इतकेंच नव्हे तर इकडे कित्येक वर्षें राहिलेला असावा. शिवाजीमहाराजांत जें विलक्षण आकर्षण होतें त्यानेंहि तो ओढला गेला असावा. कदाचित् शिवाजीनें याचे गुण ओळखून त्यास आपणांपाशीं ठेवूनहि घेतलें असावें. बहुशः तो त्याच्या वा त्याच्या सेनापतींच्या स्वारीबरोबरहि हिंडत असावा. त्याला शिवाजी, त्याचे मुत्सद्दी, सेनापति व कुटुंबांतील माणसें यांची पूर्ण माहिती होती. तो महाराष्ट्राचे देश व कोंकण या दोन्ही भागांत हिंडला असून त्याला तेथील शेंकडों लहान-मोठ्या गांवांचें खडान्‌खडा ज्ञान होतें. कोंकणांतला पावसाळा त्यानें पाहिला होता व तिकडील निसर्गसौंदर्याशीं तो तन्मय झाला होता. त्यानें केलेलीं कित्येक वर्णनें त्याच्या उच्च कवित्वशक्तीची व संस्कृत भाषेवरील प्रभुत्वाची साक्ष देणारीं आहेत. त्यानें शिवभारत या काव्यग्रंथास मालोजीपासून प्रारंभ करून तें शिवाजीच्या कोंकणावरील स्वारीनंतर संपविलें आहे. म्हणजे २९ एप्रिल १६६१ पर्यंतचें शिवचरित्र त्यानें त्यांत वर्णिलें आहे. त्यांतील मुख्य प्रसंग म्हणजे फत्तेखानाची स्वारी, अफजलखानाचा वध, पन्हाळगडचा वेढा, त्यांतून सुटल्यावर शिवाजीचें राजगडास आगमन, शाइस्ताखानाची स्वारी, उंबर खिंडींतील युद्ध, राजापुराची लूट, शृंगारपूरचे सुर्वे यांचा पराभव हे होत. यानंतरचा भाग शिवभारतांत न येण्यास काय अडचणी आल्या तें समजत नाहीं. तसेंच त्यानें तें काव्य केव्हां रचिलें हेंहि निश्चित नाहीं. शाइस्ताखानाची स्वारी शिवाजीवर इ. स. १६६१ त झाली त्यानंतर केव्हां तरी ही काव्यरचना करण्यांत आली यांत शंका नाहीं. इ. स. १६६१ नंतर इ. स. १६६४ त राजापुरास भरलेल्या पंडितसभेस तो उपस्थित होता व इ. स. १६६६ त शिवाजी आग्र्यास गेला त्याच्या परिवारांत परमानंदहि होता. शिवाजी १९ ऑगस्ट १६६६ रोजीं आग्र्याहून पळाला. त्यापूर्वी परकलदास हा दिवाण कल्याणदास यास आग्र्याहून ता. १५ जुलै १६६६ च्या सुमारास लिहितो :

" शिवाजीपाशीं कवींद्र कवीश्वर नांवाचा कवि असून त्याला त्यानें

एक हत्ती, एक हत्तीण, एक सहस्र रुपये, एक घोडा व पोशाख दिला आहे. त्याच्या मनांत त्याला आणखी एक हत्ती द्यावयाचा असून तो त्याला देणारहि आहे." शिवाजी म्हणतो, "बादशहा मला परवाना देत नाहीं. तो मिळाला असता तर मी आग्र्याहून घोड्यावर बसून निघालों असतों. आतां मी आपले घोडे व हत्ती देऊन टाकून येथें फकिरासारखा बसेन."

विमलदास यानें दिवाण कल्याणदासाला ता. २३ ऑगस्ट १६६६ रोजीं पुढील पत्र लिहिलें आहे. "आम्हांला बख्शहाचें पत्र राज्यांतील सर्व घाट बंद करण्याविषयीं आलें. त्याप्रमाणें आम्ही सर्व परगण्यांना तशीं आज्ञापत्रें पाठविलीं. त्याच दिवशीं पुरोहित मनोहरदास व नथूराम यांजकडून दौशाहून (Dausa) वर्तमान आलें कीं, शिवाजीचा कवीश्वर हा तेथें एक हत्तीण, दोन उंट, एक घोडा, चाळीस पायिक व दोन ओझ्याचे बैल घेऊन आला आहे. हत्तिणीच्या पाठीवर हौदा असून शिवाजीनें ती आपणांस बक्षीस दिली असल्याचें तो खोटेंच सांगतो. बैलावर कापड लादलें आहे असें त्याचें म्हणणें. पण तें उघडून दाखविण्यास तो कबूल नाहीं. मी मनोहरदासास परमानंदाला थांबवून धरण्यास व बैलांवरील सामान नीट तपासण्यास सांगितलें आहे." गरीब दास हा कल्याणदासाला २८ डिसेंबर १६६६ रोजीं लिहितो –

"शिवाजीचा नोकर कवींद्र परमानंद यास ( २३ ऑगस्टपासून ) थांबवून ठेवला आहे. त्यानंतर मिर्झा राजा ( जयसिंग ) यांजकडून त्यास मुक्त करण्याविषयीं आज्ञा आली. म्हणून आम्हीं त्यास सोडलें. मागाहून दुसरी आज्ञा तो जेथें असेल तेथें पहाऱ्यांत ठेवण्याची आली. त्या वेळीं चौकशी करतां आम्हांस कळलें कीं, तो बनारसला जाण्याच्या उद्देशानें उदेपुरास गेला आहे. ही वार्ता समजतांच त्याच दिवशीं चार अश्वारोह व पंधरा पायिक यांना त्याच्या शोधार्थ रवाना केलें. त्यांनी त्याला हिंडान परगण्यांत चंदनगांव येथें २६ डिसेंबर १६६६ रोजीं गांठलें. तो म्हणतो कीं मला दिल्लीस जावयाचें आहे. तरी आम्ही काय करावें याविषयीं आज्ञा व्हावी. कारण तो फार बडबड करतो. त्याजबरोबर दोन घोडे, दोन उंट व एक सुखपाल हत्ती ( ? ), वीस कहार ( हमाल ) व पायिक आहेत"

( हाउस ऑफ शिवाजी – सरकार ).

यानंतर परमानंद कोठें गेला हें समजत नाहीं. बहुधा तो आधींच्या बेताप्रमाणें काशीस गेला असावा व तेथें ३।४ वर्षें राहून परत महाराष्ट्रांत आला असावा. कारण अण्णाजी दत्तोनें इ. स. १६७३ त पन्हाळा घेतल्यावर शिवाजी तो पाहण्यास रायगडाहून जात असतां मध्यंतरीं पोलादपुरास थांबला व परमानंदाच्या मठांत जाऊन त्यानें त्याचें दर्शन घेतलें. त्यावरून इ. स. १६७३ पूर्वी बरेच दिवस तो महाराष्ट्रांत परत येऊन कोंकणांतील पोलादपूर या सुरक्षित स्थळीं काव्यरचना करीत व शिष्यांना पढवीत राहिला असावा.

पोलादपूर हा गांव रम्य आहे. तो सावित्री नदीच्या कांठीं वसला असून तेथून पारघाट ३।४ कोस व पारघाटापासून प्रतापगड एक कोस आहे. सावित्री नदीला घाटहि आहे. कोंकणांतील नद्यांना घाट नाहींत व पोलादपुरासच तो आहे त्या अर्थी रसिक व निसर्गप्रिय अशा परमानंद कवीनें हें काव्यास स्फूर्ति देणारें स्थान निवासास पसंत केल्यावर शिवाजीनें त्याच्या पाठशाळेकरितां एक चौसोपी वाडा व स्नानाकरितां नदीला घाट बांधून दिला असावा.

परमानंद पोलादपुरास शिवराज्याभिषेकाच्या पूर्वीपासून असल्यामुळें इ. स. १६७४ त शिवाजीनें रायगडावर स्वतःस अभिषेक करून घेतला, तेव्हां परमानंद त्या समारंभास हजर राहावा हें क्रमप्राप्तच समजलें पाहिजे. अशा स्थितींत प्रश्न असा उपस्थित होतो कीं, परमानंदानें शिवभारत केव्हां रचावयास घेतलें ? राज्याभिषेकापूर्वी कीं राज्याभिषेकानंतर ? मात्र शाइस्ताखानापर्यंतच त्यानें चरित्र लिहिलें, त्यावरून ही काव्यरचना इ. स. १६६१ नंतर केव्हां तरी झाली हें स्पष्ट होय. शिवाजी पोलादपुरास आला त्या वेळीं शिवाजीस परमानंदाच्या शिष्यांनीं शिवस्तुतिपर कविता म्हणून दाखविली ती शिवभारतापैकींच असल्यास शिवभारत अर्धवट स्थितींत इ. स. १६७४ पूर्वी त्यानें लिहून ठेवलें असावें व तोच भाग त्यानें काशीस आपल्या श्रोत्यांना वाचून दाखविला असावा. पोलादपुरास तीच रचना पुढें सुरू असावी व कांहीं आकस्मिक कारणानें ती नंतर बंद पडली असावी. शिवाय परमानंदानें शिवाजीस राजगडचा शिवाजी म्हटलें आहे यावरून राज्याभिषेकापूर्वी त्यानें हें काव्य रचिलें असें मानण्यास हा एक सबळ पुरावा आहे.

## श्रीशंभु-चरित्र

शिवभारत या स्थितींत राहिल्यावर कालान्तरानें शिवाजी दिवंगत होऊन संभाजी गादीवर बसला. त्या वेळीं संभाजीच्या आग्रहावरून वा त्याची कृपा संपादण्याकरितां स्वेच्छेनें परमानंदानें श्रीशंभुचरित्र रचावयास घेतलेलें दिसतें. किंबहुना तो छत्रपतींच्या पदरीं राजकवि म्हणून राहिल्यानें त्याचें तें कर्तव्यच झालें होतें. सांप्रत 'परमानंदकाव्यम्' या नांवानें रा. ब. गोविंदराव सरदेसायांनीं जें काव्य प्रसिद्ध केलें आहे तें श्रीशंभुचरित्र होय. त्याचा कांहीं भाग परमानंदानें रचला व उरलेला बराच मोठा भाग त्याचा नातु गोविंद यानें रचला. हें परमानंदकाव्य त्रुटित, अशुद्ध व अर्धवट स्थितींत आहे; पण त्याचा परमानंदाच्या नांवावर मोडणारा भाग शुद्ध व परमानंदास साजेसा आहे. त्यांत संभाजीस दोष न देतां शिवाजी सोयराबाईच्या नादानें वागून संभाजीचें नुकसान करण्यास प्रवृत्त झाला आहे असें परमानंद भासवीत आहे.

परमानंद शिवाजीच्या सांगण्यावरून हें चरित्र रचिलें असें स्वतःच म्हणतो. त्यावरून तो कांहीं काल शिवाजीच्या राजसभेंत राजकवि म्हणूनहि चमकत असावा. या चरित्राची जन्मकथा येणेंप्रमाणें :- एकदां परमानंद नांवाचा एक श्रेष्ठ ब्राह्मण तीर्थयात्रेच्या निमित्तानें काशीस गेला होता. तेथें तीर्थविधि करून भागीरथीच्या तीरीं तो बसला असतां तेथील कांहीं पंडितांनीं शिवाजीमहाराजांचें चरित्र ऐकण्याची इच्छा प्रकट केली. ते म्हणाले, "तुळजाभवानीच्या प्रसादानें ज्याला राज्य मिळालें, आणि गाई, देव व ब्राह्मण यांचें जो संरक्षण करतो अशा राजगडच्या ( रायगडच्या नव्हे ) शिवाजीराजाचें जें चरित्र तुम्ही देवीच्या प्रसादानें रचलें आहे, तें कृपा करून आम्हांस सांगा." तेव्हां कवींद्र परमानंद म्हणाला, "नारायणांशरूपी हा राजा शिवाजी एकदा मला म्हणाला, मालोजीपासून प्रारंभ करून मीं आतांपर्यंत जीं जीं कृत्यें केलीं तीं सर्व वर्णन करा. त्याचें हें सांगणें ऐकून मी घरीं आलों व भारताप्रमाणें मोठें चरित्र मीं रचावें ही शिवाजीची इच्छा माझ्या हातून कशी पार पडेल असा विचार करीत असतां एकवीरा देवीनें 'मी तुला प्रसन्न झाल्यें आहे. तूं काळजी करूं नको' असा धीर दिला. तेव्हां मला उत्साह वाटून हा इतिहास मीं लिहिला."

संस्कृतांत मुख्य अठरा पुराणें व अठरा उपपुराणें आहेत. त्या पुराणांत आपल्या काव्याची म्हणजे पुराणाची भर घालून अठरा या आंकड्यास बाध न आणण्याकरितां कवीनें या पुराणास अनुपुराण म्हटलें आहे. तरी पण त्याला मनांतून त्यास 'शिवभारत' म्हणावयाचें असल्यानें 'चरितं शिवराजस्य भरतस्येव भारतम्' असा उल्लेख त्यानें अध्याय १, श्लोक २२ मध्यें केला आहे व त्याची संख्या एक लक्षापर्यंत करण्याचा (शतसाहस्र्यां संहितायां) त्याचा संकल्प होता, पण तो सिद्धीस गेला नाहीं.

कवीनें शिवभारत विविध वृत्तांत गुंफून अनेक अलंकारांनीं सजविलें आहे. त्याची भाषा रसाळ, सोपी, शुद्ध व अनुप्रासांनीं व यमकांनीं नटलेली आहे. तिजवर पुष्कळशी झांक वाल्मीकि व कालिदास यांच्या काव्याची मारीत आहे. त्याजपाशीं शब्दसंपात्ति विपुल व वर्णनशैली प्रसादयुक्त आहे. तो भोसले आडनांवाचा निर्देश भृशबल या शब्दानें करतो. तो पन्हाळ्याला प्रणाल, खेळण्याला विशाळगड व कोंढाण्याला सिंहगड म्हणतो; म्हणजे शेवटचे दोन गड सध्यांच्या नांवानें त्याच्या काव्यरचनाकालींहि प्रसिद्धि पावले होते.

परमानंद राजापूरच्या सभेकरितां इ. स. १६६४ त कोंकणांत आल्यानंतर परत काशीस गेला होता कीं काय हें नक्की समजत नाहीं. परंतु त्यानंतर इ. स. १६७३ त तो रायगड व प्रतापगड यांच्या वाटेवरील पोलादपूर या गांवीं कायमचा राहावयास आलेला दिसतो. परमानंदाचा समकालीन जयराम कवि होता. त्याचा परमानंदाशीं चांगला परिचय असावा त्यानें आपल्या 'पर्णालपर्वतग्रहणाख्यान' या काव्यांत परमानंदाचा गौरवपूर्वक उल्लेख केला आहे. त्यानें वर्णिल्याप्रमाणें शिवाजीमहाराज रायगडाहून पन्हाळा पाहावयास जात असतां त्यांना वाटेंत प्रतापगडावर जाऊन देवीचें दर्शन घ्यावयाचें होतें. त्यापूर्वी पोलादपुरास महाराज पालखींतून उतरून परमानंदांच्या मठांत त्यांच्या भेटीस गेले. परमानंदांचा मठ म्हणजे चौसोपी इमलाच होता. त्यांत परमानंदानें आपले पंधरा शिष्य काव्यादि संस्कृत ग्रंथ शिकवून तयार केले होते. त्यांना त्यानें महाराजांच्या स्तुतिपर कविता शिकविल्या असून त्या त्यांजकडून महाराजांसमोर गाऊन दाखविल्या. महाराजांनीं परमानंदास वंदन केलें व महाराज परत निघा-

त्यावर गोसाव्यांनीं त्यांच्या मस्तकावर हात ठेवून 'पूर्ण साम्राज्य प्राप्त होवो' असा त्यांस आशीर्वाद दिला –

गोस्वामी च ततस्तस्य हस्तं विन्यस्य मस्तके ।
पूर्णसाम्राज्यदात्रीभिराशीभिः पर्यतोषयत् ॥

परमानंद हा राजकवि झाला असें मानण्याचें दुसरें कारण हें कीं, त्याचा नातू गोविंद हा तेंच कार्य करीत होता. तो व त्याचा पिता देवदत्त यांनीं संभाजीनंतर ताराबाई, शाहू, सकवारबाई यांच्या स्तुतिपर कविता रचल्या आहेत. गोविंदानें शाहू-राजकीर्ति-मंजरी नांवाचें मराठींत एक काव्यहि लिहिलें आहे. तात्पर्य, परमानंदानंतर त्याचे पुत्रपौत्र छत्रपतींचे पिढीजात राजकवि होऊन राहिले.

## (५) शिवराजभूषण

शिवाजीचा यशोदुंदुभि दिगंत गाजून जे गुणिजन त्याजकडे धांवत आले त्यांपैकीं हिंदी कवि भूषण हा होय. त्यानें शिवराजभूषण हें हिंदी काव्य लिहिलें. भूषण हा कनोजी ब्राह्मण, त्याचें गोत्र काश्यप, त्याच्या पित्याचें नांव रत्नाकर व उपनांव त्रिपाठी. त्याचें राहण्याचें गांव कानपूर जिल्ह्यांत यमुना नदीच्या कांठीं त्रिविक्रमपूर (तिकवापूर). भूषणाचें घराणेंच कवींचें. त्याचे वडील रत्नाकर हे कवि होते. त्याचे सर्व भाऊहि कविच होते. त्याचा एक भाऊ चिंतामणि हा औरंगजेबाच्या पदरीं कवि होता. भूषण स्वतः चांगला विद्वान् व प्रतिभासंपन्न होता. त्यास त्याच्या कवित्वगुणावरून चित्रकूट संस्थानाधिपति सुळंकी-वंशस्थ हृदयराम याचा पुत्र रुद्र यानें कवि ही पदवी दिली.

भूषणाचा जन्म इ. स. १६३६ च्या सुमारास झाला असावा. तो मरणसमयीं ऐंशी वर्षांचा होता. त्यानें बरेच काव्यग्रंथ रचिले आहेत. त्यांपैकीं शिवराजभूषण, श्रीशिवाजीबावनी, छत्रसालदशक, भूषणहजारा, भूषणउल्लास व दूषणउल्लास हे होत. त्यानें शिवराजभूषण काव्य लिहिलें, त्यांत शिवराज्याभिषेकसमारंभाचें वर्णन नाहीं. त्याच्या काव्यांत औरंगजेब-शिवाजीची भेट, साल्हेरचें युद्ध, बहलोलखान युद्ध, सुरतेची लूट, पन्हाळगड, सिंहगड व लोहगड या दुर्गांचा पाडाव यांचें वर्णन आहे. त्यानें हें काव्य अलंकारशास्त्राचा एक नमुना म्हणून रचिलें आहे. त्याची भाषा जुनी

व्रज आहे. या काव्याच्या ओघांत त्यानें शंभर अलंकार गुंफले असून त्यांच्या स्पष्टीकरणासाठीं शिवचरित्रांतील विविध प्रसंगांचीं उदाहरणें दिलीं आहेत. वे. बाळशास्त्री खुपेरकर यांच्या मतें या काव्याची रचना करतांना भूषणापुढें जयदेवकवीचा चन्द्रालोक हा ग्रंथ असावा.

भूषण रायगडावर शिवराज्याभिषेकाच्या वेळीं उपस्थित होता कीं नाहीं याविषयीं संशय असला तरी तो रायगडावर जाऊन शिवाजीस भेटला होता यांत शंका नाहीं. तो लिहितो –

" शिवाजीनें बालपणीं गडकोट घेतले. त्यानंतर ऐन तारुण्यांत गोवळकोंडा व विजापूर यांस व दिल्लीपतीसहि त्यानें जिंकलें. सर्व तुरुष्कांना जिंकल्यावर त्यानें रायगड ही आपली राजधानी केली. शिव सरजा मोठा दानशूर व गुणिजनांचा चहाता असल्यामुळें गुणिलोक त्याच्या दर्शनास येत. त्याच मंडळींत भूषण नांवाचा कवि आला. त्यास पाहून शिवचरित्र लिहिण्याची स्फूर्ति भूषणास झाली. " शिवाजीनें गोवळकोंड्यावर इ. स. १६७७ त स्वारी केली, तिचा उल्लेख शिवराजभूषणांत कवीनें केला आहे, त्या अर्थी सदर काव्यांत समग्र शिवचरित्राचें कवीनें सिंहावलोकन केलें आहे असें म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं. त्यावरून त्यानें शिवराजभूषण हें काव्य शिवाजीच्या मृत्यूनंतर लिहिलें असावें. तो भूषणकवि शिवाजीच्या मृत्यूनंतरहि विद्यमान होता हें लक्षांत ठेवल्यास वरील अनुमान बिनचूक ठरतें. त्याच्या दोह्याचा एक नमुना –

दोहा

तहँ नृप रजधानी करी जीति सकल तुरकान ।
सिव सरजा रुचि दान मैं कीन्हो सुजस जहान ॥

– शिवराजभूषण

## (६) विश्वनाथभट रानडे

मुसलमानी राजवटीच्या प्रतिकूल कालांतहि महाराष्ट्रीयांनीं आपली विद्येची परंपरा अनंत अडचणी सोसूनहि टिकविली होती. त्या काळीं विद्येविषयीं पैठणाचा लौकिक कायम राहिला नसून महाराष्ट्रीयांना तरी काशी हें एकच विद्येचें माहेरघर डोळ्यापुढें होतें. कोठें श्रीक्षेत्र काशी व कोठें

कोंकणांतील रत्नागिरी जिल्ह्यांतील देवगड तालुका! त्या तालुक्यांतील जामसडें या गांवीं रानडे हें घराणें राहात होतें. हें घराणें विद्येविषयीं फार प्रसिद्ध होतें. त्यांतील विश्वनाथभट नांवाचा मुलगा काशीस अध्ययनाकरितां कमलाकरभट या प्रख्यात विद्वानापाशीं गेला. कमलाकरभट हे निर्णयसिंधु या सर्वमान्य धर्मग्रंथाचे कर्ते. विश्वनाथभट यानें काव्यादि शास्त्रांचा अभ्यास कमलाकरभटापाशीं केला असें दिसतें. तेथील अध्ययन आटोपल्यावर त्याच्या काव्यशक्तीवरून कमॅलाकरभटजींच्या शिफारशीनें जयपूरचा राजा व जयसिंगाचा पुत्र रामसिंग याच्या सेवेंत त्याचा प्रवेश झाला.

रामसिंग राजा होता तरी त्याच्या घराण्यांत विद्येची मोठी अभिरुचि होती. त्यानें आपले पुत्र विष्णुसिंग प्रभृति काशीस एका पाठशाळेंत शिकावयास ठेवले होते. ही पाठशाळा जयसिंगानें स्थापन केली होती. त्या पाठशाळेस प्रसिद्ध प्रवासी टॅव्हर्नियर यानें इ. स. १६६६ त भेट दिली. त्यांजबरोबर इतर सरदारांचीं व ब्राह्मणांचीं मुलेंहि शिकत होतीं. त्याविषयीं टॅव्हर्नियर लिहितो – "मला तेथें चौक दिसला. तो दुजोडी होता. त्या घरांत रामसिंगाचीं व इतर मुलें जमिनीवर खडूनें गणितांतील उदाहरणें सोडवीत होतीं. मी आंत आलेला पाहतांच त्या राजपुत्रांनीं माझी चौकशी करण्याकरितां आपल्या सेवकास पाठविलें. मी फ्रेंच माणूस आहें असें समजल्यावर त्यांनीं मला भेटीस बोलावलें, व युरोप आाणि फ्रान्स याविषयीं मला पुष्कळ माहिती विचारली.

"मुलांना शिकविणारे जे ब्राह्मण पंडित होते त्यांपैकीं एकापाशीं पृथ्वीचे दोन गोल होते. ते त्यांस डचांनीं दिले होते. त्या गोलावर आपला फ्रान्स देश कोठें आहे हें मीं त्यांना दाखविलें. त्यानंतर कांहीं वेळ त्यांजबरोबर संभाषण झाल्यावर त्यांनीं मला पानसुपारी देऊन निरोप दिला." या पाठशाळेंत शिकविणाऱ्या गुरुजींत विश्वनाथभट असावा. जयसिंग इ. स. १६६७ मृत्यु पावला. तो मेल्यावर रामसिंग गादीवर बसला. तो इ. स. १६८२ पर्यंत राज्य करून दिवंगत झाला. त्याला औरंगजेबानें आसामचा सुभेदारहि नेमलें होतें. रामसिंगाच्या पदरीं विश्वनाथभट राजकवि या नात्यानें असावा. त्यानें एकंदर किती काव्यग्रंथ लिहिले हें माहीत नाहीं. पण त्यानें लिहिलेलें शृंगारवापिका हें नाटक प्रसिद्ध आहे. तें त्यानें रामसिंगाचा पुत्र

कुमार विष्णुसिंह याजकरितां रचिलें. त्या काव्यांत विश्वनाथभट आपला निर्देश पुढीलप्रमाणें करतो –

"यो जात्या खलु चित्तपावन इति ख्यातस्ततोपाख्यया। विख्यातो भुवि रानडा इति जडाज्ञानापहानौ कृती। तस्य श्रीकविविश्वनाथ-विदुषो दोषोज्झितैषा कृतिः। कुर्याच्चेतसि संमदं बहुविधं संख्यावतां संप्रति।" विश्वनाथानें ही नाटिका काशीस इ. स. १६६३ त संपविली. रामसिंग व त्याचा पिता जयसिंग हे उभयता गुणज्ञ, रसिक व विद्वानांचे चहाते होते. विश्वनाथभट जयसिंगास प्रशंसितांना म्हणतो कीं जयसिंगाच्या सभेंत तर्क, सांख्ययोग, पातंजलयोग, साहित्य, वेद व इतर शास्त्रें यांत प्रावीण्य मिळविलेले पंडित येत, व त्यांची ज्यांच्या त्यांच्या योग्यतेप्रमाणें संभावना करून जयसिंग त्यांस गौरवपूर्वक निरोप देई. रामसिंगास काव्य, नाटक, प्रहसनें, आख्यानें, रामायणभारतादि पुराणें यांची आवड होती. म्हणूनच त्यानें विश्वनाथभटास आश्रय दिला होता हें उघड आहे. विश्वनाथानें आपल्या नाटिकेंत एका महत्त्वपूर्ण प्रसंगाचा उल्लेख केला आहे तो चिंतनीय आहे. शिवाजी व संभाजी यांची आग्र्याहून सुटका झाली, तींत रामसिंगाचें अंग होतें कीं नाहीं याविषयीं शंका घेण्यास जागा आहे. त्याचें अंग असलेंच तर तें गुप्तपणें असणार. कारण तो औरंगजेबाचा सेवक होता. पण त्या शंकेचें निराकरण विश्वनाथाच्या विधानानें पुष्कळ अंशीं होणार आहे. विश्वनाथ स्पष्टपणें लिहितो :–

काले प्रालेयहेमाचलयुगलमपि प्रस्खलेत् सागरोऽपि।
क्षोभेण त्यक्तवेलो भवति न तु चलेद्रामसिंहोऽतिधीरः॥
सेवासुंभावसंभावितमयवनाधीशकाराविमाकौ।
सद्यो निर्मोच्य भूयस्तरसुपरि भरं स्वात्मनः सोऽथ मूहे॥

( यांतील सेवा म्हणजे शिवाजी व सुंभा म्हणजे संभाजी )

सारांश, रामसिंगानें स्वतःच्या जबाबदारीवर शिवाजी व संभाजी यांची सुटका केली असें विश्वनाथ सांगतो.

जयसिंगाच्या मृत्यूनंतर जसा रामसिंग तसा शिवाजीच्या मृत्यूनंतर संभाजी त्याच्या गादीवर आला. रामसिंग व संभाजी यांचा त्यानंतर पत्र-

व्यवहार होत असून, तसें एक पत्र संभाजीनें रामसिंगास पाठविण्याचा आढळ होतो. तत्कालीन कवि एकाच राजाच्या आश्रयावर अवलंबून न राहतां इतरहि राजांचे आश्रय हुडकीत हिंडत. त्या परिपाठास विश्वनाथभट तरी कसा अपवाद व्हावा? रामसिंग हा जयपूरचा राजा. त्याचा आश्रय विश्वनाथानें मिळविला तर तो स्वदेशांतला राजा जो संभाजी त्याचा आश्रय मिळविल्याशिवाय कसा राहील? त्यानेंहि शंभुविलास नामक संभाजीच्या स्तुतिपर काव्य रचिलें. त्या कामगिरीबद्दल संभाजीनें त्याची योग्य संभावना केलीच असेल. अशा रीतीनें विश्वनाथाची शृंगारवापिका व शंभुविलास हीं काव्यें आतां उपलब्ध झालींच आहेत. तशीं आणखीहि त्याचीं काव्यें असतील पण त्यांचा शोध अद्यापि लागलेला नाहीं.

## (७) रघुनाथ गणेश नवहस्त (नवाथे)

समर्थांच्या शिष्यवृन्दांत अनेक पंडित व विद्वान् होते. त्यांपैकींच रघुनाथ गणेश नवहस्त हे होत. कदाचित् समर्थांचे कित्येक शिष्य खुद्द समर्थांपेक्षांहि विद्वत्तेंत श्रेष्ठ असतील. पण विद्वत्त्व व साधुत्व या दोन कोटी भिन्न आहेत. विद्वान् शेंकडों सांपडतील, पण साधु हा फार विरळा. त्याच्या आध्यात्मिक वैभवापुढें दिपून विद्वानहि साधूचे चरण धरण्यांत स्वतःस धन्य समजतो. त्याच दृष्टीनें रघुनाथभटाकडे पाहावयास पाहिजे. रघुनाथभटानें समर्थ हेळवाकास असतां त्यांची शुश्रूषा करून त्यांस बरें केलें. रघुनाथ हा सामान्य माणूस नव्हता. त्यानें एकनाथाचा पणतू अनंतदेव या पंडितापाशीं राहून अध्ययन केलें होतें. अनंतदेव हा स्मृतिकौस्तुभ या धर्मशास्त्रपर ग्रंथाचा कर्ता.

रघुनाथभटाचा काळ इ. स. १६५० ते १७०० असा धरण्यांत येतो. अध्ययन संपल्यावर रघुनाथ चाफळास रामदासापाशीं राहावयास आला. त्यास रामदासांनीं चाफळास नुकत्याच स्थापन केलेल्या रघुपतीची पूजा सांगितली. तो ती पूजा करी व राममंदिरांत पुराणहि सांगत असे. त्याबद्दल त्यास वाळवे तालुक्यांत बिळाशी गांवीं इनाम देण्यांत आलें होतें. रघुनाथानें अग्निहोत्रहि घेतलेलें दिसतें.

एकीकडे हे उद्योग करीत असतां त्यानें दुसरीकडे फावल्या वेळांत ग्रंथरचनाहि चालू ठेवली होती. त्यानें संस्कृत व मराठी या दोन्ही भाषांत

ग्रंथ रचिले. त्याचे संस्कृत ग्रंथ धर्मामृतमहोदधि, भोजनकुतूहल, साहित्य-कुतूहल, जनार्दन महोदय व काशीमीमांसा, आणि मराठी ग्रंथ नरकवर्णन, स्त्रीधर्म व गोवर्धनोद्धरण हे होत. संस्कृत ग्रंथ लिहीत असतां त्यानें मराठी ग्रंथ लिहावयास घेतले याचें कारण तो देतो –

सोडून संस्कृत परिपाटी । धरिली प्राकृताची धाटी ॥
लोकोपकारासाठीं । गोवर्धनोद्धरण रचियलें ॥
मग दीपांबिकेच्या वचनें । प्राकृत स्त्रीधर्मकथनें ॥
नरकविषय विवेचनें । केलीं भागवतोक्त ॥

महाराष्ट्रांतील ग्रंथकारांना व विद्वानांना महाराष्ट्र व कर्नाटक यांत दोन आश्रयस्थानें होतीं. एक महाराष्ट्रांत शिवाजी व दुसरें कर्नाटकांत एकोजी. शिवाजीकडून एकोजीकडे व एकोजीकडून शिवाजीकडे अशा त्यांच्या येरझाऱ्या सुरू असत. त्याप्रमाणें शिवराज्याभिषेकानंतर किंवा शिवाजी कर्नाटकांतील स्वारी करून आल्यानंतर रघुनाथ तंजावरास एकोजी-कडे गेला. ती शिवाजीच्या तशीच व्यंकोजीच्या जीविताची अखेर होती. कारण शिवाजी इ. स. १६८० त व त्यानंतर अवघ्या तीनच वर्षांनीं एकोजी दिवंगत झाला. यामुळें रघुनाथाच्या काव्यांत एकोजीपेक्षां त्याची भार्या दीपांबिका ( दिपाबाई ). हिचाच उच्चार वारंवार झाला असून तिच्याच आज्ञेवरून तिला समजण्याकरितां रघुनाथानें मराठींतून ग्रंथरचना करण्यास सुरुवात केली.

एकोजी इ. स. १६८३ त मेला तेव्हां तो केवळ चोपन्न वर्षांचा होता. त्याच्या मृत्यूनंतर राज्यकारभार दिपाबाईच करूं लागली. तिला शहाजी-प्रभृति तिघे पुत्र होते. दिपाबाई शहाणी व चतुर स्त्री होती. तिच्या मध्य-स्थीनेंच शिवाजी व व्यंकोजी यांचा लढा मिटला असें मानण्यांत येतें.

रघुनाथभटानें प्रथम काशीयात्रा केली व नंतर तो तंजावरास गेला असें दिसतें. काशीयात्रेस जाण्यापूर्वी रघुनाथानें आपला जांवई व दिवाकर गोसाव्यांचा पुत्र भैरवभट महाबळेश्वरकर यास चाफळच्या रामाची पूजा व त्यासाठीं मिळालेलें बिळाशीचें इनाम बक्षीस दिलें. त्या बक्षीसपत्रावर समर्थशिष्य कल्याण गोसावी, दत्तात्रेय गोसावी, विठ्ठल गोसावी, भास्कर

गोसावी व नानाजी गोसावी यांच्या सह्या आहेत. तें उत्पन्न हल्लीं दिवाकर गोसाव्याच्या चाफळांतील वंशजांकडे चालत आहे. रघुनाथभट इ. स. १७०० च्या सुमारास मरण पावला असावा. त्यानें आपल्या जनार्दन महोदय-काव्यांत कोल्हापूरच्या महालक्ष्मीस अनुलक्षून मजकूर लिहिला आहे. ती कऱ्हाडे ब्राह्मणांची कुलस्वामिनी आहे.

## (८) नीलकंठ चतुर्धर

महाभारतावरील नीलकंठी टीका प्रसिद्ध आहे. तिचा कर्ता नीलकंठ महाराष्ट्रीय ब्राह्मणच होता. हा अहमदनगर जिल्ह्यांतील कोपरगांवचा रहिवासी. तो शिवकालांतच होऊन गेला. त्यानें आपली ग्रंथरचना इ. स. १६८० ते १६९३ पर्यंत केली असावी. त्याचें घर कोपरगांवाजवळील गोदावरीच्या बेटांत कचेश्वर व शुक्रेश्वर या देवालयांच्या सन्निध होतें. नीलकंठ कोपर-गांवाहून काशीस गेला व तेथें त्यानें आचारप्रदीप हा ग्रंथ लिहिला. त्या-शिवाय शिवताण्डवटीका, गणेशगीताटीका आणि महाभारतांतील आदि, सभा, वन, विराट, उद्योग, भीष्म, कर्ण, शांति इत्यादि पर्वांवरील टीका लिहिल्या. नीलकंठाचें उपनांव चतुर्धर हें मूळचें आडनांव नव्हे. मूळचें आडनांव चौधरी, त्याचें रूपांतर चतुर्धर.

## (९) मुक्तेश्वर व श्रीधर

शिवपूर्वकालांत संतमंडळीनीं भक्तिपंथाचा प्रसार करून महाराष्ट्रि-याची मनोभूमिका बऱ्याच अंशीं सात्त्विक बनविली. संतमंडळीचें लक्ष व्यवहाराकडे प्रायः कमी असे. पण ती उणीव गृहस्थाश्रमांतील सात्त्विक व ईश्वरनिष्ठ कवि आपल्या सत्काव्यानें भरून काढीत होते. त्यांपैकीं मुक्तेश्वर हा थोर कवि स्वराज्याच्या सुप्रभातीं महाभारत व रामायण या संस्कृत महाकाव्यांचीं महाराष्ट्र भाषेंत रूपांतरें करीत होता, आणि श्रीधर कवि शिवशाहीच्या सायंकाळीं उदयाचलावर येत होता. मुक्तेश्वर एकनाथांच्या कन्येचा पुत्र. त्याचें बालपण पैठणास आजोळीं गेलें व पुढील आयुष्यांतील कांहीं काळ त्यानें कृष्णाकांठीं कुरुंदवाडाजवळील तेरवाड या गांवीं घालविला. या उभयतांनीं महाभारत व रामायण यांतील वीर पुरुषांच्या धीरोदात्त कथा गाऊन जनतेच्या मनोभूमिकेंत सुप्तावस्थेंत असलेलें धैर्य, शौर्य, साहस, पराक्रम व आत्मबलिदान यांचे स्वराज्यास परिपोषक असे निखारे फुलविले.

मुक्तेश्वराच्या नजरेखालून गोदावरी, भीमा, निरा, कृष्णा या नद्यांनीं भिजविलेला महाराष्ट्राच्या पूर्वेकडील पट्टा गेला असून त्याला इंग्रज, पोर्तुगीज, आरब, हुरमुज ( इराणी ), काळमुख ( हबशी ), रूमशाम, नाटपाट, पुलिंद, पारसी या परकीय आक्रमकांच्या हालचाली व कारवाया पूर्णपणें माहीत होत्या. त्यावर स्वराज्याशिवाय दुसरा तोडगा नाहीं अशी त्याची बालंबाल खात्री झाली असून तें महत्कार्य करणाऱ्या शिवाजीमहाराजांच्या पराक्रमास त्यानें धन्यवाद दिले आहेत. मुक्तेश्वर म्हणतो, " गोब्राह्मणप्रतिपालक असा हिंदु राजा असावा, त्यानें म्लेच्छ लोकांना दंडून आपले मांडलिक करावे. गोवध व देवब्राह्मणावज्ञा करणारांना त्यानें शूळ दंड करावा, दुर्गबळ राष्ट्रास फार उपकारक असल्यामुळें त्यानें अमात्य, सुहृद्, कोश यांच्या साहाय्यानें किल्ले बांधावे व त्याचा दरारा भरतखंडभर असावा इत्यादि. " मुक्तेश्वरांचें हें सर्व वर्णन भविष्यकाळाविषयीं नसून प्रत्यक्ष त्याच्या डोळयासमोर छत्रपति शिवाजीमहाराज स्वराज्याची मुहूर्त मेढ रोवीत होते त्यांस उद्देशून स्पष्टपणें दिसतें.

मुक्तेश्वरामागून कांहीं काल गेल्यावर श्रीधर हा काव्यरंगणीं नाचावयास आला. वतनदारीला कोणी कितीहि नांवें ठेवलीं तरी महाराष्ट्राचा धर्म व संस्कृति यांचें संरक्षण करण्याची बहुमोल कामगिरी वतनदार ब्राह्मण कुळांतील नरपुंगवांनींच केली हें विसरतां कामा नये. त्यांपैकीं श्रीरामदास हे एकटेच होते असें नाहीं. त्यांच्या काळीं व नंतरहि असे किती तरी त्यागी, विरक्त, श्रद्धाळू, विद्वान्, सच्छील व भक्तिमान् पुरुष महाराष्ट्रांत होऊन गेले. त्या काळीं संत, कवि व पंडित यांचा संगम पंढरीस चंद्रभागेच्या तीरीं पांडुरंगाच्या चरणापाशीं झाला होता. पंढरपूर हें क्षेत्र व तसेंच विद्वानांचें माहेरघर बनलें होतें. आजूबाजूच्या पांचपंचवीस कोसांतील संतमहंत जसे पंढरीस लोटत, तसे पंडित व कविहि तेथें राहावयास येऊन आपल्या पांडित्याचा व प्रतिभेचा प्रभाव पाडीत व संतसंगतीनें पावन होत.

श्रीधरकवि हा नाझरें गांवचा रहिवासी. नाझरें गांव पंढरपुरापासून १६ कोसांवर सांगोलें तालुक्यांत माणनदीच्या कांठीं वसलें आहे. हा टापू माणदेशांत गणला जात असून तो दुष्काळी भागांत मोडतो. श्रीधराच्या घराण्यांत देशपांडे वतन पिढीजात चालत आलें असून तें त्याच्या व

त्याच्या पूर्वजांच्या निर्वाहाचें साधन होतें. एकीकडे विजापूरकरांची सेवा करावी व दुसरीकडे ब्राह्मणधर्म रक्षावा असें दुहेरी कार्य त्यांना करावें लागत होतें. श्रीधराचा मूळ पुरुष राघोपंत हा आदिलशाहींत शिपाईगिरी पत्करून होता. त्याला अश्वपरीक्षा चांगली होती. पण पुढें शिपाईगिरीचा त्याग करून तो कीर्तनांत रममाण झाला. श्रीधराचा आजा दत्तानंद हा योगी व ज्ञानी असून त्यानें संन्यास घेतला होता. दत्तानंद शके १५९० त समाधिस्थ झाला.

श्रीधराचा पिता ब्रह्मानंद यानें दत्तानंदापासून योग व वेदान्त यांचें तात्त्विक व अनुभविक ज्ञान मिळविलें होतें. तो सदाचरणी असून वानप्रस्थ व संन्यास हे दोन्ही आश्रम त्यानें पाळिले होते. ब्रह्मानंदानें पंढरीस राहून शके १६०४ मध्यें आत्मप्रकाश हा ग्रंथ रचिला. पंढरीस एक तप घालविल्यावर त्यानें शके १६१५ त इहलोक सोडला.

श्रीधराचें अध्ययन नाझरें गांवाच्या शांत व स्तब्ध वातावरणांत आपल्या पित्यापाशीं झालें. त्याचा जन्म शके १५८० त झाला असावा. वतनदारांची राहणी अशी असे कीं त्यांच्या घराण्यांतील एका पुरुषानें वतनी काम पाहावें व बाकीचे त्याचे भाऊ व भाऊबंद यांनीं प्रपंचांतील इतर कारभार सांभाळावा. त्यांतील एखादा प्रपंचांत गढलेला असे व दुसरा कोणी परमार्थाकडे लक्ष लावून असे. त्यानें सकाळीं उठावें, गांवापासून दूर नदीकांठीं किंवा ओहळ-विहिरीकडे बहिर्दिशेस जावें, येतांना तुळशी, फुलें, दूर्वा आणाव्या, घरीं आल्यावर सावकाशपणें स्नानसंध्या, जपतप, करावें, पोथीचा एखादा अध्याय वाचावा; दोन प्रहरीं जेवण झाल्यावर घटकाभर वामकुक्षि करावी. ती आटोपल्यानंतर तो ग्रंथकार असेल तर त्यानें १०।५ ओव्या वा श्लोक रचावे, त्यांच्या आधारें देवासमोर बसून पुराण सांगावें, सायंकाळीं संध्या उरकून फराळ ( धान्यफराळ ) करावा आणि रात्रीं येत असेल तर कीर्तन करावें व मग निद्रासुख अनुभवावें. स्वच्छंदानुवर्तित्व हा त्यांचा स्थायीभाव. साधें अन्न व साधें वस्त्र हेंच त्यांचें सुखसाधन. ज्वारीची भाकरी, राळ्याचा भात, वांग्याची भाजी, तुरीचें वरण व ताकाचें फुळकवणी असलें तरी त्यावर तृप्ति.

श्रीधराची दिनचर्या नाझऱ्यास अशीच असावी. तो विद्वानांत मोडण्याइतका संस्कृतज्ञ होता. त्याच्या संग्रहीं असलेल्या ग्रंथांत पवनविजय, हठदीपिका, योगसिद्धान्त हे ग्रंथ होते. त्याचे पूर्वज संन्यासी व योगी होते. अलीकडे ब्राह्मणांचा योगाभ्यास लुप्त झाला. प्राणायाम म्हणजे नाकाला बोटें लावणें इतकेंच त्याचें ज्ञान. पण पेशवाईअखेरपर्यंत बऱ्याच श्रेष्ठ ब्राह्मणांना योग साधला होता. तो श्रीधरासहि साधला असून त्यानें संस्कृत-महाकाव्याचें अध्ययन केलें होतें व त्याच्यापूर्वी मराठींत जे गद्यग्रंथ झाले होते तेहि त्यानें वाचले होते; म्हणून महाभारत, रामायण, भागवत या ग्रंथांचें अवलोकन केल्यावर तशी ग्रंथरचना आपणहि मराठींत करून आपल्या अज्ञबांधवांच्या हातांत ज्ञानाच्या किल्ल्या द्याव्या असें त्यास कां न वाटावें ?

श्रीधराचें हें कार्य चालू असतांच तो यात्राहि करी. त्या यात्रेंत त्यानें समग्र महाराष्ट्रच पाहिला व त्यांतील गोदावरी, कृष्णा, भीमा या नद्यांची स्नानें केलीं असें नव्हे तर तो काशी-रामेश्वर व प्रभास-सोमनाथहि करून आला होता. त्या यात्राप्रसंगानें त्यानें हिंदी भाषेंत प्रावीण्य मिळविलेलें असो कीं घरींच असतां मुसलमानी राज्यकर्त्यांचा प्रभाव म्हणून त्याला तिचें ज्ञान झालेलें असो, त्याला कोणी हिंदींतून कवितारूपानें पत्र लिहिलें तर तोहि त्याचें उत्तर त्याच रूपानें पाठवीत असे.

मनुष्याला शृंगाररस जात्याच आवडतो, तसा वीररसहि आवडतो. वीरांचे पराक्रम वर्णावयास त्यास स्फुरण चढत असतें. मग तो कवि असल्यास त्याच्या लेखणींत तेंच स्फुरण चढावें हें स्वाभाविक नव्हे काय ? कवि काय किंवा लेखक काय त्यास लेखनशैली साधली व त्याच्या मित्रमंडळींत त्याच्या कृतीची वाहवा होऊं लागली म्हणजे रोज कांहींना कांहीं रचना केल्याशिवाय त्याला चैनच पडत नाहीं. तीच अवस्था श्रीधराचीहि होती. तो नुसता कवि नसून कीर्तनकारहि होता. त्या कारणानें त्यानें जी कविता रचावी, ती कीर्तनांत गाऊन श्रोतृवृंदास डोलावयास लावावें. नाझरें सोडून पंढरीस तो जाऊन राहिला त्याचें कारण तरी हेंच होय. पंढरीस आषाढी-कार्तिकीसच काय, पण दर एकादशीस यात्रा लोटावयाची. असे श्रद्धाळू व भाविक भगवद्भक्त शेंकडोंनीं पंढरीच्या महाद्वारांत जमल्यावर श्रीधर-

स्वामींनीं आपला नवा काव्यालंकार त्यांच्या श्रवणपुटांत घालून तो किती सरस वठला आहे याची अनायासें परीक्षा करून घ्यावी. त्यांजकडून जसजसें त्याच्या कवितेचें स्वागत होत चाललें तसतसे तो हरिविजय, रामविजय, पांडवप्रताप, जैमिनीअश्वमेध व शिवलीलामृत हे ग्रंथ एकामागून एक प्रसवत गेला. श्रीधराच्या दैवतांत कोल्हापुराकडील ज्योतिबा व पालीचा ( पेंबर ) खंडोबाहि होता. श्रीधराचा अंत पंढरपुरास शके १६५१ त झाला. म्हणजे शिवरायाच्या कारकीर्दीचा मध्यान्हीं येऊन कललेला सूर्य त्यानें पाहिला होता, आणि बाळाजी विश्वनाथाची कारकीर्द संपून बाजीरावानें पेशवाईचीं परिधान केलेलीं साडेतीन वस्त्रें त्यानें ऐकलीं होतीं. हरिविजय हा ग्रंथ त्यानें शके १६२४ त व शेवटचा शिवलीलामृत ग्रंथ शके १६४० त रचला.

## प्रकरण बाविसावें

# जमीन व जमीनबाब

शिवाजीपूर्वी निजामशहा, आदिलशहा व मोगल यांनीं दक्षिणेंतील आपआपल्या राज्यांत जमिनीची मोजणी करून वसुलाची शिस्त लावून दिली होती. निजामशाहींत ही व्यवस्था लावणारा मलिक अंबर. त्याला इ. स. १६०० ते १६०६ पर्यंत जी स्वस्थता लाभली तिचा उपयोग त्यानें या कामीं केला. त्यानें जमिनीची मोजणी करून सरकारसारा ठरविला व उत्तरेंतील तोडरमल्लाची पद्धत दक्षिणेंत सुरू केली. या कार्यांत त्यास साबाजी आनंदराव, शिवाजीपंत मुत्सद्दी व सखाराम मोकाशी इत्यादिकांनीं चांगली मदत केली. त्यानें जमिनी इजाऱ्यानें देण्याची चाल बंद केली व वसुलाचें काम सरकाराकडे घेऊन त्यावर ब्राह्मण कारकून नेमले. शेतसारा निश्चित करण्यापूर्वी त्यानें मागील कित्येक वर्षांच्या उत्पन्नाची सरासरी काढून प्रत्येक शेतावरचा नक्त सारा ठरविला. आणि तो पीक प्रतिवर्षी कमीजास्ती जसें येईल त्याप्रमाणें कमीजास्ती करण्याची सवड ठेवली. प्रारंभीं नवीन जमीन लागवडीस आणतांना कांहीं वर्षें शेतकऱ्यांना त्यानें साऱ्याची माफी दिली. त्यामुळें नवीन जमिनी लागवडीस आल्या.

निजामशाहींत ही सुधारणा सतराव्या शतकाच्या प्रारंभीं झाली. तिलाच लागून विजापूरची आदिलशाही. तिच्या गादीवर इब्राहिम आदिल-

शहा दुसरा इ. स. १५८०–१६२६ पर्यंत होता. म्हणजे मलिक अंबराचा तो समकालीन होय. त्यानें त्याच सुमारास तोडरमल्लाची व मलिक अंबराची जी पद्धति होती तीच अमलांत आणून जमिनीची मोजणी केली व शेतसाऱ्याचे दर ठरविले.

## मोगलांची पद्धति

मोगलांचें राज्य दक्षिणेंत झालें तेव्हां सुभेदार औरंगजेब यानें आपल्या मुलखांत जमीनमहसूल-पद्धतींत सुधारणा, शहाजहानानें त्याकरितां पाठविलेला मुर्शिद कुलीखान याजकडून करवून घेतली. ती अशी :– जमिनीची मोजणी झाली नव्हती. ती प्रत्येक शेतकऱ्याला वांटून दिलेली नव्हती. आणि सरस, मध्यम, कनिष्ट अशी वर्गवारी करून धाराहि ठरविण्यांत आला नव्हता. कोणा एका शेतकऱ्यानें एक नांगर व दोन बैल घेऊन जेवढी जमीन नांगरतां येईल तेवढी नांगरावी व ती त्याची समजली जावी. त्यानें प्रत्येक नांगरामागें ठराविक इतकी रक्कम सरकार सारा म्हणून पीक निघाल्यावर सरकारांत भरावी. याचा अर्थ असा कीं मलिक अंबर व तोडरमल्ल यांच्या पद्धतीचा अंमल मोगलापूर्वी निजामशाहींत व्हावा तसा झाला नव्हता. साऱ्याची आकारणी पूर्वी स्थलपरत्वें वेगळी असे व स्थानिक अधिकाऱ्यांनीं ( पाटील, देशमुख ) ती मनास वाटेल तशी ठरविलेली असे. यामुळें रयतेवर खालच्या अधिकाऱ्यांकडून जुलूम होऊन ते आपल्या लहरीप्रमाणें रयतेस वागवीत. म्हणजे अधिकाऱ्यानें काढवेल तितकी रक्कम शेतकऱ्याकडून वसूल करावी व तिचा स्वतःस आवश्यक वाटेल तितका हिस्सा सरकारांत भरावा. या जुलमानें शेतकरी घरेंदारें सोडून पळून गेल्यावर तोहि वसूल होईनासा झाला. म्हणून वर लिहिल्याप्रमाणें औरंगजेबाच्या नवीन कारकिर्दीत शहाजहानानें मुर्शिद कुलीखान यास दक्षिणेचा दिवाण नेमलें. दिवाण तोडरमल्ल याची जमीनमहसूल-पद्धति गुजराथ व माळवा यांस व कांहींशी दक्षिणेंत पूर्वीच लागू करण्यांत आली होती, तीच मुर्शिद कुली यानें इ. स. १६५६ त मोठ्या प्रमाणावर जारी केली. त्यानें प्रथम पळून गेलेल्या रयतेस परत बोलावून जागेवर बसविलें व मुलकीखात्यांत खालपासून वरपर्यंत अधिकारी नेमून त्यांची एक सांखळी बनविली, सर्वत्र अमीन व मोजणीदार नेमून हक्कनोंदणी केली व प्रतबंदी लावली,

प्रत्येक गांवीं उद्योगी व हुशार पाटील नेमले, गरीब शेतकऱ्यांना तगाई दिली. तिच्यांतून त्यांनीं बीं-बियाणें, औतकाठी व बैल घ्यावे आणि तगाईची रक्कम हप्तेबंदीनें परत करावी.

त्यानें एका वर्षांत खानदेश व वऱ्हाड येथील शेतकऱ्यांना ताली घालण्यास ४० ते ५० हजार रुपये दिले. वसूल-पद्धति स्थानभेदाप्रमाणें ठरविण्यांत आली. जेथील शेतकरीवर्ग मागासलेला होता, वस्ती तुरळक होती व गांवें आडवळणी होतीं तेथें प्रत्येक नांगरामागें उक्ता सारा शेतकऱ्यानें द्यावा असें झालें. इतर ठिकाणीं शेतांत जें उत्पन्न होईल त्याचा वांटा घ्यावा. जें पीक पावसावर अवलंबून त्याचा अर्धा वांटा, जें पीक विहिरीच्या पाण्यावर येई त्यांतील धान्याचा तिसरा वांटा, ऊस, द्राक्षें व केळीं यांच्या उत्पन्नाचा तिसरा व चौथा हिस्सा आणि पाटस्थळ जमिनींचा विहिरींपेक्षां कमीअधिक प्रमाणांत हिस्सा घ्यावा. मुर्शिद कुलीची आणखी एक पद्धत होती, ती उत्तरेकडील धर्तींवर होती. तिजप्रमाणें एकंदर उत्पन्नाचा चौथा हिस्सा लक्षांत घेऊन प्रत्येक बिघ्यामागें विवक्षित रुपये सारा घ्यावा. अर्थात् आधी पीक-पाहणी केल्यावरच हा आंकडा निश्चित होई.

सारांश, निजामशाहींत जी धारा-पद्धति होती तीच ही, पण मध्यंतरीं धामधुमीच्या काळांत ती मोडली असल्यानें तिचें पुनरुज्जीवन मुर्शिद कुलीनें केलें. म्हणून तिला मुर्शिद कुलीखानाची धारापद्धति म्हणतात. या पद्धतीनें शेतीची सुधारणा झाली. थोड्याच वर्षांत सर्व जमीन लागवडीस आली व इ. स. १६५८ त औरंगाबादेच्या आसपास पड जमिनीचा एकहि तुकडा शिल्लक राहिला नाहीं. या वेळीं धान्याचे भाव गहूं व डाळी रुपयास २॥ मण, ज्वारी व बाजरी ३॥ मण, गूळ अर्धा मण व तेल चार शेर होतें.

सांप्रत दक्षिणेंत सर्वत्र रयतवारी पद्धति आहे. तीच या वेळीं जारी झाली होती. मोगलांची ही पद्धति एकंदरींत शेतकऱ्यांस सुखावह होती. शेतकऱ्यानें शेतसारा वाटल्यास धान्यरूपानें द्यावा, वाटल्यास द्रव्यरूपानें द्यावा. सरकारशीं शेतसाऱ्याचा करार झाला असल्यामुळें त्यांची पूर्वी पिळणूक होत असे ती थांबली, आणि जमिनीची प्रतवारी व मोजणी झाल्यामुळें शेतकऱ्यांवर साऱ्याचा बोजा ज्याच्या त्याच्या उत्पन्नाच्या प्रमाणांत बसूं लागला. निजामशाही, आदिलशाही व मोगल यांचा कांहीं

मुलूख शिवाजीस मिळाल्यावर त्यानें मोगलांची हीच धारा-पद्धति थोड्या फरकानें आपल्या प्रदेशास लागू केली असें दिसतें.

त्यानें पुनः जमिनीची मोजणी व आकारणी करून जमीनमहसूल-पद्धति सुधारली. त्यानें जमिनीची मोजणी पुढीलप्रमाणें केली :– चौदा तसूंचा हात, एक हात व दोन मुठी मिळून एक काठी ( ८२ तसू ). औरसचौरस वीस काठ्यांचा एक बिघा. अशी जमिनीची मोजणी करून ज्या गांवाची जी जमीन ती त्यास वांटून दिली. जमीनमहसूल क्षेत्रपरत्वें वेगळा आकारला. पीक आलें म्हणजे त्याचे पांच वांटे ( तक्षिमा ) करावे. त्यांतील तीन वांटे रयतेस द्यावे व दोन वांटे दिवाणांत घ्यावे.

नवीन रयत जमीन कसावयास आली असतां तिची स्थिति लक्षांत घेऊन तिला गुरेंढोरें द्यावीं, बीजास दाणापैका द्यावा आणि तो दोनचार वर्षांनंतर अनुकूलता पाहून पिकावर घ्यावा. जमीनमहसूल सरकारनें नेमलेल्या कारकुनानें करावा. त्यापूर्वी वसुलाचें काम देशमूख, देसाई, पाटील व कुलकर्णी हे करीत असत. ते एखाद्या गांवाचा वसूल हजार-दोन हजार झाला तर त्यांतील फक्त दोन-तीनशें दिवाणांत भरीत व बाकीचा आपसांत वांटून घेत. याचा अर्थ असा कीं, मुसलमानी अमदानींत कांहीं भागांत मक्त्याच्या वसुलीची पद्धति असून देशमूख, पाटील आदि मिरासदार उक्ती रक्कम सरकारांत भरीत. याचा परिणाम असा झाला कीं, मिरासदार गबर बनले, ते वाडे व बुरूज बांधून बंदोबस्तानें राहूं लागले. ते आपल्यापाशीं फौज बाळगीत व तिच्या जोरावर सरकारी अधिकारी अधिक वसुलासाठीं आग्रह धरूं लागल्यास त्यास धुडकावून लावीत. अशा रीतीनें राजसत्तेस न जुमानणाऱ्या मिरासदारांचा शिवाजीला सहाजिकच राग येऊन त्यानें त्यांच्या अधिकारास आळा घालण्याचा प्रयत्न केला. त्यानें मिरासदारांच्या वाड्यांना बुरूज बांधण्यास मनाई केली व होते ते बुरूज पाडून टाकले. जमीनदारांपासून ( शेतकरी ) सारा घेतांना त्यास धान्य वा द्रव्य यांपैकीं जें सोयीस येईल तें देण्याची सवलत दिली आणि देशमूख, देशपांडे, पाटील व कुलकर्णी हे वसुलाच्या बाबतींत जी मदत करीत त्याबद्दल त्यांचे हक्क ठरवून दिले ( सभासद ). अर्थात् या पद्धतीनें सरकारी वसूल वाढला असेल व मिरास-दारांचीं उत्पन्नें कमी झालीं असतील.

## मेजर जर्विस याची माहिती

शिवाजीच्या जमीनमहसूल-पद्धतीविषयीं मेजर जर्विस आपल्या कोंकणावरील पुस्तकांत लिहितो –

" शिवाजीनें सर्व जमिनीची प्रथम मोजणी व प्रतबंदी केली असा सार्वत्रिक समज आहे. प्रचीतगड, राजपुरी, रायगड, सुवर्णदुर्ग, अंजनवेल, रत्नागिरी व विजयदुर्ग या भागांतून प्रत्येकीं एक दोन गांवें निवडून तेथील उत्पन्नाचा तीन वर्षांचा अंदाज त्यानें काढला. त्याच्या आधारें त्यानें धान्याचे दर निश्चित केले. धान्यापैकीं निम्मा तो धान्यरूपानें घेई व निम्मा द्रव्यरूपानें घेई. ज्या त्या तालुक्यांत धान्याचा भाव असेल तो जमेस धरून त्याच्या आधारें रोकड साऱ्याची आकारणी तो करी. भात व ताग यांच्या जमिनींचे बारा वर्ग पाडण्यांत आले होते. त्यांपैकीं चार वर्ग म्हणजे प्रती अद्यापि चालू आहेत. अव्वल ही पहिली प्रत, दुय्यम ही दुसरी, सीम ही तिसरी, चार-सीम ही चौथी ( charseem ) प्रत. पहिल्या प्रतीचे बारा मण, दुसरीचे दहा मण, तिसरीचे आठ व चौथीचे साडेसहा मण. बाकीच्या आठ प्रतींचीं नांवें पुढीलप्रमाणें – राऊपल ( Raupal ), खारवट ( Kharwut ), बावूल ( Bawul ), खुरी ( Khuree ), कुरियत रूतू ( Rutoo ), तुरुवत किंवा काठाणी ( Toorwut or Kathanee ) व मनूत ( Manut ). राऊपल जमीन झुडपांची, खारवट जमीन समुद्र वा नदी यांच्या कांठावरची, तिला खारी भाटीहि म्हणतात. बावूल ही खडकाळ जमीन, खुरी ही दगडाळ जमीन ( stony sort ), खुरीयत वा तुरवत जमीन द्विदल धान्यें व ताग पिकविणारी, मनूत झाडांच्या मुळ्या असलेली व साफ न केलेली म्हणजे इंदापूर-गोरेगांव यांच्याजवळची. या जमिनींवर आकारणी पुढीलप्रमाणें करण्यांत आली होती –

" दर बिघ्यास राऊपल ८ मण, खारवट ७॥ मण, बावूल ६॥ मण, खुरी ६। मण, खुरीयत ( करड ) ६। मण, रुतू ५ मण, तुरवत वा काठाणी ५ मण, मनूत ५ मण.

" वजत म्हणजे नापीक ( uncultivable ) जमिनीवर साऱ्याची आकारणी करण्यांत येत नसे. पण लागणीचें क्षेत्र वाढत जाऊन गरीब शेतकरी कोणतीहि जमीन करूं लागले, तेव्हां डोंगराळ व पड जमिनींतहि

लावणी झाली. त्याजवर प्रथम सारा बसविण्यांत आला नव्हता. पण मागाहून माफक आकारणी करण्यांत आली. वरकस अथवा डोंगरी जमिनीवरील आकारणी बिघ्यावर न करतां नांगरावर करण्यांत आली. उदाहरणार्थ, असली जमीन सहासात बिघे असली तरी एक बिघा धरण्यांत येई. जमिनीवरील साऱ्याची आकारणी केवळ तिच्या पिकाऊपणावरूनच नव्हे तर पिकाच्या जातीवरूनहि करण्यांत येई. नाचणीच्या पिकास नांगरामागें ३॥। मण चांगल्या जमिनीस व ३ मण कनिष्ठ जमिनीस साऱ्याची आकारणी होत असे. अव्वल दर्जाच्या जमिनींत एकच पीक काढून न थांबतां दोनहि पिकें काढीत असत. या दुसऱ्या पिकावर जादा आकारणी हळदीस दर बिघ्याला ५ मण, तागाला ५ मण, उसाला ६। मण ते ३$\frac{1}{2}$ मण ( गूळ ) याप्रमाणें होत असे."

## कोंकणांतील जमाबंदी

रा. रावजी गोविंद चित्रे रहाणार पोलादपूर जि. कुलाबा यांच्या दप्तरीं खालील मजकूर आढळला. हा मजकूर बखरवजा शंभर वर्षांपूर्वीचा आहे. त्यांत शिवाजीनें अनाजी दत्तो यांजकडून कोंकणांत जमाबंदी कशी केली याची तपशीलवार माहिती आहे ती अशी – "तळवटी व वरकशी डोंगरी गांवांना पिकाचें मान पाहून दर बिघा ठरवून दिला. मौजे कापडे बुद्रुक व पोलादपूर या गांवीं दोन शिरस्ते. १ प्रत शिरस्ता दर बिघ्यास दहा मण भात. प्रत २ खराबा जमिनीस रान पाहून दर बिघा आठ मण. वरकड गांवीं शिरस्ता दर बिघा आठ मण याप्रमाणें. वरकशी शेतास नजरमान पांच जणांनीं जमीन तपासून अदमास करून खंडीचे पिकास स्थळ नजरेस येईल त्याप्रमाणे धारा द्यावयाचा शिरस्ता.

"नागलीचे शेतास धारा – ( १ ) आवट जमिनीस खंडीचे पिकांस तीन मण केला. ( २ ) डोंगरी जमिनीस खंडीचे पिकास अडीच मण. वरीचे शेतास धारा दर खंडीचे पिकास – ( १ ) आवट जमिनीस अडीच मण. ( २ ) डोंगरी जमिनीस दोन मण याप्रमाणें. मग तें धान्य वेळच्या वेळेस विकत जाणें. अशा रीतीनें कीं तो माल महाग विकला जाईल व फायदा होईल तें करणें. वसूल हंगामशीर घ्यावा आणि साठवण करून विकरा असा करावा कीं तो हंगामी व्हावा. जिन्नस पडून राहून वाया तर जाऊं नये आणि विकरा

महाग व्हावा. या रीतीनें नारळ, खोबरें, सुपारी, मिरें विकीत जाणें. ऐन जिनस महाग विकल्यानें जो फायदा होईल त्याचा मजरा ( बक्षीस ) तुझाच आहे असें समजणें.

" सुभ्यांतील गांवांतून फिरावें. ज्या गांवीं जाशील त्या गांवाच्या कुणब्यांना गोळा करावें. ज्याला जें शेत करावयास दिलें तें करण्यास त्याजपाशीं माणूस, बैल व दाणे असल्यास बरें. पण ज्यापाशीं बैल-नांगर नाहीं व पोटास दाणे नाहींत त्याला रोख पैका देऊन बैल घेववावे व पोटास खंडी दोन खंडी दाणे द्यावे. त्याच्यानें जेवढें शेत करवेल तेवढें त्यानें करावें. पेस्तर सालीं त्याजपासून बैलाचे व गल्याचे पैके वाढी दिढी न करतां मुद्दलच हळूहळू त्याला शक्य होईल तितकें वसूल करावें. या कामीं दोन लाख लारी पावेतो खर्च आला तरी चालेल. कुणब्यांकडे पड जमीन लावून दस्त जास्ती करून घ्यावा. ज्या रकमा कुळाला देणें शक्य होणार नाहीं त्या माफ कराव्या व तसें पुढच्या वर्षी साहेबास समजवावें. म्हणजे साहेब माफीची सनद देतील. येणेंप्रमाणें कारभार करीत जाणें म्हणजे तुझा कामगारपणाचा मजरा होईल व साहेबाची तुजवर मेहेरबानी होईल " ( शि. च. सा. खंड ९, पृ. ५८ ).

हरीक शेतास खंडीच्या पिकास धारा २॥ मण; तीळ, उडीद, तूर या शेतास मण-दोन मण, पीक चांगलें न आल्यास अधोली, पायली, दीड पायलीप्रमाणें.

शिवाजीराजा प्रजावत्सल होता. तो तिला अतिशय दयाळूपणानें वागवीत असे व तिच्या कल्याणासाठीं झटत असे. याचा प्रत्यय त्याच्या खालील पत्रांत येतो. तो प्रभावळीच्या सुभेदारास लिहितो :–

**श्रीशंकर**

शके १५९८ भाद्रपद शुद्ध ८

इ. स. १६७६ सप्टेंबर ५

राजश्री रामाजी अनंत सुबेदार मामले प्रभावळी प्रति राजश्री शिवाजी राजे दंडवत – " तुला पूर्वी फर्माविले आहे. येसियासी चोरी न करावी. इमाने इतबारे साहेब काम करावे. अशी तूं क्रियाच केली आहेस. तेणेंप्रमाणें एक भाजीच्या देठासहि मन न दाखविता रास्त

व दुरुस्त वर्तन ठेवणें. लावणी संचणी ज्यावेळीं करावयाची त्यावेळीं करणें. मुलखांत बटाईचा ( ऐनजिनसी शेतसारा ) तह चालत आहे त्याप्रमाणें रयतेचा वांटा रयतेस पावे व राजभाग आपणांस येई तें करणें. रयतेवर काडीचा जाच वगैरे केलिया साहेब तुजवर राजी नाहीं ऐसे बरें समजणें. दुसरी गोष्ट कीं रयतेपासून ऐन जिनसाचे नक्त ( रोकड पैसा ) घ्यावा ऐसा हुकूम नाहीं. ऐन जिनसाचा ऐन जिनसच वसूल घेऊन जमा करीत जाणें."

वरील हकीकत वाचून कांहीं प्रमेयें निघतात तीं अशीं – शिवकालांत हल्लीं जमीनमहसूल केवळ द्रव्यरूपानें सरकार घेतें ती पद्धति नव्हती. त्याची पद्धति दुहेरी होती. या नवीन पद्धतींत एक लाभ असा आहे कीं सरकारी अधिकाऱ्यांना धान्य बाळगून ठेवावें लागत नाहीं व त्याची नासाडीहि होत नाहीं. तथापि साऱ्याचे हप्ते ठराविक महिन्यांत असल्यानें त्या वेळीं शेतकऱ्यास येईल त्या भावानें धान्य विकावें लागतें व बहुधा तें स्वस्त विकण्याचीच पाळी येते. पण शिवकालांत सरकारसारा धान्य-रूपानें व द्रव्य-रूपानें घेत असल्यामुळें रयतेस ती पद्धति हितावह अशीच होती. मात्र सारा म्हणून घेतलेलें धान्य गांवगन्ना पेवांत वा अंबारांत सांठवून ठेवावें लागे आणि धान्याला पावसाळ्यांत भाव आला म्हणजे तें विकणें सरकारास फायदेशीर होई. यांत आणखी एक सोय अशी होती कीं, दुष्काळांत रयतेपाशीं कांहींहि त्राण उरलें नाहीं व तिला उपाशी मरण्याची पाळी आली म्हणजे हेंच धान्य तिला वाढी दिढीनें वा केवळ परत करण्याच्या बोलीनें देऊन तिचें प्राणरक्षण करतां येई.

हल्लीं सरकार शेतकऱ्यांस विहीर खणणें, बींबियाणें खरेदी करणें, ताली धरणें यासाठी तगाई देतें. शिवाजीनें त्याच पद्धतीचा अंगीकार करून तो तिला जरूर तेव्हां धान्य व जरूर तेव्हां द्रव्यहि देत असे. शेतसारा म्हणून एकंदर उत्पन्नापैकीं धान्याचा वांटा किती घ्यावा हें जमिनीचा दर्जा व धान्याचा प्रकार पाहून शिवाजीनें ठरविलें असलें तरी नारळ, सुपारी या जिनसांना तें प्रमाण लागू करणें अव्यवहार्य असल्यामुळें त्यासाठीं त्यानें निराळ्या पद्धतीचा अवलंब केला होता असें त्याच्या खालील पत्रावरून दिसून येतें. हें पत्र त्यानें २४ सप्टेंबर १६७१ रोजीं तुकाराम सुभेदार व कारकून सुबे मामले प्रभावळी यास लिहिलें आहे.

" मामले दाभोळ विलायतीस नारेळ दर सद्दे ( शेकडा ) लारी ४ व रोठा देखील जकात दरखंडीस लारी १२५ सवाशेप्रमाणें विकत आहे आणि नेवरे व बाजे ( इतर गांवें ) तुम्हांकडील महाली ऐन जिन्नसबटाई दिवाणांत वसूल देताती व रयत बांसा खरेदी करितात. ऐसे असतां कमनिर्खे नारेळ, सुपारी विकते, ऐसी खबर कळो आली आहे. तरी हा अंमल कैसा आहे ? ऐन जिनसाची गिर्दवारी ( जकात वसुली ) कैसी करता ? आणि निर्खें कोण विकतात ? हें खबर घेणें आणि ताकीद करणें. पेस्तर ( पुढच्या वर्षी ) ऐसे नव्हे. ऐन जिनसाची गिर्दवारी बरी व्हो. आणि जो तह तुम्हाकडे आहे त्या निर्खे विक्री करणें. कमनिर्खे विकिलिया इकडे धक्का बसतो आणि अलग नुकसान येऊं पहातें. त्याची बदनामी तुम्हास. ऐसे जाणून खरी खबर घेउन, चौकशी व गिर्दवारी करून ऐन जिन्नस तहप्रमाणेंच दिवाणांतून विकीत जाणें " ( प. सा. सं. खंड २, पृ. ३९८ ).

यापासून अनुमानें निघतात तीं – शिवाजीनें नारळ व सुपारी शेतकऱ्यानें काय भावानें विकावी याचे दर ठरवून दिले होते. ते जिन्नस व्यापाऱ्यास विकतांना सरकारी अधिकारी त्या जागीं हजर असे. त्यानें त्या विक्रींतून सरकारी जकात वसूल ( उत्पन्न ) करावी. अर्थात् हें उत्पन्न द्रव्यरूपानें मिळे. पण कित्येक शेतकरी रोकड रक्कम न देतां जिन्नसच सरकारांत देत. त्यांची विक्री सरकारी अधिकारी करून येईल ती रक्कम जमा करीत. ती विक्री ठरलेल्या भावानेंच करावयाची असे. पण कांहीं शेतकरी कमी दरानें व्यापाऱ्यांस आपले जिन्नस विकीत, त्या कारणानें सरकारी उत्पन्नास धक्का पोंचे. तो न पोंचावा यासाठीं ठराविक दरानेंच नारळ व सुपारी विकली जाईल अशी तजवीज करण्यासाठी वरील हुकूम सुभेदारास काढण्यांत आला.

## पाटबंधारे

शिवाजीचें लक्ष जमीनसुधारणेकडे होतें. जमिनीस पाण्याची सोय कायमची केल्यावांचून पीक चांगलें व हमखास येणार नाहीं याची जाणीव त्यास होती. परंतु या कामास फुरसत व शांतता पाहिजे, ती त्यास कधींच मिळाली नाहीं. तथापि जेव्हां थोडीशी उसंत मिळे तेव्हां तो वरील सुधारणा केल्याशिवाय राहत नसे. पुण्याजवळचा शिवापूर गांव त्याच्या नांवें वसविण्यांत

आला. बालपणीं त्याचें राहणेंहि त्या गांवीं असे. या कारणानें त्याजविषयीं वाटणाऱ्या प्रेमानें तेथें त्यानें सुंदर आंबराई लावली व ओढ्याला धरणहि बांधलें. याची साक्ष लक्ष्मण पाटील वल्लद तावजी पाटील कामथे, मौजे कोंडवें बुद्रुक, कर्यात मावळ प्रांत पुणें, यानें शके १७११ त दिलेल्या जबानीवरून येणार आहे. तो म्हणतो –

"शिवाजीमहाराज शिवापुरास येऊन बाग-आमराई लावावयाकरितां धरणाचें काम लावलें. ते समयीं भोवरगांवचे पाटील जमा झाले. पण धरणाचें पाणी निघावयास एक मोठा धोंडा आड येत होता. त्यामुळें पाणी निघेना. म्हणून येस पाटील तेथें कामावर होता त्यास महाराजांनीं आज्ञा केली कीं आम्ही स्वारीहून येतों तोंपावेतों हर इलाज करून एवढा मोठा धोंडा फोडून काढून पाण्यास वाट करणें. ऐसी आज्ञा करून महाराजांची स्वारी गेल्यावर मागें येस पाटलानें हर इलाज करून धोंडा फोडून पाण्यास वाट सुरळीत करून दिली. नंतर पुढें महाराजांची स्वारी आल्यावर काम पाहिलें व धोंडा फोडून वाट कोणीं केली म्हणून पुसिलें. तेव्हां सभोंवते लोक होते, त्यांनीं अर्ज केला कीं, येस पाटील कोंडवेकर यानें आज्ञेप्रमाणें हें काम केलें. तेव्हां महाराज मेहरबान होऊन येस पाटलास बक्षीस देऊं लागले. येस पाटील म्हणाला – 'बक्षीस नगदी दिलें तर खाऊन जाईल. त्यापेक्षां इनाम जमीन वेविली पाहिजे.' त्याजवरून महाराजांनीं जमीन इनामः करून दिली" (शि. च. सा. खंड २, पृ. १४१).

# प्रकरण तेविसावें

# शिक्षण-प्रसार

शिक्षणप्रसार म्हणजे ज्ञानप्रसार. आधुनिक कालांत प्रजेस शिकवून साक्षर बनविणें हें सरकार आपलें कर्तव्य समजतें. ही कर्तव्यबुद्धि राज्यकर्त्यांत ब्रिटिश अमदानीपासून जागृत झाली आहे आणि नवीन स्वातंत्र्याच्या काळांत प्राथमिक शिक्षणास सरकारानें इतकें उचलून धरलें आहे कीं, एकाहि मुलामुलीस निरक्षर न ठेवण्याचा त्यानें चंग बांधला आहे. शिक्षणप्रसाराची इतकी आवश्यकता प्राचीनकाळीं राज्यकर्त्यांना वाटत नव्हती. कारण नित्याच्या व्यवहारांत साक्षरतेला इतकें अपरिहार्य स्थान प्राप्त झालें नव्हतें. ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य कमी अधिक प्रमाणांत साक्षर असत. विशेषतः कर्तव्य या दृष्टीनें ब्राह्मणांना अध्ययन व अध्यापन करावें लागत असल्यामुळें कांहीं ब्राह्मण वेदांचें व शास्त्राचें अध्ययन करीत व आपल्या घरीं वा देवालयांत वा मठांत थोड्या विद्यार्थ्यांना पढवून आपल्यासारखेच तयार करीत. इतर ब्राह्मण फक्त साक्षर असत व तितकेच क्षत्रिय व वैश्यहि असत.

राष्ट्रकूट राजांच्या काळीं वरिष्ठ असें संस्कृत शिक्षणास म्हणत. त्यांत वेद, व्याकरण, ज्योतिष, साहित्य, मीमांसा, धर्मशास्त्र, पुराणें व न्याय हे विषय असत. त्रैवर्णिकांनीं वेदाभ्यास बारा वर्षे करावा अशी धर्मशास्त्रांची आज्ञा असली तरी तशी वहिवाट नव्हती. क्षत्रियांचें वेदाध्ययन बेताचें

असावें. ब्राह्मणांतहि ज्यांचा व्यवसाय पौरोहित्याचा तेच वेदाध्ययनाकडे विशेष लक्ष देत असतील. सरकारी न्यायखात्यांत नोकरी मिळण्यास धर्मशास्त्रांतील पारंगतता पुरत असेल. फलज्योतिषाचा पगडा सामान्यजनांवर मोठा होता. राजसभेंतहि ज्योतिषी असत.

वरिष्ठ शिक्षण तीन ठिकाणीं मिळत असे. ( १ ) देवळांना लागून मठ असत, त्यांत शिक्षण मिळे. त्याच्या खर्चाची तजवीज सरकारी देणगींतून किंवा एखाद्या खाजगी व्यक्तीच्या दानांतून होत असे. ( २ ) ब्राह्मणांना वसाहतीसाठीं अग्रहार गांवें मिळालेलीं असत. त्यांत ते विद्यार्थ्यांना आपल्या घरीं शिकवीत. ( ३ ) खासगी व्यक्तींच्या किंवा गांवांच्या मदतीनें पाठशाळा व वेदशाळा स्थापण्यांत येत. त्यांत गुरुजी विद्यार्थ्यांना पाठ देत. हीच परंपरा राष्ट्रकूटांमागून कल्याणीचे चालुक्य व कलच्यूरी व त्यानंतर देवगिरीचे यादव यांच्या काळांत सुरू होती. राष्ट्रकूट, दोन्ही चालुक्य घराणीं व कलच्यूरी यांची राजभाषा कानडी होती. त्यांचा अंमल महाराष्ट्र व कर्नाटक या दोन्ही प्रांतांवर चालत असल्यानें मराठीवर कानडीची छाप पडावी आणि तिचें वळण, वाक्प्रचार व शब्द मराठींत शिरावे हें स्वाभाविक होय. तथापि राजाची भाषा कानडी असली तरी महाराष्ट्राचें राजदप्तर मराठी व कर्नाटकाचें कानडी असणें क्रमप्राप्त आहे. तथापि एका अर्थानें कानडीची सरशी दोन तीनशें वर्षें मराठीवर झाल्यानंतर यादवकाळांत मराठी ही राजभाषा होऊन तिची कमान चढती झाली. त्याबरोबर मराठीची छाप कानडीवर बसून कर्नाटकांत मराठीचा प्रसार होऊं लागला. त्या प्रसारास यादव राज्याबरोबर व त्यानंतर जे ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ हे नामांकित साधुसंत जन्मास आले, त्यांच्या काव्यानें पंढरीच्या पांडुरंगाची भक्ति कर्नाटकांत फैलावली आणि त्यांच्या रसाळ, भक्तिपर व आध्यात्मिक काव्यानें कर्नाटकासहि मोहनी पडून त्यांचे ग्रंथ वाचण्याकरितां कर्नाटकांतील सुजाण लोकांना मराठीचा अभ्यास करणें आवश्यक वाटूं लागलें. अशा रीतीनें कर्नाटकांत मराठीचा प्रवेश तुंगभद्रेपर्यंत झाला. विजयानगराचें हिंदुराज्य बुडाल्यावर व शहाजी विजापूरकरांचा सरदार या नात्यानें बंगळूर ही आपली राजधानी करून राहिल्यावर तुंगभद्रेपलीकडे त्याच्या जहागिरींतहि मराठी भाषा पसरली.

यादवांचें राज्य बुडून कलबुर्ग्यास अल्लाउद्दिन बहामनीनें स्थापलेलें राज्य वाढत गेलें व बहामनींचे सुभेदार विजापूर, गोवळकोंडा, अहमदनगर, बेदर व एलिचपूर येथें राहूं लागून कालांतरानें स्वतंत्र झाले व त्यांचीं राज्यें वेगळीं झालीं. त्या वेळीं अहमदनगर, एलिचपूर, बेदर व विजापूर या प्रत्येक राज्यांतील कारभार प्रजाजन व राज्यकर्ते यांच्या सोयीकरितां प्रथम मराठींत, आणि नंतर फार्सी व मराठी या भाषांत चालूं लागला. यादवराज्यांत जे देशमुख, देशपांडे व कुलकर्णी मराठींत वाकबगार झाले होते तेच मुसलमानी राजवटींत प्रारंभीं तीच भाषा वापरूं लागले.

मराठीची या विविध कारणांनी कर्नाटकांत जी आवड उत्पन्न झाली तिजमुळें कर्नाटकांत कांहीं गांवीं आदिलशाही राजवटींत मराठी शाळा निघाल्या. तसली एक शाळा म्हैसूर संस्थानापैकीं शिवमोघें ( शिमोगा ) या गांवीं स्थापण्यांत आली होती. सोलापुराच्या आग्नेयीस शंभर मैलांवर सगर नांवाचें कानडी गांव आहे. त्यांतील चारशें साडेचारशें वर्षांपूर्वीचे महजर व खाजगी पत्रें एक जात अथपासून इतिपर्यंत मराठींत आहेत. क्वचित् एखाद्या पत्रावर सहीदाखल लिहिलेले शब्द कानडी आहेत. मराठी पत्रें लिहिणारांपैकीं कित्येकांचीं नांवें कानडी आहेत हा विशेष होय. सगर प्रांतांतील कणमेश्वर येथील विठ्ठल केशव कर्णिक यानें ज्ञानेश्वरीची एक प्रत तयार केली होती. याचा अर्थ असा कीं सोलापूरच्या दक्षिणेकडील फार मोठ्या प्रदेशांतील बहुजन समाजानें सामान्यतः मराठी भाषा लिहिण्या-वाचण्यासाठीं आपुलकीनें स्वीकारली होती.

श्री. ग. ह. खरे लिहितात, " सिद्रामप्पा मल्लिकार्जुनाप्पा यांच्या संग्रहांत संस्कृत, मराठी व कानडी पोथ्या आढळल्या. पण कागदांत कानडी कागद प्रायः आढळले नाहींत. बहुतेक कागद, फार्सी, मराठी व फार्सी-मराठी मिश्रित आहेत. पहिला मराठी कागद इ. स. १५२४।२५ चा आहे. पहिला फार्सी-मराठी कागद इ. स. १५५८।५९ चा आहे व पहिला निवळ फार्सी कागद इ. स. १५६८ चा आहे. आदिलशाही फार्सी फर्मानांत फार्सीबरोबर थोडे मराठी शब्द आहेत. मराठी कागदांत मात्र शेंकडों फार्सी शब्द आहेत. या सर्व संग्रहांत सर्वांत जुने कागद मराठी मोडी लिपींत आहेत.

हे कागद निवळ सरकारी कामासंबंधीं नसून गांवकऱ्यांनीं एकत्र बसून करावयाचे महजर, ऋणकोनें धनकोस द्यावयाचीं कर्जखतें व आपसांतील खाजगी पत्रव्यवहार त्यासंबंधीं आहेत. फर्मानांचीं भाषांतरें व खाजगी निमंत्रणेंहि मराठींत आहेत " ( सकाळ १२ सप्टेंबर १९५४ ). सारांश, कर्नाटकांतील सुशिक्षित लोकांना सोळाव्या शतकांत कानडी व मराठी या दोनहि भाषा अवगत होत्या.

यादवांचें राज्य चौदाव्या शतकांत बुडून महाराष्ट्रावर मुसलमानी अंमल सुरू झाला; तेव्हांपासून मराठी भाषेची स्थिति वरीलप्रमाणें होती. पण त्यांजकडून महाराष्ट्रांतील हिंदूंच्या विद्येला उत्तेजन तर प्रायः मिळालें नाहींच, उलट हिंदुधर्मद्वेषानें मठ व देवालयें उद्ध्वस्त करून हिंदूंची विद्या बुडविण्याचेंच पातक त्यांनीं जोडलें.

मुसलमान राज्यकर्ते मुसलमानी विद्येस उत्तेजन देत. अर्थात् तें उत्तेजन फक्त मुसलमानांच्या वांट्यास येई. मुसलमानांची विद्यादानपद्धति महाराष्ट्रांत कशी असेल याची कल्पना मोगलांनीं आपल्या राज्यांत अंगीकारलेल्या पद्धतीवरून येणार आहे. कारण जी पद्धति उत्तरेंत मोगलांची तीच पद्धति महाराष्ट्रांत बहामनी राज्यांची.

मोगल बादशहा मशिदी, दर्गे, साधु व विद्वान् यांना जमिनी इनाम देत व तनखेहि चालवीत. त्या उत्पन्नांतून शाळा स्थापण्यांत येत. बहुधा प्रत्येक मशिदीस जोडून प्राथमिक शाळा म्हणजे मकतब असे. तींत मशिदींतील मुल्ला आसपासच्या मुसलमान मुलांमुलींना जमवून त्यांना धुळाक्षरें व कुराण शिकवी. ठठ्ठा, अजोधन, सिआलकोट, सरहिंद, कनोज, नागोर, अहमदाबाद, पट्टण, जानपूर इत्यादि शहरीं विद्वान् मुसलमान घराणीं असून त्यांजकडे वरिष्ठ प्रतीचें शिक्षण घेण्यास ठिकठिकाणचे विद्यार्थी येत. या विद्वान् घराण्यांना दानधर्म मुसलमान राजे करीत. वरिष्ठ प्रतीचें शिक्षण अरबी भाषेच्या द्वारा देत. भौतिक शास्त्रें, तत्त्वज्ञान, व्याकरण, गणित व धर्म यांवरील ग्रंथ अरबी भाषेंत असत. मात्र अरबी भाषा बोलण्यांत नसे. फ्रेंच भाषा युरोपांतील बऱ्याच देशांत सुसंस्कृतपणासाठीं शिकविण्यांत येते. तशी फार्सी भाषा भारतांतील वरिष्ठ दर्जाचे मुसलमान शिकत. विशेष शिकलेले मुसलमान आपलें अध्ययन पूर्ण करण्यासाठीं मक्केस जाऊन राहत.

तिकडे जाऊन आलेला माणूस पंडित समजला जात असल्यानें त्याला काजी नेमण्यांत येई. खोरासन, तुराण, अरबस्तान येथून इकडे येणाऱ्या पंडितांना फार मान असे. राजपुत्रांना शिकविण्यास त्यांना ठेवीत.

मोगल बादशहा आपल्या मुलींना शिकविण्यास इराणी स्त्रियांना नेमीत. त्या मुली धर्मशास्त्र शिकत नसत व अरबी भाषाहि शिकत नसत. त्या फार्सी शिकत व कुराण पाठ करीत. अकबराची पत्नी मकफी, औरंगजेबाची कन्या झेबुन्निसा व पहिल्या शहाअलमाची पत्नी नुरुन्निसा या विद्वान् होत्या. उमरावहि आपल्या मुलींना हें शिक्षण देत, पण घरच्या घरीं देत. उमरावांच्या मुलींचीं लग्नें १५ ते १८ वर्षांपर्यंत होत. तोंपर्यंत त्यांना हें शिक्षण देण्यांत येई.

## बहामनींची शिक्षणपद्धति

दक्षिणेंत कलबुर्ग्यास बहामनी राज्य होतें व तें मोडल्यानंतर विजापूर, गोवळकोंडा, अहमदनगर, बेदर व एलिचपूर येथें त्यांच्या पांच शाखा होत्या. त्यांनीं इकडे रूढ केलेली शिक्षणपद्धति पूर्णपणें धार्मिक असल्यामुळें मुसलमानांपुरतीच मर्यादित होती. गुलबर्ग्यास महमूदशहा नांवाचा सुलतान ( इ. स. १३७८–१३९६ ) होता. तो विद्वान्, गुणज्ञ व रसिक होता. त्याचें मुसलमानी धर्मप्रसाराकडे विशेष लक्ष होतें. तो स्वतः अरबी व फार्सी भाषा जाणणारा होता. त्यानें इराण व अरबस्तान या देशांतून अनेक विद्वान् इकडे आणून त्यांस मोठमोठ्या नगरांतून अरबी व फार्सी भाषा शिकविणाऱ्या शाळा काढून त्यांजवर शिक्षक नेमले व त्यांजकडून मुसलमान मुलांना कुराणाचें शिक्षण देवविलें. अशा शाळा त्यानें कलबुर्गा, बिदर, कंधार ( मराठवाडा ), एलिचपूर ( वऱ्हाड ), दौलताबाद, चौल व दाभोळ ( कोंकण ) येथें काढल्या.

महमूदशहानंतर कांहीं वर्षांनी अहमदशहा वली (इ.स. १४१२–१४३४) गादीवर बसला. त्याचें वारंगळचा राजा देवराय याजबरोबर युद्ध जुंपल्यावर त्याच्या मुलखांत शिरून त्यानें तैलंगणांतील देवळें, मठ व पाठशाळा पाडल्या. त्याच्या ताब्यांत महाराष्ट्र आधींपासून होताच; तेव्हां तेथील मठ देवळें व पाठशाळा यांचा बिध्वंस त्यापूर्वीच करण्यांत आला असेल हें सांगावयास नकोच.

फेरोजशहा बहामनी ( इ. स. १३९८ ) हा विद्वान् व गुणी लोकांना इराण, अरबस्तान या देशांतून आणवी आणि आठवड्यांतून शनिवार, सोमवार व गुरुवार या दिवशीं त्यांची वनस्पतिशास्त्र, तर्कशास्त्रा व भूमिति या विषयांवर व्याख्यानें करवी. त्याच्या पदरीं हकीम हसन गिलानी या नांवाचा ज्योतिर्विद् होता. त्याजकरितां त्यानें इ. स. १४०७ त दौलताबादेजवळच्या घाटांत एक वेधशाळा बांधण्यास सुरुवात केली होती. पण हकीम मध्यंतरीं निवर्तल्यामुळें तें काम अर्धवट राहिलें.

विद्येचा प्रसार अशा रीतीनें महाराष्ट्रांत चालू होता व त्याचा फायदा मुसलमान लोकांना मिळत होता. मशिदी व दर्गे हीं मुसलमानी धर्माचीं, तशींच विद्येचीं केंद्रें बनल्यानंतर त्यांजमार्फत त्यांची विद्या महाराष्ट्रभर सर्वत्र पसरत गेली. बहामनी सत्तेप्रमाणें अहमदनगराची निजामशाही बुडविल्यानंतर मोगलांची सत्ताहि वऱ्हाड, खानदेश, अहमदनगर, नासिक, औरंगाबाद, जालना, नांदेड या महाराष्ट्रीय प्रदेशांत स्थापन झाल्यावर त्यांनींहि आपल्या पद्धतीनें आपल्या राज्यांत शिक्षणप्रसार सुरू केला. त्या वेळीं नासिक, पैठण, औरंगाबाद, पुणें, जुन्नर, कऱ्हाड इत्यादि प्रमुख नगरांत व त्याप्रमाणेंच दिंडोरी, नंदुरबार, रहिमतपूर, पारनेर, खेड, वाई, बागणी, खानापूर, नांदेडजवळील कंधार, मावळांत नवलाखउंबरें, या देशावरील लहानमोठ्या गांवीं आणि कोंकणांत दाभोळ, केळशी, राजापूर, विजयदुर्ग, चौल, माणगांव, निजामपूर, पण, भिवंडी, दंडाराजपुरी अशा शेंकडों ठिकाणीं मुसलमानांनी मशिदी वा दर्गे बांधून त्यांत फार्सी व अरबी भाषा मुसलमान मुलांमुलींना शिकविण्यास प्रारंभ केला.

## फार्सी भाषा व हिंदु

राज्यकर्ते मुसलमान व प्रजा हिंदु अशी स्थिति होती. राज्यकर्त्यांना आपला कारभार चालविण्यास हिंदूंचें सहकार्य हवें होतें व हिंदूंनाहि आपल्या व्यवहाराचा उलगडा करून घेण्याकरितां मुसलमानांशीं संबंध जोडावयास पाहिजे होता. याला मुख्य साधन भाषा असल्यामुळें हिंदुप्रजाजनांना राज्यकर्त्यांची दरबारी भाषा जी फार्सी ती अवगत होणें जसें जरूर होतें, तसें राज्यकर्त्यांनाहि मराठी भाषा समजणें आवश्यक होतें. सुलतान, त्यांचे वजीर, सुभेदार, हवालदार इत्यादि वरिष्ठ अधिकारीवर्ग

मुसलमान आणि त्यांचे दिवाण, फडणीस, मुजुमदार, चिटणीस, पोतनीस, शेखदार, देशमुख, देशपांडे, कुलकर्णी इत्यादि कनिष्ठ अधिकारी हिंदु असत. मुसलमानांचा स्वभाव व वागणूक लक्षांत घेतां वरिष्ठ अधिकाऱ्यांना मराठी लिहितां तर येत नसेलच, पण वाचतां व बोलतांहि क्वचितच येत असेल. या कारणानें गरजू अशा हिंदूंनाच आपली मराठी भाषा शिकून मुसलमानांची दप्तरी फार्सी भाषा शिकणें भाग पडत असेल. त्यांना ही भाषा शिकण्यास काजी, मौलवी, मुनशी यांजकडेच जावें लागत असेल व ते त्यांना ती भाषा मशिदींत वा दर्ग्यांत मुसलमानांबरोबर आनंदानें शिकवीत असतील. कारण हिंदूंना बाटवून मुसलमान करणें हें मुसलमानांचें ध्येय होतें व तें साधण्याचा हा एक टप्पाच होता.

मुसलमानांच्या मुलकी खात्यांतील नोकरवर्गांत ब्राह्मणच बहुसंख्येनें असणें स्वाभाविक होय. त्यायोगानें महाराष्ट्रांत फार्सी भाषेचा फैलाव ब्राह्मण, प्रभु यांत विशेष झाला असला पाहिजे. मराठे मराठीच लिहिण्या-वाचण्यास जर तुरळक शिकत असत तर त्यांना फार्सी भाषा शिकण्याचें कसें साधणार ! मात्र मराठे हे मुसलमानांच्या सैन्यांत सरदार व सैनिक असल्यामुळें त्यांना फार्सी भाषा, तिचें रूपांतर उर्दूत होईपर्यंत बोलतां येत असेल व ती त्यांच्यामार्फत त्यांच्या बायका-मुलांतहि कमी-अधिक प्रमाणांत शिरली असेल. ब्राह्मणांना मुसलमान अधिकाऱ्यांची संगत व त्यांना मराठी व फार्सी या दोन्ही भाषा अवगत या कारणानें त्यांच्या मराठी पत्रव्यवहारांत व बोलण्यांत फार्सी शब्दांची भेसळ होणें अगदीं स्वाभाविक होय. तत्कालीन मराठी भाषा बिघडण्याचें मुख्य कारण हें होय. जशी कारकुनी पेशांतील ब्राह्मणांनीं मराठी भाषा बिघडविली, तशी मराठे सरदार, शिलेदार, बारगीर, किल्लेदार, हवालदार, सरनौबत व त्यांचीं बायकामुलें यांनींहि ती बिघडविली.

सरकारी पत्रव्यवहारांत मराठीची इतकी दुर्दशा उडाली कीं, राजवाडे म्हणतात त्याप्रमाणें शब्दप्रयोग, वाक्यरचना या सर्व बाबतींत मराठी ही फार्सीची बटीक बनली. त्यांच्या मतें मोडी लिपी हेमाद्रीनें प्रचारांत आणली असली तरी ती त्यास फार्सी लिपी पाहून सुचली असावी. कारण मराठींत बाळबोध व मोडी हे जसे दोन प्रकार आहेत तसे फार्सींतहि आहेत. त्यास

नस्त व शिकस्ता अशीं नांवें आहेत. नस्त अक्षर आपल्या बाळबोधीप्रमाणें स्पष्ट व सुव्यक्त असतें. फार्सीत शिकस्तन या क्रियापदाचा अर्थ मोडणें असा आहे. म्हणजे शिकस्ता याचा अर्थ मोडी. राजवाड्यांजवळच्या इ. स. १४१६ च्या पुढील कागदपत्रांचें अक्षर मोडी होतें.

त्या दृष्टीनें लिपीच्या बाबतींतच मराठीनें फार्सीचें अनुकरण केलें असें नव्हे तर पत्रांतील मायने, शब्दप्रयोग व शब्दहि फार्सीतून घेण्यांत आले. "शिवकालांत दियानतरावाचें एक पत्र असून त्यांत ९१ शब्द आहेत. पैकीं ३० शब्द फार्सी आहेत. बाकीच्या शब्दांतील २।३ शब्दांखेरीज करून उरलेले शब्द फार्सी शब्दांचे मराठी तर्जुमे आहेत. मायन्यांतील अखंडित लक्ष्मीप्रसन्न व परोपकारमूर्ति हे शब्द दामदौलतहू व मुषफिक मेहेरबान या शब्दांचे तर्जुमे आहेत. पहिल्या वाक्यांतील सेवक हा शब्द बंदा या फार्सी शब्दाचें भाषांतर आहे" ( राजवाड्यांच्या प्रस्तावना खंड ८ वा ).

फार्सी भाषेचा मुसलमानी राजवटींत मराठी भाषेवर असा विपरीत परिणाम झाला. इंग्रजी भाषेचा मराठीवर घडलेला परिणाम आज आपण पाहतोंच. त्यावरून फार्सीच्या परिणामाची कल्पना आपणांस येईल. हल्लीं किती तरी इंग्रजी शब्द मराठींत घुसले आहेत. ते बोलण्यांत व लिहिण्यांत येतात. कोणत्याहि मोठ्या नगरांत एखादी चक्कर टाकल्यास जिकडे तिकडे ज्यावर इंग्रजी शब्द मराठींत लिहिले आहेत वा सर्वत्र इंग्रजी लिहिलें आहे अशा शेंकडों पाट्या दुकानांना लावलेल्या दिसतात. हेअर कटिंग सलून, हायस्कूल, कॉलेज, डेअरी, बँका, विमाकंपनी, बस-स्टँड, स्टेशन इत्यादि असंख्य शब्द ठिकठिकाणीं रस्तोरस्तीं डोळ्यांना बोचत असतात. शब्दांची जी दशा तीच शब्दप्रयोगांची व वाक्यरचनेची. 'सभा घेतली', 'या चळवळीमागें हा हेतु आहे', 'संपावर गेले' इत्यादि.

सुशिक्षित म्हणविणारांची ही स्थिति. त्यांच्या संगतीनें अशिक्षितहि न कळत हवे तितके इंग्रजी शब्द टाइम, पब्लिक, स्टँड, पेपर, रोड, कोर्ट, यांसारखे वापरीत असतात. शिक्षित लोक आपला खाजगी पत्रव्यवहारहि इंग्रजींतून करतात व त्यांत श्रेष्ठता व भूषण मानतात. इंग्रजी राज्यांत इंग्रजी भाषेचा प्रसार होत असतां मराठी शिक्षण गांवगन्ना शाळा स्थापून देण्यांत येत होतें. तरीहि जर मराठीची इतकी विपन्नावस्था तर ज्या काळांत मराठी

शिक्षण देणारी एकहि तात्यापंतोजीच्या तुटपुंज्या गांवठी शाळांशिवाय शाळा नव्हती त्या मुसलमानी काळांत व शिवकालांत मराठीचे किती धिंडवडे निघाले असतील याची कल्पना काय करावी ?

## मराठीचें रक्षण

सांप्रत मराठीचें रक्षण तिच्या शुद्ध स्वरूपांत अनेक ग्रंथकारांनीं, मासिककारांनीं व कांहीं वृत्तपत्रकारांनीं गेलीं ७५।८० वर्षें केलें म्हणून ती भाषा जिवंत तरी राहिली आहे. त्या काळीं गद्य ग्रंथकार व नियतकालिककार नव्हते व छापखानेहि नव्हते. तरीहि साधु, संत व कवि यांनीं मराठीला शक्य तितक्या शुद्ध स्वरूपांत जगविलें हे त्यांचे केवढे उपकार ! तरीहि पद्यग्रंथकारांनाहि परकीय भाषेचा अनिष्ट परिणाम अजिबात चुकवितां आला नाहीं. नाथांना आपल्या काव्यात रूपकाच्या निमित्तानें का होईना अर्जदास्त, अर्जदार, बंदगी, बंदेनवाज, आलेकम सलाम असे शब्द वापरावेसे वाटले. तसेंच जीवाला सुभेदार, बुद्धीला फडणीस, देहाला मौजे, अष्टपुरीला तालुका व पांचाळेश्वराला मामला ही उपमा द्यावीच लागली. महालिंगदास हा कवि शके १४८७ त होता. त्याच्या ‘ सिंहासन बत्तिशी ’ या ग्रंथांत कारकोनी, बंदिखाना, चाबूक, हरामखोरी इत्यादि शब्द आले आहेत. रामदास यावनी शब्द कटाक्षानें टाळीत. तरी त्यांच्या दासबोधग्रंथांतहि ‘मज्यालसि’, ‘साहेबी’ यांसारखे शब्द क्वचित् आढळतात.

जसे फार्शी शब्द मराठींत शिरत तसे महाराष्ट्राभोंवतालच्या व महाराष्ट्रापासून दूरच्या भाषांतील शब्दहि मराठींत प्रवेश करीत. त्यांचा प्रवेश मराठी कवींमार्फत होत असे. हे कवि महाराष्ट्राबाहेर कित्येक वर्षें राहून तिकडील भाषांत इतकें प्रावीण्य संपादित कीं त्या भाषांत ते कवित्वहि करीत. अशांपैकींच शिवकालीन मुकुंद नामक एक कवि असून त्यानें आपलें काव्य महाराष्ट्रांतील व महाराष्ट्राबाहेरील ब्रिज, नेमाडी, अभीर, बागलाणी, खानदेशी, रणावट, गुर्जरी, महाराष्ट्रीय व मारवाडी या भाषांत केलें आहे. अशांच्या मराठी रचनेंत इतर भाषिक शब्द शिरावयाचेच.

शिवकालीं इतर सर्व व्यवसायांप्रमाणें विद्याभ्यासहि मुलगा बापापाशींच करीत असे. बापाला जितकें लिहितां वाचतां येई तितकें तो मुलास शिकवी. शिकावयाचें तें तरी आपला पिढीजाद धंदा पुढें चालविण्याकरितां. देशा-

वरील ब्राह्मण हे देशपांडे, कुलकर्णी, जोशी, वा मुसलमान राज्यकर्त्यांच्या पदरीं कारकून असत. जोशी वगळून त्या सर्वांना लेखन, वाचन, उजळणी, गणित, हिशेब इतकें यावेंच लागे. लेखन-वाचन करण्यास हल्लींसारखीं त्या काळीं अनेक पुस्तकें नव्हतीं व विषयहि नव्हते. इतिहास, भूगोल यांचा तर त्यांना गंधहि नव्हताच, पण मराठी शुद्ध लिहिण्यास व वाचण्यास ज्या व्याकरण-विषयाची जरुरी आहे तेंहि शिकण्याचें साधन नव्हतें. म्हणजे मराठीकरितां व्याकरण या विषयावर पुस्तकच नव्हतें. जें कांहीं होतें तें पद्यवाङ्मय. गद्य-वाङ्मय मुळींच नव्हतें म्हटलें तरी चालेल. कागद अतिशय दुर्मिळ, लहान व महाग. शिवकालीन पत्रें एक वीत लांब व चार-सहा बोटें रुंद अशा कागदावर लिहिलीं आहेत. तो कागद जुन्नरी वा दौलताबादी. मराठी गद्य-वाङ्मयाची रचना नाहीं व जी थोडी होती ती लिहून काढण्यास कागद नाहींत, अशा स्थितींत शिकाऊ मुलांच्या हातांत वाचावयास व त्यावरून लिहावयास पुस्तकें तरी कोणतीं द्यावयाचीं ? पेशवाईत शिवाजी, संभाजी, राजाराम, पेशवे यांच्या बखरी तरी मुलांना वाचावयास देण्यासाठीं होत्या. पण शिवकालापूर्वी मराठ्यांचा स्वतंत्र असा स्फूर्तिदायक इतिहासच नसल्यामुळें त्याच्या आधारावर लिहिलेल्या बखरीहि नव्हत्या. तथापि भाषाज्ञान होण्यास मुलांना वाचावयास कांहीतरी द्यावयास पाहिजे म्हणून शालिवाहनाची बखर आणि भारत व रामायण यांतील कथांवरील बखरी मोडींत लिहून त्या मुलांना वाचावयास देत.

## बाळबोध व मोडी

मुलांना बाळबोध व मोडी या दोन्ही लिपी शिकाव्या लागत. बाल-बोध ही मूळची एकच लिपी. पण जलद लिहिण्यास ती अवघड असल्यामुळें ती मोडून तिजपासून मोडी लिपी निर्माण झाली. यादवांचा मंत्री हेमाद्रि यानें मोडी लिपी निर्मिली असें म्हणतात. हेमाद्रीकडे यादवांचें वसुलीखातें असल्यामुळें सौकर्यासाठीं त्यानें बालबोधीची मोडी बनविली असावी असें राजवाडे म्हणतात. तें कांहींहि असलें तरी इतकें खरें की, पेशवाईत घटून घटून मोडी लिपीला सफाई व वळणदारपणा आला तो शिवकालांत आला नव्हता; त्याकाळच्या कित्येक पत्रांत मोडी व बाळबोध या दोन लिपींचें मिश्रण आढळतें. शिवकालापूर्वी तीनशें वर्षें मराठी ही राजभाषा वा

दरबारी भाषा नसल्यामुळें तिची आबाळ झाली असल्यास व मोडी लिहिण्याचा परिपाठ नसल्यानें तिला सौंदर्य आलें नसल्यास आश्चर्य कसलें ! म्हणून त्या काळीं बाळबोध जाणणारांपेक्षां मोडी जाणणारे लोक थोडे असतील.

श्रीसमर्थ दासबोधांत ब्राह्मणांना बाळबोध अक्षरच उत्तम घटविण्याचा उपदेश करतात. ते लिहितात – ' ब्राह्मणें बाळबध अक्षर । घडसुनी करावें सुंदर । जें देखतांचि चतुर । समाधान पावती ॥ १ ॥ वाटोळें सरळें मोकळें । वोतलें मसीचें काळें । कुळकुळीत वळी चालिल्या ढाळें । मुक्तामाळा जैशा ॥२॥ '

ग्रंथलेखकास त्यांनीं केलेल्या सूचना वाचल्या असतां लेखनकलेला अडचणी किती असत याची कल्पना येते. लेखकापाशीं कागद चांगला टिकाऊ पाहिजे. त्याशिवाय सुऱ्या, कातऱ्या, बोरू, हिंगूळ, आळिता, पोथी बांधून ठेवतांना खालींवर घालावयाच्या बंदरांतन आणिलेल्या गुळगुळीत फळया, बांधावयास बासन, गोफ, मेणकापड इत्यादि साहित्य त्यांनीं सुचविलें आहे.

घट्ट कागद आणावे । जपोन नेमस्त खळावे । लिहिण्याचे सामे असावे । नानापरी ॥ १४ ॥ सुऱ्या कातऱ्या जागाईत । खळी घोटाळे ( कागद घोटण्याचा घोटा ) तागाईता नाना सुरंग मिश्रित । जाणोनि ध्यावे ॥ १५॥ नाना देशींचे बरू आणावे । घटी बारीक सरळे ध्यावे । नाना रंगाचे आणावे । नाना जिनसी ॥ १६ ॥ नाना जिनसी टांकतोडणी । नाना प्रकारें रेखाटणी । चित्रविचित्र करणी । सिसें लोळया ॥ १७ ॥ हिंगुळ संग्रहीं असावे । वाळले आळिते पाहोनि ध्यावे । सोपे भिजउनी वाळवावे । संग्रह मसीचे ॥ १८ ॥ तगटी इतिश्र्या कराव्या । बंदरी फळ्या घोटाव्या । नाना चित्रीं चिताराव्या । उंच चित्रें ॥ १९ ॥ नाना गोप नाना बासनें । मेणकापडें सिंदुखणें । पेट्या कुलपें जपणें । पुस्तकाकारणें ॥ २० ॥ ( लेखनक्रिया निरूपण नाम समास १, दशक १९ ) – दासबोध.

ग्रंथरचना हें मानवजीवितांतील पुण्यकृत्यच असून ती करीत असतां अन्तःकरण प्रसन्न व थोर असावयास पाहिजेच, पण ग्रंथलेखनहि तितकेंच पवित्र कृत्य समजून तें हौसेनें व उत्साहानें करीत गेलें पाहिजे असें समर्थांच्या उपदेशाचें सार आहे. जुन्या पोथ्या अजूनहि आपणांस पाहावयास

सांपडतात. त्यांची निगा कशी उत्कृष्ट ठेवलेली असते, खालींवर सुरेख घोटीव फळ्या, त्या जाड व रंगीत बासनांत गुंडाळलेल्या, त्या बासनाला रंगीत दालहि रेशमाचा व विचित्र लावलेला आणि त्यानें ती पोथी घट्ट बांधलेली. पोथी ज्या प्रसंगाची असेल त्या प्रसंगाचीं वेगळालीं रंगीत चित्रें अध्यायाच्या प्रारंभीं अशीं काढलेलीं कीं तीं पाहून श्रोत्याचें व वाचकाचें अन्तःकरण पवित्र व गंभीर भावनांनीं भरून यावें. अक्षरें टप्पोरीं व फार जपून काढलेलीं. जणूं काय अक्षर काढणें म्हणजे सुबक चित्रच रेखाटणें होय. अशी पोथी लिहून पुरी करण्यास महिनोन् महिने लागावे. त्या परिश्रमामुळें ग्रंथाला योग्यता सुवर्णालंकाराची येऊन तो चोरीस जाऊं नये याकरितां दागिन्यांच्या डब्याप्रमाणें ती पोथी मजबूत पेटींत कुलूप घालून बंदोबस्तानें ठेवावी.

## शिवकालीन लेखक

शिवकालीन लेखक आपल्या पोथ्या इतक्या बंदोबस्तानें ठेवीत त्याचें कारण त्या लिहिण्यास फार कष्ट पडत हें होय. त्यांना कागद साफसूफ करण्यापासून तयारी करावी लागे. कागद लहान, जाडजूड, ओबडधोबड, काळसर व चिंध्या कुटून कसे तरी बनविलेले. ते घट्ट नसून विशविशीत असत. याकरितां त्यांना खळ लावून प्रथम घट्ट करावें लागे. मग त्यांत जीं धसकटें असत, तीं दाबून टाकण्याकरितां त्यांजवरून घोटाळें फिरवून ते गुळगुळीत करण्यांत येत. तेवढ्या त्या लहानशा कागदांतच दोन्ही बाजूंनीं समास सोडीत. समास दाखविण्याकरितां आळत्यानें तांबड्या रेघा ओढीत. शिऱ्यांत काजळ घोटून त्याची काळी कुळकुळीत शाई करीत. पण बोरूनें त्यावर लिहिण्यास सुरुवात करण्यापूर्वी ओळी सरळ येण्याकरितां कांहीं तजवीज करावी लागे. त्या काळीं शिसपेन्सिली नसत. पण शिशाच्या लोळ्या असत. त्यांनीं रेघा ओढाव्या. अक्षरसुद्धां फार बारीक लिहितां कामा नये. कारण म्हातारपणाची गोष्ट वेगळी. त्या वेळीं उपनेत्रांच्या अभावीं पोथीचीं अक्षरें वाचवयास दिसण्यासाठीं तीं मोठीं काढणें आवश्यक असे. सारांश, त्या काळीं लेखनास इतके प्रयास पडत म्हणून त्याची मातबरीहि विशेष.

कागद जेव्हां उपलब्ध झाला तेव्हांपासून सरकारी पत्रव्यवहारांत मोडी लिहिणें शक्य झालें. म्हणून बाळबोध अक्षरापेक्षां मोडी लिपी पुष्कळशी

आधुनिक असल्यामुळें तींत सफाई व पूर्णता शिवकालांत आली नव्हती. भा. इ. सं. मंडळांत सर्वांत जुना मोडी लेख शके १४२९ मधील आढळता. तेव्हांपासून मोडीची घडी बसत बसत तिला शके १६०० च्या सुमारास बरेंचसें स्थिर व पूर्ण स्वरूप प्राप्त झालें. कागदाच्या कमताईमुळें शिवकालीन अक्षर लहान व किरटें असे व ओळी जवळजवळ काढीत. कागद इतका दुर्मिळ कीं पाटलास तो पैदा करण्याकरितां त्याच्या मुशाहिऱ्यांत कागद ही एक वेगळी बाब धरावी लागे. फार्सी या राजभाषेस सरकारी पत्र-व्यवहारांत साहजिकच प्राधान्य असे. कागदांतील पहिला मजकूर फार्सी व त्याच्याखालचा मजकूर मराठी. तो बहुधा भाषांतररूप असावयाचा.

शिवपूर्वकालीन, शिवकालीन व पेशवेकालीन पत्रांतील भेद एकदम ओळखावयाचें गमक हें की 'तिसा मया' हे शब्द असतील तर तो कागद शिवपूर्वकालीन, 'अलफ' असल्यास शिवकालीन आणि 'मया व अलफ' असल्यास पेशवेकालीन. या पत्रव्यवहारावरून बालबोधीची मोडी लिपी कशी बनत गेली हें समजतें. शके १४०० मधील मोडी कागदांत मोडी 'अ' हा बालबोध 'अ'सारखाच दिसतो.

भारतांत कागद केव्हांपासून मिळूं लागला, हा एक संशोधनाचा विषय आहे. शिकंदर बादशहानें भारतावर स्वारी केली तेव्हां भारतास कागद बनविण्याची कला माहीत होती असें म्हणतात ( ज्ञानकोश ). याचा अर्थ असा कीं, मुसलमानांच्या काळापूर्वी भारतांत कागद तयार होत होता. तसें असेल तर ज्ञानेश्वरांनीं आपल्या भावार्थदीपिकेची पहिली प्रत कागदा-वरच लिहून काढली असली पाहिजे. पण कागद मुळींच मिळत नव्हता तेव्हां लेखनव्यवसाय अतिशयच मर्यादित असेल व त्या वेळीं इतर देशांत लांकूड वापरीत असत. भारतांत धुळाक्षरें व उजळणी लिहिण्याकरितां तात्पुरत्या लांकडाच्या पाट्या व धूळ वापरीत असले तरी कायम स्वरूपाचें लेखन ताडपत्र वा भूर्जपत्र, ताम्रपट, पाषाण, कापड यांवर करण्यांत येत असे. अशा काळांत शिक्षणप्रसार नाममात्रच असावा हें स्वाभाविक होय. म्हणूनच वेद व शास्त्रें विद्यार्थ्यांना तोंडानें सांगण्याचा व तें वाङ्मय त्यांजकडून पाठ करून घेण्याचा प्रघात त्रैवर्णिकांत व विशेषतः ब्राह्मणांत पडला. श्रुति व स्मृति हीं नांवें ग्रंथांना देण्याचें कारण तरी हेंच होय.

मराठींतील पद्यग्रंथ बाळबोधींत असत. त्या कारणानें मोडीपेक्षां बालबोध वाङ्मय वाचावयास पुष्कळ मिळे. पण मराठी बालबोध वाङ्मयहि प्रायः केवळ भक्तिपर असल्यामुळें ज्याला विद्वत्ता संपादावयाची असे त्याला संस्कृत भाषेच्या अभ्यासाशिवाय गत्यंतर नसे. इतकेंच नव्हे तर, मराठी ग्रंथरचना करण्यासहि संस्कृत भाषेचें ज्ञान अपरिहार्य होतें. मुसलमानी काळांत व शिवकालांत जेवढे मराठी ग्रंथकार झाले ते सर्व संस्कृतज्ञ किंबहुना कित्येक पंडितहि होते. न्याय, मीमांसा, व्याकरण, वेदान्त, ज्योतिष, साहित्य, वैद्यक या विषयांवरील ग्रंथ संस्कृतांत असत. अठरा पुराणेंहि संस्कृतांतच होतीं. या कारणानें ज्या कोणाला म्हणून मराठी ग्रंथकार व्हावयाचें असे तो संस्कृत भाषा शिके. संस्कृत भाषाहि बहुधा परंपरेनें शिकविली जाई. म्हणजे बाप जर व्याकरण, मीमांसा, न्याय, ज्योतिष, साहित्य यांपैकीं एका वा अनेक विषयांत निपुण असला, तर तो आपल्या मुलाला तो एक वा अनेक विषय शिकवी. अशा रीतीनें एकाच घराण्यांत कित्येक पिढ्या एकाच प्रकारच्या विद्वानांची परंपरा लागून राहिलेली असे. अशा विद्वानांकडे इतरांचीं मुलेंहि शिकावयास येऊन तयार होत.

अशी प्राचीन विद्या शिकण्याचीं प्रमुख केंद्रें महाराष्ट्रांत पैठण, नाशिक, त्र्यंबक, वाई, माहुली, कऱ्हाड, कोल्हापूर इत्यादि होतीं. त्यांशिवाय इतर मोठ्या गांवीं व क्षेत्रांत विद्वान् घराणीं असत, तींहि विद्यादानाचें कार्य करीत. तेथील ज्ञानानें ज्यांची तृप्ति होत नसे ते महत्त्वाकांक्षी तरुण काशीस जाऊन विद्या पूर्ण करीत. पैठणचें गागाभट्टांचें घराणें व कवीन्द्र परमानंद, रानडे हे या कोटींतील होत.

शिवकालांत व शिवपूर्वकालांत महाराष्ट्रांत कीर्तनकार, पुराणिक, कवि व ग्रंथकार मराठींत अनेक होऊन गेले. ते सर्व संस्कृतज्ञ होते. श्रीमद्भगवद्गीता, उपनिषदें, पुराणें हे मूळ ग्रंथ संस्कृतांत वाचून त्यांच्या आधारें ते मराठींत ग्रंथ लिहीत, कीर्तनें करीत व पुराणें सांगत. शिवपूर्वकालांतील ग्रंथकार एकनाथ, दासोपंत, कृष्णदास मुद्गल, मुकुंदराज, ज्ञानेश्वर हे चांगले संस्कृतज्ञ व वेदान्ती होते. शिवकालांतीलहि जयरामस्वामी, रंगनाथस्वामी, केशवस्वामी, आनंदमूर्ति, मुक्तेश्वर हेहि संस्कृतज्ञ व वेदान्ती

होते. खुद्द श्रीसमर्थ रामदासहि संस्कृतज्ञ व वेदान्ती असल्याचें त्यांच्या श्रीमद्दासबोध या प्रासादिक ग्रंथावरून दिसून येतें. इतकेंच काय पण शिवाजीच्या अष्टप्रधानांपैकीं निराजी रावजी, मोरेश्वर पंडितराव, रघुनाथपंत हणमंते व बहुधा मोरोपंत पिंगळे पेशवे, तसेंच प्रभाकरभट राजोपाध्ये यांनाहि संस्कृत भाषा व कांहीं शास्त्रें चांगलींच अवगत असावीं.

मुसलमान राज्यकर्ते धर्मप्रसाराकरितां शिक्षणप्रसार करीत होते, तोच मार्ग पोर्तुगीज व इंग्रज यांनीं हिंदुस्थानांत आल्यावर निराळ्या पद्धतीनें अवलंबिला. आठव्या शतकांत सीरियन चर्चचे ख्रिस्ती लोक मुसलमानांच्या धार्मिक आक्रमणास भिऊन मलबारांत राहावयास आले होते. पोर्तुगीज हे रोमन कॅथॉलिक पंथाचे. ते पंधराव्या शतकांत हिंदुस्थानांत आले तेव्हां मलबारांत उतरले. त्यांच्या कट्टर सांप्रदायिक अभिमानास ख्रिस्ती धर्मान्तर्गत सीरियन पंथ पसंत पडला नाहीं. त्यांच्या कोचीन येथील बिशपानें सीरियन ख्रिस्त्यांना रोमन कॅथोलिक पंथाची दीक्षा देण्याचें योजून तो प्रचार पुरोहित ( प्रीस्ट्स् ) वर्गाकडून करण्यासाठीं इ. स. १५४५ त क्रानगानोर येथें महाविद्यालय काढलें. धर्मप्रसारार्थ पोर्तुगीजांनीं काढलेलें हें पहिलें विद्यालय समजण्यास हरकत नाहीं. महाविद्यालयाशिवाय कोचीन येथें पोर्तुगीजांचा एक बिशप, कॅथेड्रल आणि फ्रन्सिस्कन्स, डॉमिनिकन्स, सोसायटी ऑफ जीझस यांचे मठ व दवाखाने अशा संस्था होत्या.

### पोर्तुगीज व इंग्रज

गोवें घेतल्यावर पोर्तुगीजांनीं बिशपाची गादी इ. स. १५३४त स्थापून बाटविलेल्या लोकांना धार्मिक शिक्षण देण्यास शाळा उघडल्या; वसईस १२ प्रार्थनामंदिरें, अनाथालयें व मठ बांधून इ. स. १५४८ त जेसुइट सेमिनरी स्थापली. इ. स. १५६० त ठाण्यास गोसालो बॉडरिग्ज या जेसुइट मिशनऱ्यानें लहान मुलें विकत घेतलीं व कांहीं अर्भकें जमविलीं आणि तीन वर्षांत ५–६ हजार लोक बाटविले. त्यानें विरारच्या अरण्यांत ख्रिस्त्यांचें एक गांव वसविलें, तेथें जमिनी घेऊन घरें बांधलीं, व तेथील वस्ती थोड्याच दिवसांत तीन हजारांवर गेली. गांवकऱ्यांना रोज धर्मशिक्षण देण्यांत येई व तें घेतल्यावर सायंकाळीं ख्रिस्ती धर्मतत्त्वें ते गात. त्याशिवाय चौल, आगाशी, आंबोली, वानरें, भाईंदर, भिवंडी, बोरिवली

इत्यादि जीं अनेक गांवें पोर्तुगीजांनीं घेतलीं त्यांत प्रार्थनामंदिरें, अनाथालयें, मठ व शाळा बांधून हिंदु लोकांत ख्रिस्ती धर्म फैलावण्याचा जारीनें प्रयत्न केला. इ. स. १६१४ त फादर स्टीफन यानें ख्रिस्ती पुराण मराठींत ओवीबद्ध लिहून तें बाटग्या लोकांना वाचावयास दिलें.

शिक्षणप्रसार हें धर्मप्रसाराचें साधन म्हणून पोर्तुगीज व मुसलमान यांनीं वापरलें तसेंच इंग्रजांनींहि मुंबईस इ. स. १६६८ त तें वापरण्यास सुरुवात केली. त्यांनी त्या हेतूनें मुंबईस एतद्देशीय मुलांना शिकविण्याकरितां शाळा घातली. इंग्रज लोक विद्येचे चहाते व भोक्ते. त्यांना संस्कृत विद्येचें महत्त्व लवकरच कळून येतांच भीमजी पारख या सुरतेच्या गुमास्त्यास संस्कृत ग्रंथ छापण्याकरितां त्यांनी इंग्लंडांतून एक छापखाना इ. स. १६७४ त आणून दिला. त्यांतून मुलांना शिकविण्याचीं शालोपयोगी पुस्तकेंहि छापून निघत असतीलच. या बाबतींत इंग्रजांनीं पोर्तुगीजांच्याहि पुढें पाऊल टाकलें.

शिवकालापूर्वी मराठी भाषा लौकिक व्यवहारांत व राजसभेंत मृतप्राय झाली होती; तिला संजीवनी पाजणें शिवाजीस व भोंवतालच्या विद्वान् लोकांस आद्य कर्तव्य वाटलें. त्याचीं साधनें दोन. एक मराठी कोश बनविणें व दुसरें संस्कृत भाषेच्या प्रसारास उत्तेजन देणें. राजव्यवहारकोश त्याकरितां बनविण्यांत आला. अर्थात् तो राजव्यवहारापुरता म्हणजे मर्यादित स्वरूपाचा होता. सांप्रत शब्दकोश जसे व्यापक, मोठे व सर्वांगीण स्वरूपाचे असतात, त्या धर्तीचा हा प्रयत्न नव्हता. त्या धामधुमीच्या व अस्वस्थतेच्या काळांत तें शक्य नसलें तरी वरील छोट्या प्रयत्नाच्या मुळाशीं तीच जाज्वल्य भावना होती यांत शंका नाहीं.

## शिवाजीचे प्रयत्न

दुसरा प्रयत्न विद्यादानाचा. हल्लींप्रमाणें तेव्हां गांवोगांवीं प्राथमिक शाळा स्थापन करणें राज्यकर्त्यांच्या आटोक्याबाहेरचें होतें. म्हणून शिवाजी व त्याचें विद्वन्मंडळ यांनीं विद्वानांना दक्षिणा देऊन त्यांजमार्फत संस्कृत विद्येचा प्रसार करण्याची नामी युक्ति काढली. दक्षिणा देणें म्हणजे ज्ञानवृक्षाच्या मुळाला पाणी घालणें होय. राष्ट्रांत अनेक संस्कृतज्ञ लोक निर्माण झाले म्हणजे ते आपल्या शिष्यवर्गांत, भाषणांत व पत्रव्यवहारांत संस्कृत

शब्दांना प्राधान्य देऊन परकीय शब्दांची हकालपट्टी करतात. पेशवाईंत हेंच झालें म्हणून मराठी भाषेवरील यावनी पुटें गळून पडत चाललीं. त्यास सुरुवात शिवकालांत झाली.

त्यास उत्तेजन देण्याकरितां शिवाजीनें पुढील योजना कार्यवाहींत आणली. त्यानें " ज्या ब्राह्मणाकडून एक ग्रंथ अधीत झाला त्यास दोन मण, पंचग्रंथी, दशग्रंथी यांस पांच मण, दहा मण, परीक्षा करून द्यावें. तसेंच पंडित. जसा जो विद्वान् त्यास योग्यता पाहून स्वदेशींचे, त्यांस भात व द्रव्य, विदेशीयांसी ( परप्रांतीय ब्राह्मण ) द्रव्य याचीं वर्षासनें, श्रावणमासीं सर्वांस पंडितराव याणीं परीक्षा करून देत जावीं. अधिक विद्या होईल त्यांस अधिक मोईन् ( दक्षिणा ) वाढवावी. मोठे मोठे पंडित, वैदिक, प्रतिष्ठित येतील त्यांची सभा करून सत्कार करून त्यांस शंभर-पन्नास अधिक ( हि रुपये ) योग्यतेनुरूप द्यावे, ऐसें करून दिल्हें. याजमुळें दिवसेंदिवस अधिक विद्या वृद्धीस पावती जाली. अग्निहोत्र घेणार, त्यांस तितकें द्रव्य देऊन घेववावें. त्यांची मोईन अधिक करावी. तसेंच यज्ञ करणार, त्यांस द्रव्य लागेल तसें मोईन बांधून देऊन यज्ञ करवावे. याप्रमाणें देवब्राह्मणांची स्थापना करून नित्यदानें व नैमित्तिक प्राप्त झालें असतां करावें. तसेंच जागाजागा अन्नछत्रें व नित्य ब्राह्मणभोजन, इच्छाभोजन ब्राह्मणांस याचा निबंध बांधून दिला " ( चिटणीस-विरचित शिवछत्रपतींचें चरित्र, पृ. १८४ ). पेशवाईंत हजारों ब्राह्मणांना लाखों रुपयांचा देकार श्रावणमासीं होऊं लागला, त्याचें मूळ शिवाजीच्या वरील धर्मदायांत सांपडतें. शिवाजीनें जें कार्य आरंभिलें तें पेशव्यांनीं मोठ्या प्रमाणावर पुढें चालू ठेवलें इतकेंच.

## प्रकरण चोविसावें

# गोब्राह्मणप्रतिपालन

पुण्याजवळ भीमा व इंद्रायणी यांच्या संगमावर नागरगांव नांवाचें गांव होतें. तेंच सध्यांचें तुळापूर. विजापूरच्या बादशहाचा एक वजीर मुरार जगदेव हा तेथील कुलकर्णी होता. त्यानें भाद्रपद वद्य अमावास्या शके १५५५ या दिवशीं ( २३ सप्टेंबर १६३३ ) सूर्यग्रहणानिमित्त मोठा दानधर्म केला. त्यांत त्यानें गजदान व अश्वदान केलें. शंभर गाई ब्राह्मणांना दान दिल्या व त्यांशिवाय महत्त्वाची गोष्ट ही-कीं, त्यानें सोनें, रुपें इत्यादि चोवीस धातूंचीं महादानें देऊन ३०० वराह इतकी भूमि अग्रहार दिली. त्यांपैकीं २१६ वराह भूमीचे १८ भाग पाडून दोन भाग दीपदान, अभिषेक व नैवेद्य यांकरितां लावून दिले. हीं दानें पुढील ब्राह्मणांस देण्यांत आलीं :--

( १ ) सोनभट देवगिरीकर, ( २ ) नरसिंहभट अग्निहोत्री, ( ३ ) त्रिंबकभट नांदुरकर, ( ४ ) त्रिंबकभट सुदामे, ( ५ ) त्रिंबकभट खेडकर, ( ६ ) भानभट तळेगांवकर, ( ७ ) महादेवभट पुरंदरे, ( ८ ) त्रिंबकभट पुराणिक, ( ९ ) पुरुषोत्तमभट वैष्णव, ( १० ) भानभट वैष्णव, ( ११ ) गोपतिभट ढेरे, ( १२ ) आपदेवभट चित्राव, ( १३ ) बाळभट नाशिककर, ( १४ ) रंगनाथभट ग्रामज्योतिषी, ( १५ ): पुंडलिक हरिदास पंढरपूरकर, ( १६ ) सोमनाथभट ग्रामज्योतिषी. त्यांखेरीज कालिदास, कविश्रेष्ठ वररुचि,

त्रिमलभट पुरोहित, रायराय व हलगोडे यांना घरें बांधण्याकरितांहि दान केलें ( प. सा. सं. खं. १, पृ. ८१ ).

या यादींत एकूण वीस ब्राह्मण आहेत. ते एकाच गांवचे नसून देवगिरी, नांदुरा, खेड, तळेगांव, नाशिक, पंढरपूर इत्यादि दूरदूरचे व क्षेत्रांतील निवडक ब्राह्मण दिसतात. त्यांतील कोणी अग्निहोत्री, कोणी पुराणिक, कोणी हरिदास, कोणी ग्रामज्योतिषी व कोणी कवि आहेत. अशा गुणी व विद्वान् ब्राह्मणांनीं नागर गांवांत कायमची वस्ती करून राहावें, अग्निहोत्र चालवावें, देवालयांत पुराण सांगावें, गोकुळाष्टमी, रामनवमी इत्यादि जयंत्यांना व चातुर्मास्यांत कीर्तनें करावीं व काव्यरचनाहि करावी असा हेतु मुराररावाचा त्यांची नागरगांवीं स्थापना करण्यांत असावा. या ब्राह्मणांत दोन वैष्णव आहेत हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. म्हणजे कर्नाटकांतील वैष्णवपंथाचा तुरळक प्रसार शिवकालीं महाराष्ट्रांत झाला होता. नागरगांव हें मूळचें प्रसिद्ध क्षेत्र होतें म्हणूनच मुराररावानें तेथें मुद्दाम येऊन तुळा केली व त्या क्षेत्रास यावनी सत्तेखालीं आलेलें मालिन्य घालवून त्यास उजळा देण्याकरितां विद्वान् ब्राह्मणांची तेथें स्थापना केली. एव्हांपासून नागरगांवाचें नांव बदलून त्यास तुळापूर हें नांव प्राप्त झालें. याच गांवीं यानंतर ५६ वर्षांनीं औरंगजेबानें तळ देऊन संभाजीस हालहाल करून वधिलें.

वरील दानपत्रांत मुराररावांस धर्मावतार, राजाधिराज, महाराज, राजश्री, पंडित, जगदेकप्रभु व सार्वभौम प्रतिनिधि अशीं विशेषणें लावलीं आहेत व तीं अतिशयोक्तीचीं व अवास्तव वाटतात.

शिवछत्रपति हे गोब्राह्मणप्रतिपालक होते. सत्पात्र ब्राह्मण हा हिंदुधर्माचा रक्षक व आधारस्तंभ असून गोमाता ही बहुविध कारणांनी पवित्र मानण्यांत येते. त्या उभयतांच्या योगक्षेमाची शिवछत्रपति कशी काळजी वाहत हें खालील उदाहरणांतहि प्रत्ययास येतें. वाई क्षेत्राचें महत्त्व सरदार रास्ते यांच्या कारकीर्दीत वाढून त्यास अलीकडील भव्य व उदात्त स्वरूप प्राप्त झालें असलें तरी शिवकालांतहि तें प्रसिद्ध क्षेत्र होतेंच. शिवाय तें परगण्याचें ठाणेंहि असल्यामुळें तेथील वस्ती मोठी असली पाहिजे. चित्राव हें वाईचें जुनें विद्वानांचें घराणें. त्यास मुसलमान राज्यकर्त्यांकडूनहि इनामें मिळालीं होतीं. त्या घराण्याच्या आश्रयानें इतर ब्राह्मणहि तेथें आले होते.

त्यांपैकीं एक नरसिंहभट चित्राव यांचा नातलग होता. त्यानेंहि गोधन बाळगलें होतें व त्याला स्वतःला निर्वाहाचें साधन पाहिजेच होतें. म्हणून मोरेश्वर पंडितराय यांनी २८ मार्च १६७९ रोजीं ( शके १६०१ चैत्र वद्य ९ ) परगणे वाईचे येसाजी मल्हार देशाधिकारी व लेखक यांस आज्ञापत्र लिहिलें :– " नरसीभटाचे ( चित्राव ) नातलग यांस जमिनीऐवजीं ३ खंडी गल्ला व एकास चार व्यालेल्या गाईपर्यंतचा करभार माफ असे."

पूर्वी बहुधा प्रत्येक ब्राह्मणाच्या घरीं गाय असे. गोप्रदान हें दान पुण्यप्रद समजलें जात होतें. अंबरीष आख्यानांत ' गोदानें शुभसाठिं लक्ष नृप दे विप्रोत्तमाकारणें ' अशी एक पंक्ति मोरोपंतांनीं घातली आहे. वसिष्ठाच्या आश्रमांत कामधेनु होती व इतरहि ऋषि धेनु बाळगीत. ब्राह्मणगृहस्थ दोन प्रहरीं जेवावयास बसण्यापूर्वी देवास नैवेद्य दाखवितांना गोग्रास काढून ठेवीत असे व तो गाईच्या मुखांत आवर्जून घालण्यांत येत असे; अर्थात् अशा अनेक कारणांनीं ब्राह्मणांच्या घरीं गाई असत. खालीं लिहिलेल्या नरसीभटाच्या नातलगापाशीं चारापर्यंत गायी होत्या, त्या अर्थी तो विशेष गोभक्त व कदाचित् शेतकरी असावा. त्याच्या गाईंना कर माफ होता. याचा अर्थ याला गुरचरणाचा म्हणजे गायरानाचा कर माफ होता.

## वेदविद्येस उत्तेजन

वर उल्लेखिलेले नरसीभट बिन रंगभट व दुसरे एकनाथभट बिन रामभट हे वाईस राहात असत. वाईपासून सात-आठ कोसांवर सातारा तालुक्यांत बोरखळ व कोरेगांव तालुक्यांत किन्हई हीं गांवें आहेत. तेथील मोकदमाच्या ( पाटील ) अमलाखालीं महागांव व शिवथर हीं दोन गांवें होतीं. त्या गांवांतून उपरिनिर्दिष्ट भटजींना सालिना धर्मादाय १० होन मिळत व खेरीज दीड चावर जमीन होती. ती त्याजकडे चालविण्याविषयीं परगणे वाईचे दिवाणानें वरील पाटलास ता. १९ नोव्हेंबर १६७४ ( शके १५९६ मार्गशीर्ष शुद्ध २ ) आज्ञापत्र पाठविलें तें असें :– " नरसीभट बिन रंगभट व एकनाथभट बिन रामेश्वरभट चित्राऊ, वाई, यांस धर्मादाय इनाम सालिना होन १० मौजे महागाऊ, शिवथर वगैरे गांवीं आहे व चावर १॥ दुदेह आहे तरी पूर्वीप्रमाणें चालविणें."

वाईस चित्रावभटजींचीं घरें शिवकालीं बरींच असावीं. त्यांतील एक

आपदेवभट विष्णुभट चित्राऊ जुनारदार यांस कोरेगांव तालुक्यांतील मौजे खेड व तडवळें बुद्रुक या दोन खेड्यांत जमीन हक्कासह होती. तीहि चालविण्यास वाईच्या दिवाणानें खेड व तडवळें या दोन गांवांच्या पाटलास आज्ञापिलें ( शके १५९६ माघशुद्ध २ व इ. स. १६७४ नोव्हेंबर १९ ). हीच गोष्ट नारायणभट बिन गोपिनाथभट चित्राऊ यांस लागू करण्यांत आली. त्यांस वाईजवळ मौजे पसरणी व वोझर्डें व एकसर येथें अनुक्रमें ·॥·, ·॥·, ·।~ जमीन इनाम होती; तीहि चालविण्याचा हुकूम वाईच्या दिवाणानें तेथील मोकदमांना केला ( २७ नोव्हेंबर १६७४ व मार्गशीर्ष शुद्ध १० शके १५९६ ).

हीं इनामें शिवाजीस राज्याभिषेक झाला त्याच वर्षी मुसलमानी अमदानींतल्याप्रमाणें पुढें चालविण्याची आज्ञा झाली. या वरील दाखल्याचा विचार करतां वाई हें क्षेत्र पेशवाईतच प्रसिद्धीस आलें नसून मुसलमानी कालांतहि त्याची प्रसिद्धि असल्याचें कळून येतें.

मुसलमानी राज्यकर्ते हिंदुधर्माचे शत्रु असतांहि हिंदुधर्माचे आधारस्तंभ जे ब्राह्मण व त्यांचें ब्राह्मण्य त्या काळांत जिवंत राहिलें याचें कारण त्यांनीं त्यांचा वृत्तिच्छेद केला नव्हता हेंच होय. वरील दाखले तेच दर्शवितात. खालील दाखलाहि त्याचाच निदर्शक आहे. कोंकणांत कुडाळ संस्थानाजवळ फोंडा प्रांतांत मौजे कुकडियें तपे अंत्रूज येथें सातबा व रामजोशी यांस वृत्ति होती. ती शिवाजीनें प्रारंभीं अमानत केली व मागाहून सुरू केली.

" मौजे कुकडियें तपे अंत्रूज येथें सातबा व रामजोशी यांस वृत्ति होती. ते अमानत जाली. त्याबद्दल त्यास तांदूळ ५ मण व ४ व्यालेल्या गायींचा करभार माफ केला असे " ( शके १६०१ अ. ज्येष्ठ शुद्ध ५, इ. स. १६७९ मे ४; प. सा. सं. खंड २, पृ. ६३२ ).

वरील आज्ञापत्र मोरेश्वर पंडितराव यांनी काढलें. त्यानंतर दुसरें आज्ञापत्र फोंडा प्रांताचा देशाधिकारी व लेखक धर्माजी नागनाथ यास त्याच दिवशीं त्यांनीं येणेंप्रमाणें काढलें.

" अनंतभट बिन फटजोशी याची सरजोतिषी राजगृहीं जमा जाली. त्याबद्दल त्यास तांदूळ १ खंडी ५ मण व व्यालेल्या गायी १–८ चा करभार माफ या गोष्टी दिल्या आहेत. "

पंडितरावांच्या आज्ञापत्रांतील विशेष हा कीं, त्यांनीं त्यांत मुसलमानी शब्दांस शक्य तितका फाटा देऊन शुद्ध संस्कृत शब्द वापरले आहेत. सुभेदार व कारकून असें न म्हणतां देशाधिकारी व लेखक अशी शब्दयोजना केली आहे. दिवाणाऐवजीं राजगृह म्हटलें आहे. नरसिंहभट बिन रामचंद्रभट मंगळवेढे ऋग्वेदी, गोत्र काश्यप, सूत्र आश्वलायन हे कसबें खेड, मामले दाभोळ येथें राहत असत. त्यांजकडे वंशपरंपरेनें विजापूरच्या बादशहाकडून पांच ठिकाणें व ४५ लारी इनाम चालत होतें. तें शिवछत्रपतींचा अंमल चालू झाल्यावर त्यांनीं अमानत केलें. तेव्हां छत्रपतींच्या राज्यारोहणाची पर्वणी साधून ते किल्ले रायरीस गेले. "त्या वेळीं हे थोर भले ब्राह्मण देखोन त्यांसी कित्येक दान-द्रव्य महाराज देत होते; परंतु त्यांनीं मान्य न केलें, तेव्हां राजश्रींनीं काय हेतु आहे म्हणून पुशिलें. तें समयीं त्यांनीं वृत्तिपत्रें करून मागितलीं. ते गोष्टी सिंहासनीं असतां मान्य करून हस्तोदक ते क्षणीं दिलें." त्याप्रमाणें हें उत्पन्न त्यांजकडे चालत होतें. पुढें तांब्रांच्या उपद्रवानें देशाचा नाश झाल्यावर नरसिंहभटांचे चिरंजीव दादंभट उपाध्ये व ज्योतिषी यांनीं साताऱ्यास जाऊन महाराजांपाशीं (शाहूमहाराज) तें चालविण्याविषयीं विनंती केली (सनदापत्रांतील माहिती, पृ. १५६). शिवाजीस इ. स. १६७४ त राज्याभिषेक झाल्यावर, त्यानें अष्टप्रधान-मंडळ स्थापन केल्यावर व त्याच्या राज्यास स्थैर्य प्राप्त झाल्यावर त्याला आपल्या राज्यांत बऱ्याच सुधारणा सुसूत्रपणें करतां आल्या. हिंदुधर्म-स्थापना हें त्याचें अवतारकृत्य असल्यामुळें तो धर्म ज्या विद्वान् व आचारसंपन्न ब्राह्मणांवर आधारलेला त्या ब्राह्मणांच्या योगक्षेमाकडे त्यानें आपलें लक्ष मुद्दाम वळविलें. धर्मखात्यावर मोरेश्वर पंडितराव यांची नेमणूक झाली होतीच. त्यांनीं तें काम दक्षतेनें चालविलें. त्या बाबतींत त्यांनीं चेऊलचे देशाधिकारी बहिरो त्रिमल यांस शके १५९९ ज्येष्ठ शुद्ध ५, इ. स. १६७७ मे २६ रोजीं लिहिलेलें पत्र महत्त्वाचें आहे. ते आज्ञापितात :–

"शके पिंगल संवत्सरे वेदमूर्ति राजश्री येसाजीभट विष्णुभट मनोहर वास्तव्य चेऊल वेदशास्त्रसंपन्न यासी धर्मार्थ प्रतिवर्षी देविले, तांदूळ कोठीमापे आठशेरी पायलीने खंडी एक व गाई सर चार सोडविले आहेती.

तरी प्रतिवर्षी वेदमूर्तींचा समाचार घेऊन एकीपासून चार ( गाई ) सोडविले आहेती. तरी प्रतिवर्षी वेदमूर्ति सुखरूप आहेत तोंवरी चालविणें. प्रतिवर्षी नूतन पत्राचा आक्षेप न करणें. गाई स्वतःच्या असतील असा समाचार घेऊन एकीपासून चार पावेतों करभार न घेणें हे विज्ञाप्ति." ( शि. च. सा. खंड ९, पृ. ६१ ). हा मनोहर ब्राह्मण आडनांवावरून चित्तपावन दिसतो.

## चाफळचे अग्निहोत्री

अग्निहोत्र हा यज्ञसंस्थेचा एक अवशेष आहे. त्या योगानें प्राचीन यज्ञयागपद्धतींचें पुण्यस्मरण होऊन कधींकाळीं कोणास यज्ञ करण्याची बुद्धि झाल्यास त्यास जरूर ते तज्ज्ञहि मिळूं शकतात. शिवाय ज्या गांवीं अग्निहोत्री असेल त्या गांवास पावित्र्य येतें हा फायदा आहेच. याच दृष्टीनें अग्निहोत्रपरंपरा प्राचीन काळापासून चालत आली असून, तिला शिवछत्रपतींनींहि हातभार लावला होता. शिवाजीचे धर्मखात्यावरील प्रधान मोरेश्वर पंडितराव यांनी भानजीपंत देशाधिकारी व लेखक प्रांत कऱ्हाड यांस ता. १८ मार्च १६७९ रोजीं पुढील आज्ञापत्र लिहिलें :–

" चाफळ येथील रघुनाथ गणेश अग्निहोत्री यांस परम योग्य व अग्निहोत्री म्हणून एक खंडी जोंधळे द्यावे. त्यांस चार गाईपर्यंतचा कर माफ केला आहे ! " ( प. सा. सं. खं. २, पृ. ६३० ).

चाफळ गांव डोंगरांच्या वळशांत व कृष्णाकांठापासून तीन कोसांवर मांड या लहानशा नदीच्या तीरावर रम्यस्थळीं वसलें आहे. परवांपर्यंत तेथें ब्राह्मणवस्तीहि चांगली होती. समर्थांपूर्वींहि तेथें कांहीं विद्वान् व सत्पात्र ब्राह्मण राहत असल्यामुळेंच त्यांनीं राममंदिरासाठीं तें स्थान पसंत केलें असावें. अशा सत्पात्र ब्राह्मणांपैकींच रघुनाथभट अग्निहोत्री हे असावे.

## चौलचे गोब्राह्मण

शके १५९८ भाद्रपद शुद्ध ४

इ. स. १६७६ सप्टेंबर १

( श्रीचिंतामणी-चरणशरण )

श्रीसकलगुणमंडित सौजन्यसिंधु शिरोमणि अखंडित लक्ष्मीआलंकृत राजमान्य राजेश्री बाहिरो त्रिमल सुबेदार व कारकून मामले चेऊल प्रति –

पोष्य मोरेश्वर पंडितराव नमस्कार – धर्मादाय ब्राह्मण कसबा चेऊल यासी वणी गाई पोट कोडिया सोळा. खंडजोशी बिन माहादजोशी वणी ( गाई ) ४, बहिरंभट बिन गणेशभट उपाध्ये ( गाई ) ४, विठ्ठलभट बिन गणेशभट उपाध्ये ( गाई ) ४, गोपाळभट बिन आऊभट ( गाई ) ४. एकूण गाई पोट कोडिया सोळा सोडिलिया आहेती. तरी तुम्ही हर एकापासून चारी पावेतों वणी ( वनचराइचा कर ) घेत न जाणें. दरसाल ताज्या खुर्दखताचा उजूर न करणें ( शिवचरित्र साहित्य खंड ९, पृष्ठ ५७ ).

## ब्राह्मण-भोजन

मुसलमानी अंमल हिंदुधर्मास प्रतिकूल होता. अशा स्थितींत वेदाभ्यासास व शास्त्राभ्यासास मुसलमान राज्यकर्त्यांकडून प्रोत्साहन मिळणें शक्यच नव्हतें. तरी ब्राह्मणांनी केवळ आपला ब्राह्मणधर्म म्हणून अत्यंत दारिद्र्यांतहि वेदशास्त्रांचें अध्ययन चालू ठेवलें होतें. कोंकणांतील ब्राह्मणांची विद्वत्तेविषयीं प्रसिद्धि शिवकालींहि होती. रत्नागिरी जिल्हा हें ब्राह्मणांचें आगर. गांवोगांवीं ब्राह्मणवस्ती मोठी. शिवछत्रपतींचे एक मंत्री अण्णाजी दत्तो राजापुरास गेले असतां त्यांनीं ता. २८ नोव्हेंबर १६७९ रोजीं राजापुरापासून एक मैलावर असलेल्या धोपेश्वरक्षेत्रीं ब्राह्मणांना अन्नसंतर्पण केलें. त्या वेळीं त्यासभोंवरच्या गांवांचा मिळून वीस सहस्र ब्राह्मणसमुदाय लोटला होता. अर्थात् इतक्या ब्राह्मणांना एकाच दिवशीं अन्नसंतर्पण करणें शक्य नाहीं. नुसतें सहस्रभोजन म्हटलें तरी त्याची केवढी तयारी करावी लागते. मग वीस सहस्रांची गोष्ट बोलावयासच नको. हा रगाडा एक महिनाभर तरी चालला असेल ( प. सा. स. खंड २, पृष्ठ ६६२ ).

## प्रकरण पंचविसावें

# हिंदुधर्म व मराठे

### वेरूळचें देवालय

वेरूळ हें भोसल्यांचें मूळ गांव. तेथील घृष्णेश्वर ( श्रीदेव आनंदसिद्ध ) हें त्यांचें कुलदैवत. त्याचें देवालय मालोजी व विठोजी या बंधूंनीं बांधून त्याची व्यवस्था लावून दिली. ती मोगलांच्या धामधुमींत मोडली. त्यानंतर शाहूमहाराज साताऱ्याच्या गादीवर आले, तेव्हां त्यांनीं ती व्यवस्था पुनः सुरू करून देवालयास १३ डिसेंबर १७१९ रोजीं इनाम जमिनी दिल्या. वेरूळ शाहूमहाराजांच्या अमलाखालीं नव्हतें तरी त्यांच्या इच्छेस मान देऊन औरंगाबादेच्या मोगल सुभेदारानें त्यांच्या योजनेस मान्यता दिली असावी असें खालील सनदेवरून दिसून येतें.

"श्रीदेव आनंदसिद्ध ज्योतिर्लिंग कसबें येरूळ प्रांत मजकूर येथें आहेत. त्यास पूर्वी कै. राजश्री मालोजीराजे व विठोजीराजे भोसले यांनीं श्रीचें देवालय बांधलें ते समयीं देवालयाभोंवतीं जमीन बिघे २५ बागायत व २० जिरायत एकूण पाऊणशें बिघे पादशहापासून मागून घेऊन श्रीचे पुष्पवाटिकेस व अतीत-अभ्यागतास राहावयास व श्रीची पूजा नंदादीपास इनाम करून दिल्ली. त्याप्रमाणें चालत आलें. सांप्रत काळीं धामधुमीचे प्रसंगाकरितां चालत नव्हतें. ऐसीयासी हल्लीं श्रीची पूजाअर्चा चालवणें

स्वामीस आगत्य जाणून स्वामींनीं नबाब अमीरउल् उमराव यांसीं लिहून व राजश्री शंकराजी मल्हार यांसीं सांगून त्यांचे तर्फेनें इनाम बहाल करून घेतला व तो श्रीपाद ब्रह्मेंद्र संन्यासी यांच्या स्वाधीन केला आहे. तेथें ते मठ बांधून बागेचें संरक्षण करतील. बागेमध्यें पुष्पें फळें उत्पन्न होतील तीं श्रीचे पूजेस पावतील. बागाईतजिराइतामुळें जें उत्पन्न येईल त्याचें अन्नछत्र घालतील व श्रीचे पूजेस व नंदादीपासहि ऐवज देतील. सदरहू पाऊणशें बिघे जमीन श्रीपादाचे दुमाले करून श्रीकडे अविच्छिन्न इनाम चालवणें म्हणून पत्रें १२ सफर, सन अशरीन मया. येविषयीं पत्रें देशमुख, देशपांडे परगणे येरूळ, मोकदम कसबें येरूळ, कमावीसदार वर्तमान व भावी परगणे येरूळ, व गुमास्ते सरदेशमुख " ( सनदापत्रांतील माहितीं, पृ. १०६ ).

## वेरूळचा घृष्णेश्वर

शिवाजीमहाराजांचे पूर्वज कोठेंहि असले तरी ते वेरूळच्या घृष्णेश्वरास विसरत नसत. खुद्द शहाजीराजे यांची त्याजवर निस्सीम भक्ति होती. त्यांनीं देवाच्या अभिषेकाविषयीं पुढील पत्र लिहिलें :—

### वर्षासन

शके १५६६ कार्तिक वद्य १०
इ. स. १६४४ नोव्हेंबर १३

शहाजीराजे – माहादभट तिमणभट मुकाम येळूर यांस " तुमचे बाप तिमणभट बिन दामोदर यास श्री घृष्णेश्वर देवाचा अभिषेक मातुश्री उमाई आपासाहेबीं दिधला होता. तेणेंप्रमाणें तुम्ही अभिषेक करीत जाणें. सालिना होनु १७. आमचे वंशींचे अभिषेक तुम्हीच करीत जाणें " ( प. सा. सं. खं. १, पृ. १७७ ).

महादभट हे सगळयाच भोसल्यांचे वेरूळचे तीर्थोपाध्ये होते असें दिसतें. कारण याच महादभटाकडे अभिषेकाचें काम शहाजीचे चुलतभाऊ त्रिंबकजीराजे व संभाजीराजे यानींहि सोपविलें होतें.

### वर्षासन

शके १५६५ श्रावण वद्य ४

संभाजीराजे ( भोसले ) – माहादभट तिमणभट येळूरकर यांस " या

वर्षापासून तुम्हांस श्रीचा अभिषेक सांगितला आहे. सालिना मोईन १७ होन पातशाही."

त्रिंबकजीराजे – महादेवभट सेडगे राहणार येलूर, "तुम्हांस शके १५६५ पासून येरूळ येथील अभिषेक सांगितला आहे" (प. सा. सं. खं. १, पृ. १०५).

घृष्णेश्वराची भक्ति भोसले घराण्यांतील अनेक पुरुष व स्त्रिया करीत असत; इतकेंच नव्हे तर इतरहि मराठे सरदार त्याचे भक्त होते.

### धर्मपत्र

शके १५८७ कार्तिक वद्य १२

सुवाईआवा, खेळोजी, सुभानजी रेखोजी व महादजी राजे भोसले – महादभट बिन तिमणभट राहणार येलूर यांस – "श्रीघृष्णेश्वराची पूजा व अभिषेक याबद्दल ४० रुपये" (प. सा. सं. खंड १, पृ. ३०१).

शके १५८४ भाद्रपद शुद्ध ३

झुंझारराऊ राजे घाटगे – महादभट राहणार वेलूर यांस :– "घुस्मेश्वर यासी अभिषेकाबद्दल सालिना १२ होन व शिवालयतीर्थीचें तीर्थोपाध्येपण दिल्हें असे" (प. सा. सं. खं. १, पृष्ठ २१५).

शहाजीला संभाजी नांवाचा चुलतभाऊ होता. त्याची जहागीर दौंडापाशीं होती. ग्रहण हा हिंदूंत मोठा पर्वकाळ मानण्यांत येतो. ग्रहण लागतांना व सुटतांना हिंदु लोक आपल्या शक्त्यनुसार लहानमोठीं दानें देत असतात व तीं मागण्याकरितां मांग लोक रस्तोरस्तीं हिंडत असतात. त्यांचा 'दे दान सुटे गिराण, तांबेंदान वस्त्रदान' याचा ओरडा चंद्र-ग्रहणाच्या वेळीं रात्रभर सारा गांव दणाणून सोडतो. पूर्वी राजे लोक पर्वकाळीं नदीवर वा दोन नद्यांच्या संगमावर जाऊन स्नान करीत व नदीच्या प्रवाहांत उभें राहून विद्वान् व सत्पात्र ब्राह्मणास गांवहि दान देत. हेतु हा कीं, त्या ब्राह्मणाला निर्वाहाची काळजी न राहून वेदाध्ययन, शास्त्राध्ययन व अध्यापन करतां यावें आणि स्नानसंध्या करून त्यानें दात्याचें कल्याण चिंतावें. संभाजी एखादें गांव दान देण्याइतका मोठा जहागीरदार नव्हता. म्हणून त्यानें सूर्यग्रहणानिमित्त ता. २३ नोव्हेंबर १६२२ रोजीं मुद्गल

व कृष्णभट बिन बाबदेवभट राहणार चाकण यांस एक चावर जमीन इनाम दिली.

### सूर्यग्रहण : खुर्दखत

शके १५४४ मार्गशीर्ष शुद्ध १

अजर, रा. संभाजीराजे यांजकडून कारकून देशमुख देशपांडे परगणे पांडिया पेडगांव तर्फ करडें यांस – "मुद्गल व कृष्णभट बिन बाबदेवभट सो चाकण यांस धर्मादाय इनामबदल सूर्यग्रहण जमीन काळाकीर्दी चावर एक मौजे बेलवडी दे॥ नख्तयाती व कुलबाब दिधले असे. जमीन मोजून हद्द माहदूद घालून प्रज नेमून हुजूर खबर लिहिणें. चालवीत जाईजे" (प. सा. सं. खंड १, पृष्ठें ३९–४०).

### पर्वतीचे पुरंदरे

सासवडचे सरदार पुरंदरे यांचें घराणें पेशवाईत फारच योग्यतेस चढलें. तें मूळचें पुरंदर गडाशीं संबद्ध असलें तरी त्याचें वास्तव्य सासवडास निदान तीनशें वर्षांहून अधिक काल असावें. त्यांची वस्ती वतनपरत्वें सासवडाभोंवतालच्या खेड्यांपाड्यांतूनहि पसरली होती. ते सर्व अर्थातच सरदार नसून सामान्य स्थितींतील वतनदार होते. त्यांपैकीं एक घराणें तीनशें वर्षांपूर्वींच पर्वती या गांवीं स्थायिक झालें असून त्यांतील एका ब्राह्मणास मुरारपंताच्या दानौघांत तुळापुरास इनाम मिळालेलें दिसतें. तो जो महादेवभट त्यास मुधोजी नाईक निंबाळकर यांनीं त्यापूर्वीं अकरा वर्षें म्हणजे शके १५४४ कार्तिक शुद्ध १२ स पुण्याजवळील पिंपळें-सौदागर येथें एक चावर भूमि इनाम दिली.

### खुर्दखत

इ. स. १६२२ नोव्हेंबर ४

अजर मुधोजी नाईक – कारकून परगणे पुणें व मोकाशाचे हुद्देदार व मोकदम मौजे पिंपळें-सौदागर यांस –

"महादेवभट बिन मुद्गलभट पुरंदरे सेकीन ( राहणार ) पुणें मालुम केलें कीं, आपणास चावर १ इनाम दिधलिया तुम्हांस आशीर्वाद. तरी त्यास एक चावर जमीन कसबे मजकुरीं दिली आहे. त्याचे ताब्यांत देणें" (प. सा. सं. खं. १, पृ. ३९ ).

गांव म्हटला कीं त्याला ग्रामजोशी हा पाहिजेच. अठरापगड जातींचे सर्व धार्मिक संस्कार त्याजवर अवलंबून असत. लग्नकार्य, श्राद्ध-पक्ष, जनन-मरण, सणवार, सत्यनारायण, वटसावित्रीसारखीं व्रतें हें सर्व ग्रामजोशी असेल तरच पार पाडावयाचे. सारांश, खेड्यांतील धर्मसंरक्षण केवळ त्याच्या हातांत. ग्रामजोशी फार विद्वान् असत असें नाहीं. त्यांना 'याज्ञिकी' येत असली म्हणजे बस. यासाठीं प्राचीन कालापासून ग्रामव्यवस्थेंत ग्रामजोशास मोठें स्थान प्राप्त झालें होतें. त्याला सर्व संस्कारांची दक्षिणा मिळत असून त्याशिवाय वतनी इनामहि असे. हें इनाम राज्यकर्ते देत व त्यांजकडून मिळालें नसल्यास गांवकरीहि आपल्या अधिकारांत देत. इतका अधिकार गांवकऱ्यांना मुसलमानी राजवटींतहि होता हा विशेष होय. म्हणूनच गांव करील तें राव करणार नाहीं अशी म्हण मराठींत रूढ झाली आहे. कोंकणांत रत्नागिरीजवळ पावस या नांवाचा मोठा गांव आहे. तेथें विश्वनाथ जोग व कृष्णफर्जंद सोमजोशी हे जोसकी करून राहत असत. पण त्याकरितां त्यांस वतन असें कांहीं नव्हतें. गांवकरी दक्षिणेच्या रूपानें जें कांहीं देतील तेवढेंच. हा उपरीपणा त्यांस व ग्रामस्थांसहि इष्ट न वाटून समस्त ग्रामस्थांनीं आपल्या अधिकारांत त्यांच्या योगक्षेमाची तजवीज केली.

उपाजनपट

शके १५५६ माघ वद्य ३

समस्त ग्रामवासी कसबे पावस – "विश्वनाथ जोग व कृष्णफर्जंद सोमजोशी यांस – तुम्ही पावसचे ज्योतिषी सेवा मिरासी करीत आहां. तुम्हास वृत्ति नाहीं तरी तुम्ही कसबे मजकुरीं घर शेत व बाग करून राहावें. जागा दिली आहे" ( प. सा. सं. खं. १, पृ. ८५ ).

जसे राज्यकारभाराच्या सोयीसाठी देशाचे राजकीय विभाग पाडलेले असत, तसे धर्मव्यवस्थेकरितांहि भाग पाडलेले असून, त्यांजवर धर्माधिकाऱ्याची वंशपरंपरेने नेमणूक केलेली असे. धर्माधिकारी हा ग्रामजोशावरचा. त्याच्या हाताखालीं गावगन्ना जोशी असत. पण कित्येकदां जोसकीचें विशिष्ट प्रदेशांतील सर्व वतन धर्माधिकाऱ्यानेंच आपल्याकडे घेतलेलें असून गांवगन्ना आपले गुमास्ते नेमून त्यांजमार्फत तो गांवकीचीं कार्यें करून घेत असे. अशांपैकींच अंतो बिन दामोदर व नारो बिन अनंत पाध्ये गोळवली-

कर हे: दिसतात. त्यांना मुसलमानपूर्व हिंदु राजे यांच्यापासून ताम्रपट मिळाले होते व ते पाहून मुसलमान राजांनींहि त्यांस फर्मानें दिलीं होतीं. अशी स्थिति असतांहि संगमेश्वरचा कृष्णजोशी या बापलेकाबरोबर वतनाच्या बाबतींत तंटा करूं लागला. तेव्हां गोळवलीकरांनीं आपली फिर्याद मजालसीकडे नेली. तिनें पुरावा पाहून गोळवलीकरांना अनुकूल असा निकाल दिला.

### महजर

शके १५५८ भाद्रपद शुद्ध १२
इ. स. १६३३ सप्टेंबर २

" अंतो बिन दामोदर व नारो बिन अनंत पाध्ये गोळवलीकर यांनीं मजालसीस मालूम केलें जे मौजे. देवधर मामले हमजाबाद ते किले खेळणापर्यंत धर्माधिकरण व जोशीगिरी आपली पिढी दर पिढी चालत आली असे. कृष्णजोशी संगमेश्वरकर यांनीं मिराशीस खलेल केली. ताम्रपटें फर्मानें आहेत. ताम्रपट कागद पाहतां पाध्ये खरे, जोशी मजकुराशी निसबत नसे " ( प. सा. सं. खं. १, पृ. ९१ ). यावरून संगमेश्वर ते खेळणा एवढा टापू पाध्ये यांच्या कक्षेंतील होता.

### सप्तशृंग

नाशिक जिल्ह्यांतील सप्तशृंगीचें देवस्थान पुरातन असून तेथील धर्मकृत्यें मुसलमानी राजवटींतहि पुरातन पद्धतीनें चालू होतीं. तथापि देवीच्या पूजेसंबंधीं इ. स. १६३७–३८ त म्हणजे निजामशाही राज्य अस्तित्वांत होतें तेव्हां तेथील गोपाळभट पुजारी व भोपे पुजारी यांजमध्यें भांडण लागलें. सप्तशृंगपर्वत अहिवंत किल्ल्याखालचा असल्यामुळें अहिवंत गडावरील निजामशाही अधिकाऱ्यांनी दाव्याची चौकशी केली. त्या वेळीं भोपे पुजारी हजर न राहिल्यानें दाव्याचा निकाल एकतर्फी लागला.

### महजर ( किले अहिवंत )

शके १५५९

" गोपाळभट पुजारी व भोपे पुजारी सप्तशृंग यांचा पुजारीपणाबद्दल गरगशा लागला होता. गोपाळभटापाशीं निवाड्याचे कागद आहेती. भोपे

पुजारी यापासी येक जरा नाहीं. भोपे मुनसिफीस हाजीर न व्हातीच. लायनी हरकती करिताती. गोपाळभटाचे पूजेचे तकसीम दुबाला केली असे " ( प. सा. सं. खंड १, पृ. ९७ ). देवीचे पुजारी ते भोपे व देवाचे पुजारी ते बडवे. तुळजापूर व सप्तशृंगी येथील पुजाऱ्यांना भोपे म्हणतात व पंढरपूर आणि शिंगणापूर येथील पुजाऱ्यांना बडवे म्हणतात. अनेक मराठे सरदार व देशमुख सप्तशृंगीचे उपासक होते.

शके १५६६

दत्ताजीराजे – गणेशभट दीक्षित राहणार वणी यांस – " श्रीसप्तशृंगीचा जप, पूजाआवर्तन करीत जाणें. एकंदर वर्षासन १५ रु. देत जाऊं " ( प. सा. सं. खं १, पृ. २०८ ). वणी हें गांव सप्तशृंगीच्या पायथ्याशीं असून तेथें राहून कित्येक ब्राह्मण देवीच्या उपासनेकरितां डोंगरावर जात असत. हाच गणेश दीक्षित इतरहि मराठे सरदारांचा उपाध्याय होता. त्यांपैकींच धनाजी धारराव राजे व हिंदुराव राजे कल्याणकर तळकोकण हे दिसतात.

शके १५८७ माघ वद्य १

धनाजी धारराऊ राजे – वेदमूर्ति गणेश दीक्षित सप्तशृंग यांस " आपण अगर आपले वंशीचे लोकांस तुम्ही तीर्थगुरु " ( प. सा. सं. खं. १, पृ. ३०७ ).

शके १५८७ माघ वद्य १३

रा. हिंदुराव राजे कल्याणकर तळकोंकण – ती. स्व. वेदमूर्ति रा. गणेश वलद विठ्ठल दीक्षित यांस " तुम्ही आमचे व आमच्या वंशीचे तीर्थगुरु. प्रतिवर्षी सप्तशतीचे सात सप्ताह करीत जाणें. १४ रु. प्रतिवरसी देत जाऊं " ( प. सा. सं. खं. १, पृ. ३०७ ).

हल्लीं काशी, त्र्यंबकेश्वर, प्रयाग, गया इत्यादि क्षेत्रांत कोणी यात्रेस गेलें असतां त्यांजपासून तेथील भिक्षुक आपल्या वहींत त्यांची व त्यांच्या पुत्रपौत्रांचीं नांवें टिपून घेऊन त्यांनीं आपणांस उपाध्ये म्हणून मानावें असें लिहून घेत असतात. त्यांतीलच हा प्रकार दिसतो. सप्तशतीचा पाठ सप्तशृंगीवर करण्याचा प्रघात फार जुना असल्याचें खालील उदाहरणांवरूनहि कळून येतें.

शके १५८७

जाधवराऊ राजे – गणेश विठ्ठल दीक्षित तीर्थोपाध्ये सप्तशृंग यांस "तुम्ही प्रत्यहीं श्रीस सप्तशतीचें एक आवर्तन करीत जाणें. तुम्हांस प्रतिवर्षी २० रुपये देत जाऊं" (प. सा. सं. खं. १, पृ. २८८).

## पंढरपूरची पालखी

पंढरपुरास आषाढ शुद्ध ११ व कार्तिक शुद्ध ११ या दिवशीं महाराष्ट्रांतील अनेक गांवांहून पालख्या व दिंड्या जात असतात. त्यांत ज्ञानेश्वर, तुकाराम, सोपानदेव व एकनाथ यांच्या पालख्या प्रमुख असून त्यांजबरोबर सहस्रो वारकरी टाळ-मृदुंग वाजवीत व भजन करीत पायी प्रवास करतात. ही प्रथा हैबतीबुवा आरफळकर यांनीं पेशवाईच्या अखेरीस पाडली अशी समजूत आहे; पण खालील मजकुरावरून ती फार जुनी म्हणजे मुसलमानी राजवटींतहि चालू होती. त्यासंबंधाचें पत्र कै. राजवाडे यांस सातारा जिल्ह्यांत वाळवें मुक्कामीं मिळालें. तें शके १५६० चें (इ. स. १६३८) आहे. "वाळव्याहूनहि एक दिंडी पंढरपुरास एकादशीला जात असून तिजबरोबर पालखी, ती वाहून नेणारे भोई, पूजेकरितां गुरव, ब्राह्मण (भट), गरुडध्वज, रात्रीं मशाल धरण्याकरितां दिवट्या इत्यादि सरंजाम असे. ही दिंडी पंढरीस गेल्यावर गोपाळकाल्याच्या वेळीं हरिदास कीर्तन करी, श्रोत्यांस व त्यास बुक्का लावण्यांत येई व खिरापत वाटीत."

## शिखर शिंगणापूर

शिंगणापूरचा महादेव हें महाराष्ट्रांतील लक्षावधि मराठे-ब्राह्मणांचें कुलदैवत असून पंढरपूर, तुळजापूर येथील देवस्थानांइतकी त्याची योग्यता समजली जाते. तेथील तळें शिवछत्रपतींचे आजोबा मालोजीराजे भोसले यांनीं बांधलें व तेथील देवस्थान भोसल्यांचें कुलदैवत होतें व त्याजवर अधिकारहि मालोजीचाच होता. मालोजीच्या पश्चात् तो अधिकार शहाजीराजाकडे आला. ता. १३ सप्टेंबर १६३८ त तेथील बडवे वगैरेंत वतनाविषयीं तंटा उपस्थित झाला. शिंगणापूरचा महादेव शिखरावर म्हणजे डोंगरावर आहे व शिंगणापूर गांव अगदीं पायथ्याला आहे. पायथ्याशीं एक तळें आहे व डोंगरावरहि आहे. दर चैत्री-पौर्णिमेस व महाशिवरात्रीस डोंगरावर मोठी यात्रा भरते. त्या वेळींच बडवे आदिकरून वतनदारांना

खरी कमाई व्हावयाची. तिजवरून तंटा लागला असतां त्याचा निवाडा गांवकऱ्यांनीं जमून केला.

### विज्ञापना

१३ सप्टेंबर १६३८

" समस्त गांवकरी श्रीशंभुमहादेव व पेठ शिंगणापूर यांजकडून—महाराज.

महाराजांनीं सिंगणापुरास ताटे, थिटे, आराध्ये, मोकदम व बडवे क्षेत्र पंढरपूर यांस वेव्हारसंमंधे पाठविलें. थिटे, आराध्ये व मोकदम हे आले. बडवे आले नाहींत. बावीस दिवस वाट पाहिली. मग ताटे, थिटे, आराध्ये, मोकदम क्षेत्र मजकूर यांसीं स्थळपत्र लिहून दिलें असे. महाराजे उभे वर्गाचा हुजूर जैसा नेमू केला असेल तेणेप्रमाणें जमाना करणें वर्तविलें पाहिजे हे विनंती. "

वरील पत्रांत महाराज असा उल्लेख आहे. ते शहाजीराजे नसून ' राजाधिराज महाराज राजश्री कृष्णाजीपंत महाराज होत ' हे कृष्णाजीपंत कोण याचा बोध होत नाहीं. ते ब्राह्मण दिसतात. शिंगणापूरचे ते सत्पुरुष असून त्यांस 'महाराज' हें उपपद गौरवार्थ लावलें असावें.

### नवलगुंदची पुनःस्थापना

" गतवर्षीं सुलतान तारा मोगल लष्कर समवेत येऊन कसबें नवलगुंद येथें राहिले. आल्यावर त्यानीं घरें, वाडे व पेठ जाळून तलफ केली होती. त्यामुळें गांवांत मरग ( मरी ) सुटला, माणसें मरूं लागलीं. रयत लोक, दिवाण लोक व वाणी वळुंज गांवीं राहिनासें झाल्यावर गांवें हुगी घालून आगंतुक देवतांचें स्थापन केलें. ग्रामदेवस्थानाच्या दिवसापासून पांढरी वसली. त्या दिवसाच्या स्थापनेच्या पुरातनस्थळीं मूर्ति होत्या त्या दुरात्म्यांनीं विच्छिन्न केल्या. त्यांची स्थापना झाली पाहिजे. महाराज राजश्री महाराष्ट्र राजा आहे. देवस्थानें छिन्नभिन्न असो नये. याकारणें देवालयें बांधावीं, उरजा चालवावी. ह्यांत आपण व स्वामी मिळोन जें करणें तें करीत आहों. होईल तें करूं. तूर्त नवलगुंदासारखे गांवांत देवळेंच राहिलीं नाहींत. ऐसीयास हुगी घालते समयीं श्रीदेवस्वामीची स्थापना करावी; देवळें, इमारती बांधाव्या; तूर्त मूर्ति स्थापून पूजा चालवावी; नित्य पुराणश्रवण चालावें; त्यास एक भला ब्राह्मण योग्य पाहून त्यास इनाम करून

देऊन पुराण-श्रवण चालतें करावें आणि पुढें वरकड देवांची उरजा चालवावी ऐसें वचन गुंतलें आहे. ऐसीयास वेदमूर्ति वेंकटीभट बिन काशिनाथभट वाराणशीकर बहुत योग्य आणि भले ब्राह्मण आहेत. यांसी श्रीच्या पुराणा-बद्दल इनाम खालसात जमिनीपैकीं हुलमार दोनीमार यास देऊन चालविलें पाहिजे. म्हणजे प्रतिदिवशीं पुराण-श्रवण सांगतील. तेणेंकरून देवस्थानाची स्थापना होऊन शांत होईल. उरजाहि चालेल. म्हणजे महाराज राजश्री छत्रपतिसाहेबास हें श्रेय येईल आणि आपणहि वचन चालविलें असें होऊन पुढेंहि गांवाची आबादमामुरी होईल. पुढें आगंतुक देवस्थान बांधणें व उरजा चालविणें तें चालविलें पाहिजे" अशी विनंती लखवा लिंगपा देसाई मामले तोरगळ यांनी छत्रपतीस ( संभाजीस ? ) केली.

तेव्हां महाराजांनी विचार केला "विचारमतेंहि पाहतां हिंदुकीची गोष्ट खरीच. याकारणें सदरहूप्रमाणें चालविणें उचित आहे. उदंड खर्चवेच महाराजांचे दरबारांत होऊन जातो अगर पडजगलहि पडतें. त्यापरीस श्रीचे उरजे अर्पित राजगृहांतून जरी वेच जाहला तरी ज्याचें नांव त्याचें पुण्ये महाराज राजश्री छत्रपतीसाहेबांस श्रेय होईल. ऐसे पाहून श्रीचे उरजेबद्दल भट-गोसावी यांसी पुराणाबद्दल इनाम खालसातपैकीं हुतमार दोनीमार सर्वमान्य करून दिल्हे असे. कसबेंपैकीं मशाती छत्तीस बिघेचा मार ऐसे दोनीमार अजरा मऱ्हामत दुमाला करून देणें. भट-गोसावी यांचा भोगवटा आपण व पुत्रपौत्री कमावीस करून घेतील आणि श्रीचे देवळीं पुराण सांगून सुखी असतील" ( सनदापत्र, पृ. १६३ ).

## तारळ्याचे महाडिक

शिवकालांत देशावर देशस्थ ब्राह्मणांना धार्मिक वतनें मिळावीं यांत नवल नाहीं. पण तारळ्याच्या महाडिक या श्रेष्ठ मराठे घराण्यांतून एका कोंकणस्थ ब्राह्मणाला देशावर वतन मिळलें ही घटना लक्षांत घेण्यासारखी आहे.

श्री

शके १६१९ आषाढ शुद्ध १३

इ. स. १६९७ जून २१

स्वस्तिश्रीनृपशालिवाहनशके १६१९ ईश्वरनामसंवत्सरे आषाढ शुद्ध त्रयोदशी इंदुवासरे तद्दिनीं वेदमूर्ति महादेवभट व बाळकृष्णभट पेंडसे

पुरोहित यांसी माणकोजी राजे महाडिक दंडवत विनंति उपरी. तुम्हास वर्षासन पुरोहितपणाचे बारा रुपये रास केले आहेती. वर्षाप्रति प्रविष्ट करीत जाऊं ( शिवचरित्र-साहित्य-खंड ५, पृ. २४० ).

### दानपत्र

शके १६१९ आश्विन शुद्ध ८
इ. स. १६९७ सप्टेंबर १३

दानपत्र वेदमूर्ति बालकृष्णभट पुरोहित यासी प्रति राजेश्री प्रतापजी राजे माहाडिक. तुम्हास कसबे बविडे ( बावडे ) प्रगणे इंदापूर येथील जमीन चावर दिल्ही असे. आपली जोंपर्यंत जाहगीर आहे तोंपर्यंत तुम्ही कीर्द करून सुखी असणें रा छ. रबिलावल शके १६१९ ईश्वरनाम संवत्सर ( शिवचारित्र-साहित्य-खंड ५, पृ. २४१ ).

## प्रकरण सव्विसावें

# संत, महंत व सज्जन

### (१) चिंचवडचे देव : मोरया गोसावी

मोरया गोसावी यांचे पूर्वज म्हैसुराजवळ शाळिग्राम या गांवीं राहत असत. त्या गांवावरून त्यांचें आडनांव शाळिग्राम असें पडलें. मोरयांच्या जन्मापूर्वी सात-आठ पिढ्या शाळिग्राम पुण्यास येऊन राहिले. तेथून मुसलमानांच्या उपद्रवास कंटाळून त्यांनीं चिंचवडास स्थलांतर केलें. मोरयांचे वडील वामनभट व मातुश्री पार्वतीबाई. वामनभटजींना बरींच वर्षें पुत्रसंतति होईना. म्हणून त्यांनीं पत्नीसह मोरगांवास पुष्कळ वर्षें तपश्चर्या केली. तेव्हां श्रीमोरयादेव प्रसन्न होऊन त्यांस पुत्र झाला म्हणून त्याचें नांव मोरया ठेवलें. मोरयांनींहि वडीलांप्रमाणें मोरयाची आराधना केली. मोरगांवच्या गजाननास मोरेश्वर तथा मोरया व थेऊरच्या गजाननास चिंतामणि म्हणतात. प्रथम त्यांनीं मोरगांवास व नंतर थेउरास तपश्चर्या केली. थेउरास ते तपश्चर्या करीत असतां त्यांस चिंतामणीनें प्रसन्न होऊन मजसारखा पुत्र तुला होईल असा आशीर्वाद दिला. त्याप्रमाणें पुत्र जन्मास आल्यावर त्याचें नांव चिंतामणि ठेवण्यांत आलें.

मोरया गोसाव्यांच्या पत्नीचें नांव उमाबाई. ती रावेत-पुनवळें येथील गोविंदराव कुलकर्णी यांची कन्या. मोरया चिंचवडास असतां तेथून एका

मैलावरील किवजाबाईच्या वनांत ते तपश्चर्येस बसत असत. चिंचवडाहून प्रतिमासीं शुद्ध चतुर्थीस ते मोरगांवीं मोरयाच्या दर्शनास जात असत. पुढें वृद्धपण प्राप्त झाल्यावर त्यांना मोरगांवाची महिन्याची वारी होईना. तेव्हां ते मोरगांवीं आले असतां श्रीगजाननानें त्यांच्या स्वप्नांत येऊन सांगितलें कीं "तूं आतां यापुढें महिन्याची वारी सोडून दे, येथील ब्रह्मकमंडलु डोहांत माझी मूर्ति सांपडेल तिची नित्य पूजा करीत जा आणि वर्षांतून फक्त दर भाद्रपद शुद्ध ४ स व माघ शुद्ध ४ स मोरेश्वरीं माझ्या दर्शनास येत जा." देवाची ही आज्ञा प्रमाण मानून मोरयांनीं स्नानाकरितां कऱ्हेच्या ब्रह्मकमंडलु-कुंडांत बुडी मारली तों त्यांत त्यांना मंगलमूर्तीची पाषाणाची मूर्ति सांपडली.

मोरयांचे गुरु श्रीयोगिराजमहाराज. त्यांची समाधि चिंचवडास आहे. मोरयांनीं काशीयात्राहि केली होती. पुढें त्यांचा समाधिकाळ समीप आला. तेव्हां त्यांनीं आपले चिरंजीव चिंतामणिदेव यांस आपला जिवंत समाधि घेण्याचा मनोदय सांगितला. चिंतामणि देवांनीं भूमि शुद्ध करून गुहा तयार केली व तींत स्नानसंध्या व पूजादि नित्यकर्म आटोपून मोरया गोसावी जाऊन बसले. त्यांनीं नासिकाग्रदृष्टि केली व त्यांजपुढें चिंतामणिदेवांनीं गणेशपुराणाची पोथी ठेवली. चिंतामणींना दोन भार्या होत्या. त्यांसमवेत पित्याला वंदन करून ते बाहेर पडले व नंतर गुहेच्या तोंडावर शिळा ठेवून त्यांनीं तिचें द्वार बंद केलें. याच समाधीवर पुढें शके १५८० त ( इ. स. १६५८ त ) मंगलमूर्तीचें देवालय बांधण्यांत आलें.

मोरया गोसावी समाधिस्थ झाल्यावर त्यांच्या पदावर चिंतामणि आले. देव ही संज्ञा मोरयांच्या घराण्यास चिंतामणींच्या कारकीर्दीपासून प्राप्त झाली. चिंतामणि देवांना दोन भार्यांपासून चार पुत्र झाले. पहिलीला नारायणमहाराज व दिगंबरदेव आणि दुसरीस विनायक तथा काकामहाराज व मोरोबा देव. नारायणमहाराज वडील म्हणून चिंतामणि देवानंतर गादी-वर बसले. त्यांनीं नानाउत्पन्नांच्या सनदा मिळविल्या, वाडा बांधला व कोठारेश्वराची स्थापना केली. ते मोठे कारस्थानी होते.

चिंतामणिमहाराजांच्या हयातींत औरंगजेब चिंचवडास आला होता. त्यानें चिंचवडांतील देवस्थानाचा विध्वंस करण्याचें ठरवून मोरया गोसा-व्यांच्या समाधीपुढें मांस भरलेलें ताट ठेवलें आणि तुमच्या देवांत काय

सामर्थ्य आहे तें दाखवा, नाहींतर या ताटांतील मांस तुम्हांस खावयास देऊन बाटवितों असें चिंतामणि देवांना आव्हान केलें. तेव्हां चिंतामणि देवांनीं ताटावरील रुमालावर तीर्थ शिंपडतांच आंत गुलाबाचीं फुलें झालीं. त्याच वेळीं मोरया गोसाव्यांनींहि भीषण रूप धारण करून औरंगजेबास भिवविलें व अशा रीतीनें देवस्थानाचें रक्षण केलें. मोरेश्वर व चिंचवड हीं दोन्ही देवघराण्याचीं स्थानें. त्या दोन्ही ठिकाणचे मुसलमान चतुर्थीचें व्रत पाळतात. ते तेथील नगाऱ्याकडे वतनदार आहेत.

चिंचवडच्या देव घराण्याचा आतां पुष्कळच विस्तार झाला आहे. खुद्द पुण्यांतच त्यांचीं नव्वद कुटुंबें आहेत. त्याशिवाय कांहीं कुटुंबें पुण्याबाहेरहि आहेत. पुण्यास श्री. गणेश गंगाधर देव नांवाचे एक आस्थेवाईक गृहस्थ जोगेश्वरीच्या बोळांत राहतात. त्यांनीं आपल्या तेथील वाड्यांत ' देव-मंडळ ' स्थापन केलें आहे. त्या मंडळामार्फत त्यांनीं मोरया गोसावी व त्यांचे वंशज यांजविषयीं बरीच माहिती गोळा केली आहे. ती बव्हंशीं ऐकीव असल्यानें कालनिश्चयदृष्ट्या तितकीशी विश्वसनीय नाहीं. तथापि त्यांच्या टिपणां-वरून उपरिनिर्दिष्ट माहिती निवडून काढली आहे. देवांच्या घराण्यांतील पहिले सात पुरुष औरस होते. ते येणेंप्रमाणें – ( १ ) मोरया गोसावी, ( २ ) चिंतामणिमहाराज, ( ३ ) नारायणमहाराज, ( ४ ) दुसरे चिंतामणि महाराज, ( ५ ) धरणीधरमहाराज, ( ६ ) तिसरे चिंतामणिमहाराज. हे सर्व पदस्थ देव. त्यांपैकीं पहिल्या तिघांचा कालनिश्चय व ऐतिहासिक माहिती येथें देत आहें.

## ऐतिहासिक माहिती

मोरया गोसावी यांचें नांव मोरेश्वर व आडनांव शाळिग्राम. नांव मोरेश्वर व भक्तहि मोरेश्वराचे म्हणजे मोरयाचे म्हणून त्यांना लोक मोरया म्हणूं लागले. त्यांचें घराणें मूळ पुण्यांतील असें ऐकिवांत आहे. परंतु कागदो-पत्रीं ते चिंचवडांत राहत असल्याचा उल्लेख सांपडतो. ते इ. स. १६१९ त चिंचवडास होते. मोरया गोसाव्यांचें मलिक अंबर, विजापूरकर व त्यांचे अधिकारी, शहाजी व शिवाजीराजे या सर्वांवर वजन असून त्या सर्वांकडून त्यांस इनाम जमिनी व उत्पन्न मिळालें होतें. ते कुटुंबवत्सल असूनहि मोर-गांवाच्या श्रीगजाननाचे अनन्यभक्त होते. गोसावी म्हणजे इंद्रियदमन

केलेला पवित्र ब्राह्मण. त्यांच्या अशा वर्तनावरूनच त्यांना गोसावी ही संज्ञा प्राप्त झाली असावी. इ. स. १६५३ च्या पत्रांत त्यांचा उल्लेख मोरया असा सांपडतो.

चिंचवडास त्यांचा वास इ. स. १६३९ पर्यंत होता. त्या काळांत त्यांनीं चिंचवडास निजामशाही अधिकाऱ्याकडून अर्धा चाहूर जमीन व २० खंडी धान्य असें इनाम मिळविलें ( १२ आक्टोबर १६२६ ). चिंचवडाजवळ आकलवाडी ( आकुर्डी ) गांव आहे, तेथेंहि सैद सादत सैद हुसेन याजकडून मोरया यांस इनाम होतें; तें शहाजी राजे यांनीं पुढें चालविलें ( इ. स. १६२८ ). गोसावी इ. स. १६३९ च्या सुमारास मोरगांवीं रहावयास गेले. त्यांत त्यांचा उद्देश चिंचवडाहून सुमारें १५ कोस असलेल्या मोरगांवाची दर पंधरवड्याला वा महिन्याला चतुर्थीची वारी करून शरीरास उतार वयांत क्लेश देण्यापेक्षां मोरगांवीं श्रीसन्निध नित्य राहून त्यांची उपासना करावी असा असावा.

मोरयावर मुसलमान अधिकाऱ्यांची भक्ति बसण्याचें एक कारण त्यांचें चारित्र्य हें होतेंच; पण त्याशिवाय गोरगरीब अशा हिंदु व मुसलमान या दोन भिन्नधर्मीयांच्या ठिकाणीं समत्वबुद्धि हेंहि होतें. कारण मलिक सैद यानें कसबे कल्याण, तपे अंबरनाथ, मामले मुरंजन येथील कारकून व देशमुख यांस दिलेल्या आज्ञापत्रांत स्पष्ट म्हटलें आहे.

" रा. मोरेश्वर गोसावी मुकाम मोरेश्वर यांसी इनामाबद्दल धर्मादाऊ लंगर, आटारोटी, गरीबगुरिबा दर सवाद कसबे मजकुरी लारी एक दिला आहे " ( इ. स. १६३९ डिसेंबर १४ ). हें उत्पन्न मोरयास इ. स. १६३९ पूर्वीच मिळालें होतें; परंतु मध्यंतरीं गोसावी काशीयात्रेस गेल्यामुळें त्यांच्या गैर हजेरींत तें बंद होतें. कदाचित् त्यांच्या पश्चात् लंगर चालविण्याची व्यवस्था नसेल म्हणूनहि तें बंद झालें असावें. विजापूरकरांचा सुभेदार रुस्तुमजमा यानेंहि चेऊल, ठाणें, मुरबाड इत्यादि ठिकाणांहून गोसावी यांस लारी २ व १ देण्याबद्दल त्या त्या भागाच्या परगणा-अधिकाऱ्यांना लिहिलें.

शिवाजीराजे यांचीहि मोरया गोसाव्यांवर भक्ति होती. गोसावी यांस बागबगीच्याचा शौक होता. देवालाहि बेल, फुलें व तुळशी पूजेकरितां पाहिजेच होत्या. त्यांनीं पुण्याच्या देशमुखास लिहिलें ' मोरेश्वर गोसावी

मोरगांवीं वाग गिहीवर साम धरून झाड झाडोरा करतील. ते उपज दुमाले केला असे. ते दुमाले करीत जाणें.' (इ. स. १६४७) (प. सा. सं. खंड ३, पृ. ५०).

वरील उत्पन्नाशिवाय मोरयास परगणे सुपेपैकीं मौजे लोणी, पणदरे व इंदापुरापैकीं काझड व शेळगांव येथील जमीन चावर दोन, कास रुके ७ व टांकसाळी टके १८६ इनाम होतें. गोसावी यांजपाशीं गायी पुष्कळ होत्या. त्यांजकरितां शिवाजीमहाराजांनीं त्यांस चराऊ रान दिलें. महाराजास सर्वजण गोब्राह्मणप्रतिपालक म्हणतात. ही पदवी लोकांनीं त्यांस कशी दिली हें खालील पत्रांवरून समजून येणार आहे.

शके १५६९
इ. स. १६४७–४८

शिवाजीराजे – कारकून व देशमुख परगणे पुणें यांस "मोरेश्वर गोसावी यांसी दहावीस गाई आहेती. ब्राह्मण अतीत-अभ्यागतास पावते. गाईस चारावयास रान नाहीं, अतीत ब्राह्मणास पावणार नाहीं. महाराज गोब्राह्मणाचे प्रतिपालक आहेती. यैसियास दरसावद मौजे मजकूर आहे. त्यांत शेजारी मुनसील पटी कास रुके ८३ नाकीर्दी पडिली. सालमजकुराकारणें प्रतापेस उखते लाविली. सदरहू पटी इनाम दिलीया कल्याण चिंतू. तरी दिली असे" (प. सा. सं. खंड ३, पृ. ४९).

मुनसील नांवाची जमिनीची पट्टी पडिक होती. ती एक प्रताप (एक नाणें) भाड्यानें मोरया गोसाव्याकडे वचनराईकरितां लावण्यांत आलीच होती. तीच आतां इनाम दिली. मोरयांनीं विनंती केल्यावरून महाराजांनीं त्यांच्या गाईंच्या चाऱ्याची व्यवस्था केली. त्यानंतर जे अतिथि ब्राह्मण त्यांच्या मठांत येत त्यांच्या भोजनाकारितांहि कांहीं जमीन गोसाव्यांनीं मागितली. ती महाराजांनीं कृपाळू होऊन त्यांस दिली.

"शिवाजीराजे – कारकून व देशमुख परगणे पुणें यांस – मोरेश्वर गोसावी क्षेत्र मोरेश्वर यांस महाराजें मौजे मजकूरपैकीं ८७ रुके जमीन दिधली. तेथील धान्य ब्राह्मणमुखीं घालून महाराजांस कल्याण चिंतून राहू. झाडझाडोरा बाग करून उत्पन्न येईल तें सर्वोत्तमास अर्पून महाराजास

आशीर्वाद देऊं. तरी खुर्दखत दिधलें असे एक जरा तसवीस लागों न देणें " इ. स. १६४७-४८ ( प. सा. सं. खंड ३, पृ. ४९ ).

मोरया गोसावी हे पेशवाईतील ब्रह्मेंद्रस्वामीप्रमाणेंच महत्त्वाकांक्षी व कर्तबगार होते. त्यांजप्रमाणें ते परोपकारी व रसिकहि होते. त्याच्या-सारखाच बागबगीच्याचा व पुष्पवाटिकांचा ह्यांस शौक होता. ते कित्येक जमिनी कुळांकडे लावून उक्ता खंड घेऊन न बसतां गुरेंढोरें व गडीमाणसें ठेवून जमीन घरीं करीत असत.

मोरयाविषयीं इतकी ऐतिहासिक माहिती मिळते. ती दिल्यानंतर त्यांचा काळ ठरविणें आवश्यक आहे. गणेशपंत देवांच्या टिपणांत त्यांचा जन्मकाल शके १२९७ व समाधिकाल मार्गशीर्ष वद्य ६ शके १४८३ देण्यांत आला आहे. त्यावरून त्यांचा आयुर्दाय १८६ वर्षें दिसून येतो. मोरयास पुत्र चिंतामणि शके १४०३ मध्यें म्हणजे त्यांच्या वयाच्या १०६ व्या वर्षीं झाला. मोरया दीर्घायुषी होते असें मानलें तरी वरील सर्व कालगणना अविश्वसनीय वाटते. मोरोबा गोसावी यांस उत्पन्न मिळाल्याचा पहिला उल्लेख इ. स. १६१९ चा आहे. त्यांच्या समाधीवर देवालय इ. स. १६५८ त ( शके १५८० ) बांधण्यांत आलें. त्यापूर्वीं वर्ष-दोन वर्षें त्यांनीं समाधि घेतली असावी आणि त्यांस मिळालेलें पहिलें उत्पन्न लक्षांत घेतां त्यांची प्रसिद्धि निजामशाही दरबारापावेतों त्यांच्या वयाच्या तिसाव्या वर्षीपर्यंत झाली असावी. या हिशेबानें त्यांची हयात इ. स. १५८९ ते इ. स. १६५६ पर्यंत म्हणजे एकूण ६७ वर्षें मानण्यास हरकत नाहीं. इ. स. १६५३ त 'मोरया' असा उल्लेख केलेलें पत्र आहे. त्यावरून इ. स. १६५३ ते इ. स. १६५८ यांच्या दरम्यान ते समाधिस्थ झाले असावे.

## चिंतामणि देव

मोरया गोसावी यांचे चिरंजीव चिंतामणि देव हे इ. स. १६६३ त चांगले कर्तेसवरते झाले असून लोक त्यांस महाराज राजेश्री चिंतामणि गोसावी देवस्वामी या नांवानें ओळखूं लागले होते. त्यांचे पुत्र नारायणदेव हे इ. स. १६७६ च्या सुमारास साधुत्व पावले होते. इ. स. १६७३ त मोरयांचें नांव मागे पडून पत्रव्यवहारांत देव हें नांव नमूद झालेलें दिसतें. हे देव चिंतामणि वा नारायण यांपैकीं कोणी असावे. कदाचित् इ. स. १६७३ च्या

पूर्वी चिंतामणि देव समाधिस्थ झाले असल्यास त्यांचे चिरंजीव नारायण देव गादीवर असतील.

शिवाजीमहाराजांकडे चिंचवडचा सरदेशमुखीचा हक्क होता. त्यांतील २९ होन चिंचवडच्या देवांना देण्याची आज्ञा त्यांनीं खालील पत्रांत केली आहे. त्यांत देव ही पदवी नमूद आहे.

शके १५९५ भाद्रपद वद्य १३
इ. स. १६७३ सप्टेंबर २२

शिवाजीराजे—येसाजी गणेश हवालदार व कारकून परगणे पुणें यांस—

"श्रीदेवस्वामी चिंचवड हे इनाम जमीन घरवाहो करताती व यास अलाहिदा सरदेशमुखी परगणे मजकूरपैकीं होनु २९ खर्च पडोन पावताती. सनद तरी इनामाची नाहीं. ये बाबे नवा इनाम सरदेशमुखी देविला नाहीं. जे जमीन देवास इनाम असे त्यावरी सरदेशमुखी होती, ते दुबाले केली. सरदेशमुखी इनाम देविला नाहीं. त्याचा इनाम आहे, त्यावरी सरदेशमुखी जे होईल ते त्याचे नांवें खर्च लिहीत जाणें. हुजूर हुकुमावरून तुम्ही २९ होनु पावावयां खलेल केले. तरी नवे खलेल कांहीं न करणें. तागायत गुदस्ता पांच साले येकूण तीस होन सरदेशमुखीपैकीं श्री देवास पावताती तैसेच साल मजकुरापासून पाववीत जाणें" (प. सा. सं. खंड ३, पृ. ११४).

तात्पर्य, देवांकडे जो इनाम होता त्याजवरील सरकारी सरदेशमुखीच्या हक्काचें येणें २९ होन हे गोसावी यांजपासून वसूल न करतां त्यांस दुमाला केलें.

देवांचा व्याप दांडगा. ते सालिना मठास लागणारें मीठ आपले बैल कोंकणांत पाठवून त्यांजवरून गोण्यांतून वाहून आणवीत. तें मीठ लोकांपासून धर्मादाय म्हणून फुकट घेऊन येत. लोकांना नेहमीं अशी तसदी देणें योग्य नव्हे असें जाणून गोसावी यांनीं महाराजापाशीं सरकारी मिठांतून मीठ मागितलें व तें त्यांनीं दिलें.

शके १५९८ आषाढ वद्य ७
इ. स. १६७६ जून २२

राजश्री शिवाजीराजे — कोनेरी रंगनाथ सुबेदार व कारकून सुबा तर्फ कल्याण यांस —

"श्री देव यांचे येथें अन्नव्यय बहुत आहे. तीस त्यांचे बैल पेण, पणवेली, नागोठणे येथें जातात; मीठ नेतात, त्याचे पैके कोणी घेत नाहीं. म्हणून श्रीनें सनद पाहिजे म्हणून सांगून पाठविलें. याउपरी फुकट मीठ कोणापासून घ्यावयास द्यावयास गरज नाहीं. मीठ केली दहा शेरी गल्ल्याचे ४ खंडी रास देणें. तें पेणचेच बंदरीहून यांस दिवाणीचे मिठापैकीं दरसाल देत जाणें. खर्च लिहिणें. दरसाल ताज्या सनदेचा उजूर न करणें" (प. सा. सं. खंड ३, पृ. १२३).

इ. स. १६८० त राजा शंभुछत्रपतीच्या पत्रांत मोरेश्वर हें नांव आलें आहे. तें मोरया गोसाव्यांचें कीं काय असा भ्रम उत्पन्न होतो; पण ते पहिले मोरया ऊर्फ मोरेश्वर गोसावी नसून त्यांचे नातू म्हणजे चिंतामणि देवास दुसऱ्या भार्येपासून झालेले मोरोबा तथा मोरेश्वर होत. तें पत्र असें–

शके १६०२ कार्तिक वद्य ११
इ. स. १६८० नोव्हेंबर ६

राजा शंभुछत्रपति – सुभेदार, जुमलेदार व कारकून लष्कर यांस –

" मोरेश्वर गोसावी वास्तव्य श्रीमोरेश्वर तर्फ कऱ्हेपठार येथें कुटुंबेसी राहतात. तरी तुम्ही जातांयेतां त्यांच्या माणसास व शेतापोतास गुराढोरांस काडीचीतसवीस देत न जाणें. जेथें अनुकूल पडेल तेथें सुखें राहो देणें" (प. सा. सं. खंड ३, पृ. १४५).

### आणखी एक पत्र

शके १६०२ कार्तिक वद्य ९
इ. स. १६८० नोव्हेंबर ४

राजा संभुछत्रपति – नागोजी बल्लाळ मुख्य देशाधिकारी यांस –

" मोरेश्वर गोसावी यांचें इनाम प्रांतमजकुरीं आहे. परगणे सुपेपैकीं मौजे लोणी व पणदरें, इंदापूरपैकीं काझड व सेलगाऊ येथील जमीन चावर २ कास रुके ८७ व टांकसाळी टक्के १८५ हा इनाम सालाबादप्रमाणें चालविणें" (प. सा. सं. खंड ३, पृ. १४५).

गोसावी यांजकडे गुरें बहुत होतीं, त्यांस ५० हजार गवत पुणें परगण्यांतून मिळे. मोरया गोसाव्यांचें उत्पन्न वेगळें व मोरगांवच्या श्रीमयूरेश्वरास मिळालेलें उत्पन्न वेगळें. तें त्याचे पिढीजाद पुजारी, मंगलमूर्ति गोसावी,

मह्लादाजी गोसावी व गणोबा गोसावी मु. मोरगांव यांस मिळालें होतें. हल्लीं चिंचवड संस्थान स्वतंत्र असून तेथील श्रीगजाननाची स्थापना मोरया गोसाव्यानंतर झाली. गोसाव्यांचा अंतहि मार्गशीर्ष वद्य षष्ठीस चिंचवडास झाला. तेथें त्यांची पुण्यतिथि होत असते. अर्थात् चिंचवड संस्थानास असलेलें उत्पन्न मोरया व त्यांचे वंशज यांनीं संपादिलें असावें. मोरगांवचा विनायक हा अष्टविनायकांपैकीं असून त्याचें उत्पन्न वेगळें आहे.

## येसूबाईचें पत्र

देव घराण्यावर छत्रपति घराण्याचा लोभ फार. शिवछत्रपति, संभाजी-राजे यांनीं देवांचा वेळोवेळीं इनामें देऊन परामर्श घेतला होता. संभाजीच्या वधानंतर शाहू व येसूबाई औरंगजेबाच्या कैदेंत पडलीं. त्यांची विचारपूस मराठे सरदार बाहेरून करीत असत व त्यांस द्रव्यसाहाय्यहि देत असत. एकदा येसूबाईसाहेबांवर फार कठीण प्रसंग ओढवला. त्यांजपाशीं खर्चाला पैसा नाहीं अशी त्यांस विपन्नावस्था आली. तेव्हां येसूबाईनीं चिंचवडच्या देवांना वैशाख शुद्ध ७ शके १६२७ रोजीं पत्र लिहिलें व मदतीसाठीं करुणा भाकली. त्याचा सारांश –

## श्रीशंकर

" राजश्री श्री. देव स्वामीचे सेवेसी. श्रीमंत परमपूज्य तपोनिधि मुक्ति-दायक सकलगुणालंकरण देवमान्य वरदमूर्तिपरायण राजमान्य राजश्री.

आज्ञाधारक सेवेसी मातुश्री येसूबाईसाहेब दोनी करकमल जोडून चरणावरी मस्तक ठेवून साष्टांग नमस्कार विनंति उपरी. येथील क्षेमतागा-ईत वैशाख सुध सप्तमी गुरुवार जाणवून मुकाम अमदानगरीं दुर्गांत स्वामींच्या आशीर्वादेकरून यथास्थित असे.

आमचें वर्तमान तरी स्वामीपाशीं सत्यच कथन केलें पाहिजे. चिरंजीव दाजी ( शाहू ) तों पृथ्वीपतीसमागमे ( औरंगजेब ) गेले. आम्हांस सार्व-भौमाची आज्ञा जाली कीं 'अहमदनगरास जावें.' आज्ञेप्रमाणें आम्हांस अहमदनगरास घेऊन आले. येथें आलियावरी आजी पांच मास जाले.

परंतु खर्चाची बहुत तंगचाई जाली. काय निमित्य तरी सार्वभौम दूर गेले. आमचा तनखा जो दिल्हा तेथें ताम्रानी व हरिभक्तांनीं व कांहीं काळानें प्रतिकूल जाली. यामुळें द्रव्य येणें राहिले. येथें :अहमदानगरीं साहुकारांचे

पांच सात सहस्र ब्रह्मस्व जाले. आतां कोणी देत नाहीं. मागिल्याच पैकियास तगादे लाविले आहेत. त्याच्यामुळें बहुत कष्टी होतो. तो दुःखसागर स्वामीस काय म्हणवून लिहावा! स्वामीच्या सेवेसी रायाजी जाधव पाठविला असे. तरी महाराज कैलासवासी स्वामी गेल्या तागाईत आपणावरी हा कसाला प्राप्त जाला. इंगळास वोळंबे लागले. आतां एक स्वामीवितरिक्त आणीक कोणाचा भरवसा या समयात नाहीं. एक स्वामीच क्लेशपरिहार करतील. इतरांच्यानें कांहीं होणें नाहीं. तरी सारांश गोष्ट कीं, ब्रह्मस्वापासून मुक्त केलियानें बहुत कीर्ति स्वामींची आहे. आणि पाऊसपाणी जालियावरी स्वामी ज्यापासून देववितील त्यांस प्रविष्ट करूं. परंतु हा समय आम्हांवरी कठीण पडला आहे. याचें निवारण करणार स्वामी समर्थ आहेत" (इतिहासमंजरी, पृ. १३३–३४). हें पत्र येसूबाईनीं लिहिलें तेव्हां चिंचवडच्या गादीवर नारायणमहाराज किंवा दुसरे चिंतामणीमहाराज यांपैकीं कोण होते हें समजत नाहीं.

## (२) सिद्धेश्वरभट ब्रम्हे

परगणे चाकण येथें वेदमूर्ति सिद्धेश्वरभट बिन मेघनाथभट ब्रम्हे उपाध्ये हे वास्तव्य करून असत. ते अनुष्ठान करीत व त्यांच्या अनुष्ठानानेंच आपले मनोरथ सिद्धीस गेले अशी शिवाजीमहाराजांची श्रद्धा असल्यामुळें त्यांनीं त्यांस वर्षासन नेमून दिलें.

शके १५७५ श्रावण ३
इ. स. १७।७।१६५३

श्रीभवानीशंकर

"श्रीसकल तीर्थस्वरूप वेदमूर्ति राजश्री सिद्धेश्वरभट बिन मेघनाथभट ब्रम्हे उपाध्ये परगणे चाकण स्वामी यांसी –

आज्ञाधारक राजे श्रीशिवाजीराजे बिन शहाजीराजे भोसले साष्टांग दंडवत, सुरुसन अर्बाखम सैन अलफ. पत्र लेहून दिधलें ऐसीजें. स्वामींच्या अनुष्ठानबळें आपण राज्यास अधिकारी जालों व सकळ मनोरथ चिंतिले पावलों, ऐसा अनुभव आला म्हणून व संकटकाळीं साहाकारी जाणोन, पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें स्वामीस वर्षासन होन पातशाई १०० शंभरी केलें असेत. सदरहू वर्षासन यावत्‌काळपर्यंत आपलें राज्य तावत्काळपर्यंत चालवूं. यासी अन्यथा करूं अथवा पुढें कोणी आपले वंशपरंपरेचा होऊन अन्यथा

करील, त्यास श्रीजीची व कुलस्वामीची व आपल्या पूर्वजांची व गोब्राह्मणांची आण असे. यावेगळे स्वर्गदेवतेच्या पूजनास व श्रीनवचंडीमध्ये जपतपहवनास व ब्राह्मण-भोजनास जें लागेल त्याची आज्ञा करीत जाणे. आज्ञेप्रमाणें प्राप्त करीत जाऊं. राज्य स्वामींच्या प्रसादाचें आहे. आपण आज्ञाधारक असो " ( सनदापत्रांतील माहिती, पृ. ११३–१४ ).

### ( ३ ) सूर्योपासक गोपाळभट

गोपाळभट नांवाचे थोर अनुष्ठाते महाबळेश्वरीं असत. त्यांस महाराजांनीं आपले गुरु मानून त्यांजपासून मंत्रोपदेश घेतला त्याविषयीं.

" वेदमूर्ति गोपाळभट बिन श्रीधरभट वास्तव्य श्रीमहाबळेश्वर यांसी. स्वास्ति श्रीशके १५७४ नंदननाम संवत्सर, फाल्गुन शुद्ध प्रतिपदा रविवासरें तद्दिनीं गोसावी याप्रति विद्यार्थी शिवाजीराजे दंडवत –

विनंति उपरी स्वामी भले थोर आनुष्ठाते, सूर्यउपासनी, पद्महस्ती ऐसे जाणोन, आपण मातोश्री जिजाबाई आऊसाहेब वेदमूर्ति प्रभाकरभट उपाध्ये यांच्या विद्यमाने स्वामीपासून मंत्रोपदेश संपादिला. स्वामी आपले गुरु. स्वामीस आपण आपले अभ्युदयार्थ सूर्यप्रीत्यर्थ अनुष्ठान सांगितलें. प्रतिवर्षी वर्षासन द्यावयाची मोईन केली असे. बितपशील –

वर्षासन – पैकी गल्ला नवशेरी सूर्यप्रीत्यर्थ अनुष्ठान प्रतिवर्षी करावें त्यास नक्त होन १००, बारुळे मापे खंडी ४ तांदूळ, ४ नागली एकुण ८ खंडी, तूप ·।४, तेल ·।४, सामुग्री व पूजा – आरक्त वस्त्रें दोन अनुष्ठानसमयीं नेसावयास व १ पीताबर, १ शाल, १ आसन एकूण तीन. वजन चंदन ८८५ शुभ्र, ८८५ आरक्त एकूण ८।·. स्वामींनी आमचे भाग्योदयार्थ प्रतिवर्षी अनुष्ठान उत्तरोत्तर करावें व मंत्रोपदेशहि स्वामींचे वंशपरंपरेनें आमचे वंशपरंपरेस करावा. आपण संकल्पपूर्वक प्रतिवर्षी वर्षासन, दानपत्र करून स्वामीस दिल्हे. हें आपले वंशपरंपरेनें उत्तरोत्तर चालवावयास अन्यथा करूं तरी श्रीमहादेव साक्ष. स्वामींनीं निरंतर देवापाशीं आमचें कल्याण इच्छावें. लेखनालंकार मोर्तब " ( सनदापत्रांतील माहिती, पृ. ११३ ).

### ( ४ ) बोधलेबुवा

बोधलेबुवा यांचे खरें नांव माणकोजी जगताप. ते सोलापूर जिल्ह्यांतील धामणगांवचे पाटील. ते पंढरीचे वारकरी व अभंगकार होते. त्यांच्या पत्नींचें

नांव ममताबाई. बोधला म्हणजे बोधराज. त्यांची जात मराठा. त्यांजपाशीं जमीनजुमला व इतर जिनगी बरीच होती. परोपकार हाच धर्म असें बुवा मानीत व त्यांच्या पत्नीचेंहि तेंच मत होतें. ते गोरगरीब व अंधपंगु यांचा परामर्श घेत. एकदां भयंकर दुष्काळ पडला. त्यांत बोधलेबुवांनीं व त्यांच्या पत्नीनें आपणांजवळ होतें नव्हतें तें दुष्काळग्रस्तांस देऊन त्यांचे प्राण वांचविले. त्यामुळें त्यांजपाशीं कांहीं न राहून त्यांस अठराविश्वें दारिद्र्य आलें. तेव्हां ममताबाई रानांत जाऊन झाडांच्या फांद्या तोडून त्यांची मोळी बांधी व ती नगरांत जाऊन तीन-चार पैशांस विकी. त्या पैशांतून जें पीठ-मीठ मिळे त्यावर तीं नवरा-बायको चरितार्थ करीत. देवाला त्यांची दया येऊन त्यांच्या भूतदयेची कसोटी पाहण्याचें त्यानें मनांत आणिलें. तो ब्राह्मणाचें रूप धारण करून त्यांजपाशीं भिक्षा मागावयास आला. बोधलेबुवा व ममताबाई यांनीं आपल्यापाशीं होतें तें त्यास दिलें. तेव्हां त्यानें त्यांच्या-समोर अन्न शिजवून भोजन केलें व उरलेलें अन्न त्यांस दिलें. त्या पति-पत्नींस वाटलें कीं हा साक्षात् परमेश्वर आपल्या घरीं येऊन त्यानें आपली कसोटी पाहिली. या विचारानें त्यांस अत्यानंद झाला. बुवा शिवकालांत असावे. ( शिवाजी-निबंधावलि – लेखक : रेव्हरंड ॲबट ).

## ( ५ ) तुकारामबुवा

शिवकालीं महाराष्ट्रांत जे महान् साधु होऊन गेले त्यांपैकीं तुकाराम-बुवा हे एक होत. तुकाराम व रामदास एकाच वर्षी जन्मास आले. पण रामदासांना जितकें आयुष्य लाभलें तितकें तुकारामास लाभलें नाहीं असें दिसतें. रामदासांनीं शिवछत्रपतींची सबंध कारकीर्द पाहिली व छत्रपतीं-मागून ते सुमारें एका वर्षानें निवर्तले. जणूं काय शिवाजीच्या महत्त्वपूर्ण व बिकट कार्यास सहायभूत होण्याकरितांच त्यांचा जन्म होता. तुकाराम, रामदास यांच्या बरोबरीचे तिसरे साधु मोरया गोसावी. ते व तुकारामबुवा हे दोघे शिवाजीमहाराजांच्या अगदीं सन्निध राहणारे. मोरया गोसाव्यांचें वास्तव्य चिंचवडास व तुकारामबुवांचें देहूस. हीं दोन्ही गांवें पुण्यापासून दहा-पांच कोसांच्या अंतरावर. पण त्या दोघांशीं महाराजांचा दाट संबंध न येतां तो फक्त रामदासांशीं आला. यावरून त्या उभयतांची मनोभूमि कशी समान होती हें लक्षांत येतें. किंबहुना महाराजांनीं ते दोघे सन्निध असल्या-

मुळें त्यांच्या उपदेशाची अपेक्षा करावी हें स्वाभाविक होय. पण त्यापैकीं तुकोबांनीं शिवाजीनें तसा प्रयत्न केला असतां तुम्हांस उपदेश करण्यास रामदासच योग्य असें सांगून त्यांजकडेच बोट दाखविलें यांतील मर्म कोणाहि चाणाक्ष मनुष्याच्या लक्षांत येण्यासारखें आहे.

तुकारामबुवांचा जन्म शके १५३० मध्यें व देहावसान शके १५७१ मध्यें म्हणजे इ. स. १६४९ त झालें. याचा अर्थ असा कीं, शिवाजी १९ वर्षांचा होईपर्यंत बुवा हयात होते. हा काळ अल्प असला तरी शिवाजीच्या पराक्रमाची प्रभा सर्वत्र फाकत चाललेली बुवांनीं पाहिली होती. या काळांत शिवाजीचें आगमन बेंगळुराहून महाराष्ट्रांत होऊन त्यानें रोहिडेश्वरावर शेंकडों मावळे जमवून त्यांजपुढें स्वराज्याची घोषणा केली होती; तोरणा, राजगड व सिंहगड हे किल्ले घेतले होते व विजापुराहून चालून आलेल्या फत्तेखानाचा पराभवहि केला होता.

शिवाजी आपल्या वयाच्या बाराव्या वर्षीं महाराष्ट्रांत आला, तेव्हां तो अगदीं कोंवळ्या वयाचा होता. त्याचें वय तेव्हां निखालस संस्कारक्षम होतें. अशा वेळीं त्यास सत्समागम घडला असला तर तो तुकारामबुवांचा. मुलांना कीर्तनें ऐकण्याची आवड त्याच काळांत असते. बुवांच्या कीर्तनांची प्रसिद्धि सर्वत्र झाली असल्यामुळें त्यांचें कीर्तन ऐकण्यास लोकांच्या झुंडीच्या झुंडी लोटत. त्यांत बालशिवाजीहि असे. त्याच्या मनावर त्यांची मूर्ति व धगधगीत वैराग्य पाहून फार खोलवर परिणाम घडला असला पाहिजे. तेव्हांपासून पुढें सात वर्षेंपर्यंत जेव्हा संधि सांपडे तेव्हां त्यानें भक्तिभावानें त्यांचीं कीर्तनें श्रवण करण्यास जावें. पुणें हें भोंवतालच्या गांवांत सर्वांपेक्षां मोठें असल्यामुळें बुवांचीं बरींचशीं कीर्तनें पुण्यांतच होत. अशाच एका कीर्तनप्रसंगीं विजापूरच्या कोणा तरी मुसलमान सरदारानें पाळत ठेवून त्यांस पकडण्याचा प्रयत्न केला, पण तो बुवांच्या दैवी सामर्थ्यामुळें वा गफलतीनें फसला. त्यानंतर महाराजांनीं त्यांस आपल्या भेटीस येण्याविषयीं पुष्कळ आर्जवें करून पाहिलीं; पण बुवा पूर्णपणें विरक्त व निवृत्तिमार्गी; त्यांना जगांतील वैभवाचा व सुखोपभोगाचा पूर्ण कंटाळा; म्हणून त्यांनीं त्यांस अत्यंत निःस्पृहपणानें कळविलें :–

अरण्यवासी आम्ही फिरूं उदासीन। दर्शन तें हीन अमंगळ॥ वस्त्रा-वीण काया झालीसें मळीण। अन्नरहित जिणें फळाहारी॥ रोड हातपाय दिसे अवकळा। काय तो सोहळा दर्शनाचा॥

अशा व्यक्तीच्या नादीं लागण्यापेक्षां व अनेक साधूंचा उपदेश घेण्यापेक्षां एकाच आपणास योग्य अशा साधूकडे लक्ष लावणें हितप्रद हें सांगण्यासाठीं तुकोबा म्हणतात :– सद्‌गुरु श्रीरामदासाचें भूषण। तेथें घालीं मन चळूं नको॥

बुवा निवृत्तिमार्गी असल्यामुळें त्या मार्गाचा आविष्कार शिवाजीस पुढील शब्दांनीं करतात :–

पांडुरंग आम्हां पाळिता पोशीता। आणिकाची वार्ता काय तेथें॥ तुझी भेटी घेणें काय हो मागणें। आशेचेंहि शून्य केलें तेणें॥ निराशेचा गांव दिधला आम्हांसी। प्रवृत्ती भावासी सांडियेली॥ विश्व हें विठ्ठल नाही कांही दूजे। देखणें हें तुझें तुजमाजी॥

## बुवांची भूमिका

या अभंगांत बुवांनी आपली भूमिका स्पष्ट केली आहे. ते आपणांस निवृत्तिमार्गी व जगांतील घडामोडींविषयीं निराशावादी म्हणवितात. शिवाजीपूर्वी मी स्वराज्य मिळवून दाखवितों असें छातीवर हात ठेवून सांगणारा कोणी नरपुंगवच उभा राहिला नव्हता तेव्हां संतांनीं देवावर हवाला टाकून स्वस्थ राहावें यांत नवल नाही. पण शिवाजीसारखा वीर-पुरुष समोर दिसत असतांनाहि बुवांनीं त्याच्या कार्याची फिकीर बाळगूं नये, यांतच वारकरी पंथाच्या कार्यपद्धतीचें इंगित सांठविलें आहे. म्हणून राजवाडे या पंथास पंगु व सहिष्णु म्हणतात हें पुष्कळ अंशीं खरें ठरतें. याचा अर्थ तुकारामबुवांच्या अखेरीस युगांतर होण्याची व नवें स्वराज्य-युग अवतरणार असल्याची जाणीव बुवांना झाली नव्हती किंवा त्या स्वराज्याशीं त्यांना कांही कर्तव्य नव्हतें असेंच म्हणणें भाग पडतें. सारांश, तुकारामबुवा निवृत्तिमार्गांतले शेवटचे साधु व रामदास हे प्रवृत्तिमार्गांतले पहिले साधु होत.

रामदासांचें दर्शन व उपदेश घेण्याची आज्ञा तुकारामबुवांनीं केल्यावर शिवाजीमहाराज अविलंबेंकरून रामदासांच्या दर्शनास गेले असतील हें

सांगावयास नकोच. बुवा इ. स. १६४९ त समाधिस्थ झाले, त्याअर्थी रामदास व शिवाजी यांची भेट इ. स. १६४९ त झाली या प्रचलित समजुतीस पुष्टिच मिळते. बुवांना दासांची कीर्ति दुरून ऐकून माहीत होती असें नव्हे तर त्या उभयतांची गांठ कृष्णातीरीं पडली होती हें बुवांच्या खालील अभंगांत स्पष्टपणें दिसतें :–

हुर्मूजी रंगाचा उंच मोतीदाणा। रामदासी बाणा या रंगाचा ॥ पीतवर्ण कांति, तेज अघटित। आळूं शोभत भ्रुकुटीमाजीं ॥ कौपिन परिधान मेखला खांद्यावरी। तुंबा कुबडी करीं समर्थांच्या ॥ रामनाम मुद्रा द्वादश हे टिळे। पुच्छ वळवळे कटीमाजीं ॥ काष्टाच्या पादूका स्वामींच्या पायांत। स्मरणी हातांत तुळशीची ॥ कृष्णातटाकासी जाहलें दर्शन। वंदिले चरण तुका म्हणे ॥

वरील अभंगांत समर्थांचें हुबेहूब वर्णन आहे व तें त्यांच्या सर्वांस माहीत असलेल्या वर्णनास धरून आहे. त्यांत ' पुच्छ वळवळे ' असें म्हटलें आहे तें त्यांच्या लंगोटीस अनुलक्षून दिसतें.

शिवकालीन सतरावें शतक हें महाराष्ट्रांतील अध्यात्मयुगाचें शेवटचें शतक होय. महाराष्ट्रीय लोक परकीयांच्या अमलाखालीं आर्त झाले होते. संसारांतील अनंत दुःखांनीं पोळलेल्या तुकोबाकडे महाराष्ट्रीय आर्तांचें साहजिकच पुढारीपण आलें होतें. मनानें ते परमेश्वरास सर्वस्वी शरण गेल्यामुळें संकटकालीं त्यांचें रक्षण लोक ज्यास चमत्कार म्हणतात, ते दाखवूनहि करणें त्यास भाग होतें. म्हणूनच त्यानें इंद्रायणीच्या डोहांत तुकोबांनीं तेरा दिवस बुडविलेल्या अभंगांच्या वह्या कोरड्या काढून त्यांचे प्राण वांचविले. हा व तुकोबांचे इतर चमत्कार पाहिले व ऐकले याची साक्ष तुकोबांची समकालीन शिष्या बहिणाबाई आपल्या अभंगांत देत आहे व स्वतः तुकोबांनींहि ती गोष्ट स्वमुखानें कबूल केली आहे. हे चमत्कार शिवाजीनें अगदीं बाल्यावस्थेंत ऐकले असल्यामुळें त्याची भक्ति तुकोबावर बसली. तुकोबा पांडुरंगाचें परमभक्त. त्या पांडुरंगावर तुकोबांच्या उक्तीनें व कृतीनें सर्व महाराष्ट्रीय बहुजनसमाजाची भक्ति जडून त्यांनीं कोणत्याहि लोभास बळी न पडतां भयावह अशा परधर्मीपासून दूर राहण्याचा निश्चय केला असल्यास त्यांत आश्चर्य तें कसलें ? शिवरायांना स्वधर्मरक्षणाकरितां

स्वराज्य स्थापण्याची प्रेरणा व्हावी यास तुकोबाची परमेश्वरावरील अनन्य-भक्ति बऱ्याच अंशीं कारण झाली असावी.

## ( ६ ) महंत केवळ भारती

मौजे केंजळ, संमत हवेली, परगणे वाई येथें तपोनिधि केवळ भारती गोसावी महंत हे राहत असत. त्यांस शिवछत्रपतींनीं जमीन इनाम दिली त्यासंबंधीं :–

" जे वख्ती थोरले कैलासवासी ( शिवछत्रपति ) यांनीं वाईचा कोट कबज करायास वेढा घालून बैसले, ते वेळेस महंत यांचे दर्शनास जाऊन त्यांची भेट घेऊन प्रसाद दिल्हे. बोलिले जें ' कोट वाईचा आपण तुम्हांस दिल्हा. तुम्ही कार्य सिद्धी जाहलीयाउपरी आपणांस एक स्थळ अनुष्टानास एकान्त करून देणें. ' त्यास महाराज बोलले कीं, ' कोट हस्तगत जाहलीयाउपरीं जें स्थळ मागाल तें देऊं ! ' ते प्रसंगीं कोट हस्तगत जाहलीयाउपरी गोसावी यांनीं स्थळ मागितलें. डोंगर धामणा संमत हवेली, त्याचे माथा जमीन वैराण कोकस्थान आहे. तेथें मठ बांधण्यास एकान्त स्थळ आहे. त्यांपैकीं एक चावर जमीन मठाभोंवतीं इनाम करून मागितली. सनद होण्याची तों महाराज उत्तीर्ण उठोन गेले ( दिवंगत झाले ) " ( सनदां-पत्रांतील माहिती, पृ. १६० ).

## ( ७ ) महापुरुष देवभारती

मोगलाईंत औंढ्या नागनाथाच्या पट्ट्यांत शिवछत्रपति छावणी करून राहिले होते. त्या वेळीं मौजे मुदलगांव येथील महापुरुष देवभारती यांस तो गांव इनाम दिला त्याची सनद :–

" मौजे मुदलगांव येथें तपोनिधि महापुरुष देवभारती गोसावी रहात होते. ते महादेवाच्या मंदिरांत राहात असत, अखंड अनुष्टान करीत. ऐसे तपस्वी होते. त्यांच्या दर्शनास शिवछत्रपतिहि गेले. ते सालेर व मुल्हेरचे मोहिमेस जात होते. त्यांस भगवानांनीं आशीर्वचन दिधलें कीं ' जा. नववे दिवशीं सालेर व मुल्हेर हे किल्ले फत्ते होतील. ' त्यास श्रीमहाराज शिवछत्रपति बोलले कीं, ' किल्ले फत्ते जाले तर हा गांव आम्ही तुम्हांस मोकासा देऊं. ' तेव्हां तेथून जातांच नववें दिवशीं किल्ले घेतले. तेव्हां मेहरबान होऊन गांव

भगवानास मोकासा दिधला. सनद करून दिधली कीं यास कोणी मुजाहीम न होणे. त्यानंतर मोगलाई फौजा येऊन देवालयास अग्नि लागला. सनदा आंत होत्या त्या जळून गेल्या " ( सनदा-पत्रांतील माहिती, पृ. १४७ ).

## (८) मौनीबुवा

मौनीबुवा हे मराठा जातीचे संत असावे. त्यांचें स्थळ पाटगांव सह्याद्रीच्या घाटांतील निबिड अरण्यांत आहे. तेथून: अवघ्या दोन कोसांवर रांगणा हा इतिहासप्रसिद्ध किल्ला आहे. कोल्हापूर जिल्ह्यांत व कोल्हापूरच्या दक्षिणेस चाळीस मैलांवर पाटगांव आहे. साधु समजला कीं त्याला भेटावें व त्याचा आशीर्वाद घ्यावा असा शिवछत्रपतींचा परिपाठ होता. कर्नाटकाच्या स्वारीवर जाण्यापूर्वी महाराज पाटगांवीं मौनीबुवास भेटावयास गेले होते. पाटगांवीं मौनीबुवांची भेट घेऊन महाराज गेले तेव्हां त्यांजबरोबर मोरोपंत पिंगळे होते. त्यांजपाशी महाराजांनीं चाफ्याच्या फुलांचा तुरा व हार दिला व पंचपात्री दिली आणि हुजऱ्यांच्या हातीं नारळ व फुलांचे जिन्नस दिले. महाराजांची इच्छा कीं आपण तंजावराकडे जात आहों, तेव्हां बुवांनी आपणांस प्रसाद द्यावा. त्या हेतूनें महाराज सात तास उभे होते. उपरांतिक त्यांनीं पूजा केली व आपल्या हातांत साखरेचा प्याला घेऊन बावांच्या तोंडांत साखर घातली. बावांनीं तोंडांतले उच्छिष्ट महाराजांच्या हातीं दिलें व मोरोपंतांकडे पाहिलें. त्यांनीं फुलांचा तुरा पुढें केला. तो घेऊन बावांनीं महाराजांचे डोईवर ठेवला. हा लाभ मानून महाराज नमस्कार करून दक्षिणदिग्विजयास निघाले. ते पुढे मोठें यश संपादून इ. स. १६७८ त रायगडास परत आले ( गो. स. सरदेसाई – पुरुषार्थाचा शिवाजी अंक, पृ. ५१ ).

सिंधुदुर्ग किल्ल्यांतील मंदिरांत शिवाजीमहाराजांची प्रतिमा असून गाभाऱ्याबाहेर मौनी बावांची मूर्ति बसविली आहे. पाटगांवास मौनी बावांची भव्य समाधि आहे. तेथें दरसाल रथसप्तमीपासून दहा दिवस बावांच्या पुण्यतिथीचा समारंभ होत असतो. श्रावण शुद्ध ८ स बावा समाधीस बसत असत. ते बहुधा एक महिना समाधि लावून बसत असावे.

मौनीबावा मौन धारण करून असत म्हणून त्यांचें नांव मौनीबुवा पडलें. त्यांच्या एका शिष्याचें नांव तुरुतगिरी. त्यावरून बावा नाथपंथी वा

गोसावीपंथी दिसतात. महाराज कर्नाटकांतील स्वारींत यशस्वी होऊन आल्यावर त्यांस तुरुतगिरी जाऊन भेटला व त्यानें मठांत येणाऱ्या अतिथि-अभ्यागतांसाठीं महाराजांपाशीं इनाम मागितलें. तसेंच बुवांच्या मठांत हरिदास, पुराणिक इत्यादि सेवेकरितां असत, त्याकरितांहि त्यांस मदत पाहिजे होती. त्याबाबत महाराजांनीं प्रस्तुत मठ कुडाळ प्रांतांत असल्यामुळें त्यावरील देशाधिकाऱ्यास आज्ञा केली.

शके १५९९ वैशाख वद्य ७
इ. स. १६७७ मे ३

खुर्दखत

श्रीराजा शिवछत्रपति – गणोराम देशाधिकारी तर्फ कुडाळ यांस – 'मौनीबावा पाटगांव यांच्याकडे येणाऱ्या आतीत-आभ्यागताबद्दल प्रतिवर्षी येक हजार माणसांची सामग्री देविली आहे. दर माणसास येकदा अन्न पावावें म्हणून तांदूळ वजन सडीक ८८१॥, कणीक वजन ८८१॥, दाळी वजन ८८॥·, तूप वजन ८८।·, मीठ वजन ८८८९ येकूण पावणेचार शेर नवटाक रास याप्रमाणें हजार माणसांची बेरीज होईल ते साल तिसा सबैनपासून तुरुतगिरीपाशीं वर्षांमध्यें एकदां एकठोक देणें' (प. सा. सं. खंड ३, पृ. १२५).

खुर्दखत

श्रीराजा शिवछत्रपति – गणोराम देशाधिकारी व देशलेखक प्रांत कुडाळ यांसी "मौनी गोसावी यांचे सेवेंतील हरदास १, पुराणिक १ व मृदंगी १ यांस प्रत्येकी ६ होनप्रमाणे एकूण १८ होन देत जाणें. धर्मार्थ म्हणून खर्च लिहिणें म्हणून सनद दिली" (प. सा. सं. खंड ३, पृ. १४३). मौनीबुवा इ. स. १६८६ पूर्वी मृत्यु पावले. त्यांजवर संभाजीमहाराजांचीहि शिवाजीप्रमाणें भक्ति असून तेहि त्यांचा परामर्श चांगला घेत असत. संभाजीनंतर राजारामानें सातशें होन उत्पन्नाचे दोन गांव मठास इनाम दिले.

## (९) शेखमहंमदबावा

कीर्तन, भजन व पुराण या त्रिविध साधनांनीं तत्कालीन संत-सज्जनांनीं जें धर्मकार्य चालविलें होतें त्याचा सुपरिणाम मुसलमानांवरहि झाला, मग हिंदूंतील अठरापगड जातींवरहि झाला असल्यास नवल काय?

मुसलमानहि या काळांत धर्मप्रसार करीत होते; पण त्यांचा प्रचार युक्तिवादापेक्षां जबरदस्तीवर व आमिषावर अवलंबून असे. ही रीत पारमार्थिक ज्ञान देणारी व चर्चात्मक नसल्यामुळें ती लोकप्रिय होणें शक्य नव्हतें. उलटपक्षीं राजसत्ता प्रतिकूल असतांहि हिंदुधर्म टिकला याचें कारण तो लोकप्रिय झाला होता व समाधान देणारा होता. शेखमहंमद मुसलमान असतां मनानें हिंदु बनला होता तो या योगानेंच. तो जेथें वरील त्रिविध कार्य चालू असेल तेथें जात असला पाहिजे व धर्मतत्त्व समजून घेण्याइतका बुद्धिमान् व शिक्षित असला पाहिजे.

अहमदनगर जिल्ह्यांत श्रीगोंदें या तालुक्यांत रुईवाहिरें या नांवाचें एक लहानसें खेडें आहे. तेथें शेखमहंमदबावा राहात असत. त्यांच्या घराण्याकडे मुलाणीवृत्ति होती. तीस अनुसरून महंमदबावा सोळा वर्षांचे असतां बापाच्या आज्ञेवरून बकरें कापण्यास गेले. त्यांना बकरें कापण्याचा हा पहिलाच प्रसंग होता. ते हातांत सुरी घेऊन बकऱ्याजवळ गेले पण त्या गरीब प्राण्याचें ओरडणें ऐकून त्यांचें अन्तःकरण द्रवलें. कापण्याचें दुःख कसें होतें हें पाहण्याकरितां त्यांनीं स्वतःचें बोट थोडेसें कापून पाहिलें. त्याबरोबर त्यांना अतिशय वेदना झाल्या. त्यावरून बकऱ्यास होणाऱ्या दुःखाची कल्पना येऊन त्यांनीं सुरा फेकून दिला व हिंसाकर्म न करण्याची शपथ घेतली. ते अभंगांत लिहितात –

पडताळुनी सुऱ्या । पशु विदारिती ॥
रडे बोंबा मारिती । कापिता बोट ॥ १ ॥
मेल्या रांडा पोरें । रडतीं परोपरी ॥
नेणती अविचारी । परावें दुःख ॥ २ ॥
अहिंसा विज्ञान । दुःखीं सुख कळलें ॥
आत्मज्ञान कळलें । शेखमहंमदा ॥ ३ ॥

त्यांजविषयीं एक कथा प्रचलित आहे. औरंगजेब दक्षिणेंत आल्यावर या प्रांतांतून जात असतां त्याच्या लोकांनीं इतरांबरोबर महंमदबावांनाहि जबरीनें धरून त्यांच्या डोक्यावर बिगार दिली. ती त्यांच्या डोक्यावर न राहतां सव्वा हात अधांतरींच राहिली. तेव्हां हा कोणी तरी अवलिया

असल्याविषयीं अधिकाऱ्यांची खात्री होऊन त्यांनीं त्यांस सोडून दिलें. तेव्हांपासून बावांची विशेष प्रसिद्धि झाली.

महंमदबावा श्रीगोंदे येथें मठ करून राहिले. त्यांच्या गुरूचें नांव बोधले किंवा चंद्रबोधले होते. बावांचा तुकारामबुवा व जयरामस्वामी वडगांवकर यांजबरोबर विशेष स्नेह होता. महंमदाचें घराणें मूळ ब्राह्मण जातीचें असून तें पुढें बाटविलें गेलें असें त्यांच्या खालील अभंगावरून वाटतें –

एकांताचें ठायीं नवलाव केलें।
जानवें दाविलें चिरूनी खांदा ॥ १ ॥
मुळींचे ब्राह्मण आलो याचि ठाया।
दावियलें तया यज्ञोपवित ॥ २ ॥
सदाशिवलिंग अक्षय मस्तकीं ॥
देखिलें कवतुक जयरामांनीं ॥ ३ ॥

महंमदबावांच्या ग्रंथांवरून त्यांजवर हिंदुत्वाचे संस्कार विशेष झाले असून त्यांना मराठी भाषा चांगलीच अवगत होती. किंबहुना त्यांच्या घरची भाषा उर्दूपेक्षां मराठीच असली पाहिजे. त्याशिवाय त्यांना 'योगसंग्राम', 'निष्कलंकप्रबोध' व 'पवनविजय' असे तीन ओवीबद्ध व अभंगात्मक ग्रंथ मराठींत लिहितां आले नसते. त्यांना भगवद्गीता चांगली परिचित होती व भागवतादि ग्रंथहि त्यांनीं श्रवण केले होते. अर्थात् त्यांचें उठणें-बसणें व बोलणें-चालणें हिंदूंत व हिंदु संत-सज्जनांत नेहमीं होत असलें पाहिजे. ते आपल्याविषयीं लिहितात –

मी जातीचा मळिणवंश। संस्कार नेणें मऱ्हाटीस। नाहीं पाहिलें शास्त्रपुराण। बोलो नाहीं शिकलों साळसूदवचन ॥

हा त्यांचा केवळ विनय दिसतो. ते पंढरपुराची वारीहि करीत.

धन्य पंढरपूर। पुण्याचें नगर। नांदे सौदागर पांडुरंग ॥ ध्रु. ॥ चित्त करूनि वोरासोरा। शीघ्र चला पंढरपुरा। पाहो रखुमाईच्या वरा ॥

फाल्गुन शुद्ध ९ हा महंमदबावाच्या पुण्यतिथीचा दिवस आहे. त्या दिवशीं त्यांच्या कबरीच्या एका अंगास मुसलमान व दुसऱ्या अंगास ब्राह्मण व इतर हिंदु उभे राहून कबरीला अबीर चढवीत असतात. यावरून

महंमदबावा हिंदु व मुसलमान या दोन्ही जमातींस सारखेच पूज्य वाटत होतें हें स्पष्ट आहे. त्यांचा हिंदुधर्माकडील कल कडव्या मुसलमानांना कितपत पसंत असेल हा प्रश्न आहे; परंतु श्रीगोंद्याचे मुसलमान तितके कडवे नसून हिंदूंत मिळूनमिसळून वागत असले पाहिजेत.

## (१०) बावा याकुत

रत्नागिरी जिल्ह्यांत बाणकोटच्या खाडीपाशीं केळशी नांवाचें गांव समुद्रतीरीं आहे. तेथें बाबा याकुत हा मुसलमान अवलिया राहत होता. केळशीपासून जंजिरा संस्थान जवळ होतें. तें बुडविण्याचा बेत शिवाजीचा होता. त्यासाठीं दंडाराजपुरी ही सिद्दीची राजधानी जिंकण्याचा शिवाजीनें निर्धार केला. पण दंडाराजपुरी जिंकण्यास फार कठीण. ती घेण्याची शिवाजी शिकस्त करीत असतां त्याला याकुतबावाचा आशीर्वाद घेणें इष्ट वाटलें. म्हणून तो त्याच्या दर्शनास गेला. तेव्हां याकुतबावा शिवाजीस पाहून चालता झाला. शिवाजी त्याच्या मागोमाग जाऊं लागला म्हणून बावा परत येऊन आपल्या जागीं बसला. त्याच्या दाढी-मिशा पिकल्या होत्या. त्यानें मिशीचा एक पांढरा केस उपटून शिवाजीच्या हातावर प्रसाद म्हणून ठेवला. शिवाजीनें तो केस बरोबरच्या एका अधिकाऱ्यापाशीं ठेवावयास दिला. पण तो पुढें नाहींसा झाला. त्यावरून राजपुरी आपणांस साध्य नाहीं असा शिवाजीनें कयास काढला व तोच खरा ठरला.

## प्रकरण सत्ताविसावें

# समर्थांची संघटना

श्रीसमर्थ रामदासस्वामी हे या काळांतील फार मोठे संघटनाकार. त्यांनीं इ. स. १६४४ त कृष्णातीरीं राहावयास आल्यावर आपल्या रामदासी पंथाची स्थापना केली. स्वधर्मरक्षण हें या पंथाचें प्रधानकार्य होतें. त्यापूर्वी तीनशें वर्षेपर्यंत वारकरी पंथ ( भागवतधर्म ) धर्मरक्षणाचें कार्य महाराष्ट्रांत करीत आला होता. तो बहुजनसमाजाकरितां असून त्याचें आराध्यदैवत पंढरपुरचा पांडुरंग होता. त्याची स्थापना कोणाहि एका व्यक्तीनें न करतां ती स्वाभाविक रीत्या होत गेली. त्या पंथाचा उगम ज्ञानेश्वरापासून व त्यांच्या भावार्थदीपिका या ग्रंथापासून झाला. त्यानंतर नामदेव, एकनाथ, तुकाराम आदिकरून साधुवृंदांच्या अभंगांची, ग्रंथांची व तपश्चर्येची भर पडून त्यास तुकारामबुवांच्या काळीं सुसंघटित स्वरूप प्राप्त झालें होतें. तुकारामबुवांचा काळ हा स्वराज्याचा उदयकाळ होय. भागवत धर्मांत ज्ञानेश्वर, एकनाथ, नामदेव व तुकाराम हे चार अग्रगण्य मानले जातात. किंबहुना ज्ञानेश्वरांच्या भावार्थदीपिकेनें भागवतधर्माचा पायाच घालून दिला. ह्यापूर्वी गीतेंतील तत्त्वज्ञान संस्कृत भाषानभिज्ञांस अज्ञात होतें. त्या तत्त्वज्ञानांत तर हिंदुधर्माचें सारच ओतलें आहे. अशा जगन्मान्य ग्रंथाचें विवरण ज्ञानेश्वरांनीं अतिशय विस्तृत व कोणाहि अज्ञ माणसास समजेल

अशा रीतीनें केलें आहे. आणि व्यवहारांतील अनेक सोपे दृष्टान्त देऊन विषय इतका खुलविला आहे कीं, तो श्रोत्यांच्या मनांत सहज उतरावा व त्याचें विवेचन चालू झाल्यावर त्यानें डुलूं लागावें. ज्ञानेश्वरांच्या या अलौकिक गुणामुळेंच महाराष्ट्रांतील अठरापगड जातींत वैदिक तत्त्वज्ञानाचें बीज पेरलें जाऊन त्याला मुसलमानी अमदानीच्या तीनशें वर्षांच्या काळांत विलक्षण पीक आलें. त्या तत्त्वज्ञानाचा फैलाव ज्ञानेश्वरानंतरच्या काळांत एकनाथ, नामदेव, तुकाराम इत्यादि अग्रगण्य संतांनीं आपल्या ग्रंथरचनेनें व कीर्तन-भजनानें महाराष्ट्रभर शेंकडों वर्षें केल्यामुळें महाराष्ट्रियांत एकप्रकारचा जिवटपणा व चिवटपणा येऊन तो समाज इस्लामी धर्मास धैर्यानें तोंड देण्यास समर्थ झाला आणि या तत्त्वज्ञानाच्या अठरापगड जातींतील प्रसारानें हिंदुधर्मास प्रातिनिधिक स्वरूप प्राप्त झालें.

## वारकरी पंथाचें कार्य

वारकरीपंथाच्या चळवळीनें बहुजन समाजांत धर्माभिमान बाणण्यास फार मोठी मदत झाली यांत शंका नाही. त्या पंथाच्या धुरीणांत कांही ब्राह्मण साधु होते व त्याचा स्वीकार कित्येक ब्राह्मणांनींहि केला होता. परंतु ब्राह्मणांचें अपेक्षित कार्य याहून निराळें होतें. तें लक्षांत घेऊन वारकरी पंथाच्या भक्तिमार्गाबरोबरच, दत्तोपासना व गणेशोपासना, गाणगापूरचे नृसिंहसरस्वती व चिंचवडचे मोरया गोसावी प्रभृतींनीं ब्राह्मण जातींत प्रसृत केली होती. संध्यावंदन हें सर्वसामान्य ब्राह्मणांचें नियतकर्म होय. त्याशिवाय वेद व शास्त्रें यांचें अध्ययन, अध्यापन व पठन करणें हा त्यांचा धर्म होय. त्यावर वारकरी पंथांत सहाजिकच कटाक्ष नसल्यामुळे कांही ब्राह्मण दत्तोपासक व कांहीं गणेशोपासक बनून त्यांचे संप्रदायच झाले होते. पण त्यांचा प्रसार ब्राह्मण जातींत जितका व्हावयास पाहिजे तितका न झाल्यामुळें त्यांजमध्ये एकंदरीनें मालिन्य, आचारभ्रष्टता व अज्ञान मातलें होतें. तसेंच प्राप्त परिस्थितींत धर्मदृष्टीशिवाय राजकीय व व्यावहारिक दृष्टीनेंहि आपण कसें वागावयास पाहिजे व काय केलें पाहिजे हें त्यांस कोणी समजून सांगितलें नव्हतें. थोडे भिक्षुक, शास्त्री व पंडित सोडल्यास बाकीच्या ब्राह्मणांना लिहिणें-वाचणें व हिशेबठिशेब यापलीकडे शिक्षण मिळत नव्हतें; इतकेंच नव्हे तर कैक ब्राह्मण अक्षरशत्रूहि असत. वातावरण धार्मिक होतें. मुसलमान राज्यकर्ते व पोर्तुगीज यांस

जुलमाची लहर लागे, तो जुलूमहि धार्मिक स्वरूपाचा होता. लोकजीवन हल्लींच्या मानानें फार रूक्ष होतें. सकाळीं मिजासीनें प्यावयास चहा नव्हता व त्या वेळीं चाळावयास वर्तमानपत्रहि नव्हतें. करमणुकीस कादंबऱ्या नव्हत्या व मनोरंजनास नाटकें व चित्रपटहि नव्हते. जाती होत्या, पण जातिद्वेष नव्हता. प्रत्येकाला आपल्या जातीचा व धर्माचा अभिमान होता. चोखा मेळ्यासारखा महारसुद्धां आपल्या जातीस इतर जाती हीन मानतात म्हणून हिंदुधर्म सोडून इस्लामी धर्म स्वीकारण्यास कबूल नव्हता. प्रत्येक जात शास्त्रानें व रूढीनें दाखविलेल्या धंद्यास चिकटून असल्यामुळें जाति-जातींत स्पर्धा नसून सहकार्य होतें व ज्याला त्याला त्याच्या व्यवसायांत संरक्षण मिळालें होतें. या कारणानें उच्चनीच भावनेस गैरवाजवी महत्त्व प्राप्त न होतां जातींचा मूळ हेतु जो श्रमविभाग व सहकार्य त्या पद्धतीनें सर्व व्यवहार सुरळीत व समाधानानें चालू होता. गरजा थोड्या होत्या व आयुष्यक्रम अगदीं संथ होता. वाचावयास पोथीपुस्तकाशिवाय इतर कांही नसून त्यांत परमार्थ, देवादिकांच्या कथा यांचें निरूपण असे. एक प्रपंच करावा व बाकीचा वेळ परमार्थांत घालवावा. ज्यांना प्रपंचांत गोडी वाटत नव्हती ते परमार्थास लागत. त्याकरितां ते ब्रह्मचारी राहत, संन्यास घेत, विवाहित असले तरी बायकोमुलांचा त्याग करून यात्रेस, क्षेत्रास, वा गुरूचा शोध काढीत कोठें तरी निघून जात. गंगेच्या कावडी काशीहून रामेश्वरास नेऊन घालीत व रामेश्वराचा सेतु गंगेंत आणून सोडीत. कोणी माधुकरी मागून देवाची सेवा करीत तर कोणी कोरान्नावर उपजीविका चालवीत. संसारास त्रासून आत्महत्येस कोणी प्रवृत्त न होतां चित्तास शांति मिळण्या-करितां उपासनेस लागत होता. पण त्यास कोणी नेता असा लाभला नव्हता तो रामदासांच्या रूपानें त्यांस मिळाला.

समाजाच्या या मनःस्थितींत देशकाळवर्तमानाच्या दृष्टीने कांहीं कमी पडत आहे असें रामदासस्वामींच्या लक्षांत येऊन त्यांनीं कृष्णातीरीं आल्यावर आपल्या संघटनेस सुरुवात केली. ब्राह्मण तरुणांना त्यांनीं हाताशीं धरलें व त्यांची शिष्यशाखा स्थापून तिच्याद्वारा ब्राह्मणांना स्वकर्तव्याची ओळख करून देणें व बहुजन समाजास धर्मोपदेश व नीत्युपदेश करणें हें उद्दिष्ट समर्थांनी आपल्या डोळ्यांपुढें ठेवलें. आतांपर्यंत

महाराष्ट्रांत ज्या उपासना चालू होत्या त्यांहून निराळीच उपासना त्यांनीं लोकांच्या पुढें ठेवली. त्यांनीं सांसारिकांपुढें मुख्यतः असुरारि धनुर्धर राम व ब्रह्मचाऱ्यांपुढें हनुमंत याची प्रतिमा ठेवली. समर्थांपूर्वी महाराष्ट्रांत महानुभावांशिवाय कोणी संघटित अशी शिष्यशाखा निर्माण केली नव्हती. त्यांनीं शिष्य आपणांस हव्या त्या गुणांचे वेंचून काढले व त्यांस स्वतःची शिकवण देऊन त्यांजकरितां नवीन उभारलेल्या मठांवर त्यांची स्थापना केली. या शिष्यांत धाडसी तरुण, शास्त्री, पंडित, ग्रंथकार, अविवाहित व विवाहित अशा प्रकारचे लोक होते. पुरुष होते, तशा स्त्रियाहि होत्या. मात्र स्त्रिया अगदींच थोड्या म्हणजे हाताच्या बोटांवर मोजण्याइतक्या होत्या. ब्राह्मण होते, तसे मराठेहि होते. मात्र मराठेहि अल्प प्रमाणांत होते. यावरून ब्राह्मणेतरांना या पंथांत बंदी नव्हती हें स्पष्ट आहे. मराठे कमी आले याचें कारण एक तर त्यांस आकर्षण्यास वारकरी संप्रदाय होता व दुसरें असें कीं समर्थ संप्रदायांतील कडक शिस्त पाहून त्यांत येऊं इच्छिणारे ब्राह्मणेतर क्वचित् आढळत असले पाहिजेत.

## समर्थांचे मठ

समर्थांनीं एकंदर अकराशें मठ स्थापन केले असें म्हणतात. पण ही अतिशयोक्ति म्हणून सोडून दिल्यास त्यांचे ६०।७० मठ निश्चित होते असें वाटतें. हे मठ महाराष्ट्र, कर्नाटक, तेलंगण, गुजराथ, उत्तर हिंदुस्थान, माळवा, मल्याळ, तामिळ या सर्व प्रांतांत विखुरले होते. यावरून समर्थांची संघटनाशक्ति किती जबरदस्त होती हें कळून येतें. शिवाजीचे जसे किल्ले तसे समर्थांचें मठ होत. आणि शिवाजीचे जसे किल्ल्यावरील हवालदार तसे समर्थांचे मठांतील महंत होत. समर्थांचें मुख्य बळ त्यांच्या मठांत व महंतांत होतें. परप्रांतांतील मठांचीं मुख्य ठिकाणें तंजावर, इंदूर, बोधन, प्रयाग, अयोध्या, मथुरा, काशी, द्वारका, बद्रिकेदार, सोरटीसोमनाथ, श्रीशैल, ओंकारेश्वर, अवंतिका, अनंतशयन हीं सांगण्यांत येतात. त्यांवरील महंतांचीं नांवेंहि नमूद आहेत. तीं लक्षांत घेतल्यास हा मठप्रसार म्हणजे एक नवलकथा असें मानण्याचें कारण नाहीं. याचा अर्थ असा कीं समर्थसंप्रदायानें हिंदुस्थानाचा फार मोठा प्रदेश व्यापला होता. इतर प्रांतांपेक्षां महाराष्ट्रांत

मठसंख्या अधिक होती, व महाराष्ट्रामध्येंहि सातारा प्रांतांत त्यांचें प्रमाण सर्वांत अधिक होतें.

समर्थांचे मठावर नेमलेले प्रसिद्ध महंत म्हटले म्हणजे, उद्धवस्वामी, भीमस्वामी, कल्याणस्वामी, दिनकरस्वामी, वासुदेवस्वामी, मुसळराम, अण्णाप्पा इत्यादि होत. त्यांचे मराठे महंत शिरवळचे बाजी व पारगांवचे शंकराजी गोसावी हे होत. स्त्रियांपैकीं मिरजेच्या मठांत वेणाबाई व वाळव्याच्या मठांत अंबिकाबाई या होत्या. सांप्रदाय म्हटला कीं त्याचा वेष विशिष्ट प्रकारचा असावयास पाहिजे. तो बहुधा संप्रदायाचा जो प्रवर्तक त्याच्या वेषाप्रमाणें साहजिक असावयाचा. रामदासी संप्रदायाचे मुख्य प्रवर्तक रामदास यांचीं वस्त्रें हुरमुजी असत, खांद्यावर मेखला, कंबरेस कौपीन, हातांत तुंबा, तुळशीची माळ व कुबडी आणि पायांत काष्ठाच्या खडावा. त्यांचा वर्ण पीत, अंगकांति व तेज अघटित व दोन भुवयांमध्यें आवाळूं असे. छत्रपतींनीं समर्थांची जेव्हां उत्तम बडदास्त लावून दिली तेव्हां ते कपाळावर केशराचा टिळा व कस्तूरीची अक्षता लावूं लागले; अंगाला केशरमिश्रित चंदनाची उटी चर्चूं लागले व गळ्यांत चंपक माळा घालूं लागले. ( श्रीसमर्थावतार, पृ. ४३२।४३३ ). ते डोक्यास दिव्य चिरा बांधीत. पण प्रथमपासून त्यांच्या डोक्याला रुमालवजा वस्त्र, किंवा उघडें डोकें, अंगावर मेखला वा अंग उघडें, खालीं लंगोटी, बगलेंत कुबडी, हातांत तुळशीची माळ, पायांत खडावा किंवा प्रवासांत वहाणा असा त्यांचा वेष असावा.

समर्थांचीं निवासस्थानें मुख्यतः दोन. एक चाफळ व दुसरें सज्जनगड. महाराष्ट्रांत आल्यावर त्यांनीं आयुष्याचा पूर्वार्ध चाफळास व उत्तरार्ध सज्जनगडावर म्हणजे परळीवर काढला. अंगापूरच्या डोहांत रामाची मूर्ति व आंग्लाई देवीची मूर्ति त्यांस सांपडली. त्यांपैकीं रामाची स्थापना त्यांनीं चाफळास असतां तेथें केली व देवीची स्थापना सज्जनगडावर असतां त्या ठिकाणीं केली. त्याच गडावर त्यांनीं आपला देह ठेवला. त्यांच्या समाधीवर रामाचें देऊळ असून खालीं भुयारांत त्यांची समाधि आहे. समाधीच्या मागच्या कोनाड्यांत पितळी पेटींत पादुका आहेत. त्या समर्थ नेहमी वापरीत. तेथेंच चंदनाची एक कुबडी व काठी आहे. दुसरी एक कुबडी असून तिच्या आंत गुप्ती आहे. वरील देवळांत राम, लक्ष्मण, सीता, मारुति यांच्या मूर्ति

आहेत. त्या तंजावराहून शके १६०३ माघ व॥ ५ स आणल्यावर ज्या दगडी ओट्यावर ठेवल्या होत्या तो ओटा, श्रीसमर्थांचा पाणी पिण्याचा तुंबा, पिकदाणी, शिवरायांनीं दिलेला पितळेचा पलंग व समर्थांची त्यांच्या हयातींत एका शिष्यानें काढलेली तसबीर इतक्या वस्तु तेथील शेजघरांत आहेत. पलंगाच्या लांबीवरून समर्थ उंच नसून ठेंगणे असावे असें वाटतें.

वरील वर्णनावरून समर्थांच्या उतारवयांतील राहणीची कल्पना येते. तें वर्णन अर्थातच त्यांच्या शिष्यास लागू नाहीं. समर्थशिष्यांची दीक्षेचीं वस्त्रें पांच असत – ( १ ) मेखळा, ( २ ) शिरोवस्त्र, ( ३ ) झोळी, ( ४ ) कमरेस बांधावयाचें रामनामांकित वस्त्र, ( ५ ) भगवें निशाण. हल्लीं रामदासी दिसतात त्यांच्या डोक्याला लहानसा हुरमुजी रुमाल, अंगावर त्याच रंगाचें उपरणें, कंबरेस धोतर, खांद्यावर झोळी, हातांत कुबडी व पायांत जोडा किंवा वहाणा असतात.

## वासुदेव गोसावी

समर्थांच्या प्रमुख शिष्यांपैकीं वासुदेव गोसावी हे एक होत. त्यांचा मठ भोर संस्थानांत कण्हेरी नामक खेड्यांत आहे. तो आधुनिक कालांत कसा आहे याचें शब्दचित्र कै. वासुदेवराव मुंडले यांनीं ‘ राजवाडे-चरित्रांत ’ काढलें आहे. त्यांनीं कै. विश्वनाथ काशीनाथ राजवाडे यांजबरोबर इ. स. १९०३ सालाच्या सुमारास कण्हेरीच्या मठास भेट दिली होती. तिची हकीकत वाचली असतां समर्थकालीं मठांत कोणते कार्यक्रम चालत व सद्यःकालीं त्यांची दुरवस्था कशी झाली आहे याचें अंधुक ज्ञान आपणांस होतें. वाई व भोर यांजमध्यें एक डोंगराची रांग असून तींत आंबडखिंड नांवाचें एक रमणीय स्थळ आहे. तेथें पांथस्थांकरितां श्रीमंत पंतसचिवांनीं एक अन्नछत्र ठेवलें होतें. त्या खिंडींतील हवा आरोग्यदायक व पाणी पाचक म्हणून राजवाडे व मुंडले तेथें वाईहून महिना दीड महिना राहावयास गेले होते.

आंबडखिंडीपासून कण्हेरी सुमारें चार कोस. त्या गांवीं वरील दोघे संशोधक जावयास निघाले. मुंडले लिहितात – “ त्या मठाचे मूळ पुरुष वासुदेव पंडित यांची समाधि मठांत आहे. आम्ही कण्हेरीस गेलों तों तेथें पाण्याचा अत्यंत दुष्काळ असून जें पाणी होतें तें बिघडलेलें

होतें व गांवांतील लोक नारूनें ग्रस्त झालेले दिसले. मठांत प्रवेश केला तों तेथील इमारत अव्यवस्थित व पडझड झालेली दिसली. मठाधिपति व त्यांच्या घरांतील माणसें कृष्णवर्णीय व वागणूक आणि राहणी अस्वच्छ असल्याचें दिसून आलें. त्या कुटुंबांतील एक पुरुष वेड लागल्यामुळें एका कोपऱ्यांत बरळत पडला होता. मूळ पुरुषाची समाधि असलेली खोली व त्यापुढील सभामंडप मात्र बऱ्या स्थितींत होता. त्या समाधीशेजारीं दासबोध व इतर पोथ्या यांची पूजा केलेली होती." सारांश मठांतला प्राण जाऊन त्याचें कलेवर काय तें उरलें होतें.

रामदासीपंथांतील महंताचीं समर्थांनीं स्वतः सांगितलेलीं वीस लक्षणें आहेत. त्यांत प्रमुख म्हणजे त्यांना लिहितां-वाचतां आलें पाहिजे, परमार्थांत कोणीं शंका विचारल्यास त्यांचें समाधान करतां आलें पाहिजे, बोलणें प्रचीतीचें असावें, गातां व नाचतां यावें, टाळ वाजवितां यावा, ग्रंथ लिहितां यावें, अंगीं वैराग्य व विवेक असावा, लोकांना राजी राखतां यावें, राजकारणाचें ज्ञान असावें, काळ-प्रसंग समजावा, मन अव्यग्र असावें, वृत्ति उदासीन व समाधानी असावी आणि रामोपासनेंत मन इतकें रंगून गेलेलें राहावें कीं जनांचें लक्ष त्यांजकडे लागावें ( श्रीसमर्थचरित्र-आळतेकरकृत, पृ. २४३।४४ ).

## रामदासी दिनचर्या

रामदासीबुवांची दिनचर्या कशी असावी याविषयीं निरनिराळ्या मठांत निरनिराळा क्रम सांगण्यांत आला आहे. कल्याणस्वामींच्या परंपरेंतील दासविश्रामधामाचे कर्ते आत्मारामबुवा यांनीं सांगितलेल्या नित्यक्रमांत पुढिलांचा प्रामुख्यानें अंतर्भाव होतो. ( १ ) त्यानें प्रातःकालीं उठल्यावर गुरुध्यान, ( २ ) महावाक्याचें स्मरणोत्तर ध्यान, ( ३ ) तारकमंत्रस्मरण, ( ४ ) आराध्यमूर्तीचें चिंतन, ( ५ ) मंगलाचरण, भजन, स्तवन व भूपाळ्या, ( ६ ) श्रीरामाचें सगुण ध्यान, ( ७ ) देवभक्त व संतादिक यांचें वर्णन, ( ८ ) काकड-आरती, ( ९ ) परब्रह्मस्वरूपाचा अभ्यास करीत अगर तारकनामाचें स्मरण करीत प्रपंचकाम, ( १० ) स्नानसंध्यादि नित्यकर्म, ( ११ ) एकांत स्थळीं एकाग्र मनानें आराध्यमूर्तीचें स्तवन, जप, देवतार्चन, ( १२ ) स्तोत्रपठन, ( १३ ) नैवेद्य आणि सायंकाळीं ( १४ )

नित्यकर्म, ( २ ) मारुतिदर्शन व प्रदक्षिणा, ( ३ ) भीमरूपी स्तोत्रें, ( ४ ) भजन, ( ५ ) ग्रंथवाचन-दासबोध, मनोबोध इत्यादि. ( ६ ) शेजारती.

हा असाच्या असाच नित्यक्रम समर्थांनीं ठरवून दिलेला नसावा. त्यांत कालेकरून ज्या त्या मठपतीनें स्वेच्छेनुरूप कमीअधिक फेरफार केले असावे. समर्थांच्या वेळीं कदाचित् ही दिनचर्या याहून पुष्कळच सुटसुटीत असेल. तथापि शुचिर्भूतपणा, ब्रह्मकर्म, भजन, पूजन, ग्रंथवाचन व भिक्षेसाठीं पर्यटन यावर विशेष कटाक्ष असावा. समर्थांना आपल्या शिष्यांमार्फत समाजाला जागे करावयाचें होतें. त्याचें साधन म्हटलें म्हणजे भजन, पूजन, कीर्तन, पुराण व भिक्षाटन हें होय. त्या दृष्टीनें त्यांनीं स्वतः सांगितलेल्या दिनचर्येची रूपरेखा पुढीलप्रमाणें होती :– प्रातःकाळीं उठल्यावर प्रातःस्मरण करावें, नित्यनेम स्मरावा व मागील उजळणी करून नवीन पाठांतरास सुरुवात करावी. कांहीं नेम धरावा, उगीच बाष्कळपणाची वटवट करूं नये. बहिर्दिशेस जाऊन स्नानसंध्या उरकून वस्त्रपात्र धुऊन परत यावें, परत आल्यावर देवतार्चन करावें. या वेळीं मध्यान्हकाळ झाला असल्यामुळें फलाहार उरकून आपल्या प्रापंचिक उद्योगास लागावें. ज्या कोणाचीं पोथ्या-पुस्तकें नकलेकरितां आणिलीं असतील त्यांची नक्कल सुंदर अक्षरांनीं लिहावी. रोज कांहीं ग्रंथ वाचावा व त्याचा अर्थ समजून घ्यावा. कोणास प्रश्न विचारावयाचा तो नेमका व स्पष्ट विचारावा. पुराण सांगण्यास बसल्यावर वा कीर्तनास उभें राहिल्यावर प्रतिपाद्य विषय श्रोत्यांस नीट समजेल असा उकलून सांगावा, त्या प्रतिपादनांत ज्याचा आपणांस प्रत्यय आला आहे तेंच प्रतिपादावें. सावधगिरीनें वागावें, नीतिमर्यादा राखावी, हरिकथानिरूपणावर भर द्यावा. शक्य तितकें कोणाचेंहि मन दुखवूं नये, बोलण्याप्रमाणें चालावें, नामघोष करावा, गातां यावें, लोकांच्या मनांतील समजून घ्यावें. असें वागलें म्हणजे मनुष्य महंतपदाला पोंचतो. अशा मनुष्याच्या वैभवास काय उणें पडणार आहे! आकाशांत जशीं असंख्य नक्षत्रें जमतात तसे लोक त्याच्या भोंवतालीं गोळा होतील.

वरील दोन दिनचर्यांपैकीं दुसरी दिनचर्या बरीच सुटसुटीत दिसते. तथापि तींत रामदासीपंथाची मुख्य दीक्षा जी भिक्षा ती न आल्यामुळें रामदासांनीं रेखीव असें दिनचर्येचें स्वरूप ठरविलें नसावें. हीं दोन्ही चित्रें

ढोबळ स्वरूपाचीं मानावयास पाहिजेत. त्यांनीं कदाचित् ज्या त्या मठपतीच्या पात्रतेप्रमाणें दिनचर्येंत कमीअधिक प्रमाणांत बदल करण्यास सवड ठेवली असावी. त्यांच्या प्रचारांतील राजकारण ही बाब जशी महत्त्वाची तशीच नाजूक व जोखमीची होती.·ती प्रत्येक रामदास्यास साधण्यासारखी नव्हती. ती ज्यांस साधेल असे महंत वा शिष्य अल्पप्रमाणांत असावे. कारण ते एके ठिकाणीं राजकारण कसें करावें हें लिहितांना म्हणतात :- अवघड स्थळीं कठीण लोक। तेथे रहाणें नेमक। सृष्टीमध्ये सकळ लोक। धुंडित येती। तेथे कोणाचें चालेना। अणुमात्र अनुमानेना। कट घालून राजकारणा। लोक लावी। लोकीं लोक वाढविले। तेणें अमर्याद झाले। भूमंडळीं सत्ता चाले। गुप्तरूपे॥ (दा. द. १५, स. २ ).

याचा अर्थ – राजकारण करणाऱ्या महंतानें स्वतः अवघड ठिकाणीं राहावें. तें ठिकाण अलबत्यागलबत्यास माहीत नसावें. ज्यांना राजकारणांत भाग घ्यावयाचा असेल त्यांनीं त्या महंताला त्या गुप्त ठिकाणीं जाऊन भेटावें. त्याजपासून विशिष्ट प्रसंगीं काय करावयास पाहिजे तें समजून घ्यावें. आणि मग यानें त्याला व त्यानें तिसऱ्याला असा संदेश पोंचवून राजकीय कार्यकर्त्यांची संख्या अमर्याद वाढवावी. ही सगळी योजना राजकीय कट करण्याची दिसते. तिजवरून शिवाजीचें राजकारण प्राथमिक अवस्थेंत असतां रामदासी शिष्यांना राजकीय आंदोलन वा उपदेश करणें किती कठीण होतें हें समजून येतें. अर्थात् हें काम येरगब्राळाचें नसल्यामुळें स्वामी या कामांत अगदीं निवडक व शेलक्या शिष्यांनाच घेत असले पाहिजेत.

स्वामींनीं राजकारणाविषयीं आणखी एक इशारा देऊन ठेवला आहे.

राजकारण बहुत करावें। परंतु कळोंच नेदावे। परपीडेवरी नसावें। अन्तःकरण॥ १९॥ लोक पारखून सांडावें। राजकारणें अभिमान झाडावे। पुनः मेळऊन घ्यावे। दुरील दोरे॥ २१॥ ढिरवटासी दुरी धरावें। कचरटासीं न बोलावें। समंध पडतां सोडून जावें। येकीकडे॥ २१॥ ऐसे असो राजकारण। सांगतां तें असाधारण। सुचित अस्ता अन्तःकरण। राजकारण जाणे॥ २२॥

अर्थ – गुप्तपणा ही राजकारणांतील गुरुकिल्ली आहे. राजकारणांत कोणाचाहि प्रवेश करण्यापूर्वीं त्याची परीक्षा घ्यावी व तिला जे उतरतील

त्यांनाच ध्यावें. एखादा मनुष्य लायक आहे, पण गर्विष्ठ आहे, त्याचा गर्व झाडून टाकून मगच त्याला राजकीय गाड्यास जुंपावें. मनुष्य हिरवट असेल, कोणास न जुमानणारा असेल तर त्याला व भित्र्या माणसालाहि राजकीय चळवळींत थारा देऊं नये. सारांश, राजकारण फार अवघड असल्यामुळें जे सुचित अन्तःकरणाचे म्हणजे सुविचारी असतील त्यांनाच साधेल.

ही कामगिरी स्वामी फार थोड्या शिष्यांवर सोपवीत असतील. सर्व-सामान्य शिष्यानें या भानगडींत न पडतां आपल्या पंचक्रोशींत भिक्षेच्या मिषानें हिंडत असतां स्वराज्य व स्वधर्म यांस आवश्यक अशा सद्‌गुणांची हांक मनाच्या श्लोकांनीं मारून घोरत पडलेला समुदाय उठवावा. त्यांतील निवडक श्लोक येथें देत आहे. त्यांचा प्रभाव जनतेवर किती पडत असेल याची कल्पना आजहि आपणांस करतां येईल.

सदाचार हा थोर सांडूं नये तो। जनीं तोचि तो मानवी धन्य होतो॥ हा आवाज कानीं पडतांच त्या क्षणीं तरी दुराचाऱ्याच्या डोक्यांत लख्ख-कन् सत्प्रकाश पडत असेल. – मना श्रेष्ठ धारिष्ट जीवीं धरावें। हा चरण ऐकतांच भित्र्या लोकांना भित्रेपणाची लाज वाटूं लागत असेल. देह त्यागिता कीर्ति मागे उरावी। या वचनानें पोटाच्या मागें लागलेल्या माण-सासहि महत्कृत्यें करण्याची ईर्षा उत्पन्न होत असेल. समर्थाचिया सेवका वक्र पाहे। असा सर्व भूमंडळीं कोण आहे॥ या उक्तीनें परधर्मीयांच्या आक्रमणानें चिंताक्रांत झालेल्यांची हिंमत वाढत असेल. आणि, सदा बोल-ण्यासारिखे चालताहे। अनेकीं सदा एक देवासि पाहे॥ हा बोल ऐकून श्रोत्याला खोटें बोलण्याची खंती उत्पन्न होत असेल. हीं वचनें विरक्त व शुचिर्भूत अशा शिष्यांच्या तोंडून वारंवार कानीं पडल्यामुळें, महाराष्ट्रीय जनमनाची नैतिक पातळी खात्रीनें उंचावून स्वराज्याच्या व स्वधर्माच्या चळवळीचें बळ प्रतिपच्चंद्ररेखेप्रमाणें प्रत्यहीं वाढत असेल.

## उपदेशाचा प्रभाव

समर्थांचे मठ म्हणजे किल्ले. शिवाजीचे किल्ले डोंगराळभागांत होते. पण समर्थांच्या मठांना भूमिमर्यादा मुळींच नव्हती. ते मावळांत व देशावर सर्वत्र होते. शिवाजीच्या किल्ल्यांवरील हवालदारांना व शिबंदीला मुसलमानी

अधिकाऱ्यांचें व सैनिकांचें भय बाळगावें लागत असे व युद्धेंहि करावीं लागत. पण समर्थांच्या मठपतींना तीहि काळजी नव्हती. त्यांनीं खुशाल इकडे तिकडे जाऊन भिक्षा मागावी व मनाचे श्लोक म्हणून जनांत नवचैतन्य उत्पन्न करावें. त्या योगानें आणि समर्थांच्या व निवडक समर्थशिष्यांच्या गुप्त राजकीय चळवळीनें उत्साही, नीतिमान्, सामर्थ्यवान्, बुद्धिवान्, धाडसी, शूर व हिकमती तरुण सहस्रोंनीं पुढें येऊन शिवरायाच्या सैन्यांत, कारकुनींत वा अधिकाराच्या जागेवर शिरून त्याचें सैनिकी व बौद्धिक बळ वाढीस लावीत असतील. त्यांपैकींच निळो सोनदेव मुजुमदार, बाळाजी आवजी चिटणीस व रामचंद्र नीलकंठ पंतअमात्य हुकमत पन्हा हे प्रमुख होत. त्याशिवाय गणेशपंत, प्रल्हादपंत, नानाजीपंत, रामकृष्णपंत, विश्वंभरपंत, विश्वासराय, नारायणपंत, कोनेरीपंत, मल्लारीपंत, बाळकृष्णपंत शहापूरकर, अंताजी गोपाळ वाकनवीस, अनंतभट महाबळेश्वरकर, आनंदराव देशपांडे इत्यादि लहान-मोठे अधिकारीहि समर्थांचें शिष्यत्व पत्करलेलेच होते. ( आळतेकरकृत श्रीसमर्थचरित्र, पृ. २३३ ).

मोरोपंत पेशवे, नारो नीलकंठ मुजुमदार, राघो बल्लाळ सुभेदार, मोरेश्वर पंडितराय, नारो त्रिमल, पंताजी गोपिनाथ वाकेनवीस, त्रिंबक वासुदेव हवालदार व कारकून तर्फ कऱ्हे पठार, अण्णाजीपंत सुरनीस, निराजी रावजी, रावजी सोमनाथ, अनाजी दत्तो, बाबाजी विठ्ठल सुभेदार, दत्ताजीपंत वाकनवीस यांसारख्या मुत्सद्द्यांपैकीं कित्येकांना छत्रपतींच्या साहाय्यास जाण्याची स्फूर्ति खुद्द समर्थांपासून वा त्यांच्या शिष्यवर्गापासून मिळाली असल्याचा पुष्कळ संभव आहे. आळतेकरांच्या यादींतील बहुतेक नांवें ब्राह्मणांचीं आहेत, मराठ्यांचीं नाहींत. पण आळतेकरांच्या यादीला न गवसलेल्या अशा हजारों अज्ञात मराठ्यांचें स्फूर्तिस्थान कदाचित् समर्थ व समर्थ-संप्रदाय यांचेंच असेल. शिवाजीप्रमाणें त्यांनीं समर्थांचा अनुग्रह घेतला नाहीं म्हणून त्यांची नोंद झाली नसावी इतकेंच फार तर म्हणतां येईल. समर्थांची चळवळ ही एक प्रकारें राष्ट्रीय शिक्षणाची चळवळ होती. नव्या काळाला चळवळीचें स्वरूप नवीन असावें लागतें. मठस्थापनेची कल्पना समर्थांची नवीन होती असें नाहीं. त्यांच्यापूर्वी बौद्धांचे मठ सर्व भारतभर स्थापन झाले होते. महानुभावांचे मठ महाराष्ट्रांत सर्वत्र होते. महाराष्ट्रांत

त्यांच्या डोळ्यादेखत गोव्यापासून वसईपर्यंतची सारी समुद्रकांठची कोंकणपट्टी पोर्तुगीजांचीं प्रार्थनामंदिरें, मठ ( मोनेस्टरी ) अनाथालयें व पाठशाळा यांनीं व्यापली होती. जेसुइट पंथाचे महंत ( मंक ) ब्रह्मचर्य पाळून धर्मोपदेश करीत हिंडत होते आणि मुसलमानहि मशिदी व दर्गे स्थापून फकिरांमार्फत धर्मप्रसार करीत होते. ख्रिस्ती काय, पोर्तुगीज काय किंवा मुसलमान काय यांच्या धर्मप्रसाराचा भर केवळ शाळांवर नव्हताच; मुसलमानांचा जबरदस्तीवर व पोर्तुगीजांचा जबरदस्ती व उपदेश यांवर होता. समर्थांना शाळा सर्वत्र स्थापून आपली नवी शिकवण सर्वांस देणें आटोक्याबाहेरचें व कालावधीचें होतें. त्यापेक्षां आपणांस हवे तसे शिष्य तयार करून व त्यांच्याकरितां ठिकठिकाणीं मठ व देवालयें बांधून त्यांच्या उपदेशद्वारां नवीन राष्ट्रीय शिक्षणं देणें हें काम सोपें व शीघ्रफलदायी होतें, म्हणून त्यांनीं त्याचाच अवलंब केला; आणि तें काम दिसण्यांत सोज्ज्वळ व निरुपद्रवी असल्यामुळें त्यांना मुसलमान राज्यकर्त्यांकडून अडथळा न होतां त्यांची अवलियांत गणना होऊन त्यांना थोडेंबहुत आर्थिक साहाय्यच झालें. त्यांच्या या धोरणामुळेंच त्यांना शिवाजीच्या राज्यांत व त्याबाहेरहि पुष्कळ मठ बिनहरकत स्थापन करतां आले.

समर्थांच्या संघटनेविषयीं इतकें लिहून झाल्यानंतर असा प्रश्न उत्पन्न होतो कीं, समर्थ जन्मास आले नसते तर शिवाजीच्या कार्यास कोणतें वळण लागलें असतें ? शिवाजी संतसमागमासाठीं भुकेलेला होता हें निर्विवाद होय. तो तुकारामबुवांकडे गेला होता व मोरयागोसाव्यांचेंहि दर्शन त्यानें घेतलें होतें. पण शिवाजीचे गुरु होण्यास लागणारी पात्रता आपल्या अंगीं नाहीं याची जाणीव त्यांना होती. पण समर्थच नसते तर धर्मप्रवण शिवाजीची भक्ति वारकरी पंथावरच जडण्याचा संभव होता. तशी ती जडली असती तर वेद व शास्त्रें यांच्या अभ्यासास उत्तेजन, राजव्यवहारकोश, वेदोक्त धर्माप्रमाणें राज्याभिषेक व सनातन धर्माच्या अंगोपांगांचा परिपोष आणि गोब्राह्मणप्रतिपालन या बाबी मागें पडून सनातन धर्मास आलेली ग्लानि कायम राहून त्याचा लोप होण्याचीच भीति उत्पन्न झाली असती. कारण की या सर्वांचा आवेशानें व प्रचार की पद्धतीनें पाठपुरावा करणारा दुसरा कोणीहि सामर्थ्यवान् साधु नव्हता.

## राजवाड्यांची मीमांसा

राजवाडे तत्कालीन परिस्थितीची येणेंप्रमाणें मीमांसा करतात. श्रीशंकराचार्यप्रणीत सनातन धर्माच्या कठोर आचाराला कंटाळून त्याविरुद्ध झालेली जी धर्मक्रान्ति तो भक्तिमार्ग होय. पंगु भक्तिमार्गाविरुद्ध झालेली जी धर्मशुद्धि ती समर्थांच्या प्रवृत्तिपर महाराष्ट्रधर्माच्या साहाय्यानें पुनरुज्जीवित झालेला सनातनधर्म होय. ( १ ) श्रीमदाचार्यप्रणीत सनातन धर्म ( २ ) संत-प्रणीत भक्तिमार्ग व श्रीसमर्थप्रणीत महाराष्ट्रधर्मोज्जीवित सनातन धर्म अशी खरी परंपरा आहे. प्रवृत्तिपर धर्म सोडून मराठ्यांनीं निवृत्तिपर भक्तिमार्गाचा अवलंब केला तेव्हां राज्यावनति झाली. त्यांनीं निवृत्तिपर भक्तिमार्ग किंचित् सोडून प्रवृत्तिपर सनातन धर्मास पुनः येऊन मिळण्याचा प्रयत्न केला तेव्हां त्यांची राज्योन्नति झाली. सहिष्णुता हेंच संतांचें व्रत पडलें, तेव्हां गाईचा वध, ब्राह्मणांचा छळ व धर्माचा उच्छेद झाला तरी संतांची सहिष्णुता कांहीं चळली नाहीं. तेव्हां अशांच्या हातून राष्ट्राची उन्नति व्हावी कशी ? तोंच समर्थांच्या उदयाच्या सुमारास काय प्रकार झाला पाहा. आपल्याला कांहीं मिळवावयाचें आहे, गोब्राह्मणांचें प्रतिपालन करावयाचें आहे, सनातनधर्म स्थापावयाचा आहे, स्वराज्याची प्राणप्रतिष्ठा करावयाची आहे, असे प्रवृत्तिपर विचार लोकांच्या मनांत उत्कटत्वानें बाणूं लागले, व राजकीय उन्नति होण्यास प्रारंभ झाला. या राज्यक्रान्तीला समर्थांनीं उपदेशिलेला महाराष्ट्रधर्म कारण झाला. महाराष्ट्रधर्म हा शब्द 'रिलिजन' वाचक नसून ड्यूटी, पेट्रिऑटिझम् याचा वाचक आहे. यांत मराठ्यांची एकी करणें, यवनांचें पारिपत्य करणें, जे विरुद्ध दिसतील त्यांचें पारिपत्य करणें व स्वराज्य साधणें हें येतें. महाराष्ट्रधर्म हा शब्द प्रथम समर्थांच्याच वाङ्मयांत आला."

कै. राजवाडे यांच्या प्रतिपादनांतील प्रखरपणा सोडल्यास वारकरी पंथानें स्वधर्मरक्षण केलें तरी तो पंथ निवृत्तिमार्गी होता व समर्थांचा रामदासी पंथ प्रवृत्तिमार्गी होता हें नाकबूल करतां येत नाहीं. याला परिस्थिति अंशतः कारण असली तरी रामदासांची मनोधारणा तुकारामादि संत मंडळींहून भिन्न होती हें स्पष्ट आहे. त्यांस लोकांना कर्मयोगी बनवावयाचें होतें असें सूत्ररूपानें म्हणतां येईल.

## समर्थांचें वशीकरण

समर्थांनीं जी प्रचंड संघटना व लोकसंग्रह केला त्यास त्यांच्या अनेक थोर गुणांप्रमाणें वाङ्माधुर्य हाहि गुण कारण झाला होता. त्यांचा एक मासला खालीं देत आहे. ते वृद्धपणीं पाटण तालुक्यांत सह्याद्रीच्या माथ्यावरील हेळवाक या गांवीं कोयनेच्या कांठीं चातुर्मास्यांत शके १५९६ त राहिले होते. तेथील थंड हवा त्यांना बाधून हींवताप लागला. त्या वेळीं त्यांची शुश्रूषा रघुनाथभट नवहस्त यांनीं केली. त्या योगानें आजारांतून बरे झाल्यावर ते चाफळास आपल्या मठांत राहावयास गेले असतां त्यांनीं एक आभारप्रदर्शक पत्र रघुनाथभटजींस पाठविलें. तें पुढीलप्रमाणें –

### श्रीरामसमर्थ

उत्तमगुणालंकृत रघुनाथभक्तिपरायेण परोपकार राजमान्य राजश्री रघुनाथभट गोसावी यांसी स्नेहपूर्वक सूचना. तुमचा निरोप घेऊनू हेळवाकीहून स्वार जालों ते सुखरूप चाफळास पावलों. संकल्पाची समाराध्रनाहि जाली. पुढें शरीराचा उपचारहि हळूहळू होतो.

तुमचें मन मजवरी बहुत आहे. ते तुमचे आवडीच्या गुणे कल्याण होईल, ऐसे नेमस्त चिन्ह दिसतें. आपण ते कर्कष शीतळाईमध्ये बहुताचि श्रम पावलो. तो माझा सकळ श्रम घेऊन मज निरोप दिधला तो उपकार देव जाणे. याविषयीं चित्त चमत्कारलें तें पत्रीं किती म्हणून लिहावें ! माझें अरिष्ट तुम्ही घेऊन मज उष्णदेशीं पाठविलें हा उपकार श्रीरघुनाथजीस जाला. मज रघुनाथजी वेगळे कोण्ही जिवलग नाहीं. आपण जाला समाचार रघुनाथजीस विदित केला. या उपरीं माझे ठायीं तुम्ही आहा. रघुनाथकृपेचा प्रत्यय तुम्हांस आलियावरी प्रचीतीस कळो येईल. बहुत काय लिहिणें !

वेदमूर्ति दिवाकरभट गोसावी तेथें आलियावरी तुम्ही माझा समाचार घेयासी ये प्रांतास आलें पाहिजे. स्नेह बहुत असो दीजे. हा पत्रार्थ. हें इतकें म्या आवडीच्या कळवळयानें लिहिलें आहे. मनेमन साक्ष असेल. परंतु तुम्हास उपचारसा वाटोन रंजीस व्हाल तरी न होणें. जैसा दिवाकरभट तैसे तुम्ही हा इत्यर्थ आहे. बरें कळलें पाहिजे. तुमचा आमचा एकांत प्रसंग जालियावरी मग ऐसें लिहितां नये. म्हणोनि ये संधीमध्ये प्रसंग

फावला, पुढें फावेना म्हणोनि लांबे करून ( विस्तृत ) लिहिलें. वरकड इतर भाव मनामध्यें असेल तरी रघुनाथ साक्ष असे. तुम्ही रंजीस न होणें आणि जें आहे तें लिहिलें. यामध्यें मिथ्या स्तुति नाहीं. तुम्ही सर्वज्ञ आहां. तुमचें जें कांहीं आहे तें सकल माझेंचि आहे. म्या मज माझ्या मनास येईल तैसे लिहिलें. येथें तुमचें काय गेलें ? कांहीं चिंता न कीजे. तुम्ही आमचेहि आहां. तुम्ही आम्ही सकल देवाचे आहों. शरीरभेदावरी न जाणें. अंतर स्थिति पाहिल्या उपरीं कळो येईल ( भा. इ. सं. मं. इतिवृत्त, शके १८३६ ).

### हेळवाकची घळ

समर्थांना एकांत फार आवडे व मानवे. समाजांत मोकळेपणानें वावरतांना पाण्यांत सोडलेल्या माशाप्रमाणें जसा त्यांना आनंद होई त्याप्रमाणेंच एकांतांत त्यांना निर्वेधपणें ब्रह्मचिंतन करावयास सांपडून ब्रह्मानंद मनमुराद उपभोगावयास मिळे. त्यांचीं एकान्त-स्थळेंहि रम्य असत. सह्याद्रीच्या पायथ्याची शिवथरची घळ जशी त्यांनीं एकान्ताकरितां पसंत केली होती, तशीच सह्याद्रीच्या माथ्यावरील हेळवाकची घळ त्यांनीं निवडली होती. हेळवाक गांव कुंभारली घाटाच्या तोंडाशीं असून भोंवतालीं किर्र झाडी व शेजारीं पूर्ववाहिनी कोयना नदी वाहत आहे. कऱ्हाडाहून पाटणावरून चिपळुणाकडे जातांना डाव्या हाताला कोयनेचें पात्र एकसारखें दिसत असतें. दोन्ही बाजूंना डोंगरांच्या रांगा व त्यांमधून वाहणारी कोयना व तिच्या काठानें पूर्वपश्चिम जाणारी सडक या प्रदेशास कोईन-कांठ म्हणतात. त्यांतील माती पिवळी आहे. अशा प्रदेशांतून आजहि एस्. टी.च्या गाडींतून वेगानें जातांना ती रमणीय वनश्री पाहून जर परमानंद होतो तर त्या काळीं घोड्यावरून थबकत थबकत व सुखाचे घुटके घेत घेत स्वैरपणें मार्ग क्रमीत असतां प्रवाश्याच्या चित्तवृत्ति कशा थरारून जात असतील, याची कल्पना करूनहि येणार नाहीं.

कोयनेचा प्रचंड बंधारा या हेळवाकापाशींच बांधला जात आहे. हेळवाकाच्या दक्षिणेस कोंढवळें हें खेडें व त्याच्या पलीकडील अरण्यांत रामदासस्वामींची घळ आहे. घळीची लांबी ९८ हात व रुंदी १५ हात आहे. स्वामी येथें इ. स. १६७४च्या पावसाळ्यांत म्हणजे शिवाजीच्या राज्याभिषेककाळीं राहत असतां त्यांना शीतज्वराची बाधा झाली. ते अशा बिकट

स्थळीं एखादा-दुसरा शिष्य घेऊन राहत. यापैकींच रघुनाथ गोसावी हे दिसतात. रघुनाथभट हे पंडित व काशीवास केलेले गृहस्थ असून दिवाकर गोसाव्यांचे व्याही होते. त्यांच्या पोटांत शिरून त्यांना आपलेसें करून सोडण्याची मोहनी विद्या समर्थांना निसर्गतःच कशी प्राप्त झाली होती याचें चित्र म्हणजेच वरील पत्र. समर्थ घोड्यावर बसण्यांत पटाईत होते. त्यांना लढाऊ हत्यारेंहि वापरतां येत असावीं. त्यांच्या कुबडींत गुप्ती असे ती एकटेदुकटे हिंडत असतां आत्मरक्षणासाठीं. या वेळीं त्यांची प्रकृति घोड्यावर बसण्याइतकीहि बरी नसावी. परंतु डोलीची सोय नसल्यामुळें त्यांना घोड्यावरूनच चाफळास जावें लागलेलें दिसतें. त्यांनीं चाफळास गेल्यावर समाराधना घातली ती शरीरस्वास्थ्यासाठीं केलेला नवस फेडण्याकरितांच काय !

आतां शेवटीं शिवाजीला रामदासांनीं अनुग्रह केव्हां केला असावा याचा नक्की काल आपणांस ठरवितां येतो का हें पाहूं. रामदासांचे समकालीन तुकारामबुवा. रामदासांचा दासबोधग्रंथ व तुकारामबुवांचे अभंग पूर्णप्रमाण आहेत असें कै. वि. का. राजवाडे यांनीं आपलें ठाम मत सांगितलें आहे ( म. इ. सा. खंड ४ ). तुकारामबुवांनीं शिवाजीला रामदासांना गुरु करण्याचें आपल्या अभंगांत आग्रहपूर्वक सांगितलें आहे. बुवांचा काळ इ. स. १६४९ त झाला हें आजपर्यंत तरी निर्विवाद समजण्यांत येतें. तें विचारांत घेतल्यास बुवांनीं हा उपदेश शिवाजी १९ वर्षांचा होण्यापूर्वीच केला आहे, तेव्हां रामदासांनीं शिवाजीस अनुग्रह त्यानंतरच अल्प काळानेंच केला असला पाहिजे.

शिवाजी व रामदास यांचे संबंध कसे दाट होते याविषयीं चिटणिसांच्या बखरींतील कांहीं विधानें येथें उद्धृत करणें इष्ट होय. अफजलखानाच्या वधाची हकीगत देण्याच्या प्रकरणांत प्रारंभीं चिटणीस म्हणतात, “ श्रीरामदासांची कृपा होऊन उपदेश व्हावा इच्छिलें तेहि मनोरथ सिद्धीस गेले ” इ. स. १६५९ ( पृ. १२१ ). इ. स. १६६६·त महाराज आग्र्यास औरंगजेबाच्या भेटीस गेले. त्यापूर्वी त्यांनीं “ श्रीरामदासस्वामींचें दर्शन घेऊन सर्व वृत्त निवेदन करून ‘ दिल्लीस जाणें प्राप्त, कसें करावें ’ विचारलें. ‘ जावें. फत्ते पावाल, संकट दूर होईल, तूर्त प्रसंगें जाणेंच प्राप्त आहे ’ ऐसी आज्ञा जाली ” ( पृ. २२८ ). कास्म द गार्डा याचा यास दुजोरा आहे.

या ठिकाणीं ‘ आग्र्‍या ’ऐवजीं ‘ दिल्ली ’ हा शब्द आला आहे. त्याचें कारण असें कीं औरंगजेब तेव्हां कायमचा दिल्लीस राहत असल्यामुळें सार्वत्रिक समज दिल्लीस जावयाचें असाच होता.

“ कर्नाटकांतील दिग्विजय करून महाराज तोरगळ प्रांतांतून पनाळियावरून सातारा प्रांतीं येऊन श्रीस्वामींचें दर्शन करून प्रतापगडीं श्रीदेवीचें दर्शन केलें आणि रायगडावर येऊन पावले ” इ. स. १६७७ ( पृ. २९४ ). राज्यारोहणापूर्वीं ‘ श्रीरामदासस्वामींकडे ( महाराजांनीं ) कारकून पाठविले, विनंति केली, त्यांनीं अनुमोदन दिल्हें ’ ( पृ. ३२४ ). राज्यारोहणानंतर महाराज राजगडीं येऊन प्रतापगडच्या देवीचें दर्शन घेतलें. तेथून श्रीरामदासस्वामींच्या दर्शनास आले. इ. स. १६७४ ( पृ. ३४५ ). संभाजी दिलेरखानाकडे गेल्यावर महाराजांनीं त्याला निरोप पाठविला “ तुम्ही यवनास मिळाला. यवनांचे घरांत राज्य घालण्याची बुद्धि तुम्ही धरली. तरी आम्हांस या उपरी कांहीं कर्तव्य नाहीं. एखादे क्षेत्रीं वास करूं किंवा श्रीरामदासस्वामींचेपाशीं येऊन बसो ” इ. स. १६७८ ( पृ. ३४८ ). शेवटीं मरणसमयीं ‘ दोन प्रहरीं देहत्याग करून अवतार समाप्त श्रीराम ऐसे म्हणून केला ’ इ. स. १६८० ( पृ. ३५२ ). महाराज दोन घटका रात्रीं जपध्यान करून कांहीं पुराण व दासबोध दोन समास श्रवण करून भोजन करीत ( पृ. १८७ ). सारांश, राज्यस्थापनेच्या प्रारंभापासून मृत्यूपर्यंत शिवाजी व रामदास यांचा निकट संबंध असल्याचें चिटणीस दर्शवितात. चिटणीस ब्राह्मण नसून प्रभु होते, हेंहि लक्षांत ठेवावयास पाहिजे.

## प्रकरण अठाविसावें

# समर्थांची प्रभावळ

### जयरामस्वामी

जयरामस्वामी हे जातीचे देशस्थ ब्राह्मण. त्यांचा जन्म शके १५२१ त झाला. त्यांचें उपनांव केसर. त्यांचे वडील भिकाजीपंत हे कात्राबाद मांडवगण जिल्हा अहमदनगर येथील देशपांडे होते. त्यांच्या मातुश्रींचें नांव कृष्णाबाई. स्वामींचे वडील भिकाजीपंत त्यांच्या बालपणींच दिवंगत झाल्यावर जयरामाच्या संगोपनाची जोखीम कृष्णाबाईवर पडली. भिकाजीपंत देशपांडे असले तरी त्यांची आर्थिक स्थिति समाधानकारक नसावी. म्हणून कृष्णाबाई पुत्रास घेऊन पंढरीस गेल्या व तेथें भिक्षेवर चरितार्थ चालवूं लागल्या. अर्थात् जयरामाचें उपनयनहि त्यांस भिक्षेवरच करावें लागलें. मुंजीनंतर कृष्णाबाईनींहि इहलोक सोडल्यामुळें जयराम अगदींच पोरका झाला. अशा असहाय स्थितींत पांडुरंगाशिवाय जयरामाला सखा कोणी उरला नाहीं. त्यानें पांडुरंगाच्या देवालयांत जाऊन त्याची करुणा भाकली. जयरामाचें शिक्षण पंढरपुरासच झालें असावें. त्याच्या ग्रंथसंपत्तीवरून तो संस्कृतज्ञ विद्वान् दिसतो. श्रीमद्भगवद्गीता, उपनिषदें व महापुराणें हे त्या वेळचे अभ्यासावयाचे ग्रंथ होत. गीताध्ययनावांचून समाधान नाहीं व महापुराणावांचून मनोरंजन नाहीं. जयरामस्वामींनीं

श्रीमद्भागवतांतल्या दशमस्कंधावरील टीका, रुक्मिणीस्वयंवर, सीतास्वयंवर, ज्ञानीभक्तसंवाद, शांतिपंचीकरण व अपरोक्षानुभूति हे ग्रंथ लिहिले. अपरोक्षानुभूति या ग्रंथावरून ते आत्मानुभवी असल्याचें स्पष्ट होतें. त्यांचे गुरु कृष्णाप्पास्वामी हे माण देशांत वडगांवीं राहत असत. ते मूळ बहेबोरगांवचे. जयराम त्यांजपाशींच येऊन राहिले व तेथेंच त्यांना गुरुकृपेनें आत्मज्ञान झालें. जयरामस्वामी रामदासस्वामींप्रमाणेंच संसारांत पडले नाहींत. भजन-पूजन, कीर्तन, पुराण यांतच त्यांनीं आपलें आयुष्य व्यतीत केलें. अशा स्थितींत त्यांची वृत्ति सहजच उदासीन व अनासक्त बनली. त्यांनीं आपलें जीवित परमार्थास वाहिलें. तें इतक्या आतुरतेनें कीं, त्यांना कृष्णाप्पांनीं मंत्रोपदेश देतांच त्यांची समाधि लागली व त्या अवस्थेंत ते बीस दिवस राहिल्यावर कृष्णाप्पांनीं त्यांस जागृत करून 'आपला अवतार जगदुद्धारासाठीं आहे' असें त्यांस सांगितलें.

तीर्थयात्रा कोणाहि साधूस आवश्यक असे. जयरामस्वामींनींहि महायात्रा केली. यात्रेस निघाल्यावर विटें व खानापूर या दोन गांवांच्यामधील रेणावीजवळील रेवणसिद्धाच्या डोंगरावर त्यांनीं अनुष्ठान केलें. तेथून पंढरपूर, पैठण येथें ते गेले. पंढरपुरास पांडुरंगाचें व पैठणास नाथांच्या समाधीचें दर्शन त्यांनीं घेतलें. काशीस गेल्यावर त्यांनीं दीर्घकाल काशीवास केला व उरलेल्या तीर्थयात्रा आटोपून ते वडगांवास आले. ते कृष्णभक्त होते. नित्य प्रातःकाळीं सद्‌गुरूची काकडआरती करावी, स्नान केल्यावर गुरुदेवतेची पूजा करून बारा घटिका दिवस येईपर्यंत गुरूचें भजन करावें असा त्यांचा क्रम होता. ते भजन करीत असतां देव्हाऱ्यांतील मुरलीधराची मूर्ति नृत्य करीत असल्याचें सांगतात.

वडगांव म्हणजे रामदासांच्या रहाळांतील गांव. रामदास लोकसंग्राहक होते. जयरामस्वामी आपल्या भक्तिपंथांतील असल्याचें आढळतांच त्यांनीं त्यांजबरोबर सख्य जोडलें व त्यांची गणना रामदास-पंचकांत होऊं लागली. उभयतांचें एकमेकांकडे जाणें-येणें फार व परमार्थ-चर्चाहि पुष्कळ. जयराम समर्थांच्या शिष्यांपैकीं नसले तरी त्यांच्या सहकाऱ्यांपैकीं एक होते. त्यांची एक कथा प्रचलित आहे. तिजमधील चमत्कार बाजूस ठेवला तरी निरु-

पद्रवी अशा साधूंनाहि मुसलमान लहरी अधिकारी कसे पेंचांत आणीत व त्यांचा प्राण घेण्यास कसे उठत हें प्रतीत होतें.

### जयरामस्वामींचें कीर्तन

जयरामस्वामी कीर्तन उत्तम करीत. कोल्हापुरास त्यांचें कीर्तन बहिणाबाई ऐकत असे. त्यांच्या कीर्तनाला गर्दीहि अलोट होत असे. शके १५७७ त जयराम आपल्या शिष्यांसमवेत मिरजेस गेले होते व त्या मुक्कामांत रामदासहि त्यांजबरोबरच होते. मिरजेस दिलेरखान म्हणून एक मुसलमान ठाणेदार होता. तो रस्त्यानें जात असतां जवळच जयरामांचें कीर्तन कनाती लावून चाललें होतें. खानानें आपल्या नोकरास विचारलें 'ये क्या तमाशा है?' तेव्हां नोकर नम्रपणें म्हणाला, 'हिंदूका फकीर आनंदसे देवभजन करता है.' खान कीर्तन औत्सुक्यानें ऐकत कांहीं काळ तेथेंच उभा राहिला. तो त्याच्या कानावर पुढील वाक्य पडलें 'साधूंचा समागम मुहूर्तमात्र जरी झाला तरी ते साधु देवाची भेट करवितात!' खानानें तेवढेंच लक्षांत ठेवलें व दुसऱ्या दिवशीं स्वामीस आणावयास पालखी पाठविली. जयरामांना संशय आला. तरी निरुपाय होऊन ते खानाच्या भेटीस गेले. खान त्यांस हात जोडून म्हणाला, "कल अपने भजनमे कहा जो फकीर का मिलाफ घडी भर होनेसे वो साधु (फकीर) अल्लाका दर्शन कर देता है. तो हमका आपका मिलाफ चार घडी हुवा. और राम रहिम ये दो नही है. इस वास्ते हमकू राम दिखलाना चाहिये."

यावर जयरामस्वामींनीं उत्तर दिलें. 'मी म्हणालों तें खरें आहे. पण जे भक्त देवाचें भजन निरंतर करतात त्यांनाच यथाकाल दर्शन घडतें.' तेव्हां खान त्यांस अडवून म्हणाला – 'काल तुम्ही असें कोठें म्हणाला? तें कांहीं नाहीं. भल्या गृहस्था! आतांच्या आतां राम दाखीव नाहीं तर मुसलमान करतों.' असें म्हणून खानानें भांड्यांत झांकून ठेवलेलें मांस उघडून दाखविलें. जयरामस्वामीपुढें घोर संकट उभें राहिलें. त्यांनीं रामदासांना बोलावून घेतलें आणि त्यांची खानाशीं गांठ घालून दिली. समर्थ म्हणाले, 'या माझ्यामागून म्हणजे मी तुम्हांला राम दाखवितों.' असें म्हणून समर्थ किल्ल्याच्या एका बारीक छिद्रांतून बाहेर गेले, जयरामहि गेले, पण खानास जातां येईना. तेव्हां खान खजिल होऊन समर्थांना शरण गेला.

सहजगत्या कोणी कोठें कांहीं धार्मिक गोष्ट बोलला कीं हैक म्हणतां ब्रह्महत्या या न्यायानें इस्लामी राज्यांत त्याच्या जिवावर केव्हां काय बेतेल याचा नेम नव्हता.

जयराम समर्थांपेक्षां नऊ वर्षांनीं मोठे होते व ( शके १५९४ भाद्रपद वद्य ११ स ) समर्थांपूर्वी समाधिस्थ झाले. त्यांनीं जिवंत समाधि घेतली. त्यांचे गुरु कृष्णाप्पा यांनींहि जिवंत समाधि घेतली होती. कित्येक साधु असे असत कीं ते अंथरुणावर पडून मृत्यु येण्याची वाट पाहत नसत. आपला मृत्यु जवळ आला आहे असें वाटूं लागतांच, आपणांस व्यवस्थित अशा खड्ड्यांत पुरून घेत व त्यावर माती घातल्यावर आंतल्या आंत प्राण सोडीत. जयरामस्वामींचा गोपाळ या नांवाचा एक आवडता शिष्य होता स्वामींनीं बसण्याकरितां एक घोडा ठेवला होता, त्याची तो चाकरी करीत असे. त्याच गोपाळाच्या गळ्यांत माळ घालून त्यांनीं आपल्या जागीं त्याची स्थापना केली.

भगवद्गीतेच्या ८ व्या अध्यायांत परमगति प्राप्त करून घेणारानें मृत्युपूर्वी सर्व इंद्रियांचा निरोध करून, मनाचा हृदयांत निरोध करून आपला प्राण मस्तकांत नेऊन समाधियोगांत स्थिर व्हावें, ओंकाराचा जप करीत व परमात्म्याचें स्मरण करीत देह सोडावा असें सांगितलें आहे. कृष्णाप्पा व जयरामस्वामी यांनीं याच पद्धतीनें जिवंत समाधि घेतली असें दिसतें.

हल्लीं वडगांवास जयरामस्वामी, त्यांचे गुरु कृष्णाप्पा स्वामी व गादी-वरील कित्येक पुरुषांच्या समाधि एका देवळासमोरील सभामंडपांत आहेत. बहुतेक सर्व समाधींवर शकमित्यांचे लेख खोदलेले आहेत. मंडप बराच मोडकळीस आलेला आहे. हल्लीं त्यावर पत्रा ठोकला आहे; शेजारीं मोठी बारव आहे. तिचें पाणी मठाच्या बागेला व मळ्याला मिळतें. मंडपाभोंवतीं दगडी ओवऱ्या आहेत. एकंदर शिल्पावर मुसलमानी छटा दिसते. शेजारीं भिंतीपलीकडे एक कबर आहे. कृष्णाप्पाच्या समाधीभोंवतीं सुमारें एक वीत रुंदीच्या दगडाच्या पट्टीवर चौफेर देवनागरी लिपींत मजकूर खोदला आहे. ही समाधि तिरकसलेली आहे. मठाचा संस्थानवाडा शेजारींच आहे. काम लांकडी पण भव्य आहे. वाड्यांत संस्थानाचें देवघर आहे. त्यांत दोनतीनशें

मूर्ति वगैरे आहेत ( भा. इ. सं. मं. त्रैमासिक, आश्विन शके १८३१ व इ. स. १९३९ आक्टोबर ).

जयरामस्वामींच्या मठास मौजे रायगांव तर्फ औंध व वडगांव तर्फ निंबसोड-मायणी हीं दोन गांवें पूर्वापर इनाम आहेत. तीं देण्याचा उद्देश मठांतील धर्मकृत्यें चालविणें व मठाकडे अतीथ-अभ्यागत येतील त्यांसाठीं अन्नछत्र ठेवणें हा आहे.

## रंगनाथस्वामी

रंगनाथ जरासे चंगीभंगी होते. त्यांचा जन्म खानदानी घराण्यांत झाला होता. त्यांचे पूर्वज बीड प्रांतांतील चौसाळे महालांत खडकी येथें राहत असत. तेथून ते पंधराव्या शतकाच्या सुमारास पंढरपुराजवळ नाझरें या गांवीं राहावयास आले. तेथें रंगनाथांचे पूर्वज राघोपंत यांनीं विजापूर दरबारांतून देशपांडेपणाची वृत्ति संपादली. राघोपंत शिपाईगिरींत पटाईत असत. त्यांच्या अश्वविद्यानैपुण्यावरून त्यांना लोक घोडके म्हणूं लागले. घोडके याचा अर्थ घोड्याचे वैद्य असाहि आहे. रंगनाथांचे वडील बोपाजी. त्यांनीं कल्याणी मठाचे पूर्णानंदस्वामी यांचा अनुग्रह घेतला होता. त्यांच्या मातुश्रीचें नांव बयाबाई.

रंगनाथांचा जन्म शके १५३४ मार्गशीर्ष शुद्ध १० रविवार या दिवशीं झाला. ते मार्गशीर्ष शुद्ध १० शके १६०६ त समाधिस्थ झाले. त्यांना घरचेंच शिपाईगिरीचें वळण असल्यामुळें लहानपणापासून दांडपट्टा, बोथाटी, तिरंदाजी या मर्दानी खेळाची आवड उत्पन्न झाला. घरच्या श्रीमंतींत त्यांचे लाडहि पुरविले गेले. त्यास अनुसरून रंगनाथ संसारसुखांतच मजा मारावयास प्रवृत्त व्हावयाचे; पण नवल असें कीं, रामदासाप्रमाणेंच त्यांना समवयस्क अशा रंगनाथानें लग्नाची गोष्ट कानीं पडतांच घर सोडलें व नाझऱ्याहून अशनूर, निरा-नरसिंगपूर असे करीत करीत ते हिमालयांत बदरिकाश्रमीं गेले. वाटेंत टेहरीच्या राजानें त्यांचा अनुग्रह घेऊन त्यांस घोडा, हत्यारें, मंदिल दिला. तेव्हांपासून रंगनाथ सरदाराप्रमाणें थाटानें राहूं लागले.

पंढरपुरास ते यात्रेहून परत आल्यावर त्यांच्या आईबापांनीं त्यांस नाझरें येथें परत नेलें. त्यानंतर रंगनाथांच्या वडिलांनीं ( बोपाजीपंत ) चतुर्थाश्रम

घेतला व त्यांजपासूनच रंगनाथांना अनुग्रह मिळाला. वडिलांनीं कऱ्हाडास कृष्णा-कोयना या नद्यांच्या प्रीतिसंगमावर जिवंत समाधि घेतली. त्यानंतर रंगनाथ घोड्यावरून कृष्णाकाठानें वर जात असतां कोरेगांवाच्या वाटेवर निर्गुडीच्या बनांत ओढयाच्या काठीं त्यांच्या घोड्याचा पाय चिखलांत रुतून घोडा चालेना. म्हणून ही ईश्वरी आज्ञा समजून त्यांनी तेथेंच मठ बांधला. त्या ठिकाणीं पुढें वस्ती वाढून निगडी हें गांव झालें असें सांगतात. त्यांच्या मठास पंधराशें रुपयांचें उत्पन्न परवापर्यंत चालू होतें. निगडी गांव मसूर स्टेशनापासून जवळ आहे.

## भागम्मा व चंदम्मा

रंगनाथांच्या ऐषआरामी राहणीमुळें त्यांजविषयीं लोकमत अनुकूल नसावें. ते निळया घोड्यावर बसत, कमरेस तरवार लटकावीत व बरोबर लंगोटबंद शिष्यपरिवार घेऊन प्रवास करीत. ते उत्कृष्ट तिरंदाज व मजबूत शरीरबांध्याचे होते. एकदां दरोडेखोरांनीं त्यांना वाटेंत गांठून लुटण्याचा रंग आणला. दरोडेखोरांचें संख्याबल मोठें पाहून रंगनाथांनीं त्या पेंचांतून सुटण्याचा एक हुन्नर केला. त्यांनीं जवळच एका झाडाच्या खोडांत तीर मारला व तो उपसून काढण्यास चोरांना सांगितलें. त्यांना तो निघेना, तेव्हां ते स्वामीस शरण आले. शिवाजीमहाराजांना साधुसंतांच्या दर्शनाचा नाद फार. एकदां ते प्रथमच रंगनाथांच्या दर्शनास गेले. त्या वेळीं स्वामी भगवीं वस्त्रें परिधान करून पलंगावर पहुडले असून त्यांचे पाय भागम्मा व चंदम्मा या लावण्यखाणी शिष्यिणी रगडीत होत्या. महाराजांना त्याचा विस्मय वाटला. तेव्हांपासून रंगनाथ हा भ्रष्ट आहे अशी महाराजांची समजूत झाली.

समर्थ साताऱ्यास छत्रपतींच्या भेटीस आले असतां रंगनाथस्वामींस निगडीहून त्यांच्या दर्शनाकरितां येतांना महाराजांनीं पाहिलें. ते पंचहत्यारें बांधून घोड्यावर बसले असून त्यांजबरोबर पांच-पंचवीस लंगोटबंद शिष्य चालत होते. त्यामुळें महाराजांचा संशय दुणावला. पण रंगनाथांची पूर्ण माहिती असलेल्या समर्थांनीं महाराजांची खात्री करून त्यांचा संशय घालविला.' रामदासांची थोरवी त्यांच्या हयातींत व पश्चात् महाराष्ट्रांत सर्वसामान्य लोकांना कळलीच, पण त्यांचे समवयस्क व त्यांच्यासारखेच जे

रंगनाथांसारखे संत त्यांनाहि त्यांच्या हयातींतहि पटली होती. ते खालील पद्यांत स्तवतात.

रामदास चतुराक्षरि मंत्र जप वारंवार ।
दुस्तर भवभयसागरतारक सच्चित्सुखसार ॥
रामदास द्वयनामीं अखंड गोडी शर्करा ।
राहटी परिमळ भुवनीं होती कर्पुरा ॥
राजस वर्तुळ त्यापरि त्या जीवनचि गारा ।
राजाधिराज अवतरलासे या जगदुद्धारा ॥ १ ॥
मनुष्यरूपें विलसे परि हा परिपूर्ण काम ।
मकराकृति कुंडलें पाहतां स्वतःसिद्ध हेम ॥
मंडन संतसभेचें साधक जना विश्राम ।
मस्तकमणि हा शत कोटीचा निजगुज विश्राम ॥ २ ॥
दास तो उदास सेवुनी परमामृत कंदा ।
दाता स्वात्मसुखाचा निरसुनि विषयाचा धंदा ॥
दानवषट्कुळवैरि मर्दुनि तारिति मतिमंदा ।
दारा द्रव्य त्यजुनि सत्वर सद्भावी वंदा ॥ ३ ॥
सग्दुरुराज विराजित करुनी सज्जनगडिं वास ।
सत्य सनातन श्रीगुरुसमर्थ मुनिमानसहंस ॥
सद्भावेंसी शरण रिघावें धरूनिया कांस ।
सहज पूर्ण निजरंगें रंगलों तारक विश्वास ॥ ४ ॥

ज्याला जवळचीं माणसें मोठा मानतात तोच खरा मोठा. कारण दूरच्या मनुष्याला गुण तेवढे दिसत असतात, पण जवळच्याला दोषहि दिसतात. विशेषतः एकाच पेशांतील लोक मत्सरानें एकमेकांची निंदाच करीत असतात. यास जे अपवाद तेच श्रेष्ठ होत व तो समर्थांचा श्रेष्ठपणा रंगनाथांनीं वरील पद्यांत प्रांजलपणें कबूल केला आहे. मोठेपणाचें दुसरें लक्षण असें कीं खरा मोठा पुरुष इतरांचे गुण तेवढे घेतो व दोषावर पांघरूण घालतो. समर्थांनीं रंगनाथांची बाजू छत्रपतींपुढें कशी सावरून धरली हें वर दाखविलेंच आहे. रंगनाथांनीं या पद्यांत रामदासांना

राजाधिराज, जगदुद्धारक, संतसभेचें मंडन व परमामृतकंद या शब्दांनीं गौरविलें आहे. रामदास त्यांस प्रीतिपूर्वक रंगोबा म्हणत.

रंगनाथांनीं ग्रंथरचना बरीच केली असून त्या काळीं कोणाहि लेखकास संस्कृत भाषेचें चांगलें ज्ञान असल्याशिवाय नवीन ग्रंथ रचणें शक्य नव्हतें. कारण मराठींत अुच्च दर्जाची ग्रंथनिष्पत्ति अगदींच थोडी झाली होती व सर्व ज्ञानभांडार संस्कृतांतच होतें. रंगनाथांनीं गुरुगीता, रामजन्म, गजेंद्रमोक्ष, निजानंदसाधनें, सुदामचरित्र, शुकरंभा-संवाद, पंचीकरण, वृद्धमोक्षविवरण इत्यादि विविध विषयांवर आख्यानें रचलीं आहेत व वेदान्तपर विवरण केलें आहे. इंग्रजी राज्यांत जसें राजकीय पुढाऱ्यांचें पीक स्वाभाविकपणें पिकलें होतें, तसें सतराव्या शतकांत व त्यापूर्वी जिकडे-तिकडे संतसाधु उत्पन्न झाले होते व धर्मरक्षणार्थ त्यांचीच तेव्हां जरूर होती. रंगनाथ बाह्यतः जरी रंगेल होते तरी अन्तर्यामीं त्यांची वृत्ति ईश्वर-चरणींच रत झाली होती. म्हणूनच त्यांनीं एका पद्यांत म्हटलें आहे –

निजानंदीं रंगे चित्त, रंगेचिना ज्याचें ।<br>
तोंड पाहूं नका त्याचें ॥<br>
सिद्धान्त वर्णायासी भय काय त्याचें वाचें ॥

रंगनाथ चांगले गायक व कीर्तनकार होते. गायनकलेमुळें त्यांच्या कीर्तनास रंग भरत असेल यांत शंका नाहीं. स्वतः कवि, गायक, कीर्तन-कार व भक्तिमान् या गुणांच्या बळावर धर्मज्ञान देणें व धर्मरक्षण करणें हें जें तत्कालीन आवश्यक कर्तव्य तें त्यांना यशस्वी रीतीनें पार पाडतां आलें असेल.

## आनंदमूर्ति

आनंदमूर्ति ढालगांवचे. ढालगांव मिरज संस्थानांत होतें. त्यांचे वडील बाळंभट व आई सावित्रीबाई. गोत्र वासिष्ठ व शाखा आश्वलायन. गुरु रघुनाथ, यजुर्वेदी माध्यंदिन शाखेचे. त्यांचें गोत्र विश्वामित्र. रघुनाथ हे साक्षात्कारी पुरुष होते. त्यांनीं काशीहून कावडींतून चोवीस वेळां गंगोदक नेऊन रामेश्वरास अभिषेक केला व तितक्याच वेळां रामेश्वराहून सेतु आणून गंगेंत टाकला. 'तेविसाव्या कावडीच्या वेळीं आनंदमूर्तीस रघुनाथांचें अकल्पितपणें दर्शन घडलें. तेव्हां चोविसावी कावड नेल्यानंतर आपण ढालगांवीं राहाव-

यास येऊं असें त्यांनीं आनंदमूर्तीस वचन दिलें व त्याप्रमाणें वास्तव्यास येऊन त्यांनीं आनंदमूर्तींवर कृपा केली.

आनंदमूर्तींचा या वेळीं विवाह झाला असून त्यांची पत्नी नुकतीच प्रसूत झाली होती. आनंदमूर्तींच्या पित्याला आपला पुत्र एका गोसाव्याच्या नादीं लागलेला खपला नाहीं. म्हणून गुरूचा नाद सोडून त्यास संसारास लावावें या हेतूनें त्यांनीं तुला असले फंद करावयाचे असतील तर ' माझ्या घरांतून बायकोसुद्धां चालता हो ' अशी त्यास ताकीद दिली. त्या धाकानें आनंदमूर्तींचा नाद सुटेल अशी बापाची समजूत होती. आतां आनंद-मूर्तींच्या परीक्षेची वेळ आली. एक तर त्यांनीं सहकुटुंब घरादारास तरी पारखें झालें पाहिजे किंवा गुरूस तरी सोडलें पाहिजे.

त्यांपैकीं त्यांनीं पहिला मार्ग स्वीकारला. ते सहकुटुंब गुरूसह वेरळा-नदीच्या कांठावर व कृष्णानदीपासून जवळच वसगडें येथें गेले. तेथून एके दिवशीं शिष्यास कळूं न देतां गुरुजी चालते झाले. आतां आनंदमूर्तींना वनवास नको असता तर परत ढालगांवीं जाऊन घरीं राहण्याची संधि अनायासेंच आली होती. परंतु गुरूच्या ठिकाणीं त्यांची भक्ति इतकी दृढ होती कीं ते गुरूचा शोध काढीत गुरु संकेश्वरीं होते तेथें आले आणि त्यांनीं स्त्रीस नूतन बालकासह मागें ठेवलें. शिष्याची निष्ठा पाहून गुरूंनीं त्यास गहिंवरून गाढालिंगन दिलें व त्याजबरोबर ते परत वसगड्यास आले. कांहीं काल गुरुशिष्यांनीं एकत्र घालविल्यावर रघुनाथस्वामी दिवंगत झाले. त्यांच्या दहनस्थळीं वृंदावन बांधून आनंदमूर्ति त्यांची सेवा करीत असत. त्यांच्या प्रेमामुळें दर रामनवमीस वृंदावन डोल देत असे. समर्थ व आनंदमूर्ति यांचा समागम फार होऊन दोघांच्या गांठीभेटी वारंवार होत. त्या उभयतांचा परस्परांवर लोभ इतका कीं आनंदमूर्तींची गणना पुढें समर्थ पंचाय-तनांत झाली.

समर्थ एकदां आनंदमूर्तींच्या भेटीस ब्रह्मनाळास ( वसगड्याजवळ ) गेले असतां त्यांनीं वृंदावनास साष्टांग नमस्कार करतांच वृंदावन डोलूं लागलें व आनंदमूर्तीस पोटाशीं धरून पुढील श्लोक रचिला –

अति कठिण शिळा ती डोलवी वृक्ष जैसा ।
जननिजठरकोशीं जन्मला कोण ऐसा ॥

गुरुभजनप्रतापें ख्याति झाली दिगंतीं ।
अनुदिनिं स्मर चित्ता स्वामि आनंदमूर्ति ॥

आनंदमूर्तींच्या गुरुनिष्ठेची एक कथा विलक्षण आहे. आनंदमूर्ति आपल्या संबळींत गुरूचा चर्मी जोडा ठेवून त्याची प्रवासांत एकान्त स्थळीं पूजा करीत असत. एकदां जयरामस्वामींनीं आपल्या गुरूच्या पुण्यतिथीस संतमंडळी मिळविली होती. तींत आनंदमूर्तीहि होते. आलेल्या मंडळींतील एक गृहस्थ गीतेचा अध्याय वाचल्यावांचून भोजन करीत नसत. पण ते येतांना पोथी आणावयास विसरले होते. तेव्हां जयरामस्वामींनीं त्यांस सांगितलें, 'आनंदमूर्ति स्नानास गेले आहेत. त्यांची संबळी येथेंच आहे. तिच्यांतील पोथी घेऊन वाचा !' त्याप्रमाणें त्या गृहस्थानें संबळी उघडली व तींत गीता सांपडली ती वाचली. इतक्यांत आनंदमूर्ति स्नान करून परत आले. संबळी उघडी पाहतांच ते खजिल झाले. त्यांना वाटलें आपलें बेंड फुटलें. पण पाहतात तों त्यांच्या जोड्याची पोथी झाली होती. अशा रीतीनें गुरूंनीं त्यांची लाज राखली.

या निस्सीम गुरुभक्तानें आपल्या पश्चात् वृंदावनाच्या जोपासनेचें काम आपला पुत्र कृष्णा याजवर सोपवून शके १६१८ त वैकुंठवास केला (श्रीसमर्थावतार). ब्रम्हनाळ, कृष्णा व वेरळा यांच्या संगमावर असून तेथें रघुनाथस्वामी व आनंदमूर्ति यांच्या समाधी आहेत.

## केशवस्वामी

समर्थ पंचायतनांतील समर्थ धरून शेवटचे केशवस्वामी. महाराष्ट्र व कर्नाटक यांच्या सीमेवर कल्याणी नांवाचें गांव आहे. ती चालुक्य व कलच्यूरी या राजघराण्यांची एक वेळ राजधानी होती. लिंगायत पंथाची स्थापना बसवेश्वरानें येथेंच केली. व याज्ञवल्क्यस्मृतीवर मिताक्षरा ही टीका लिहिणारा विज्ञानेश्वर हा याच नगरांत विक्रमादित्य सहावा या सर्वश्रुत सम्राटाच्या राजसभेंत झळकत होता. प्रसिद्ध कवि बिल्हण याच नगरांत विक्रमादित्याचा राजकवि या नात्यानें ऐश्वर्य भोगीत होता. या गांवास सांप्रत पूर्वीचें वैभव राहिलें नसलें तरी गांव बराच मोठा असून ब्राह्मणवस्तीहि बरीच आहे. याच गांवीं केशवस्वामींचे वडील आत्माराम-

पंत हे देशपांडे होते. त्यांच्या मातुश्रींचें नांव गंगा. गंगाबाईस केशव वयाच्या ८० व्या वर्षीं झाला हें नवल होय.

कल्याणीचे कलच्यूरी राज्य बुडाल्यानंतर मुसलमानी अमदानींत तें एक महत्त्वाचें ठिकाण व मुसलमान जहागीरदाराचें वसतिस्थान होतें. मुसलमानी संस्कृतीचा पगडा या देशपांड्याच्या मुलावर लवकरच बसलेला दिसतो. त्या काळीं मुलांचीं लग्नें फार तर १५।१६ व्या वर्षीं होत. त्याप्रमाणें केशवस्वामींचें लग्न योग्य वेळीं झालें होतें तरी त्यांना बाहेरख्यालीचें व्यसन होतें. घरची सुस्थिति असली म्हणजे हीं व्यसनें विशेषतः मोगलाईत जडत. त्याशिवाय गांजाचेंहि व्यसन त्यांस होतें. गांजाची आग इतकी भयंकर की त्यानें जिवंतपणींच मनुष्याच्या अंगाची राख व्हावी. या दोन व्यसनांच्या आधीन झालेल्या केशवस्वामींची प्रकृति फारच अशक्त बनली होती.

तथापि केशवस्वामींत दोन गुण मोठे होते. ते कीर्तन करीत व पद्येंहि रचीत. कीर्तनांत रंग भरण्यास त्यांस त्यांची पद्यरचना फार उपयोगी पडे. पद्येंहि अशीं तशीं नसत. जशा तमाश्यांत भेदक लावण्या असतात तशीं यांचीं पद्यें बाहेरून शृंगारिक, पण आंतून आध्यात्मिक असत. या कारणानें त्यांच्या कीर्तनास श्रोत्यांची अगदीं थाप उडे. तें युग चमत्कारयुग होतें, जिकडे-तिकडे संत व त्यांचे चमत्कारच चमत्कार. केशवस्वामींच्या चमत्काराच्या आख्यायिका प्रसिद्ध आहेत. ते एकदां कीर्तन करीत असतां शेवटीं खिरापत देतांना सुंठवड्याऐवजीं बचनागाच्या कांड्या चुकून कुटून वांटण्यांत आल्या; पण तें विष न बाधतां देवाची मूर्ति मात्र त्या विषानें काळी पडली.

स्वामी कल्याणीहून भागानगरास गेले व तेथेंच मठ करून राहिले. भागानगर परळीपासून ( सज्जनगड ) फार दूर असल्यामुळें केशवस्वामी व रामदासस्वामी यांच्या भेटी वारंवार होत नसत. केशवांनीं समर्थांची कीर्ति इतक्या दूरवरहि ऐकिली असून त्यांच्या गुणांवर लुब्ध होऊन केशवांनीं एक पद्य रचिलें. तें वाचलें म्हणजे संतमंडळींत समर्थांना केवढा मान असे हें समजतें.

रामदास माउली ।। ध्रु. ।।
सच्चित्सुखघन वरद प्रतापी। शांतीची साउली ।।

अनन्य जे नर शरण रिघाले । तया लागि पावली ॥
केशविं केशव निज सुख सेवी । आठवितांचि धांवली ॥ ३ ॥

समर्थांच्या इच्छेवरून केशवस्वामी त्यांस भेटावयास परळीस जाण्यास निघाले. प्रकृति अशक्त म्हणून पत्नीस त्यांनीं बरोबर घेतलें. त्यांनीं प्रवास पायींच सुरू केला. बसत-उठत व मुक्काम करीत ती जोडी निघाली. बायको स्वामीपेक्षां जरा टणक म्हणून गांठोडें तिच्या डोक्यावर. शेवटीं दोघें इतकी थकलीं कीं त्यांच्यानें पाय उचलवेना. तेव्हां तेथें एक धटिंगण प्रकट झाला. त्यानें दोघांना दोन खाद्यांवर घेऊन सज्जनगडाच्या पायथ्याशीं आणून सोडलें व आपण नाहींसा झाला.

स्वामी सज्जनगडीं पोंचले. त्यांचें कीर्तन ऐकण्यास समर्थप्रभृति अत्यंत उत्सुक होते. परंतु प्रवासाची दगदग झालेली व गडावर समर्थां-देखत चिलीम ओढण्याची चोरी, या कारणानें केशवस्वामीस अवसान येईना. समर्थांनीं ही गोम ओळखून त्यांना चिलीम भरून दिली. केशव लज्जित झाले. ते म्हणाले 'हें काय?' समर्थांनीं उत्तर दिलें, 'आम्हांला तुमचें कीर्तन हवें व तुम्हांला हें हवें म्हणून असें केलें.' नंतर त्यांनीं कीर्तन केलें व सर्वांनीं धन्योद्गार काढले. त्या दिवसापासून केशवस्वामींनीं गांजा सोडला.

केशवांनीं आपला अवतार शके १६०४ च्या पौष १३ स संपविला. हैदराबादेस नदीच्या कांठीं त्यांची समाधि आहे. पण तिजकडे कोणाचें लक्ष नाहीं. त्यांचा मठ त्यांच्या जन्मस्थानीं कल्याणीस आहे. शिवराम-स्वामींचा मठ गांवाच्या या टोंकाला तर केशवस्वामींचा त्या टोंकाला. त्या दोघांच्या खाजगी वर्तनास धरूनच त्यांच्या मठांतहि महदंतर आहे.

## प्रकरण एकोणतिसावें

# आत्मचरित्रांतील समाजचित्र

### बहिणाबाई

शिवकालांत ज्या साध्वी स्त्रिया होऊन गेल्या त्यांत बहिणाबाईचें स्थान बरेंच उच्च समजलें जातें. शिवाजीमहाराजांचें मूळ गांव वेरूळ. त्या वेरुळाच्या पश्चिमेस देवगांव नामक खेडें आहे. त्यांत इ. स. १६२८ त म्हणजे शिवजन्मापूर्वी दोन वर्षें बहिणाबई जन्मास आली आणि इ. स. १६०८ त देहूस तुकारामबुवा व मराठवाड्यांत जांबेस रामदासस्वामी यांचा जन्म झाला. अर्थात् बहिणाबाई ही समर्थ रामदासस्वामी व तुकोबाराय यांच्या समकालीन होय. पण या त्रिवर्गांत तुकोबांनीं इहलोकीं अगदीं अल्पकाल जीवित व्यतीत केलें. त्यांचें प्रयाण इ. स. १६४९ त झालें. त्यांच्या प्रयाणसमयीं बहिणाबाई २१ वर्षांची होती व समर्थहि ४१ वर्षांचे होते; पण शिवाजीमहाराज अवघे १९ वर्षांचे होते. शिवाजीमहाराज बंगळुराहून पुण्यास १२ व्या वर्षीं आले. त्यामुळें तुकोबा व छत्रपति यांचा समागम अवघ्या सात वर्षांत काय घडला असेल तेवढाच.

बहिणाबाईचें जन्मस्थान देवगांव हें शिवनदीच्या तीरावर आहे. त्याची गणना त्या काळीं पुण्यक्षेत्रांत होत होती. तिच्या पित्याचें नांव आवजी. तो गांवचा कुळकर्णी होता. तिच्या आईचें नांव जानकी. आवजीला संतान

नसल्यामुळे त्यानें देवगांवच्या लक्षतीर्थावर जाऊन शिवानुष्ठानास सुरुवात केली. अनुष्ठान चालू असतां एके दिवशीं एका पवित्र ब्राह्मणानें स्वप्नांत येऊन ' तुला एक कन्या व एक पुत्र होईल ' असा आवजीस वर दिला. तो वर मिळाल्यापासून नऊ महिने पूर्ण झाल्यावर त्याच्या पोटीं बहिणा आली. कधीं नव्हत कन्या का होईना, झाल्यामुळें आईबापांनीं तिच्या बारशाचा समारंभ थाटानें केला.

एके दिवशीं आऊदेव रानांत गेला असतां त्याला वेरूळच्या वाटेवर अवचित एक पीतांबर सांपडला. त्या पीतांबराला गांठ मारून तींत ठेवलेली एक मोहरहि आऊदेवास मिळाली. आऊदेव या लाभास शुभशकुन समजला. त्यावरून सहजच मुलीची पत्रिका वर्तवून घेण्यास तो उत्सुक झाला. देवगांवीं विश्वेश्वर नांवाचा ब्राह्मण ज्योतिषी होता. त्यानें तिची पत्रिका वर्तवून ही मुलगी भक्तिमान् व भाग्याची होईल व तिला आयुष्य फार आहे असें सांगितलें. त्यावरून प्रसन्न होऊन आवजीनें त्या ज्योतिषाला एक गाय व वस्त्र दान केलें. बहिणाच्या पाठीवर बहुधा दोन अडीच वर्षांनीं एक मुलगा झाला. त्यायोगें आवजीचे सर्व मनोरथ पूर्ण झाले. आतां बहिणा सहा वर्षांची झाली. तेव्हां तत्कालीन रूढीप्रमाणें तिच्या लग्नाचा विचार घरांत सुरू झाला. कांही गृहस्थ मुलीस पाहावयासहि आले. त्या सर्वांचा सारासार विचार करून शिवपूरचा एक आप्त रत्नाकर पाठक यास आऊ देवानें पसंत केलें. वास्तविक आऊदेव व बहिणा यांच्या वयांत कितीतरी अंतर. तो तीस वर्षांचा व ही सहा वर्षांची. शिवाय रत्नाकर भटजींची पहिली भार्या मरून त्याचा हा द्वितीय संबंध होता, तरी त्याला आवजीनें पसंत केलें त्या अर्थी तो सधन असावा. आवजी कुलकर्णी व रत्नाकर जोशी अशी ही जोशी-कुळकर्ण्यांची सांगड जमली.

आवजीला मुलें नवसासायासांनी झालीं; त्यावरून बहिणाच्या लग्नांत आवजी हा कदाचित् वयस्क म्हणजे रत्नाकरापेक्षां १०।५ वर्षांनीं वडील अतएव चाळीस-पंचेचाळीस वर्षांचा असावा. वतनदार मंडळींचीं कुलंगडीं फार. त्यांचे ते भाऊबंद, त्यांच्या त्या तक्षिमा आणि कुलकर्णपणाच्या पाळ्या त्या भानगडींत आवजीला भाऊबंदाचें देणें झालें. त्याच्या फेडीसाठीं ते त्याजपाशीं शेतमळा लिहून मागूं लागले. ती आपत्ति चुकविण्याकरितां

आवजीनें आपला जांवई रत्नाकर यास सल्लामसलतीस बोलावलें. उभयतां-च्या वाटाघाटींत रत्नाकरानें आवजीच्या कुटुंबास घेऊन देशांतरास जावें असें ठरलें. रत्नाकर या गोष्टीस तयार झाला त्या अर्थी त्याची घरची स्थिति चांगली असून घरची व्यवस्था त्याच्या अनुपस्थितींत पाहण्यास घरचें मनुष्यबळहि बरें असलें पाहिजे. त्या घरच्या मंडळीवर भार टाकून रत्नाकर त्या सर्वांस मध्यरात्रीं कोणास कळूं न देतां घेऊन निघाला. ते दिवस पावसाळ्याचे होते. या वेळीं बहिणा नऊ-दहा वर्षांची व तिचा भाऊ सात-आठ वर्षांचा असावा. तिचा बाप आवजी कर्तृत्वशून्य दिसतो. कारण त्यांच्या पुढच्या प्रवासांत त्याची कर्तबगारी कोठेंहि दृष्टीस पडत नाहीं. तो सर्वस्वीं जांवयावर अवलंबून असून त्याच्या ओंजळीनें पाणी पीत होता.

त्या मंडळींनीं हा प्रवास पायींच केला असावा. तसा तो केला असेल तर त्यांचे वाटेनें फार हाल झाले असतील. त्या मुलांपैकीं एखाद्या दुसऱ्याला पाठुंगळीलाच घ्यावें लागलें असेल. त्या स्थितींत बहिणा रत्नाकराच्या पाठुंगळीला बसली असल्यास न कळे!

## प्रवरा-संगम

स्वदेशीं चोरी व परदेशीं भीक अशी म्हण आहे. त्या म्हणीप्रमाणें तीं सर्व देशांतराला अब्रूखातर भीक मागण्यासाठी निघाली हें उघड आहे. बहुधा वाटेनें कोस-दोन कोसांवर मुक्काम करीत ही मंडळी दरकूच दरमजल प्रवरा-संगमास येऊन पोचली. वेरूळचा डोंगराळ प्रदेश सोडल्यावर प्रवरा-संगम हेंच दक्षिणेकडे येतांना पवित्र क्षेत्र लागतें. त्या क्षेत्रीं गोदावरी व प्रवरा या दोन नद्यांचा संगम झाला असून संगमाच्या ठिकाणीं दोन नद्यां-मध्यें जें टोंक येतें त्या टोंकावर श्रीसिद्धेश्वराचें देवालय आहे. त्या टोंकावरून दुथडी नजर टाकली तर केवढें तरी अफाट पात्र दिसतें. त्या सर्वांनी तेथें मुक्काम करून गंगास्नान केलें व टोक्याला जाऊन श्रीसिद्धेश्वराचें दर्शन घेतलें. त्या क्षेत्रीं साहजिकच संन्यासी, संत, सज्जन व महानुभाव यांचा मोठा समुदाय वास्तव्य करून होता. संत, हरिदास यांचीं भजनें, कीर्तनें आणि संन्याश्यांचीं वेदान्तपर प्रवचनें चालू होतीं. त्यांच्या पायापाशीं राहून तीं भक्तिभावानें ऐकावीं अशी बहिणास पूर्वील संस्कारामुळें इच्छा झाली.

पण तें तिच्या दैवांत नव्हतें. कदाचित् आपल्या गांवचे लोक अवचित तेथें येऊन आपलें दैन्य त्यांच्या दृष्टीस पडेल या भीतीनें त्यांनीं तेथून लवकरच मुक्काम हालविला. बहिणाचे आईबाप शिवभक्त होते. देवगांवीं शंकराचें स्थान असल्यामुळें त्यांना शिंगणापुरास जाऊन शंभु महादेवाचें दर्शन घ्यावें असें वाटलें. महादेवाच्या आसपास फारशी वस्ती त्या काळीं नसून तें एक वनच होतें. वाटेनें भिक्षा मागून पोट भरावें असें त्यांचें कष्टमय जीवित होतें. मधलीं लहान-मोठीं गांवें मागें टाकीत तीं दुर्दैवी माणसें निरा-नरसिंगपुरास आलीं. येथें निरा व भीमा यांचा संगम असून नरसिंहाचें प्रख्यात स्थान आहे. तेथेंहि स्नान करून व नरसिंहाचें दर्शन घेऊन हीं पंढरपुरास पोचलीं.

पंढरपूर व निरा-नरसिंगपूर यांमध्यें दहा कोसांचें अंतर आहे. तें अंतर भीमेच्या कांठानें जात जात त्यांनीं दोन-तीन दिवसांत तोडलें असेल. पंढरीस त्यांनीं पंचरात्र मुक्काम केला. बहिणाचें मन पंढरपुरास फार रमलें. प्राण गेला तरी पंढरीचें स्थळ व चंद्रभागेचें जळ सोडूं नये असें तिच्या मनानें घेतलें. तिनें चंद्रभागेंत स्नान केलें, पद्मालयींहि स्नान केलें; राही, रखुमाबाई, सत्यभामा, पांडुरंग यांचीं दर्शनें घेतलीं. पांडुरंगाची मूर्ति पाहून सर्व इंद्रियांसुद्धा तिचे नेत्र संतोषले. महाद्वारांतून प्रवेश करतांना तिच्या मनास महासौख्य झालें. तिनें देवास हर्षयुक्त होऊन प्रदक्षिणा घातली.

ही मंडळी चैत्री पौर्णिमेपर्यंत पंढरीस राहिली. त्यांचा ओढा पांडुरंगापेक्षां शिंगणापूरच्या महादेवाकडे जास्ती होता. चैत्री पौर्णिमेस पांच-पंचवीस कोसांतील भक्तजन कावडी घेऊन महादेवास पाणी घालण्याकरितां येतात. शंकराच्या दर्शनानें या यात्रेकरूंचें समाधान झालें. हें स्थान डोंगराच्या शिखरावर आहे व त्याच्या पायथ्याशीं शिंगणापूर गांव आहे. शिखरावर पंचरात्री क्रमिल्यानंतर ते निर्वासित शिंगणापुरास आले. तेथेंच कोरान्न मागून तीं माणसें सुखानें राहूं लागलीं. तें अन्न बहिणास अमृताप्रमाणें गोड वाटलें. त्याच स्थळीं नेहमींच राहण्याचा त्यांचा बेत असावा, पण त्यांना राहावयास मनाजोगें स्थळ तेथें मिळेना. तेव्हां बहिणाच्या भ्रतारानें सासू-सासऱ्यांच्या विचारानें जेथें ब्राह्मणसमुदाय मोठा असेल त्या गांवीं जाऊन राहावें असें योजलें. त्या दृष्टीनें रहिमतपूर हा गांव त्यांस बरा वाटला.

## रहिमतपूरचें उपाध्येपण

शिंगणापूर हें सातारा व सोलापूर या जिल्ह्यांच्या सीमेवर आहे. त्याच्या दक्षिणेस माण देश तुडवून तीं माणसें रहिमतपुरास म्हणजे कृष्णानदीच्या रहाळांत आलीं. शिंगणापूर व रहिमतपूर यांजमध्यें दहा-पंधरा कोसांचें तरी अंतर आहे. रहिमतपुरास तीं सर्वजण भिक्षा मागत. त्या काळांत ब्राह्मणांना भिक्षा मागण्याची लाज वाटत नसे. म्हणूनच समर्थांनी ब्राह्मणांची ती मुख्य दीक्षा सांगितली आहे. सासरा कुळकर्णी व जांवई जोशी अशा दुकलीनें मोठ्या ब्राह्मणवस्तीच्या रहिमतपूर गांवीं गेल्यावर कोठें ना कोठें तरी भोंक पाडलें असलें पाहिजे. त्यांना कोणा भल्या ब्राह्मणानें आपल्या घरीं बिऱ्हाडास जागा दिली असावी. रत्नाकरभटजी थोर स्नान-संध्या करणारा कर्मठ ब्राह्मण होता. त्याला पाहून कोणाहि सद्‌गृहस्थास पूज्यभाव वाटावा. तो काळ अस्वस्थतेचा होता तरी भक्तिमान् लोक काशीयात्रा करावयास चुकत नसत. रहिमतपूरच्या एका ब्राह्मणास काशीयात्रेस जाण्याची इच्छा झाली. पण तो पडला गांवचा उपाध्याय. दुसऱ्या एखाद्या ब्राह्मणास बदली द्यावा तर तोच उपाध्येपण खमाटून बसावयाचा. म्हणून त्या ब्राह्मणानें तसली भानगड न करतां त्याला हा पाहुणा रत्नाकर त्या कामाला बरा वाटला. म्हणून त्यानें त्याजवर उपाध्येपण सोंपवून आपण यात्रेस गेला.

रत्नाकरंभटजींचें दैव या घटनेमुळें कांहींसें फळफळलेंच म्हणावयाचें. गांव चांगला सुखवस्तु व मोठा. त्यांत प्रत्यहीं कोठें ना कोठें हव्यकव्य चालावयाचेंच. कोणाची मुंज, कोणाचें लग्न, कोणाच्या घरीं श्राद्धपक्ष तर कोणाच्या घरीं सटवाईची पूजा, शांतिपाठ वा बारसें. या कारणानें या सर्वांची एक वर्षभर तरी चांगली पोळी पिकली. एका वर्षानें गांवचा वतनदार उपाध्याय महायात्रा आटोपून घरीं आला, तेव्हां रत्नाकरभट व आवजी दोन पैसे गांठीं लावूनहि असतील. उपाध्यायहि सज्जन व कनवाळू होता. त्यानें परत आल्यावर त्या सर्वांना आणखी एक वर्ष ठेवून घेतलें. बहिणा अशी जरी गांवोगांव भटकत होती तरी तिचें संसारांत लक्ष नसून तिला वाटे 'सत्संगति करावी. कथा आयकावी, पुराण श्रवण करावें व ब्राह्मणांना पुजावें.'

हा काळ शिवरायाच्या उदयापूर्वीचा. सर्वत्र शांतता होती. साताऱ्यास तेव्हां हल्लींची प्रतिष्ठा आली नव्हती. या कारणानें एक नाशिक सोडल्यास

महाराष्ट्रांत मोठें नगर व क्षेत्र कोल्हापूर. तेव्हां रहिमतपुराहून कोल्हापुरास जाण्यास हीं माणसें सिद्ध झालीं. त्या मोठ्या नगरांत या पांच जणांनीं सतत ठिय्या दिला तरी निर्वाह चालण्यास हरकत नव्हती. रहिमतपुराहून कोल्हापुरास जाऊं लागलें कीं तो सारा कृष्णा-कांठच. जमिनी काळयाभोर, कृष्णेचें पाणी अमृततुल्य मधुर, मुलूख सुपीक, हवा सुरेख. अशा त्या प्रदेशांतून वीस-पंचवीस कोसांची मजल मारतांना त्या सर्वांना सुख वाटलें असेल. त्यांनीं वारणा ओलांडली व पंचगंगा जवळ केली. तेथेंच कोल्हापूर व त्यांतच असंख्य कुटुंबांची कुलस्वामिनी अंबाबाई. तिच्या पायापाशीं बहिणा आली. या वेळीं ती ११ वर्षांची पोरगी होती. तेव्हांचीं माणसें अगत्याचीं व आदरातिथ्यशील. आपल्या गांवीं येईल त्याचा स्वशक्त्यनुसार परामर्श घ्यावयाचा हें त्यांचें ब्रीद. आतां हीं माणसें पांच. त्यांना थारा देण्याइतकीं किती जणांचीं घरें त्या स्वराज्यपूर्वकालांत मोठीं असतील !

अशा स्थितींत परस्थांची वर्दळ आनंदानें सहन करणारा बहिरंभट हा रत्नाकरभटाला भेटला. बहिरंभट हा यजुर्वेदी ब्राह्मण. रत्नाकरहि यजुर्वेदीच. तो चांगला वेदान्ती व दोन्ही शास्त्रांत गति असलेला अग्निहोत्री होता. अशा सत्पात्र व प्रख्यात ब्राह्मणाच्या घरीं राहावयास बहिणास मिळालें हें तिचें थोर भाग्य नव्हे तर काय !

आतांपर्यंत बहिणानें जीं गांवें पाहिलीं त्या सर्वांत कोल्हापूर मोठें. ब्राह्मणसमुदायहि बराच असल्यामुळें नानाविध धार्मिक चळवळी तेथें चालत. तशांत अनेकांची कुलस्वामिनी महालक्ष्मीहि त्यांत. तिच्याहि दर्शनाकरितां परठिकाणचे लोक येत. कांहीं दिवस गेल्यावर फिरत फिरत जयरामस्वामींची स्वारी कोल्हापुरास आली. जयरामस्वामींची गणना पुढें दासपंचायतनांत झाली. अशा अधिकाराचे जयराम. ते सातारा जिल्ह्यांतील खटाव तालुक्यांत वडगांवीं राहणारे. तेथें अद्यापि त्यांचा मठ आहे. ते प्रख्यात कीर्तनकार व संत होते. त्यांच्या आगमनानें बहिणाला हर्ष व्हावा यांत नवल काय ! कोल्हापुरास त्यांचीं कीर्तनें भागवतावर चालूं लागलीं. तीं ऐकावयास बहिणा जात असे. त्यांत जी आत्मचर्चा चाले तिची बहिणाला भारी गोडी.

## बहिरंभटाची कपिला गाय

बहिणा ज्यांच्या घरीं बिऱ्हाडानें होती त्या बहिरंभटाला कोणी एकानें एका सोमवारीं कपिलागाय दान केली. हा सोमवार बहुधा श्रावणांतला असावा. ती गाभण गाय बहिरंभटानें रत्नाकरभटजीस देऊन टाकली. ती गाय कांहीं दिवसांनीं विऊन तिला एक कालवड झाली. ती कालवड कपिलाच असून तीहि बहिणाच्या मागोमाग कीर्तनास जाई व जणूं काय आपणांस कीर्तन कळतेंच आहे अशा थाटानें तिनें कीर्तन श्रवण करावें. या विचित्र करणीनें बहिणाचें नांव जयरामस्वामीपर्यंत गेलें व गांवभरहि तिची कीर्ति पसरली. जयराम कीर्तनांत तुकोबांचे अभंग म्हणत. त्यांचा अर्थ समजून बहिणाची भक्ति तुकोबावर जडली. या वेळीं तुकोबा ३० वर्षांचे असतील व त्यांनी अभंगरचना त्या पूर्वी चारच वर्षे सुरू केली होती. त्या चार वर्षांत त्यांचा रामेश्वर भटजीकडून छळ होऊन त्यांचे बुडालेले अभंग तेरा दिवसांनीं तरून कोरडे निघाल्याची वार्ता देहूपासून दोनशें मैलांवर असलेल्या कोल्हापुरासहि पोंचली होती.

अशा महान् साधूला आपण कधीं पाहूं असें बहिणाला झालें. बहिणा वांसराचे लाड फार करते व तिला जयरामहि नांवाजतात याचें वैषम्य रत्नाकरास वाटून त्यानें तिला अमानुष मारहाण केली. पुढें तें वांसरू मेलें व त्याची अद्भुतभक्ति पाहून जयरामस्वामीप्रभृतींनीं प्रेतयात्रा काढून त्यास पुरून टाकलें. त्या वांसरानें ज्ञानेश्वराच्या रेड्याप्रमाणें बहिरंभटापाशीं 'यत्कृपा तमहं वंदे परमानंदमाधवम्' असे उद्गार काढले होते. त्या चमत्कारानें सर्व लोक चकित झाले.

यानंतर बहिणा तुकोबाच्या दर्शनाकरितां अगदीं वेडी झाली. सात दिवस तिनें शोक केला. तेव्हां सातव्या दिवशीं तुकोबांनीं स्वप्नांत येऊन तिच्या मस्तकावर कर ठेवला व रामकृष्णहरि हा मंत्र कर्णरंध्रीं सांगितला. उलट बहिणानेंहि त्यांच्या पायावर मस्तक ठेवलें. हा चमत्कार रविवार कार्तिक वद्य ५ रोजीं झाला. तुकोबांनीं त्यामागून जयरामस्वामींनाहि स्वप्नांत येऊन 'बहिणाला दर्शन देऊन तुमच्या भेटीला आलों' असें सांगितलें.

बहिणाचा नवरा रत्नाकर पडला पक्का कर्मठ. ती शूद्र तुकारामाच्या नादीं लागली हें त्याला मुळींच खपलें नाहीं. त्याचें बहिणाबरोबर हें दुसरें

लग्न हातें. तें त्यानें मुलेंबाळें होऊन संसार चालावा या हेतूनें केलें होतें. तो हेतु बाजूला राहून बहिणा जर संतीण बनली तर आपलें पुढें काय होणार या काळजीनें तो व्याकूळ झाला. तोहि आपल्या ठिकाणीं म्हणाला, ' एवी-तेवी आपण प्रपंचांतून उठलों आहों, तर असें जिणें व्यर्थ घालवून काय करावयाचें ! यापेक्षां आपणहि गृहत्याग करून अरण्यांत तपश्चर्येस जावें. ' बहिणानें नवऱ्याची ही वृत्ति पाहून ' तो दगडाचा विठोबा व स्वप्नांतला तुकोबा ' यांना सोडून देऊन पतिसेवा करावी असा निश्चय केला. सारांश, संसार कीं परमार्थ असा पेंच बहिणास पडून ती संसारांत राहण्यास तयार झाली.

## पेंचांतून सुटका

पण ईश्वरानें बहिणास या पेंचांतून मोठ्या युक्तीनें सोडविलें. रत्नाकर सर्वांचा निरोप घेऊन वनांत जावयास निघणार तोंच तो अकस्मात् तापानें आजारी पडून हैराण झाला. एकूण एक महिना त्याचा आजारांत गेला. त्या काळांत बहिणानें त्याची उत्तम सेवा केली. त्याला पुष्कळ औषधें दिलीं, पण त्यांपैकीं कशाचाहि गुण येईना. त्याचें मन त्यास खाऊं लागलें. विठोबा व तुकोबा या दोघांनाहि आपण शिव्या दिल्याबद्दल त्यानें त्यांची क्षमा मागितली व तुकोबानें चमत्कार दाखवून आपणांस वांचवावें असें त्यास वाटलें. तेव्हां पांडुरंग वृद्ध ब्राह्मणाचें रूप घेऊन त्याजकडे आला व म्हणाला, ' तुझी बायको हरिभक्त आहे हें लक्षांत ठेव व तिला त्रास देत जाऊं नकोस. ' रत्नाकर बोलला, ' मी बायकोला नीट वागवीन पण माझा जीव वांचवा. ' ब्राह्मणानें त्याला आशीर्वाद दिला व रत्नाकरानें त्याला लोटांगण घातलें. त्या दोघांचें झालेलें हें बोलणें बहिणानें ऐकलें. इतकें झाल्यावर ब्राह्मण अदृश्य झाला व नवरा बरा होण्याच्या पंथास लागला.

रत्नाकर बरा झाल्यावर भक्तिमार्गाकडे वळला व आतां यापुढें कोल्हापुरास न राहतां देहूस जाऊन राहण्याचा त्यानें निश्चय केला. मग बहिणा, तिचा नवरा, तिचे आईबाप, भाऊ व गाय अशीं देहूस जावयास निघालीं. बहिणा या वेळीं गरोदर होती. हें तिचें पहिलें गर्भारपण असल्यास ती कमींत कमी सोळा वर्षांची तरी असेल व त्या हिशेबानें तिनें कोल्हापुरांत कमींत कमी पांच वर्षें वास केला असेल. कोल्हापुराहून देहूस येईपर्यंत या मंडळीला पंधरा दिवस सहज लागले

असतील. हीं माणसें देहूस पोंचलीं तीं इन्द्रायणीवरच गेलीं. कारण गांवांत त्यांची ओळखपाळख मुळींच नव्हती. त्यांनीं इन्द्रायणींत स्नान केलें, पांडुरंगाचें दर्शन घेतलें व तुकोबा देवाची आरती करीत होते तेथें ही मंडळी बसली. त्या वेळीं बहिणानें तुकोबाकडे निरखून पाहिलें तों स्वप्नांत त्यांना तिनें जसे पाहिलें होते तसेच ते दिसले. त्यांना तिनें नमस्कार केला व नवऱ्यानें साष्टांग नमस्कार घातला.

इतकें होत आहे तों दोन प्रहरची वेळ होत आली. तेव्हां कोठें तरी जेवणाची सोय पाहणें भागच होतें. त्यासाठीं रत्नाकर गांवांत ब्राह्मणांचीं घरें शोधीत निघाला. देहूंत कोंडाजी नांवाचा सात्त्विक, सुखवस्तु व अतीथ-अभ्यागतांचा सत्कार करणारा ब्राह्मण होता. त्यास रत्नाकर भेटला. कोंडोपंत त्यास 'अवश्य या' म्हणाला. पण रत्नाकराला भीड वाटली. त्यानें सांगितलें, 'आम्ही एक-दोघें नसून पांचजण आहों.' कोंडोपंत म्हणाला, 'कांही हरकत नाही. देवदयेनें माझ्या घरीं भाजी-भाकरीला कमी नाही. या, सर्वजण खुशाल या.'

### मंबाजीबुवा

अशा रीतीनें जेवणाची सोय लागली खरी. पण बिऱ्हाड कोठें ठेवायाचें ? इतक्यांत इतिहासप्रसिद्ध तुकोबाचा छलक मंबाजीबुवा त्यांच्या दृष्टीस पडला. तो स्वतःच्या घरांत शिरतच होता. तोंच त्याला घाई-घाईनें गांठून रत्नाकरानें त्याजपाशीं बिऱ्हाडास जागा मागितली. पण मंबाजी म्हणजे जमदग्नीचा अवतार! तो मुळीं त्याच्या अंगावरच आला. त्यानें त्या सर्वांना घराबाहेर हाकून लावलें. तेव्हां शेवटीं उरलें पांडुरंगाचें देऊळ. त्या देवळाच्या ओवरीचा आश्रय या मंडळींनीं केला व तेथें बिऱ्हाड ठेवून ती मंडळी कोंडोपंतांच्या घरीं गेली. कोंडाजीनें त्यांस आनंदानें जेवावयास घातलें. त्यानें त्या सर्वांचा आत्मा संतुष्ट झाला. भोजनोत्तर तुम्ही कोठून आला, कोठें चालला अशी त्यांची विचारपूस करून कोंडाजी बोलला, "आता सोमवती अमावास्या जवळ आली आहे, पर्वणी आहे. रोज देवळांत हरिकथा होत असते. ती ऐका. येथें रहा. भक्तिकोडें सुख घ्या. येथें तुकोबा भगवद्भक्त आहेत. ती वैष्णवांची माउली आहे. अन्नाची चिंता तुम्हांला नको. मी तुम्हांस भक्षावयाला धान्य देईन. मला तरी काय, तेवढेंच पुण्य."

बहिणा ज्या वेळीं देहूस राहावयास आली तेव्हां ती किती वयाची असावी ? ती कोल्हापुराहून निघाली त्या सुमारास तीन महिन्यांची गरोदर होती. म्हणजे तेव्हां ती सोळा वर्षांची तरी असावी. तिचा जन्म विद्वानांनीं इ. स. १६२८ तील धरला आहे. त्या दृष्टीनें ती देहूस इ. स. १६४४ सालीं आली असावी. ती देहूस आल्यानंतर सोमवती अमावास्या जवळ आली आहे असें कोंडाजी तिच्या मंडळींना म्हणाला. कार्तिकमासीं वासरूं मेल्यानंतर कांहीं दिवसांनीं बहिणानें कोल्हापूर सोडलें. कार्तिक महिन्यामागून तीन चार महिन्यांनीं देहूस बहिणा आली असें मानल्यास मोडकांच्या जंत्री-प्रमाणें शके १५६५ च्या माघ महिन्यांत सोमवती अमावास्या येते. इंग्रजी पद्धतीप्रमाणें ता. २९ जानेवारी १६४४ हा दिवस येतो.

बहिणा देहूस असतांना ती प्रसूत होऊन तिला काशीबाई नांवाची कन्या झाली. काशीबाईच्या पाठीवर बहिणा पुनः गरोदर राहून तिला विठोबा हा पुत्र झाला. तो बहुधा इ. स. १६४६ सालीं झाला असावा. त्यामागून तीन वर्षांनीं म्हणजे सन इ. स. १६४९ मध्यें तुकोबांनीं परलोकीं प्रयाण केलें. यावरून बहिणानें तुकोबाचे शेवटचे दिवस पाहिले असावे; इतकेंच नव्हे तर ती कदाचित् त्यांच्या प्रयाणसमयीं देहूस असून त्यांच्या प्रयाणानंतर देहूस राहण्याचें कारण संपलें म्हणून ती शिवपुरीं आपल्या गांवीं कायमची राहा-वयास गेली असावी.

असो; देहूस मंबाजीनें त्यांना विमुख दवडल्यावर बहिणाच्या माण-सांनीं पांडुरंगाच्या देवालयांत ओवरींत बिऱ्हाड ठेवलें. तें कांहीं दिवस तेथें असावें. पुढें बहिणाची भक्ति कसास लागून तिची गणना संतांत होऊं लागल्यावर देहूकरांनीं तिला सोयीची जागा पाहून दिली; व तें सर्व कुटुंब महादाजी कुळकर्ण्यांच्या घरीं राहावयास आलें व त्या घरींच तिचें काशी-बाईच्या वेळचें पहिलें बाळंतपण झालें; तेव्हां तिला वाटलें आपल्या पोटीं आपलें लाडकें वासरूंच आलें आहे. बहिणा ओवरींत राहत होती तेव्हां तिचा काळ मनाजोगा जात होता. तेथें दिनरात कथा चालत. कथा करणार प्रत्यक्ष तुकोबा. भक्तीचा केवळ पुतळा. मग त्या आनंदास काय पारावार ! तुकोबा कीर्तनांत वेदाचा अर्थ सांगत. तो ऐकून बहिणा समाधान पावली. तिच्या डोळ्यावरची झापड उडाली. तिच्या हृदयांत तुकोबा प्रवेशला.

मंबाजी हा प्रकार दुरून पाहत होता. हल्लींच्या भाषेंत बोलावयाचें तर बुवाबाजी हा त्याचा धंदा होता. त्या धंद्याला तुकोबाच्या पांडुरंगावरील नितांत भक्तीनें खो बसतो हें त्याला सहन होईना. त्यानें त्या सर्वांना आपलें शिष्यत्व पत्करण्याची गळ घातली. पण त्या सर्वांनीं तें ऐकलें न ऐकल्यासारखें केलें. तरीहि त्यानें त्यांचा पिच्छा सोडला नाहीं. आणखी दोन-तीनदां त्यानें तेंच टुमणें लावलें. तेव्हां रत्नाकरभटजींनीं पुढें होऊन सांगितलें कीं, ' आम्ही कोल्हापुरासच अनुग्रहीत झालों आहों. तुकोबा स्वप्नांत आले व त्यांनीं आम्हांला अनुग्रह दिला. ' हें ऐकून मंबाजीचें पित्त खवळलें. तो म्हणाला, " काय सांगतां ! अहो, स्वप्नांत कोठें अनुग्रह होत असतो काय ? आणि ती अनुग्रह कोणाचा ? तर म्हणे तुकोबाचा ! तुका शूद्र ? त्याला कसचें ज्ञान नि कसला अधिकार ? तुम्ही ब्राह्मण आहां. ब्राह्मणांनीं शूद्राची भक्ति करणें हा अधर्म आहे. ती तुम्ही कराल तर ब्राह्मण तुम्हांला वाळींत टाकतील."

मंबाजी पुढें एके दिवशीं वाटेनें चालला होता. त्याला पाहून बहिणा मुद्दाम त्याला नमस्कार करावयास गेली. तो येरू दूर पळूं लागला व शिवूं नको म्हणाला. एवढेंच म्हणून तो थांबला नाहीं. तो चिडून तिचें ब्राह्मण्यहि नाकारूं लागला. " तुमची जात मला माहीत नाहीं. मी तुम्हांला शूद्र समजतों. तुम्ही एक सोनार असाल नाहीं तर गोळक असाल. कारण तुमची वागणूकच ब्राह्मणासारखी नाहीं, असें असून जर कोठें तुम्ही ब्राह्मण म्हणून जेवावयास जाल तर मी तुम्हांला दिवाणांत घालीन. " मंबाजीनें ही दिलेली धमकी बहिणानें नवऱ्यास सांगितली आणि नवऱ्यानें ती महादाजी कुळकर्णी व कोंडाजीपंत यांच्या कानावर घातली. ते म्हणाले, ' तुम्हांला त्याच्याशीं करावयाचें आहे काय ? चला आमच्या घरीं. ' मंबाजीचा नाद बहिणादिकांनीं सोडला तरी मंबाजी त्यांच्या राशीस पक्का लागला. तो त्यांना म्हणे, ' तुम्ही ब्राह्मण आणि शूद्राला गुरु करतां कसे ? ' वास्तविक बहिणा देहूस येण्यापूर्वीच तुकोबानें इंद्रायणीच्या डोहांत रामेश्वरभटाच्या आज्ञेवरून टाकलेल्या अभंगांच्या वह्या कोरड्या निघाल्या होत्या व रामेश्वरभटहि तुकोबाचें श्रेष्ठत्व ओळखून त्याचा शिष्य झाला होता. हें सर्व माहीत असतां मंबाजी तुकोबाला कमी कसा लेखीत होता याचें नवल वाटल्याशिवाय राहत नाहीं.

## मंबाजीचा हट्ट

कांहीं केलें तरी बहिणा व रत्नाकर बधत नाहींत असें पाहून मंबाजी अधिकच हट्टास पेटला. तो त्यांना बहिष्कृत करण्याच्या खटपटीस लागला. त्या वेळीं पुण्यास आपाजी गोसावी हा एक अतिविख्यात राजयोगी राहत होता. त्याला मंबाजीनें पत्र पाठविलें, " तुकोबा गोसावी हा शूद्र वाणी आहे. तो देवळांत नेहमीं कथा करतो. त्याच्या पायां ब्राह्मण पडतात. रामेश्वरभट अतिथोर योगी आहेत, तेहि त्याला नमस्कार करतात. हा मला अन्याय वाटतो. तरी तुम्ही तुकोबाला बांधून नेऊन दंड करा. येथें एक स्त्रीपुरुष आले आहेत. ते आपणांस ब्राह्मण म्हणवितात. पण आहेत सोनार. त्यांना कुळकर्णी मान देतो. ते तुकोबाचे शिष्य झाले आहेत. यामुळें स्वधर्माचा लोप होत आहे. तरी तुम्ही स्वामींनीं त्यांचें रक्षण करावें. "

हें पत्र वाचून आपाजीला क्रोध आला व त्यानें तुकारामाला शिक्षा करण्याचा निश्चय केला; तथापि त्यानें पुढें काय केलें हें बहिणानें आत्मचरित्रांत सांगितलें नाहीं. पण त्याला तुकोबाचें कांहीं वांकडें करतां आलें नाहीं असें दिसतें. कारण तसें कांहीं होत नाहीं असें पाहूनच कीं काय मंबाजी गोसावी बहिणा व तिचा नवरा यांच्यामागें लागला कीं तुम्ही देहू सोडून चालते व्हा. याच्या मुळाशीं आणखी एक कारण असावें तें हें कीं, तुकोबाच्या पाठोपाठ बहिणाचेहि देव्हारे देहूंत माजूं लागल्यामुळें त्याला तुकोबाच्या जोडीस हा नवा शत्रु उभा राहिलासा वाटला असावा.

मंबाजीनें आतां बहिणाच्या प्रत्यक्ष छळाला सुरुवात केली. बहिणा देहूस आली तेव्हां तिच्याबरोबर कोल्हापुरास बहिरंभटांनीं दिलेली गायहि आली होती. ही गाय अद्यापि आटली नसून थोडेसें दूध देत होती. तिचें वासरूं कोल्हापुरांत मेल्यावर ती आतांपर्यंत पुनः व्याली नसावी. त्या बिचाऱ्यांना त्या गाईपासून जें चुळकाभर दूध मिळत होतें तें त्यास पाहवेना. तेव्हां मंबाजीनें त्याच्या बागेंत ती शिरल्याचें निमित्त करूनच कीं काय, तिला आपल्या घरांत बांधून घालून सोट्यानें चोपलें. गाय गांवांत कोठें दिसेना. तेव्हां बहिणानें ती मात तुकोबाला सांगितली असावी. ती ऐकून तुकोबा व्यथित झाले. त्यांना गाईनें स्वप्नांत येऊन सांगितलें –

" अरे तुकोबा ! पाहातोस काय ! मला फार कष्ट होत आहेत. तीन रात्रीं मला खुंट्याला बांधलें आहे. मला चारा नाहीं कीं पाणी नाहीं; व कोठें पळूनहि जातां येत नाहीं. "

हें स्वप्न पडल्यावर तुकोबा जागे होऊन पाहतात तों त्यांची पाठ सुजलेली. ती सूज कमी होईना. त्यांच्या पाठीवर सोट्याचे वळ दिसत होते ते पाहून सर्व जन कष्टी झालेले देखून तुकोबांनीं त्यांना स्वप्नांतील हकीगत सांगितली. त्यानंतर तुकोबानें विठोबाचा धावा सुरू केला. तो म्हणाला, " पांडुरंगा ! गायीला कोणी कोठें बांधून ठेवलें आहे तें समजत नाहीं. तरी नारायणा ! तिचें रक्षण कर. "

येथें ईश्वर पुनः बहिणाच्या मदतीस आला. ती आग विझविण्यास लोक धावत गेले. ते आग विझवीत असतांना आंत पाहतात तों तेथें गाय बसलेली. त्यांनीं गाय दाव्याची सोडवून आणिली तेव्हां तिच्या पाठीवर माराचे वळ दिसले. जनांनीं रत्नाकरास बोलावून ती गाय त्याच्या स्वाधीन केली. तुकोबांनाहि ही वार्ता कळतांच तेहि धावून आले व तिला प्रदक्षिणा घालून म्हणाले, " माते, तूं माझ्या स्वप्नांत येऊन माझा धावा केलास. तुझा व माझा आत्मा एक आहे याची मला निश्चित साक्ष आली. " रामेश्वरभटासहि ही वार्ता समजली. त्यानेंहि तेथें येऊन तुकोबाचें दर्शन घेतलें व गायहि पाहिली. तुकोबा व गाय या दोघांची पाठ सुजलेली पाहून ते सर्व लोक रडूं लागले. ते म्हणाले, ' तुकोबा केवळ पांडुरंग आहे. '

मंबाजीचे या घटनेनें तरी डोळे उघडावयास पाहिजे होते. त्याची आतां इतकी फटफजिती व विटंबना झाली होती कीं त्याला गांवांत तोंड दाखविण्यासहि जागा राहिली नव्हती. देहू गांवांत त्याला बरे म्हणणारा एकहि माणूस उरला नसेल. अशा स्थितींत मंबाजी शुद्धीवर येऊन तुकोबास मानूं लागला असेल काय !

बहिणा देहूस असतां ती व तिचा नवरा आपणांस तुकारामाचे शिष्य म्हणवीत असले तरी बहिणास नवऱ्याच्या देखत तुकारामास नमस्कार करण्याची भीति वाटत असे. म्हणून नवरा पुण्यास कांहीं कामाकरितां गेला असल्याची संधि साधून बहिणानें पांडुरंगाच्या देवळांतील ओवरींत त्रिरात्र राहण्यास आईची परवानगी घेतली. ती म्हणते, " मी डोळे मिटून

बसलें असतां तुकारामाची मूर्ति पाहिली. त्यांनीं मजबरोबर बोलून माझ्या मस्तकावर हात ठेवला. आणि कवित्वाचें वरदान दिलें. मग डोळे उघडले तों 'रामकृष्णहरि' हा मंत्र आठवला. त्या वेळीं जें सुख झालें तें वाचेनें सांगतां येत नाहीं. मला तेथून उठूं नयेसें वाटलें. मग मी इन्द्रायणींत स्नान केलें व परत येऊन पांडुरंगाचें दर्शन घेतलें. तुकोबाला नमस्कार केला व बिऱ्हाडीं आलें. तेव्हांपासून बोलण्याची स्फूर्ति मला झाली."

या वेळेपासून बहिणा अभंग करूं लागली. तिला लिहितां वाचतां येत नसावें. तिला ब्रह्मज्ञान झालें तें पुराण, कीर्तन व भजन यांच्या श्रवणानें आणि शेवटीं तुकोबांच्या कृपेनें. अर्थात् तिचें ज्ञान शाब्दिक नसून अनुभवजन्य होतें. तें मिळविणें हें एकच तिचें ध्येय असल्यानें त्याप्रीत्यर्थ तिनें अनंत यातना सहन केल्या. ती तोंडानें सहजस्फूर्तीनें अभंग सांगत असावी व ते दुसऱ्याकडून लिहून घेत असावी.

बहिणा बरींच वर्षे देहूस राहिली असावी. कदाचित् तुकोबाच्या प्रयाणापर्यंतहि ती देहूस असेल. तिनें ज्या वेळीं देहू सोडलें त्या वेळीं तिचे आईबाप व भ्रतार हीं जिवंत होतीं कीं काय न कळे. पण देहूहून आपल्या माहेरीं म्हणजे देवगांवीं न जातां सासरीं म्हणजे शिवपुरास-शेऊरास ती रहावयास गेली. तेव्हांपासून तिचें आयुष्य ऐहिक दृष्ट्या सुखाचें गेलें असावें. ती मेली तेव्हां तिचा नवरा जिवंत असणें शक्य नव्हतें. कारण तेव्हां ती स्वतःच मुळीं ७२ वर्षांची होती. तर तिचा नवरा १०० वर्षेपर्यंत कोठून जगणार ! म्हणून नवऱ्याच्या पश्चात् तिनें बरींच वर्षे वैधव्यांत काढलीं असलीं पाहिजेत. तिला काशीबाई व विठोबा हीं दोन मुलें होतीं. विठोबा हाहि आईसारखाच देवभक्त असून त्याला मुलेंबाळें झालीं असलीं पाहिजेत. तो मातेचा आज्ञाधारक होता व बहिणाबाईची गणना संतमंडळींत होऊन तिची कीर्ति सर्वत्र पसरली होती.

तुकोबाच्या निर्गमनानंतर महाराष्ट्रांत सर्वश्रेष्ठ असे रामदास हे एकच साधु उरले. बहिणा तुकोबानंतर ५०।५१ वर्षे जगली असल्यानें तिला इतक्या प्रदीर्घ काळांत रामदासांचा समागम व्हावासा वाटावा हें स्वाभाविक होय. तिनें तुकोबाचा अनुग्रह पूर्वीच घेतला असल्यामुळें ती आतां समर्थांची अनुगृहीत शिष्या होणें शक्य नव्हतें. पण शिष्यत्व न पत्करलें म्हणून त्यांच्या

दर्शनास जाण्यास हरकत काय ? तशी ती गेली असतां समर्थांनीं तिला दिलेली वीतभर लांबीची दासमारुतीची मूर्ति तिच्या वंशजांच्या राममंदिरांत शेऊरास अद्यापि आहे. तिचे वंशजहि तेथें आहेत.

बहिणाचा पुत्र विठोबा हाहि भक्त होता. त्याची पत्नी रुक्मिणी बहिणाच्या मृत्यूपूर्वी अवघी १८ च दिवस दिवंगत झाली होती. बहिणाला स्वतःचा मृत्यु अगाऊ १८ दिवस कळला होता. आश्विन शुद्ध प्रतिपदा हा तिनें आपला अंतकाळाचा दिवस विठोबास सांगून ठेवला होता. ती त्याला सांगते 'मी अंतकाळीं सूर्योदयापूर्वी तीन घटिका उत्तराभिमुख अशी आसनावर बसून ध्यानमुद्रा लावीन. तेव्हां : विठोबा ! तूं माझ्या पाठीशीं बैस.' समाधान कसें प्राप्त होतें ? त्याचें उत्तर 'भाव तेथें भक्ति। भक्ति तेथें ज्ञान। ज्ञान तेथें समाधान' असें ती देते. बहिणाला आपले पूर्वीचे बारा जन्म आठवत असून त्यांचें सविस्तर वर्णन तिनें विठोबास सांगितलें.

'माझें आयुष्य तेरा जन्म मिळून ३५१ वर्षें होतें' असें ती म्हणते. 'आरशांत जसें रूप दिसावें तसे मला पूर्वजन्म दिसतात.' बहिणाच्या काळांत ढोंगी संत पुष्कळ असत. त्यांपैकीं खऱ्याखोट्यांची पारख करणारी जनता होती. ती वाटेल त्याला साधु म्हणण्याजोगी भोळी नव्हती. मंबाजी व रामेश्वरभट यांच्या निंदेतूनच तुकोबांचें साधुत्व तावूनसुलाखून निघालें. त्याविषयीं बहिणा व तिचा पुत्र विठोबा यांचे बोल विचारार्ह आहेत. बहिणा म्हणते 'घरोघरीं संत जाले कलीमाजी। केज्यावरी भाजी तैशा परी। शेवटीं तें आतां सांगतसें लोकां। मनीं धरा निका सत्य भाव.'

विठोबा म्हणतो 'उदर भराया केलें असें ढोंग। घरोघरीं बोंब उपदेशाची। आपणा कळेना लोकां सांगे ज्ञान। धरोनिया ध्यान बका ऐसें। स्वयें बुडोनिया लोकां बुडविती। हात धरुनि जाती यमलोका।

## चाकणचा कचेश्वर

कचेश्वर हा चाकणच्या ब्रम्हे घराण्यांतील. त्याचे वडील सिद्धेश्वरभट यांजवर शिवाजी महाराजांची फार निष्ठा होती. त्यांच्या अनुष्ठानानें आपले मनोरथ सिद्धीस गेले या श्रद्धेनें महाराजांनीं त्यांस शंभर होनांचें वर्षासन नेमून दिलें. सिद्धेश्वरभटजी वैदिक ब्राह्मण होते. त्यांच्या काळांत वारकरी

पंथ व भक्तिमार्ग यांचा प्रसार बहुजनसमाजांत झाला असला तरी इतर वैदिक व शास्त्रीमंडळीप्रमाणें तेहि त्या पंथापासून अलिप्त होते. तथापि त्यांजवर नसला तरी त्यांचा पुत्र कचेश्वर याजवर त्या पंथाचा प्रभाव पडून तो तुकोबाचा भक्त बनला. अर्थात् ही भक्ति तुकोबांच्या अवतारसमाप्ती-नंतरच कचेश्वरांत उद्भवली हें उघड आहे. ही परिणति होतांना कचेश्वराच्या मार्गांत काय अडचणी आल्या तें त्यानेंच आपल्या चरित्रांत अभंगरूपानें वर्णिलें असल्यामुळें त्याचा आशय गद्य स्वरूपांत देत आहें. तो वाचकांस उद्बोधक वाटणार आहे.

"मला वेदविद्येशिवाय इतर कांहीं माहीत नव्हतें. मी कोणाच्याहि कीर्तनाला जात नसें. कीर्तनकारांची मीं निंदाच करावी. काम, क्रोध व लोभ यांनीं मी पूर्णपणें ग्रासला गेलों असून लोकांशीं उद्धटपणानें मीं वागावें. स्नान व संध्या यांजवर माझी काडीइतकीहि निष्ठा नव्हती. मात्र गर्वानें अगदीं फुगून गेलों होतों. कोणी ब्राह्मण वेदविद्या पढत बसले असले म्हणजे त्यांना छळावें व चिडवावें असें मला वाटे. पापपुण्याची तर मला क्षिती नव्हती.

"एकदां कांहीं प्रापंचिक कामासाठीं जुन्नरास गेलों होतों. तेथें कृष्णं-भटांच्या घरीं असतां त्यांनीं मला देवाच्या पूजेस चलण्याविषयीं आग्रह केला. पण मी तिकडे लक्ष दिलें नाहीं. तथापि मनाला मात्र चुटपुट लागली. रात्रीं झोपीं जातांना विचार आला कीं उद्यां दिवस उगवल्यावर आगमग्रंथ धुंडाळून त्यांतून शाक्तपंथाचा मंत्र घ्यावा. झोपेंत मला स्वप्न पडलें, 'मी सहस्रभोजनास बसलों असून तेथें कृष्णंभट आले आहेत. त्यांचें रूप अद्भुत होतें. त्यांच्या सुंदर मुद्रेवर मंद स्मित विलसत होतें. त्यांनीं मला हात जोडून विनविलें कीं 'तूं मंत्रशास्त्र शिकूं नकोस. तें भलें नव्हे. त्याऐवजीं मी सांगतों तें कर.' त्यांनीं माझ्या कानाशीं येऊन प्रणवाक्षराचा जप करण्यास सांगितलें. हा उपदेश ऐकतांच माझी चित्तवृत्ति पालटूं लागली. आपण गीता पढावी व तिजवरची टीका आनंदें पाहावी असें वाटलें. त्याप्रमाणें मीं गीतापठनाचा क्रम चालू केल्यावर मला तीर्थरूपांनीं ताडन करून गीतार्था-पासून परावृत्त केलें.

"पण त्यांचें न ऐकतां मीं भक्तिपूर्वक गीतेचें पठन चोरून चालू ठेवलें. मग मी विजापुरास वडिलांच्या भीतीनें गेलों. तेथें नारायणानें स्वप्नांत

येऊन गीतापाठांत माझ्या ज्या चुका होत असत त्या दुरुस्त केल्या, आणि मजकडून सारी गीता म्हणवून घेतली; व माझ्या मस्तकीं हात ठेवला. तेव्हां-पासून गीता चोरून म्हणण्याचें सोडून देऊन प्रकटपणें गीता म्हणूं लागलों; आणि गीतेचा मला अगदीं छंदच लागला. जर का एखादे दिवशीं सकाळीं मजकडून गीतापठनांत खंड पडतोसा दिसला कीं कोणी दिव्य दिगंबर नर माझ्या डोक्यांत दगड घालावयास धावे. मी नित्य भक्तीनें लिंगपूजा करावी, गीतेचा एक अध्याय वाचावा, विष्णुसहस्रनामाचा जप करावा व इतर व्याप कांहींहि करूं नये.

" असें करीत असतां एकदां मला विषबाधा झाली. शरीर क्षीण होत चाललें, विष पाडण्याचे नाना यत्न केले, पण व्यर्थ. विषामुळें सारखी धाप लागली. रात्रंदिवस झोप येईना. हे हाल सोसण्यापेक्षां मृत्यु आला तर बरा असें वाटलें. इतक्यांत चाकणांत मरीची साथ उद्भवल्यामुळें मी सिरोलीस गेलों. तेथें जें कांहीं सुख लाधलें तें काय सांगावें ! त्या गांवीं हरिकथा होत असे. तिला जाऊन ती लक्षपूर्वक ऐकावी. त्याचा मजवर विलक्षण परिणाम होऊन मलाहि आपण कीर्तन करावें व संतांना नमन करावें असें वाटे. म्हणून मी खेडास जाऊन नारायणास भेटलों व त्यांजपाशीं तुकोबाचीं पांच पद्यें आल्हादपूर्वक लिहून मागितलीं. त्यांनीं मला अंबाजीपंत लोहगांवकर यांजकडे जाण्यास सांगितलें. कारण त्यांजपाशीं तुकोबांच्या अभंगांच्या सर्व वह्या आहेत असें ते म्हणाले.

### कचेश्वराचें स्वप्न

" नारायणांची आज्ञा घेऊन भक्तिपूर्वक विठोबाच्या देवळांत आलों. तेथें मीं देवाचें दर्शन घेतलें, मन आनंदलें, संतमुखांतून कीर्तन ऐकलें. कथा संपल्यावर मला एक अलौकिक कौतुक दिसलें. ' प्रत्यक्ष तुकोबा कीर्तन करीत आहे. आनंदानें सारखा डुलत आहे. ज्याप्रमाणें प्रचंड वायूनें कर्दळी हालते तसा तुकोबा हालतो आहे. तेव्हां मला वाटलें कीं हा पडतो कीं काय ! म्हणून त्याला सावरून धरण्याकरितां खांदा देऊं लागलों. तरी तो आवरता आवरेना. त्याचा तो भार एक प्रहरभर सहन केल्यानें माझें शरीर क्षीण झालें. त्यानें माझा भाव जाणिला व कथा पूर्ण केली. माझ्या माथ्यावर हात ठेवून तो गुप्त झाला. ' असें मला स्वप्न पडलें. त्या दिवशीं तुकोबानें

मला स्फूर्ति दिली. मीं एकदा कथा केली. मला स्वराचें व तालाचें ज्ञान नव्हतें तरी तुकोबानें कौतुकानें मजकडून कथा करविली.

" त्या दिवसापासून विषबाधेनें जी जी व्यथा मला जडली होती ती ती सर्व गेली. अशा रीतीनें प्रचीत घडल्यावर मीं लोकांची लाज सोडली. मी मनाशीं म्हणालों. ' मला इतरांशीं काय करावयाचें आहे ? ' ब्राह्मणांनीं हें सर्व पाहिलें. ते म्हणूं लागले कीं याला मोठ्या भुतानें झपाटलें आहे. त्यांनीं द्वेषबुद्धीनें माझ्या बापापाशीं गाऱ्हाणें सांगितलें. ते म्हणाले, ' काय तुमचा मुलगा ! चांगला आमच्यापैकीं वैदिक. पण त्याची आम्हांला लाज वाटूं लागली आहे. नाचतो काय बाजारांत. त्याला शिक्षा करा. त्याला तुम्ही घरांत येऊं देऊं नका. भलत्याच जातीच्या मनुष्याला आलिंगन देतो. '

" बापानें ब्राह्मणाच्या मुखांतून हें वर्तमान ऐकल्यावर त्याला फार दुःख झालें. ते फार कष्टी झाले. ते क्रोधानें म्हणाले, ' कसला पापी पोरगा माझ्या पोटीं आला. त्याला मीं पढविलें, सर्व शिकविलें. तें सर्व वाया गेलें. काय करावें ! माझ्या कष्टांचें सार्थक कांहीं झालें नाहीं. ' मग तीर्थरूपांनीं रागावून माझी सांडी केली, मला वेगळें घातलें, पण थोडेंबहुत अन्नवस्त्रहि दिलें. आपल्या अर्भकाला वेडें केलें अशा भावनेनें ते संतांना गालिप्रदान करूं लागले. कोणी ब्राह्मण म्हणाले, ' याला वाळींत घाला. ' ते मजपाशीं येऊन तसेंच म्हणतांच मीं त्यांना सांगितलें, ' खुशाल घाला. ' तेव्हां मात्र ब्राह्मणांची बडबड थांबली.

" ब्राह्मण जातींतून माझी अशी हकालपट्टी झाल्यावर मला दुरून दीनवाणें देखून मला सांभाळावयास कोणी हरिभक्त आले. त्यांनी मला आशीर्वाद दिला ' तूं धन्य आहेस. कांहीं चिंता करूं नकोस. ' त्यांच्या या आशीर्वादावर मीं विश्वास ठेवला. ईश्वराची माया काय अगम्य आहे ! ती कोणासहि कळत नाहीं. कारण ईश्वरानें लवकरच कृपा केली. पंतांचें पत्र मला आलें कीं नारायणानें चऱ्होली गांव मला मोकासा दिला आहे. तें पत्र वाचून ईश्वर आहे यावर माझा विश्वास बसला.

" त्यानंतर निःस्पृह राहावें असें मीं ठरविलें. चऱ्होलीस मला तळ्यापाशीं राहण्यास स्थळ देण्यांत आलें. त्या स्थळीं मी जाऊन राहिलों. त्या

स्थळीं एक विहीर असावी अशी वांच्छा झाली. तीहि देवानें पूर्ण केली. मग वाटलें कीं पूजेला महाविष्णूची मूर्ति असावी. तीहि देवानें अवचित दिली. आपणांस कथा करण्यास विस्तीर्ण स्थळ मिळाल्यास चांगलें असें मनांत आलें. देवानें तेंहि मिळवून दिलें. मी मूळचा वैदिक ब्राह्मण. ते पूर्व-संस्कार आठवून स्मार्ताग्निसहित अग्निहोत्र घ्यावें अशी प्रवृत्ति झाली. त्यास लागणारें साहित्य देवानें पुरविलें. मग वाटलें कीं आता आपण देवाची स्तुति करावी. तें ओळखून देवानें मला कवित्वाची स्फूर्ति दिली. अशा रीतीनें जो जो हेतु मनामाजीं आणावा तो तो माझ्या स्वामीनें पुरविला. कशाचेंहि त्यानें उणें पडूं दिलें नाहीं. संसाराची चिंता मला मुळींच राहिली नाहीं.

## कचेश्वराचा अनुभव

" माझा अंगीकार देवानें केला आहे असा मला पूर्ण अनुभव आला. मायबाप जसे बाळाला पाळतात तसा देव मला पुढून व मागून संभाळीत आहे. माझ्या हृदयसंपुटांतच देव आला असल्यामुळें आतां वणवण करण्याचें मला कारणच काय ? माझा अभिमान धरून देव माझा योगक्षेम चालवीत आहे. तो मला कशाचेंहि उणें पडूं देत नाहीं. जें मीं इच्छावें तें मला मिळतें. देव माझी स्नानसंध्या चालवितो. अहोरात्र मजकडून कथा करवितो. जेथें मी आहें तेथें देव आहे. मला तो संकटाचा वारा लागूं देत नाहीं. माझा स्वामी माझीं संकटें परभारें वारितो. पुढें कांहीं घडणार असेल त्याची सूचना तो मला आगाऊ देतो व मला सावध राहण्यास सांगतो. असे स्वामीचे उपकार मीं किती आठवावे ! त्याचे सर्व खेळ अगणित आहेत. तो अनंत ब्रह्मांडें व्यापून निराळाच उरला आहे. त्याच्या इच्छेवांचून एक काडी कीं एक पान हलत नाहीं. त्याच्या सत्तेनें हें जग चालतें व बोलतें; हानि, मृत्यु, लाभ, उत्पत्ति, प्रळय, स्थिति, समुदाय यांचा कर्ता तोच आहे. याचा पार वर्णणारा कोण आहे ? वेदहि स्तवितां शिणले. ब्रह्मादि-कांनाहि त्याचा अंत लागला नाहीं. साधक सारे शिणले. तोच दीनावर कृपा करील तर चारी भुक्तिमुक्ति दासी होतील. स्वामीचें एक वर्म आहे. तो फक्त एका भक्तिभावानें वश होतो. या कलियुगांत वर्णाश्रम धर्म करून सत्कर्म आचरावें. हीच प्रेरणा देऊन तो महाविष्णु कथा करवितो व नित्य

चालवितो. पुढें काय होणार हें नारायण जाणें. सद्यःस्थिति मात्र अशीच आहे. कचेश्वराकडून हे अनुभवाचे बोल देव वदवीत आहे."

अशा कचेश्वराची गणना साधूंत व्हावी यांत नवल काय! त्याजवर चाकणकरांची श्रद्धा बसून त्यांनाहि त्याच्या साधुत्वाचा प्रत्यय कालेंकरून आला. शालिवाहन शके १६०७ मध्यें चाकण चौसष्टींत पाऊस अजिबात जाऊन लोक हवालदील झाले. त्या वेळीं चाकणचा किल्लेदार व फौजदार यांनीं समस्त ब्राह्मणांना बोलावून अनुष्ठानास बसविण्यास ग्रामस्थांना सांगितलें. त्याप्रमाणें ग्रामस्थांनीं ब्राह्मणांना मिळवून अनुष्ठान केलें. हें अनुष्ठान ११ दिवस चाललं होतें; पण पाऊस न पडे. अशा स्थितींत ब्राह्मणांनीं ग्रामस्थांना सांगितलें कीं, आमचा मुख्य महंत जो कचेश्वर त्याला तुम्हीं आणविलें तरच तुमचा हेतु सिद्धीस जाईल; ब्राह्मणांचा हा मनोदय जाणून गांवकऱ्यांनीं कचेश्वरास बोलाविलें.

कचेश्वराने येतांच ग्रामस्थांकडून ब्राह्मणांना निरोप देवविला आणि आनंदगिरीच्या मठांत हनुमंताचें देऊळ आहे, त्या देवळांतील मंडप हरि-कथेकरितां मला द्या, मी देवाचा धावा करतों म्हणजे पर्जन्य पडेल यांत संशय नाहीं असें सांगितलें. कचेश्वराची आज्ञा मान्य करून गांवच्या पुढाऱ्यांनीं हरिकथेचें साहित्य केलें. मग कचेश्वराने कथेस आरंभ करतांच अहोरात्र पाऊस पडून त्यानें अगदीं पुरेपुरेसें केलें. त्यायोगें संतुष्ट होऊन चाकण परगण्यांतील प्रत्येक गांवानें प्रतिवर्षीं कचेश्वराला १ होन व १ मण धान्य द्यावें असा लेखी करार शके १६०७ माघ शुद्ध ७ स करून दिला. म्हणजे कचेश्वराला प्रतिवर्षीं ६४ होन व ६४ मण धान्य मिळूं लागलें.

हा करार छत्रपति संभाजीच्या कारकीर्दींत करण्यांत आला. त्यानंतर छत्रपति शाहूमहाराज यांनीं शके १६५२ वैशाख शुद्ध पंचमीस त्याजवर आपलें शिक्कामोर्तब केलें.

कचेश्वराचें हें चरित्र अनेक रीतींनीं बोधप्रद व मननीय आहे. त्याचा आत्मविकास कसा होत गेला हें त्यावरून कळतें. कचेश्वर स्वतः वैदिक होता व त्याचे वडील सिद्धेश्वर हे वैदिक असून शिवछत्रपतींनीं त्यांना गुरु मानलें होतें. असा हा वैदिक ब्राह्मणवर्ग वारकरीपंथांत कांहीं ढवळाढवळ करीत नव्हता पण त्यांत सामील होण्यासहि तयार नव्हता. विद्वान् ब्राह्मण वार-

करीपंथांत शिरून त्यांतील अज्ञ व हीन आचाराच्या लोकांशीं बरोबरीच्या नात्यानें वागण्यास कबूल नव्हते. ते ब्राह्मण कर्मठ होते व वैदिकधर्मानें चालणारे होते. ब्राह्मणांनीं स्नानसंध्या करावी, वेदाध्ययन व शास्त्राध्ययन करावें, शास्त्रांत सांगितल्याप्रमाणें आचार पाळावा या मताचे ते होते.

पण कचेश्वर हा नवीन पिढींतला असल्यामुळें त्याला वारकरीपंथांतील जिवंतपणा कळल्यावर तो तुकोबाचा भक्त बनला. ज्ञानेश्वरानंतर वारकरी-पंथांतील अत्यंत प्रभावशाली संत तुकोबा होत. तुकोबांची छाप अखिल बहुजनसमाजावर बसली होती, इतकेंच नव्हे तर ब्राह्मणांतील कित्येक विद्वान् तरुणहि त्याला शरण गेले होते. कचेश्वर हें त्यांपैकीं एक ढळढळीत उदाहरण होय. कचेश्वराची अहंकारबुद्धि नष्ट होऊन तो शूद्र व अज्ञ अशा वारकऱ्यांना उघडपणें आलिंगन देऊं लागला.

कचेश्वर प्रारंभीं वेदविद्या शिकलेला असून मनानें इतका नास्तिक व बेताल बनला होता कीं, वैदिकांची टवाळी करण्यासहि कचरत नसे. पण स्वप्नांतील एका दृष्टान्तानें त्याच्या वृत्तींत पालट पडून तो गीताध्ययन करूं लागला. त्यानंतर तुकोबा स्वप्नांत येऊन त्याच्या उपदेशानें तो भक्तिमार्गाकडे वळला. त्याला बापानें घराबाहेर काढलें व ब्राह्मणांनीं त्याला वाळींत टाकलें. त्या स्थितींत ईश्वराची त्याजवर कृपा होऊन त्याला चऱ्होली गांव मोकासा मिळाला. इतकें घडल्यावर पूर्वसंस्कार जागृत झाले; व त्याच्या विचारसरणीस निराळें वळण लागून तो पुनः वैदिक धर्मानुयायी बनला; इतकेंच नव्हे तर त्यानें अग्निहोत्रहि घेतलें. या दृष्टीनें तत्कालीन ब्राह्मणवर्गाला नवविचारांचे कसे धक्के बसत होते हें समजतें.

कचेश्वरानें तुकोबावर आरत्याहि केल्या आहेत. त्यांत त्याची तुकोबावरील अनन्यभक्ति प्रतीत होतेच. पण त्याशिवाय तुकारामविषयक आख्यायिकांनाहि उजळा मिळतो. बहिणाबाई ही कचेश्वराच्या आधींच्या पिढींतील व तुकारामास समकालीन. ती कचेश्वरापूर्वींच्या पिढींतील असली तरी उत्तरवयांत कचेश्वरास समकालीन होतीच. तुकारामाच्या वह्या इंद्रायणीच्या डोहांतून कोरड्या निघाल्या हा चमत्कार ऐकल्यावरच ती कोल्हापुराहून देहूस गेली. त्यामुळें तो चमत्कार निर्विवाद ठरतो. पण तुकाराम सदेह वैकुंठाला गेला, या चमत्काराचा निर्देश तिच्या आत्मचरित्रांत कोठें आला

नाहीं. तथापि कचेश्वराच्या आरत्यांत मात्र तो आहे. कचेश्वरानें वह्या कोरड्या निघाल्याचा स्पष्ट उल्लेख केलाच आहे, पण त्याशिवाय तुकारामानें कुडीसह सायुज्यमुक्ति मिळविली असें तो मुद्दाम लिहितो. आरत्यांतील ते चरण येणेप्रमाणें –

सामर्थ्य वर्णवेना ॥ लिळा केलिया नाना । रक्षिल्या वह्या जळीं । आतां तारावें दीना ॥ १ ॥ संतांत कीर्ति केली । कुडी सायोज्यीं नेली । आश्चर्य थोर केलें । जना देख दाविली ॥ २ ॥

(भा. इ. सं. म. वार्षिक इतिवृत्त, शके १८३५)

कचेश्वर हा शाहू महाराजांच्या वेळींहि हयात होता. शाहू महाराज औरंगजेबाच्या अटकेंतून सुटून ताराबाईपासून राज्य घेण्यास महाराष्ट्रांत येत असतां त्याचा मुक्काम खेडास होता. त्या वेळीं कचेश्वर खेडांत विठ्ठल-मंदिरांत ध्यानस्थ बसत असे. त्यांस महाराज भेटले व त्यांनीं त्यास राज्यप्राप्तीविषयीं विचारलें, तेव्हां त्यानें त्यांस आशीर्वाद दिला. त्यानंतर तेथेंच शाहूचें ताराबाई पक्षाच्या फौजेशीं मोठें युद्ध झालें (इ. स. १७०८). यांत शाहूस थोर यश मिळालें. याच मुक्कामांत शाहूनें कचेश्वरास गुरु मानल्यामुळें त्याच्या वंशजास राजगुरु म्हणूं लागले. यावरून कचेश्वर दीर्घायु होऊन समाधिस्थ झाला असें दिसतें.

## प्रकरण तिसावें

# देवालयें व धर्मक्षेत्रें

### त्र्यंबकेश्वर

नाशिक व त्र्यंबक हीं अखिल भारतीय लौकिकाचीं क्षेत्रें आहेत. त्यांची प्रसिद्धि मुसलमान पूर्वकाळापासून दीड दोन सहस्र वर्षांची आहे. त्र्यंबकेश्वरीं गोदावरीचा उगम व शंकराचें मंदिर आहे. त्र्यंबकेश्वराच्या जवळच्या ब्रम्हगिरीवरून गोदावरी थेंबाथेंबानें स्रवत असून जेथें गोदोदक ठिबकतें त्यास गंगाद्वार म्हणतात. शहाजी महाराजांचा अधिकार नाशिक-त्र्यंबकेश्वरावर निजामशाही अमलाखालीं कांहीं काल चालत होता; तेव्हां गंगेचा ( गोदा ) अर्घ्य व गायमुख यांविषयीं तेथील उपाध्यायांनीं शहाजी-कडे तक्रार केली होती. मलिक अंबराच्या कारकीर्दीत तीं दोन्ही स्थानें अमानत झाल्यामुळें उपाध्यायांना आर्थिक नुकसान सोसावें लागलें. विशेषतः शके १५६९ च्या सुमारास-सिंहस्थ आल्यामुळें तें नुकसान त्यांस विशेषच जाणवलें. कारण त्या वर्षीचें उत्पन्न निजामशहा व शहाजी यांनीं निमें निमें वांटून घेतलें होतें. तरी ती आपली मिरास असून आपणांस परत मिळावी असा सोन प्रभु, दत्त देव, गणेश प्रभु व त्रिबक देव यांनीं शहाजीकडे अर्ज केला होता ( प. सा. सं. खंड १, पृ. ११७ ).

अशा रीतीनें शिवछत्रपतींचा त्र्यंबकेश्वराशीं त्यांच्या वडिलांपासून

संबंध जडला होता. तेथील उपाध्येपण शिवाजीनें वेदमूर्ति आपदेभट ढेर्गे यांस देऊन श्रीत्र्यंबकेश्वराच्या पूजा-अर्चेची व्यवस्था लावली होती. ती येणेप्रमाणें –

शिवाजीराजे भोसले यांजकडून वे. आपदे भट ढेर्गे वास्तव्य त्र्यंबकेश्वर यांस "श्रीचें तीर्थ उपाध्येपण तुम्हांस पूर्वीपासून दिलें आहे. ऐसीयास श्रीची पूजा, नैवेद्य व ब्राह्मणभोजन + दक्षिणा मोईन सालिना होनु पातशाही ६० श्रीची पूजा व नैवेद्य व नित्य दक्षिणा ४० ब्राह्मण अभिषेक अंसे १०० केले असेत" (शके १५९२ आषाढ शुद्ध १०, इ. स. १६७० जून १८. प. सा. सं. खंड ३, पृ. ११०).

शिवाजीच्या मृत्यूनंतर औरंजेबानें येऊन जी धामधूम केली तींत त्र्यंबकेश्वराचें मंदिर त्यानें उद्ध्वस्त केलें असावें. कारण पुढें पेशवाईत नानासाहेब पेशव्यानें त्याच्या बांधकामास इ. स. १७५५ त सुरुवात केली. हें काम ३१ वर्षें चालू राहून इ. स. १७८६ त पुरें झालें.

## पुळ्याचा गणपति

शिवछत्रपति कोंकणांत वाडा गणेश-पुळें, कसबे नेवरें, सुभा प्रांत राजापूर येथें श्रींच्या दर्शनास गेले होते. त्या वेळीं त्यांनीं श्रीधर भट बापट यांस श्रीस नित्याभिषेक, पूजा व प्रदक्षिणा करावयाची आज्ञा करून वर्षासन सालिना होन पातशाही २५ करून दिले त्यासंबंधीं –

"ते समयीं समस्त ब्राह्मण, वाडा मजकूर, व मालगुंड व निंबोडी या गांवचे व परगांवचे थोर थोर शिष्ट विद्वान ब्राह्मण आले होते. त्यांनीं स्वामीपाशीं विनंती केली कीं श्रीसन्निध आसमंतात् भागीं ब्राह्मणांचीं घरें आहेत. त्यामध्यें रामा भंडारी याचे निसबतीचा बाग आहे. तेथें भंडारी मजकूर माड बांधून कापतो. त्यामार्गें आम्हीं श्रीस पूजा नैवेद्य आणावा, ही गोष्ट उत्तम नसे. क्षेत्रीं ब्राह्मणांचे घराजवळीं भंडारी माड कापतो हें स्वामीस श्रेयस्कर नव्हे. शेजारी भंडारी असतां ब्राह्मणास आपले घरीं अध्ययनहि करतां नये. याकरितां ब्राह्मणांचे घरांमधून भंडारी याचें घर काढिलें पाहिजे म्हणून विदित केलें. त्यावरून स्वामींनीं भंडारी मजकूरचें घर ब्राह्मणांचे घराजवळून काढिलें" (सनदापत्रांतील माहिती, पृ. १५३).

भंडारी यांचा धंदा दारू गाळण्याचा. गणपति-पुळें येथें सदर भंडारी माड कापून त्यापासून ब्राह्मण वस्तींत राहून दारू काढीत असे. म्हणून ब्राह्मणांच्या वस्तींत राहूं देण्यास ब्राह्मणांचा विरोध होता.

## तिरुपतीचा व्यंकटेश

शिवाजीमहाराज कर्नाटकांत दिग्विजयार्थ गेले तेव्हां त्यांनीं वृद्धाचलम् येथें जाऊन श्रीचें दर्शन घेतलें. त्यापूर्वी त्यांच्या प्रवासांत वाटेवरच तिरुपतीचें स्थान होतें. त्यावर जाऊन त्यांनीं श्रीव्यंकटेशाचें दर्शन घेऊन तेथें श्रीची पूजा, अन्नछत्र इत्यादिकरितां शके १५९९ पिंगलनाम संवत्सरे वैशाख शुद्ध द्वादशी, भृगुवासर या दिवशीं तेथील पुरुषोत्तमभट बिन सोमयागभट बुरडी, धर्माधिकरणी यास वर्षासन करून दिलें. त्याची सनद. श्रीचे पूजेस प्रतिवर्षी ६ होन, कर्पूरदीप प्रतिदिनीं करीत जावा. १२ होन, क्षीराब्धि-अभिषेक श्रीनिवास मूर्तीस प्रत्यहीं करीत जावा. १२ होन, नंदादीप सर्वदा चालवीत जावा. त्यास "अन्नछत्रास प्रत्यहीं होन पादशाही एक मोईण केली आणि भट गोसावी यांचे दिमत केले. प्रत्यहीं एक होनाचें अन्न ब्राह्मणांस घालावें. वंचनार्थ कांहीं न करावा. एकूण सालिना होन पादशाही ३६०."

"श्रीची पूजा व अन्नछत्र चालवावें. यानिमित्त वेदमूर्तीस वर्षासन होन पादशाही ६० येणेप्रमाणें ४२० होन प्रतिवर्षी मोईन करून पत्र करून दिल्हें आणि एका वर्षाचें द्रव्य तेव्हांच दिल्हें" ( सनदापत्रांतील माहिती, पृ. १३४।१३५ ).

## श्रीज्ञानेश्वर

पुण्यापासून सहा कोसांवर इंद्रायणीच्या तीरीं आळंदी येथें ज्ञानेश्वरांची समाधि आहे. तिला आषाढ वद्य ११ व कार्तिक वद्य ११ स लक्षावधि यात्रा दर्शनाकरितां लोटते. त्या ठिकाणीं ज्ञानेश्वरांनीं सुमारें ६५० वर्षांपूर्वी समाधि घेतली. पुणें प्रांत ज्या अनेक क्षेत्रांनीं पावन केला आहे त्यांपैकीं आळंदी हें एक प्रमुख क्षेत्र आहे. त्याजकडे छत्रपतींचें साहजिकच लक्ष जाऊन त्यास पुढीलप्रमाणें उत्पन्न लावून दिलें.

## सनद

शके १५९३
इ. स. १६७१–७२

शिवाजीराजे साहेब दामदौलतहू – कारकून, देशमुख, देशपांडे व मोकदम क. रयानी प्रांत चाकण यांस "श्रीज्ञानेश्वर यांचें इनाम मौजे आळंदी प्रगणे मजकुरी सालाबाद जि॥ जमीन, मुजुरी, शेत सव्वादीडशें कारवे एक खंडी अडीच मण देवाचे देवास दिधलें असे. कुलबाब कुलकानू दुमाले केले असे. दुमाला करणें. यासी काडीचा तोसीस न लावणें. श्री रामानंद गोसावी तपस्वी यापाशी खत देणें."

हल्लीं आळंदीच्या देवाचें उत्पन्न पंचांच्या ताब्यांत आहे. शिवकालीं साहजिकच अशी व्यवस्था नव्हती. कोणी विरक्त भक्त समाधीपाशीं राहून व तपश्चर्या करून समाधीची पूजाअर्चा करीत. त्यांपैकींच रामानंद गोसावी हे दिसतात. ते तपश्चर्या करून तेथें राहत. त्यांजपाशींच महाराजांनीं इनामाचीं खतें देवविलीं ( प. सा. सं. खंड २, पृ. ४१२ ).

## ज्ञानेश्वरांची समाधि

श्रीशिवछत्रपति, जिजाबाई व शहाजी राजे यांनीं श्रीज्ञानेश्वरांच्या समाधीची पूजा आदीकरून व्हावी यासाठीं कांहीं व्यवस्था केली होती. पुढें औरंगजेब दक्षिणेंत आल्यावर ती व्यवस्था मोडली. त्यानंतर राजारामानें ती राज्याभिषेक शके १८ प्रजापतिनाम संवत्सरे यांत पुनः सुरू केली. त्याविषयीं त्यानें बयाजी नारायण देशाधिकारी व लेखक प्रांत जुन्नर यास आज्ञापत्र लिहिलें त्याचा सारांश :

"श्रीज्ञानेश्वरस्वामींची समाधि मौजे आळंदी, परगणे चाकण प्रांत मजकूर येथें आहे. या समाधिस्थळीं पूजा पुरस्कार चालिला पाहिजे म्हणून कैलासवासी महाराज, कैं. मातुश्री जिजाऊ व कैं. राजेसाहेब या त्रिवर्गांनीं, आपआपले वेळेस नियत करून दिली. तेणेंप्रमाणें श्रीची पूजा सांग चालत आली. त्याउपरी तांम्रांचे अवांतराकरितां भोगवटा तुटला आहे. ऐसीयासी पूर्वील मोईनप्रमाणें चालवावें व स्वामींनीं आपलियाकडूनहि विशेष मोईन करून देऊन यथासांग पूजा पुरस्कार चालवावा अशी विनंती मोरो

भास्कर कुलकर्णी यांनीं चंदीचे मुक्कामीं स्वामीसन्निध येऊन केली. त्यावरून मनास आणितां श्रीस्वामींचें सिद्धस्थान; या स्थळीं बहुत साक्षात्कार आहे. यासाठीं पूर्वी कैलासवासी त्रिवर्गसाहेबांनीं पूजेस नियत करून दिधली आहे, त्याप्रमाणें चालवावें. शिवाजीनें श्रीविठ्ठल देवास ४ धोतरें, चार शेले, रुक्मिणीस दोन लुगडीं, दोन चोळ्या, त्याशिवाय तांदूळ, कणीक, डाळ, तूप, नंदादीपासी तेल, पानसुपारी, शाक, दक्षिणा, आषाढी व कार्तिकी द्वादशी यांस क्षीराब्धि, हरभऱ्याची डाळ व गूळ अशी नेमणूक करून दिली होती. ती राजारामानें दुप्पट केली (सनदापत्रांतील माहिती, पृ. १६८।१६९).

## सासवडचे सोपानदेव

श्रीज्ञानेश्वरांचे धाकटे बंधु सोपानदेव यांचा काळ सासवडास झाला. ते त्यापूर्वी कांहीं दिवस सासवडासच वास करून असावे. हेंहि स्थळ पुण्यापासून दक्षिणेस दहा कोस असून तेथेंहि मार्गशीर्ष मासीं १३ स मोठी यात्रा भरते. सासवडाजवळून कऱ्हानदी वाहत आहे व तिला चांबळी ही लहानशी नदी तेथेंच येऊन मिळाली असून त्या नदीवरच सोपानदेवांची समाधि आहे. शिवछत्रपति बालपणीं खेडेबारें येथें राहत असत. तें खेडेबारें सासवडाच्या पश्चिमेस तीन-चार कोसांवर आहे व त्यांचा प्रिय पुरंदर गड सोपानदेवाच्या समाधीवर छाया करूनच आहे. अशा या स्थानास महाराजांनीं शके १५९३ कार्तिक शुद्ध ३ स सनद करून दिली.

## सनदेची नक्कल

२५ आक्टोबर १६७१

अजेर रा. शिवाजी राजेसाहेब – देशमुख, देशपांडे, मोकदम व रयांनीं कसबे सासवड कर्यात मजकूर यांसी – "श्रीसोपानदेव यांची समाधि कसबे मजकुरी आहे. नि॥ जमीन मुंजरी देवाभोंवतालीं थळ भाडळे पैकीं कास मण ८४॥ आहे. ते देवाचे देवास दिल्ली असे. कुलबाब कुलकानु दुमाला केले असे. थळपैकीं ८४॥ साडेचार मण बाद देणें. देवाचें देवास चालविणें.

निसबत जकातीवर व बाजारापैकीं दररोजीना मोईन सालाबादप्रमाणें चालविणें. जोरी नैवेद्या कारणें केली मामी आधोली ८८॥· व तेलाबद्दल

दिवाबत्तीस वजन टकबंदी ८८॥· आच्छेर सदरहू देवास दिल्हे असे. तालीक घेऊन असल पत्र गोसावी रामानंद याजपाशीं परतोन देणें ( प. सा. सं. खंड २, पृ. ४०१ ).

## शिराळ्याचा मारुती

सातारा व कोल्हापूर या दोन जिल्ह्यांच्या सीमेवर वारणा नदी असून तिच्याजवळ बिळाशी म्हणून मोठें गांव आहे. तेथें वेदमूर्ति रघुनाथभट वसिष्ठ गोत्री राहत असत. ते तेथील देवाची पूजाअर्चा करीत व अग्निहोत्रहि संभाळून असत. त्याकरितां त्यांस इनाम होतें. बिळाशीपासून थोड्या अंतरावर बत्तीसशिराळें हा प्रसिद्ध गांव असून त्या ठिकाणीं समर्थ रामदासस्वामींनीं हनुमानाची स्थापना केली होती. त्याच्या पूजेप्रीत्यर्थ इनाम होतें.

शके १००१ कार्तिक शुद्ध २
इ. स. १६७९ आक्टोबर २६.

अनाजी दत्तो – बाबाजी विठ्ठल सुभेदार व कारकून ता॥ मलकापूर यांस ‘ मौजे बिळाशी येथील श्रीदेवाचा इनाम पूर्वीप्रमाणें रघुनाथभट अग्निहोत्री यांकडे चालविणें. देवतार्चन त्यांचे स्वाधीन आहे. तर्फ शिराळेपैकीं मौ. काकरडे येथील इनाम शिराळ्याच्या हनुमानप्रीत्यर्थ चालविणें ’ ( प. सा. सं. खंड २, पृ. ६४७ ).

## मथुरेचें तीर्थपुरोहितपण

शिवाजीमहाराज आग्र्यास औरंगजेबाच्या भेटीस गेले होते, तेव्हां तेथून परत येतांना ते गुप्तपणें मथुरेस उतरले होते, त्यावेळीं तेथील तीर्थोपाध्यायांना आपलें पुरोहितपण त्यांना देणें शक्य नव्हतें. त्यानंतर देशीं आल्यावर हें पुरोहितपण मागण्यास बालकराम तिवारी हे आले. यापुढें महाराजांना परत दिल्ली-आग्र्याकडे जाण्याची आशा नव्हती तरी आपल्या पुत्रपौत्रांनीं मथुरेस गेल्यावर बालकरामाकडे वा त्याच्या वंशजाकडेच तीर्थविधि करावा अशाविषयीं महाराजांनीं शके १५८७ त बालकरामास सनद दिली. तीच पुढें शाहूमहाराजांनीं मान्य केली ( सनदापत्रें, पृ. ११९ ).

## देवालयाचा पुनरुद्धार

ज्यानें त्यानें आपल्या धर्माप्रमाणें वागावें अशी हिंदुधर्माची शिकवण आहे. तिचें उल्लंघन शिवाजीमहाराजांनीं कधीं केलें नाहीं. मात्र पहिलीं

हिंदूंचीं देवळें पाडून मुसलमानांनीं जेथें मशिदी बांधल्या त्यांचा विध्वंस करून त्या ठिकाणीं त्यांनीं पुनः देवालयें बांधल्याचीं थोडींच उदाहरणें उपलब्ध आहेत, त्यांपैकीं खालील उदाहरण होय. महाराजांनीं कर्नाटकावर स्वारी केली त्यावेळीं जिंजीच्या किल्ल्याची दुरुस्ती केल्यानंतर महाराज तिरुपन्न-मालेकडे गेले. महाराज शिवभक्त होते हें प्रसिद्ध आहे. म्हणून तेथील शिवाचें व समोत्तिरपेरूमल यांचें देवालय पाडून मुसलमानांनीं मशिदी बांधल्या होत्या. त्या दोन्ही मशिदी नष्ट करून तेथें त्यांनीं शिवालयांची स्थापना केली. शिवलिंगाची प्रतिष्ठापना करतांना एक लाख गाई आणिल्या होत्या. तेथील टेकडीवर कार्तिक महिन्यांत दीपोत्सव त्यानेंच सुरू केला ( शिवच. सा. खंड ८, पृ. ५५।५६ ).

## मुरुडेश्वरचा जीर्णोद्धार

नाशिक क्षेत्रांत मुरुडेश्वराचें देवालय होतें. तें स्वाभाविकपणें पडलें होतें कीं मुसलमानांनीं पाडलें होतें हें समजत नाहीं. पण त्याचा जीर्णोद्धार मुकुंद पाटील यांनीं केला व त्यांत आप्पाजीभट निरंतर यांनीं पुराण सांगावें अशी व्यवस्था केली.

श्री

गंगा, रघुवीर व श्रीसांब

शके १६०३ आषाढ शुद्ध ९
इ. स. १६८१ जून १४

वेदशास्त्रसंपन्न राजश्री आप्पाजीभट निरंतर या प्रति विद्यार्थी मुकुंद दुरडी सावरगावकर पाटील ( याचा ) साष्टांग नमस्कार विनंति. तुम्ही श्री मुरुडेश्वराचे देवालयांत पूर्वीपासून पुराण सांगत आहां. सांप्रत आम्ही या देवालयाचा जीर्णोद्धार केला म्हणोन आपण ब्राह्मण थोर विद्यासंपन्न स्नान-संध्याशील ऐसे जाणोन मुरुडेश्वराचे देवालयांत वंशपरंपरा देवाचे सान्निध्यांत पुराण सांगत जावें. यास अन्यथा कोणी करील त्याला कुलस्वामीची व श्री सांबाची शपथ असे ( शि. च. सा. खंड ५, पृ. ९१ ).

# प्रकरण एकतिसावें

# कृष्णातीर

कृष्णातीर हें शिवछत्रपतींच्या राज्यांतील धर्मक्षेत्र होतें. तेथील हवा चांगली, जमीन सुपीक, पाणी विपुल व लोक धिप्पाड. त्यांत धोम-महाबळेश्वरापासून नृसिंहवाडीपर्यंत अनेक क्षेत्रें वसलीं आहेत. पैकीं कऱ्हाड व कोल्हापूर यांची ख्याति शिलाहार, राष्ट्रकूट इत्यादि राजघराण्यांपासून आहे. या दोन क्षेत्रांचींच फक्त नांवें मुसलमानपूर्वकाळीं वाचण्यांत येतात, यावरून हल्लीं प्रसिद्ध असलेलीं क्षेत्रें तेव्हां नव्हतीं असें मानणें चूक होईल. वाईजवळील पांडवलेणीं दीड-दोन हजार वर्षांचीं जुनीं आहेत. त्या अर्थी वाईक्षेत्र तेव्हांपासून मोठें गणलें गेलें असलें पाहिजे. मुसलमानी काळांत त्याशिवाय माहुली, कोणेगांव, उंबरज, निंब इत्यादि स्थळांचा उल्लेख आढळतो व तेथील ब्राह्मणांना आदिलशाहीपासून इनामें जमिनी असल्याचें दिसून येतें. यांतील कांहीं इनामें आदिलशाहींतून त्यांस नव्यानें मिळालीं असतील व कांहीं इनामें प्राचीन हिंदुराजवटींत जीं ब्राह्मणांकडे होतीं तीं आदिलशाहीनें पुढें चालविलीं असतील. कारण कऱ्हाड वगैरे अनेक गांवांच्या ब्राह्मणांना राष्ट्रकूट, चालुक्य, यादव, शिलाहार घराण्यांतील राजांनीं अग्रहार दिल्याचे शेंकडों दाखले दाखवितां येतात. वाईला सध्यांचें रमणीय व भव्य स्वरूप पेशवाईत सरदार रास्ते यांच्या औदार्यानें व धर्मभावनेनें प्राप्त

झालें असलें तरी क्षेत्र या नात्याचा तिचा लौकिक त्याहून प्राचीन म्हणजे शिवशाहीच्या पूर्वीपासून आहे, हें वाईचे थिटे यांनीं तेथील देशपांड्यांना आपला वाद संपल्याबद्दलचें जें पत्र शके १६१० विभवनामसंवत्सरे कार्तिक शुद्ध द्वादशीसह त्रयोदशी भृगुवासरीं लिहून दिलें आहे, त्यावरून सिद्ध होतें. त्याकाळीं ब्राह्मणांत वाई येथें थिटे मंडळी, वैदिक अग्रहारी मंडळी आणि त्याप्रमाणेंच सावकार, सराफ, पोतदार, देशपांडे व कुलकर्णी यांचीं घराणीं होतीं. अग्रहारी ब्राह्मणांत नारायणभट बिन अनंतभट सप्तपुत्र ( सातपुते ), महादेवभट बिन शंकरभट पिटके, शेषाचार्य बिन कृष्णंभट रड्डी, आनंदभट बिन कृष्णंभट गिजरे, गोपाळभट बिन नरसिंहभट चित्राव, नीळकंठभट पुराणिक, मदंभट बिन शंकरभट शेंडे धर्माधिकारी, शंकर जोशी बिन कडत जोशी ग्रामजोशी, रंगाचार्ये व रामाचार्ये बिन कोनेराचार्ये अष्टपुत्रे, कुशभट बिन गोविंदभट अग्निहोत्री महाबळेश्वरकर, रामभट बिन शंभुभट प्रभुणे, बाबदेवभट बिन कृष्णंभट सुरत्राण, हरिभट बिन रुद्रभट महाभाष्य, शामभट व रामभट व नारायणभट बिन शंकरभट होशिंग, तीमणभट बिन चंद्रभट नवग्रहे, धोंडभट बिन मुकुंदभट मोने इत्यादिकांचीं नांवें आहेत. हीं नांवें सविस्तर देण्यांतील हेतु असा कीं, ते वैदिक असले तरी अग्रहार देतांना त्यांच्या इतर गुणांचाहि विचार करण्यांत आला असावा. रड्डीसारखे ब्राह्मण वैष्णव व कर्नाटकांतून आलेले दिसतात.

त्याशिवाय ज्यांना अग्रहार नाहीं पण जे वैदिक आहेत अशांचींहि कांहीं नांवें आहेत. त्यांपैकीं विश्वनाथभट बिन शिवरामभट, श्रीपतिभट बिन कृष्णभट सदावर्ती यांचीं नांवें होत. विद्वान् ब्राह्मणांना निर्वाहाची अडचण पडूं नये यासाठीं अग्रहार देण्याची वहिवाट प्राचीन काळीं होती. तिजमुळें एकाच घराण्यांत वेदविद्या व शास्त्रें अनेक पिढ्या टिकून राहिलीं. हा उपक्रम शिवकालांतहि चालू होता, असें शके १५९५ ( इ. स. १६७३ ) मध्यें शंकराजी बापूजी देशकुलकर्णी यांस लिंगोजी यमाजी व मल्हार लिंगोजी सटवे यांनीं लिहिलेल्या पत्रावरून दिसतें. सध्यां वाईस मधली आळी म्हणून जी पेठ आहे तींत पूर्वी शकर बिबीची ( मुसलमानाची ) शेरी म्हणजे मळा होता. तींत सत्यनाथपुरी नांवाची नवी पेठ वसवून ब्राह्मणांना अग्रहार घरें बांधण्यास जागा देण्यांत आली. पण इतर स्थळा-

प्रमाणें वाईवरहि सुलतानी फेरा इ. स. १६९० त संभाजीराजे यांच्या वधानंतर येऊन क्षेत्राची मृत्तिका खालीवर ( धूळधाण केली ) करण्यांत आली ( शिवचरित्र साहित्य खंड ५, पृ. १८३।१८५।२१३ ).

वाई क्षेत्राचे दोन भाग आहेत. एक पूर्वेचा व दुसरा पश्चिमेचा. पूर्व-भाग ही जुनी वाई व पश्चिम भाग ही नवी वाई. वर ज्या ब्राह्मणांचीं नांवें दिलीं आहेत त्यांपैकीं बहुतेकांचीं घरें आजहि जुन्या वाईत आहेत. जुनी वाई ही पेशवेपूर्वकालीन व नवी वाई ही पेशवेकालीन समजली जाते. नवी वाई ही रास्त्यांनीं वसविली असून तिचा प्रारंभ धर्मपुरीपासून होतो. तींत धर्मपुरी, गणपति आळी, मधली आळी व गंगापुरी या आळ्या आहेत. वर निर्दिष्ट केलेली सत्यनाथपुरी ही मधल्या आळींत आहे व तिला लागून निमजगा आहे. त्यावरून पेशवे पूर्वकाळांत धर्मपुरीपासून सत्यनाथपुरी-पर्यंतचा भाग ओसाड अथवा मुसलमानांच्या कबरस्तानाचा असावा. म्हणजे सत्यनाथपुरी ही जुन्या वाईपासून बरीच तुटक असावी व मधल्या भागांत मागाहून रास्त्यांच्या प्रोत्साहनानें ब्राह्मणवस्ती झाली असावी असें वाटतें. सत्यनाथपुरी हा गोसावी असून त्याचा मठ होता. त्याभोंवतीं जी वस्ती झाली तिला सत्यनाथपुरी हेंच नांव मिळालें.

असो; आदिलशाहींत चालू असलेलीं इनामें शिवछत्रपतींनीं कमी अधिक फरकानें पुढें कशीं चालविलीं व त्यानंतर राजाराममहाराजांनीं त्यांचें पुनरुज्जीवन कसें केलें याचा वृत्तान्त उद्‌बोधक असल्यामुळें येथें देत आहे.

## संगम-माहुली

सातान्यापासून जवळच संगममाहुली हें प्रसिद्ध क्षेत्र कृष्णा व वेण्णा या दोन नद्यांच्या संगमावर आहे. तेथील वेदमूर्ति हरभट बिन जनार्दनभट व विनायकभट बिन एकनाथभट यांनीं जिंजीस राजाराममहाराजांकडे जाऊन इनामाच्या सनदा आणिल्या.

"स्वतिश्री राज्याभिषेक शके १९ श्रीमुखनामसंवत्सरे वैशाख शुद्ध पौर्णिमा, भौमवासरे, क्षत्रिय कुलावतंस श्रीराजाराम छत्रपति यांणी देशाधिकारी व लेखक वर्तमान व भावी सुभा परगणे वाई यांसी आज्ञा केली

ऐसीजे – वेदमूर्ति हरभट व विनायकभट आफळे व समस्त ब्राह्मण वास्तव्य स्थळ माहुली संमत निंब कृष्णा-वेणी संगम यांच्याविषयीं चंदीचे मुक्कामीं स्वामी सन्निध येऊन विदित केलें कीं, विनायकभट आफळे व समस्त ब्राह्मणांस आदिलशहाचे वेळेपासून मौजे माहुली संमत मजकूर हा गांव इनाम चालत होता. त्यावरी हा देश राजश्री कैलासवासी स्वामींस ( शिवाजी ) हस्तगत जाहला. त्या दिवसापासून ब्राह्मणांचें इनाम अमानत करून ब्राह्मणांच्या योग्यता व कुटुंबें पाहून त्या त्या योग्य ब्राह्मणांस धान्य देविलें होतें. तें हा काळपावेतों चालत आलें आहे. त्या अन्नेकरून ब्राह्मणांचीं अग्निहोत्रें व कुटुंबें संरक्षण होता बहुत प्रयास होऊं लागलें यास्तव स्वामिसन्निध आलों आहों.

ऐसीयास महाराजधर्मप्रभु, कित्येक देवब्राह्मणांचें इनाम पूर्वप्रकारें चालतें केलें. तरी आपणास आदिलशहाचे वेळेस गांव इनाम चालत होता. त्या अलीकडे हा काळ पावेतों इनाम गांव न चालतां भोगवटा तुटला आहे. तरी पूर्वप्रकारें इनाम चालविण्याची आज्ञा केली पाहिजे म्हणोन श्रुत केलें. त्यावरून मनास आणिता विनायकभट आफळे व समस्त ब्राह्मण बहुत थोर, भले विद्यावंत, कुटुंबवत्सल व कृष्णातीरीं वास करून राहणारे असें जाणोन त्यांस पूर्वी धान्य द्यावयाची मोईन आहे तें अनामत करून हल्लीं नूतन इनाम मौजे माहुली संमत मजकूर हा गांव एक कुलबाब कुल कानू हल्लीपट्टी, पेस्तरपट्टी जल, तरु, काष्ट, पाषाण, निधिनिक्षेप, झाडझाडोरा, पडले पानसहित खेरीज इनामती व हक्कदार करून इनाम दिल्हा असे " ( सनदा पत्रांतील माहिती, पृ. १२६।२७ ).

शिवाजीनें इनाम जमिनी अनामत करून धान्य देण्यास सुरुवात केली पण त्या धान्यावर ब्राह्मणांचा योगक्षेम नीट चालत नव्हता हा या पत्रांतील मजकूर चिन्त्य आहे.

## ब्रह्मपुरी

रहिमतपुराजवळ कृष्णाकाठीं ब्रह्मपुरी नामक क्षेत्र आहे. तेथील ब्राह्मणांना राजारामानें राज्याभिषेक शके २५ मध्यें इनाम दिलें. त्याचें वृत्त असेंच आहे. तेथील ब्राह्मणांनाहि आदिलशाहींत गांवगन्ना इनाम जमिनी होत्या. त्या शिवाजीनें काढून घेऊन त्यांस त्याऐवजीं धान्य देण्याची वहिवाट

पाडली. पण औरंगजेबानें हा मुलूख घेतल्यावर त्यांना धान्य मिळणें बंद पडून त्यांचे हाल होऊं लागले. त्या सनदेंतील मजकूर –

" त्याउपरीं या देशांत तांब्रांची राज्यक्रांत बहुत जाली. देश अमित्राहीं आक्रमिला. तेणेंकरून कितेक ब्राह्मण स्थलांतरे गेलों होतों, ते मागती स्वस्थळास आलों. परंतु योगक्षेम चालला पाहिजे, म्हणोन राजश्री रामचंद्र पंडित अमात्य यांपाशीं येऊन विज्ञापना केली. त्यांनीं आम्हां ब्राह्मणांचें इनाम पहिलें होतें तें कुली दूर करून मौजे कोणेगाव तर्फ उंबरज श्रीतीरीं आहे, तेथें विसा पांडांचे मोजणीनें जमीन चावर पांच इनाम देऊन आपलें पत्र व पंडितराव यांचें पत्र दिल्हे आणि जमिनीचें नांव ब्रह्मपुरी असें पर्याय ठेवलें. ते भूमि केवळ पडीत पडली आहे. आपण तेथें कीर्दीविषयीं श्रम करवीत आहों. अल्प-स्वल्प उत्पन्न होतें. पण तेणेंकरून आम्हां ब्राह्मणांचा योगक्षेम चालत नाहीं. आतां महाराज देशास आले आहेत. तरी आम्हांस पांच चावरांऐवजीं १४॥ चावर जमीन द्यावी. म्हणजे ती आम्ही वांटून घेऊं व आपली स्नानसंध्यादिक, वैश्वदेव, उपासना, अग्निहोत्रादिक सत्कर्मे आचरून स्वामींस व स्वामींच्या राज्यास अभीष्टचिंतन करीत राहूं " ही विनंती मान्य करून राजारामानें राज्याभिषेक शके २५ मध्यें वरीलप्रमाणें इनाम दिलें ( सनदापत्रांतील माहिती, पृ. १३८।३९ ).

## सयदापूर कीं सिदपूर ( सिद्धपूर ) ?

कसबे कऱ्हाड येथील ब्राह्मणांनाहि सैदापुरास इनाम जमिनी आदिलशाहीपासून होत्या. कऱ्हाड हें गांव कृष्णा व कोयना या नद्यांच्या संगमावर असून सैदापूर कृष्णेच्या पैलतीरास आहे. त्या जमिनी शिवाजीनें अमानत करून ब्राह्मणांना धर्मादाय धान्य देण्याचा परिपाठ पाडला होता. पुढें औरंगजेबानें देश पादाक्रांत केल्यावर हा धर्मादाय बंद पडला. " ऐसीयास हें राज्य देवब्राह्मणांचें आहे. येथें ब्राह्मणांचें चालवावें, ब्राह्मणहि आपली स्नान-संध्यादिक कर्मानुष्ठानें आचरोन स्वामींस व स्वामींच्या राज्यास कल्याण चिंतून रहावें हें जाणून राजश्री रामचंद्र पंडित अमात्य यांनीं जन्माष्टमीचे दिवशीं श्रीकृष्णा व कुकुदमती यांच्या संगमावर जाऊन मौजे-सैदापूर कर्यात हवेली, परगणे कऱ्हाड या गांवाचें नांव सिदपूर ठेवून सदर

गांव अग्राहार करून दिला असे. याची भूमि यथा विभाग ब्राह्मण पाहून वांटून द्यावी, यास्तव राजश्री पंडितराव यांस ( राजाराममहाराज यांनीं ) आज्ञा केली असे. राज्याभिषेक शके २४ " ( सनदापत्रांतील माहिती, पृ. १३७ ).

## कऱ्हाडचे गिजरे

### ताकीद

शके १५९४, पौष शु. २

अज दि कर्यात कासेगांव किले पनाळा यांजकडून – मोकदम मौजे तांदळे व रेटरे यांस –

" नरहरिभट बिन अंतीभट गिजरे मुकाम कऱ्हाड यांस दोन होन दोन्ही गांवांत मिळून धर्मादाय चालत आहेत. तरी ते पूर्वीप्रमाणें चालविणें."

### खुर्दखत

शके १५९६, श्रावण व. १
इ. स. १६७४, ऑगस्ट ७

अजर नाइकजी राजे खराडे यांजकडून – कारकून व देशमुख मसूर यांस –

" काशीभट बिन अंतभट साो. पाटण यांस वीस बिघे इनाम जमीन चालत आहे. हल्लीं महाराजांस ( शिवाजी ) मोकासा अर्जानी जाहाला आहे. माहाराज धर्मपरायण देवब्राह्मणांचे भगत आहो. ऐसीयास आपण जानोब-दार ( ब्राह्मण ). यास्तव दहा बिघे आणखी दिल्हेया कृष्णातीरीं स्नान-संध्या करून आशीर्वाद देऊनु असो. " " तरी भट गोसावी यांस पाव चावर दुंबाला कीजे " ( प. सा. सं. खं.२, पृ. ४९९ ).

## निंबचा कमलनयन मठ

साताऱ्यापासून जवळच कृष्णातीरीं निंब ( लिंब ) या नांवाचा कसबा आहे. कृष्णेच्या एका कांठास लिंब व दुसऱ्या कांठास गोवें. नांव लिंब असलें तरी तेथील पेरूच प्रसिद्ध आहेत. या सुंदर गांवांत शिवपूर्वकालापासून कमलनयन गोसाव्यानें एक मठ स्थापन केला होता व तो सार्वजनिक मदती-वर चालविला होता. कमलनयन दसनामपंथीय मानभाव होता. पण तो मानभाव म्हणण्यापेक्षां वैष्णव गोसावी पंथाचा असावा. त्याचे विजापूर

दरबार, तेथील रणदुल्लाखान, अफजलखानप्रभृति मुसलमान सुभेदार, मराठे देशमुख इत्यादिकांवर वजन असून त्यांजकडून गांवोगांवीं त्यानें उत्पन्नें व इनामें मिळविलीं होतीं. पण त्यांची एकंदर व्याप्ति वाई, सातारा, कोरेगांव, पाटण, कऱ्हाड या तालुक्यांपुरतीच होती. निंब, गोवें, इडमिडे, निगडी, मोरगिरी इत्यादि ठिकाणीं त्यांस जमिनी इनाम मिळाल्या होत्या. खुद्द निंबास सोमाजी दिनकरराव काकडे यांनीं दहा बिघे जमीन दिली होती.

जमिनीशिवाय चिंचणेरहून पाचकुडी गहू, कसबे कुडाळाहून भात, निगडीहून रोख १५ होन आणि ठराविक गांवांहून इतर जिनसा मिळत. या मिळकतींतून कमलनयन गोरगरिबांना भंडारा घालीत असे. म्हणून मुसलमान अधिकाऱ्यांनाहि त्याजविषयीं आपुलकी वाटे. लिंब गांवांत जंगमाबरोबर लग्नकार्यांत त्यास मानपान असे.

कमलनयनाचा जोडीदार हिंगलगीर गोसावी होता. कमलनयनास इनाम इ. स. १६३७ त सोमाजी दिनकरराव काकडे यांजपासून मिळा-याचा उल्लेख आहे. नंतर इ. स. १६३८ त कमलनयन समाधिस्थ झाला व त्यापूर्वीं त्यानें मठ व इनाम आपला चेला जोगींद्रगीर याच्या स्वाधीन केला. तेव्हांपासून जोगींद्रगीर व हिंगलगीर जोडीनें मठाची व्यवस्था ठेवूं लागले. नंतर इ. स. १६४४ त मानभाव हिंगलगिरहि समाधिस्थ झाले. त्याच्या जागीं दसनाम-पंथीय शिष्यांनीं गोविंदगीर याची स्थापना केली. अशा रीतीनें जोगींद्रगीर व गोविंदगीर ही जोडी मठाधिपति बनली. हे दोघे जरी मठाधिपति झाले तरी मठ कमलनयनाच्या नांवेंच चालत होता.

मठाच्या गोव्यांतील मळ्यास पाटाचें पाणी मिळत होतें. तें (इ. स. १६५०) आठवड्यांतून दोनच दिवस मिळूं लागल्यानें मळ्याचें नुकसान होऊं लागलें. तेव्हां अफजलखानानें सर्व आठवडाभर पाणी देण्याची आज्ञा केली. मठास निंब येथें ३० बिघे, आनेवाडीस २ बिघे, इडमिडे येथें ३०, वरिये येथें ५ बिघे व निगडी येथें १५ बिघे जमीन (इ. स. १६६३) होती. निगडीच्या इनामी जमिनींतून संन्याश्यांसाठीं (?) अन्नछत्र चालविण्यांत येत होतें. इ. स. १६६५ त वाईस सर्जाखान हा सुभेदार होता. त्या वेळीं गोव्यांतील मळ्याला पाणी मिळत नाहीं असें पाहून तो वाईच्या कारकुनांना लिहितो —

इ. स. १६६५ नोव्हेंबर १३

"मोकदम मौजे गोवें हें गोविंदगिरी मुरीद कमलनयन याच्या गोवे येथील मळयास पूर्वीप्रमाणें कालव्याचें पाणी मिळूं देत नाहींत. फकिराचे इनामास तसवीस होणें अजब आहे. तरी असें न करणें" (प. सा. सं. खंड १, पृ. ३००).

निंबच्या मठांतील कुणबीण बुली हिने जीव दिला (इ. स. १६७१-७२). त्याचा विचार करण्याकरितां दसनाम मानभावांची निंबास सभा झाली. या कामीं मठपति दोषी आहेत असें सभेंत ठरून मठपतीपासून भंडारा घेऊन त्यास दोषमुक्त करावें असा निर्णय झाला (प. सा. सं. खंड २, पृ. ४१३).

शिवाजीमहाराजांचीहि निंबच्या मठावर कृपा होती. त्यांचे वाई व सातारा येथील सुभेदार कृष्णाजी भास्कर हे कुकाजी बयाजी हवालदार ताा सातारा यांस लिहितात –

इ. स. १६७५ एप्रिल ३०

रा. जोगेंद्रगीर मानभाऊ अजहत कमलनयन सेकीन निंब यास इनाम बिघे १५ आहे. ती गुदस्ता पड होती. तर आता कीर्दीस लावूं देणें. सनद पेस्तर येईल (प. सा. सं. खंड २, पृ. ५२१).

# औरंगजेबाची छावणी

डॉ. जॉन फ्रान्सिस गेमेली कॅरेरी हा फ्रेंच प्रवासी हिंदुस्थानांत आला असतां औरंगजेबाचा मुक्काम कृष्णानदीच्या कांठीं विजापूर जिल्ह्यांत गलगली येथें होता. त्याचें शिबिर पाहण्यास कॅरेरी गोव्याहून मुद्दाम गलगलीस गेला. त्यानें हा प्रवास इ. स. १६९५ च्या मार्च महिन्यांत केला. औरंगजेब व त्याचे पुत्र यांच्या छावणीनें तीन मैलांचा प्रदेश व्यापला होता. त्यांच्या छावणीभोंवतीं खंदक खणले होते. शिबिराला तीन दरवाजे असून त्यांपैकीं एक स्त्रियांकरितां व दोन बादशहा व त्याचा दरबार यांजकरितां होते. कॅरेरी याला माहिती मिळाली तिजप्रमाणें संनिवेशांत एकंदर घोडे साठ सहस्र, पायदळ एक लक्ष, उंट पांच सहस्र व हत्ती तीन सहस्र होते. त्याशिवाय बाजारबुणगे, कारागीर व व्यापारी पुष्कळच होते. छावणींतील सर्व लोक मिळून पांच लाख होते. अडीचशें बाजार होते. या सर्व छावणीनें तीस मैलांचें क्षेत्र व्यापलें होतें.

कॅरेरी यास ता. २१ मार्च रोजीं बादशहाची भेट घेण्याची संधि मिळाली. बादशहाच्या पहिल्या चौकांत ( कोर्ट ) जाण्यास दोन दरवाजे होते. आंतीलः एका तंबूत नगारे व सनया वाजत होत्या. तो चौघडा होता. तेथें एक सोन्याची घंटाहि होती. या दिवशीं दुपारींच चौघडा वाजण्यास सुरुवात झाली होती. कॅरेरी म्हणतो – 'या पहिल्या चौकांतून मी दुसऱ्या चौकांत गेलों. त्या चौकांतून राजाच्या डेऱ्यांत गेलों. डेऱ्यांत खोल्या असून त्या रेशमी व जरीच्या वस्त्रांनीं सुशोभित केल्या होत्या. या खोल्यांपैकीं एका खोलींत

राजा देशी पद्धतीच्या बैठकीवर बसला होता. तेथें उंची गालिचे पसरले होते व खांब सोन्यानें मढविलेले होते. मीं राजाला मोगली पद्धतीनें मुजरा केला व त्याजपाशीं गेलों. माझें भाषण राजाला समजून सांगण्यास मज-बरोबर ख्रिस्ती दुभाषा होता. राजानें मला युरोपच्या राज्याची (फ्रान्स) माहिती विचारली व भेटीचें कारणहि विचारलें. मीं सांगितलें, 'आपण आशिया खंडांतील सर्वांत मोठे सम्राट म्हणून इजिप्त, तुर्की साम्राज्य व इराण देश पाहात पाहात आपल्या दर्शनास आलों आहे व येथून चिनांत जाणार आहे.' मग राजानें मला तुर्कस्तान व युरोपिय राजे यांजमध्यें जें युद्ध चाललें होतें त्याची माहिती विचारली. ती मला होती तशी सांगितल्यावर राजानें मला निरोप दिला. त्यानंतर तेथून मी दुसऱ्या चौकांत आलों.

"राजाच्या तंबूस लागूनच दरबाराचा तंबू होता. तो दोन खांबी होता. तंबूला बाहेरून कनाती लावल्या होत्या आणि आंतून तलम ताप-त्याचे पडदे होते. तंबूच्या मध्यभागीं भूमीपासून चार विती उंच असा चबुतरा होता. त्याभोंवतीं दोन विती उंच रुप्याचा कठडा होता. चबुतऱ्या-वर तलम गालीचा पसरला होता. या चबुतऱ्यावरच सहा विती अंतरावर मध्यभागीं एक वीत उंचीचा दुसरा चबुतरा होता. त्याच्या चार कोपऱ्यांवर चार रुपेरी खांब असून ते तंबूच्या आढ्याला भिडले होते. यावर राजाचें सिंहासन मांडलें होतें. तेंहि चौकोनी तीन विती उंच व मढविलेल्या लांकडाचें होतें. त्यावर पाय ठेवून जाण्यास रुप्याचा चौरंग होता. सिंहासनावर पाठीमागे लोड व दोन हातास दोन उशा वा गिरद्या होत्या. सिंहासनावर बसण्याकरितां राजा काठी टेकीत आला. त्याच्यापुढें उमराव व असंख्य दरबारी चालले होते. त्याच्या अंगांत पांढरा अंगरखा असून त्याचे बंद उजव्या हाताखालीं बांधले होते. डोक्याला भर-जरीचा पांढरा रत्नखचित शिरपाव होता. पायांत मुसलमानी पद्धतीचा जोडा होता. दोन हुजरे दोन्हीकडून त्याजवर चौऱ्या ढाळीत होते. एकानें त्याच्या डोक्यावर हिरवें छत्र धरलें होतें. राजा बेताच्या उंचीचा पण वांकलेला होता. त्याचें नाक लांब, बारीक, दाढी पांढरी शुभ्र व रंग गव्हा-सारखा होता. तो सिंहासनावर बसल्यानंतर त्याजपाशीं ढाल-तलवार डाव्या बाजूस ठेवण्यांत आली.

" नंतर राजानें ज्यांचें काम असेल त्यांना आपणाकडे येण्यास हातानें खूण केली. या क्षणीं त्याजपुढें दोन चिटणीस येऊन उभे राहिले. त्यांनीं आपल्या हातांतील कागदपत्रामधील मजकूर राजास सुनावला. त्यावर त्यानें डोळ्याला चष्मा न लावतां स्मितपूर्वक सही केली. इतकें काम झाल्यावर त्याजपुढें निरीक्षणाकरितां हत्ती आणण्यांत आले. हत्तीवरील माहुतानें हत्तीचा पार्श्वभाग राजापुढें करून व त्यावरील झूल दूर सारून दाखविला आणि मग त्याचें तोंड राजाकडे वळवून व त्याच्या सोंडेस थोपटून त्याजकडून सिंहासनास सोंड वर व खालीं करून सलामी करावयास लावली.

" हत्ती निघून गेल्यावर शहा अलम याचा पुत्र म्हणजे औरंगजेबाचा नातू मुजऱ्यास पुढें आला. त्यानें वाकून जमिनीला दोनदां हात लावून राजास मुजरा केला; आणि मग सिंहासनाच्या डाव्या बाजूस बसला. त्याच्या मागून राजाचा एक पुत्र अजमशहा यानें राजास मुजरा केला व तो सिंहासनाच्या पायरीवर बसला. राजपुत्रांच्या अंगांत रेशमी अंगरखे असून त्यांवर विविध रंगांचीं फुलें काढलीं होतीं. ते ढाल-तरवार बाजूस लटकावलेले होते. त्यांचा शिरपाव रत्नखचित होता. राजघराण्यांतील पुरुषांनीं भुईला दोनदां हात लावून मुजरा करावा व बाकीच्यांनीं तीनदां हात लावून मुजरा करावा अशी शिस्त होती.

" तंबूच्या बाहेर भाल्याच्या टोंकावर राजचिन्हें असलेले भाले घेऊन उभीं राहिलेलीं नऊ माणसें होतीं. त्यांच्या अंगांत किरमिजी रंगाचे भरजरीचे अंगरखे असून त्यांच्या बाह्या रुंद होत्या. तंबूच्या उजव्या अंगास दहा बंदुकधारी व भालदार होते. त्याशिवाय कित्येक छडीदार होते. ते तंबूंत इतरेजनांना जाऊं देत नसत.

" तंबूभोंवतालच्या कुंपणाबाहेर स्वार व पायदळ, निशाणाचे व नौबत धारण करणारे हत्ती होते. त्यांजवरील नौबत सारखी झडत होती. दरबार खलास झाल्यावर राजा व राजपुत्र जसे आले तसेच लवाजम्यासह निघून गेले. त्यांपैकीं कोणी पालखींत तर कोणी शृंगारलेल्या घोड्यावर बसले. शेवटीं घोड्यावर बसून कोतवाल आठ विती लांबीचें शिंग (trumpet) वाजवीत निघाला. त्याचा कर्कश आवाज ऐकून मला हसूं आलें.

# फलश्रुति

आतांपर्यंतच्या विवरणावरून शिवाजीमहाराजांच्या राज्यपद्धतीची यथार्थ कल्पना कोणासहि येईल. शिवाजीनें स्वराज्य स्थापून मुसलमानांचें आक्रमण परतविलें व हिंदुधर्माचें रक्षण केलें. महाराष्ट्राच्या सर्वांगीण उन्नतीचें ध्येय त्याजपुढें होतें. तो गोब्राह्मणप्रतिपालक होता, विद्येचा भोक्ता होता, विद्वानांचा पुरस्कर्ता होता, वैदिक धर्माचें पुनरुज्जीवन करणारा होता, चातुर्वर्ण्याचा संरक्षक होता, विद्वन्मंडळांत वावरणारा असून त्यांच्या सल्ल्यानें चालणारा होता; पंचांगशुद्धीचें तत्त्व त्याला पटलें होतें आणि कवि व ग्रंथकार यांचा त्यानें परामर्श घेतला होता. साधुसंतांना तो अत्यंत मानणारा होता. पेशव्यांनीं पुढें श्रावण महिन्यांत दक्षिणा सुरू करून वेद व शास्त्रें यांच्या प्रसाराचें धर्मदृष्ट्या अत्यंत आवश्यक असें कार्य चालविलें त्यास त्यानें चालना दिली होती.

महाराजांनीं हिंदुधर्म व हिंदु संस्कृति यांची स्थापना महाराष्ट्रांत केल्यावर महाराजांच्या पश्चात् पेशवे व महाराष्ट्रीय सरदार यांनीं हिंदुधर्मावरील मुसलमानांचें आक्रमण कायमचें थांबविलें आणि हिंदुधर्म व हिंदु संस्कृति यांस आलेलें मालिन्य कर्नाटक, गुजराथ, माळवा, बुंदेलखंड व मध्यप्रदेश यांत जेथें जेथें मराठ्यांची सत्ता पसरली त्या सर्व प्रदेशांतून घालवून त्यांना उजळा दिला व त्यांचा ऱ्हास थांबविला. या महत्कार्याचे प्रवर्तक

श्रीशिवाजीमहाराज निवर्तल्यास आतां २७७ वर्षें झालीं आहेत. त्यांच्या मृत्यूनंतर मराठी राज्य १३८ वर्षें टिकलें व त्यामागून इंग्रजी राज्य आलें.

इंग्रजी राज्य स्थापन झाल्यावर हिंदुस्थानाच्या राजकारणास नवीन दिशा लागली. इंग्रजांनीं इंग्रजी विद्या या देशांत आणून पाश्चात्त्य राज्यपद्धति व समाजव्यवस्था यांची भारतीयांना ओळख करून दिली. त्या योगानें पाश्चात्त्यांच्या लोकशाही पद्धतीचें स्वराज्य मिळविण्याची अभिनव कल्पना आंग्ल-विद्या-विभूषितांच्या मनांत रुजली व पाश्चात्त्यांच्या दृष्टीनें हिंदुधर्मीयांकडे ते पाहूं लागतांच हिंदुधर्म व हिंदुसमाज यांत त्यांना दोष दिसूं लागले. हिंदुधर्मांतील मूर्तिपूजा कांहीं हिंदु-पुढाऱ्यांना गैर वाटून त्यांनीं ख्रिस्तीधर्माच्या धर्तीवर ब्राह्मोसमाज, प्रार्थनासमाज व आर्यसमाज यांची स्थापना केली. हिंदुधर्मांतील मूर्तिपूजा जशी त्यांना मान्य नव्हती तशी ज्ञातिव्यवस्था वा चातुर्वर्ण्य हेंहि मान्य नव्हतें. अशा पुढाऱ्यांना सुधारक ही संज्ञा प्राप्त झाली. पण त्यांची विचारप्रणालि ज्यांना पटली नाहीं आणि हिंदुधर्म व हिंदुसमाज यांचें आहे हेंच स्वरूप योग्य आहे असें ज्यांना वाटत होतें ते स्वतःस सनातनी म्हणवूं लागले. अशा रीतीनें सुधारक व सनातनी असे दोन पक्ष देशांत निर्माण झाले. पण इंग्रजी शिक्षणाचा प्रसार देशांत क्रमाक्रमानें जसजसा वाढत गेला तसतशी सुधारकांची संख्या बेसुमार वाढली व सनातनीपक्षीयांची संख्या खूपच रोडावली.

## स्वराज्याचें उदक

इंग्रजांनीं स्वराज्याचें उदक सन १९४७ सालीं काँग्रेसपक्षाच्या हातावर सोडलें आणि काँग्रेसपक्षाच्या हातीं भारताचें सार्वभौमत्व येतांच त्यांनीं आपल्या तत्त्वानुसार नवीन नवीन कायदे करून हिंदुसमाजाच्या सर्व क्षेत्रांत उलथापालथ चालविली. काँग्रेसपक्ष हा गांधींच्या अनुयायांचा पक्ष होय. गांधी हे जातपात तोडण्याच्या व हिंदूंतील अस्पृश्यता नष्ट करण्याच्या मताचे होते म्हणजे धर्मक्रान्तिकारक होते. त्याशिवाय त्यांचीं आर्थिक मतें समाजसत्तावाद्यांच्या मतासारखीं होतीं. त्यांच्या अनुयायांत कित्येक जण प्रच्छन्न व प्रकट समाज-सत्तावादीहि होते. अशा या पक्षानें हिंदुसमाजावर दुहेरी हल्ला चढविला व भारतांत अनादिकालापासून जें दृश्य दृष्टीस पडलें नव्हतें तें झपाट्यानें दिसावयास लावलें. त्यांनीं सर्व संस्थानें खालसा केलीं.

त्यांत शिवाजीमहाराजांच्या स्वराज्याचे व पेशवाईतील साम्राज्याचे जे अवशेष होते ते जळून त्यांची राख झाली. त्यामुळें भारतीय राज्याला एकसंधीपणा आला खरा, तरी हिंदुधर्म व हिंदुसंस्कृति यांचीं इंग्रजी राज्याच्या वरवंट्यांतून वांचलेलीं जीं आश्रयस्थानें होतीं त्यांचा विध्वंस झाल्यामुळें हिंदुधर्म, हिंदूंची विद्या, कला, कौशल्य यांचा पोशिंदावर्ग लयास गेला. असे संस्थानिक भारतांत सातशें-साडेसातशें होते; म्हणजे हिंदुधर्म व हिंदुसंस्कृति यांचीं साडेसातशें केंद्रें धुळीस मिळालीं.

संस्थानिकांच्या मागून दुसरा हल्ला इनामदार, सरदार, जहागीरदार यांच्या इनामी उत्पन्नांवर चढविण्यांत आला. अखिल भारतांत त्यांची संख्या लाखांनीं मोजण्यासारखी होती. संस्थानिक हे डोंगर, पर्वत, टेकड्या समजल्या तर इनामदारादि वर्ग हा वृक्षांसारखा मानावा लागेल. त्यावर हिंदुत्व व हिंदु-संस्कृति हीं घरटीं करून राहिलेलीं होतीं. त्या लाखो वृक्षांची तोड झाल्यावर ह्या घरट्यांचा व त्यांतील कच्च्याबच्च्यांचा चुराडा उडाला. इनामदारांच्या मागून महाराष्ट्रासारख्या दरिद्री प्रांतांतील जमीन-मालकांचा वर्ग कायद्याच्या बडग्याखालीं सांपडला. यांत ब्राह्मणांपैकी बहुसंख्य लोक मराठे व इतर हिंदु होते. ते कुळांकडे जमिनी लावून खेड्यांत वा शहरांत राहून कुलधर्म व कुलाचार पाळीत. अशा लक्षावधि ब्राह्मणादिकांनीं दोन सहस्र वर्षें कोकण व देश यांत हिंदुधर्म व हिंदुसंस्कृति हीं आपल्या कुवतीप्रमाणें जिवापलीकडे जतन करून ठेवलीं होतीं. त्या बिचाऱ्यांच्याहि मुंड्या कायद्यानें मुरगळण्यांत आल्या. खेड्यापाड्यांतून जे थोडे लहान-मोठे सावकार जीव धरून होते त्यांच्याहि डोक्यांत सावकारी कायद्याची कुऱ्हाड घालून त्यांचा कपाळमोक्ष करण्यांत आला. अशा रीतीने गेल्या दहा वर्षांत डोंगर, पर्वत, टेकड्या, उंचवटे जमीनदोस्त करून आणि वृक्षवेली व झाडेंझुडपें यांचा फन्ना पाडून भरतखंड हें सपाट मैदान बनविण्यांत आलें आहे.

## रशिया व भारत

भारतांतील वैश्यवर्गानें गेलीं शेंकडों वर्षें आपला दानौघ हिंदुधर्म व हिंदुसंस्कृति यांजकडे वळवून त्यांच्या संरक्षणाचें महनीय कार्य केलें आहे त्या वर्गावर अजून गदा पडली नसली तरी ती फार काळ लोटण्यापूर्वी पडणार याची त्या वर्गालाहि शंका उरलेली नाहीं. विमा कंपन्यांचा कारभार

खाजगी लोकांच्या हातून काढून आपल्या हातीं सरकारनें घेतलाच आहे. पण अजून गिरण्या व कारखाने खाजगी मालकीचे असून त्यांवर डालमिया, बिर्ला यांसारख्या उद्योगपतींनीं जी कोट्यवधि रुपयांची संपत्ति मिळविली तिच्यांतून लक्षावधि रुपये धर्मकृत्यांकडे खर्च केले आहेत. त्यांचेहि कारखाने सरकार आपल्या हातीं घेईल तेव्हां तेहि जलाशय कोरडे पडून भरतखंड अधिकच रूक्ष व माळा-मैदानासारखे रखरखीत बनेल. सारांश, भारत सरकार हें बडें भांडवलदार व कारखानदार बनत असून सर्व प्रजाजनांना कामकरी वा शेतकरी अशा निकृष्ट स्थितीस पोचवूं पाहत आहे. म्हणजे इंग्रजी राज्यांत जें आर्थिक स्वातंत्र्य जनतेस होतें तेंहि स्वराज्यांत राहणार नसून, प्रत्येक बाबतींत जनतेस सरकारच्या तोंडाकडे पाहण्याचा प्रसंग येणार आहे; आणि भारतांतील बहुविधता व वैचित्र्य मावळून जनतेचें जीवन नित्राण, निष्प्राण, रटाळ, बेचव व कंटाळवाणें होणार आहे. तात्पर्य, रशियांत जनतेची जी स्थिति आज आहे तीच बव्हंशीं भारतांत दृष्टीस पडणार आहे

हा सर्व खटाटोप भारत सरकार जनतेचें वैरी आहे म्हणून करीत आहे काय? याचें उत्तर स्पष्ट शब्दांनीं 'नाहीं' म्हणूनच द्यावें लागेल. सध्याचें सरकार स्वतःस कल्याणकारी राज्य म्हणवीत असून रामराज्यांत भारतीय प्रजा जशी सुखी होती तशी आतांची प्रजा सुखी करण्याचा त्याचा दावा आहे. त्यांनीं शेंकडों कोटि रुपयांचें कर्ज काढून व देशांतहि प्रजेवर नवे नवे कर बसवून भाकरा, नांगल, दामोदर, काकापारा, कोयना यांसारखे प्रचंड बंधारे बांधून लाखो एकर जमिनीस पाणी पुरविण्याच्या व शेतींतील उत्पन्न वाढविण्याच्या योजना आंखल्या आहेत आणि विद्युदुत्पादनानें खेडयापाडयांतूनहि लहान-मोठे कारखाने काढण्यास उत्तेजन देण्याचें ठरविलें आहे.

सरकारच्या या प्रजावात्सल्याबद्दल त्यास कोणीहि भारतीय माणूस दुवाच देईल. तथापि त्यापासून व इतर पंचवार्षिक योजनांपासून हा देश कधी व किती संपन्न होईल, याविषयीं आज अनुमान काढतां येणार नाहीं. निदान हे फायदे आज तरी दृष्टीस पडूं लागले नाहींत. देशांतील महागाईची मात्र चढती कमान आहे. लोकांना अन्न व वस्त्र यांची भ्रांति पडली आहे. कोट्यवधि लोकांवर अर्धपोटी राहण्याची पाळी आली आहे. ज्या

थोड्यांना पोटभर अन्न मिळतें त्यांचें तें अन्न सकस व पौष्टिक नसतें. त्यामुळें प्रजा अशक्त बनत चालली आहे. सध्यांच्या राज्यांत जितकी महागाई आहे तितकी पूर्वीं कोणत्याहि राज्यांत नव्हती. शिवकालांत व पेशवाईंतहि दहा-वीस वर्षांनीं दुष्काळ पडत व लाखों लोक मृत्यु पावत; पण दुष्काळ वर्षभरांत उलगडला व सुकाळ झाला कीं, दाणा-मातीबरोबर होऊन लोक धष्टपुष्ट बनत व वाटेल त्या संकटास तोंड देण्यास व पराक्रमास सज्ज असत. पण त्या काळांत दहा-वीस वर्षांनीं दुष्काळ पडत होता तर आज महागाईलाच दुष्काळ म्हणावयाचें झाल्यास दुष्काळ हा नित्याचाच होऊन बसला आहे व तो कधीं संपेल व सुबत्ता कधीं होईल हें कोणींहि राजकीय ज्योतिषी सांगूं शकत नाहीं. आणि सरकारचे उत्पादनवाढीचे प्रयत्न व लोकसंख्येचें पुढचें पाऊल यांत अशी शर्यत लागून राहिली आहे कीं, लोकसंख्येच्या बरोबरीला उत्पादन कधीं काळीं येईल यावर कोणाचाहि विश्वास बसत नाहीं. अशा रीतीनें भारतांतील प्रत्येक माणूस चिंतामग्न असून त्याला भविष्यकाळ भयाण वाटत आहे.

## धर्माची धोंड

शिवराज्याहून हल्लींच्या राज्यांत आणखीहि बरेंचसें निराळेंपण आहे. शिवाजीनें प्रवर्तित केलेला धर्म या राज्याला मान्य नाहीं. हें राज्य स्वतःला धर्मातीत म्हणवितें. म्हणजे हिंदुस्थानांत हिंदु, मुसलमान, ख्रिस्ती, पार्शी इत्यादींचे धर्म आहेत त्या धर्मांशीं या राज्याला कांहींहि कर्तव्य नाहीं. याचें कारण असें सांगण्यांत येतें कीं देशांत विभिन्न धर्मांचे अनुयायी असल्यास त्यांच्यांत भांडणें लागतात व देशाच्या ऐक्यास धोका पोंचतो, यास्तव सरकारनें धर्मापासून अलिप्त राहणेंच सुरक्षितपणाचें. शिवाय सर्वसामान्य आधुनिक शिक्षिताप्रमाणें त्यांनाहि वाटतें कीं मनुष्याला धर्माचीच मुळीं जरुरी काय! कारण नित्याच्या मानवी व्यवहारांत त्यावांचून कोणाचेंहि अडत नाहीं. मनुष्यानें काम केलें कीं त्याला पैसा मिळतो, तो पैसा खर्चला कीं जीवनावश्यक वस्तु हातीं येतात व जीवन सुरळीत चालू राहतें. शिवाय मानवाला मृत्यु हा केव्हां तरी यावयाचाच. तुम्ही धर्मानें वागला तरी मृत्यु येतो व न वागला तरीहि येतोच. मग धर्माची नसती धोंड वाटेंत हवी कशाला ? हीच विचारसरणी आपल्या राज्यकर्त्यांची

दिसते. व रशियांतहि हीच विचारसरणी कम्युनिस्ट नेत्यांनीं स्वीकारून रशियांतून त्यांनीं ख्रिस्तीधर्म खणून काढला. आमचे राज्यकर्ते येथील धर्मांना रशियाप्रमाणें खणून काढीत नाहींत हा त्यांचा समंजसपणा व सहिष्णुपणाच समजावयास पाहिजे. परंतु धर्म हे राज्यकर्त्यांनीं त्यांचें रक्षण केल्याशिवाय टिकत नाहींत असा इतिहासाचा अनुभव आहे.

भारत सरकारानें देवस्थानांचीं उत्पन्नें काढून न घेतां चालू ठेवलीं आहेत. हीहि त्यांची सहिष्णुताच म्हणावी लागेल. देवस्थान हें धर्माचें एक प्रतीक आहे. त्यांतील धर्मकृत्यें करण्यास पुरोहितवर्ग लागतो व उपासकहि लागतात. पुरोहितांस धर्मग्रंथांचें ज्ञान पाहिजे व उपासकांस उपासनेचें महत्त्व समजावयास पाहिजे. पुरोहितांस तें ज्ञान वेदपाठशाळा व संस्कृत-पाठशाळा यांतून मिळतें व उपासकांस भक्तीचें वळण घरें, पुराणे, कीर्तनें व प्रवचनें यांमार्फत मिळतें. पाठशाळा कार्यक्षम राखण्याची जोखीम सरकार निधर्मी-पणाच्या बाण्यानें पत्करण्यास तयार नाहीं. या कारणानें कार्यक्षम पुरोहितवर्ग आणि सत्पात्र पुराणिक, हरिदास व प्रवचनकार आजच मृत्युपंथास लागले असून अल्पावधींत त्यांचा मागमूसहि राहणार नाहीं. अशा रीतीनें देवाचे भक्त नाहींसे झाले व पुरोहितहि उरले नाहींत तर देवळें राहतील कशाला व तीं राहिलीं तरी त्यांचा उपयोग काय? म्हणजे सरकारी प्रयत्नाशिवाय भारतांतून धर्माचें अजिबात उच्चाटन होईल. ही स्थिति भारतीय राज्यकर्त्यांना श्लाघ्य व हितावह वाटते काय?

वास्तविक आमच्या राज्यकर्त्यांनीं धर्माला इतकें कां भ्यावें? धर्मांत असें अंगावर शहारे आणण्यासारखें भयंकर काय आहे? धर्म ही अखिल विश्वाला आपलें घर मानणाऱ्या त्रिकालदर्शी सर्वश्रेष्ठ पुरुषांनीं मानवाला दिलेली अमूल्य देणगी आहे. त्याला विकृत स्वरूप आलें असल्यास तें अज्ञ व स्वार्थी मानवांनीं दिलें आहे. सामान्य मानव आपल्या घरच्या बायका-मुलांस कुटुंब मानून फक्त त्यांच्याच पालन-पोषणाची काळजी वाहतो. पण सर्वश्रेष्ठ पुरुष वसुधैवकुटुंबकम् या उच्च भूमिकेवरून जगाकडे पाहत असतो. दोन्ही व्यवहारच आहेत. एक उच्च पातळीवरचा व्यवहार व दुसरा खालच्या पातळीवरचा व्यवहार. केवळ नीच पातळीवरून मनुष्य संसार करूं लागेल तर तो आसुरी संपत्तीच्या तडाक्यांत सांपडेल व त्यामुळें मान-

वाचा नाश होईल. यासाठीं दैवी संपत्तीचे गुण मानवांत उतरले पाहिजेत. तेंच कार्य धर्म करीत असतो.

### दैवी संपत्ति व आसुरी संपत्ति

श्रीमद्भगवद्गीतेंत दैवी व आसुरी अशा दोन्ही संपत्तींचे गुण सांगितले आहेत. दैवी संपत्तीनें मनुष्यास मोक्ष मिळतो म्हणजे मनुष्य दुःखमुक्त होतो व आसुरी संपत्तीनें तो बंधनांत म्हणजे दुःखांत पडतो. म्हणून दैवी संपत्तीचे गुण मानवांची चातुर्वर्ण्यांत विभागणी करून त्यांस वांटून देण्यांत आले आहेत. चातुर्वर्ण्य-संस्था यंत्रसामर्थ्यामुळें इंग्रजी राज्यांत फारच विस्कळित झाली असल्यामुळें चातुर्वर्ण्यान्तर्गत अनेक जातींत ते गुण उत्कटत्वाने वसत नाहींत हें खरें आहे. म्हणून सध्याचें सरकार धर्म व ज्ञातिसंस्था यांच्याविरुद्ध आहे. पण जर आहे हें स्वराज्य टिकावयास पाहिजे असेल तर धर्माशिवाय म्हणजे अभयं सत्त्वसंशुद्धि इत्यादि दैवी संपत्तीचा जनतेंत प्रसार व परिपोष झाल्याशिवाय तें टिकणार नाहीं. याकरितां धर्माची उपेक्षा न करतां आहे हा धर्म सुधारून नव्या धर्माची स्थापना करणें सरकाराचें कर्तव्य आहे. देशांत डॉ. राजेंद्रप्रसाद, डॉ. राधाकृष्णन्, डॉ. राजगोपालाचार्य यांसारखे धर्मज्ञ आहेत. त्यांची समिति सरकारानें नेमावी व तिजकडून नवीन कालाशीं सुसंगत असा धर्म स्थापण्याचा प्रयत्न करावा. सांप्रत मानवताधर्माचें नांव नवमतवाद्यांत ऐकूं येतें. तसलें नांव या धर्मास देण्यांत आलें तरी हरकत नाहीं. कोणताहि धर्म म्हटला कीं आचार आलाच. आचार म्हणजे दैवी संपत्तीचा अभ्यास होय. दैवी संपत्ति म्हणजे देवपदावर मानवाला नेणारे सद्गुण होत. सद्गुणसंपन्नता हा व्यक्ति, समाज व राष्ट्र यांच्या उत्कर्षाचा पाया आहे. त्यासंबंधीं समर्थ म्हणतात, ' हे सकळ गुणापासी गति । सगुण भाग्यश्री भोगिती । अवगुणांस दरिद्रप्राप्ति । येदर्थी संदेह नाहीं ॥ ' भारतांत अवगुणांची अभिवृद्धि होत आहे म्हणूनच त्यास दारिद्र्यप्राप्ति झाली आहे. सद्गुणांच्या प्राथमिक शिक्षणाचें स्थळ घर. यानंतरचें स्थळ शाळा. सद्गुण हे मानवांत आपोआप उद्भूत होत नाहींत. ते प्रयत्नाने रुजवावे लागतात. सद्गुणांची परंपरा टिकविण्याकरितां वर्ण वा जाति निर्माण करण्यांत आल्या. शौर्य हा गुण क्षत्रियांत जसा सहज आढळेल तसा ब्राह्मणांत आढळणार नाहीं. औदार्य हा गुण घरंदाज

श्रीमंतांच्या कुलांत जसा आढळेल तसा पिढ्यानुपिढ्या मजुरी करणारांत आढळणार नाहीं. वर्ण, जात व वंश यांत विशिष्ट गुण असतात. त्या गुणांकडे दुर्लक्ष करून सरकार आपला राज्यशकट हांकीत असल्यामुळें राज्यकारभार अपात्र लोकांच्या हातीं जाऊन त्याचा खालपासून वरपर्यंत बोजवारा उडाला आहे. कारभार नालायकांच्या हातीं गेल्यामुळें जनतेच्या कोटयवधि रुपयांची नासाडी व उधळपट्टी चालू आहे आणि लांचलुचपतीशिवाय पानहि हलेनासें झालें आहे. कारण लोकांना चांगलें बनण्याचें प्रत्यक्ष शिक्षण कोठेंच मिळत नाहीं. जें शिक्षण मिळतें तें राजकारणाचें व तेंहि निवडणुकीच्या मिषानें. पण त्यांतहि पक्षोपपक्षांचे पुढारी खोटा प्रचार करतात, जाति-जातींत द्वेष माजवितात, एकमेकांची निंदा करीत सुटतात, वर्तमानपत्रें त्यांत टवाळी, कुचाळी व शिवीगाळ यांची भर घालतात. असलें राजकारण सर्व लोकांत व आबालवृद्धांत पसरत आहे. तें बहुतांशीं स्वार्थमूलक व अधोगतीस नेणारें असतें. आसुरी संपत्ति म्हणतात ती हीच. शिवकालांत शेंकडों साधु उत्पन्न होऊन पुराण, प्रवचन व कीर्तन या द्वारा रात्रंदिवस दैवी संपत्तीच्या शिकवणीचा सतत वर्षाव करीत होते म्हणून स्वराज्य व स्वधर्म यांसाठीं झिजणारे व प्राणाची आहुति देणारे निर्भय, सात्त्विक वृत्तीचे, सत्यवचनी, त्यागी, तेजस्वी, शुचिर्भूत, क्षमावान्, धैर्यशाली, संयमी व स्वधर्माप्रमाणें आचरण करणारे असंख्य लोक निर्माण झाले.

पण आज त्या प्रकारची शिकवण जनतेस मिळतच नाहीं म्हटलें तरी चालेल व ती मिळावी यासाठीं सरकार कांहीं प्रयत्नहि करीत नाहीं. आणि उलट आसुरी संपत्तीची शिकवण व तिचें प्रदर्शन अविरत सुरू आहे. आसुरांस काय करावें व काय करूं नये हें समजत नाहीं. शुचिर्भूतपणा, सदाचार व सत्य हीं त्यांच्या गांवीं नसतात. या जगांत ईश्वर नाहीं असें ते मानतात व विषयोपभोगांत गुंग होतात आणि कोणत्याहि मार्गानें पैसा मिळविण्याच्या मागें असतात. असले लोक क्रूर कर्में आचरून जगाच्या नाशास मात्र कारण होतात. ही दुरवस्था आज आपण पाहत आहों व ती पाहून विचारी लोकांचीं मनें विषण्ण बनलीं आहेत. विद्यालयें, महाविद्यालयें व प्राथमिक शाळा यांतून लाखों नव्हे कोट्यवधि विद्यार्थी

शिकत असतां आणि वर्तमानपत्रें, मासिकें व पुस्तकें यांचे भारेच्याभारे बाहेर पडत असतां चांगलीं माणसें कां निपजत नाहींत याचा छडा लावण्यांत देशहितैषी माणसें गर्क झालीं आहेत. श्री. राजगोपालचारी व सर्व पक्षांचे उच्च पातळीवरील पुढारी धर्मशिक्षणाच्या अभावावर अचूकपणें बोट ठेवीत आहेत. पण मांजराच्या गळ्यांत घाट बांधावी कोणीं! ज्यांच्या हातांत राज्यसूत्रें आहेत त्यांनीं निधर्मीपणाच्या खोड्यांत स्वतःस अडकवून घेतलें असल्यामुळें ते धर्माची अद्यापि दखलहि घेत नाहींत. ते धर्माचे कदाचित् शत्रु असले तरी गीतेंत प्रतिपादिलेल्या दैवी संपत्तीचे ते खास शत्रु नसतील व स्वराज्य त्या गुणाशिवाय टिकणार नाहीं व उत्कर्षहि पावणार नाहीं हें त्यांनाहि कबूल करावें लागेल. शिवाजी व तत्कालीन संत यांचा दैवी संपत्तीचा जनतेंत प्रसार करण्याचा मार्ग सनातनी म्हणजे जुना होता, आतां विसाव्या शतकांतील आमचें अत्यंत अद्ययावत् म्हटलें जाणारें सर्व शक्तिमान् व सर्व साधनसंपन्न सरकार कोणता नवा मार्ग शोधून काढतें हें पाहावयाचें. कारण स्वराज्य मिळालें तरी तें टिकविण्याची जबाबदारी त्याजवर आहेच.

## तें राज्य व हें राज्य

शिवाजीचें राज्य एकट्या महाराष्ट्रियांचें होतें. हल्लींचें राज्य सर्व भारतीयांचें, सर्व जातींचें व सर्व जमातींचें आहे. यामुळें त्याची साधन-संपत्ति अनंत पटींनीं मोठी आहे. तथापि तीनशें वर्षांपूर्वी शिवाजी शस्त्रास्त्रांत पाश्चात्यांच्या जितका मागें होता तितकेंच कॉंग्रेस सरकारहि आज फार मागें आहे. त्यांना आजहि पाश्चात्त्यांनीं त्याज्य ठरविलेलीं शस्त्रास्त्रें, विमानें व लढाऊ जहाजें खरेदी करावीं लागत आहेत. यंत्रशास्त्र व भौतिक शास्त्रें यांत शिवकालांतील सारें जग बाल्यावस्थेंत होतें. पण आज या सर्व शास्त्रांत पाश्चात्त्यांनीं आश्चर्यकारक प्रगति केली आहे. त्या वेळच्या राजनीतिशास्त्रा-पेक्षां आजचें राजनीतिशास्त्र अगदींच निराळ्या पद्धतीनें प्रगत झालें आहे. लोकसत्तावाद व साम्यवाद असे दोन पक्ष जगांत उत्पन्न झाले असून त्या दोन पक्षांत हाडवैर माजून राहिलें आहे. दोनहि पक्ष अणुबॉंब व अण्वस्त्रें यांनीं सज्ज आहेत. भारतीय युद्धकाळांत एक पांडवांनीं तरी जगावें किंवा कौरवांनीं तरी जगावें इतक्या अटीला राजकारण पोचलें होतें. अगदीं तीच

स्थिति आजच्या जागतिक राजकारणाची आहे. लोकसत्ताक पक्षाचें नेतृत्व अमेरिकेकडे आहे व साम्यवादी पक्षाचें नेतृत्व रशियाकडे आहे. दोन्ही पक्ष एकमेकांना जिंकण्याच्या किंबहुना ठार मारण्याच्या प्रयत्नांत आहेत; कारण अमेरिकेला भीति वाटतें कीं साम्यवादानें जग ग्रासलें तर जगांतील विशेषतः अमेरिकेंतील लोकशाही नष्ट होऊन अमेरिकन लोकांस व्यक्तिस्वातंत्र्यास, वैभवास व श्रीमंतीस मुकावें लागून अमेरिकन राष्ट्र शूद्रावस्थेस पोचेल. उलटपक्षीं रशियास अशी भीति वाटते कीं, अमेरिकन पद्धतीच्या लोकशाहीनें सर्व साम्यवादी देश, विशेषतः रशिया ग्रासला जाऊन गेल्या चाळीस वर्षांत कामकरी व शेतकरी लोकांचें राज्य स्थिर करण्याचा जो प्रयत्न आपण केला तो धुळीस मिळेल.

अशा या दोन विभिन्न विचारप्रणालीमुळें उभय पक्षांतील रणसंग्राम अटळ झाला आहे. पं. नेहरू या दोन पक्षांत समेट घडवून आणण्यासाठीं शांतिपाठ गात आहेत. पण त्यांस त्या कामीं यश येणें सर्वथा अशक्य आहे. भारतीय युद्धाच्या वेळीं श्रीकृष्णानें मी स्वतः काळ असून लोकक्षय करण्याकरितां प्रवृत्त झालों आहे असें म्हटलें होतें. त्या प्रसंगीं जग जसें नाशासाठीं परिपक्व झालें होतें तसेंच हल्लींचें जगहि त्यानें निर्मिलेलें यंत्रशास्त्र व भौतिक शास्त्रें यांच्या योगानें नाशाची वाट चालत आहे. तो नाश फार दूर नाहीं व तो झाला म्हणजे भूमीला अपरंपार लोकसंख्येनें झालेला भार हरण होऊन जगाचे डोळे उघडतील व जगाकरितां एक धर्म स्थापण्याची विचारी लोकांना गरज वाटूं लागेल. सांप्रत हिन्दूंचा सनातनधर्म व वर्णाश्रम हा चेष्टेचा व उपहासाचा विषय झाला आहे. पण त्याचीच उपयुक्तता व सनातनत्व जगास पटून योगेश्वर श्रीकृष्णानें दिलेलें अभिवचन साकार होईल व खरी शांति तेव्हांच लाभेल. शिवाजीचें धर्मस्थापनेचें जें कार्य अर्धवट राहिलें होतें तें या भावी व भयानक जागतिक महायुद्धानंतर पूर्ण होईल असा रंग दिसतो.

समाप्त

# सूची

## ( व्यक्तिवाचक )

## ( स्थळवाचक )

# शुद्धिपत्र

| पृष्ठ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|
| ६३ | १९४० | १९०० |
| ७३ | गणेश रामचंद्र | गणेश विनायक |
| १८३ | पायऱ्या | पामऱ्या |
| २८० | १६३३ | १९३३ |
| ३०४ | कान्ता धरामृत | कान्ताधरामृत |
| ३४६ | पृ. ३४६ | पृ. ४४६ |
| ४१६ | मसूर | रहिमतपूर |
| ४६१ | संनिवेश | छावणी |

परिपूर्ति पृष्ठ १३ परिच्छेद २ अखेर ‘ हें समजेल ’ असें वाचावें.

# प्रस्तुत ग्रंथकर्त्याचीं इतर पुस्तकें

## प्रकाशित

१. मुसलमानपूर्व महाराष्ट्र
( राजकीय इतिहास ) रु. ३-८-०

२. मुसलमानपूर्व महाराष्ट्र
( सांस्कृतिक इतिहास ) रु. ४-८-०

३. शीघ्र साहित्यादर्श
( वृत्तपत्रव्यवसाय ) रु. २-८-०

४. युगप्रवर्तक शिवाजीमहाराज रु. ५-०-०

५. पेशवेकालीन महाराष्ट्र दुर्मिळ

★

## अप्रकाशित

१. रशियांतील सर्वांगीण क्रांति

२. हिंदुसमाजाची पुनर्घटना

३. चमत्कार व त्यांची मीमांसा

४. भारतांतील प्रेक्षणीय स्थळें

५. माझें जग